**शोधप्रकाशन ग्रंथमाला – ५४**

## श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचित

# श्रीसिद्धान्तशिखामणी

## ( मराठी अन्वयार्थ व भावानुवादासह )


संपादक

काव्य-सर्वदर्शनतीर्थ, वेदान्ताचार्य, विद्यावारिधि, विद्यावाचस्पति

श्रीजगद्गुरु विश्वाराध्य ज्ञानसिंहासनाधीश्वर

**श्री १००८ जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी**

जंगमवाडी मठ, श्रीक्षेत्र काशी, वाराणसी

*भावानुवाद तथा संपादनसाहाय्य*

**डॉ. चंद्रशेखर शिवलिंग कपाळे**

एम्.ए., पीएच्.डी.



**शैवभारती शोधप्रतिष्ठान**

जंगमवाडी मठ, वाराणसी – २२१ ००१

*प्रकाशक :*

**शैवभारती शोधप्रतिष्ठान**

डी. ३५/७७, जंगमवाडी मठ

वाराणसी – २२१ ००१



© शैवभारती शोधप्रतिष्ठान



प्रथमावृत्ती : १९९१ प्रती ५०००

द्वितीयावृत्ती : २००७ प्रती २०००

तृतीयावृत्ती : २०१२ प्रती २०००

ISBN : 978-93-82639-01-5

मूल्य : शंभर रुपये (१०० रुपये)

*अक्षरसंयोजन*

**शिवशक्ती कम्प्यूटर प्रोसेस**

जंगमवाडी मठ, वाराणसी – २२१ ००१

*मुद्रक*

**मित्तल ऑफसेट**

कौशलेशनगर, सुन्दरपुर, वाराणसी

*काशीज्ञानसिंहासनाधीश्वर श्री १००८ जगद्गुरू*
*डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींचे*

# *प्रास्ताविक आशीर्वचन*

## वीरशैव परंपरा

वीरशैव हा एक सनातन धर्म आहे. या धर्माला युगायुगांची परंपरा आहे. भगवान शिवाच्या आदेशानुसार श्रीमज्जगद्गुरू पंचाचार्यांनी लिंगोद्भव होऊन भूलोकात पाच ठिकाणी पंचपीठांची स्थापना करून वीरशैव धर्माची प्रतिष्ठापना केली आहे. ही पंचपीठे रंभापुरी, उज्जयिनी, केदार, श्रीशैल आणि काशीक्षेत्रामध्ये अनादिकालापासून विद्यमान आहेत. या पीठांच्या प्राचीनतेची प्रमाणे विविध ग्रंथात जशी उपलब्ध आहेत तशी ऐतिहासिक प्रमाणेसुद्धा उपलब्ध आहेत. म्हणून ही पंचपीठे वीरशैव धर्माची राष्ट्रीय पीठे म्हणून ओळखली जातात. या पंचपीठांचे शाखामठ आपल्या देशाच्या प्रत्येक प्रांतामध्ये विद्यमान आहेत.

मानवजातीच्या कल्याणासाठी अवतार घेतलेल्या श्रीमज्जगद्गुरू पंचाचार्यांनी विभिन्न महर्षींना पंचसूत्रांचा उपदेश देऊन वीरशैव धर्मदर्शनाची परंपरा स्थापित केली आहे. रंभापुरीस्थित श्रीमज्जगद्गुरू रेणुकाचार्यांनी अगस्त्यमहर्षींना 'पडविडी' सूत्राचा उपदेश केला आहे. श्रीमदुज्जयिनीस्थित जगद्गुरू दारुकाचार्यांनी दधीची महर्षींना 'वृष्टी' सूत्राचा उपदेश केला. श्रीमत्केदारस्थित जगद्गुरू घंटाकर्ण शिवाचार्यांनी व्यास महर्षींना 'लंबन' सूत्राचा उपदेश केला. श्रीशैलस्थित जगद्गुरू धेनुकर्ण शिवाचार्यांनी सानंद महर्षींना 'मुक्तागुच्छ' सूत्राचा उपदेश केला. तसेच श्रीमत्काशीस्थित जगद्गुरू विश्वकर्ण शिवाचार्यांनी दुर्वासमहर्षींना 'पंचवर्ण' सूत्राचा उपदेश केला. श्रीमज्जगद्गुरू

पंचाचार्यांद्वारा उपदेशिलेली ही पंचसूत्रे आपल्या देशाची पहिली दार्शनिक महासूत्रे होत.

या पंचसूत्रांमध्ये ईश्वर, जीव, सृष्टी, बंध, मोक्ष यांना समजून घेण्याचे विधिविधान अत्यंत सूक्ष्मरूपाने उपदेशिले आहे. वडाच्या बीजामध्ये भावी उत्पन्न होणारा विशाल वटवृक्ष जसा अत्यंत सूक्ष्मरूपाने असतो, तसेच या पंचसूत्रांमध्ये दार्शनिक तत्त्वे सूक्ष्मरूपाने निहित आहेत. आज आपल्या देशात प्रसिद्ध असलेली ब्रह्मसूत्रे, योगसूत्रे, सांख्यसूत्रे, जैमिनीसूत्रे आदी सूत्ररचनाकारांना श्रीमज्जगद्गुरू पंचाचार्यांची ही पंचसूत्रे प्रेरणास्थानी आहेत, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. श्रीमज्जगद्गुरू पंचाचार्यांच्या सूत्रांमध्ये असलेल्या अत्यंत सूक्ष्म वीरशैव तत्त्वज्ञानाचे विस्तृत विवेचन श्रीसिद्धान्तशिखामणीमध्ये पहावयास मिळते, म्हणून सिद्धान्तशिखामणी हा वीरशैवांचा धर्मग्रंथ होय.

**श्री सिद्धान्तशिखामणी व ग्रंथकार शिवयोगी शिवाचार्य :**

श्रीशिवयोगी शिवाचार्य नावाच्या थोर विद्वान् आणि श्रेष्ठ शिवयोगी यांनी अठ्ठावीस शैवागम आणि शैव पुराणे यांच्या आधारे या ग्रंथाची रचना केलेली आहे. या ग्रंथावर मरितोंटदार्य नावाच्या विद्वान् विरक्त स्वामीजींनी तत्त्वप्रदीपिका नावाची संस्कृत व्याख्या लिहिलेली असून त्यांनी आपल्या अवतरणिकेमध्ये—

**अनेकविध सिद्धान्तशिखामणिमनामयं**
**श्रीवीरशैव सिद्धान्तमेकोत्तरशतस्थलम्।**
**रेणुकागस्त्य संवादं निगमागमविश्रुतं**
**प्रदीपयति गुप्तार्थमुद्धृत्य शिवयोगिराट्।।**

अशा रीतीने ग्रंथ आणि ग्रंथकारांची मुक्तकंठाने स्तुती केली आहे. ते म्हणतात की हा सिद्धान्तशिखामणी अनेक सिद्धान्तांचा शिखामणी आहे. या ग्रंथात वीरशैव षट्स्थलसिद्धान्ताचा एकशे एक स्थलांमध्ये विस्तार केलेला आहे. निगम आणि आगमांमध्ये अत्यंत गूढरूपाने असलेल्या या सिद्धान्ताचे रेणुकागस्त्यसंवादरूपाने शिवयोग्यांचे चक्रवर्ती असलेल्या शिवयोगी शिवाचार्यांनी स्पष्टीकरण केले आहे. एका विरक्त आचार्यांनी एका शिवाचार्यांना 'शिवयोगी



चक्रवर्ती' म्हणून संबोधणे हे परस्पर सौहार्दाचे ज्वलंत उदाहरण आहे. त्यावेळी सनातन वीरशैवधर्मातील शिवभक्तीचे रक्षण करण्यासाठी श्री शिवयोगी शिवाचार्यांनी या ग्रंथाची रचना केली असल्याचे स्वतः सांगितले.

**येन रक्षावती जाता शिवभक्तिः सनातनी।**
**बौद्धादिप्रतिसिद्धान्त महाध्वान्तांशुमालिना।।** सि.शि. १.२३

यावरून कळून येते की शिवयोगी शिवाचार्यांचा काळ अर्थात् ग्रंथाचा रचनाकाळ इ.स. सहावे शतक असावे. आपल्या देशात सातव्या शतकात आद्यशंकराचार्यांचा उगम झाल्याचे इतिहास सांगतो. शंकराचार्यांच्या प्रचारकार्यामुळे बौद्धमताचा प्रचार कमी झाला होता. वरील श्लोकात बौद्धादि प्रतिसिद्धान्ताचा उल्लेख 'महाध्वान्त' महान् अंधकार असा करतात. याचा अर्थ असा की शिवयोगी शिवाचार्यांच्या काळ शंकराचार्यांच्या पूर्वीचा अर्थात सहावे शतक असला पाहिजे. ग्रंथकार शिवयोगी शिवाचार्य हे अत्यंत पवित्र विद्वत् परंपरेतील होते. त्यांच्या वंशाच्या मूळ पुरुषाचे नावही शिवयोगी शिवाचार्यच होते. त्यांच्या वंशामध्ये मुद्देव आणि सिद्धनाथ असे ही शिवाचार्य होऊन गेले. यांची ही परंपरा सुप्रसिद्ध पुत्रवर्गीय शिवाचार्य परंपरा असल्याचे दिसते. त्यांनी ग्रंथाच्या प्रथम परिच्छेदात तेराव्या श्लोकापासून विसाव्या श्लोकापर्यंत स्वतःचे वंशवर्णन केले आहे.

या सिद्धान्तशिखामणी ग्रंथात एकूण २१ परिच्छेद आहेत. १ ते ४ परिच्छेदात मंगलाचरण, कैलासवर्णन, जगत्सृष्टी आणि रेणुकाचार्यांच्या अवताराबद्दल वर्णन केले आहे. २१व्या परिच्छेदात जगद्गुरू रेणुकाचार्यांनी विभीषणाच्या प्रार्थनेवरून तीन कोटी लिंगस्थापना केल्याचा उल्लेख आहे. पाचव्या परिच्छेदापासून विसाव्या परिच्छेदापर्यंत सोळा परिच्छेदांत षट्स्थल सिद्धान्तातील ४४ अंगस्थले व ५७ लिंगस्थलांचे विस्तृत विवेचन केले आहे. षट्स्थलाचे एकशे एक अवांतर स्थलरूपाने विवेचन करणारा हा पहिला ग्रंथ आहे. शिवागमांमध्ये षट्स्थलाचे उल्लेख आहेत परंतु त्यातील अवांतर स्थलांचे उल्लेख मिळत नाहीत. म्हणून श्रीशिवयोगी शिवाचार्यांना एकोत्तरशतस्थलाचे आद्यविवेचक म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

श्रीशिवयोगी शिवाचार्यांनी ''**आलोक्य शैवतंत्राणि कामिकाद्यानि सादरम्**'' या श्लोकामध्ये सांगितल्याप्रमाणे कामिकादी वातुलांत सर्व शैवागम, शिव, स्कंद, लिंग इत्यादी सर्व शैव पुराणांचे अध्ययन करून वेदमार्गाला बाधा न आणता शिवाचाराच्या सिद्धीसाठी आणि नास्तिक मताच्या निराकरणासाठी व विद्वानांच्या समाधानासाठी वीरशैवांचे सर्वस्व असलेला, सर्वार्थांचा प्रकाशक असा, सर्व दोषांपासून मुक्त आणि शुद्ध अंत:करणाच्या शिवयोग्यांना आदरणीय असलेला सिद्धान्तशिखामणी हा ग्रंथ शिवयोगी शिवाचार्यांनी रचला आहे. यावरून असे दिसून येते की शिवयोगी शिवाचार्यापूर्वी वीरशैव सिद्धान्त सूक्ष्मरूपाने आगमादि ग्रंथात भिन्न-भिन्न ठिकाणी होता. त्याच्या आधारे शिवयोगी शिवाचार्यांनी रेणुकागस्त्य संवादाच्या रूपात सिद्धान्तशिखामणीची रचना केली.

या ग्रंथामध्ये संदर्भानुसार वेद, उपनिषदे, आगम आणि पुराणांतील अनेक अवतरणे दिली आहेत यावरून त्यांची प्रगाढ विद्वत्ता दिसून येते. शिवयोगी शिवाचार्यांना शिवयोगाची साधना करून शिवतत्त्वाचा आत्मरूपाने अनुभव असल्याने ते ब्रह्मनिष्ठ होते तसेच शास्त्राचे ज्ञाते असल्यामुळे श्रोत्रियसुद्धा होते. श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ अशा शिवयोगी शिवाचार्यांनी या ग्रंथाची रचना केली म्हणून हा एक उत्कृष्ट धर्मग्रंथ झाला आहे. या ग्रंथावर अनेक विद्वांनानी भाष्ये, टीका, संशोधन आणि प्रवचने केली व ती लिहून प्रकाशितही झाली. त्याचे संक्षिप्त विवरण पुढीलप्रमाणे आहे

१. **श्रीसिद्धान्तशिखामणि : ( मूळ ग्रंथ )** –श्रीशिवयोगी शिवाचार्य, सुमारे सहावे शतक.

२. **श्रीसिद्धान्तशिखामणि : 'तत्त्वप्रदीपिका' संस्कृत व्याख्यानासह** – श्री मरितोंटदार्य, १७ वे शतक.

३. **कैवल्यसार ( एकोत्तरशतस्थले )** – श्री मरितोंटदार्य, १७ वे शतक.

४. **शिवाधिक्य शिखामणि** – कन्नड भाष्य 'सिद्धार्थ बोधिनी' सह-सोसले रेवणाराध्य, १७वे शतक.



५. **श्रीसिद्धान्तशिखामणि** – मरितोंटदार्यांच्या संस्कृत भाष्यासह तेलुगू परिष्करण, पी. आर. करिबसव शास्त्री, इ.स.१८८० प्रकाशक : यजमान वीरसंगप्पा, म्हैसूर.

६. **वीरशैव श्रीसिद्धान्तशिखामणि** – रस्तापुर गठद हल्लद बसवार्य (कन्नड) इ.स. १९०२.

७. **श्रीसिद्धान्तशिखामणि** – मरितोंटदार्यांच्या संस्कृत भाष्यासह मूळ श्लोकांचा मराठी भावार्थ मणूरमठाध्यक्ष मल्लिकार्जुन शास्त्री, वारद ग्रंथमाला, ग्रंथ क्र. १७, दोन भागांत इ.स. १९०५.

८. **श्रीसिद्धान्तशिखामणि** – (मरितोंटदार्यांच्या संस्कृत भाष्याच्या आधाराने कन्नड टीका 'तात्पर्य दीपिका'सह) श्री एन. आर. करिबसव शास्त्री, इ.स. १९१४, प्रकाशक : यजमान वीरसंगप्पा, म्हैसूर.

९. **श्रीसिद्धान्तशिखामणि** – 'भावप्रकाश' या कन्नड टीकेसह – पं० काशीनाथ शास्त्री, १९३६ म्हैसूर.

१०. **श्रीसिद्धान्तशिखामणि** – तेलुगू आणि कन्नड आवृत्त्यांच्या आधाराने मरितोंटदार्यांच्या संस्कृत भाष्याचा कन्नड अनुवाद – एम्. एल. नागण्णा, इ.स. १९५९.

११. **श्रीसिद्धान्तशिखामणि ( प्रवचने )** – श्री मल्लिकार्जुन स्वामी – प्रकाशक, श्री सिद्धेश्वर, शिवानंद मठ, गदग. (कन्नड) इ.स. १९६६; (मराठी अनुवाद) श्रीकांत अळ्ळी, संकेश्वर, प्रकाशक शिवानंद मठ, गदग १९७६.

१२. **मणिकांति ( १९५१ ), मणिमुकुर** (कन्नड पद्यानुवाद, १९५६) – **मणिवचनगळु, जीवनसिद्धान्त** (सिद्धान्तशिखामणी वरील विशेष कन्नड व्याख्याने भाग १ ते ६, इ.स. १९६९-७०), **सिद्धान्तशिखामणि सौंदर्य दर्शन** इत्यादी विमर्शात्मक कृती – डॉ. ज.च.नि. प्रकाशक, निडिमामिडी पुस्तक भांडार, बेंगलोर.

१३. **श्रीसिद्धान्तशिखामणि ( तमिळ अनुवाद )** – शिवप्रकाश स्वामी, तिरुवण्णमलै, प्रकाशन – कुंभकोणम्.

१४. **श्रीसिद्धान्तशिखामणि ( तेलुगू अनुवाद )** – श्री चन्नपुग्गड नागेश्वर राव.

१५. **श्रीसिद्धान्तशिखामणि ( रेणुकगीता )** – भामिनी षट्पदीमध्ये कन्नड पद्यानुवाद, एस्. एम्. सिद्धय्या (निजगुणसिद्ध), चित्रदुर्ग.

१६. **श्रीसिद्धान्तशिखामणि** – (हिंदी पद्यानुवाद) – डॉ. पुट्टराज गवई, गदग, इ.स. १९७७.

१७. **श्रीसिद्धान्तशिखामणिः** – (संस्कृत श्लोक, मरितोंटदार्यांचे संस्कृत भाष्य आणि दोन्हींचा मराठी भावानुवाद) – संपा. श्रीकाशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी, संपादनसाहाय्य व मराठी भावानुवाद – डॉ. चंद्रशेखर शि. कपाळे, पं. शरणय्याशास्त्री व डॉ. शे. दे. पसारकर, प्रकाशन– वीरशैव साहित्य संशोधन मंडळ, सोलापूर, इ.स. १९९०.

१८. **श्रीसिद्धान्तशिखामणि** – (एन्. आर. करिबसव शास्त्री यांच्या ग्रंथाचे संपादन व पुनर्मुद्रण) – प्रा. सं. शि. भूसनूरमठ व डॉ. एम्. जी. घिवारी, १९७२ प्रकाशक – श्रीमद्वीरशैव शिवयोगमंदिर, बेळगाव, १९९२ (बेळगाव येथे भरलेल्या अ.भा. वीरशैव महासभेच्या २१ व्या अधिवेशनात श्रीकाशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींच्या हस्ते प्रकाशित झाला. दि. १२–५–१९९२).

१९. **श्रीसिद्धान्तशिखामणी प्रवचनप्रभे** – (किरण १ ते ८ कन्नड व किरण १, २ मराठी प्रवचन शैलीतील पुस्तिका) – डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी, प्रकाशक : अमरेश्वर मठ, गुळेदगुड्ड – १९८६ ते ९०.

२०. **जन्म हा अखेरचा** – (सिद्धांतशिखामणी–१०१ स्थलांवरील प्रवचने– मराठी) – श्रीकाशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी, संपादन / अनुवाद : डॉ. शे. दे. पसारकर, प्रकाशक : विश्वाराध्य ज्ञानसिंहासन, जंगमवाडीमठ, वाराणसी, चौथी आवृत्ती, २०००.



**२१. श्रीसिद्धान्तशिखामणी ( शिवयोग शास्त्र ) :**

महाराष्ट्रातील राष्ट्रसंत ष.ब्र. शिवलिंग शिवाचार्य स्वामीजी अहमदपूर हे ज्येष्ठ शिवाचार्य असून त्यांनी वीरशैव संतवाङ्मयाचा सखोल अभ्यास करून त्याविषयी विपुल ग्रंथलेखन, संपादन केले आहे. संतशिरोमणी मन्मथस्वामींच्या परमरहस्य ग्रंथाच्या अनेक आवृत्त्या काढून पारायण, भजन, कीर्तनाच्या माध्यमातून मोठा धर्मप्रसार केला. कीर्तनकारांची एक मोठी फळी निर्माण केली. अशा या आचार्यांनी सिद्धांतशिखामणी ग्रंथावर संस्कृत भाष्य व मराठी अनुवाद विस्तृत प्रस्तावनेसह 'शिवयोगशास्त्र' नावाचा ग्रंथ सिद्ध केला. हा ग्रंथ मरितोंटदार्यांच्यानंतर लिहिलेले दुसरे संस्कृतभाष्य असून हा ग्रंथ १९९२ साली प्रकाशित झाला.

**२२. श्रीसिद्धान्तशिखामणी – मराठी ओवीबद्ध टीका**

सौ. महानंदा शिवाप्पा खके यांनी या ग्रंथावर मराठी ओवीबद्ध टीका लिहिली असून श्रीपलसिद्ध दर्शन मासिकातून त्याचा काही भाग क्रमशः प्रसिद्ध झाला आहे.

**२३. श्रीसिद्धान्तशिखामणी विवेचन**

महाराष्ट्रातील लिं. श्री विश्वनाथ चांडोळे यांनी या ग्रंथाच्या प्रत्येक स्थलावर क्रमशः विवेचन लिहिले असून ते २००४ साली प्रकाशित झाले आहे.

**२४. श्रीसिद्धान्तशिखामणी : कन्नड पारायणग्रंथ**

या ग्रंथात पारायणासाठी आवश्यक तो न्यास, ध्यान, माहात्म्य आणि फलश्रुतीचे संयोजन केले आहे. श्रीमत्काशी महास्वामीजी डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी प्रत्येक श्लोकाचा भावार्थ जोडला असून बेंगळूरूचे डॉ. सिद्धलिंगप्पा यांनी संपादन केले आहे. इ.स. २०११ साली प्रकाशित झालेल्या ग्रंथाच्या ४०००० प्रती मुद्रित होऊन विविध ठिकाणी वितरित झाल्या आहेत. या ग्रंथाच्या एक लक्ष प्रती मुद्रणाचा संकल्प आहे.

**२५. श्रीसिद्धान्तशिखामणी : तेलुगू पारायणग्रंथ**

तिरुपती विश्वविद्यालयाचे प्रा. डॉ. के. प्रताप यांनी तेलुगू भावानुवादासह हा ग्रंथ संपादित केला असून इ. २०१२ सालच्या श्रीमत्काशीज्ञानसिंहासनाधीश्वर

जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींनी श्रावणमास अनुष्ठानात आंध्र प्रदेशातील बारा जिल्ह्यांत संचार करून या ग्रंथाच्या दहा हजार प्रती घरोघर पोचविण्यात आल्या.

**२६. श्रीसिद्धान्तशिखामणी : तमिळ पारायणग्रंथ**

पांडीचेरीचे डॉ. टी. गणेशन् यांनी या ग्रंथाचे तमिळ अनुवादासह संपादन केले असून लवकरच तो प्रकाशित होणार आहे.

**२७. श्रीसिद्धान्तशिखामणी : मल्याळम् पारायणग्रंथ**

या ग्रंथाचे संपादन केरळातील कालडी विश्वविद्यालयाचे प्रा. डॉ. नटेशन यांनी केले असून अनुवाद श्रीमती अंबिका अप्पू कुटन यांनी केला आहे. लवकरच याचे प्रकाशन होणार आहे.

**२८. श्रीसिद्धान्तशिखामणी : मराठी पारायणग्रंथ**

महाराष्ट्राचे वीरशैव मराठी वाङ्मयाचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ. शे. दे. पसारकर यांनी 'श्रीसिद्धान्तशिखामणी-तत्त्वामृत' या नावाने मराठी ओवीटीका लिहिली असून संपादनही केले आहे. डिसेंबर २०१२ मध्ये या ग्रंथाचे प्रकाशन होणार आहे.

**२९. श्रीसिद्धान्तशिखामणी : रशियन पारायणग्रंथ**

युक्रेनमधील कु. युलिया उर्फ गौरी यांनी या ग्रंथाचा रशियन अनुवाद करून ग्रंथ संपादित केला आहे. २ जून २०१२ ला मास्को येथे श्रीकाशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींच्या अमृतहस्ते या ग्रंथाचे प्रकाशन झाले.

**संशोधनकार्य**

श्रीकाशीजगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींनी 'श्रीसिद्धान्त-शिखामणेर्दशनान्तरीय सिद्धान्तैः सह समीक्षा' या नावाने शोधप्रबंध लिहून १९८४ साली डॉ. संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालयाकडून डॉक्टरेट पदवी विद्यावारिधि (पीएच्.डी.) मिळविली आहे. केंद्र सरकारच्या मानवसंसाधन मंत्रालयाच्या



अनुदानाने १९८९ साली हा प्रबंध ग्रंथ मुद्रित झाला असून तो संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालयाच्या शक्तिविशिष्टाद्वैत वेदांत विभागाच्या आचार्य पदवीसाठी पाठ्यग्रंथ म्हणून स्वीकृत झाला आहे.

श्रीशैलपीठाचे विद्यमान जगद्गुरू डॉ. चन्नसिद्धराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजींनी 'श्रीसिद्धान्तशिखामणी गीतयोः मीमांसा' या विषयावर शोधप्रबंध लिहून काशी हिंदू विश्वविद्यालयाच्या दर्शनशास्त्र विभागात 'दर्शनशास्त्रचक्रवर्ती' (पीएच्.डी.) अशी उपाधी प्राप्त केली आहे. त्या संस्कृत शोधप्रबंधाचे प्रकाशन रंभापुरी पीठाद्वारा २००४ साली झाले.

'शैवागम आणि सिद्धांतशिखामणि तौलनिक अध्ययन' या विषयावर बेंगलोर येथील विभूतिपुर मठाचे श्री ष.ब्र. डॉ. महांतलिंग शिवाचार्य स्वामीजी यांनी बेंगलोर विश्वविद्यालयाच्या संस्कृत विभागामध्ये डॉ. सी. शिवकुमार स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरेट (पीएच्.डी.) प्राप्त केली. हा प्रबन्ध ग्रंथ डिसेंबर २०१२ मध्ये प्रकाशित होणार आहे.

**श्रीसिद्धान्तशिखामणी चर्चासत्रे :**

१९९७ साली काशीपीठामध्ये झालेल्या कोटिबिल्वार्चन या धार्मिक कार्यक्रमाच्या सांगतासमारंभी अखिल भारतीय स्तरीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. त्यावेळी वीसपेक्षा अधिक मूर्धन्य विद्वानांनी सिद्धान्तशिखामणी ग्रंथातील विविध विषयांवर निबंध प्रस्तुत केले होते. ते सर्व निबंध प्रश्नोत्तरांसह 'सिद्धान्त-शिखामणी समीक्षा' नावाने २०००साली काशीपीठातर्फे प्रकाशित झाले आहे.

'जागतिक धर्मावर श्रीसिद्धान्तशिखामणीचा प्रभाव' या विषयावर एक चर्चासत्र म्हैसूर येथे आयोजित करण्यात आले होते. सिद्धान्तशिखामणी ग्रंथाची इस्लाम, ख्रिश्चन, जैन, बौद्ध आदी धर्मांच्या अभ्यासकांनी आपापल्या धर्मग्रंथाशी तुलना करून काही निबंध प्रस्तुत केले होते. त्यात सिद्धान्तशिखामणी जागतिक दार्शनिक ग्रंथ असल्याचे सिद्ध झाले. या सर्व निबंधांचे संकलन करून 'आधुनिक जगाला सिद्धान्तशिखामणीचे योगदान' असा ग्रंथ सिद्ध झाला. त्याचे प्रकाशन २००६ साली वीरशैव अनुसंधान संस्था बेंगळूरूच्या वतीने करण्यात आले.

काशीक्षेत्रामध्ये इ.२००७ साली श्री काशीजगद्गुरू महास्वामीजींच्या एकसष्टीच्या निमित्ताने अखिल भारतीय साहित्य संमेलन घेण्यात आले होते. त्यावेळी श्रीसिद्धान्तशिखामणी ग्रंथावर आधारित, अनुवादित व विवेचन केलेल्या साहित्यावर एक सत्र आयोजित करण्यात आले होते. यात विविध भाषीय देशी व विदेशी अभ्यासकांनी शोधनिबंध प्रस्तुत केले होते. यातील मौलिक संशोधन व व्याख्यान पाहिल्यावर हा ग्रंथ किती मौलिक आणि उपयुक्त आहे हे लक्षात येते.

**श्रीसिद्धान्तशिखामणीचे साहित्यसौंदर्य :**

श्री शिवयोगी शिवाचार्यांनी या संपूर्ण ग्रंथात पारंपरिकरित्या अनुष्टुप् छंदाचा वापर केला आहे. प्रत्येक परिच्छेदाच्या शेवटी मालिनी, वंशस्थ, शार्दूलविक्रीडित, वसंततिलका, पुष्पिताग्रा इत्यादी छंदांचा वापर केला आहे. त्यामुळे ग्रंथकर्ते केवळ दार्शनिक नसून एक महाकवी होते हे लक्षात येते. तसेच 'सर्गबंधो महाकाव्यम्' या निकषाप्रमाणेही सिद्धान्तशिखामणी महाकाव्य आहे असे सिद्ध होते. या महाकाव्याचे नायक जगद्गुरु रेणुकाचार्य हे आहेत. ते धीरोदात्त नायकापेक्षाही उत्कृष्ट गुणांनी युक्त आहेत. या ग्रंथात ज्याला शिष्य म्हणून उपदेश करतात त्या अगस्त्याच्या गुणांची ते प्रशंसा करतात. ज्याच्यावर अनुग्रह करून तीन कोटी लिंगस्थापना करतात त्या विभीषणाच्या गुणांचीही प्रशंसा करतात, भगवान शिवांनी भूलोकात जाण्याची आज्ञा दिल्यानंतर भगवान शिवाची आज्ञा शिरसावंद्य मानून किंचिदपि प्रतिवाद न करता ते भूलोकात अवतार घेतात, वीरशैव धर्माची स्थापना करतात. रावणाचा तीन कोटी लिंगस्थापनेचा संकल्प पूर्ण करण्यासाठी ते स्वतःहून श्रीलंकेत जातात. लोकोपकारासाठी आमंत्रणाची वाट न पाहता विभीषणाच्या विनंतीवरून लिंगस्थापना करतात यावरून भगवत्पाद जगद्गुरू रेणुकाचार्यांच्या ठायी असलेल्या कारुण्याची परमावधी आहे हे लक्षात येते. एखाद्या महाकाव्याचा नायक धीरोदात्त असावा अशी सामान्य अपेक्षा असते. परंतु येथे तर शिवासमान अणिमादी अष्टैश्वर्यसंपन्न जगद्गुरू नायकरूपाने प्राप्त झाले आहेत. दुर्बोध असा तत्त्वज्ञानाचा उपदेश अगस्त्याला करताना विविध दृष्टांतांनी ते विषय सोपा करून सांगतात, हेही कारुण्याचेच द्योतक आहे. असे रेणुकाचार्य धीरोदात्त नायकापेक्षाही सर्वथा सरस असल्याने ते महानायक सिद्ध होतात व सिद्धान्तशिखामणी हा ग्रंथही महाकाव्य सिद्ध होतो.



बहुधा काव्यामध्ये अलंकारांचे प्रयोग कवी करत असतो, तसे शिवयोगी शिवाचार्यांनीही ग्रंथात उपमा (३-२२), मालोपमा (१६-१९), प्रतिवस्तु उपमा (१३-६,७), रूपक (१-१, १९-१४), परिकरा (५-७३), अनुप्रास (३-१९, ६-३९) इत्यादी शब्दालंकार व अर्थालंकारांचा भरपूर उपयोग केला आहे.

शैलीच्या दृष्टीने विचार केल्यास हे वैदर्भी शैलीचे काव्य असल्याचे लक्षात येते. कोमल पदांचा वापर, समासरहित रचना सहज बोध असल्यामुळे व प्रसाद गुणांनी युक्त काव्य असल्याने रचना प्रासादिक झाली आहे. श्रुतिकटुत्व, दुरान्वय, क्लिष्टता इत्यादी दोष यात दिसत नाहीत, असे विचार काशी विश्वविद्यालयाचे निवृत्त आचार्य, शास्त्रचूडामणी विद्वान् प्रो. डॉ. राधेश्याम चतुर्वेदी यांनी सिद्धान्तशिखामणी हिंदी व्याख्या या ग्रंथाच्या भूमिकेमध्ये व्यक्त केले आहेत.

या ग्रंथाचा स्वाध्याय करत असताना साधकाला सांसारिक विषयांवरील निरासक्ती उत्पन्न होऊन गुरू, लिंग, जंगम, विभूती, रुद्राक्ष, मंत्र, पादोदक आणि प्रसाद या विषयांवर उत्तरोत्तर श्रद्धा वाढत जाऊन स्वाध्यायकर्ता हळूहळू शांतरसाने परिपुष्ट होतो. शांतरसाने परिपुष्ट शिवभक्ती वाढते. भक्तीच्या योगाने लिंगांग-सामरस्यरूप मुक्ती प्राप्त करून साधक जननमरणाच्या फेऱ्यातून कायमचा सुटतो.

श्रीसिद्धान्तशिखामणी मराठी अन्वयार्थ आणि भावानुवाद असलेल्या ग्रंथाची तिसरी आवृत्ती काढताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर कपाळे यांनी १९९२ साली काशीपीठात वास्तव्य करून महास्वामीजींच्या सहयोगाने अतिशय उत्कृष्ट असा प्रत्येक श्लोकाचा अन्वयार्थ व भावार्थ लिहून महाराष्ट्रातील जिज्ञासू वीरशैवांसाठी अत्यंत मोलाचे कार्य केले आहे. विद्याव्यासंगी, कवी, चिकित्सक, अभ्यासक आणि उत्तम लेखक अशा रीतीने प्रा. कपाळे यांचे व्यक्तिमत्त्व विकसित झाले होते. शासकीय महाविद्यालय,

गुलबर्गा येथील प्राचार्य- पदावरून सेवानिवृत्त झाल्यानंतर काशीक्षेत्री राहून आमच्यासोबत दररोज आठ तास बसून त्यांनी हा ग्रंथ पूर्ण केला. खरोखरच त्यांची धर्मप्रीती व वाङ्मयप्रीती प्रशंसनीय आहे. प्रा. कपाळे हे केवळ साहित्यिकच नव्हते तर दानशूरही होते. त्यांनी मराठी साहित्यिकांचा प्रतिवर्षी सत्कार व्हावा म्हणून एक लक्ष रुपयांचा निधी आपल्या मुलांकडून काशीपीठाला दिला व त्याच्या व्याजातून मराठी संशोधक विद्वानांस डॉ. चंद्रशेखर कपाळे साहित्य पुरस्कार दिला जात आहे. अशा रीतीने डॉ. कपाळे अजरामर झाले. त्यांच्या आत्म्याला चिरशांती प्राप्त झालेलीच आहे. त्यांच्या परिवाराला अनंत मंगल आशीर्वाद.

**श्रीसिद्धान्तशिखामणी पारायण विधि व फलश्रुती**

हा ग्रंथ काशीपीठाच्या शैवभारती शोध प्रतिष्ठान तर्फे तिसऱ्या आवृत्तीच्या रूपाने प्रकाशित होत आहे. या ग्रंथामध्ये पारायणासंबंधी न्यास, ध्यान, माहात्म्य व फलश्रुती जोडलेली असून भगवद्गीतेसारखे संस्कृत सिद्धान्तशिखामणीचे ही पारायण भाविकांना करता यावे या दृष्टीने हा प्रत तयार केली आहे.

श्रीसिद्धान्तशिखामणी श्रीजगद्गुरू रेणुकभगवत्पादांच्या मुखारविंदातून विनिसृत झालेला आहे. हे एक दिव्य शिवयोगशास्त्र आहे. तसेच **मंत्रमूलं गुरोर्वाक्यं** या उक्तीनुसार जगद्गुरुमुखातून निघाल्यामुळे हा एक महामंत्रसुद्धा आहे. अर्थात् श्रीसिद्धान्तशिखामणी एक शास्त्र महामंत्र आहे असे सिद्ध होते. या मंत्राचे द्रष्टा शिवयोगी शिवाचार्य ऋषी आहेत. मुख्य छंद अनुष्टुप् आहे. सच्चिदानंद परशिव हे अधिष्ठात्री देवतारूप आहेत म्हणून सच्चिदानंदरूपी परशिवाच्या अनुग्रहासाठी सिद्धान्तशिखामणी शास्त्रमहामंत्राचा पाठरूपी जपाचा विधी सांगितलेला आहे. या मंत्रात ४५४८८ अक्षरे आहेत. या अक्षरात्मक शास्त्रमहामंत्राचे पारायण करण्याची परंपरा आपल्या देशात अनादिकालापासून चालत आलेली आहे. 'पारायणमिति ख्यातं सद्योमुक्तिप्रदं नृणाम्' असे श्रीमद्भागवतामध्ये ग्रंथपारायणाचे महत्त्व सांगितलेले आहे, म्हणून आपल्या देशात शिवमहापुराण, दुर्गासप्तशती, भागवतमहापुराण, श्रीमद्भगवद्गीता, शिवलीलामृत, शिवसहस्रनाम, ज्ञानेश्वरी, परमरहस्य, ललितासहस्रनाम, विष्णुसहस्रनाम आदी चे विविध संप्रदायाचे लोक पारायण करतात.



श्रीसिद्धान्तशिखामणी वीरशैव धर्माचे शिवयोगशास्त्र प्रतिपादन करणारा सर्वोत्कृष्ट धर्मग्रंथ आहे म्हणून प्रत्येक वीरशैवाने आपल्या इष्टलिंगपूजनानंतर श्रीसिद्धान्तशिखामणीचे पारायण केले पाहिजे. श्रीसिद्धान्तशिखामणीमध्ये एकूण २१ परिच्छेद आहेत. प्रतिदिन तीन परिच्छेदाप्रमाणे केले तर एका सप्ताहात एक पारायण होते. एका दिवसाला एक परिच्छेद या प्रमाणे २१ दिवसात एक पारायण होते. या ग्रंथात १०१ अवांतर स्थले आहेत. दररोज एक स्थलाप्रमाणे पारायण करून १०१ दिवसातही हे पारायण पूर्ण करता येईल. ज्याला शक्य असेल त्याला विशेष पर्वकाळी श्रद्धाभक्तीने एका दिवसातही पारायण करता येईल. उदाहरणार्थ सोमवारी, श्रावण सोमवारी, मास शिवरात्री, महाशिवरात्री, प्रदोष, स्वतःचे वाढदिवशी, मुला-मुलीचे वाढदिवशी, आई-वडिलांची पुण्यतिथी, गुरूंची पुण्यतिथी, लग्नाचा वाढदिवस इत्यादी निमित्ताने हे करता येईल. पारायण हे जपाच्या समान कोटीच्या असल्याने पारायणकर्त्याला पुण्यप्राप्ती होते. त्या पुण्याईने त्यांना अपेक्षित भोग-भाग्य प्राप्त होतात. या पारायणाबरोबर त्याचे स्वाध्याय आणि चिंतन केले तर शिवाद्वैतज्ञान प्राप्त होऊन शेवटी लिंगांगसामरस्यरूपी मुक्ती प्राप्त होते. म्हणूनच श्री शिवयोगी शिवाचार्यांनी ग्रंथाचे शेवटी फलश्रुतीमध्ये **'स याति विमलां भुक्तिं च मुक्तिं परां'** असे सांगितले आहे. म्हणून प्रत्येक शिवभक्ताने प्रतिदिन श्रीसिद्धान्तशिखामणीचे वर सांगितलेल्या विधिपैकी कुठल्याही विधीने, निमित्ताने, श्रद्धाभक्तीने पारायण करून भोगमोक्ष प्राप्त करून घ्यावे.

ग्रंथाच्या मुद्रणकार्यात चिदानंद ओ. हिरेमठ (कसगी) यांनी संगणकीय अक्षर जुळणी अल्पवेळात करून दिल्याबद्दल त्यांना अनंत मंगल आशीर्वाद. ग्रंथाच्या मुद्रणासंबंधी इतर कार्य अत्यंत निष्ठेने पार पाडणारे शैवभारती शोधप्रतिष्ठान चे कार्यवाह डॉ. जी.सी. केंडदमठ यांनाही मंगल आशीर्वाद. या ग्रंथाचे मुद्रण त्वरित गतीने चालू असताना काशी यात्रेच्या निमित्ताने आलेल्या

संस्कृत विद्वान् पं. शिवाप्पा नागनाथअप्पा खके यांनी आमच्या आग्रहामुळे काशीक्षेत्री पंधरा दिवस थांबून या ग्रंथाचे मुद्रणदोषसंशोधन केले आणि आमच्या प्रास्ताविक आशीर्वचनाच्या लेखनामध्ये मोलाचे योगदान दिल्याबद्दल त्यांना आणि त्यांच्या संपूर्ण परिवाराला अनंत मंगल आशीर्वाद. या तिसऱ्या आवृत्तीच्या मुद्रणासाठी आर्थिक योगदान देणाऱ्या सद्भक्तांना व पारायण, स्वाध्याय, प्रवचन, कीर्तन करणाऱ्या सर्व भक्तांना जगद्गुरु पंचाचार्य, काशीविश्वनाथ व माता अन्नपूर्णेचा मंगल आशीर्वाद.

**ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः**

इत्याशिषः

वास्तव्य वाराणसी
दि. ६.११.२०१२

❍❍❍

# अनुवादकाचे दोन शब्द

**श्रीसिद्धान्तशिखामणी** सारख्या धर्मग्रंथाचा अनुवाद करणे हे काम तसे कठीणच. परंतु प.पू.ज.डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींच्या आदेशानुसार ते करावे लागले. एका भाषेतील विचार आणि भावना जशाच्या तशा दुसऱ्या भाषेत व्यक्त करणे यात अनेक अडचणी असतात. प्रत्येक भाषेची जडण घडण, वाक्यरचना, व्याकरणाचे नियम इत्यादीत बरेच अंतर असते. संस्कृत भाषेतील लिंग, वचन, विभक्ती, प्रत्यय इत्यादी वैशिष्ट्ये कायम ठेवून मराठीत अनुवाद करणे शक्य नाही. त्यामुळे शब्दशः भाषांतरापेक्षा मुळातील अर्थ आणि भाव भाषांतरात कायम राखण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणूनच याला भावानुवाद असे म्हटले आहे.

या अनुवादाने आणखी एक वैशिष्ट्य असे की, मूळ ग्रंथाचा अर्थ एखाद्या भाषेत लिहून तयार आहे व त्यावरून हा मराठी अनुवाद केला आहे अशी स्थिती येथे नाही. तर मूळ श्लोकांचा अन्वयार्थ व भावार्थ प.पू. महास्वामीजींनी कन्नडमधून तोंडी सांगावा आणि मी तो लगेच मराठीत लिहून घ्यावा अशा पद्धतीने हे अनुवाद कार्य कमीत कमी वेळेत पूर्ण करावे लागले आहे. त्यामुळे अनुवाद कसा झाला आहे हे मूळ लिखित ग्रंथाच्या अभावी तुलना करून पाहाता येण्यासारखे नाही. परंतु प.पू. महास्वामीजींना मराठी भाषाही चांगली अवगत असल्यामुळे अनुवादित भाग पुनःपुन्हा वाचून दाखविल्यावर त्यांचे समाधान झाल्यानंतरच अनुवादाचे अंतिम रूप निश्चित होत असे. त्यामुळे माझ्याइतकेच परिश्रम महास्वामीजींनाही करावे लागले, किंबहुना अधिकच. कारण त्यांची नित्य आणि नैमित्तिक कार्ये सांभाळून पुन्हा या कामासाठी त्यांना वेळ द्यावा लागे. आम्हांला दिवसा व रात्री मिळून किमान दररोज दहाबारा तास काम करावे लागत असे. त्यामळे त्यांना विश्रांती मुळीच मिळायची नाही. खरोखरच त्यांचे धर्म, साहित्य आणि समाजप्रेम व कार्यतत्परता केवळ अतुलनीय आहे. म्हणूनच एकामागून एक नवे प्रकल्प महास्वामीजी हाती घेत आहेत आणि इतरांनाही कार्यप्रवृत्त करीत आहेत. कामाच्या इतक्या व्यापातूनही त्यांनी 'वीरशैव तत्त्वत्रयविमर्श' या नावाचा संस्कृत प्रबंध लिहिला. वाराणसीच्या डॉ. संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालयाकडून या प्रबंधासाठी त्यांना 'विद्यावाचस्पति' ही साहित्यातील सर्वोच्च पदवी नुकतीच प्रदान करण्यात

आली आहे. म्हणूनच त्यांच्यासारख्या विद्याप्रेमी व गुणग्राहक व्यक्तिमत्त्वाच्या सहवासात, माझ्यासारख्या वयोवृद्ध व्यक्तीलाही काम करण्यासाठी हुरूप येतो.

ग्रंथाच्या शुद्ध मुद्रणाच्या बाबतीतही महास्वामीजींचा विशेष कटाक्ष असल्यामुळे पं. व्रजवल्लभ द्विवेदीजींना संस्कृत व मला मराठी वारंवार तपासावी लागत. मुद्रकांना मराठी भाषा अवगत नसतानाही केवळ देवनागरी लिपीतील मजकुराची अर्थ न समजता जुळणी व नंतर मुद्रण करणे हे कष्टाचे काम होते. तरीही त्यांनी ते व्यवस्थितपणे व वेळेवर करून दिले, हे कौतुकास्पद म्हटले पाहिजे.

या ग्रंथाच्या दोन प्रती अनुवादित सिद्ध करण्याच्या निमित्ताने मला काशीच्या जंगमवाडी मठात प्रत्येक वेळी दोन-दोन महिने सतत वास्तव्य करावे लागले. त्यामुळे माझ्या नेहमीच्या कामात खंड पडला असला आणि प्रापंचिक जबाबदाऱ्यांकडे काहीसे दुर्लक्ष झाले असले तरी या निमित्ताने मठातील वानप्रस्थ जीवनाचा अनुभव घेताना बरेच काही नवीन शिकता आले याचा आनंद आहे. मठाचे प्रबंधक श्री महेश्वरदेव, श्री पंचाक्षरी लिगाडे, त्यांचे सर्व सहकारी आणि मठात शिकण्यासाठी राहिलेले सर्व विद्यार्थी मित्र यांनी अगदी घरच्यासारखे प्रेम दिले, त्यामुळे माझा निवास सुखद झाला. त्या सर्वांचा मी कृतज्ञ आहे. या ग्रंथाचे औपचारिक प्रकाशन नांदेड येथे दि. ७-१२-९१ रोजी सुरू झालेल्या 'जगद्गुरू पंचाचार्य महोत्सव व विश्वशांती महायज्ञ समारंभ' या प्रसंगी श्रीमद्जगद्गुरु उमापति पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामी यांच्या अमृतहस्ते संपन्न झाले. त्यावेळी मी व माझी पत्नी सौ. जलजाक्षी यांना निमंत्रित करून आमचा सत्कार करण्यात आला, त्या बद्दल या कार्यक्रमाचे संयोजक श्री ष.ब्र.प्र. षडक्षर स्वामी शिराढोणकर, भीमाशंकर नगर, नांदेड यांचे आम्ही उभयता पतिपत्नी चिरऋणी आहोत. गुरुजनांच्या कृपाआशीर्वादाने यापुढेही माझ्या हातून शक्य ती सेवा घडत राहावी अशी आशा व्यक्त करून थांबतो.

पडाव :
जंगमवाडीमठ,
वाराणसी - २२१००१
दि. ८/७/१९९२

**डॉ. चंद्रशेखर कपाळे**
'शिवरत्न'
१०-२/३६ (एस्.बी. कालेज रोड)
गुलबर्गा - ५८५१०३

❍❍❍

## विषयानुक्रमणिका

| | |
|---|---|
| *प्रास्ताविक आशीर्वचन* | *iii-xvi* |
| *अनुवादकाचे दोन शब्द* | *xvii-xviii* |
| *विषयानुक्रमणिका* | *xix-xxii* |
| *श्रीजगद्गुरू पंचाचार्य स्तुती* | *xxiii* |
| *श्रीसिद्धान्तशिखामणी न्यासादी* | *xxiv-xxv* |
| *श्रीसिद्धान्तशिखामणिध्यानम्* | *xxvi* |
| *श्रीसिद्धान्तशिखामणि-माहात्म्यम्* | *xxvii* |
| **परिच्छेद १** | **१-१३** |
| इष्टदेवतानमस्काररूप मंगल | १-५ |
| ग्रन्थकाराचे वंश वर्णन | ६-८ |
| ग्रंथावतारक्रम निरूपण | ९-१३ |
| **परिच्छेद २** | **१४-२५** |
| शिव-परब्रह्माचे निरूपण | १४-१७ |
| शिवाची शक्ती | १८-१९ |
| सृष्टिप्रकार कथन | १९-२५ |
| रेणुक-दारुकाचे द्वारपालपदी नियोजन | २५ |
| **परिच्छेद ३** | **२६-५६** |
| रेणुकाचार्यांचे भूलोकावतरण | २६-५६ |
| कैलासवर्णन | २६-२९ |
| श्रीशंकर वर्णन | २९-३४ |
| भवानी वर्णन | ३४-३८ |
| देवतादिकृत शिवसेवा वर्णन | ३९-४२ |
| शिवकृत व्यवहार वर्णन | ४३-४६ |
| शिवस्वरूप वर्णन | ४७-४८ |
| रेणुकास शिवभक्तिमहिमा कथन | ४९-५२ |
| रेणुककृत निवेदन | ५३-५४ |
| शिवाकडून रेणुकास आश्वासन | ५५-५६ |
| **परिच्छेद ४** | **५७-७५** |
| रेणुक प्रादुर्भाव वर्णन | ५७-६० |
| अगस्त्य आश्रमाचे वर्णन | ६१-६५ |
| रेणुकाचे मलयाद्रीकडे प्रयाण | ६१ |
| अगस्त्य आश्रमाचे वर्णन | ६१-६५ |
| अगस्त्य मुनीचे वर्णन | ६५-६८ |
| अगस्त्य-रेणुक संवाद | ६८-७४ |
| अगस्त्यकृत रेणुकाचार्यांची प्रार्थना | ७५ |
| **परिच्छेद ५** | **७६-१०४** |
| अगस्त्य मुनीला तत्त्वोपदेश | ७६-८६ |
| १. भक्तस्थलांतर्गत-पिंडस्थल | ८७-९५ |
| २. पिंडज्ञान स्थल | ९५-९७ |

३. संसारहेयस्थल ९७–१०४

**परिच्छेद ६ १०५–१२६**

४. दीक्षालक्षणगुरु–
कारुण्यस्थल १०५–१११
५. लिंगधारणस्थल १११–१२६

**परिच्छेद ७ १२७–१४९**

६. भस्मधारणस्थल १२७–१४१
७. रुद्राक्षधारणस्थल १४१–१४९

**परिच्छेद ८ १५०–१६६**

८. पंचाक्षरीजपस्थल १५०–१६६

**परिच्छेद ९ १६७–१९९**

९. भक्तमार्ग क्रियास्थल १६७–१८४
१०. उभयस्थल १८४–१८६
११. त्रिविधसंपत्तिस्थल १८७–१८९
१२. चतुर्विधसारायस्थल १९०–१९३
१३. सोपाधिदानस्थल १९४–१८९
१४. निरुपाधिदानस्थल १९०–१९३
१५. सहजदानस्थल १९४–१९९

**परिच्छेद १० २००–२२६**

१६. माहेश्वरस्थल २००–२०६
१७. लिंगनिष्ठास्थल २०६–२०८
१८. पूर्वाश्रयनिरसनस्थल २०९–२१२
१९. सर्वाद्वैतनिरसनस्थल २१२–२१४
२०. आव्हाननिरसनस्थल २१४–२१६
२१. अष्टमूर्तिनिरसनस्थल २१६–२१८
२२. सर्वगतनिरसनस्थल २१८–२२१
२३. शिवजगन्मयस्थल २२१–२२४
२४. भक्तदेहिकलिंगस्थल २२४–२२६

**परिच्छेद ११ २२७–२५२**

२५. प्रसदिस्थल २२७–२३२
२६. गुरुमाहात्म्यस्थल २३२–२३४
२७. लिंगमाहात्म्यस्थल २३४–२३७
२८. जंगममाहात्म्यस्थल २३७–२४०
२९. भक्तमाहात्म्यस्थल २४१–२४४
३०. शरणमाहात्म्यस्थल २४५–२४८
३१. प्रसादमाहात्म्यस्थल २४८–२५२

**परिच्छेद १२ २५३–२७०**

३२. प्राणलिंगीस्थल २५३–२५७
३३. प्राणलिंगार्चनस्थल २५७–२५९
३४. शिवयोगसमाधिस्थल २६०–२६४
३५. लिंगनिजस्थल २६४–२६७
३६. अंगलिंगस्थल २६८–२७०

**परिच्छेद १३ २७१–२८४**

३७. शरणस्थल २७१–२७५
३८. तामसनिरसनस्थल २७५–२७८
३९. निर्देशस्थल २७८–२८०
४०. शीलसंपादनस्थल २८१–२८४

**परिच्छेद १४ २८५–३०१**

४१. ऐक्यस्थल २८५–२९०
४२. आचारसंपत्तिस्थल २९०–२९४
४३. एकभाजनस्थल २९४–२९७
४४. सहभोजनस्थल २९७–३०१

**परिच्छेद १५ ३०२–३२७**

लिंगस्थलांतर्गत भक्तस्थल ३०२–३०३



४५. दीक्षागुरुस्थल ३०४–३०६
४६. शिक्षागुरुस्थल ३०६–३०९
४७. ज्ञानगुरुस्थल ३०९–३१२
४८. क्रियालिंगस्थल ३१२–३१४
४९. भावलिंगस्थल ३१४–३१७
५०. ज्ञानलिंगस्थल ३१७–३१९
५१. स्वयस्थल ३२०–३२२
५२. चरस्थल ३२२–३२४
५३. परस्थल ३२४–३२७

**परिच्छेद १६ ३२८–३५८**

५४. क्रियागमस्थल ३२९–३३२
५५. भावागमस्थल ३३२–३३५
५६. ज्ञानागमस्थल ३३६–३३९
५७. सकायस्थल ३३९–३४२
५८. अकायस्थल ३४२–३४४
५९. परकायस्थल ३४५–३४८
६०. धर्माचारस्थल ३४८–३५१
६१. भावाचारस्थल ३५१–३५४
६२. ज्ञानाचारस्थल ३५५–३५८

**परिच्छेद १७ ३५९–३९०**

प्रसादिस्थल ३५९–३६०
६३. कायानुग्रहस्थल ३६०–३६३
६४. इंद्रियानुग्रहस्थल ३६३–३६६
६५. प्राणानुग्रहस्थल ३६७–३७०
६६. कायार्पितस्थल ३७१–३७२
६७. करणार्पितस्थल ३७२–३७६
६८. भावार्पितस्थल ३७६–३७९
६९. शिष्यस्थल ३७९–३८३
७०. शुश्रूषुस्थल ३८३–३८७
७१. सेव्यस्थल ३८८–३९०

**परिच्छेद १८ ३९१–४१९**

प्राणलिंगीस्थल ३९१–३९२
७२. आत्मस्थल ३९२–३९७
७३. अन्तरात्मस्थल ३९७–४००
७४. परमात्मस्थल ४००–४०३
७५. निर्देहागमस्थल ४०४–४०६
७६. निर्भावागमस्थल ४०७–४०९
७७. नष्टागमस्थल ४०९–४११
७८. आदिप्रसादिस्थल ४११–४१३
७९. अन्त्यप्रसादिस्थल ४१४–४१६
८०. सेव्यप्रसादिस्थल ४१६–४१९


**परिच्छेद १९ ४२०–४५५**

शरणस्थल ४२०–४२१
८१. दीक्षापादोदकस्थल ४२१–४२३
८२. शिक्षापादोदकस्थल ४२४–४२६
८३. ज्ञानपादोदकस्थल ४२६–४३०
८४. क्रियानिष्पत्तिस्थल ४३०–४३३
८५. भावनिष्पत्तिस्थल ४३३–४३५
८६. ज्ञाननिष्पत्तिस्थल ४३५–४३८
८७. पिंडाकाशस्थल ४३८–४४१
८८. बिंद्वाकाशस्थल ४४१–४४३
८९. महाकाशस्थल ४४३–४४७
९०. क्रियाप्रकाशस्थल ४४७–४४९
९१. भावप्रकाशस्थल ४४९–४५२
९२. ज्ञानप्रकाशस्थल ४५२–४५५

| | |
|---|---|
| **परिच्छेद २०** | **४५६-४८६** |
| ऐक्यस्थल | ४५६-४५७ |
| ९३. स्वीकृतप्रसादिस्थल | ४५७-४६० |
| ९४. शिष्टोदनस्थल | ४६०-४६२ |
| ९५. चराचरलयस्थल | ४६३-४६६ |
| ९६. भांडस्थल | ४६६-४६८ |
| ९७. भाजनस्थल | ४६८-४७१ |
| ९८. अंगालेपस्थल | ४७१-४७३ |
| ९९. स्वपराज्ञस्थल | ४७३-४७५ |
| १००. भावाभावलयस्थल | ४७५-४७७ |
| १०१. ज्ञानशून्यस्थल | ४७७-४८१ |
| शास्त्रप्रचाराचा आदेश | ४८१-४८६ |
| **परिच्छेद २१** | **४८७-५०६** |
| विभीषणास अभीष्टदान | ४८७-४९४ |
| तीनकोटी लिंगांची स्थापना | ४९५-४९७ |
| रेणुकमाहात्म्य | ४९८-५०१ |
| सोमेश्वरस्तुती | ५०२-५०३ |
| श्री रेणुकांचे सोमेश्वर-लिंगात ऐक्य | ५०४-५०६ |


❍❍❍

॥ श्री जगद्गुरु पंचाचार्याः प्रसीदन्तु ॥



**ॐ नमः पञ्चाचार्येभ्यो**
**पञ्चाननमुखोद्भूतेभ्यो**
**पञ्चसूत्रकर्तृभ्यो**
**पञ्चाक्षरमनुस्वरूपेभ्यो**
**शिवाद्वैतविद्यासम्प्रदायकर्तृभ्यो**
**वीरशैवमहामतसंस्थापकेभ्यो**
**नमो जगद्गुरुभ्यः॥**

# ।। अथ श्रीसिद्धान्तशिखामणि न्यासादि:।।

## अथ ऋष्यादिन्यास:

अस्य श्रीसिद्धान्तशिखामणिशास्त्रमहामन्त्रस्य
भगवान् श्रीशिवयोगि शिवाचार्य ऋषि:।
अनुष्टुप् छन्द:। श्री सच्चिदानन्दस्वरूप: परशिवो देवता।

सच्चिदानन्दरूपाय शिवाय ब्रह्मणे नम
इति बीजम्।

अमृतार्थं प्रपन्नानां या सुविद्याप्रदायिनी
इति शक्ति:।

शिवज्ञानकरं वक्ष्ये सिद्धान्तं श्रुणु सादरम्
इति कीलकम्।

●

## अथ करन्यास:

एक एव शिवस्साक्षाच्चिदानन्दमयो विभु
इति अङ्गुष्ठाभ्यां नम:।

निर्विकल्पो निराकारो निर्गुणो निष्प्रपञ्चक
इति तर्जनीभ्यां नम:।

अनाद्यविद्यासम्बन्धात्तदंशो जीवनामक
इति मध्यमाभ्यां नम:।

देवतिर्यङ्मनुष्यादिजातिभेदे व्यवस्थित
इति अनामिकाभ्यां नम:।



मायी महेश्वरस्तेषां प्रेरको हृदि संस्थित
इति कनिष्ठिकाभ्यां नम:।

बीजे यथाऽङ्कुर: सिद्धस्तथाऽत्मनि शिव: स्थित
इति करतलकरपृष्ठाभ्यां नम:।

●

## अथ अंगन्यास:

एक एव शिवस्साक्षाच्चिदानन्दमयो विभु
इति हृदयाय नम:।

निर्विकल्पो निराकारो निर्गुणो निष्प्रपञ्चक
इति शिरसे स्वाहा।

अनाद्यविद्यासम्बन्धात्तदंशो जीवनामक
इति शिखायै वषट्।

देवतिर्यङ्मनुष्यादिजातिभेदे व्यवस्थित
इति कवचाय हुम्।

मायी महेश्वरस्तेषां प्रेरको हृदि संस्थित
इति नेत्रत्रयाय वौषट्।

बीजे यथाऽङ्कुर: सिद्धस्तथाऽत्मनि शिव: स्थित
इति अस्त्राय फट्।

श्रीशिवप्रीत्यर्थे श्रीसिद्धान्तशिखामणिपाठे विनियोग:।

●●●

## ।। अथ श्रीसिद्धान्तशिखामणिध्यानम्।।

स्वस्ति श्रीगणनायकेन मुनयेऽगस्त्याय तत्त्वार्थिने
शिष्याय प्रतिबोधिते भगवता श्रीरेणुकेन स्वयम्।
तात! त्वं शिवयोगिवर्यसुकृतिर्मे मानसे मन्दिरे
श्रीसिद्धान्तशिखामणे वस सदा ज्ञानप्रदीपो भव।।१।।

शरणागतदीनार्तपरित्राणैकहेतवे।
श्रीरेणुकगणेशाय ज्ञानमुद्राय ते नमः।।२।।

अगस्त्यसंशयव्रातमहाध्वान्तांशुमालिनम्।
वन्दे शिवसुतं देवं रेणुकाख्यं जगद्गुरुम्।।३।।

नमः शिवाचार्यवराय तुभ्यं श्रीवीरशैवागमसागराय।
विनाऽपि तैलं भवताऽत्र येन प्रज्वालितो ज्ञानमणिप्रदीपः।।४।।

यस्मिन्नागमशास्त्रतत्त्वमखिलं सम्यक् च संसूचितं
भक्तैर्वाञ्छितभुक्तिमुक्तिफलदं यत्कल्पवृक्षात्मकम्।
तं शैवागमसम्मतं निगमविद् विद्वद्भिरासेवितं
श्रीसिद्धान्तशिखामणिं प्रतिदिनं ध्यायेत् सदा सादरम्।।५।।

पूज्यश्रीशिवयोगिवर्यरचितं सिद्धान्तरत्नाकरं
सूक्ष्मं धार्मिकतात्त्विकस्थलयुतं चैकाधिकं तत् शतम्।
त्रैलोक्यं पदमादिमं परपदं सर्वान्तिमे योजितं
श्रीसिद्धान्तशिखामणिं दिनदिनं ध्यायेत् सदा शांतिदम्।।६।।

●●●



## ।। अथ श्रीसिद्धान्तशिखामणिमाहात्म्यम्।।

यः पठेत् प्रयतो नित्यं श्रीसिद्धान्तशिखामणिम्।
शिवसायुज्यमाप्नोति भयशोकादिवर्जितः।।१।।

सदाऽध्ययनशीलस्य श्रीसिद्धान्तशिखामणेः।
क्षीयन्ते सर्वपापानि पूर्वजन्मकृतानि च।।२।।

जलस्नानाद् वरं पुंसां श्रीसिद्धान्तशिखामणौ।
ज्ञानार्णवे सदा स्नानं संसारमलनाशनम्।।३।।

श्रीरेणुकगणाध्यक्षमुखपद्माद्विनिःसृतः।
कण्ठपीठे सदा धार्यः श्रीसिद्धान्तशिखामणिः।।४।।

श्रीरेणुकगणाध्यक्षवचनामृतसागरम्।
पायं पायं सदा पुंसां पुनर्जन्म न विद्यते।।५।।

सर्वागमव्रजोगावस्तासां दोग्धा च रेणुकः।
वत्सोऽगस्त्यः सुधीर्भोक्ता दुग्धं शिखामणिर्महान्।।६।।

एकं शास्त्रं श्रीशिवाद्वैतसंज्ञम्
एको देवः श्रीमहादेव एव।
एको मन्त्रः शैवपञ्चाक्षरोऽयम्
कर्माप्येकं इष्टलिङ्गार्चनं हि।।७।।

### ।। अथ फलश्रुतिः।।

श्रीवेदागमवीरशैवसरणिं श्रीषट्स्थलोद्यन्मणिं
श्रीजीवेश्वरयोगपद्मतरणिं श्रीगोप्यचिन्तामणिम्।
श्रीसिद्धान्तशिखामणिं लिखयिता यस्तं लिखित्वा परान्
श्रुत्वा श्रावयिता स याति विमलां भुक्तिं च मुक्तिं पराम्।।

श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचित

# श्रीसिद्धान्तशिखामणी

मराठी अन्वयार्थ व भावानुवादासह

शैवभारती शोधप्रतिष्ठान

श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचित

श्रीसिद्धान्तशिखामणी

मराठी अन्वयार्थ व भावानुवादासह

शैवभारती शोधप्रतिष्ठान

श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचित

# श्रीसिद्धान्तशिखामणी

## पहिला परिच्छेद

### शिवस्तुती

**त्रैलोक्यसम्पदालेख्यसमुल्लेखनभित्तये।**
**सच्चिदानन्दरूपाय शिवाय ब्रह्मणे नमः।।१।।**

**अन्वयार्थ :** त्रैलोक्य = तिन्ही लोकांचे, सम्पदालेख्य = वैभवरूपी चित्र, समुल्लेखन = रेखाटण्यासाठी, भित्तये = आधारभूत भिंतीसारखा असणारा; सच्चिदानन्दरूपाय = सत्-चित् आणि आनंदरूप अशा, ब्रह्मणे = विशाल-रूप, शिवाय = पर शिवाला, नमः = नमस्कार असो.

**भावार्थ :** स्वर्ग, मृत्यू आणि पाताल या त्रैलोक्याच्या वैभवाचे विशाल, चराचर सृष्टिरूपी चित्र काढण्यासाठी आधारभूत भिंत म्हणजे शिव होय. त्या सच्चिदानंदस्वरूप, परब्रह्म अशा शिवाला नमस्कार असो॥१॥

**ब्रह्मेति व्यपदेशस्य विषयं यं प्रचक्षते।**
**वेदान्तिनो जगन्मूलं तं नमामि परं शिवम्।।२।।**

**अन्वयार्थ :** वेदान्तिनो = वेदान्ती लोक, यं = ज्याला, ब्रह्मेति = ब्रह्म असा, व्यपदेशस्य = शास्त्रीयपरिभाषेचा, विषयं = विषय, प्रचक्षते = म्हणतात; जगन्मूलं = जगाला मूल कारण असणाऱ्या, तं = त्या, परं शिवम् = परशिवाला, नमामि = मी नमस्कार करतो.

**भावार्थ :** पंचमहाभूतांपेक्षाही व्यापक असणाऱ्या परमात्म्याला वेदान्ती लोक शास्त्रीय परिभाषेत ब्रह्म असे संबोधितात. अशा त्या जगाला मूल कारण असणाऱ्या परशिवाला मी नमस्कार करतो॥२॥

**यस्योर्मिबुद्बुदाभासः षट्त्रिंशत्तत्त्वसञ्चयः।**
**निर्मलं शिवनामानं तं वन्दे चिन्महोदधिम्।।३।।**

**अन्वयार्थ :** षट्त्रिंशत्तत्त्वसञ्चय: = शिवादिभूम्यन्त (शिवापासून भूमीपर्यंत) अशा छत्तीस तत्त्वांचा समूह, यस्य = ज्या शिवरूपी समुद्राच्या, ऊर्मिबुद्बुदाभास: = लाटा आणि बुडबुड्यांच्या रूपात दिसतो; तं = त्या, निर्मलं = मलरहित, स्वच्छ; शिवनामानं = शिव या नावाच्या, चिन्महोदधिम् = चिद्रूप सागराला, वन्दे = मी नमस्कार करतो.

**भावार्थ :** परशिव हा चैतन्याचा महासागर आहे. छत्तीस तत्त्वांचा समूह = १. शिव २. शक्ती ३. सदाशिव ४. ईश्वर ५. शुद्धविद्या (ही पाच शुद्ध तत्त्वे) ६. माया ७. कला ८. विद्या ९. राग १०. काल ११. नियती १२. पुरुष (ही सात शुद्धाशुद्ध तत्त्वे) १३. प्रकृती १४. महत् १५. अहंकार १६. मन १७. श्रोत्र १८. त्वक् १९. चक्षु २०. जिव्हा २१. घ्राण २२. वाक् २३. पाणि २४. पाद २५. पायु २६. उपस्थ २७. शब्द २८. स्पर्श २९. रूप ३०. रस ३१. गंध ३२. आकाश ३३. वायु ३४. अग्नी ३५. जल, ३६. पृथ्वी (ही चोवीस अशुद्ध तत्त्वे) अशी एकूण छत्तीस तत्त्वे, त्या महा-सागरावरील लाटा आणि बुडबुडे आहेत. अशा त्या निर्मल, शिव या नावाच्या महासागराला मी नमस्कार करतो.।।३।।

**यद्भासा भासते विश्वं यत्सुखेनानुमोदते।**
**नमस्तस्मै गुणातीतविभवाय परात्मने।।४।।**

**अन्वयार्थ :** विश्वं = समस्त प्रपंच, यद्भासा = ज्याच्या प्रकाशाने, भासते = प्रकाशते, यत्सुखेन = ज्याच्या सुखाने-आनंदाने, अनुमोदते = आनंदित होते; गुणातीतविभवाय = सत्त्वादी गुणरहित वैभवसंपन्न अशा, तस्मै = त्या, परमात्मने = परशिवाला, नम: = नमस्कार असो.

**भावार्थ :** ज्याच्या तेजाने हे सर्व विश्व प्रकाशित होते, ज्याच्या आनंदाने सर्व जग सुखी व आनंदित होते, जो सत्त्व-रज-तम या मायिक



(मायीय) त्रिगुणांच्या पलीकडला आहे, अशा त्या वैभवसंपन्न परशिवाला माझा नमस्कार असो.।।४।।

**सदाशिवमुखाशेषतत्त्वोन्मेषविधायिने ।**
**निष्कलङ्कस्वभावाय नमः शान्ताय शम्भवे।।५।।**

**अन्वयार्थ :** सदाशिवमुखाशेष = सदाशिव तत्त्वासह उर्वरित सर्व, तत्त्वोन्मेष = तत्त्वांचा उन्मेष (प्राकट्य), विधायिने = करणाऱ्या; निष्कलङ्कस्वभावाय = निर्मल स्वभावाच्या, शान्ताय = शांत असा, शम्भवे = शंभूला, नम: = नमस्कार असो.

**भावार्थ :** सदाशिवापासून पृथ्वितत्त्वापर्यंत सर्व तत्त्वांचा आपल्या विमर्शशक्तीने विकास करणाऱ्या, निर्मल आणि शांतस्वरूपी शंभूला नमस्कार असो.।।५।।

**स्वेच्छाविग्रहयुक्ताय स्वेच्छावर्तनवर्तिने।**
**स्वेच्छाकृतत्रिलोकाय नमः साम्बाय शम्भवे।।६।।**

**अन्वयार्थ :** स्वेच्छाविग्रहयुक्ताय = स्वेच्छेने देहधारी होणाऱ्या, स्वेच्छावर्तनवर्तिने = आपल्या इच्छाशक्तीने आचरण करणाऱ्या; स्वेच्छाकृतत्रिलोकाय = आपल्या इच्छाशक्तीने त्रैलोक्याची निर्मिती करणाऱ्या, साम्बाय = अंबेसह असणाऱ्या, शम्भवे = शंभूला, नम: = नमस्कार असो.

**भावार्थ :** परशिव हा निराकार, निरवयव असला तरी भक्तांवर अनुग्रह करण्यासाठी तो स्वेच्छेने दिव्य देह धारण करतो. अशा स्वेच्छेने देह धारण करणाऱ्या, इच्छाशक्तीने त्रैलोक्याचे सृजन करणाऱ्या, अंबेसह असणाऱ्या शिवाला नमस्कार असो.।।६।।

**यत्र विश्राम्यतीशत्वं स्वाभाविकमनुत्तमम्।**
**नमस्तस्मै महेशाय महादेवाय शूलिने।।७।।**

**अन्वयार्थ :** स्वाभाविक = सहज, अनुत्तमम् = सर्वश्रेष्ठ, ईशत्वं = स्वामित्व, यत्र = जो, विश्राम्यति = विराम पावते; तस्मै = त्या, महेशाय =

महेश्वर अशा, शूलिने = त्रिशूलधारी, महादेवाय = महादेवाला, नमः = नमस्कार असो.

**भावार्थ :** सहज आणि सर्वश्रेष्ठ स्वामित्व ज्याच्या ठिकाणी वसते, विराम पावते आणि जो सर्वांचा शासक आहे अशा, इच्छा-ज्ञान-क्रियाशक्तिमय त्रिशूलधारी महादेवाला नमस्कार असो.॥७॥

**शक्तिस्तुती**

**यामाहुः सर्वलोकानां प्रकृतिं शास्त्रपारगाः।**
**तां धर्मचारिणीं शम्भोः प्रणमामि परां शिवाम्॥८॥**

**अन्वयार्थ :** शास्त्रपारगाः = शास्त्रपारंगत, याम् = जिला, सर्वलोकानां = सर्वलोकांची, प्रकृतिं = मूल कारण असे, आहुः = म्हणतात; शम्भोः = शंभूच्या, धर्मचारिणीं = धर्मपत्नी असणाऱ्या, तां = त्या, परां शिवां = परशिवेला (श्रेष्ठ अशा पार्वतीला), प्रणमामि = मी नमस्कार करतो.

**भावार्थ :** वेदागमादिपारंगत विद्वान जिचे वर्णन सर्वलोकांचे मूलकारण असे करतात, त्या शंभूची सहधर्मचारिणी असणाऱ्या परशिवेला (श्रेष्ठ अशा पार्वतीला) मी नमस्कार करतो.॥८॥

**यया महेश्वरः शम्भुर्नामरूपादिसंयुतः।**
**तस्यै मायास्वरूपायै नमः परमशक्तये॥९॥**

**अन्वयार्थ :** यया = जिच्यायोगाने, महेश्वरः = महान ईश्वर असा, शम्भुः = महादेव, नामरूपादिसंयुतः = अनेक रूपांनी व नावांनी युक्त झालेला आहे; तस्यै = त्या, मायास्वरूपायै = मायास्वरूपिणी अशा, परमशक्तये = सर्वश्रेष्ठ शक्तीला, नमः = नमस्कार असो.

**भावार्थ :** सर्वश्रेष्ठ प्रशासक असा, स्वभावतः नामरूप नसलेला शंभू जिच्यायोगाने अनेक नामरूपांनी युक्त झाला, अशा त्या मायारूप परमशक्तीला नमस्कार असो.॥९॥

**शिवाद्यादिसमुत्पन्नशान्त्यतीतपरोत्तराम् ।**
**मातरं तां समस्तानां वन्दे शिवकरीं शिवाम्॥१०॥**



**अन्वयार्थ :** शिवात् = परशिवापासून, या = जी, आदिसमुत्पन्न = सर्वात प्रथम प्रकट झाली आहे अशी, शान्त्यतीतपरोत्तराम् = शान्त्यतीतोत्तरा कलेपेक्षा श्रेष्ठ असलेली; समस्तानां = सर्वांची, मातरं = मातृरूपिणी, शिवकरीं = मंगलकारिणी, तां = त्या, शिवाम् = शिवेला, वन्दे = नमस्कार करतो.

**भावार्थ :** परशिवापासून सर्वप्रथम प्रकट झालेली जी शान्त्यतीतोत्तरा कला, तिच्याहून श्रेष्ठ असलेली, अर्थात् निवृत्ती, प्रतिष्ठा, विद्या, शांती, शांत्यतीत आणि शांत्यतीतोत्तरा (पराकुंडलिनी) या सहा कलांची माता असणारी, कल्याणकारी सर्वमंगला अशा त्या शक्तीला नमस्कार असो.॥१०॥

**इच्छाज्ञानादिरूपेण या शम्भोर्विश्वभाविनी।**
**वन्दे तां परमानन्दप्रबोधलहरीं शिवाम्॥११॥**

**अन्वयार्थ :** शम्भोः = शंभूची, या = जी शक्ती, इच्छाज्ञानादिरूपेण = इच्छा, ज्ञान आणि क्रियारूपाने, विश्वभाविनी = विश्वाला प्रकाशित करणारी; परमानन्दबोधलहरीं = परमानन्दबोधरूपी प्रवाह असणाऱ्या, तां = त्या, शिवाम् = शक्तीला, वन्दे = नमस्कार असो.

**भावार्थ :** परशिवाची समवेतशक्ती इच्छा-ज्ञान-क्रियारूपिणी असून ती सर्व विश्वाला प्रकाशित करते, परमानंद आणि प्रकर्षज्ञानाचा प्रवाहरूप असणाऱ्या त्या शक्तीला नमस्कार करतो.॥११॥

**अमृतार्थं प्रपन्नानां या सुविद्याप्रदायिनी।**
**अहर्निशमहं वन्दे तामीशानमनोरमाम्॥१२॥**

**अन्वयार्थ :** अमृतार्थं = अमृतत्वाच्या प्राप्तीसाठी, प्रपन्नानां = शरण आलेल्यांना, या = जी, सुविद्याप्रदायिनी = उत्तम ज्ञान देणारी आहे; तां = त्या, ईशान = शिवाचे, मनोरमाम् = मन रमविणाऱ्या शक्तीला, अहं = मी, अहर्निशं = रात्रंदिवस, वन्दे = नमस्कार करतो.

**भावार्थ :** अमृतत्त्वाच्या प्राप्तीसाठी शरण आलेल्या भक्तांना जी उत्तम ज्ञान प्रदान करते, शिवाचे मन रमविणाऱ्या त्या शक्तीला मी रात्रंदिन नमस्कार करतो.॥१२॥

## ग्रंथकाराचे वंशवर्णन

**कश्चिदाचारसिद्धानामग्रणी: शिवयोगिनाम्।**
**शिवयोगीति विख्यात: शिवज्ञानमहोदधि:।।१३।।**

**अन्वयार्थ :** आचारसिद्धानां = सदाचारसंपन्न अशा, शिवयोगिनाम् = शिवयोग्यांमध्ये, अग्रणी: = प्रमुख; शिवज्ञानमहोदधि: = शिवज्ञानाचा सागर, कश्चित् = कोणी एक, शिवयोगीति = शिवयोगी या नावाने, विख्यात: = प्रसिद्ध होता.

**भावार्थ :** ग्रंथकार शिवयोगी यांच्या वंशात पूर्वी सदाचारसंपन्न अशा शिवयोग्यांमध्ये अग्रगण्य असणारा, शिवज्ञानाचा महासागर असा शिवयोगी नावाचा प्रसिद्ध योगी पुरुष होता.॥१३॥

**शिवभक्तिसुधासिन्धुजृम्भणामलचन्द्रिका।**
**भारती यस्य विदधे प्राय: कुवलयोत्सवम्।।१४।।**

**अन्वयार्थ :** यस्य = जो प्रसिद्ध अशा शिवयोग्याची, भारती = वाणी, शिवभक्तिसुधासिन्धु = शिवभक्तिरूपी सुधासागराला, जृम्भण = भरतीसाठी, अमल = निर्मल, चन्द्रिका = चांदणे होऊन, प्राय: = बहुतेक, कुवलयोत्सवम् = पृथ्विरूपी कुमुदिनीला आनंदित, विदधे = करते.

**भावार्थ :** ग्रंथकार शिवयोगी शिवाचार्यांच्या वंशाचा मूळ पुरुष शिवयोगी याच नावाचा होता. त्याची वाणी ऐकल्यावर भक्तांच्या मनामध्ये शिवभक्ती, पूर्णचन्द्राच्या दर्शनाने सागराला भरती यावी तशी उचंबळून येत असे आणि ते पाहून भूमंडळावरील सर्वांची मने चांदण्यात उमलणाऱ्या कुमुदिनीप्रमाणे प्रफुल्लित होत असत.॥१४॥

**तस्य वंशे समुत्पन्नो मुक्तामणिरिवामल:।**
**मुद्दवाभिधाचार्यो मूर्धन्य: शिवयोगिनाम्।।१५।।**

**अन्वयार्थ :** तस्य = त्याच्या, वंशे = वंशात, अमल: = निर्मल, मुक्तामणिरिव = मोत्याप्रमाणे, शिवयोगिनाम् = शिवयोग्यांना, मूर्धन्य: = श्रेष्ठ असा, मुद्दवाभिध: = मुद्देव नावाचा, आचार्य: = आचार्य, समुत्पन्न: = जन्मला.



**भावार्थ :** त्या शिवयोग्याच्या वंशात, श्रेष्ठ वेळूच्या गर्भात उत्पन्न होणाऱ्या मोत्याप्रमाणे शिवयोग्यांत श्रेष्ठ असा मुद्देव नावाचा आचार्य जन्मास आला.॥१५॥

**मुद्दानात्सर्वजन्तूनां प्रणतानां प्रबोधत:।**
**मुद्देवेति विख्याता समाख्या यस्य विश्रुता।।१६।।**

**अन्वयार्थ :** प्रणतानां = शरणागतांना, प्रबोधत: = ज्ञानोपदेशाने, सर्वजन्तूनां = समस्त प्राण्यांना, मुद्दानात् = आनंदित करीत असल्यामुळे; यस्य = ज्याचे, विख्याता = प्रसिद्ध, समाख्या = नाव, मुद्देवेति = मुद्देव असे, विश्रुता = प्रसिद्धीस आले.

**भावार्थ :** त्याला शरण आलेल्या सर्व प्राण्यांना तो ज्ञानोपदेशाने संतोष देत असल्याने, त्याचे मुद्देव (संतोष देणारा) हे विख्यात नाव अन्वर्थकपणे प्रसिद्धीस आले.॥१६॥

**तस्यासीन्नन्दन: शान्त: सिद्धनाथाभिध: शुचि:।**
**शिवसिद्धान्तनिर्णेता शिवाचार्य: शिवात्मक:।।१७।।**

**अन्वयार्थ :** तस्य = त्याला, शान्त: = प्रशांत, शुचि: = पवित्र, शिवात्मक: = शिवस्वरूपी, शिवसिद्धान्तनिर्णेता = शिवाद्वैत (वीरशैव) सिद्धान्ताचा निर्णय करणारा असा, सिद्धनाथाभिध: = सिद्धनाथ नावाचा, शिवाचार्य: = शिवाचार्य, नन्दन: = पुत्र, आसीत् = होता.

**भावार्थ :** या मुद्देवाचा सिद्धनाथ नामक पुत्र होता, तो अत्यंत पवित्र, रागद्वेषादिरहित, शिवस्वरूप व शिवसिद्धान्ताचा निर्णय करणारा, शिवागमांतील पती, पशू आणि पाश या तीन पदार्थांचा आणि क्रियापाद, चर्यापाद, योगपाद व ज्ञानपाद या चतुष्पादांचा अर्थ उलगडून दाखविणारा, शिवसिद्धान्ताची स्थापना करणारा एक महान आचार्य होता.॥१७॥

**वीरशैवशिखारत्नं विशिष्टाचारसम्पदम्।**
**शिवज्ञानमहासिन्धुं यं प्रशंसन्ति देशिका:।।१८।।**

**अन्वयार्थ :** देशिका: = उपदेश करणारे आचार्य, यं = ज्याला, वीरशैवशिखारत्नं = वीरशैव शिरोमणी, विशिष्टाचारसम्पदम् = श्रेष्ठ आचारसंपन्न; शिवज्ञानमहासिन्धुं = शिवज्ञानाचा महासागर अशी, प्रशंसन्ति = स्तुती करतात.

**भावार्थ :** सिद्धनाथ हा वीरशैवांचा मुकुटमणी आहे, तो सदाचार-संपन्न असून शिवज्ञानाचा महासमुद्रच आहे, अशी त्याची प्रशंसा तत्कालीन श्रेष्ठ आचार्य करीत असत.॥१८॥

**यस्याचार्यकुलाज्जाता सतामाचारमातृका।**
**शिवभक्तिः स्थिरा यस्मिन् जज्ञे विगतविप्लवा।।१९।।**

**अन्वयार्थ :** यस्य = ज्या, आचार्यकुलात् = आचार्यांच्या कुलापासून, सताम् = सत्पुरुषांच्या, आचारमातृका = आचारांचे मूळ; जाता = उगम पावले, यस्मिन् = ज्याच्या ठिकाणी, विगतविप्लवा = उपद्रवरहित, शिवभक्तिः = शिवाची भक्ती, स्थिरा = स्थिर, जज्ञे = झाली.

**भावार्थ :** सज्जनांनी आचरावेत अशा आचारांचा उगम ज्या आचार्य-कुलात झाला, त्या कुलात सिद्धनाथाचा जन्म झाल्यामुळे त्याच्या अंगी निर्दोष अशी अष्टविधा भक्ती दृढ झाली होती.॥१९॥

**तस्य वीरशिवाचार्यशिखारत्नस्य नन्दनः।**
**अभवच्छिवयोगीति सिन्धोरिव सुधाकरः।।२०।।**

**अन्वयार्थ :** वीरशिवाचार्यशिखारत्नस्य = वीरशैव शिवाचार्यांचा मुकुटमणी असलेला, तस्य = त्याला, सिन्धोः = सागरापासून, सुधाकरः = चन्द्र, इव = प्रमाणे, शिवयोगीति = शिवयोगी नावाचा, नन्दनः = पुत्र, अभवत् = जन्मला.

**भावार्थ :** वीरशैव शिवाचार्यांचा मुकुटमणी अशा त्या सिद्धनाथ शिवाचार्यांना शिवयोगी नावाचा पुत्र झाला, समुद्रापासून जन्मलेला चंद्र जसा आपल्या पित्याला (सागराला) आनंद देतो तसा शिवयोगी आपल्या पित्याला (सिद्धनाथाला) आनंद देणारा होता.॥२०॥

**चिदानन्दपराकाशशिवानुभवयोगतः ।**
**शिवयोगीति नामोक्तिर्यस्य याथार्थ्ययोगिनी।।२१।।**



**अन्वयार्थ :** चिदानन्द = सच्चिदानंदरूपी, पराकाश = आकाशाप्रमाणे व्यापक, शिव = शिवाच्या, अनुभवयोगतः = साक्षात्कारयोगाने, यस्य = ज्याला, शिवयोगीति = शिवयोगी असे, नामोक्तिः = नाव, याथार्थ्ययोगिनी = अन्वर्थक झाले.

**भावार्थ :** या शिवयोगी शिवाचार्याला सच्चिदानंद पराकाशस्वरूप परशिवाचा स्वानुभवाने साक्षात्कार प्राप्त झाला असल्यामुळे त्याचे शिवयोगी हे नाव सार्थ व अन्वर्थक होते.॥२१॥

**शिवागमपरिज्ञानपरिपाकसुगन्धिना ।**
**यदीयकीर्तिपुष्पेण वासितं हरितां मुखम्।।२२।।**

**अन्वयार्थ :** शिवागम = शिवागमांच्या, परिज्ञान = परिपूर्ण ज्ञानाच्या, परिपाक = पक्वतेमुळे, सुगन्धिना = सुगंधित; यदीय = ज्याच्या, कीर्तिपुष्पेण = कीर्तिरूपी फुलाने, हरितां = दिशांचे, मुखम् = मुख, वासितं = सुवासित झाले.

**भावार्थ :** शिवागमांचे परिपूर्ण ज्ञान झाल्यामुळे त्याच्या कीर्तिपुष्पाचा सुगंध दाही दिशांत दरवळत होता. अर्थात् शिवयोगी हे शिवागमांचे संपूर्ण ज्ञाते आहेत, अशी त्यांची कीर्ती सर्वत्र पसरली होती.॥२२॥

**येन रक्षावती जाता शिवभक्तिः सनातनी।**
**बौद्धादिप्रतिसिद्धान्तमहाध्वांतांशुमालिना।।२३।।**

**अन्वयार्थ :** बौद्धादि = बौद्ध आणि अन्य, प्रतिसिद्धान्त = विरोधी सिद्धान्तरूपी, महाध्वान्त = घोर अंधःकाराला, अंशुमालिना = सूर्यासारखा असणाऱ्या; येन = ज्याच्याकडून, सनातनी = सनातन, शिवभक्तिः = शिवाची भक्ती, रक्षावती = रक्षिली, जाता = गेली.

**भावार्थ :** शिवसिद्धांताला प्रतिकूल असलेल्या बौद्धादी नास्तिक मतरूपी अंधःकाराचे त्यांनी सूर्याप्रमाणे खंडन करून सनातन अशा शिवभक्तीचे रक्षण केले.॥२३॥

**स महावीरशैवानां धर्ममार्गप्रवर्तकः।**
**शिवतत्त्वपरिज्ञानचन्द्रिकावृतचन्द्रमाः ।।२४।।**

**अन्वयार्थ :** शिवतत्त्वपरिज्ञान = शिवतत्त्वाचे संपूर्ण ज्ञानरूपी, चन्द्रिका = चांदण्याने, आवृतचन्द्रमाः = आवृत चंद्रासारखा असलेला; सः = तो, महावीर-शैवानां = श्रेष्ठ वीरशैवांना, धर्ममार्गप्रवर्तकः = धर्ममार्गाचे प्रवर्तन करणारा होता.

**भावार्थ :** चंद्र जसा चांदण्याने शोभतो तसे शिवतत्त्वज्ञानाच्या चंद्रिकेने शोभणारा तो शिवयोगी श्रेष्ठ वीरशैवांनाही धर्ममार्गाचे प्रवर्तन करणारा होता.॥२४॥

**आलोक्य शैवतन्त्राणि कामिकाद्यानि सादरम्।**
**वातुलान्तानि शैवानि पुराणान्यखिलानि तु।।२५।।**

**अन्वयार्थ :** कामिकाद्यानि = कामिक आगमापासून, वातुलान्तानि = वातुल आगमापर्यंत, शैवतन्त्राणि = सर्व शैवतंत्रग्रंथ, तु = आणि, अखिलानि = सर्व, शैवानि = शिवसंबंधी, पुराणानि = पुराणे, सादरम् = आदराने, आलोक्य = पाहून अभ्यासून.

**भावार्थ :** त्यांनी कामिकापासून वातुलागमापर्यंत अठ्ठावीस शैवागमांचे आणि सर्व शैव पुराणांचे आदरपूर्वक अध्ययन करून ॥२५॥

**वेदमार्गाविरोधेन विशिष्टाचारसिद्धये।**
**असन्मार्गनिरासाय प्रमोदाय विवेकिनाम्।।२६।।**

**अन्वयार्थ :** वेदमार्गाविराधेन = वैदिक मार्गास बाध न आणता, विशिष्टाचारसिद्धये = सदाचारांच्या सिद्धीसाठी; असन्मार्ग = कुमार्गाचे, निरासाय = निराकरण करण्यासाठी, विवेकिनाम् = विद्वान लोकांच्या, प्रमोदाय = आनंदासाठी.

**भावार्थ :** वेदमार्गास बाध न आणता, शिवाचाराच्या सिद्धीसाठी, कुमार्गाच्या निराकरणासाठी आणि विद्वान लोकांच्या संतोषासाठी ॥२६॥

**सर्वस्वं वीरशैवानां सकलार्थप्रकाशनम्।**
**अस्पृष्टमखिलैर्दोषैरादृतं शुद्धमानसैः।।२७।।**



**अन्वयार्थ :** वीरशैवानां = वीरशैवांना, सर्वस्वं = सर्वस्वासारखे असणारे, सकलार्थप्रकाशनम् = संपूर्ण पदार्थाचे प्रकाशन करणारे; अखिलैः = सर्व, दोषैः = दोषांनी, अस्पृष्टं = न स्पर्शिलेल्या, शुद्धमानसैः = शुद्धान्तःकरणाच्या व्यक्तींना, आदृतं = आदरणीय झालेले.

**भावार्थ :** वीरशैवांचे सर्वस्व, सर्व अर्थांचे प्रकाशक, सर्व दोषांपासून मुक्त आणि शुद्धांतःकरणाच्या शिवयोग्यांना आदरणीय असलेले ॥२७॥

**तेष्वागमेषु सर्वेषु पुराणेष्वखिलेषु च।**
**पुरा देवेन कथितं देव्यै तन्नन्दनाय च।।२८।।**

**अन्वयार्थ :** तेषु = त्या, सर्वेषु = सर्व, आगमेषु = आगमांमध्ये, च = आणि, अखिलेषु = समस्त, पुराणेषु = पुराणांमध्ये; पुरा = पूर्वी, देवेन = शिवाने, देव्यै = देवीला, च = आणि, तन्नन्दनाय = आपल्या पुत्राला, कथितं = सांगितले.

**भावार्थ :** शिवाद्वैत सिद्धान्त सर्व आगमांत आणि पुराणांमध्ये सांगितला असून जो पूर्वी शिवाने पार्वती आणि षडाननाला सांगितला.॥२८॥

**तत्सम्प्रदायसिद्धेन रेणुकेन महात्मना।**
**गणेश्वरेण कथितमगस्त्याय पुनः क्षितौ।।२९।।**

**अन्वयार्थ :** तत्सम्प्रदायसिद्धेन = त्या संप्रदायात प्रसिद्ध असलेल्या, महात्मना = महिमाशाली अशा, रेणुकेन = रेणुक नावाच्या, गणेश्वरेण = गणेश्वराने, क्षितौ = पृथ्वीवर, पुनः = पुन्हा, अगस्त्याय = अगस्ती मुनीला, कथितं = सांगितले.

**भावार्थ :** शिवसंप्रदायात प्रसिद्ध असलेले, सकल शिवगणांचे अधिपती, महात्मा रेणुकाचार्यांनी तेच पुन्हा पृथ्वीवर अगस्ती ऋषीला सांगितले.॥२९॥

**वीरशैवमहातन्त्रमेकोत्तरशतस्थलम् ।**
**अनुग्रहाय लोकानामभ्यधात् सुधियां वरः।।३०।।**

**अन्वयार्थ :** एकोत्तरशतस्थलम् = एकशेएक स्थलात्मक, वीरशैव-महातन्त्रम् = वीरशैव सिद्धान्त; लोकानाम् = लोकांच्या, अनुग्रहाय =

अनुग्रहासाठी, सुधियां = बुद्धिमंतांत, वर: = श्रेष्ठ, (अशा शिवयोगी शिवाचार्यांनी) अभ्यधात् = सांगितले.

**भावार्थ :** पूर्वी रेणुकाचार्यांनी अगस्ती मुनीला सांगितलेले पिण्डस्थलापासून ज्ञानशून्यस्थलापर्यंत असलेल्या एकशे एक स्थलांत वर्णिलेले वीरशैव महातंत्र, पंडिताग्रणी अशा शिवयोगी शिवाचार्यांनी वीरशैवांवर अनुग्रह करण्यासाठी पुन्हा प्रकट केले.॥३०॥

**सर्वेषां शैवतन्त्राणामुत्तरत्वान्निरुत्तरम्।**
**नाम्ना प्रतीयते लोके यत्सिद्धान्तशिखामणि:।।३१।।**

**अन्वयार्थ :** सर्वेषां = सर्व, शैवतन्त्राणाम् = शैव तंत्रांच्या, उत्तरत्वात् = उत्तर भागी असल्यामुळे, व निरत्तरम् = त्याच्यापेक्षा उत्तर भागी काही नसल्यामुळे, लोके = लोकांमध्ये, यत् = जो, सिद्धान्तशिखामणि: = सर्व सिद्धांतांचा शिखामणी अशा, नाम्ना = नावाने, प्रतीयते = प्रसिद्ध आहे.

**भावार्थ :** वीरशैवांचा हा शिवाद्वैत सिद्धान्त शैवतंत्राच्या उत्तर भागांत असून तो श्रेष्ठतम व सर्वांच्या शिरोभागी असल्यामुळे त्याचे सिद्धान्त-शिखामणि असे नाव प्रसिद्ध आहे. या सिद्धान्ताचे प्रतिपादन करणाऱ्या या ग्रंथाचेही 'सिद्धान्तशिखामणी' असेच नाव आहे.॥३१॥

**अनुगतसकलार्थे शैवतन्त्रै: समस्तै:**
**प्रकटितशिवबोधाद्वैतभावप्रसादे ।**
**विदधतु मतिमस्मिन् वीरशैवा विशिष्टा:**
**पशुपतिमतसारे पण्डितश्लाघनीये।।३२।।**

**अन्वयार्थ :** समस्तै: = सर्व, शैवतन्त्रै: = शैव तंत्रांतील, अनुगतसकलार्थे = संपूर्ण पदार्थांनी युक्त, प्रकटित = प्रसिद्ध केलेला, शिवबोध = शिवज्ञानाने, अद्वैतभावप्रसादे = शिवाद्वैतभावरूपी प्रसादाने युक्त, पण्डित-श्लाघनीये = पंडितांकडून प्रशंसनीय, पशुपतिमतसारे = पाशुपतमताचा साररूप असलेला, अस्मिन् = ह्या सिद्धान्तामध्ये, विशिष्टा: = विशिष्ट अशा, वीरशैवा: = वीरशैव लोंकानी, मतिम् = बुद्धी, लक्ष, विदधतु = घालावे.



**भावार्थ :** समस्त वीरशैव तंत्रांचा रहस्यार्थ व्यक्त करणारा, समस्त भावाने युक्त, प्रासादिक, शिवाद्वैतज्ञान प्रकट करणारा, विद्वानांनी प्रशंसिलेला, पाशुपतमताचा सारसर्वस्व असणारा अशा या सिद्धान्तशिखामणी ग्रंथाकडे वीरशैवांनी विशेष लक्ष द्यावे, अर्थात् त्याचे लक्षपूर्वक अध्ययन करावे.॥३॥

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ मङ्गलाचरण-श्रीशिवयोगिशिवाचार्य वंशवर्णनं नाम प्रथमः परिच्छेदः।***

**पहिला परिच्छेद समाप्त.**

❐❐❐

# दुसरा परिच्छेद

### शिव-परब्रह्माचे निरूपण

**सच्चिदानन्दरूपाय सदसद्व्यक्तिहेतवे।**
**नम: शिवाय साम्बाय सगणाय स्वयम्भुवे।।१।।**

**अन्वयार्थ :** सदसद्व्यक्तिहेतवे = सत्-असत्‌रूपी प्रपंचाच्या आविर्भावाला कारणीभूत, साम्बाय = अंबेसहित, सगणाय = गणासहित, स्वयम्भुवे = स्वयंभू अशा, सच्चिदानन्द = सच्चिदानंदरूपी, शिवाय = शिवाला, नम: = नमस्कार असो.

**भावार्थ :** भावाभावारूप प्रपंचनिर्मितीला कारण असणाऱ्या, प्रमथगंणासहित व पार्वतीयुक्त असणाऱ्या, सच्चिदानंदरूप स्वयंभू शिवाला नमस्कार असो.॥१॥

**सदाशिवमुखाशेषतत्त्वमौक्तिकशुक्तिकाम्।**
**वन्दे माहेश्वरीं शक्तिं महामायादिरूपिणीम्।।२।।**

**अन्वयार्थ :** सदाशिवमुखाशेष = सदाशिवापासून भूमीपर्यंत समस्त, तत्त्वमौक्तिक = तत्त्वरूपी मोत्यांना, शुक्तिकाम् = शिंपल्यासारखी असणाऱ्या, महामायादिरूपिणीम् = महामायादी अनेक रूपांनी युक्त अशा, माहेश्वरीं = महेश्वराची, शक्तिं = शक्तीला, वन्दे = मी नमस्कार करतो.

**भावार्थ :** जी सदाशिवापासून भूमीपर्यंत असणाऱ्या चौतीस तत्त्वरूप मोत्यांच्या निर्मितीस कारण अशी शिंपली आहे; जी शुद्धविद्या, महामाया, प्रकृती या नावांनी प्रसिद्ध आहे; त्या शिवासह अभिन्न रूपाने असलेल्या शक्तीला नमस्कार असो.॥२॥

**अस्ति सच्चित्सुखाकारमलक्षणपदास्पदम्।**
**निर्विकल्पं निराकारं निरस्ताशेषविप्लवम्।।३।।**

**अन्वयार्थ :** सच्चित्सुखाकारम् = सत्-चित्-आनंदस्वरूप, अलक्षण-पदास्पदम् = लक्षणाने अवर्णनीय, निर्विकल्पम् = भेदरहित, निराकारं = आकाररहित, निरस्त = नाहीसे झालेले, अशेष = संपूर्ण, विप्लवं = उपद्रव बाधा, अस्ति = होता.



**भावार्थ :** सच्चिदानंदस्वरूप परशिवब्रह्म सृष्टीच्या पूर्वी लक्षणरहित भेदरहित, आकारविहीन आणि सर्व उपद्रवांपासून मुक्त होता.॥३॥

**परिच्छेदकथाशून्यं प्रपञ्चातीतवैभवम्।**
**प्रत्यक्षादिप्रमाणानामगोचरपदे स्थितम्।।४।।**

**अन्वयार्थ :** परिच्छेकथाशून्यं = परिच्छेदरहित, प्रपञ्चातीतवैभवं = अलौकिक वैभवशाली, प्रत्यक्षादिप्रमाणानाम् = प्रत्यक्षादी प्रमाणांना, अगोचरपदे = अगम्यस्थानी, स्थितम् = राहाणारे.

**भावार्थ :** त्या परब्रह्माचे देश-वस्तु-कालानुसार विभाग होत नाहीत. ते प्राकृतिक प्रपंचाच्या पलीकडले आणि प्रत्यक्ष अनुमानादी सर्वप्रमाणांना अगोचर स्थानी होते.॥४॥

**स्वप्रकाशविराजन्तमनामयमनौपमम् ।**
**सर्वज्ञं सर्वगं शान्तं सर्वशक्ति निरङ्कुशम्।।५।।**

**अन्वयार्थ :** स्वप्रकाशं विराजन्तम् = स्वयंप्रकाशस्वरूपात विराजमान, अनामयम् = बाधारहित, अनौपमम् = उपमारहित, सर्वज्ञं = सर्व जाणणारा, सर्वगं = सर्वव्यापी, शान्तं = उपद्रवरहित, सर्वशक्ति = सर्वशक्तिमान, निरङ्कुशम् = कोणाच्याही अधीन नसलेला.

**भावार्थ :** तो परब्रह्म-शिव स्वयंप्रकाशित, जन्ममरणादी दोषांपासून मुक्त, उपमातीत, सर्वज्ञ, सर्वांतर्यामी, रागद्वेषरहित, शांत, सर्वसामर्थ्यवान्, सर्वव्यापक असलेला आणि ज्याच्यावर कोणाचाही अधिकार नसलेला असा होता.॥५॥

**शिवरुद्रमहादेवभवादिपदसंज्ञितम् ।**
**अद्वितीयमनिर्देश्यं परं ब्रह्म सनातनम्।।६।।**

**अन्वयार्थ :** शिवरुद्रमहादेवभवादिपदसंज्ञितम् = शिव, रुद्र, महादेव, भव अशा नावांनी संबोधिला जाणारा, अद्वितीयम् = एकमेव, अनिर्देश्यम् = दाखविण्यास अशक्य, सनातनम् = नेहमी असणारा-शाश्वत, परं ब्रह्म = परशिव ब्रह्म होता.

**भावार्थ :** ज्याला शिव, रुद्र, महादेव, भव इत्यादी नावे आहेत, तो सृष्टिपूर्वी सजातीय-विजातीय-स्वगतभेदरहित होता. तो दाखविण्यास अशक्य आणि नित्यपरब्रह्मरूप होता.॥६॥

**तत्र लीनमभूत् पूर्वं चेतनाचेतनं जगत्।**
**स्वात्मलीनं जगत्कार्यं स्वप्रकाश्यं तदद्‌भुतम्।।७।।**

**अन्वयार्थ :** तत्र = त्यात, चेतनाचेतनम् = चराचर, जगत् = प्रपंच, पूर्वं = उत्पत्तीच्या पूर्वी, लीनं = विलीन, अभूत् = होते, तत् = ते परब्रह्म, अद्‌भुतं = अद्‌भुत असे, स्वात्मलीनं = स्वत:तच विलीन झालेले, जगत्कार्यं = जगतरूपी कार्याला, स्वप्रकाश्यं = आपल्या प्रकाशाने प्रकाशित करते.

**भावार्थ :** पूर्वोक्त लक्षणांनी युक्त परब्रह्मात चराचर विश्व, निर्मितीपूर्वी लीन झालेले होते, त्यामुळे आंतरबाह्य इंद्रियांना ते अगोचर होते. आत्मरूपात सर्वदा लीन असलेल्या जगाला परब्रह्म आपल्या तेजाने प्रकाशित करते, असे ते अद्‌भुत आहे.॥७॥

**शिवाभिधं परं ब्रह्म जगन्निर्मातुमिच्छया।**
**स्वरूपमादधे किञ्चित्सुखस्फूर्तिविजृम्भितम्।।८।।**

**अन्वयार्थ :** शिवाभिधं = शिव नावाच्या, परं ब्रह्म = परब्रह्माने, जगन्निर्मातुमिच्छया = जग निर्माण करण्याच्या इच्छेने, सुखस्फूर्ति-विजृम्भितम् = आनंदाने उल्हसित असे, किञ्चित् = थोडेसे, स्वरूपमादधे = स्वरूप धारण केले.

**भावार्थ :** त्या शिवनामक परब्रह्माने जग निर्माण करण्याच्या इच्छेमुळे किंचित् स्फूर्तिमय व उल्हसित रूप धारण केले.॥८॥

**निरस्तदोषसम्बन्धं निरुपाधिकमव्ययम्।**
**दिव्यमप्राकृतं नित्यं नीलकण्ठं त्रिलोचनम्।।९।।**



**अन्वयार्थ :** निरस्तदोषसम्बन्धं = दोषरहित, निरुपाधिकं = उपाधिरहित, अव्ययम् = नाशरहित, अप्राकृतं = स्वाभाविक, नित्यं = शाश्वत, दिव्यं = दिव्य, नीलकण्ठं = नीलकण्ठ, त्रिलोचनम् = त्रिनेत्रधारी.

**भावार्थ :** ते स्वरूप, जन्ममरणादी सर्व दोषांपासून मुक्त, आपणांपासून भिन्न अविद्यादी उपाधिरहित, शाश्वत, त्रिकालाबाधित, दिव्य, त्रिगुणात्म प्रकृतीचा संबंध नसलेले आणि नित्य असे आहे. त्यालाच नीलकंठ आणि त्रिलोचन म्हणतात.॥९॥

**चन्द्रार्धशेखरं शुद्धं शुद्धस्फटिकसन्निभम्।**
**शुद्धमुक्ताफलाभासमुपास्यं गुणमूर्तिभि:।।१०।।**

**अन्वयार्थ :** चन्द्रार्धशेखरं = मस्तकावर अर्धचंद्र असलेला, शुद्धं = पवित्र, शुद्धस्फटिकसन्निभम् = शुद्धस्फटिकाप्रमाणे निर्मल, शुद्धमुक्ताफला-भासम् = शुद्ध मोत्याप्रमाणे कांती असलेला, गुणमूर्तिभि: = ब्रह्मादी त्रिमूर्तीकडून, उपास्यं = उपासिला जाणारा.

**भावार्थ :** त्याच्या मस्तकावर अर्धचंद्र आहे, तो शुद्ध आहे, स्फटिका-सारखा निर्मल आहे, मोत्यासारखा तेजस्वी आहे, ब्रह्मादी देवतांकडून उपासनीय आहे.॥१०॥

**विशुद्धज्ञानकरणं विषयं सर्वयोगिनाम्।**
**कोटिसूर्यप्रतीकाशं चन्द्रकोटिसमप्रभम्।।११।।**
**अप्राकृतगुणाधारमनन्तमहिमास्पदम् ।**

**अन्वयार्थ :** विशुद्धज्ञानकरणं = निर्मल ज्ञानाला कारणीभूत, सर्व-योगिनाम् = सर्व योग्यांना, विषयं = विषय, कोटिसूर्यप्रतीकाशं = कोटी सूर्यांसारखा तेजस्वी, चन्द्रकोटिसमप्रभम् = कोटीचंद्रांसारखा कांतिमान, अप्राकृत-गुणाधारं = अप्राकृतिक गुणांचा आधार, अनन्तमहिमास्पदम् = अनंत महिम्यांचा आधार.

**भावार्थ :** तो निर्मल ज्ञान होण्यास कारणीभूत असून सर्व योग्यांच्या ज्ञानाचा विषय झालेला आहे. तो कोटी सूर्यांसारखा तेजस्वी असून कोटी चंद्रांसारखा कांतिमान आहे. तो प्राकृतिक सत्त्वादीगुणांपेक्षा विलक्षण अशा

सर्वज्ञत्वादी अनंत कल्याणकारी गुणांचा आश्रय असून अघटित घटनादी अनंत महिम्यांचा आधार आहे. त्या परशिवाला स्वत:त विलीन असलेल्या सृष्टीची निर्मिती करण्याची इच्छा झाली.॥११॥

**तदीया परमा शक्तिः सच्चिदानन्दलक्षणा।।१२।।**
**समस्तलोकनिर्माण–समवायस्वरूपिणी।**
**तदिच्छयाऽभवत् साक्षात्तत्स्वरूपानुसारिणी।।१३।।**

**अन्वयार्थ :** सच्चिदानन्दलक्षणा = सच्चिदानंदलक्षणांनी युक्त, समस्त-लोक = सर्व लोकांच्या, निर्माण = निर्मितीत, समवायस्वरूपिणी = समवाय संबंधाने असणारी, तदीया = त्याची, परमा शक्ति: = विमर्शशक्ती, तदिच्छया = त्याच्या इच्छेने, साक्षात् = स्वत:, तत्स्वरूपानुकारिणी = त्याचे स्वरूप अनुसरणारी, अभवत् = झाली.

**भावार्थ :** परशिवाची जी विमर्शशक्ती आहे ती सच्चिदानंदस्वरूपिणी आहे. ही विमर्शशक्ती विश्वाच्या निर्मितीचे उपादान कारण असून तीच विश्वस्वरूप होते.॥१२॥ परशिवाच्या ठिकाणी जगाच्या निर्मितीची इच्छा झाल्याबरोबर त्याच्या ठिकाणी अविनाभावरूपाने राहाणारी विमर्शशक्ती परशिवाच्या स्वरूपाप्रमाणे सच्चिदानंदस्वरूप स्वीकारून पुढे विभाग-परामर्शाच्या अवस्थेत समस्त प्रपंचाच्या उत्पत्तीला उपादान कारण झाली.॥१३॥

**स शम्भुर्भगवान् देवः सर्वज्ञः सर्वशक्तिमान्।**
**जगत्सिसृक्षुः प्रथमं ब्रह्माणं सर्वदेहिनाम्।।१४।।**
**कर्तारं सर्वलोकानां विदधे विश्वनायकः।**

**अन्वयार्थ :** भगवान् = षड्गुणैश्वर्यशाली, देव: = लीलामूर्ती, सर्वज्ञ: = सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् = सामर्थ्यशाली, जगत्सिसृक्षु: = सृष्टी निर्माण करण्याच्या इच्छेने, विश्वनायक: = विश्वाचा नायक अशा, स: शम्भु: = त्या परमेश्वराने, प्रथमं = सर्वप्रथम, सर्वलोकानां = सर्व लोकांना, सर्वदेहिनां = सर्व जीवांना, कर्तारं = निर्माण करणाऱ्या, ब्रह्माणं = ब्रह्मदेवाला, विदधे = निर्माण केले.



**भावार्थ :** जगनिर्मितीच्या हेतूने सर्व प्रकारच्या संपत्ती, ज्ञान, यश, शोभा, वैराग्य आणि धर्म अशा षड्विध ऐश्वर्यसंपन्न, भगवान, देव, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान आणि विश्वनायक अशा शिवाने चौदा भुवने व त्या भुवनांत आश्रय घेणाऱ्या प्राण्यांची निर्मिती करण्यासाठी समर्थ अशा ब्रह्मदेवाला प्रथम निर्माण केले.॥१४॥

**तस्मै प्रथमपुत्राय शङ्करः शक्तिमान् विभुः।।१५।।**
**सर्वज्ञः सकला विद्याः सानुग्रहमुपादिशत्।**

**अन्वयार्थ :** शक्तिमान् = सामर्थ्यशाली, विभु: = व्यापक, सर्वज्ञ: = सर्वज्ञ, शङ्कर: = परमेश्वराने, तस्मै = त्या, प्रथमपुत्राय = आपला पहिला पुत्र अशा ब्रह्मदेवाला, सकला: = संपूर्ण, विद्या: = विद्या, सानुग्रहं = अनुग्रह-पूर्वक, उपादिशत् = उपदेशिल्या.

**भावार्थ :** सर्वज्ञ शिवाने शक्तियुक्त होऊन त्या प्रथम निर्मिलेल्या आपल्या मुलाला ब्रह्मदेवाला अनुग्रहपूर्वक सर्व विद्यांचा उपदेश केला.॥१५॥

**प्राप्तविद्यो महादेवाद् ब्रह्मा विश्वनियामकात्।।१६।।**
**समस्तलोकान्निर्मातुं समुद्यमपरोऽभवत्।**

**अन्वयार्थ :** विश्वनियामकात् = विश्वाचे नियंत्रण करणारा अशा, महादेवात् = महादेवाकडून, प्राप्तविद्य: = विद्या प्राप्त करून घेतलेला, ब्रह्मा = ब्रह्मदेव, समस्तलोकान् = सर्वलोकांच्या, निर्मातुं = निर्मितीस, समुद्योगपर: = पूर्णत: उद्योगशील, अभवत् = झाला.

**भावार्थ :** जगन्नियामक परमेश्वर श्रीशंकरापासून प्राप्त झालेल्या सर्व विद्यांच्या आधाराने आणि त्याच्या आज्ञेने ब्रह्मदेवाने जगनिर्मितीचा उद्योग सुरू केला.॥१६॥

**कृतोद्योगोऽपि निर्माणे जगतां शङ्कराज्ञया।।१७।।**
**अज्ञातोपायसम्पत्तेरभवन्माययाऽऽवृतः।**

**अन्वयार्थ :** शङ्कराज्ञया = शंकराच्या आज्ञेप्रमाणे, जगतां = ब्रह्मांडांचे, निर्माणे = निर्माण करण्यात, कृतोद्योगोऽपि = उद्यमशील झाला तरी, मायया =

मायेने, आवृतः = आवृत झाल्यामुळे, अज्ञातोपायासम्पत्तिः = उपायरूपी संपत्तीचे ज्ञान नाही असा, अभवत् = झाला.

**भावार्थ :** शंकराच्या आज्ञेने ब्रह्मदेव ब्रह्मांडांचे निर्माण करण्यास उद्युक्त झाला तरीही तो मायेने आवृत झाल्यामुळे त्याला सृष्टिनिर्मितीचा उपाय सुचेना.॥१७॥

**विधातुमखिलाँलोकानुपायं प्राप्तुमिच्छया।।१८।।**
**पुनस्तं प्रार्थयामास देवदेवं त्रियम्बकम्।**

**अन्वयार्थ :** अखिलान् = सकल, लोकान् = लोकांचे, विधातुं = सृजन करण्यासाठी, उपायं = युक्ती, प्राप्तुमिच्छया = प्राप्तीच्या इच्छेने, देवदेवं = देवांचा देव असा, त्रियम्बकम् = त्रिनेत्रधारी शिवाला, पुनः = पुन्हा, प्रार्थयामास = (त्याने) प्रार्थना केली.

**भावार्थ :** सर्व लोकांचे सृजन करण्याची युक्ती प्राप्त करून घेण्याच्या इच्छेने देवाधिदेव त्रिनेत्रधारी शंकराची ब्रह्मदेवाने पुन्हा प्रार्थना केली.॥१८॥

**नमस्ते देवदेवेश नमस्ते करुणाकर।।१९।।**
**अस्मदादिजगत्सर्वनिर्माणनविधिक्षम ।**

**अन्वयार्थ :** देवदेवेश = हे देवाधिदेव, करुणाकर = हे दयानिधी, नमस्ते = तुला नमस्कार असो, अस्मदादि = माझ्यासह, जगत्सर्व = सर्व जगाचे, निर्माणनविधिक्षम = निर्माण करण्याच्या विधीत समर्थ असलेला.

**भावार्थ :** हे देवाधिदेव, माझ्यासह सर्व जगाची निर्मिती करण्यास समर्थ असलेल्या दयानिधे, तुला नमस्कार असो.॥१९॥

**उपायं वद मे शम्भो जगत्स्रष्टः जगत्पते।।२०।।**
**सर्वज्ञः सर्वशक्तिस्त्वं सर्वकर्ता सनातनः।**

**अन्वयार्थ :** मे = मला, जगत्सृष्टौ = जगाच्या निर्मितीसाठी, उपायं = युक्ती, वद = सांग, जगत्पते = जगाच्या पती अशा, शम्भो = हे शंकरा, त्वं = तू, सर्वज्ञः = सर्वज्ञ, सर्वशक्तिः = सर्वशक्तिमान, सर्वकर्ता = सर्व करणारा, सनातनः = शाश्वत असा आहेस.



**भावार्थ :** हे जगाचा पती असणाऱ्या शंकरा, तू सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, सर्वकर्ता आणि शाश्वत असा आहेस, म्हणून मला जगाच्या निर्मितीचा उपाय सांग.॥२०॥

**इति संप्रार्थितः शम्भुर्ब्रह्मणा विश्वनायकः।।२१।।**
**उपायमवदत् तस्मै लोकसृष्टिप्रवर्तनम्।**

**अन्वयार्थ :** इति = अशा प्रकारे, ब्रह्मणा = ब्रह्मदेवाकडून, संप्रार्थितः = प्रार्थिलेला, विश्वनायकः = विश्वाचा नायक, शम्भुः = परमात्म्याने, तस्मै = त्याला, लोकसृष्टिप्रवर्तनम् = लोकांचे सृजन करण्यास प्रवृत्त होण्याचा, उपायं = उपाय, अवदत् = सांगितला.

**भावार्थ :** अशा प्रकारे ब्रह्मदेवाकडून प्रार्थिलेल्या विश्वनायक शंकराने त्याला ब्रह्मांडांचे सृजन करण्यास प्रवृत्त होण्यासाठी उपाय सांगितला.॥२१॥

**उपायमीश्वरेणोक्तं लब्ध्वाऽपि चतुराननः।।२२।।**
**न समर्थोऽभवत् कर्तुं नानारूपमिदं जगत्।**

**अन्वयार्थ :** चतुराननः = चतुर्मुख, ईश्वरेणोक्तं = ईश्वराकडून सांगितला गेलेला, उपायं = उपाय, लब्ध्वाऽपि = प्राप्त करून सुद्धा, नानारूपं = नाना प्रकारच्या अशा, इदं = ह्या, जगत् = जगाला, कर्तुं = निर्माण करण्यास, समर्थः = समर्थ, न अभवत् = झाला नाही.

**भावार्थ :** चतुर्मुख ब्रह्मदेव शंकराकडून जगाच्या निर्मितीचा उपाय प्राप्त करून घेऊन सुद्धा या बहुरूपी जगाचे निर्माण करण्यास समर्थ झाला नाही.॥२२॥

**पुनस्तं प्रार्थयामास ब्रह्मा विह्वलमानसः।।२३।।**
**देवदेव महादेव जगत्प्रथमकारण।**
**नमस्ते सच्चिदानन्द स्वेच्छाविग्रहराजित।।२४।।**
**भव शर्व महेशान सर्वकारणकारण।**
**भवदुक्तो ह्युपायो मे न किञ्चिज्ज्ञायतेऽधुना।।२५।।**

**अन्वयार्थ :** विह्वलमानसः = व्याकुल मनाचा, ब्रह्मा = ब्रह्मा, पुनः = पुन्हा, तं = त्याला, प्रार्थयामास = प्रार्थना करिता झाला, देवदेव = देवाधिदेवा, महादेव = महादेवा, जगत्प्रथमकारण = जगाच्या आदिकारणा, सच्चिदानन्द = सच्चिदानंदस्वरूपा, स्वेच्छाविग्रहराजित = स्वेच्छेने देह धारण करणाऱ्या, भव = भवा, शर्व = शर्वा, महेशान = महेश्वरा, सर्वकारणकारण = सर्व कारणांचे कारण अशा (तुला), नमस्ते = नमस्कार असो, भवदुक्तोऽपि = तुझ्याकडून सांगितला गेला तरी, उपायः = उपाय, मे = मला, अधुना = सध्या, किञ्चित् = थोडाही, न ज्ञायते = समजत नाही.

**भावार्थ :** व्याकुल मनाने ब्रह्मदेव पुन्हा त्याची (शंकराची) प्रार्थना करू लागला. हे देवाधिदेवा, महादेवा, जगाच्या आदिकारणा, सच्चिदानंद-स्वरूपा, स्वेच्छाप्रकारे देहधारण करणाऱ्या, भवा, शर्वा, महेश्वरा, सर्व कारणांचे कारण असणाऱ्या तुला नमस्कार असो. तू सांगितलेला उपाय मला अजून थोडाही समजला नाही.॥२३-२५॥

**सृष्टिं विधेहि भगवन् प्रथमं परमेश्वर।**
**ज्ञातोपायस्ततः कुर्यां जगत्सृष्टिमुमापते॥२६॥**

**अन्वयार्थ :** भगवन् = हे भगवंता, परमेश्वर = परमेश्वरा, प्रथमं = अगोदर, सृष्टिं = सृष्टी, विधेहि = कर, उमापते = हे उमापती, ततः = त्यानंतर, ज्ञातोपायः = उपाय जाणून, जगत्सृष्टिं = जगाची निर्मिती, कुर्याम् = करीन.

**भावार्थ :** हे उमापती भगवंता, परमेश्वरा, प्रथम तू सृष्टीचे निर्माण कर. म्हणजे तो उपाय समजल्यानंतर मी जगाची निर्मिती करीन.॥२६॥

**इत्येवं प्रार्थितः शम्भुर्ब्रह्मणा विश्वयोनिना।**
**ससर्जात्मसमप्रख्यान् सर्वगान् सर्वशक्तिकान्॥२७॥**
**प्रबोधपरमानन्दपरिवाहितमानसान् ।**
**प्रमथान् विश्वनिर्माणप्रलयापादनक्षमान्॥२८॥**

**अन्वयार्थ :** इत्येवं = अशा प्रकारे, विश्वयोनिना = सृष्टिकर्त्या, ब्रह्मणा = ब्रह्मदेवाकडून, प्रार्थितः = प्रार्थिलेला, शम्भुः = शंभू, आत्मसम-प्रख्यान् = आपणासारखेच प्रसिद्ध, सर्वगान् = सर्वगामी, सर्वशक्तिमान् = सर्वशक्तियुक्त, प्रबोध = ज्ञानाच्या, परमानंद = परमानंदाने, परिवाहित = भरलेल्या, मानसान् = मनाच्या, विश्व = विश्वाची, निर्माण = निर्मिती, प्रलय = संहार, आपादन = संपादन, क्षमान् = समर्थ, प्रमथान् = प्रमथगणांना, ससर्ज = निर्मिले.



**भावार्थ :** अशाप्रकारे सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाने प्रार्थना केल्यानंतर शंकराने आपल्यासारखेच प्रसिद्ध, सर्वगामी, सर्व शक्तींनी युक्त, ज्ञानपरमानंदाने भरलेल्या मनाचे आणि विश्वाचे सृजन, संहार करण्यास समर्थ असे वीर, नंदी, भृंगी, वृषभ, स्कन्द रेणुक, दारुकादी असंख्य शिवगण निर्माण केले.॥२७-२८॥

**तेषु प्रमथवर्गेषु सृष्टेषु परमात्मना।**
**रेणुको दारुकश्चेति द्वावभूतां शिवप्रियौ॥२९॥**

**अन्वयार्थ :** परमात्मना = परमात्म्याकडून, सृष्टेषु = निर्मिलेल्या, तेषु = त्या, प्रमथवर्गेषु = प्रमथसमूहात, रेणुकः = रेणुक, दारुकः = दारुक, इति द्वौ = हे दोघे, शिवप्रियौ = शिवाला प्रिय, अभूतां = झाले.

**भावार्थ :** परमात्म्याने निर्मिलेल्या अनेक प्रमथगणांपैकी रेणुक आणि दारुक हे दोघे शिवाला अत्यंत प्रिय होते.॥२९॥

**सर्वविद्याविशेषज्ञौ सर्वकार्यविचक्षणौ।**
**मायामलविनिर्मुक्तौ महिमातिशयोज्ज्वलौ॥३०॥**

**अन्वयार्थ :** सर्वविद्याविशेषज्ञौ = सर्व विद्यांचे मर्म जाणणारे, सर्वकार्यविचक्षणौ = सर्व कार्यात कुशल, मायामलविनिर्मुक्तौ = मायामला-पासून मुक्त असलेले, महिमातिशयोज्ज्वलौ = आपल्या अतिशय महिम्याने उज्ज्वल असे.

**भावार्थ :** ते दोघे सर्व विद्यांतील मर्म जाणणारे असून सर्व कार्यात अत्यंत चतुर होते. आणव, मायिक (मायीय) व कार्मिक या त्रिमलांपासून ते मुक्त होते. ते अत्यंत प्रभावी असून तेजःपुंज होते.॥३०॥

**आत्मानन्दपरिस्फूर्तिरसास्वादनलम्पटौ।**
**शिवतत्त्वपरिज्ञानतिरस्कृतभवामयौ।।३१।।**

**अन्वयार्थ :** आत्मानन्दपरिस्फूर्ति = आत्मानंदाने स्फुरलेल्या, रसास्वादन = रसास्वादात, लम्पटौ = निमग्न, शिवतत्त्वपरिज्ञान = शिवतत्त्वाच्या परिज्ञानाने, तिरस्कृत = निवृत्त झालेला, भवामयी = भवरूपी रोग.

**भावार्थ :** आत्मानंदातून निर्माण झालेल्या रसास्वादात ते तल्लीन झाले होते आणि शिवतत्त्वाचे यथार्थ ज्ञान झाल्यामुळे त्यांचा संसाररूपी रोग दूर झाला होता. अर्थात् त्यांना जन्ममरणाचे भय नव्हते.॥३१॥

**नानापथमहाशैवतन्त्रनिर्वाहतत्परौ ।**
**वेदान्तसारसर्वस्वविवेचनविचक्षणौ ।।३२।।**

**अन्वयार्थ :** नानापथ = अनेक मार्गांनी, महाशैवतन्त्र = उत्कृष्ट शिवाद्वैत सिद्धान्ताची, निर्वाहतत्परौ = निश्चित रूपाने प्रतिष्ठापना करण्यात तत्पर, वेदान्तसारसर्वस्व = उपनिषदांचे सारसर्वस्व, विवेचनविचक्षणौ = विवेचन करण्यात निपुण.

**भावार्थ :** अनेक उपायांनी शिवाद्वैत सिद्धान्ताची निश्चयाने प्रतिष्ठापना करण्यात तत्पर आणि उपनिषदांचे सारसर्वस्व उलगडून दाखविण्यात निपुण असे ते दोघे होते.॥३२॥

**नित्यसिद्धौ निरातङ्कौ निरङ्कुशपराक्रमौ।**
**तादृशौ तौ महाभागौ संवीक्ष्य परमेश्वरः।।३३।।**

**अन्वयार्थ :** नित्यसिद्धौ = नित्यसिद्ध, निरातङ्कौ = निर्भय, निरङ्कुश-पराक्रमौ = अप्रतिहत पराक्रमी, तादृशौ = अशा, तौ = त्या, महाभागौ = भाग्यशाली दोघांना, परमेश्वरः = परमेश्वराने, संवीक्ष्य = पाहून.

**भावार्थ :** नित्यसिद्ध, निर्भय आणि अप्रतिहत पराक्रमी अशा असलेल्या त्या दोघा भाग्यवंतांना पाहून परमेश्वराने.॥३३॥



**समर्थौ सर्वकार्येषु विश्वासपरमाश्रितौ।**
**अन्तःपुरद्वारपालौ निर्ममे नियतौ विभुः।।३४।।**

**अन्वयार्थ :** सर्वकार्येषु = सर्व कार्यात, समर्थौ = समर्थ असलेल्या, परं = परम, विश्वाससमाश्रितौ = विश्वासास पात्र असलेल्या, विभुः = सर्वव्यापी ईश्वराने, नियतौ = शुद्धात्मा अशा त्या दोघांना, अन्तःपुर-द्वारपालौ = अंतःपुराचे द्वारपाल म्हणून, निर्ममे = नेमले.

**भावार्थ :** अत्यंत परिशुद्ध आत्म्याचे, सर्व कामात समर्थ आणि अत्यंत विश्वसनीय अशा त्या दोघांस महादेवांनी आपल्या अंतःपुराचे द्वारपाल केले.॥३४॥

**गणेश्वरौ रेणुकदारुकावुभौ विश्वासभूतौ नवचन्द्रमौलेः।**
**अन्तःपुरद्वारगतौ सदा तौ वितेनतुर्विश्वपतेस्तु सेवाम्।।३५।।**

**अन्वयार्थ :** नवचन्द्रमौलेः = बालचंद्राला मस्तकावर धारण केलेल्या परमात्म्याच्या, विश्वासभूतौ = विश्वासपात्र अशा, अन्तःपुरद्वारगतौ = अंतःपुराचे द्वारपाल असलेले, तौ = ते, उभौ = दोघे, रेणुकदारुकौ = रेणुक आणि दारुक नावाचे, गणेश्वरौ = गणेश्वर, सदा = निरंतर, विश्वपतेः = विश्वाचा पती अशा शिवाची, सेवाम् = सेवा, वितेनतुः = करीत होते.

**भावार्थ :** मस्तकावर नवचंद्र धारण करणाऱ्या शंकराचे रेणुक आणि दारुक हे दोघे गणेश्वर अत्यंत विश्वासातील होते व अंतःपुराच्या दारावर पहारा करून ते सदैव शंकराची सेवा करीत होते.॥३५॥

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ जगत्सृष्टिविचा-रेणुकदारूकावतरणं नाम द्वितीयः परिच्छेदः।***

**दुसरा परिच्छेद समाप्त.**

❒❒❒

# तिसरा परिच्छेद

### रेणुकाचार्यांचे भूलोकावतरण

### कैलासवर्णन

**कदाचिदथ कैलासे कलधौतशिलामये।**
**गन्धर्ववामनयनाक्रीडामौक्तिकदर्पणे ।।१।।**

**अन्वयार्थ :** अथ = नंतर, कदाचित् = एकदा, कलधौत = चांदीच्या, शिलामये = शिलांनी युक्त, गन्धर्व = गंधर्वाच्या, वामनयना = स्त्रियांना, क्रीडामौक्तिकदर्पणे = क्रीडेसाठी केलेल्या मोत्यांच्या आरशाप्रमाणे असणाऱ्या, कैलासे = कैलास पर्वतावर.

**भावार्थ :** एकदा चांदीच्या शिलांनी भरलेला कैलास पर्वत गंधर्वस्त्रियांच्या क्रीडेसाठी केलेला मोत्यांचा आरसा असल्यासारखा दिसत होता.॥१॥

**मन्दारवकुलाशोकमाकन्दप्रायभूरुहे ।**
**मल्लीमरन्दनिष्यन्दपानपीनमधुव्रते ।।२।।**

**अन्वयार्थ :** मन्दार = मंदार, बकुल = बकुल, अशोक = अशोक, माकन्द = आंबा, प्राय = आदी, भूरुहे = वृक्षांनी युक्त, मल्ली = मोगऱ्याच्या फलांचा, मरन्द = मकरंद, निष्यन्द = स्राव, पान = पिऊन, पीन = पुष्ट झालेल्या, मधुव्रते = भ्रमरांनी युक्त.

**भावार्थ :** कैलास पर्वत मंदार, बकुल, आंबा आदी जातींच्या अनेक वृक्षांची दाटी असलेला, बटमोगरा वगैरे फुलझाडांच्या फुलांतील मकरंद पिऊन पुष्ट झालेल्या भ्रमरांनी भरलेला होता.॥२॥

**कुङ्कुमस्तबकामोदकूलङ्कषहरिन्मुखे ।**
**कलकण्ठकुलालापकन्दलद्रागबन्धुरे ।।३।।**

**अन्वयार्थ :** कुङ्कुमस्तबक = लाल फुलांच्या गुच्छांच्या, आमोद = सुवासाने, कूलङ्कष = भरलेली, हरिन्मुखे = दिशांची मुखे, कलकण्ठ =



कोकिलांचे, कुल = समूह, आलाप = आलापांच्या, कन्दलद् = मधुर ध्वनीने, राग = पंचम रागाने, बन्धुरे = मनोहर.

**भावार्थ :** लाल रंगाच्या सुवासिक फुलांच्या झुपक्यांमुळे कैलास-पर्वताच्या सर्व दिशा सुगंधित झालेल्या होत्या. तेथील झाडांवर अनेक कोकिल पक्षी बसून मधुर गायन करीत होते. त्यांचा मधुर शब्द सर्वत्र भरून राहिला होता.॥३॥

**किन्नरीगीतमाधुर्यपरिवाहितगह्वरे ।**
**सानन्दवरयोगीन्द्रवृन्दालङ्कृतकन्दरे ।।४।।**

**अन्वयार्थ :** किन्नरी = किन्नर स्त्रियांच्या, गीतमाधुर्य = गायनाच्या माधुर्याने, परिवाहित = व्याप्त, गह्वरे = दऱ्यांनी युक्त, सानन्दवरयोगीन्द्र = सानंदादी श्रेष्ठ शिवयोग्यांच्या, वृन्द = समूहाने, अलङ्कृत = सुशोभित, कन्दरे = गुहांनी युक्त.

**भावार्थ :** कैलास पर्वतावर किन्नरस्त्रिया मधुर स्वराने गायन करीत होत्या. त्यांच्या मंजुळ शब्दाने तेथील सर्व दऱ्या दुमदुमत होत्या. तर काही गुहांत सानंदगणेश्वरादी शिवयोगी ध्यान लावून बसल्यामुळे त्यांना अप्रतिम शोभा आली होती.॥४॥

**हेमारविन्दकलिकासुगन्धिरसमानसे ।**
**शातकुम्भमयस्तम्भशतोत्तुङ्गविराजिते ।।५।।**

**अन्वयार्थ :** हेमारविन्द = सुवर्णकमलांच्या, कलिका = कळ्यांच्या, सुगन्धिरस = सुगंधरसाने युक्त अशा, मानसे = मानस सरोवराने सुशोभित, शातकुम्भमय = सुवर्णमय, उत्तुङ्ग = उंच, शतस्तम्भ = शेकडो स्तंभांनी, विराजिते = शोभणारा कैलास पर्वत.

**भावार्थ :** कैलास पर्वतावर सुवर्णकमलकलिकांच्या सुगंधरसाने मानस सरोवर भरलेले होते. तेथील शेकडो उंच शिखरे सुवर्णमय स्तंभांप्रमाणे शोभत होती.॥५॥

**माणिक्यदीपकलिकामरीचिद्योतितान्तरे।**
**द्वारतोरणसंरूढशङ्खपद्मनिधिद्वये ।।६।।**

**अन्वयार्थ :** माणिक्य = माणिक रत्नांच्या, दीपकलिका = ज्योतींच्या, मरीचि = किरणांनी, द्योतितान्तरे = प्रकाशमान अंत:पुरांनी युक्त, द्वारतोरण = दारावर तोरण बांधण्यासाठी असणाऱ्या स्तंभांवर, संरूढ = ठेवलेले, शङ्खपद्म = शंख आणि पद्मरूपी, निधिद्वये = दोन संपत्तींनी युक्त.

**भावार्थ :** माणिक्य-रत्नदीपांच्या किरणप्रकाशाने कैलासाचे अंत:पुर उजळलेले होते. महाद्वाराच्या तोरणस्तंभांवर शंख आणि पद्म ठेवलेले होते.।।६।।

**मुक्तातारकितोदारवितानाम्बरमण्डिते ।**
**स्पर्शलक्षितवैडूर्यमयभित्तिपरम्परे ।।७।।**

**अन्वयार्थ :** मुक्तातारकितोदार = नक्षत्रासारख्या मोत्यांनी बनविलेला, वितान = विशाल, अम्बर = वस्त्राने, मण्डिते = सजविलेला, स्पर्शलक्षित = स्पर्शाने जाणवणाऱ्या, वैडूर्यमय = वैडूर्य रत्नांनी भरलेल्या, भित्तिपरम्परे = भिंतींच्या रांगांनी युक्त.

**भावार्थ :** त्या कैलास पर्वतावर असलेल्या मंटपाच्या आतील भाग विशाल वस्त्राने अलंकृत असून त्यावर नक्षत्रांप्रमाणे मोत्ये जडविलेले होते. त्याच्या भिंती स्पर्शानेही जाणवणाऱ्या वेडूर्य रत्नांनी भरलेल्या होत्या.।।७।।

**सञ्चरत्प्रमथश्रेणीपदवाचालनूपुरे ।**
**प्रवालवलभीशृङ्गशृङ्गारमणिमण्टपे ।।८।।**

**अन्वयार्थ :** संचरत् = संचार करणाऱ्या, प्रमथश्रेणी = प्रमथगणांच्या, पद = पायांतील, वाचाल = ध्वनी करणाऱ्या, नूपुरे = पैंजणांनी, प्रवाल = पोवळ्यांच्या, वलभीशृङ्ग = उतरत्या छताच्या शिखरांनी, शृङ्गार = अलंकृत, मणिमण्डपे = मणिमय मंटपात.

**भावार्थ :** पोवळे जडविलेल्या उतरत्या छताच्या शिखरांनी शोभणाऱ्या रत्नमंटपात संचार करणाऱ्या प्रमथगणांच्या पायांतील नुपुरांचा ध्वनी ऐकू येत होता.।।८।।



**वन्दारुदेवमुकुटमन्दाररसवासितम्।**
**रत्नसिंहासनं द्विव्यमध्यस्तं परमेश्वरम्।।९।।**

**अन्वयार्थ :** वन्दारु = वंदन करणाऱ्या, देवमुकुट = देवांच्या मुकुटांत असणाऱ्या, मन्दार = मंदार पुष्पांच्या, रस = परिमळाने, वासितं = सुवासित, दिव्यं = देवलोकासंबंधी, रत्नसिंहासनं = रत्नसिंहासनावर, अध्यस्तं = बसलेल्या, परमेश्वरम् = शिवाला.

**भावार्थ :** वंदन करणाऱ्या तेहतीस कोटी देवांच्या मुकुटांतील मंदार पुष्पांच्या परिमळाने सुगंधित झालेल्या दिव्य अशा नवरत्नखचित सिंहासनावर परमेश्वर विराजमान होता.।।९।।

**तमास्थानगतं देवं सर्वलोकमहेश्वरम्।**
**त्र्य्यन्तकमलारण्यविहारकलहंसकम्।।१०।।**

**अन्वयार्थ :** त्रयी = वेदांचे, अन्त = शेवटचा भाग, अर्थात् उपनिषद् रूपी, कमलारण्य = कमलवनात, विहार = संचार करणारा, कलहंसकम् = राजहंसासारखा असणारा, आस्थानगतं = देवसभेत बसलेला, सर्वलोक-महेश्वरम् = सर्व लोकांचा अधिपती असणारा, तं = त्या, देवं = देवाला.

**भावार्थ :** देवांच्या दरबारात मध्यभागी बसलेल्या सर्व लोकांचा महेश्वर, हा उपनिषदरूपी कमलारण्यात विहार करणाऱ्या राजहंसाप्रमाणे शोभत होता.।।१०।।

**उदारगुणमोंकारशुक्तिकापुटमौक्तिकम्।**
**सर्वमङ्गलसौभाग्यसमुदायनिकेतनम्।।११।।**

**अन्वयार्थ :** उदारगुणं = औदार्य गुणाने युक्त, ओङ्कार = ओंकाररूपी, शुक्तिकापुट = शिंपल्यातील, मौक्तिकम् = मोत्यासारखा असणारा, सर्व = नाना प्रकारच्या, मङ्गल = मंगलांचे, सौभाग्य = सौभाग्यांचे, समुदाय = समूहाचे, निकेतनम् = निवासस्थान.

**भावार्थ :** सर्व प्रकारचे मंगल आणि सौभाग्यसमूहाचे आगार असणारा, अत्यंत उदार असा परमेश्वर ओंकाररूपी शिंपल्यातील मोत्याप्रमाणे शोभत होता.॥११॥

**संसारविषमूर्च्छालुजीवसञ्जीवनौषधम्।**
**नित्यप्रकाशनैर्मल्यकैवल्यसुरपादपम्।।१२।।**

**अन्वयार्थ :** संसार = संसाररूपी, विष = विषाने, मूर्च्छालु = मूर्च्छित झालेल्या, जीव = जीवांना, सञ्जीवनौषम् = संजीवनी औषधासारखा असणारा, नित्यप्रकाश = स्वप्रकाशाने, नैर्मल्य = निर्मल स्वभावाचा, कैवल्य = मोक्षाचा, सुरपादपम् = कल्पवृक्ष.

**भावार्थ :** तो परमेश्वर संसारविषाने मूर्च्छित झालेल्या जीवांना संजीवनी औषधासारखा, स्वयंप्रकाशी, निर्मल स्वभावाचा आणि शरणागत भक्तांसाठी मोक्षदायक कल्पवृक्षच होता.॥१२॥

**अनन्तपरमानन्दमकरन्दमधुव्रतम् ।**
**आत्मशक्तिलतापुष्यत्रिलोकीपुष्पकोरकम्।।१३।।**

**अन्वयार्थ :** अनन्त = अपार, परमानन्द = परमानंद असा, मकरन्द = पुष्प-रसाचे पान करण्यात, मधुव्रतम् = भ्रमरस्वरूप, आत्मशक्ति = आत्मशक्तिरूपी, लता = वेलीने, पुष्यत् = पोसलेल्या, त्रिलोकी = तीन लोकरूपी, पुष्पकोरकम् = फुलाच्या कळीप्रमाणे.

**भावार्थ :** मकरंदाच्या आस्वादात तल्लीन झालेल्या भ्रमराप्रमाणे परमात्मा आत्मानंदाच्या आस्वादात तल्लीन झाला होता. तो आपल्या ठिकाणी नित्य असलेल्या शक्तिरूपी वेलीने पोसल्या जाणाऱ्या त्रिलोकरूपी पुष्पाच्या कळीसारखा शोभत होता.॥१३॥

**ब्रह्माण्डकुण्डिकाषण्डपिण्डीकरणपण्डितम्।**
**समस्तदेवताचक्रचक्रवर्तिपदे स्थितम् ।।१४।।**



**अन्वयार्थ :** ब्रह्माण्ड = अनंत ब्रह्मांड अशा, कुण्डिका = पात्रांच्या, षण्ड = समूहाला, पिण्डीकरण = एकत्रित करण्यात, पण्डितम् = कुशल, समस्त = सर्व, देवताचक्र = देवतासमूहाच्या, चक्रवर्तिपदे = सार्वभौम पदावर, स्थितम् = असलेला.

**भावार्थ :** अनंत ब्रह्मांडरूपी पात्रांना एकरूप करण्याच्या कार्यात कुशल असा परमेश्वर सर्व देवतांच्या समूहात चक्रवर्ती सम्राटासारखा शोभत होता.॥१४॥

**चन्द्रबिम्बायुतच्छायादायादद्युतिविग्रहम्।**
**माणिक्यमुकुटज्योतिर्मञ्जरीपिञ्जराम्बरम्।।१५।।**

**अन्वयार्थ :** अयुत = दहा हजार, चन्द्रबिम्बच्छाया = चंद्रबिंबांच्या कांतीशी, दायाद = स्पर्धा करणारे, द्युति = कांतियुक्त, विग्रहम् = शरीर धारण करणारा, माणिक्यमुकुट = रत्नमुकुटांच्या, ज्योतिर्मञ्जरी = ज्योतींच्या किरणांनी, पिञ्जराम्बरम् = पिंगट रंगाचे वस्त्र असलेला.

**भावार्थ :** दहा हजार चंद्रबिंबांच्या कांतीशी स्पर्धा करणारी अशी त्याची देहकांती होती आणि वंदन करणाऱ्या देवतांच्या मुकुटांवर जडविलेल्या रत्नांच्या प्रभेने त्याचे वस्त्र पिंगट दिसत होते.॥१५॥

**चूडालं सोमकलया सुकुमारबिसाभया।**
**कल्याणपुष्पकलिकाकर्णपूरमनोहरम्।।१६।।**

**अन्वयार्थ :** सुकुमार = कोमल, बिस = कमलतंतूसारख्या, आभया = शोभणाऱ्या, सोमकलया = चंद्रकलेने, चूडालं = शिरोभूषण झालेला, कल्याणपुष्पकलिका = कल्याण पुष्पाची कळी, कर्णपूर = कर्णाभरण धारण केल्याने, मनोहरम् = सुंदर दिसणारा.

**भावार्थ :** कोमल कमलतंतूसारखी चंद्रकला त्याच्या मस्तकावर शोभत होती आणि कल्याणपुष्पाची कळी कर्णालंकाराप्रमाणे धारण केल्यामुळे तो सुंदर दिसत होता.॥१६॥

**मुक्तावलयसम्बद्धमुण्डमालाविराजितम्।**
**पर्याप्तचन्द्रसौन्दर्यपरिपन्थिमुखश्रियम्।।१७।।**

**अन्वयार्थ :** मुक्तावलय = मोत्यांच्या माळेत, सम्बद्ध = गुंफलेल्या, मुण्डमाला = मुंडक्यांच्या माळेने, विराजितम् = शोभणारा, पर्याप्त = परिपूर्ण, चन्द्रसौन्दर्य = चंद्राच्या सौंदर्याशी, परिपन्थि = स्पर्धा करणाऱ्या, मुखश्रियम् = मुखाची कांती असणारा.

**भावार्थ :** मोत्यांच्या माळेत गुंफलेली मुंडमाला त्याने आपल्या गळ्यात घातली असल्यामुळे शोभणाऱ्या परमेश्वराची मुखकांती पूर्णचंद्राच्या सौंदर्याला लाजवीत होती.।।१७।।

**प्रात:सम्फुल्लकमलपरियायत्रिलोचनम्।**
**मन्दस्मितमितालापमधुराधरपल्लवम्।।१८।।**

**अन्वयार्थ :** प्रात: = प्रात:काळी, संफुल्ल = विकसित, कमल = कमलांना, परियाय = समान, त्रिलोचनं = तीन नेत्र असलेला, मन्दस्मित = मंदहास्याने, मितालाप = अल्प भाषणाने, मधुर = मनोहर, अधरपल्लवम् = पालवीसारखे सुकोमल ओठ असणारा.

**भावार्थ :** शंकराचे तीन नेत्र सकाळी उमललेल्या कमलांप्रमाणे प्रफुल्लित दिसत होते. मंदस्मित व मितभाषणामुळे त्याच्या ओठांच्या पाकळ्या सुंदर दिसत होत्या.।।१८।।

**गण्डमण्डलपर्यन्तक्रीडन्मकरकुण्डलम् ।**
**कालिम्ना कालकूटस्य कण्ठनाले कलङ्कितम्।।१९।।**

**अन्वयार्थ :** गण्डमण्डलपर्यन्त = गालांच्या टोकापर्यंत, क्रीडन् = रुळणारे, मकरकुण्डलम् = मकरकुंडल धारण केलेल्या, कण्ठनाले = गळ्यावर, कालकूटस्य = कालकूट विषाच्या, कालिम्ना = काळिम्याने, कलङ्कितम् = कलंकित असलेला.



**भावार्थ :** त्याच्या कानांतील मकरकुंडले गालापर्यंत रुळत होती आणि हलाहल विषप्राशनामुळे त्याचा गळा निळसर दिसत होता.।।१९।।

**मणिकङ्कणकेयूरमरीचिकरपल्लवै: ।**
**चतुर्भि: संविराजन्तं बाहुमन्दारशाखिभि:।।२०।।**

**अन्वयार्थ :** मणिकङ्कण = रत्नजडित कंकण, केयूर = बाजुबंदांच्या, मरीचि = किरणांनी युक्त, करपल्लवै: = हातरूपी पानांनी युक्त, चतुर्भि: = चार, बाहु = बाहु, मन्दारशाखिभि: = कल्पवृक्षाच्या शाखांप्रमाणे, संविराजन्तं = शोभत होते.

**भावार्थ :** रत्नकंकण आणि बाजुबंदांतील रत्नांच्या प्रभेमुळे त्याचे चार हात आणि बाहू कल्पवृक्षाच्या नवपल्लवयुक्त शाखांप्रमाणे शोभत होते.।।२०।।

**गौरीपयोधराश्लेषकृतार्थभुजमध्यमम् ।**
**सुवर्णब्रह्मसूत्राङ्कं सूक्ष्मकौशेयवाससम्।।२१।।**

**अन्वयार्थ :** गौरी = पार्वतीच्या, पयोधर = स्तनद्वयाच्या, आश्लेष = आलिंगनाने, कृतार्थ = धन्य झालेले, भुजमध्यमम् = वक्ष:स्थल असलेला, सुवर्ण = सोन्याचे, ब्रह्मसूत्राङ्कं = यज्ञोपवीत धारण केलेला, सूक्ष्म = तलम, कौशेय = रेशमी, वाससम् = वस्त्र धारण केलेला.

**भावार्थ :** पार्वतीच्या स्तनद्वय-आलिंगनाने शंकराच्या वक्ष:स्थलाचे सार्थक झाले होते. त्याच्या गळ्यात सोन्याचे यज्ञोपवीत असून त्याने तलम व उंची रेशमी वस्त्र नेसलेले होते.।।२१।।

**नाभिस्थानावलम्बिन्या नवमौक्तिकमालया।**
**गङ्गयेव कृताश्लेषं मौलिभागावतीर्णया।।२२।।**

**अन्वयार्थ :** नाभिस्थान = नाभीपर्यंत, अवलम्बिन्या = रुळणाऱ्या, नवमौक्तिकमालया = नूतन मोत्यांच्या माळेमुळे, मौलिभाग = मस्तकाहून, अवतीर्णया = अवतरलेल्या, गङ्गया = गंगेने, कृताश्लेषम् इव = आलिंगिल्या-सारखा.

**भावार्थ :** त्याने आपल्या गळ्यात नाभीपर्यंत रुळणारी उत्तम तेजस्वी मोत्यांची माळ घातली होती. त्यामुळे जटेतून निघाणाऱ्या गंगेने जणू त्याला आलिंगन दिल्यासारखे दिसत होते.॥२२॥

**पदेन मणिमञ्जीरप्रभापल्लवितश्रिया।**
**चन्द्रवत्स्फाटिकं पीठं समावृत्य स्थितं पुरः।।२३।।**

**अन्वयार्थ :** चन्द्रवत्स्फाटिकं पीठं = चंद्रकांत मणिनिर्मित चौरंगावर, मणिमञ्जीरप्रभा = रत्ननूपुरांच्या प्रभेने, पल्लवितश्रिया = पल्लवाप्रमाणे शोभणारा, पदेन = पाय, पुरः = पुढे, समावृत्य = ठेवून, स्थितम् = बसलेला.

**भावार्थ :** चंद्रकांतमणिनिर्मित चौरंगावर, रत्ननूपुरांच्या तेजाने शोभिवंत दिसणारा पाय पुढे ठेवून (व दुसरा दुमडून) श्रीशंकर ताठ बसलेले होते.॥२३॥

**वामपार्श्वनिवासिन्या मङ्गलप्रियवेषया।**
**समस्तलोकनिर्माणसमवायस्वरूपया।।२४।।**

**अन्वयार्थ :** वामपार्श्व = डाव्या बाजूला, निवासिन्या = बसलेली, मङ्गल = मंगलकारी, प्रिय = प्रिय अशी, वेषया = वेषभूषा असलेली, समस्त = सर्व, लोक = भुवनांचे, निर्माण = निर्माण करण्यात, समवाय-स्वरूपया = समवाय संबंधाने असणारी.

**भावार्थ :** सर्व जगाच्या निर्मितीला उपादान कारणभूत असलेली पार्वती परमेश्वराच्या वामभागी मंगल व प्रिय वेषात बसलेली होती.॥२४॥

**इच्छाज्ञानक्रियारूपबहुशक्तिविलासया।**
**विद्यातत्त्वप्रकाशिन्या विनाभावविहीनया।।२५।।**

**अन्वयार्थ :** इच्छाज्ञानक्रियारूप = इच्छा, ज्ञान आणि क्रियारूप, बहुशक्ति = अनेक शक्तींनी, विलासया = युक्त, विद्यातत्त्व = आत्मविद्या तत्त्वाला, प्रकाशिन्या = प्रकाशणारी, विनाभावविहीनया = अविनाभाव संबंधाने असणारी.



**भावार्थ :** इच्छा-ज्ञान-क्रियारूप बहुविध शक्तींनी युक्त, आत्मविद्यातत्त्व प्रकाशणारी पार्वती परमात्म्याशी अविनाभाव संबंधाने शोभत होती.॥२५॥

**संसारविषकान्तारदाहदावाग्निलेखया।**
**धम्मिल्लमल्लिकामोदझङ्कुर्वद्भृङ्गमालया।।२६।।**

**अन्वयार्थ :** संसार = संसाररूपी, विषकान्तार = विषारी अरण्याच्या, दाह = दहनक्रियेत, दावाग्निलेखया = दावाग्नीच्या ज्वालेप्रमाणे असणारी, धम्मिल्ल = अंबाड्यात असणाऱ्या, मल्लिका = मोगऱ्याच्या फुलांच्या सुगंधास्वादाच्या, आमोद = आनंदाने, झङ्कुर्वद् = गुंजारव करणाऱ्या, भृङ्गमालया = भृंगांच्या पंक्तीने युक्त.

**भावार्थ :** संसाररूपी विषाच्या वनाला दावाग्निज्वालेसमान असणाऱ्या पार्वतीच्या केशकलापात खोवलेल्या मल्लिकापुष्पांच्या सुवासाने आनंदित होऊन भ्रमर मंडलाकार गतीने गुंजारव करीत होते.॥२६॥

**सम्पूर्णचन्द्रसौभाग्यसंवादिमुखपद्मया।**
**नासामौक्तिकलावण्यनाशीरस्मितशोभया।।२७।।**

**अन्वयार्थ :** सम्पूर्णचन्द्रसौभाग्य = पूर्णचंद्राच्या सौंदर्याशी, संवादि = स्पर्धा करणाऱ्या, मुखपद्मया = मुखकमलाची; नासामौक्तिक = नथेतील मोत्यांच्या, लावण्य = सौंदर्याच्या, नाशीर = आघाडीवर असणाऱ्या, स्मित = मंद हास्याच्या, शोभया = लावण्याने युक्त.

**भावार्थ :** पूर्णचंद्रासमान कांतियुक्त असे मुखकमल असणाऱ्या पार्वतीने तेजस्वी मोत्यांची नथ धारण केल्यामुळे तिचे मंद हास्य अधिकच शोभायमान दिसत होते.॥२७॥

**मणिताटङ्करङ्गान्तर्वलितापाङ्गलीलया।**
**नेत्रद्वितयसौन्दर्यनिन्दितेन्दीवरत्विषा।।२८।।**

**अन्वयार्थ :** मणिताटङ्क = रत्नजडित कर्णालंकार (बुगड्या) रूपी, रङ्गान्तः = रंगमंचावर, वलित = वळलेल्या, अपाङ्ग = कटाक्ष, लीलया = लीलांमुळे,

नेत्रद्वितय = दोन्ही नेत्रांच्या, सौन्दर्य = सौंदर्याने, निन्दित = तिरस्कृत, इन्दीवर = नीलकमलांची, त्विषा = कांती.

**भावार्थ :** पार्वतीने कानात धारण केलेल्या नीलरत्नांच्या कर्णभूषणरूपी रंगमंचावरील तिच्या नेत्रकटाक्षलीलांनी तिच्या नेत्रांवर पडणाऱ्या नीलप्रभेमुळे त्यांना नीलकमलांच्या सौंदर्याला लाजविणारी शोभा प्राप्त झाली होती.॥२८॥

**कुसुमायुधकोदण्डकुटिलभ्रूविलासया।**
**बन्धूककुसुमच्छायाबन्धुभूताधरश्रिया।।२९।।**

**अन्वयार्थ :** कुसुमायुध = मन्मथाच्या, कोदण्ड = धनुष्यासारख्या, कुटिल = वक्र अशा, भ्रूविलासया = भुवयांच्या लीलांनी युक्त, बन्धूक-कुसुम = जास्वंदीच्या फुलाच्या, छाया = कांतीला, बन्धुभूत = बन्धूसमान असणाऱ्या, अधरश्रिया = ओठाच्या शोभेने युक्त.

**भावार्थ :** तिच्या भुवयांची वक्र लीला मदनाच्या धनुष्याप्रमाणे शोभत होती. तिचे दोन्ही ओठ जास्वंदीच्या फुलाप्रमाणे लालचुटुक दिसत होती.॥२९॥

**कण्ठनालजितानङ्गकम्बुबिब्बोकसम्पदा।**
**बाहुद्वितयसौभाग्यवञ्चितोत्पलमालया।।३०।।**

**अन्वयार्थ :** कण्ठनाल = गळ्याने (स्वराने), जित = जिंकले आहे, अनंग = मन्मथाच्या, कम्बु = विजयशंखाच्या, बिब्बोक = नादमाधुर्याच्या, सम्पदा = संपत्तीला, बाहुद्वितय = दोन्ही बाहूंच्या, सौभाग्य = सौंदर्याने, वञ्चित = जिंकले आहे, उत्पलमालया = कमळांच्या माळेला.

**भावार्थ :** पार्वतीचा गळा आकृतीने आणि माधुर्याने मदनाच्या विजयशंखाला जिंकणारा आणि तिचे दोन्हीं हात कोमलतेत आणि सौंदर्यात नीलकमलांच्या माळेस लाजविणारे होते.॥३०॥

**स्थिरयौवनलावण्यशृङ्गारितशरीरया ।**
**अत्यन्तकठिनोत्तुङ्गपीवरस्तनभारया ।।३१।।**



**अन्वयार्थ :** स्थिर = नित्य अशा, यौवन = तारुण्याच्या, लावण्य = लावण्याने, शृङ्गारित = नटलेल्या, शरीरया = शरीराची, अत्यन्तकठिन = अत्यंत कठीण अशा, उत्तुङ्ग = उंच, पीवर = पुष्ट, स्तन = स्तनांच्या, भारया = भाराने युक्त.

**भावार्थ :** चिरयौवनाच्या लावण्याने आणि उन्नत व पुष्ट स्तनभाराने तिचे शरीर शोभत होते.॥३१॥

**मृणालवल्लरीतन्तुबन्धुभूतावलग्नया ।**
**शृङ्गारतटिनीतुङ्गपुलिनश्रोणिभारया ।।३२।।**

**अन्वयार्थ :** मृणालवल्लरी = कमलवेलीच्या, तन्तु = देठाशी, बन्धुभूत = समान, अवलग्नया = कंबर असलेली, शृङ्गारतटिनी = शृंगार-रूपी नदीच्या, तुङ्ग = उन्नत अशा, पुलिन = वाळूच्या उंचवट्यासारख्या, श्रोणि = नितंबाच्या, भारया = भाराने युक्त

**भावार्थ :** कमलवेलीच्या देठासारखी नाजुक कंबर असलेल्या पार्वतीचे नितंब शृंगाररूपी सरितेतील वाळूच्या उंचवट्याप्रमाणे शोभत होते.॥३२॥

**कुसुम्भकुसुमच्छायाकोमलाम्बरशोभया।**
**शृङ्गारोद्यानसंरम्भरम्भास्तम्भोरुकाण्डया।।३३।।**

**अन्वयार्थ :** कुसुम्भकुसुम = कुसुंब्याच्या फुलांच्या, च्छाया = रंगाच्या, कोमलाम्बर = कोमल वस्त्रांनी, शोभया = शोभायमान, शृङ्गारोद्यान = शृंगाररूपी उद्यानाच्या, संरम्भ = शोभेसाठी असणाऱ्या, रम्भास्तम्भ = केळीच्या खुंटासारख्या, उरुकाण्डया = मांड्या असणारी.

**भावार्थ :** पार्वतीने कुसुंब्याच्या फुलांचा रंग असलेले कोमल वस्त्र परिधान केले होते. तिच्या मांड्या शृंगारोद्यानातील केळीच्या खुंटासारख्या कोमल, शुभ्र आणि शीतल होत्या.॥३३॥

**चूतप्रवालसुषुमासुकुमारपदाब्जया ।**
**स्थिरमङ्गलशृङ्गारभूषणालङ्कृताङ्गया।।३४।।**

**अन्वयार्थ :** चूतप्रवाल = आंब्याच्या पालवीप्रमाणे, सुषमा = अत्यंत शोभायमान, सुकुमार = कोमल, पदाब्जया = पदकमल असणारी, स्थिरमङ्गल = नित्य मंगल अशा, शृङ्गार = शृंगारयोग्य, भूषण = भूषणांनी, अलङ्कृत = शृंगारलेल्या, अङ्गया = शरीराची.

**भावार्थ :** तिचे चरणकमल आंब्याच्या कोवळ्या पानासारखे तांबूस व कोमल होते. तिने आपले शरीर नित्यमंगलदायक सौभाग्यलंकारांनी सुशोभित केले होते.।।३४।।

**हारनूपुरकेयूरचमत्कृतशरीरया ।**
**चक्षुरानन्दलतया सौभाग्यकुलविद्यया।।३५।।**

**अन्वयार्थ :** हार = माला, नूपुर = पैंजण, केयूर = बाजुबंदाने, चमत्कृत = विलक्षण सुंदर, शरीरया = शरीराची, चक्षुः = डोळ्यांना, आनन्दलतया = आनंदाची वेली असणारी, सौभाग्यकुलविद्यया = सौभाग्याच्या कुलविद्येसारखी असणारी.

**भावार्थ :** गळ्यातील मोत्यांच्या माळा, पायात पैंजण, दंडांत बाजुबंद अशा अलंकारांनी तिचे शरीर विलक्षण सुंदर दिसत होते. डोळ्यांना आनंद देणारी तिची देहलता सर्वसौभाग्यांची कुलविद्यास्वरूपिणी होती.।।३५।।

**उमया सममासीनं लोकजालकुटुम्बया।**
**अपूर्वरूपमभजन् परिवाराः समन्ततः।।३६।।**

**अन्वयार्थ :** लोकजालकुटुम्बया = सर्व लोक जिचे कुटुंब आहे अशा, उमया समं = उमेसह, आसीनं = बसलेला, अपूर्वरूपम् = अपूर्व सौंदर्य-स्वरूप अशा परमेश्वराची, परिवाराः = देवांचा परिवार, समन्ततः = चहू-बाजूला, अभजन् = सेवा करीत होता.

**भावार्थ :** जगातील सर्व लोक जिचे कुटुंब आहे अशा उमेसह सिंहासनावर बसलेला परमेश्वर अत्यंत सुंदर दिसत होता आणि त्याच्या सभोवती असलेले तेहतीस कोटी देव त्याची सेवा करीत होते.।।३६।।



**पुण्डरीकाकृति स्वच्छं पूर्णचन्द्रसहोदरम्।**
**दधौ तस्य महालक्ष्मीः सितमातपवारणम्।।३७।।**

**अन्वयार्थ :** महालक्ष्मीः = महालक्ष्मीने, तस्य = त्याला, पुण्डरीकाकृति= शुभ्र कमलासारख्या, स्वच्छं = स्वच्छ अशा, पूर्णचन्द्रसहोदरम् = पूर्ण चंद्रासारखे, सितम् = शुभ्र, आतपवारणम् = छत्र, दधौ = धरले होते.

**भावार्थ :** महालक्ष्मीने श्वेतकमलाप्रमाणे स्वच्छ, पौर्णिमेच्या चंद्रासारखे मनोहर असे शुभ्र छत्र पार्वतीपरमेश्वराच्या डोक्यावर धरून ती त्यांची सेवा करीत होती.।।३७।।

**तन्त्रीझङ्कारशालिन्या सङ्गीतामृतविद्यया।**
**उपतस्थे महादेवमुपान्ते च सरस्वती।।३८।।**

**अन्वयार्थ :** सरस्वती = सरस्वती, उपान्ते = समीप राहून, तन्त्री = वीणेच्या, झङ्कारशालिन्या = झंकाराने युक्त, सङ्गीतामृतविद्यया = संगीतरूपी अमृतविद्येने, महादेवं = शिवाची, उपतस्थे = सेवा केली.

**भावार्थ :** सरस्वती उमामहेश्वरांच्या समीप राहून आपल्या नवरत्न-कंकणयुक्त हाताने वीणेच्या तारा छेडून मधुर झंकारयुक्त अमृतमय गायनाने त्यांची सेवा करीत होती.।।३८।।

**झणत्कङ्कणजातेन हस्तेनोपनिषद्वधूः।**
**ओंकारतालवृन्तेन वीजयामास शङ्करम्।।३९।।**

**अन्वयार्थ :** उपनिषद्वधूः = उपनिषद्रूपी स्त्रिया, झणत्कङ्कणजातेन = कंकणांच्या किणकिण ध्वनीने युक्त, हस्तेन = हातांनी, ओङ्कारतालवृन्तेन = ओंकाररूपी पंख्याने, शङ्करम् = शंकराला, वीजयामास = वारा घातील होत्या.

**भावार्थ :** उपनिषदरूपी स्त्रिया ॐकाररूप पंख्याने उमाशंकरास, रत्नजडित कंकणांच्या मधुरध्वनी होत असलेल्या हातांनी वारा घालीत होत्या.।।३९।।

**चलच्चामरिकाहस्ता झङ्कुर्वन्मणिकङ्कणाः।**
**आसेवन्त तमीशानमभितो दिव्यकन्यकाः।।४०।।**

**अन्वयार्थ :** झङ्कुर्वन् = रुणुझुणु ध्वनी करणाऱ्या, मणिकङ्कणा = रत्नजडित कंकणांचा, चलत् = हलवीत असलेल्या, चामरिकाहस्ताः = चवऱ्यायुक्त हातांच्या, दिव्यकन्यकाः = देवकन्या, तं = त्या, ईशानं = शंकराच्या, अभितः = सभोवती, आसेवन्त = सेवा करीत होत्या.

**भावार्थ :** रत्नजडित कंकणांचा रुणझुण ध्वनी करणाऱ्या हातांनी देवकन्या उमामहेश्वरासभोवती उभ्या राहून त्यांच्यावर चवऱ्या ढाळून सेवा करीत होत्या.।।४०।।

**चामराणां विलोलानां मध्ये तन्मुखमण्डलम्।**
**रराज राजहंसानां भ्रमतामिव पङ्कजम्।।४१।।**

**अन्वयार्थ :** विलोलानां = ढाळल्या जाणाऱ्या, चामरणां = चवऱ्यांच्या, मध्ये = मध्यभागी, तत् = त्याचे, मुखमण्डलम् = मुख, भ्रमतां = संचरत असलेल्या, राजहंसानां = राजहंसांच्या, मध्ये = मध्यभागी, पङ्कजम् इव = कमळासारखे, रराज = शोभत होते.

**भावार्थ :** देवकन्यांकडून ढाळल्या जाणाऱ्या चवऱ्यांच्या मध्ये दिसणारे शंकराचे मुख सरोवरात राजहंसांच्या भ्रमणामुळे मधूनच दिसणाऱ्या कमलाप्रमाणे शोभत होते.।।४१।।

**मन्त्रेण तमसेवन्त वेदाः साङ्गविभूतयः ।**
**भक्त्या चूडामणिं कान्तं वहन्त इव मौलिभिः।।४२।।**

**अन्वयार्थ :** साङ्गविभूतयः = शिक्षाव्याकरणादी षडंगांनी युक्त, वेदाः = वेदांनी, मौलिभिः = मस्तकावर, तं = त्याला, कान्तं = मनोहर, चूडामणिं = चूडामणीप्रमाणे, वहन्तः = धारण करून, मन्त्रेण = मंत्राने, भक्त्या = भक्तिपूर्वक, असेवन्त = सेवा केली.

**भावार्थ :** शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद आणि ज्योतिष या षडंगांनी युक्त ऋग्वेदादी वेद, उपनिषद्रूपी आपल्या मस्तकावर परमात्म्याला मनोहर शिरोरत्नाप्रमाणे धारण करून आपल्या प्रणव मंत्राने त्याची भक्तिभावपूर्वक स्तुती करीत होते.।।४२।।



**तदीयायुधधारिण्यस्तत्समानविभूषणाः ।**
**अङ्गभूताःस्त्रियः काश्चिदासेवन्त तमीश्वरम्।।४३।।**

**अन्वयार्थ :** तदीय = वेदपुरुषाचे, आयुध = आयुध, धारिण्यः = धारण केलेल्या, तत् = त्याच्या, समानविभूषणाः = सारखे आभूषण असलेल्या, अङ्गभूता = त्याच्या अंगासारख्या असलेल्या, काश्चित् = काही, स्त्रियः = स्त्रियांनी, तं = त्या, ईश्वरम् = ईश्वराची, असेवन्त = सेवा केली.

**भावार्थ :** वेदपुरुषांप्रमाणेच सर्व आयुधे धारण करणाऱ्या वेदांगरूपी काही स्त्रिया वेदपुरुषांसारखेच अलंकार धारण करून परमेश्वराची सेवा करीत होत्या.।।४३।।

**आप्ताधिकारिणः केचिदनन्तप्रमुखा अपि।**
**अष्टौ विद्येश्वरा देवमभजन्त समन्ततः।।४४।।**

**अन्वयार्थ :** आप्ताधिकारिणः = अधिकारप्राप्त, केचित् = काही, अनन्तप्रमुखाः = अनंतादी, अष्टौ = आठ, विद्येश्वराः = विद्येश्वर, समन्ततः = सभोवती, देवम् = देवाला, अभजन्त = भजत होते.

**भावार्थ :** शंकराचे अत्यंत विश्वसनीय असलेले अधिकारप्राप्त अनंत, सूक्ष्म, शिवोत्तम, एकनेत्र, एकरुद्र, त्रिमूर्ती, श्रीकंठ आणि शिखंडी या नावांचे आठ विद्येश्वर त्याच्या सभोवती राहून त्याची सेवा करीत होते.।।४४।।

**ततो नन्दी महाकालश्चण्डो भृङ्गी रिटिस्ततः।**
**घण्टाकर्णः पुष्पदन्तः कपाली वीरभद्रकः।।४५।।**
**एवमाद्या महाभागा महाबलपराक्रमाः।**
**निरङ्कुशमहासत्त्वा भेजिरे तं महेश्वरम्।।४६।।**

**अन्वयार्थ :** ततः = त्यानंतर, नन्दी = नंदीश्वर, महाकालः = महाकाल, चण्डः = चंड, भृङ्गी रिटिः = भृङ्गी आणि रिटी, घण्टाकर्णः = घंटाकर्ण,

पुष्पदन्तः = पुष्पदंत, कपाली = कपाली, वीरभद्रकः = वीरभद्र, एवमाद्याः = इत्यादी, महाबलपराक्रमाः = महाबली व पराक्रमशाली, निरङ्कुशमहासत्त्वा = निरंकुश असे महासत्त्वशाली, महाभागाः = महामहिम अशा प्रमथगणांनी, तं = त्या, महेश्वरम् = शंकराची, भेजिरे = सेवा केली.

**भावार्थ :** तसेच नंदी, महाकाल, चंड, भृंगी, रिटी, घंटाकर्ण, पुष्पदंत, कपाली, वीरभद्र इत्यादी प्रमुख भाग्यवान, मोठमोठे शक्तिमान, पराक्रमी व अप्रतिहत शक्तीने युक्त प्रमथगण शंकराची सेवा करीत होते.।।४५-४६।।

**अणिमादिकमैश्वर्यं येषां सिद्धेरपोहनम्।**
**ब्रह्मादयःसुरा येषामाज्ञालङ्घनभीरवः।।४७।।**

**अन्वयार्थ :** येषां = ज्या प्रमथांच्या, सिद्धेः = सिद्धीपुढे, अणिमादिकमैश्वर्यम् = अणिमादी अष्टसिद्धींचे ऐश्वर्य, अपोहनम् = तुच्छ वाटत होते, ब्रह्मादयः = ब्रह्मादी, सुराः = देव, येषां = ज्यांच्या, आज्ञालङ्घन = आज्ञेचे उल्लंघन करण्यास, भीरवः = भीत होते.

**भावार्थ :** अणिमादी अष्टसिद्धी त्या प्रमथांच्या सिद्धीपुढे तुच्छ होत्या आणि ब्रह्मादी देवही त्यांच्या आज्ञेचे उल्लंघन करण्यास भीत होते.।।४७।।

**मोक्षलक्ष्मीपरिष्वङ्गमुदिता येऽन्तरात्मना।**
**येषामीषत्करं विश्वसर्गसंहारकल्पनम्।।४८।।**

**अन्वयार्थ :** ये = जे प्रमथ, मोक्षलक्ष्मी = मोक्षरूपी लक्ष्मीच्या, परिष्वङ्ग = आलिंगनाने, अन्तरात्मना = हृदयाने; मुदिताः = संतुष्ट झाले होते, येषां = ज्यांना, विश्व = जगाचे, सर्ग = सर्जन, संहारकल्पनम् = संहार करणे, ईषत्करम् = अत्यंत सुलभ असे होते.

**भावार्थ :** हे प्रमथ मोक्षरूपी लक्ष्मीच्या आलिंगनामुळे अंतरात संतुष्ट झालेले होते. त्यांना विश्वाची निर्मिती अथवा संहार करणे या गोष्टी सहज सुलभ होत्या.।।४८।।

**ज्ञानशक्तिः परा येषां सर्ववस्तुप्रकाशिनी।**
**आनन्दकणिका येषां हरिब्रह्मादिसम्पदः।।४९।।**



**अन्वयार्थ :** येषां = ज्यांची, परा = उत्कृष्ट अशी, ज्ञानशक्तिः = ज्ञानशक्ती, सर्ववस्तुप्रकाशिनी = सर्व वस्तूंना प्रकाशित करणारी होती; हरिब्रह्मादि = हरिब्रह्मादी देवतांची, सम्पदः = संपत्ती, येषां = ज्यांना, आनंद-कणिकाः = आनंदाच्या कणासारखी वाटत होती.

**भावार्थ :** त्या प्रमथगणांना सर्वोत्कृष्ट ज्ञानशक्ती लाभल्यामुळे सर्व वस्तूंचे यथार्थ ज्ञान झाले होते. विष्णुब्रह्मादिकांची संपत्तीही त्यांना आनंदाचा एक कण असल्यासारखी होती.।।४९।।

**आकाङ्क्षन्ते पदं येषां योगिनो योगतत्पराः।**
**काङ्क्षणीयफलो येषां सङ्कल्पः कल्पपादपः।।५०।।**

**अन्वयार्थ :** योगतत्पराः = शिवयोगांत तत्पर असलेले, योगिनः = योगीजन, येषां = ज्यांच्या, पदं = स्थानाची, आकाङ्क्षन्ते = इच्छा करीत होते, येषां = ज्यांचे, सङ्कल्पः = संकल्प, काङ्क्षणीयफलः = अपेक्षित फल देणारे, कल्पपादपः = कल्पवृक्ष होते.

**भावार्थ :** योगसाधनात निमग्न असणारे शिवयोगी आपणांस प्रमथांची योग्यता कधी लाभेल याची प्रतीक्षा करीत असतात. प्रमथांचे संकल्प म्हणजे सर्वसिद्धिदायक कल्पवृक्षच होते.।।५०।।

**कर्मकालादिकार्पण्यचिन्ता येषां न विद्यते।**
**येषां विक्रमसन्नाहा मृत्योरपि च मृत्यवः।।५१।।**
**ते सारूप्यपदं प्राप्ताः प्रमथा भेजिरे शिवम्।**

**अन्वयार्थ :** येषां = ज्यांना, कर्म = कर्म, काल = काल, आणि कार्पण्य = कृपणतारूपी, चिन्ता = चिंता, न विद्यते = असत नाही, येषां = ज्यांच्या, विक्रमसन्नाहाः = पराक्रमाची कृत्ये, मृत्योरपि = मृत्यूलासुद्धा, मृत्यवः = मृत्यूसारखी भीतिदायक होती, अशा, सारूप्यपदं प्राप्ताः = शिव-सारूप्यपद प्राप्त करून घेतलेले, ते = ते, प्रमथाः = प्रमथगण, शिवम् = शिवाला, भेजिरे = भेजत होते.

**भावार्थ :** कर्म-काल-कामादीपासून निर्माण होणाऱ्या कृपणतेची (न्यूनतेची) ज्यांना चिंता नव्हती, प्रसंगी ज्यांच्या पराक्रमामुळे मृत्यूलाही आपल्या मृत्यूची भीती वाटावी असे, परमेश्वराशी सारूप्य पावलेले प्रमथगण शिवाची सेवा करीत होते.॥५१॥

**ब्रह्मोपेन्द्रमहेन्द्राद्या विश्वतन्त्राधिकारिणम्।।५२।।**
**आयुधालङ्कृतप्रान्ताः परितस्तं सिषेविरे।**

**अन्वयार्थ :** ब्रह्मोपेन्द्रमहेन्द्राद्याः = ब्रह्मा, विष्णू आणि इंद्रादी देव, आयुधालाकङ्कृतप्रान्ताः = शस्त्रास्त्रांनी अलंकृत होऊन, परितः = सभोवती, विश्वतन्त्राधिकारिणम् = विश्वाचा सूत्रधार, तं = त्या परमेश्वराला, सिषेविरे = भजत होते.

**भावार्थ :** ब्रह्मा, विष्णू, इंद्रादी तेहतीस कोटी देव, आपापली शस्त्रास्त्रे हाती घेऊन, त्रैलोक्याची सूत्रे हाती असलेल्या शंकराभोवती उभे राहून त्याची सेवा करीत होते.॥५२॥

**आदित्या वसवो रुद्रा यक्षगन्धर्वकिन्नराः।।५३।।**
**दानवा राक्षसा दैत्याः सिद्धा विद्याधरोरगाः।**
**अभजन्त महादेवमपरिच्छिन्नसैनिकाः।।५४।।**

**अन्वयार्थ :** आदित्याः = द्वादश सूर्य, वसवः = अष्टवसू, रुद्राः = रुद्र, यक्षाः = कुबेरादी यक्ष, गन्धर्वाः = हाहा, हूहू आदी गंधर्व, किन्नराः = अश्वमुखादी किन्नर, विद्याधराः = विद्याधर, राक्षसाः = राक्षस, दैत्याः = दैत्य, सिद्धाः = सिद्ध, विद्याधराः = विद्याधर, उरगाः = सर्प, हे सर्व, अपरिच्छिन्न-सैनिकाः = असंख्यात सैन्यबलाने युक्त होऊन, महादेवं = महादेवाला, अभजन्त = भजत होते.

**भावार्थ :** बारा सूर्य, आठ वसू, अकरा रुद्र, कुबेरादी यक्ष, हाहा, हूहू आदि गंधर्व, अश्वमुखादी किन्नर, रावणादी राक्षस, बाणासुरादी दानव, तारकादी दैत्य, आदिनाथादी सिद्ध, मणिभद्रादी विद्याधर, शेषादी नाग, हे आपल्या संपूर्ण सेनेसह शंकराची सेवा करीत होते.॥५३-५४॥



**वसिष्ठो वामदेवश्च पुलस्त्यागस्त्यशौनकाः।**
**दधीचिर्गौतमश्चैव सानन्दशुकनारदाः।।५५।।**
**उपमन्युभृगुव्यासपाराशरमरीचयः ।**
**इत्याद्या मुनयः सर्वे नीलकण्ठं सिषेविरे।।५६।।**

**अन्वयार्थ :** स्पष्ट आहे.

**भावार्थ :** वसिष्ठ, वामदेव, पुलस्त्य, अगस्त्य, शौनक, दधीचि, गौतम, सानंद, शुक, नारद, उपमन्यू, भृगू, व्यास, पाराशर, मरीचि इत्यादी महर्षी नीलकंठ परमेश्वराची सेवा करीत होते.॥५५-५६॥

**पार्श्वस्थपरिवाराणां विमलाङ्गेषु बिम्बितः।**
**सर्वान्तर्गतमात्मानं स रेजे दर्शयन्निव।।५७।।**

**अन्वयार्थ :** पार्श्वस्थ = दोन्ही बाजूंना उभे राहिलेल्या, परिवाराणां = परिवारांच्या, विमलाङ्गेषु = अत्यंत निर्मल अशा शरीरात, बिम्बितः = प्रतिबिंबित झालेला, सः = तो परमात्मा, सर्वान्तर्गतं = सर्वांच्या अंतरंगात असलेल्या, आत्मानं = स्वतःला, दर्शयन्निव = जणू दाखवीत असून, रेजे = शोभत होता.

**भावार्थ :** सभोवताली उभ्या असणाऱ्या परिवाराच्या निर्मल शरीरांत शंकराची प्रतिबिंबे उमटलेली दिसत असल्यामुळे तो जणू, आपण सर्वांतर्यामी आहोत असे दाखवून शोभत होता.॥५७॥

**क्षणं स शम्भुर्देवानां कार्यभागं निरूपयन्।**
**क्षणं गन्धर्वराजानां गानविद्यां विभावयन्।।५८।।**

**अन्वयार्थ :** सः = तो, शम्भुः = परमात्मा, क्षणं = क्षणकाल, देवानां = देवांना, कार्यभागं = कार्याबद्दल, निरूपयन् = आज्ञा करीत, क्षणं = क्षणकाल, गन्धर्वराजानां = श्रेष्ठ गंधर्वांची, गानविद्यां = गायनकला, विभावयन् = श्रवण करीत.

**भावार्थ :** एखादे वेळी शंकर सर्व देवांना अमुक-अमुक कामे करा असे सांगत होते तर कधी गंधर्वांचे सुस्वर गाणे ऐकत होते.॥५८॥

**ब्रह्मविष्णवादिभिर्देवैः क्षणमालापमाचरन्।**
**क्षणं देवमृगाक्षीणां लालयन्नृत्यविभ्रमम्।।५९।।**

**अन्वयार्थ :** क्षणं = क्षणकाल, ब्रह्मविष्णवादिभिः = ब्रह्मा, विष्णू आदी, देवैः = देवांबरोबर, आलापं = वार्तालाप, आचरन् = करीत, क्षणं = क्षणकाल, देवमृगाक्षीणां = देवस्त्रियांचे, नृत्यविभ्रमम् = नर्तनवैभव, लालयन् = पाहात.

**भावार्थ :** कधी ब्रह्मदेव, विष्णू आदी देवांबरोबर सुखसंवाद करीत असत, तर कधी देवांगनांचे नृत्य पाहात असत.।।५९।।

**व्यासादीनां क्षणं कुर्वन् वेदोच्चारेषु गौरवम्।**
**विदधानः क्षणं देव्या मुखे बिम्बाधरे दृशः।।६०।।**

**अन्वयार्थ :** क्षणं = क्षणकाल, व्यासादीनां = व्यासादी ऋषींच्या, वेदोच्चरेषु = वेदमंत्रांच्या उच्चारांचा, गौरवम् = गौरव, मान, कुर्वन् = करीत, क्षणं = क्षणकाल, देव्याः = पार्वतीच्या, बिम्बाधरे = पक्व तोंडल्याच्या फळाप्रमाणे असणाऱ्या अधरयुक्त, मुखे = मुखाकडे, दृशः = दृष्टी, विदधानः = ठेवीत.

**भावार्थ :** कधी व्यासादिकांचे वेदोच्चार उत्तम आहेत असा त्यांचा गौरव करीत, तर कधी पार्वतीच्या बिंबफलासमान ओठ असलेल्या मुखाकडे दृष्टी लावीत.।।६०।।

**हास्यनृत्यं क्षणं पश्यन् भृङ्गिणा परिकल्पितम्।**
**नन्दिना वेत्रहस्तेन सर्वतन्त्राधिकारिणा।।६१।।**
**अमुञ्चता सदा पार्श्वमात्माभिप्रायवेदिना।**
**चोदितान् वासयन् कांश्चिद्विसृजन् भ्रूविलासतः।।६२।।**
**सम्भावयंस्तथा चान्यानन्यानपि नियामयन्।**

**अन्वयार्थ :** क्षणं = क्षणकाल, भृङ्गिणा = भृंगीकडून, परिकल्पितम् = केलेले, हास्यनृत्यं = विनोदपूर्ण नृत्य, पश्यन् = पाहात, सर्वतन्त्राधिकारिणा = समस्त कार्याधिकारी असा, वेत्रहस्तेन = हातात दंड धारण केलेल्या, सदा = नेहमी, पार्श्वं = बाजूला, अमुञ्चता = न सोडणाऱ्या, आत्माभि-प्रायवेदिना = आपला अभिप्राय जाणणाऱ्या, नन्दिना = नंदीकडून, कांश्चित् = काही लोकानां, आनयन् = बोलावून, च = आणि, कांश्चित् = काही लोकांना, भ्रूविलासतः = नेत्रसंकेताने, विसृजन् = पाठवीत, अन्यान् = अन्य लोकांना, सम्भावयन् = संतुष्ट करीत, अन्यान् = अन्य लोकांना, नियामयन् = शासन करीत.



**भावार्थ :** कधी भृंगीच्या विनोदपूर्ण नृत्याकडे लक्ष देत असत, तर कधी सर्व कार्याचा अधिपती असलेला, हातात दंड धारण केलेला, सदा समीप असणारा, आपले मनोगत जाणणारा अशा नंदीश्वराकडून काही लोकांना जवळ बोलावीत असत. काही जणांना नेत्रसंकेताने दूर धाडीत असत, काही लोकांना आपल्या प्रिय भाषणाने संतुष्ट करीत तर काही लोकांना शासन करीत असत. असा शंकराचा राजव्यापार चालला होता.।।६१-६२।।

**समस्तभुवनाधीशमौलिलालितशासनः।।६३।।**
**अकुण्ठशक्तिरव्याजलावण्यललिताकृतिः।**

**अन्वयार्थ :** समस्त = सर्व, भुवन = लोकांचे, अधीश = अधिपतींच्या, मौलि = मस्तकांनी, लालित = परिपालित होते, ज्यांचे, शासनः = शासन, असा, अकुण्ठशक्तिः = अप्रतिहत शक्ती असणारा, अव्याज = अकृत्रिम, लावण्य = सौंदर्याने, ललिताकृतिः = मनोहर आकार युक्त.

**भावार्थ :** अप्रतिहत शक्ती असणारा, स्वाभाविक सौंदर्यामुळे मनोहर दिसणारा अशा त्रैलोक्याधिपती शंकराची आज्ञा सर्व भुवनांचे अधिपती शिरसा पालन करीत होते.।।६३।।

**स्थिरयौवनसौरभ्यशृङ्गारितकलेवरः ।।६४।।**
**आत्मशक्त्यमृतास्वादरसोल्लासितमानसः।**

**अन्वयार्थ :** स्थिर = स्थिर अशा, यौवनसौरभ्य = तारुण्याने, शृङ्गारित = अलंकृत, कलेवरः = शरीर असलेला, आत्मशक्त्यमृत = आत्मशक्तिरूप अमृताच्या, आस्वादरस = रसास्वादाने, उल्लसितमानसः = मन आनंदित असलेला.

**भावार्थ :** त्या शंकराच्या अंगी चिरतारुण्य असल्यामुळे त्याचे शरीर सुगंधित व सुशोभित दिसत होते. त्यास आत्मशक्तिरूप अमृतरसाची गोडी लागली असल्यामुळे तो नेहमी आनंदित असे.।।६४।।

**स्वाभाविकमहैश्वर्यविश्रामपरमावधि:।।६५।।**
**निष्कलङ्कमहासत्त्वनिर्मितानेकविग्रह:।**

**अन्वयार्थ :** स्वाभाविक = स्वाभाविक असणाऱ्या, महैश्वर्य = सत्त्वादी ऐश्वर्यांच्या, विश्राम = विश्रामाचे, परमावधि: = अंतिमस्थलस्वरूप, निष्कलङ्क =कलंकरहित, महासत्त्व = महाशक्तीने, निर्मित = निर्माण केलेल्या, अनेकविग्रह: = अनेक शरीरधारी.

**भावार्थ :** स्वाभाविक अशा महाऐश्वर्याचे विश्रामस्थान असलेला शंकर निष्कलंक अशा महाशक्तीकडून निर्माण झालेल्या अनेक दिव्य रूपांना धारण करणारा होता.।।६५।।

**अखण्डारातिदोर्दण्डकण्डूखण्डनपण्डित:।।६६।।**
**चिन्तामणि: प्रपन्नानां श्रीकण्ठ: परमेश्वर:।**

**अन्वयार्थ :** अखण्ड = असंख्य, अराति = दुर्जनांचे, दोर्दण्ड = भुज-दंडांची, कण्डू = खाज, खुमखुमी, खण्डन = दूर करण्यात, पण्डित: = समर्थ असा, प्रपन्नानां = शरणागतांना, चिन्तामणि: = चिंतामणीसारखा असणारा, श्रीकण्ठ: = सुंदर कंठाचा, परमेश्वर: = परमेश्वर.

**भावार्थ :** अपरिमित सज्जन-शत्रूंच्या बाहुबलाची रग जिरविण्यास समर्थ असणारा श्रीकंठ शंकर, निर्मल अंत:करणाच्या शरणागतांना सर्व मनोरथ पूर्ण करणाऱ्या चिंतामणी प्रमाणे होता.।।६६।।

**सभान्तरगतं तन्त्रं रेणुकं गणनायकम्।।६७।।**
**प्रसादं सुलभं दातुं ताम्बूलं स तमाह्वयत्।**

**अन्वयार्थ :** स: = त्याने (परमात्म्याने), सभान्तरगतं = सभेत असलेल्या, तन्त्रं = मुख्य व प्रसिद्ध अशा, तं = त्या, गणनायकम् = गणश्रेष्ठ अशा, रेणुकं = रेणुकाला, सुलभं = सुलभ, ताम्बूलं = तांबूलरूपी, प्रसादं = प्रसाद, दातुं = देण्यासाठी, आह्वयत् = बोलाविले.



**भावार्थ :** शिवसभेत बसलेल्या, सर्व शिवगणांत प्रमुख असणाऱ्या रेणुकगणाला सुलभ असा तांबूल प्रसाद देण्यासाठी शंकराने जवळ बोलाविले.।।६७।।

**शम्भोराह्वानसन्तोषसंभ्रमेणैव दारुकम्।।६८।।**
**उल्लङ्घ्य पार्श्वमगमल्लोकनाथस्य रेणुक:।**

**अन्वयार्थ :** शम्भो: = शिवाच्या, आह्वान = बोलावण्याने झालेल्या, संतोष = संतोषाच्या, सम्भ्रमेण = घाईने, रेणुक: = रेणुक, दारुकम् = दारुकाला, उल्लङ्घ्य = ओलांडून, लोकनाथस्य = लोकनायकाच्या, पार्श्वं = जवळ, अगमत् = गेला.

**भावार्थ :** शंकराने आपणास जवळ बोलावले, या आनंदाच्या भरात, मार्गात बसलेल्या दारुकगणाला गडबडीत ओलांडून गणाधीश रेणुक लोकनायक शंकराजवळ गेला.

**तमालोक्य विभुस्तत्र समुल्लङ्घितदारुकम्।।६९।।**
**माहात्म्यं निजभक्तानां द्योतयन्निदमब्रवीत्।**

**अन्वयार्थ :** विभु: = व्यापक असा परमात्मा, तत्र = तेथे (सभेत), समुल्लङ्घिततदारुकम् = दारुकाला ओलांडलेल्या, तं = त्या (रेणुकाला), आलोक्य = पाहून, निजभक्तानां = आपल्या भक्तांचे, माहात्म्यं = महत्त्व, द्योतयन् = दाखवीत, इदं = असे, अब्रवीत् = बोलला.

**भावार्थ :** त्या सभेत दारुकाला ओलांडून आलेल्या रेणुकाला पाहून, आपल्या भक्ताचा मोठेपणा दाखविणारा, सर्वतंत्र असा शिव रेणुकास असे म्हणाला.।।६९।।

**रे रे रेणुक दुर्बुद्धे कथमेष त्वयाऽधुना।।७०।।**
**उल्लङ्घित: सभामध्ये मम भक्तो हि दारुक:।**

**अन्वयार्थ :** रे रे = अरेरे, दुर्बुद्धे = उतावळ्या, रेणुक = रेणुका, त्वया = तुझ्याकडून, अधुना = आता, सभामध्ये = सभेत, मम = माझा, भक्त: = भक्त, एष: = हा, दारुक: = दारुक, कथं = कसा, उल्लङ्घित: = ओलांडला गेला.

**भावार्थ :** अरेरे, हे उतावीळ रेणुका, माझा परमभक्त असणाऱ्या दारुकाला या सभेत तू ओलांडून का आलास?॥७०॥

**लङ्घनं मम भक्तानां परमानर्थकारणम्।।७१।।**
**आयुः श्रियं कुलं कीर्तिं निहन्ति हि शरीरिणाम्।**

**अन्वयार्थ :** मम = माझ्या, भक्तानां = भक्तांना, लङ्घनं = ओलांडणे, परमानर्थकारणम् = अत्यंत अनर्थकारक, हि = निश्चित रूपाने, शरीरिणाम् = जीवांच्या, आयुः = आयुष्य, श्रियं = संपत्ती, कुलं = कुल, कीर्तिम् = कीर्तीच्या, निहन्ति = नाश करते.

**भावार्थ :** माझ्या भक्तांना ओलांडून कोणी त्यांचा अपमान केल्यास त्याच्या आयुष्याचा, संपत्तीचा, कुलाचा आणि कीर्तीचा निश्चित नाश होतो.॥७१॥

**मम भक्तमवज्ञाय मार्कण्डेयं पुरा यमः।।७२।।**
**मत्पादताडनादासीत् स्मरणीयकलेवरः।**

**अन्वयार्थ :** पुरा = पूर्वी, यमः = यम, मम = माझ्या, भक्तं = भक्त अशा, मार्कण्डेयम् = मार्कंडेयाला, अवज्ञाय = अवमानित करून, मत् = माझ्या, पादताडनात् = पादप्रहाराने, स्मरणीयकलेवरः = ज्याचे शरीर स्मृतिशेषः (नष्ट) झाले असा, आसीत् = झाला होता.

**भावार्थ :** पूर्वी माझा भक्त मार्कंडेयाचा एकदा यमाने अपराध केल्यामुळे मी त्याला लाथ मारल्याने तो लगेच नामशेष झाला होता.॥७२॥

**भृगोश्च शङ्कुकर्णस्य मम भक्तिमतोस्तयोः।।७३।।**
**कृत्वानिष्टमभूद् विष्णुर्विकेशो दशयोनिभाक्।**

**अन्वयार्थ :** मम = माझे, भक्तिमतोः = भक्तिमान असे, तयोः = त्या, भृगोः = भृगूचे, च = आणि, शङ्कुकर्णस्य = शंकुकर्णाचे, अनिष्टं = अनिष्ट, कृत्वा = करून, विष्णुः = विष्णू, विकेशः = केशरहित होऊन, दशयोनिभाक् = दहा योनींत जन्म घेणारा, अभूत् = झाला होता.



**भावार्थ :** तसेच माझे परमभक्त अशा भृगू आणि शंकुकर्ण यांचाही विष्णूने पूर्वी छळ केला होता. म्हणून त्याचे केश नाहीसे होऊन त्याला दहा वेळा निरनिराळ्या योनींत जन्म घ्यावा लागला.॥७३॥

**मद्भक्तेन दधीचेन कृत्वा युद्धं जनार्दनः।।७४।।**
**भग्नचक्रायुधः पूर्वं पराभवमुपागमत्।**

**अन्वयार्थ :** पूर्वं = पूर्वी, मद्भक्तेन = माझा भक्त अशा, दधीचेन = दधीचीबरोबर, जनार्दनः = विष्णू, युद्धं = युद्ध, कृत्वा = करून, भग्नचक्रायुधः = चक्रायुधाचा नाश झालेला असा होऊन, पराभवं = पराभव, उपागमत् = पावला.

**भावार्थ :** पूर्वी माझा भक्त दधीचीबरोबर विष्णूने युद्ध केल्यामुळे त्याचे सुदर्शन चक्र मोडून त्याचा पराभव झाला होता.॥७४॥

**कृताश्वमेधो दक्षोऽपि मद्भक्तांश्च गणेश्वरान्।।७५।।**
**अवमत्य सभामध्ये मेषवक्त्रोऽभवत् पुरा।**

**अन्वयार्थ :** पुरा = पूर्वी, कृताश्वमेधः = अश्वमेध केलेला, दक्षोऽपि = दक्षसुद्धा, मद्भक्तान् = माझे भक्त अशा, गणेश्वरान् = गणेश्वरांना, सभामध्ये = सभेत, अवमत्य = अवमानित करून, मेषवक्त्रः = एडक्याच्या तोंडाच्या, अभवत् = झाला होता.

**भावार्थ :** पूर्वी अश्वमेध यज्ञ करणाऱ्या दक्ष ब्रह्म्याने सभेत माझे भक्त आणि गणेश्वरांविषयी उदासीनता दाखवून त्यांचा अपमान केला होता. त्यामुळे वीरभद्राकडून त्याचे मस्तक छाटले गेले आणि पुन्हा त्याच्याच अनुग्रहाने त्याला एडक्याचे मुंडके लावावे लागले.॥७५॥

**श्वेतस्य मम भक्तस्य दुरतिक्रमतेजसः।।७६।।**
**औदासीन्येन कालोऽपि मया दग्धः पुराऽभवत्।**

**अन्वयार्थ :** पुरा = पूर्वी, दुरतिक्रमतेजसः = असामान्य तेजस्वी असा, मम = माझ्या, भक्तस्य = भक्त अशा, श्वेतस्य = श्वेताविषयी, औदासीन्येन = उदासीनतेमुळे, कालोऽपि = यमसुद्धा, दग्धः = जळालेला, अभवत् = झाला होता.

**भावार्थ :** पूर्वी अत्यंत पराक्रमी अशा श्वेत नावाच्या माझ्या भक्ताकडे यमाने दुर्लक्ष केल्यामुळे मी त्या यमाला जाळून टाकले होते.।।७६।।

**एवमन्येऽपि बहवो मद्भक्तानामतिक्रमात्।।७७।।**
**परिभूता हताश्चासन् भक्ता मे दुरतिक्रमाः।**

**अन्वयार्थ :** एवम् = अशा रीतीने, अन्येऽपि = इतरही, बहवः = अनेक लोक, मद्भक्तानां = माझ्या भक्तांचे, अतिक्रमात् = अतिक्रमण केल्यामुळे, परिभूताः = तिरस्कृत झाले, च = आणि, हताः = मारले गेलेले, आसन् = झाले, म्हणून, मे = माझे, भक्ताः = भक्तलोक, दुरतिक्रमाः = अतिक्रमणीय नाहीत.

**भावार्थ :** अशाच रीतीने माझ्या भक्तांना ओलांडून त्यांचा अवमान केल्यामुळे पूर्वी काही लोक पराभूत झाले व काही मारले गेले. म्हणून माझ्या भक्तांना कोणीही ओलांडून जाऊ नये, अर्थात् त्यांचा अवमान करू नये.।।७७।।

**अविचारेण मद्भक्तो लङ्घितो दारुकस्त्वया।।७८।।**
**एष त्वं रेणुकानेन जन्मवान् भव भूतले।**

**अन्वयार्थ :** मदभक्तः = माझा भक्त असा, दारुकः = दारुक, त्वया = तुझ्याकडून, अविचारेण = विचार न करता, लङ्घितः = ओलांडला गेला, रेणुक = हे रेणुका, अनेन = त्यामुळे, एषः = अशा, त्वं = तू, भूतले = भूलोकात, जन्मवान् भव = जन्मलेला हो.

**भावार्थ :** हे रेणुका, माझ्या भक्ताला अविचाराने ओलांडून जाण्याचा अपराध केल्यामुळे तू भूमितलावर जन्म घेतला पाहिजेस.।।७८।।

**इत्युक्तः परमेशेन भक्तमाहात्म्यशंसिना।।७९।।**
**प्रार्थयामास देवेशं प्रणिपत्य स रेणुकः।**

**अन्वयार्थ :** भक्तमाहात्म्यशंसिना = भक्तांचा महिमा गाणाऱ्या, परमेशेन = परमेश्वराकडून, इति = अशा रीतीने, उक्तः = आदेशिला गेलेल्या, सः = त्या, रेणुकः = रेणुकाने, देवेशं = महादेवाला, प्रणिपत्य = नमस्कार करून, प्रार्थयामास = प्रार्थना केली.



**भावार्थ :** भक्ताचे माहात्म्य वर्णन करणाऱ्या परमेश्वराची आज्ञा ऐकल्यावर रेणुकाने त्यांना नमस्कार करून प्रार्थना केली.।।७९।।

**मानुषीं योनिमासाद्य महादुःखविवर्धिनीम्।।८०।।**
**जात्यायुर्भोगवैषम्यहेतुकर्मोपपादिनीम्।**
**समस्तदेवकैङ्कर्यकार्पण्यप्रसवस्थलीम्।।८१।।**
**महातापत्रयोपेतां वर्णाश्रमनियन्त्रिताम्।**
**विहाय त्वत्पदाम्भोजसेवां किं वा वसाम्यहम्।।८२।।**
**यथा मे मानुषो भावो न भवेत् क्षितिमण्डले।**
**तथा प्रसादं देवेश विधेहि करुणानिधे।।८३।।**

**अन्वयार्थ :** महादुःखविवर्धिनीम् = महादुःखे वाढविणारा, जाति = जाती, आयुः = आयुष्य, भोग = भोगांच्या, वैषम्यहेतु = विषमतेला कारणीभूत, कर्मोपपादिनीम् = कर्मांची उत्पत्ती करणारा, समस्तदेवकैङ्कर्य = सर्व देवांचे दास्यत्व देणारा, कार्पण्यप्रसवस्थलीम् = दैन्याची जन्मभूमी असलेला, महातापत्रयोपेतां = तापत्रयाने युक्त, वर्णाश्रमनियन्त्रिताम् = वर्णा-श्रमांची बंधने असणारा, मानुषीं = मनुष्यसंबंधी, योनिं = योनीला, आसाद्य = प्राप्त होऊन, त्वत्पदाम्भोज = तुझ्या पादकमलांची, सेवां = सेवा, विहाय = सोडून, अहं = मी, किं वा वसामि = वास करीन काय? त्यासाठी, करुणानिधे = हे करुणासागरा, देवेश = महादेवा, मे = मला, क्षितिमण्डले = भूलोकात, मानुषो भावः = मनुष्य जन्म, यथा न भवेत् = जसा न प्राप्त होईल, तथा = तसा, प्रसादं = अनुग्रह, विधेहि = कर.

**भावार्थ :** मनुष्ययोनीमध्ये मोठमोठी दुःखे वरचेवर येतात. जाती, आयुष्य, सुखोपभोग यांच्यातील विषमता उत्पन्न करणारी अनेक प्रकारची कर्मे तेथे घडतात. मनुष्ययोनीमध्ये अनेक देवांची सेवा करावी लागते. मनुष्ययोनी तर दैन्याची जन्मभूमी आहे. आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक अशी मोठमोठी दुःखे तेथे भोगावी लागतात. त्या योनीत ब्राह्मणादी वर्ण आणि ब्रह्मचर्यादी आश्रम यांच्या नियंत्रणात राहावे लागते. तुझ्या चरणकमलांची सेवा करण्याचे सोडून अशा मनुष्ययोनीत मी कसा राहू शकेन? म्हणून हे

करुणासागरा परमेश्वरा, भूलोकी मला जन्म घ्यावा लागणार नाही असा अनुग्रह माझ्यावर कर.॥८०-८३॥

**इति सम्प्रार्थितो देवो रेणुकेन महेश्वरः।**
**मा भैषीर्मम भक्तानां कुतो भीतिरिहेष्यति।।८४।।**

**अन्वयार्थ :** इति = अशाप्रकारे, रेणुकेन = रेणुकाकडून, संप्रार्थितः = चांगल्या रीतीने प्रार्थिला गेलेला, देवः = देव असा, महेश्वरः = महेश्वर, मा भैषीः = भिऊ नकोस, मम = माझ्या, भक्तानां = भक्तांना, इह = या जगात, भीतिः = भय, कुतः = कोठून, एष्यति = येईल.

**भावार्थ :** रेणुकाने अशी प्रार्थना केल्यावर महादेव म्हणाले, हे रेणुका तू भिऊ नकोस, माझ्या भक्तांना या जगात भीती कशी असेल?॥८४॥

**श्रीशैलस्योत्तरे भागे त्रिलिङ्गविषये शुभे।**
**कोल्लिपाक्याभिधानोऽस्ति कोऽपि ग्रामो महत्तरः।।८५।।**

**अन्वयार्थ :** श्रीशैलस्य = श्रीशैल पर्वताच्या, उत्तरे भागे = उत्तर दिशेला असणाऱ्या, शुभे = मंगलमय अशा, त्रिलिङ्गविषये = तेलंग देशात, कोल्लिपाक्यभिधानः = कोल्लिपाकी नावाचा, कोऽपि = कोणी एक, महत्तरः = मोठा, ग्रामः = गाव, अस्ति = आहे.

**भावार्थ :** श्रीशैल पर्वताच्या उत्तर दिशेस असणाऱ्या मंगलमय तेलंग देशात कोल्लिपाकी (कोलनुपाक) नावाचा एक मोठा गाव आहे.॥८५॥

**सोमेश्वराभिधानस्य तत्र वासवतो मम।**
**अस्पृशन् मानुषं भावं लिङ्गात्प्रादुर्भविष्यसि।।८६।।**

**अन्वयार्थ :** तत्र = तेथे, सोमेश्वराभिधानस्य = सोमेश्वर या नावाने, वासवतः = वास करणाऱ्या, मम = माझ्या, लिङ्गात् = लिंगापासून, मानुषं भावं = मानव रूपाला, अस्पृशन् = न स्पर्शिता, प्रादुर्भविष्यसि = अवतरशील.

**भावार्थ :** त्या कोलऽनुपाक क्षेत्री मी सोमेश्वरलिंग रूपाने प्रसिद्ध आहे. म्हणून हे रेणुका, तू अमानवी अशा दिव्य रूपाने त्या लिंगापासून जन्म घेशील.॥८६॥



**मदीयलिङ्गसंभूतं मद्भक्तपरिपालकम्।**
**विस्मिता मानुषाः सर्वे त्वां भजन्तु मदाज्ञया।।८७।।**

**अन्वयार्थ :** मदाज्ञया = माझ्या आज्ञेने, मदीय = माझ्या, लिङ्गसम्भूतं = लिंगापासून अवतरलेल्या, मद्भक्तपरिपालकम् = माझ्या भक्तांचे रक्षण करणाऱ्या, त्वां = तुला, सर्वे = सर्व, मानुषाः = मानव, विस्मिताः = विस्मित होऊन, भजन्तु = तुझी सेवा करोत.

**भावार्थ :** माझ्या आज्ञेने सोमेश्वर लिंगापासून अवतरलेल्या भक्तपालक अशा तुला पाहून सर्वलोक आश्चर्यचकित होऊन तुझी सेवा करू लागतील.॥८७॥

**मदद्वैतपरं शास्त्रं वेदवेदान्तसंमतम्।**
**स्थापयिष्यसि भूलोके सर्वेषां हितकारकम्।।८८।।**

**अन्वयार्थ :** सर्वेषां = सर्वांना, हितकारकम् = हितकारक असा, वेदवेदान्तसम्मतम् = वेद आणि उपनिषदांना संमत असणारा, मदद्वैतपरं = माझ्या अद्वैतरूपी (शिवाद्वैतरूप), शास्त्रं = शास्त्राला, भूलोके = भूलोकात, स्थापयिष्यसि = स्थापन करशील.

**भावार्थ :** हे रेणुका, जगातील सर्व लोकांच्या हितासाठी, वेद आणि उपनिषदांना संमत असणारे शिवाद्वैत (वीरशैव सिद्धान्त) तू स्थापन करशील. (वीरशैव सिद्धान्त शिवाद्वैत, विशेषाद्वैत, शक्तिविशेषाद्वैत, भेदाभेद अशा अनेक नावांनी प्रसिद्ध आहे. येथे श्लोकात 'मदद्वैत' असा शब्द आलेला आहे. त्याचा अर्थ शिवाद्वैत असा होतो. वीरशैव सिद्धान्त हा आगमोक्त असून तो वेदोपनिषदांनाही संमत आहे.॥८८॥

**मम प्रतापमतुलं मद्भक्तानां विशेषतः।**
**प्रकाशय महीभागे वेदमार्गानुसारतः।।८९।।**

**अन्वयार्थ :** मम = माझा, प्रतापं = प्रताप, अतुलं = अतुलनीय आहे, मद्भक्तानां = माझ्या भक्तांचा, विशेषतः = विशेष रूपाने, महीभागे = भूलोकात, वेदमार्गानुसारतः = वेदमार्गाला अनुसरून, प्रकाशय = प्रकाशित कर, अर्थात् प्रसिद्धीस आण.

**भावार्थ :** माझा आणि विशेषत: माझ्या भक्तांचा अतुलनीय पराक्रम भूलोकात वेदमार्गाला अनुसरून प्रसिद्धीस आण.॥८९॥

**इत्युक्त्वा परमेश्वरः स भगवान् भद्रासनादुत्थितो**
**ब्रह्मोपेन्द्रमुखान् विसृज्य विबुधान् भ्रूसंज्ञया केवलम्।**
**पार्वत्या सहितो गणैरभिमतैः प्राप स्वमन्तःपुरं**
**क्षोणीभागमवातरत् पशुपतेराज्ञावशाद् रेणुकः।।९०।।**

**अन्वयार्थ :** स = तो, भगवान् = षड्गुणैश्वर्यशाली, परमेश्वर: = परमेश्वर, इति = अशा रीतीने, उक्त्वा = बोलून, भद्रासनात् = मंगलमय आसनावरून, उत्थित: = उठून, केवलम् = केवळ, भ्रूसंज्ञया = भृकुटि-संकेताने, ब्रह्मोपेन्द्रमुखान् = ब्रह्मा, विष्णू आदी, विबुधान् = देवांना, विसृज्य = पाठवून, पार्वत्या सहित: = पार्वतीसह, अभिमतै: = आपल्याला हव्या अशा, गणै: = गणांबरोबर, स्वं = स्वत:च्या, अन्त:पुरं = अंत:पुराला, प्राप = गेला, रेणुक: = रेणुक, पशुपते: = शिवाच्या, आज्ञावशात् = आज्ञेनुसार, क्षोणीभागं = भूलोकात, अवातरत् = अवतरला.

**भावार्थ :** इतके बोलून शंकर आपल्या सिंहासनावरून उठले, ब्रह्मा, विष्णू वगैरे देवांना त्यांनी नेत्रसंकेताने आपापल्या स्थानी जाण्यास सांगितले व आपले प्रियगण आणि पार्वतीसह ते आपल्या अंत:पुरात गेले. इकडे शंकराच्या आज्ञेप्रमाणे रेणुकगणेश्वर कोलनुपाक गावातील सोमेश्वर लिंगापासून पृथ्वीवर प्रकट झाले.॥९०॥

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ कैलासवर्णनं रेणुकावतरणकारणं च नाम तृतीयः परिच्छेदः।***

**तिसरा परिच्छेद समाप्त**

❍❍❍

# चौथा परिच्छेद

**रेणुकप्रादुर्भाव वर्णन**

**अथ त्रिलिङ्गविषये कोल्लिपाक्यभिधे पुरे।**
**सोमेश्वरमहालिङ्गात् प्रदुरासीत् स रेणुकः।।१।।**

**अन्वयार्थ :** अथ = त्यानंतर, स: = तो, रेणुक: = रेणुक गणेश्वर, त्रिलिङ्ग-विषये = तेलंग देशात, काल्लिपाक्याभिधे = कोल्लिपाक नावाच्या, पुरे = नगरात, सोमेश्वरमहालिङ्गात् = सोमेश्वर महालिंगापासून, प्रादुरासीत् = प्रादुर्भूत झाला.

**भावार्थ :** शिवापासून आज्ञा घेऊन आलेले रेणुक गणेश्वर तेलंग देशात सुप्रसिद्ध क्षेत्र असलेल्या कोल्लिपाक नगरातील सोमेश्वर लिंगापासून प्रादुर्भूत झाले.॥१॥

**प्रादुर्भूतं तमालोक्य शिवलिङ्गात् त्रिलिङ्गजाः।**
**विस्मिताः प्राणिनः सर्वे बभूवुरतितेजसम्।।२।।**

**अन्वयार्थ :** शिवलिङ्गात् = सोमेश्वरलिंगापासून, प्रादुर्भूतं = प्रादुर्भूत झालेल्या, अतितेजसम् = अत्यंत तेजस्वी अशा, तं = त्याला, आलोक्य = पाहून, त्रिलिङ्गजा: = तेलंग देशात जन्मलेले, सर्वे = सर्व, प्राणिन: = प्राणी, विस्मिता: = आश्चर्यचकित, बभूवु: = झाले.

**भावार्थ :** सोमेश्वर महालिंगापासून प्रकट झालेले श्रीरेणुकगणेश्वर अत्यंत तेजस्वी होते. त्यांना पाहून तेलंग देशातील सर्व लोक अत्यंत आश्चर्यचकित झाले.॥२॥

**भस्मोद्धूलितसर्वाङ्गं साररुद्राक्षभूषणम्।**
**जटामुकुटसंयुक्तं त्रिपुण्ड्राङ्कितमस्तकम्।।३।।**

**अन्वयार्थ :** भस्मोद्धूलित = भस्मविलेपित, सर्वाङ्गं = सर्वांग असलेला, सार = श्रेष्ठ अशा, रुद्राक्षभूषणं = रुद्राक्षांनी विभूषित, जटामुकुटसंयुक्तं = जटारूपी मुकुट धारण केलेला, त्रिपुण्ड्राङ्कितमस्तकम् = कपाळावर त्रिपुंड्र धारण केलेला.

**भावार्थ :** श्रीरेणुकांचे सर्वांग भस्म विलेपित होते. त्यांच्या शरीरावर उत्तमोत्तम रुद्राक्षांची आभूषणे होती. ते जटाधारी होते. आणि त्यांच्या भालप्रदेशावर भस्मांचे सुंदर त्रिपुंड्र होते.॥३॥

**कटीतटीपटीभूतकन्थापटलबन्धुरम् ।**
**दधानं योगदण्डं च भस्माधारं कमण्डलुम् ।।४।।**

**अन्वयार्थ :** कटितटी = कमरेला, पटीभूत = वस्त्रासारखी असणाऱ्या, कन्थापटल = कंथेच्या कमरपट्टयाने, बन्धुरम् = अत्यंत मनोहर असा, योगदण्डं = योगदंड, च = आणि, भस्माधारं = भस्म ठेवण्याचा, कमण्डलुं = कमंडलू, दधानम् = धारण केलेला.

**भावार्थ :** त्यांनी आपल्या कमरेस वस्त्राप्रमाणे कंथा बांधल्याने ते मनोहर दिसत होते. त्यांनी हातात योगदंड व भस्म ठेवण्याचा कमंडलू घेतला होता.।।४।।

**शिवाद्वैतपरिज्ञानपरमानन्दमोदितम् ।**
**निर्धूतसर्वसंसारवासनादोषपञ्जरम् ।।५।।**

**अन्वयार्थ :** शिवाद्वैतपरिज्ञान = शिवाद्वैतज्ञानाने उत्पन्न झालेल्या, परमानन्द = परमानंदाने, मोदिताम् = आनंदित झालेला, निर्धूत = त्यजिलेला, सर्व = समस्त, संसारवासनादोषपञ्जरम् = संसाराच्या वासनेचा दोषरूपी पिंजरा.

**भावार्थ :** शिवाद्वैतज्ञानप्राप्तीच्या परमानंदाने ते आनंदित झालेले होते. त्यांच्या सर्व संसारवासनांचा दोषरूपी पिंजरा तुटलेला होता. अर्थात् ते सर्व संसारवासनांतून मुक्त झालेले होते.।।५।।

**शिवागमसुधासिन्धुसमुन्मेषसुधाकरम् ।**
**चित्तारविन्दसंगूढशिवपादाम्बुजद्वयम् ।।६।।**

**अन्वयार्थ :** शिवागम = शिवागमरूपी, सुधासिन्धु = अमृतसागराच्या, समुन्मेष = भारतीला, सुधाकरम् = चंद्रस्वरूप, चित्तारविन्द = हृदय-कमलात, संगूढ = गुप्त रूपाने ठेवले आहेत, शिवपादाम्बुजद्वयम् = शिवाचे चरणकमल, असा.

**भावार्थ :** शिवागमरूपी अमृतसागरास भरती आणणारे ते मूर्तिमंत चंद्रच होते. त्यांनी आपल्या चित्तारविंदात शिवाचे चरणकमल गुप्तपणे धारण केले होते. अर्थात् ते आपल्या अंत:करणात शिवचरणांचे गुप्तपणे चिंतन करीत होते.।।६।।



**यमादियोगतन्त्रज्ञं स्वतन्त्रं सर्वकर्मसु।**
**समस्तसिद्धसन्तानसमुदायशिखामणिम् ।।७।।**

**अन्वयार्थ :** यमादि = यमनियमादी, योगतन्त्रज्ञं = अष्टांग योगाचे स्वरूप जाणणारा, सर्वकर्मसु = सर्व कार्यात, स्वतन्त्रं = स्वतंत्र, समस्त = सर्व, सिद्धसन्तानसमुदाय = सिद्धकुल समुदायाचा, शिखामणिम् = सर्वश्रेष्ठ.

**भावार्थ :** यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी या अष्टांग योगाचे स्वरूप त्यांना अवगत असून ते सर्व कार्यात स्वतंत्र होते. सर्व सिद्धवंशाच्या समुदायात ते सर्वश्रेष्ठ होते.।।७।।

**वीरसिद्धान्तनिर्वाहकृतपट्टनिबन्धनम् ।**
**आलोकमात्रनिर्भिन्नसमस्तप्राणिपातकम् ।।८।।**

**अन्वयार्थ :** वीरसिद्धान्त = वीरशैव सिद्धान्ताच्या, निर्वाह = स्थापनेसाठी, कृतपट्टनिबन्धनम् = पट्टबंधन केलेला, आलोकमात्र = (ज्याच्या केवळ) अवलोकनाने, निर्भिन्न = नष्ट झालेले आहेत, समस्तप्राणिपातकम् = सर्व प्राणिमात्रांची पातके.

**भावार्थ :** वीरशैव सिद्धान्ताच्या प्रतिष्ठापनेसाठी ते कटिबद्ध झाले होते. आपल्या केवळ दृष्टिक्षेपाने सर्व प्राणिमात्रांची पातके नष्ट करीत होते.।।८।।

**तमपृच्छन् जना: सर्वे नमन्त: को भवानिति।**
**इति पृष्टो महायोगी जनैर्विस्मितमानसै:।।९।।**

**अन्वयार्थ :** तं = त्याला, सर्वे = सर्व, जना: = लोकांनी, नमन्त: = नमस्कार करीत, भवान् क इति = आपण कोण असे, अपृच्छन् = विचारले, विस्मितमानसै: = आश्चर्यचकित मनाच्या, जनै: = लोकांकडून, महायोगी = महायोगी रेणुक, इति = अशा रीतीने, पृष्ट: = विचारला गेला.

**भावार्थ :** अवतार घेतलेल्या महायोगी रेणुक गणेश्वरांना पाहून तेलंग देशातील आश्चर्यचकित झालेल्या लोकांनी त्यांना साष्टांग नमन केले आणि आपण कोण आहात, असा प्रश्न केला.।।९।।

**प्रत्युवाच शिवाद्वैतमहानन्दपरायणः।**
**पिनाकिनः पार्श्ववर्ती रेणुकाख्यगणेश्वरः।।१०।।**

**अन्वयार्थ :** शिवाद्वैत = शिवाद्वैताच्या, महानन्द = श्रेष्ठ आनंदात, परायणः = निमग्न, पिनाकिनः = परमेश्वराच्या, पार्श्ववर्ती = जवळ राहाणारा, रेणुकाख्यः = रेणुक नावाचा, गणेश्वरः = गणेश्वर, प्रत्युवाच = प्रत्युत्तरला.

**भावार्थ :** शिवाद्वैताच्या महानंदात निमग्न असणाऱ्या, शिवाच्या सहवासात राहाणाऱ्या त्या रेणुक नावाच्या गणेश्वराने त्या लोकांना असे उत्तर दिले.॥१०॥

**केनचित्कारणेनाहं शिवलिङ्गादिहाभवम्।**
**नाम्ना रेणुकसिद्धोऽहं सिद्धसन्ताननायकः।।११।।**

**अन्वयार्थ :** अहं = मी, केनचित् कारणेन = काही कारणामुळे, इह = भूलोकात, शिवलिङ्गात् = शिवलिंगापासून, अभवम् = उद्भवलो, सिद्धसन्तान = सिद्धसमूहाचा, नायकः = नायक असा, अहं = मी, नाम्ना = नावाने, रेणुकसिद्धः = रेणुकसिद्ध आहे.

**भावार्थ :** हे लोकहो, काही विशिष्ट कार्याच्या निमित्ताने मी या सोमेश्वर-लिंगापासून प्रकट झालो असून सिद्धसंतानात सर्वश्रेष्ठ असा रेणुक नावाचा मी सिद्ध आहे.॥११॥

**स्वच्छन्दचारी लोकेऽस्मिन् शिवसिद्धान्तपालकः।**
**खण्डयन् जैनचार्वाकबौद्धादीनां दुरागमान्।।१२।।**

**अन्वयार्थ** : अस्मिन् = ह्या, लोके = जगात, स्वच्छन्दचारी = स्वच्छंदपणे संचरणारा, जैनचार्वाकबौद्धादीनां = जैन, चार्वाक, बौद्धादींच्या, दुरागमान् = नास्तिक आगमांना, खण्डयन् = खंडन करीत, शिवसिद्धान्तपालकः = शिवाद्वैत सिद्धान्ताचे परिपालन करणार आहे.

**भावार्थ** : मी या लोकात स्वच्छंदपणे वावरणारा शिवसिद्धान्ताचे संरक्षण करणारा असून नास्तिकवादी चार्वाक, जैन, बौद्धांच्या अनिष्ट आगमांचे खंडन करणारा आहे.॥१२॥



**इत्युक्त्वा पश्यतां तेषां विषयस्थिरचक्षुषाम्।**
**उत्थाय व्योममार्गेण मलयाद्रिमुपागमत्।।१३।।**

**अन्वयार्थ** : इति = अशा प्रकारे, उक्त्वा = सांगून, विषयस्थिर-चक्षुषाम् = टक लावून पाहात असणारे, तेषां = ते लोक, पश्यतां = पाहात असताना, उत्थाय = उठून, व्योममार्गेण = आकाशमार्गाने, मलयाद्रिम् = मलय पर्वताला, उपागमात् = प्राप्त झाले-गेले.

**भावार्थ** : एवढे सांगून, लोक त्यांच्याकडे टक लावून पाहात असतानाच ते एकाएकी उठून आकाशमार्गे मलयपर्वताकडे निघून गेले.॥१३॥

**नवचन्दनकान्तारकन्दलन्मन्दमारुतम् ।**
**अभङ्गुरभुजङ्गस्त्रीसंगीतरससंकुलम् ।।१४।।**

**अन्वयार्थ** : नव = नूतन, चन्दन = चंदनाच्या, कान्तार = अरण्याला, कन्दलन् = भेदनक्षम, मन्दमारुतम् = मंद वारा असलेला, अभङ्गुर = अति निबिड, भुजङ्गस्त्री = नागिणींच्या, सङ्गीतरस = गानरसाने, सङ्कुलम् = व्याप्त असलेला.

**भावार्थ :** नव्या चंदनाच्या वृक्षराजीवरून वाहाणाऱ्या सुगंधित मंद वाऱ्याने तो मलय पर्वत दरवळून गेला होता आणि विपुल नागस्त्रियांच्या मंजुळ गानरसाने तो भरलेला होता.॥१४॥

**करिपोतकराकृष्टस्फुरदेलातिवासितम् ।**
**वराहदंष्ट्रिकाध्वस्तमुस्तासुरभिकन्दरम् ।।१५।।**

**अन्वयार्थ** : करिपोत = हत्तीच्या छाव्यांच्या, कर = सोंडींनी, आकृष्ट = उपटून टाकलेल्या, स्फुरत् = दिसणाऱ्या, एला = विलायचीच्या वेलींनी, अतिवासितम् = अतिसुगंधित झालेला, वराह = रान डुकरांच्या, दंष्ट्रिका = दातांनी, ध्वस्त = उध्वस्त केलेल्या, मुस्ता = वाळ्याच्या, सुरभि = सुगंधित झालेल्या, कन्दरम् = गुहांनी युक्त.

**भावार्थ** : हत्तीच्या छाव्यांनी आपल्या सोंडींनी उपटून टाकलेल्या वेल-दोड्यांच्या वेलींमुळे सर्वत्र सुवास भरला होता. तसेच रानडुकरांनी आपल्या सुळ्यांनी

उकरलेल्या वाळ्याचा घमघमाट पर्वतावरील गुहांमध्ये भरून गेला होता.॥१५॥

**पटीरदलपर्यङ्कप्रसुप्तव्याधदम्पतिम् ।**
**माधवीमल्लिकाजातीमञ्जरीरेणुरञ्जितम् ॥१६॥**

**अन्वयार्थ** : पटीर = चंदन वृक्षाच्या, दल = पानांनी निर्मित, पर्यङ्क = पलंगावर, प्रसुप्त = झोपलेल्या, व्याधदम्पतिम् = व्याधांच्या जोडप्यांनी युक्त, माधवी = बटमोगरा, मल्लिका = मोगरा, जाती = जाई, यांच्या मञ्जरी = मंजिऱ्यातील, रेणु = परागांनी, रञ्जितम् = रंगलेला.

**भावार्थ** : मलयाचलावरील किरातदंपती चंदनाच्या पानांनी केलेल्या शय्येवर झोपलेले होते. जाई, जुई, बटमोगरा यांची फुले, मंजिऱ्या आणि परागांचा सुवास सर्वत्र पसरलेला होता.॥१६॥

**तत्र कुत्रचिदाभोगसर्वर्तुकुसुमद्रुमे।**
**अपश्यदाश्रमं दिव्यमगस्त्यस्य महामुनेः॥१७॥**

**अन्वयार्थ** : सर्वर्तु = सर्व ऋतूंत फलणाऱ्या, कुसुमद्रुमे = पुष्पवृक्षांनी युक्त, तत्र = त्या मलयपर्वतावरील, कुत्रचित् = कोण्या एका, आभोग = विशाल प्रदेशात, महामुनेः = महर्षी, अगस्त्यस्य = अगस्तीचा, दिव्यं = दिव्य असा, आश्रमं = आश्रम, अपश्यत् = पाहिला.

**भावार्थ** : तो मलयपर्वत ऋतुमानाचा संबंध नसता एकाचवेळी, सर्वऋतूंत बहरणाऱ्या पुष्पवृक्षांनी भरलेला होता. अशा त्या मलयपर्वतावरील एका विशाल प्रदेशात असणारा अगस्तीऋषींचा अत्यंत दिव्य आणि मनोहर असा सुशोभित आश्रम श्रीरेणुकगणेश्वराने पाहिला.॥१७॥

**मन्दारचन्दनप्रायैर्मण्डितं तरुमण्डलैः।**
**शाखाशिखरसंलीनतारकागणकोरकैः ॥१८॥**

**अन्वयार्थ** : शाखाशिखर = शाखांच्या शेंड्याशी, संलीन = मिसळलेल्या, तारकागणकोरकैः = तारका समूहरूप कळयांनी युक्त, मन्दारचन्दनप्रायैः = कल्पवृक्षचंदनादी, तरुमण्डलैः = वृक्षांच्या समूहांनी, मण्डितं = अलंकृत असा.



**भावार्थ** : त्या आश्रमातील पारिजात चंदनादी वृक्ष इतके उंच होते की त्यांच्या शिरोभागी दिसणारी आकाशातील नक्षत्रे ही त्या शेंड्यांना आलेल्या पांढऱ्याशुभ्र कळ्यांप्रमाणे भासत होती.॥१८॥

**मुनिकन्याकरानीतकलशाम्बुविवर्धितैः।**
**आलवालजलास्वादमोदमानमृगीगणैः॥१९॥**

**अन्वयार्थ** : मुनिकन्या = मुनिकन्यांच्या, करानीत = हातांनी आणविलेल्या, कलशाम्बु = घागरीतील पाण्याने, विवर्धितैः = वाढलेल्या, आलावाल = वृक्षांच्या आळयातील, जल = पाण्याच्या, आस्वाद = आस्वादनाने, मोदमान = आनंदित झालेल्या, मृगीगणैः = हरिणींच्या समूहाने युक्त.

**भावार्थ** : ऋषिकन्या आपल्या हातातील कलशांनी आश्रमातील झाडांना पाणी घालीत होत्या; त्यामुळे ती झाडे वाढत होती आणि झाडांच्या आळ्यातील पाणी पिऊन हरिणींचा समुदाय, आनंदित होत होता.॥१९॥

**हेमारविन्दनिष्यन्दमकरन्दसुगन्धिभिः।**
**मरालालापवाचालुवीचिमालामनोहरैः॥२०॥**

**अन्वयार्थ** : हेमारविन्द = सुवर्णकमलापासून, निष्यन्द = स्रवलेल्या, मकरन्द = मकरंदाने, सुगन्धिभिः = सुगंधित झालेले, मराल = राजहंसांच्या, आलाप = मधुर ध्वनीने, वाचाल = बोलणाऱ्या, वीचिमाला = तरंगमालांनी, मनोहरैः = सुंदर अशा.

**भावार्थ** : तेथील सरोवरांच्या पाण्याला सुवर्णकमलातून गळणाऱ्या मधुर मकरंदाचा सुवास येत होता आणि पक्षी मधुर शब्द करीत असल्यामुळे मुखरित होणाऱ्या जलतरंगांची शोभा मनोहर दिसत होती.॥२०॥

**इन्दीवरवरज्योतिरन्धीकृतहरिन्मुखैः ।**
**लोपामुद्रापदन्यासचरितार्थतटाङ्कितैः ॥२१॥**

**अन्वयार्थ** : इन्दीवर = नीलकमलांच्या, वरज्योतिः = श्रेष्ठ अशा कांतीने, अन्धीकृत = अंधारलेल्या, हरिन्मुखैः = दिशांच्या मुखांनी युक्त, लोपामुद्रा = लोपामुद्रेच्या, पदन्यास = चरणचिन्हांनी, चरितार्थ = कृतार्थ झालेल्या, तटाङ्कितैः = किनाऱ्यांनी युक्त.

**भावार्थ** : तेथील सरोवरांत नीलकमलांची इतकी दाटी होती, की त्यांच्या निळ्या प्रभेने दाही दिशाही अंधुक झाल्या होत्या आणि अगस्त्य-ऋषिपत्नी लोपामुद्रेच्या चरणचिन्हांनी सरोवरांचे किनारे कृतार्थ झालेले दिसत होते.॥२१॥

**हारनीहारकर्पूरहरहासामलोदकैः ।**
**नित्यनैमित्तिकस्नाननियमार्थैस्तपस्विनाम्॥२२॥**

**अन्वयार्थ** : हार = मोत्यांचा हार, नीहार = हिम, कर्पूर = कापूर, हरहास = शिवाच्या मंदहास्याप्रमाणे, अमलोदकैः = निर्मल पाण्याने युक्त, तपस्विनाम् = तपस्व्यांच्या, नित्यनैमित्तिकस्नान = नित्य आणि नैमित्तिक स्नानासाठी, नियमार्थैः = नियमित अशा.

**भावार्थ** : सरोवरातील पाणी इतके स्वच्छ होते, की ते मोत्यांच्या माळा, कापूर आणि शिवाच्या मंदस्मिताप्रमाणे अत्यंत शुभ्र दिसत होते. अशा पाण्यात तपस्वी जन नित्य आणि नैमित्तिक स्नान नियमाने करीत असत.॥२२॥

**प्रकृष्टमणिसोपानैः परिवीतं सरोवरैः।**
**विमुक्तसत्त्ववैरस्यं ब्रह्मलोकमिवापरम्॥२३॥**

**अन्वयार्थ** : प्रकृष्ट = श्रेष्ठ अशा, मणिसोपानैः = रत्ननिर्मित पायऱ्यांनी युक्त, सरोवरैः = सरोवरांनी, परिवीतं = वेढलेला, विमुक्त = त्यजिलेला, सत्त्व = प्राण्यांचा, वैरस्यं = वैरभाव असा, अपरं = दुसऱ्या, ब्रह्मलोकमिव = ब्रह्मलोकासारखा.

**भावार्थ** : श्रेष्ठ-श्रेष्ठ रत्नांच्या पायऱ्यांनी युक्त सरोवरांनी अगस्ती ऋषींचा आश्रम वेढलेला होता. आश्रमातील प्राण्यांमध्ये वैरभाव मुळीच नव्हता, त्यामुळे तो परिसर प्रतिब्रह्मलोकच भासत होता.॥२३॥

**हूयमानाज्यसन्तानधूमगन्धिमहास्थलम्।**
**शुकसंसत्समारब्धश्रुतिशास्त्रोपबृंहणम्॥२४॥**

**अन्वयार्थ** : हूयमान = हवन केल्या जाणाऱ्या, आज्य = होमात घालावयाच्या तुपाच्या, सन्तान् = धारांनी उत्पन्न झालेल्या, धूम = धुराने, गन्धि = सुगंधित अशा, महास्थलं = विशाल स्थानाने युक्त, शुकसंसत् = पोपटांच्या सभेत, समारब्ध = आरंभिलेल्या, श्रुतिशास्त्रोपबृंहणम् = वेदशास्त्र-वाक्यांच्या मोठ्यानी केलेल्या उच्चारांनी युक्त.



**भावार्थ** : तेथे जागोजाग होत असलेल्या होमहवनात जळणाऱ्या तुपाचा वास येणारा धूर सर्वत्र भरला होता आणि तेथील पोपट आपसात वेदशास्त्र-वचनांची चर्चा करीत होते. असा अगस्त्याश्रम श्रीरेणुकांनी पाहिला.॥२४॥

**तस्य मध्ये समासीनं मूले चन्दनभूरुहः।**
**सुकुमारदलच्छायादूरितादित्यतेजसः ॥२५॥**

**अन्वयार्थ** : तस्य = त्या आश्रमाच्या, मध्ये = मध्यभागी, सुकुमार = कोमल अशा, दल = पानांच्या, छाया = छायेने, दूरित = निवारित, आदित्यतेजसः = सूर्याचे तेज, असा, चन्दनभूरुहः = चंदनवृक्षाच्या, मूले = तळी, समासीनं = बसलेला.

**भावार्थ** : आश्रमातील चंदनाच्या झाडाखाली अगस्ती ऋषी बसले होते चंदनवृक्षाच्या कोवळ्या आणि दाट पानांच्या छायेमुळे त्यांना सूर्याचे ऊन मुळीच लागत नव्हते.॥२५॥

**तडित्पिङ्गजटाभारैस्त्रिपुण्ड्राङ्कितमस्तकैः ।**
**भस्मोद्धूलितसर्वाङ्गैः स्फुरद्रुद्राक्षभूषणैः॥२६॥**
**नववल्कलवासोभिर्नानानियमधारिभिः ।**
**परिवीतं मुनिगणैः प्रमथैरिव शङ्करम्॥२७॥**

**अन्वयार्थ** : तडित् = विजेसारख्या, पिङ्ग = पिंगट, जटाभारैः = जटाभाराने युक्त, त्रिपुण्ड्राङ्कित = त्रिपुंड्र लावलेले, मस्तकैः = कपाळ असलेले, भस्मोद्धूलित = भस्मविलेपन केलेले, सर्वाङ्गैः = सर्वांग असलेले, स्फुरत् = शोभायमान असे, रुद्राक्षभूषणैः = रुद्राक्षांचे आभूषण धारण केलेले, नव = नूतन, वल्कलवासोभिः = वल्कले परिधान केलेले, नानानियमधारिभिः = अनेक व्रतांचे परिपालन करणारे, प्रमथैः = प्रमथगणांनी, शङ्करमिव = शंकरासारखे, मुनिगणैः = मुनींच्या समूहाने, परिवीतम् = वेढलेले.

**भावार्थ** : विजेसारख्या, पिंगट रंगाच्या जटा डोक्यावर असलेले, कपाळावर भस्माचे त्रिपुंड्र धारण केलेले, सर्वांगाला भस्मलेपन केलेले, गळ्यात उत्तमोत्तम रुद्राक्षांच्या माळा घातलेले, नूतन वल्कलांचे वस्त्र नेसलेले, नाना नियमांचे पालन करणाऱ्या मोठमोठ्या ऋषींनी वेढलेले अगस्तीऋषी, प्रमथगणांनी वेढलेल्या शंकराप्रमाणे दिसत होते.॥२६-२७॥

**समुज्ज्वलजटाजालैस्तप:पादपपल्लवै:।**
**स्फुरत्सौदामिनीकल्पैर्ज्वालाजालैरिवानलम्।।२८।।**

**अन्वयार्थ** : तप:पादप = तपरूपी वृक्षाच्या, पल्लवै: = पालवीसारख्या असणाऱ्या, स्फुरत् = चकाकणाऱ्या, सौदामिनीकल्पै: = विजेसमान असलेल्या, ज्वालाजालै: = ज्वालांच्या समूहाने, अनलमिव = अग्नीसारख्या, जटाजालै: = जटांच्या समूहाने, समुज्ज्वलत् = उज्ज्वल अशा दिसणाऱ्या.

**भावार्थ** : तपश्चर्यारूपी वृक्षाची तांबूस पालवी असल्याप्रमाणे आणि लखलखत्या विजेच्या लोळाप्रमाणे जटा असलेले अगस्ती, उफाळणाऱ्या ज्वालायुक्त अग्नीप्रमाणे दिसत होते.॥२८॥

**विशुद्धभस्मकृतया त्रिपुण्ड्राङ्कितरेखया।**
**त्रिस्रोतसेव सम्बद्धशिलाभागं हिमाचलम्।।२९।।**

**अन्वयार्थ** : विशुद्धभस्म = परिशुद्ध भस्माने, कृतया = केलेल्या, त्रिपुण्ड्राङ्कित-रेखया = त्रिपुंड्ररेखांनी युक्त (अगस्ती), त्रिस्रोतसा = गंगेच्या तीन धारांनी, सम्बद्ध-शिलाभागं = संबंधित शिलाभाग असलेल्या, हिमाचलमिव = हिमालय पर्वतासारखा.

**भावार्थ** : कपाळावर विशुद्ध भस्माचे त्रिपुंड्र धारण केलेले अगस्ती, ज्याच्या कड्यावरून गंगेच्या तीन धारा वाहात आहेत अशा हिमालय पर्वतासारखे दिसत होते.॥२९॥

**भस्मालङ्कृतसर्वाङ्गं शशाङ्कमिव भूगतम्।**
**वसानं वल्कलं नव्यं बालातपसमप्रभम्।।३०।।**



**अन्वयार्थ** : भस्मालङ्कृत = भस्माने अलंकृत, सर्वाङ्गं = सर्व अंग, भूगतं = भूमीवर असलेले, शशाङ्कमिव = चंद्रासारखे, नव्यं = नूतन असे, वल्कलं = वल्कल, वसानं = धारण कलेले, बालातप = बाल सूर्याच्या, समप्रभम् = समान कांती असलेले.

**भावार्थ** : सकाळच्या कोमल उन्हासारखे नवे वल्कल नेसलेले अगस्ती ऋषी, सर्वांगावर भस्मविलेपन केले असल्यामुळे भूलोकावर जणू चंद्रच अवतरल्यासारखे दिसत होते.॥३०॥

**वडवाग्निशिखाजालसमालीढमिवार्णवम्।**
**सर्वासामपि विद्यानां समुदायनिकेतनम्।।३१।।**

**अन्वयार्थ** : वडवाग्नि = वडवाग्नीच्या, शिखाजाल = ज्वालांच्या समूहाने, समालीढम् = व्याप्त, अर्णवमिव = समुद्रासारखे दिसणारे (अगस्ती), सर्वासामपि = सर्व, विद्यानां = विद्यांचे, समुदाय = समुदायाला, निकेतनम् = आश्रय, असे.

**भावार्थ** : सर्व विद्यांचे निधान असणारे अगस्ती ऋषी वडवाग्नीच्या ज्वालांनी व्यापलेल्या समुद्राप्रमाणे दिसत होते.॥३१॥

**न्यक्कृतप्राकृताहन्तं निरूढशिवभावनम्।**
**तृणीकृतजगज्जालं सिद्धीनामुदयस्थलम्।।३२।।**

**अन्वयार्थ** : न्यक्कृत = ज्यांच्याकडून तिरस्कृत झालेला आहे, प्राकृत = प्रकृतीसंबंधीचा, अहन्तं = अहंकार, निरूढ = दृढ झालेला आहे, शिवभावनम् = शिवभाव, तृणीकृत = तुच्छ झाले आहे, जगज्जालं = संसाराचे जाळे, सिद्धीनां = सिद्धींचे, उदयस्थलम् = उगमस्थान झाले आहे, असे.

**भावार्थ** : अगस्ती ऋषी सर्व अष्टसिद्धींचे उगमस्थान असून त्यांच्या ठिकाणी प्राकृतिक अहंकार उरलेला नव्हता. त्यांनी संसाराला कस्पटासमान लेखले होते आणि त्यांच्या ठिकाणी शिवाविषयी दृढ निष्ठा वसत होती.॥३२॥

**मोहान्धकारतपनं मूलबोधमहीरुहम्।**
**ददर्श स महायोगी मुनिं कलशसंभवम्।।३३।।**

**अन्वयार्थ** : मोहान्धकार = मोहरूपी अंधाराला, तपनं = सूर्यासारखा असणारा, मूलबोध = स्वस्वरूप ज्ञानाला, महीरुहम् = कल्पवृक्षासारखा असणारा, कलशसम्भवम् = कलशोद्भव अशा, मुनिं = अगस्तींना, स: = त्या, महायोगी = महायोगी अशा रेणुकगणेश्वराने, ददर्श = पाहिले.

**भावार्थ** : मोहरूपी अंधाराला सूर्यासारखे असणाऱ्या आणि मूळज्ञानाचे कल्पवृक्षच अशा अगस्तीऋषींस त्या महायोगी श्रीरेणुकाचार्यांनी पाहिले.॥३३॥

**तमागतं महासिद्धं समीक्ष्य कलशोद्भवः।**
**गणेन्द्रं रेणुकाभिख्यं विवेद ज्ञानचक्षुषा।।३४।।**

**अन्वयार्थ** : कलशोद्भव: = अगस्तीने, आगतं = आलेल्या, महासिद्धं = महासिद्ध अशा, तं = त्यांना, समीक्ष्य = पाहून, ज्ञानचक्षुषा = दिव्य दृष्टीने, रेणुकाभिख्यं = रेणुक नावाचे, गणेन्द्रं = गणेश्वर असल्याचे, विवेद = जाणिले.

**भावार्थ** : अगस्ती ऋषींनी आपल्या आश्रमात आलेल्या त्या महासिद्धाकडे पाहून ते रेणुकाचार्यनामक गणेश्वर आहेत, हे ज्ञानचक्षूंनी ओळखले.॥३४॥

**तस्यानुभावं विज्ञाय सहसैव समुत्थितः।**
**लोपामुद्राकरानीतैरुदकैरतिपावनैः ।।३५।।**
**पादौ प्रक्षालयामास स तस्य शिवयोगिनः।**

**अन्वयार्थ** : तस्य = त्याचा, अनुभावं = प्रभाव, विज्ञाय = जाणून, सहसैव = एकाएकी, समुत्थित: = उभा राहिला, आणि लोपामुद्रा = लोपामुद्रेच्या, कर = हाताने, आनीतै: = आणले गेलेल्या, अतिपावनै: = अत्यंत पावन अशा, उदकै: = पाण्याने, स: = त्याने, तस्य = त्या, शिवयोगिन: = शिवयोग्याचे, पादौ = दोन्ही चरण, प्रक्षालयामास = धुतले.

**भावार्थ** : अगस्ती ऋषी, रेणुकाचार्य येताच त्यांचा प्रभाव ओळखून आदराने उभे राहिले, त्यांना नमस्कार करून आसनावर बसविले आणि लोपामुद्रेने आणलेल्या अत्यंत पवित्र जलाने त्यांचे पादप्रक्षालन केले.॥३५॥



**संपूज्य तं यथाशास्त्रं तन्नियोगपुरस्सरम्।।३६।।**
**मुनिर्विनयसम्पन्नो निषसादासनान्तरे।**

**अन्वयार्थ** : यथाशास्त्रं = शास्त्रोक्त पद्धतीने, तं = त्याची, सम्पूज्य = पूजा करून, विनयसम्पन्न: = विनयशील, मुनि: = अगस्ती, तत् = त्याच्या, नियोगपुरस्सरम् = आज्ञेप्रमाणे, आसनान्तरे = दुसऱ्या आसनावर, निषसाद = बसला.

**भावार्थ** : नंतर त्या शिवयोग्याची त्यांनी शास्त्रोक्त पद्धतीने पूजा केली. आणि त्यांची आज्ञा घेऊन अत्यंत विनयाने ते दुसऱ्या आसनावर बसले.॥३६॥

**समासीनं मुनिवरं सर्वतेजस्विनां विभुम्।।३७।।**
**उवाच शान्तया वाचा रेवणः सिद्धशेखरः।**

**अन्वयार्थ** : सर्वतेजस्विनां = सर्वतेजस्वीमध्ये, विभुम् = श्रेष्ठ अशा, समासीनं = बसलेल्या, मुनिवरं = मुनिवर अगस्तीला, सिद्धशेखर: = सिद्धश्रेष्ठ असा, रेवण: = रेवण, शान्तया = प्रशांत अशा, वाचा = वाणीने, उवाच = म्हणाला.

**भावार्थ** : सर्व तेजस्वी ऋषींमध्ये श्रेष्ठ अशा त्या बसलेल्या अगस्ती ऋषीला उद्देशून सिद्धांचे मुकुटमणी असे रेणुकाचार्य शांत स्वरात म्हणाले.॥३७॥

**निर्विघ्नं वर्तसे किं नु नित्या ते नियमक्रिया।।३८।।**
**अथ वाऽगस्त्य तेजस्विन् कुतः स्युस्तेऽन्तरायकाः।**

**अन्वयार्थ** : निर्विघ्नं = विघ्नरहित असा, वर्तसे = तू आहेस ना? ते = तुझ्या, नियमक्रिया = नियमाने केल्या जाणाऱ्या क्रिया, नित्या किं नु = नित्य चालल्या आहेत ना? अथवा = अथवा, तेजस्विन् = तेजस्वी अशा, अगस्त्य = हे अगस्त्या, ते = तुला, अन्तरायका: = विघ्ने, कुत: = कोठून, स्यु: = होतील?

**भावार्थ** : हे अगस्ती महर्षे, तू कुशल आहेस ना? तुझी नित्यनियम-क्रिया पार पडते आहे ना? परंतु हे तेजस्वी अगस्त्या, तुझ्यावर विघ्ने कशी येतील बरे?॥३८॥

**विन्ध्यो निरुद्धो भवता विश्वोल्लङ्घनविभ्रमः ।।३९।।**
**नहुषो रोषलेशात् ते सद्यः सर्पत्वमागतः।**

**अन्वयार्थ** : विश्व = जगाला, उल्लङ्घन = उल्लंघन करण्याचा, विभ्रमः = भ्रम असलेला, विन्ध्यः = विंध्य पर्वत, भवता = तुझ्याकडून निरुद्धः = अडविला गेला, नहुषः = नहुष राजा, ते = तुझ्या, रोषलेषात् = किंचित रोषाने, सद्यः = तत्क्षणी, सर्पत्वम् = सर्परूप, आगतः = पावला.

**भावार्थ** : हे अगस्त्या, मेरूपर्वतापेक्षाही उंच होणाऱ्या ईर्षेने उंचच उंच वाढत जाणाऱ्या दुरभिमानी अशा विंध्यपर्वताला तू प्रतिबंध करून त्याला जमिनीवर आडवा घातलास. तसेच देवेंद्राचे स्थान मिळविलेल्या नहूष राजाने तुझा अपराध केल्यामुळे, तुझ्या अल्पशा रागाने तो लगेच सर्प झाला.।।३९।।

**आचान्ते भवता पूर्वं पङ्कशेषाः पयोधयः।।४०।।**
**जीर्णस्ते जाठरे वह्नौ दृप्तो वातापिदानवः।**

**अन्वयार्थ** : पूर्वं = पूर्वी, पयोधयः = सप्तसमुद्र, भवता = तुझ्याकडून, आचान्ताः = प्राशन केले गेले; पङ्कशेषाः = चिखलच शिल्लक राहील अशा प्रकारे, दृप्तः = उद्धट असा, वातापिदानवः = वातापी नावाचा राक्षस, ते = तुझ्या, जाठरे वन्हौ = जठराग्नीत, जीर्णः = जिरून गेला.

**भावार्थ** : हे अगस्त्या, पूर्वी तू सप्तसमुद्राचे एका आचमनातच प्राशन केल्यामुळे तेथे केवळ चिखलच शिल्लक राहिला. आणि पूर्वी तुझ्या पोटात शिरलेला वातापी दानव जठराग्नीत भस्म होऊन गेला.।।४०।।

**एवंविधानां चित्राणां सर्वलोकातिशायिनाम्।।४१।।**
**कृत्यानां तु भवान् कर्ता कस्तेऽगस्त्य समप्रभः।**

**अन्वयार्थ** : अगस्त्य = हे अगस्त्या, एवंविधानां = अशा प्रकारे, सर्वलोकातिशायिनाम् = सर्व लोकविलक्षण अशा, चित्राणां = चमत्कारिक, कृत्यानां = कार्यांचा, कर्ता = कर्ता, भवान् = तू आहेस, म्हणून ते = तुझ्या, समप्रभः = समान सामर्थ्य असणारा, कः = कोण आहे?



**भावार्थ** : हे अगस्त्या, अशा प्रकारची लोकविलक्षण आणि चमत्कारिक लीला करणारा तुझ्यासारखा प्रभावी असा दुसरा कोणी या जगात नाही.।।४१।।

**शिवाद्वैतपरानन्दप्रकाशनपरायणम् ।।४२।।**
**भवन्तमेकं शंसन्ति प्रकृत्या सङ्गवर्जितम्।**

**अन्वयार्थ** : भवन्तमेकं = तुला एकट्याला, शिवाद्वैत = शिवाद्वैत ज्ञानाने उत्पन्न झालेल्या, परानन्द = श्रेष्ठ अशा आनंदाचे, प्रकाशन = प्रकाशित करण्यात, परायणं = आसक्त असा; आणि प्रकृत्या = स्वभावाने, सङ्गवर्जितम् = संगरहित असा, म्हणून शंसन्ति = प्रशंसा करतात.

**भावार्थ** : हे अगस्त्या, शिवाद्वैत परिज्ञानाचा आनंद प्रकाशित करण्यात तत्पर आणि स्वभावतः सर्वसंगपरित्यागी असा एकमेव तूच आहेस, अशी तुझी प्रशंसा सर्व लोक करतात.।।४२।।

**पुरा हैमवतीसूनुरवदत् ते षडाननः।।४३।।**
**शिवधर्मोत्तरं नाम शास्त्रमीश्वरभाषितम्।**

**अन्वयार्थ** : पुरा = पूर्वी, हैमवती = पार्वतीचा, सूनुः = पुत्र अशा, षडाननः = षण्मुखाने, ते = तुला, ईश्वरभाषितं = ईश्वराने सांगितलेले, शिवधर्मोत्तरं = शिवधर्मोत्तर नावाचे, शास्त्रं = शास्त्र, अवदत् = उपदेशिले होते.

**भावार्थ** : हे अगस्त्या, पूर्वी पार्वतीपुत्र कार्तिकाने, शिवाने सांगितलेले शिवधर्मोत्तर नावाचे शास्त्र तुला उपदेशिले होते.।।४३।।

**भक्तिः शैवी महाघोरसंसारभयहारिणी।।४४।।**
**त्वया राजन्वती लोके जाताऽगस्त्य महामुने।**

**अन्वयार्थ** : अगस्त्य महामुने = हे अगस्ती महामुने, महाघोर = अत्यंत भयानक अशी, संसारभय = संसाराची भीती, हारिणी = दूर करणारी, शैवी = शिवाची, भक्तिः = भक्ती, लोके = जगात, त्वया = तुझ्याकडून, राजन्वती = प्रकाशित, जाता = झाली.

**भावार्थ** : हे अगस्त्या, महाघोर अशा संसाराची भीती दूर करणारी शिवभक्ती तुझ्यामुळेच या जगात प्रसिद्धीस आली.।।४४।।

**इति तस्य वचः श्रुत्वा सिद्धस्य मुनिपुङ्गवः ।।४५ ।।**
**गम्भीरगुणया वाचा बभाषे भक्तिपूर्वकम् ।**

**अन्वयार्थ** : मुनिपुङ्गवः = मुनिश्रेष्ठ अगस्ती, तस्य = त्या, सिद्धस्य = सिद्धाचे, इति = अशा प्रकारचे, वचः = बोलणे, श्रुत्वा = ऐकून, भक्तिपूर्वकं = भक्तीने, गम्भीरगुणया = गंभीर अशा, वाचा = वाणीने, बभाषे = बोलला.

**भावार्थ** : अशा प्रकारचे रेणुकसिद्धांचे बोलणे ऐकून ते ऋषिश्रेष्ठ अगस्ती भक्तियुक्त गंभीर वाणीने त्यांना म्हणू लागले.।।४५।।

**अहमेव मुनीन्द्राणां लालनीयोऽस्मि सर्वदा ।।४६ ।।**
**भवदागमसम्पत्तिर्मां विना कस्य संभवेत् ।**

**अन्वयार्थ** : भवदागमसम्पत्तिः = आपले आगमनरूपी संपत्ती, मां विना = माझ्या शिवाय, कस्य = कोणाला, सम्भवेत् = प्राप्त होईल? म्हणून, मुनीन्द्राणां = श्रेष्ठ मुनींमध्ये, सर्वदा = नेहमी, अहमेव = मी एकटाच, लालनीयः = प्रशंसनीय, अस्मि = आहे.

**भावार्थ** : हे आचार्यवरा, आपण माझ्या आश्रमात येऊन मला दर्शन दिले, या अन्य कोणा ऋषीला न मिळणाऱ्या सौभाग्यामुळे मीच एकटा सर्वऋषींमध्ये स्तुत्य आणि धन्य झालो आहे.।।४६।।

**स्थिरमद्य शिवज्ञानं स्थिरा मे तापसक्रिया ।।४७ ।।**
**भवद्दर्शनपुण्येन स्थिरा मे मुनिराजता ।**

**अन्वयार्थ** : भवद्दर्शन = आपल्या दर्शनाने उत्पन्न झालेल्या, पुण्येन = पुण्याने, अद्य = आज, मे = माझे, शिवज्ञानं = शिवज्ञान, स्थिरं = स्थिर झाले, मे = माझी, तापसक्रिया = तपश्चर्या, स्थिरा = स्थिर झाली, मे = माझे, मुनिराजता = मुनिसार्वभौमत्व, स्थिरा = स्थिर झाले.

**भावार्थ** : हे गणश्रेष्ठा, आपल्या दर्शनाच्या पुण्याईनेच आज माझे शिवज्ञान स्थिर झाले, माझ्या तपश्चर्येच्या सर्व क्रिया स्थिर झाल्या. आणि सर्वश्रेष्ठमुनी म्हणून माझी पदवीही स्थिर झाली.।।४७।।



**संसारसर्पदष्टानां मूर्च्छितानां शरीरिणाम् ।।४८ ।।**
**कटाक्षस्तव कल्याणं समुज्जीवनभेषजम् ।**

**अन्वयार्थ** : संसार = संसाररूपी, सर्प = सर्पाने, दष्टानां = दंशाने, मूर्च्छितानां = मूर्च्छित झालेल्या, शरीरिणाम् = जीवांना, तव = तुझा, कटाक्षः = कृपाकटाक्ष, कल्याणं = मंगलमय असा, समुज्जीवन = संजीवक, भोषजम् = औषध आहे.

**भावार्थ** : हे आचार्यवरा, तापत्रयात्मक संसाररूपी सर्पाच्या दंशाने मूर्च्छित झालेल्या प्राण्यांना आपला कृपाकटाक्ष म्हणजे कल्याणकारी संजीवनी औषधच आहे.।।४८।।

**समस्तलोकसन्दाहतापत्रयमहानलः ।।४९ ।।**
**त्वत्पदाम्बुजकणास्वादादुपशाम्यति देहिनाम् ।**

**अन्वयार्थ** : देहिनाम् = जीवांच्या संबंधी, समस्त = सर्व, लोक = लोकांना, संदाह = जाळणारे, तापत्रय = त्रितापरूपी, महानलः = महाअग्नी, त्वत् = तुझ्या, पादाम्बु = पादोदकाच्या, कण = कणाच्या, आस्वादात् = आस्वादाने, उपशाम्यति = शांत होतो.

**भावार्थ** : हे योगीवरा, सर्व लोकांतील जीवांना भाजणाऱ्या संसाराच्या तापत्रयरूपी महाअग्नीचा दाह आपल्या पादोदकाचा एक थेंबही प्राशन केल्यास शांत होतो.।।४९।।

**रेणुकं त्वां विजानामि गणनाथं शिवप्रियम् ।।५० ।।**
**अवतीर्णमिमां भूमिं मदनुग्रहकाङ्क्षया ।**

**अन्वयार्थ** : मदनुग्रह = माझ्यावर अनुग्रह करण्याच्या, काङ्क्षया = इच्छेने, इमां = ह्या, भूमिं = भूमीवर, अवतीर्णं = अवतार घेतलेले, शिवप्रियं = शिवाला प्रिय असणारा, गणनाथं = गणांचा नाथ, अशा, त्वां = तुला, रेणुकं = रेणुक म्हणून, विजानामि = मी जाणतो.

**भावार्थ** : हे गणश्रेष्ठा, शिवाच्या अत्यंत प्रेमास पात्र झालेले, गणांचे नाथ असे आपण रेणुकाचार्य आहात आणि माझ्यावर अनुग्रह करण्यासाठी आपण भूमीवर अवतरला आहात, हे मी जाणतो.।।५०।।

**भवादृशानां सिद्धानां प्रबोधध्वस्तजन्मनाम्।।५१।।**
**प्रवृत्तिरीदृशी लोके परानुग्रहकारिणी।**

**अन्वयार्थ** : प्रबोध = ज्ञानाने, ध्वस्त = उध्वस्त, जन्मनाम् = जन्म असणाऱ्या, भवादृशानां = आपल्यासारख्या, सिद्धानां = सिद्धांची, ईदृशी = अशा प्रकारची, प्रवृत्तिः = प्रवृत्ती, लोके = प्रपंचात, परानुग्रहकारिणी = अन्यावर अनुग्रह करणारी असते.

**भावार्थ** : हे योगीश्वरा, शिवज्ञानामुळे जन्ममरण चुकलेले आणि सर्व सिद्धी प्राप्त झालेले आपणांसारखे योगीश्वर लोकांवर अनुग्रह करण्यासाठीच पृथ्वीवर संचार करतात.।।५१।।

**त्वन्मुखाच्छ्रोतुमिच्छामि सिद्धान्तं श्रुतिसंमतम्।।५२।।**
**सर्वज्ञ वद मे साक्षाच्छैवं सर्वार्थसाधकम्।**
**सद्यः सिद्धिकरं पुंसां सर्वयोगीन्द्रसेवितम्।।५३।।**
**दुराचारैरनाघ्रातं स्वीकृतं वेदवेदिभिः।**
**शिवात्मैक्यमहाबोधसम्प्रदायप्रवर्तकम्।।५४।।**

**अन्वयार्थ** : सर्वज्ञः = हे सर्वज्ञा, श्रुतिसम्मतम् = वेदांना संमत असणारा, सर्वार्थसाधकं = सकल पुरुषार्थसाधक असा, शैवं = शिवासंबंधी, पुसां = मानवांना, सद्यः = तत्काल, सिद्धिकरं = सिद्धी देणारा, सर्वयोगीन्द्र = सर्वयोगि-श्रेष्ठांकडून, सेवितं = स्वीकारला गेलेला, दुराचारैः = दुराचाऱ्यांनी, अनाघ्रातं = वासही न घेतलेला, वेदवेदिभिः = वेद जाणणाऱ्यांनी, स्वीकृतं = स्वीकारलेला, शिवात्मैक्य = शिवजीवैक्यरूपी, महाबोध = महाज्ञानाच्या, सम्प्रदाय = संप्रदायाचे, प्रवर्तकं = प्रवर्तन करणारा, सिद्धान्तं = सिद्धान्त, त्वन्मुखात् = तुझ्या मुखाने, श्रोतुमिच्छामि = ऐकू इच्छितो, मे = मला, साक्षात् = स्वतः, वद सांग.

**भावार्थ** : हे सर्वज्ञा, दुराचारी, नास्तिक व पाखंडी मतांच्या लोकांचा ज्याला स्पर्शही झालेला नाही व वैदिकांनी ज्याचा स्वीकार केला आहे, तो सर्वार्थसाधक असून जो योगिश्रेष्ठांना मनापासून आवडतो आणि जगातील सर्व प्राणिमात्रांचे मनोरथ ज्याच्यामुळे तत्काल पूर्ण होतात असे



शिवजीवैक्यमहाज्ञान शिकविणाऱ्या वीरशैव सिद्धान्ताचा बोध मी प्रत्यक्ष आपल्या तोंडून ऐकू इच्छितो. तरी आपण कृपा करून मला त्याला उपदेश करावा.।।५२-५४।।

**उक्त्वा भवान् सकललोकमहोपकारं**
**सिद्धान्तसंग्रहमनादृतबाह्यतन्त्रम् ।**
**सद्यः कृतार्थयितुमर्हति दिव्ययोगिन्**
**नानागमश्रवणवर्तितसंशयं माम्।।५५।।**

**अन्वयार्थ** : दिव्ययोगिन् = हे दिव्य योगी, अनादृतबाह्यतन्त्रम् = वेदबाह्य तंत्रांचा अनादर करणारा, सकललोक = सकल प्राण्यांवर, महोपकारं = महान उपकार करणारा, सिद्धान्तसंग्रहं = आगमांचा संग्रह, उक्त्वा = सांगून, नानागम = अनेक आगमांच्या, श्रवणवर्तित = ऐकण्याने प्राप्त झालेल्या, संशयं = संशयी अशा, माम् = मला, भवान् = आपण, सद्यः = तत्काल, कृतार्थयितुं = कृतार्थ करण्यास, अर्हति = योग्य आहात.

**भावार्थ** : महायोगी अशा हे रेणुकाचार्या, अनेक आगमांचे अध्ययन करून माझ्या मनात अनेक शंका निर्माण झाल्या आहेत. तरी वेदांना संमत आणि नास्तिक मतांचे खंडन करणाऱ्या, जगातील सर्व लोकांचे कल्याण करणाऱ्या अशा शिवसिद्धान्तशास्त्राचा उपदेश करून, माझ्या सर्व शंकांचे निरसन करून मला त्वरित कृतार्थ करावे.।।५।।

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां***
***शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये***
***श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ***
***श्रीरेणुकागस्त्यसम्भाषणप्रसङ्गोनाम***
***चतुर्थः परिच्छेदः।***

**चौथा परिच्छेद समाप्त.**

❍❍❍

# पाचवा परिच्छेद

### श्रीरेणुकाचार्यां कडून अगस्ती ऋषींना तत्त्वोपदेश

**अथागस्त्यवचः श्रुत्वा रेणुको गणनायकः।**
**ध्यात्वा क्षणं महादेवं साम्बमाह समाहितः।।१।।**

**अन्वयार्थ** : अथ = त्यानंतर, अगस्त्य = अगस्ती मुनींचे, वचः = वचन, श्रुत्वा = ऐकून, गणनायकः = गणांचा नायक असा, रेणुकः = रेणुक, क्षणं = क्षणकाल, समाहितः = शांतचित्त होऊन, साम्बं = अंबेसहित, महादेवं = शिवाचे, ध्यात्वा = ध्यान करून, आह = म्हणाले.

**भावार्थ** : तिन्ही लोकांची जननी, प्रणवरूपिणी, स्वसमवेत, चित्क्रियासामरस्यस्वरूप अशी चिदंबरशक्ती आणि तिच्यासह असलेले लीलाविजिगीषु, गुणरत्नाकर, परब्रह्मरूपी ज्योतिर्लिंग शिव यांचे ध्यान करून स्थिरचित्ताने श्रीरेणुकाचार्य अगस्तीऋषींच्या प्रश्नाला उत्तर देतात.।।१।।

**अगस्त्य मुनिशार्दूल समस्तागमपारग।**
**शिवज्ञानकरं वक्ष्ये सिद्धान्तं शृणु सादरम्।।२।।**

**अन्वयार्थ** : समसस्तागम = सर्व आगमांत, पारग = पारंगत, मुनिशार्दूल = मुनिश्रेष्ठ अशा, अगस्त्य = हे अगस्ती, शिवज्ञानकरं = शिवाचे ज्ञान करून देणारा, सिद्धान्तं = सिद्धान्त, वक्ष्ये = सांगतो, सादरम् = आदरपूर्वक, शृणु = ऐक.

**भावार्थ** : सकल निगमागमांत पारंगत व शिवशास्त्रावर प्रभुत्व असलेल्या हे मुनिश्रेष्ठ अगस्त्या, शिवाद्वैताचे ज्ञान प्रकाशित करणारे असे जे शिवसिद्धान्तशास्त्र मी सांगणार आहे ते तू आदराने ऐक.।।२।।

**अगस्त्य खलु सिद्धान्ता विख्याता रुचिभेदतः।**
**भिन्नाचारसमायुक्ता भिन्नार्थप्रतिपादकाः।।३।।**

**अन्वयार्थ** : अगस्त्य = हे अगस्ती, खलु = निश्चयाने, रुचिभेदतः = रुचिभेदानुसार, भिन्नाचारसमायुक्ताः = विभिन्न आचारांनी युक्त, भिन्नार्थप्रतिपादकाः =



भिन्न-भिन्न अर्थ प्रतिपादन करणारे, सिद्धान्ताः = सिद्धान्त, विख्याताः = प्रसिद्ध झालेले आहेत.

**भावार्थ** : हे अगस्त्या, कपिल, पतंजली आदी ऋषींनी आपापल्या रुचिभेदानुसार सांगितलेले, भिन्न-भिन्न अर्थ प्रतिपादन करणारे आणि भिन्न आचारांनी युक्त असे अनेक सिद्धान्त प्रसिद्धच आहेत.।।३।।

**सांख्यं योगः पाञ्चरात्रं वेदाः पाशुपतं तथा।**
**एतानि मानभूतानि नोपहन्यानि युक्तिभिः।।४।।**

**अन्वयार्थ** : साङ्ख्यं = सांख्य, योगः = योग, पाञ्चरात्रं = वैष्णव सिद्धान्त, पाशुपतं = पाशुपत शास्त्र, वेदाः = वेद, एतानि = हे, मानभूतानि = प्रमाणभूत आहेत, म्हणून, युक्तिभिः = युक्तीने, नोपहन्यानि = ते खंडिले जाऊ नयेत.

**भावार्थ** : कपिल महर्षींचे सांख्यशास्त्र, महर्षी पतंजलीचे योगशास्त्र, वासुदेवाने उपदेशिलेला पांचरात्ररूपी वैष्णव सिद्धान्त, शिवाने रचिलेले पाशुपतशास्त्र आणि जैमिनीचे पूर्वमीमांसा शास्त्र हे सर्व वेदप्रमाणित असल्यामुळे त्याचे युक्तिवादाने कोणी खंडन करू नये.।।४।।

**वेदः प्रधानं सर्वेषां सांख्यादीनां महामुने।**
**वेदानुसरणादेषां प्रामाण्यमिति निश्चितम्।।५।।**

**अन्वयार्थ** : महामुने = हे अगस्ती महर्षी, सर्वेषां = ह्या सर्व, सांख्यादीनां = सांख्यादी शास्त्रांना, वेदः = वेदच, प्रधानं = मूळ आहेत, वेदानुसरणात् = वेदांचे अनुसरण करीत असल्यामुळे, एषां = ह्यांचे, प्रामाण्यं = प्रामाण्य, निश्चितं = निश्चित आहे.

**भावार्थ** : हे महामुने, सांख्यादी साही शास्त्रे अपौरुषेय वेदांना प्रमाण मानतात. आणि ती वेदांच्या आधाराने आपल्या विषयांचे प्रतिपादन करतात, म्हणून वेद हे मुख्य प्रमाण व शास्त्रे ही उपप्रमाण होत.।।५।।

**पाञ्चरात्रस्य सांख्यस्य योगस्य च तथा मुने।**
**वेदैकदेशवर्तित्वं शैवं वेदमयं मतम्।।६।।**

**अन्वयार्थ** : मुने = हे महर्षी, पाञ्चरात्रस्य = पांचरात्राचे, सांख्यस्य = सांख्याचे, च = आणि, योगस्य = योगशास्त्राचे, वेदैकदेशवर्तित्वं = वेदांच्या एखाद्याच भागाला मानणारे, मतं = मत आहे तर, शैवं = शैव सिद्धान्त, वेदमयं मतम् = संपूर्ण वेदाला मानणारे आहे.

**भावार्थ** : हे मुने, सांख्यादी शास्त्रे ही वेदांच्या काही थोड्या भागास अनुसरून आहेत, सर्वथैव वेदांस अनुसरून नाहीत. तशी शैवशास्त्राची स्थिती नसून ते सर्वतोपरी वेदमय, वेदस्वरूप असल्याचे निगमागमज्ञात्यांनी मान्य केले आहे.॥६॥

**वेदैकदेशवर्तिभ्यः सांख्यादिभ्यो महामुने।**
**सर्ववेदानुसारित्वाच्छैवतन्त्रं विशिष्यते।।७।।**

**अन्वयार्थ** : महामुने = हे महामुनी, वेदैकदेशवर्तिभ्यः = वेदाच्या एका भागाला मानणाऱ्या, सांख्यादिभ्यः = सांख्यादी शास्त्रांपेक्षा, सर्ववेदानुसारित्वात् = सर्ववेदांना अनुसरून असणारा, शैवतन्त्रं = शैव सिद्धान्त, विशिष्यते = आपल्या वैशिष्ट्याने निराळा आहे.

**भावार्थ** : हे महामुने, वेदांच्या काही भागास अनुसरणाऱ्या सांख्यादी शास्त्रापेक्षा वेदांचे संपूर्ण अनुसरण करणारे शैवशास्त्र वेदमय असून ते सर्व शास्त्रांमध्ये अग्रगण्य मानले गेले आहे.॥७॥

**शैवतन्त्रमिति प्रोक्तं सिद्धान्ताख्यं शिवोदितम्।**
**सर्ववेदार्थरूपत्वात् प्रामाण्यं वेदवत् सदा।।८।।**

**अन्वयार्थ** : शिवोदितं = शिवप्रणीत असे, शैवतन्त्रं = शैवशास्त्र, सिद्धान्ताख्यं = सिद्धान्त या नावाने, प्रोक्तं = ओळखले जाते, सर्ववेदार्थ-रूपत्वात् = संपूर्ण वेदांचा अर्थरूप असल्यामुळे ते, वेदवत् = वेदासारखे, सदा = नेहमी, प्रामाण्यं = प्रमाणभूत, मानले जाते.

**भावार्थ** : हे मुनिश्रेष्ठा, शिवाने उपदेशिलेले शैवशास्त्र सिद्धान्त या नावाने ओळखले जाते. ते संपूर्ण वेदांच्या अर्थाचे प्रतिपादन करीत असल्यामुळे त्याला वेदांइतकेच प्रमाणभूत मानले जाते.॥८॥



**आगमा बहुधा प्रोक्ताः शिवेन परमात्मना।**
**शैवं पाशुपतं सोमं लाकुलं चेति भेदतः।।९।।**

**अन्वयार्थ** : परमात्मना = महान् आत्मा अशा, शिवेन = शिवाकडून, शैवं = शैव, पाशुपतं = पाशुपत, सोमं = सोम, च = आणि, लाकुलं = लाकुल अशा, भेदतः = भेदांनी, आगमाः = आगम, बहुधा = अनेक प्रकारचे, प्रोक्ताः = सांगितले गेले आहेत.

**भावार्थ** : सर्वज्ञ परशिवाने सांगितलेले आगम अनेक आहेत. त्यांचे शैव, पाशुपत, सोम आणि लाकुल असे चार भेद आहेत.॥९॥

**तेषु शैवं चतुर्भेदं तन्त्रं सर्वविनिश्चितम्।**
**वामं च दक्षिणं चैव मिश्रं सिद्धान्तसंज्ञकम्।।१०।।**

**अन्वयार्थ** : तेषु = त्यात, शैवं तन्त्रं = शैवागम, वामं = वाम, च = आणि, दक्षिणं = दक्षिण, मिश्रं = मिश्र, चैव = तसेच, सिद्धान्तसंज्ञकम् = सिद्धान्त अशा नावाने, चतुर्भेदं = चार भेद आहेत, असे, सर्वविनिश्चितम् = सर्वांकडून निश्चित केले गेले आहे.

**भावार्थ** : त्या आगमांचे वाम, दक्षिण, मिश्र व सिद्धान्त असे चार भेद विद्वानांनी मानले आहेत.॥१०॥

**शक्तिप्रधानं वामाख्यं दक्षिणं भैरवात्मकम्।**
**सप्तमातृपरं मिश्रं सिद्धान्तं वेदसंमतम्।।११।।**

**अन्वयार्थ** : वामाख्यं = वाम शैव, शक्तिप्रधानं = शक्तीला प्राधान्य देणारे, दक्षिणं = दक्षिण शैव, भैरवात्मकम् = भैरवाला प्राधान्य देणारे, मिश्रं = मिश्र शैव, सप्तमातृपरं = सप्तमातृकांना प्राधान्य देणारे, सिद्धान्तं = सिद्धान्त शैव, वेदसम्मतम् = वेदांना मान्य असणारे आहे.

**भावार्थ** : वाम नामक शैवतंत्र शक्तीची उपासना करणारे, दक्षिण नामक शैवतंत्र भैरवाची उपासना करणारे, मिश्र नामक शैवतंत्र सप्तमातृकांची (ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वराही, इंद्राणी आणि चामुण्डा) उपासना

करणारे आणि सिद्धान्त नामक शैवतंत्र शिवाची उपासना करणारे असून ते वेदानुसारी व वेदमय आहे. अन्य तीन तंत्रे वेदानुसारी नाहीत.॥११॥

**वेदधर्माभिधायित्वात् सिद्धान्ताख्यः शिवागमः।**
**वेदबाह्यविरोधित्वाद् वेदसंमत उच्यते।।१२।।**

**अन्वयार्थ** : सिद्धान्ताख्यः = सिद्धान्त नावाचा, शिवागमः = शिवागम, वेदधर्माभिधायित्वात् = वेदोक्त धर्माचा प्रतिपादक असल्यामुळे, वेदबाह्यविरोधित्वाद् = वेदविरोधी अशा चार्वाकादी सिद्धान्ताचा विरोध करीत असल्यामुळे, वेदसम्मतः = वेदसंमत, उच्यते = म्हणविला जातो.

**भावार्थ** : वेदांमध्ये भस्म-रुद्राक्ष-लिंगधारणादी धर्म प्रतिपादन केला असल्यामुळे व त्या वेदांप्रमाणेच सिद्धान्त नामक शैवतंत्रही भस्म-रुद्राक्ष-लिंग-धारणादी विषयांना प्राधान्य देऊन भक्तीला उत्तेजन देणारे असे सरस निरूपण केले आहे, या शिवाय वेदविरोधी असलेल्या चार्वाक, बौद्धादी नास्तिक मतांचे खंडन करून शैवसिद्धान्ताचे सप्रमाण, सयुक्तिक मंडन केलेले आहे, म्हणून सिद्धान्त नामक शिवागम वेदसंमत आहे.॥१२॥

**वेदसिद्धान्तयोरैक्यमेकार्थप्रतिपादनात् ।**
**प्रामाण्यं सदृशं ज्ञेयं पण्डितैरेतयोः सदा।।१३।।**

**अन्वयार्थ** : वेदसिद्धान्तयोः = वेद आणि सिद्धान्तशास्त्रांत, एकार्थप्रतिपादनात् = एकच विषय प्रतिपादिलेला असल्यामुळे, ऐक्यम् = त्यांच्यात एकत्व आहे, पण्डितैः = पंडितांकडून, एतयोः = या दोहोंचे, प्रामाण्यं = प्रामाण्य, सदा = नेहमी, सदृशं = समान रूपाने, ज्ञेयम् = समजले जाते.

**भावार्थ** : वेद आणि शैवसिद्धान्त यात समान विषय प्रतिपादिलेले आहेत. वीरागमानुसार 'सर्व वेदांनी जे जे सांगितले आहे ते ते सर्व शिवागमांत आहे'. वेद आणिशैव-सिद्धान्त समान अर्थाचे प्रतिपादन करती असल्यामुळे विद्वानांनी सिद्धान्त-आगमांना वेदांप्रमाणेच प्रमाण मानले आहे.॥१३॥

**सिद्धान्ताख्ये महातन्त्रे कामिकाद्ये शिवोदिते।**
**निर्दिष्टमुत्तरे भागे वीरशैवमतं परम्।।१४।।**



**अन्वयार्थ** : शिवोदिते = शिवाकडून उपदेशिला गेलेल्या, कामिकाद्ये = कामिकादी वातुलान्त अशा, सिद्धान्ताख्ये = सिद्धान्त नावाच्या, महातन्त्रे = महातंत्राच्या, उत्तरे भागे = उत्तर भागात (शेवटी), परं = श्रेष्ठ असे, वीरशैवमतं = वीरशैव मत, निर्दिष्टम् = निर्देशिलेले आहे.

**भावार्थ** : शिवाने उपदेशिलेले कामिकापासून वातुलापर्यंत असलेल्या अठ्ठावीस शिवागमांना 'सिद्धान्त' नामक महातंत्र म्हणतात, त्याच्या उत्तरभागात सर्वश्रेष्ठ वीरशैव मताचे प्रतिपादन असून पूर्वभागात शैवमताचे विवरण आहे.॥१४॥

**विद्यायां शिवरूपायां विशेषाद् रमणं यतः।**
**तस्मादेते महाभागा वीरशैवा इति स्मृताः।।१५।।**

**अन्वयार्थ** : शिवरूपायां = शिवस्वरूप अशा, विद्यायां = विद्येत, यतः = ज्यामुळे, विशेषात् = विशेष रूपाने, रमणं = रमतात, तस्मात् = त्यामुळे, एते = हे, महाभागाः = भाग्यशाली लोक, वीरशैवाः = वीरशैव, इति = या (नावाने), स्मृताः = ओळखले जातात.

**भावार्थ** : त्या शिवस्वरूपी विद्येत विशेषत्वाने रमणारे, रस घेणारे असे जे महाभाग, त्यांना 'वीरशैव' असे म्हणतात.॥१५॥

**वीशब्देनोच्यते विद्या शिवजीवैक्यबोधिका।**
**तस्यां रमन्ते ये शैवा वीरशैवास्तु ते मताः।।१६।।**

**अन्वयार्थ** : वीशब्देन = वी शब्दाने, शिवजीवैक्यबोधिका = शिव आणि जीव यांच्या ऐक्याचे ज्ञान करून देणारी, विद्या = विद्या (म्हणून), उच्यते = म्हटली जाते, तस्यां = तिच्यात, ये = जे, शैवाः = शिवभक्त, रमन्ते = रमतात, ते = ते, वीरशैवाः = वीरशैव, तु = असे, मताः = ओळखले जातात.

**भावार्थ** : 'वी' शब्दाचा अर्थ विद्या, आणि 'र' शब्दाचा अर्थ रमणारे असे विद्वानांचे सांगणे आहे. जी विद्या शिव (लिंग) आणि जीव (अंग) यांच्या ऐक्याचे ज्ञान करून देणारी आहे, त्या विद्येत जे शिवभक्त लोक रमतात, सुख मानतात ते वीरशैव होत.॥१६॥

**विद्यायां रमते यस्मान्मायां हेयां श्ववद्रहेत्।**
**अनेनैव निरुक्तेन वीरमाहेश्वरः स्मृतः।।१७।।**

**अन्वयार्थ** : यस्मात् = ज्या कारणाने, विद्यायां = विद्येत, रमते = रमण करतो, हेयां = तुच्छ अशा, मायां = मायेचा, श्ववत् = कुत्र्यासारखा, रहेत् = त्याग करतो, अनेनैव = ह्याच, निरुक्तेन = (निर्वचनाने) अर्थाने, वीरमाहेश्वर: = वीर माहेश्वर, स्मृत: = ओळखला जातो.

**भावार्थ** : शिवजीवैक्यबोधक विद्येमध्ये जे रममाण होतात आणि संसाररूपी मायेला श्वान समजून तिचा त्याग करतात त्यांना 'वीरमाहेश्वर' या अन्वर्थक नावाने संबोधिले जाते.॥१७॥

**वेदान्तजन्यं यज्ज्ञानं विद्येति परिकीर्त्यते।**
**विद्यायां रमते तस्यां वीर इत्यभिधीयते।।१८।।**

**अन्वयार्थ** : वेदान्तजन्यं = उपनिषदोत्पन्न असे, यत् = जे, ज्ञानं = ज्ञान आहे, त्याला, विद्येति = विद्या असे, परिकीर्त्यते = म्हटले जाते, तस्यां = त्या, विद्यायां = विद्येत, य: = जो, रमते = आनंद पावतो, स: = तो, वीर: = वीर, इति = असे, अभिधीयते = म्हणविला जातो.

**भावार्थ** : उपनिषदांच्या अध्ययनाने प्राप्त होणाऱ्या शिवजीवैक्यबोधक ज्ञानाला विद्या असे म्हणतात व त्या विद्येत रमणाऱ्यांना वीर असे म्हणतात.॥१८॥

**शैवैर्माहेश्वरैश्चैव कार्यमन्तर्बहिःक्रमात्।**
**शिवो महेश्वरश्चेति नात्यन्तमिह भिद्यते।।१९।।**

**अन्वयार्थ** : शैवै: = वीरशैवांकडून, च = आणि, माहेश्वरै: = वीरमाहेश्वरांकडून, कार्यं = केली जाण्यायोग्य लिंगपूजा, क्रमात् = क्रमाने, अन्त: = अंतरंगाची, बहि: = बहिरंगाची (अशी समजावी), शिव: = शिव, महेश्वर: = महेश्वर, इति = असा, इह = या जगात, अत्यन्तं = अत्यंत असा, न भिद्यते = भेद नसतो.

**भावार्थ** : वीरशैव व वीरमाहेश्वर या दोघांच्या क्रियेमध्ये भेद आहे. तो असा की, वीरशैव आंतरक्रियेवर भर देतात तर वीरमाहेश्वर बाह्यक्रियेवर भर देतात. दोघांच्या क्रियेत भेद दिसून येत असला तरी वस्तुत: दोघांची लिंगार्चना



एकच असते. जसे निष्कल-शिव आणि महेश्वर-सकल-सदाशिव ही एकाच परशिवाची रूपे आहेत, तशी त्यांच्या उपासकांची नावे भिन्न असली तरी त्यांच्या उपासनेचे लक्ष्य एकच आहे.॥१९॥

**यथा तथा न भिद्यन्ते शैवा माहेश्वरा अपि।**
**शिवाश्रितेषु ते शैवा ज्ञानयज्ञरता नराः।।२०।।**
**माहेश्वराः समाख्याताः कर्मयज्ञरता भुवि।**
**तस्मादाभ्यन्तरे कुर्युः शैवा माहेश्वरा बहिः।।२१।।**

**अन्वयार्थ** : यथा = ज्या प्रकारे, तथा = त्या प्रकारे, शैवा: = वीरशैव, अपि = आणि, माहेश्वरा: = वीरमाहेश्वर, न भिद्यन्ते = यांच्यात भेद असत नाही, शिवाश्रितेषु = शिवाला आश्रित असणाऱ्यांमध्ये (शिवभक्तांमध्ये), ज्ञानयज्ञरता: = ज्ञान यज्ञात तत्पर, नरा: = जे लोक आहेत, ते = ते, शैवा: = वीरशैव आहेत, कर्मयज्ञरता: = कर्मयज्ञात तत्पर असणारे लोक, भुवि = भूलोकात, माहेश्वरा: = माहेश्वर नावाने, समाख्याता: = प्रसिद्ध आहेत. तस्मात् = म्हणून, शैवा: = वीरशैवांनी, अभ्यन्तरे = अंतरंगात, माहेश्वरा: = माहेश्वरांनी, बहि: = बहिरंगात, कुर्यु: = (पूजा) केली पाहिजे.

**भावार्थ** : ज्या प्रकारे शिव आणि महेश्वर यांच्यात भेद नाही, तसे वीरशैव आणि वीरमाहेश्वर यांच्यामध्ये भेद असत नाही. शिवभक्त असणारे वीरशैव आणि वीरमाहेश्वर यांपैकी वीरशैव हे ज्ञानयज्ञ करणारे तर वीरमाहेश्वर हे कर्मयज्ञ करणारे होत, अशी भूलोकात प्रसिद्धी आहे. म्हणून वीरशैवांनी अंतरंगात आणि वीरमाहेश्वरांनी बहिरंगात पूजा करावी. वीरशैव सिद्धान्तात ज्ञान आणि कर्म या दोहोंना समान मान्यता आहे. म्हणून ज्ञानयज्ञरत वीरशैवांनी बहिरंगात इष्टलिंगाचीही पूजा केली पाहिजे आणि कर्मयज्ञरत वीरमाहेश्वरांनी अंतरंगात चिल्लिंगाचीही पूजा केली पाहिजे.॥२०-२१॥

**वीरशैवाः षड्भेदाः**

**वीरशैवास्तु षड्भेदाः स्थलधर्मविभेदतः।**
**भक्तादिव्यवहारेण प्रोच्यन्ते शास्त्रपारगैः।।२२।।**

**अन्वयार्थ** : स्थलधर्मविभेदत: = स्थलातील आचारभेदांमुळे, भक्तादि-व्यवहारेण = भक्तादिव्यवहाराने, वीरशैवा: = वीरशैवांचे, षड्भेदा: = सहा प्रकार, शास्त्रापारगै: = शास्त्रज्ञांकडून, प्रोच्यन्ते = सांगितले गेले आहेत.

**भावार्थ** : स्थलभेद, आचरणभेद आणि अंतर्बाह्य लिंगार्चन यांच्या वैविध्याने वीरशैवांचे सहा भेद होतात, असे शास्त्रपारंगत विद्वानांनी सांगितले आहे.॥२२॥

**शास्त्रं तु वीरशैवानां षड्विधं स्थलभेदत:।**
**धर्मभेदसमायोगाद् अधिकारिविभेदत:॥२३॥**

**अन्वयार्थ** : वीरशैवानां = वीरशैवांचे, शास्त्रं = शास्त्र, स्थलभेदत: = स्थलांच्या भेदाने, धर्मभेदसमायोगात् = धर्माचरणभेदांमुळे, आणि अधिकारि-विभेदत: = अधिकारी साधकांच्या भेदांमुळे, षड्विधम् = सहा प्रकार आहेत.

**भावार्थ** : वीरशैवांचे शास्त्र अन्य शास्त्रांपेक्षा वैशिष्ट्यपूर्ण आहे. षट्-स्थलांच्या भेदामुळे, त्यात वर्णिलेल्या धर्माचरणसंबंधामुळे, स्थलाला अनुसरून असलेल्या धर्मविधिसंबंधामुळे आणि स्थलनिष्ठ भक्तादी अधिकार-भेदांमुळे वीरशैव मतात वरील प्रमुख सहा स्थले मानतात. प्रत्येक शास्त्राच्या आरंभी अनुबंधचतुष्टय सांगणे आवश्यक असते, तसे येथे वीरशैव धर्मात निष्ठा असलेला व मुक्तीची अपेक्षा बाळगणारा शिवभक्त 'अधिकारी', ज्ञानाला शास्त्राद्वारे मिळणारा प्रकाश्य-प्रकाशक-भाव हा 'संबंध', एकशे एक स्थलांचे ज्ञान होणे हा 'विषय' आहे. असे वीरशैवसिद्धान्त-शास्त्रातील अनुंबधचतुष्टय समजावे.॥२३॥

**आदौ भक्तस्थलं प्रोक्तं ततो माहेश्वरस्थलम्।**
**प्रसादिस्थलमन्यत्तु प्राणलिङ्गिस्थलं तत:॥२४॥**
**शरणस्थलमाख्यातं षष्ठमैक्यस्थलं मतम्।**

**अन्वयार्थ** : आदौ = पहिले, भक्तस्थलं = भक्तस्थल, प्रोक्तं = सांगितले आहे, तत: = त्यानंतर, माहेश्वरस्थलं = माहेश्वर स्थल, अन्यत् तु = त्यानंतर, प्रसादिस्थलं = प्रसादिस्थल, तत: = त्यानंतर, प्राणलिङ्गस्थलं = प्राणलिंगी स्थल, त्यानंतर, शरणस्थलमाख्यातं = शरणस्थल सांगितले आहे, षष्ठं = सहावे, ऐक्यस्थलं = ऐक्यस्थल, मतम् = संमत आहे.



**भावार्थ** : उपरोक्त स्थलांचा क्रम असा - प्रथमस्थल हे भक्तस्थल, दुसरे माहेश्वर, तिसरे प्रसादी, चौथे प्राणलिंगी, पाचवे शरण आणि सहावे ऐक्य, अशी ही सहा स्थले होत.॥२४॥

**अंगस्थलान्तर्गत**

**भक्तस्थलम्**

**भक्तस्थलं प्रवक्ष्यामि प्रथमं कलशोद्भव॥२५॥**
**तदवान्तरभेदांश्च समाहितमना: शृणु।**

**अन्वयार्थ** : कलशोद्भव = हे कलशसंभूत अगस्ती, प्रथमं = पहिले, भक्तस्थलं = भक्तस्थल, च = आणि, तदवान्तरभेदात् = त्याचे अवांतर भेद, प्रवक्ष्यामि = सांगतो, समाहितमना: = स्वस्थ चित्ताने, शृणु = ऐक.

**भावार्थ** : हे अगस्त्या, आता उद्दिष्ट सहा स्थलांपैकी प्रथम असणाऱ्या भक्तस्थलासह त्याचे अवांतर पिंडस्थलादी भेद कोणते ते सांगेन. तू नीट लक्ष देऊन ऐक.॥२५॥

**शैवी भक्ति: समुत्पन्ना यस्यासौ भक्त उच्यते॥२६॥**
**तस्यानुष्ठेयधर्माणामुक्तिर्भक्तस्थलं मतम्।**

**अन्वयार्थ** : यस्य = ज्याच्या ठिकाणी, शैवी = शिवाविषयी, भक्ति: = भक्ती, समुत्पन्ना = उत्पन्न झालेली आहे, असौ = त्याला, भक्त: = भक्त असे, उच्यते = म्हटले जाते. तस्य = त्याच्या, अनुष्ठेयधर्माणाम् = अनुष्ठान करण्या-योग्य धर्माचरणाचे, उक्ति: = सांगणे, भक्तस्थलं = भक्तस्थल, मतम् = होय.

**भावार्थ** : ज्यांच्या मनात शिवाविषयी भक्ती उत्पन्न झाली आहे, त्याला शिवभक्त असे म्हणतात. त्या भक्ताने आचरावेत अशा धर्माचरणांचे प्रतिपादन केलेले स्थल म्हणजे भक्तस्थल होय.॥२६॥

**अवान्तरस्थलान्यत्र प्राहु: पञ्चदशोत्तमा:॥२८॥**
**पिण्डता पिण्डविज्ञानं संसारगुणहेयता।**

**दीक्षा लिङ्गधृतिश्चैव विभूतेरपि धारणम्।।२८।।**
**रुद्राक्षधारणं पश्चात् पञ्चाक्षरजपस्तथा।**
**भक्तमार्गक्रिया चैव गुरोर्लिङ्गस्य चार्चनम्।।२९।।**
**जङ्गमस्य तथा ह्येषां प्रसादस्वीकृतिस्तथा।**
**अत्र दानत्रयं प्रोक्तं सोपाधि निरुपाधिकम्।।३०।।**
**सहजं चेति निर्दिष्टं समस्तागमपारगैः।**
**एतानि शिवभक्तस्य कर्तव्यानि प्रयत्नतः।।३१।।**

**अन्वयार्थ** : अत्र = येथे, पञ्चदश = पंधरा, अवान्तरस्थलानि = अवांतर स्थले, उत्तमाः = श्रेष्ठ आचार्यांनी, प्राहुः = सांगितली आहेत, ती म्हणजे, पिण्डता = पिंडस्थल, पिण्डविज्ञानं = पिंडज्ञानस्थल, संसारगुणहेयता = संसार-हेयस्थल, दीक्षा = गुरु-कारुण्यस्थल, लिङ्गधृतिः = लिंगधारणस्थल, विभूतेरपि धारणम् = विभूतिधारणस्थल, चैव = तसेच, रुद्राक्षधारणं = रुद्राक्षधारणस्थल, पश्चात् = त्यानंतर, पञ्चाक्षरजपः = पंचाक्षरजपस्थल, तथा = तसेच, भक्तमार्गक्रिया = भक्तमार्गक्रियास्थल, चैव = तसेच, गुरोर्लिङ्गस्य चार्चनम् = उभय स्थल, जङ्गमस्य = त्रिविधसंपत्तिस्थल, तथा = तसेच, ह्येषां प्रसादस्वीकृतिः = चतुर्विधसारायस्थल, अत्र = येथे, दानत्रयं = तीन प्रकारची दाने, प्रोक्तं = सांगितली आहेत, सोपाधि = सोपाधिदानस्थल, निरुपाधिकं = निरुपाधिदानस्थल, च = आणि, सहजं = सहजदानस्थल, इति = अशा प्रकारे, समस्तागमपारगैः = सर्व शास्त्रांत पारंगत असलेल्या पंडितांकडून, निर्दिष्टं = निर्देशिली आहेत, म्हणून, एतानि = ही सर्व, शिवभक्तस्य = शिवभक्तांनी, प्रयत्नतः = प्रयत्नाने, कर्तव्यानि = आचरिली पाहिजेत.

**भावार्थ** : उत्तम आचार्यांनी भक्तस्थलाचे पंधरा पोटभेद सांगितले आहेत. ते म्हणजे - १. पिंडस्थल, २. पिंडज्ञानस्थल, ३. संसारहेयस्थल, ४. दीक्षाप्राप्तिरूप गुरुकारुण्यस्थल, ५. लिंगधारणस्थल, ६. विभूतिधारणस्थल, ७. रुद्राक्षधारणस्थल, ८. पंचाक्षरजपस्थल, ९. भक्तमार्गक्रियास्थल, १०. उभयस्थल, ११. त्रिविधसंपत्तिस्थल, १२. चतुर्विधसारायस्थल, १३. सोपाधिदानस्थल, १४. निरुपाधिदानस्थल, १५. सहजदानस्थल. सर्व



आगमांत पारंगत असलेल्या विद्वानांनी सांगितल्यानुसार या पंधरा अवांतर स्थलांत वर्णिल्याप्रमाणे शिवभक्तांनी प्रयत्नपूर्वक आचरण करावे.॥२७-३१॥

**पिण्डस्थलम् – (१)**

**बहुजन्मकृतैः पुण्यैः प्रक्षीणे पापपञ्जरे।**
**शुद्धान्तःकरणो देही पिण्डशब्देन गीयते ।।३२।।**

**अन्वयार्थ** : बहुजन्म = अनेक जन्मांत, कृतैः = केलेल्या, पुण्यैः = पुण्य-कर्मांनी, पापपञ्जरे = पापरूपी पिंजरा, प्रक्षीणे = तुटल्यावर, शुद्धान्तःकरणः = परिशुद्ध अंतःकरणाचा, देही = जीवात्मा, पिण्डशब्देन = पिंड या पारिभाषिक संज्ञेने, गीयते = गायिला जातो.

**भावार्थ** : पूर्वीच्या अनेक जन्मजन्मांतरात केलेल्या पुण्याच्या प्रभावाने पाप नाहीसे होऊन ज्याचे मन अत्यंत परिशुद्ध झालेले आहे, अशा साधक जीवाला पिंड असे म्हणतात.॥३२॥

**शिवशक्तिसमुत्पन्ने प्रपञ्चेऽस्मिन् विशिष्यते।**
**पुण्याधिकः क्षीणपापः शुद्धात्मा पिण्डनामकः।।३३।।**

**अन्वयार्थ** : शिवशक्ति = शिव आणि शक्तीपासून, समुत्पन्ने = उत्पन्न झालेल्या, अस्मिन् = ह्या, प्रपञ्चे = प्रपंचात, पुण्याधिकः = अधिक पुण्य असणारा, म्हणूनच क्षीणपापः = पाप नष्ट झालेल्या, पिण्डनामकः = पिंड नावाचा, शुद्धात्मा = परिशुद्ध जीव, विशिष्यते = सर्वात विलक्षण दिसतो.

**भावार्थ** : शिव आणि शक्ती यांच्यापासून उत्पन्न झालेल्या या जगात जन्माला आलेला हा जीव पुण्याच्या आधिक्याने आणि पापाच्या क्षयाने शुद्धात्मा झाल्यावर त्याला पिंड असे नाव प्राप्त होते. तो पिंड नावाचा जीव इतर सामान्य लोकांपेक्षा श्रेष्ठ असतो.॥३३॥

**एक एव शिवः साक्षाच्चिदानन्दमयो विभुः।**
**निर्विकल्पो निराकारो निर्गुणो निष्प्रपञ्चकः।।३४।।**

**अनाद्यविद्यासम्बन्धात्तदंशो जीवनामकः।**
**देवतिर्यङ्मनुष्यादिजातिभेदे व्यवस्थितः।।३५।।**
**मायी महेश्वरस्तेषां प्रेरको हृदि संस्थितः।**

**अन्वयार्थ** : शिवः = परशिव, एक एव = एकटाच आहे, साक्षात् = साक्षात, चिदानन्दमयः = सच्चिदानंदस्वरूप, विभुः = व्यापक, निर्विकल्पकः = विकल्परहित, निराकारः = आकाररहित, निर्गुणः = निर्गुण, निष्प्रपञ्चकः = प्रपंच-विरहित असा आहे, तदंशः = त्याचा अंश असा, अनाद्यविद्या = अनादी अविद्येच्या, सम्बन्धात् = संबंधामुळे, जीवनामकः = जीव होऊन, देव = देव, तिर्यक् = पशुपक्षी, मनुष्यादी = मनुष्य वगैरे, जातिभेदे = भिन्न-भिन्न योनीत, व्यवस्थितः = जन्म घेतो, मायी = मायाशक्तिविशिष्ट, महेश्वरः = महेश्वर, तेषां = त्या जीवांच्या, हृदि = हृदयात, प्रेरकः = प्रेरक होऊन, संस्थितः = निवास करतो.

**भावार्थ** : स्वगत, सजातीय, विजातीय भेदरहित असा, एकमेव, सच्चिदानंदस्वरूप, सर्वव्यापी परशिव मायिक प्रपंचरहित, निराकार आणि सत्त्वादी गुणविरहित आहे. त्याचाच अंश अनादी अशा अविद्येच्या संबंधामुळे जीव होतो. तो जीव देव, मनुष्य, पशू आदी चौऱ्यांशी लक्ष्य योनींमध्ये जन्म घेतो. मायाशक्तिविशिष्ट महेश्वर त्या सर्वांच्या हृदयात निवास करून त्यांच्या सर्व व्यवहारांना प्रेरक होतो.।।३४-३५।।

**चन्द्रकान्ते यथा तोयं सूर्यकान्ते यथानलः।।३६।।**
**बीजे यथाङ्कुरः सिद्धस्तथात्मनि शिवः स्थितः।**

**अन्वयार्थ** : यथा = ज्या प्रकारे, चन्द्रकान्ते = चंद्रकांत शिलेत, तोयं = पाणी, यथा = जसे, सूर्यकान्ते = सूर्यकांत शिलेत, अनलः = अग्नी, यथा = जसे, बीजे = बीजात, अङ्कुरः = अंकुर, सिद्धः = सिद्ध होतो, तथा = त्या प्रकारे, आत्मनि = जीवात्म्यात, शिवः = शिव, स्थितः = निवास करतो.

**भावार्थ** : चंद्रकांत मण्यामध्ये जसे पाणी असते, सूर्यकांत मण्यामध्ये जसा अग्नी असतो, धान्यबीजात जसा अंकुर स्वाभाविकपणे असतो तसा जीवामध्ये शिव राहतो.।।३६।।



**आत्मत्वमीश्वरत्वं च ब्रह्मण्येकत्र कल्पितम्।।३७।।**
**बिम्बत्वं प्रतिबिम्बत्वं यथा पूषणि कल्पितम्।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, पूषणि = सूर्याच्या ठिकाणी, बिम्बत्वं = बिंबरूप, प्रतिबिम्बत्वं = प्रतिबिंबरूप, कल्पितम् = कल्पिले जाते, तसेच, एकत्र = एकट्या, ब्रह्मणि = परशिव ब्रह्मात, आत्मत्वं = जीवात्मस्वरूप, च = आणि, ईश्वरत्वं = ईश्वररूप, कल्पितम् = कल्पिले आहे.

**भावार्थ** : ज्याप्रमाणे सूर्यामध्ये बिंबपणा आणि प्रतिबिंबपणा कल्पित आहेत, त्याचप्रमाणे ब्रह्मामध्ये ईश्वरत्व आणि जीवत्व हे सुद्धा कल्पित आहेत.।।३७।।

**गुणत्रयविभेदेन परतत्त्वे चिदात्मनि।।३८।।**
**भोक्तृत्वं चैव भोज्यत्वं प्रेरकत्वं च कल्पितम्।**

**अन्वयार्थ** : परतत्त्वे = उत्कृष्ट तत्त्व अशा, चिदात्मनि = चिद्रूप परमात्म्यात, गुणत्रय = सत्त्वादी त्रिगुणांच्या, विभेदेन = तारतम्यामुळे, भोक्तृत्वं = भोक्तृत्व, चैव = तसेच, भोज्यत्वं = भोज्यत्व, च = आणि, प्रेरकत्वं = प्रेरकत्व हे गुण, कल्पितम् = कल्पिले आहेत.

**भावार्थ** : चिद्रूप अशा परमात्म्यात सत्त्वादी गुणत्रयाच्या भेदामुळे भोक्तृत्व, भोज्यत्व आणि प्रेरकत्व हे तिन्हीही कल्पिलेले आहेत.।।३८।।

**गुणत्रयात्मिका शक्तिर्ब्रह्मनिष्ठा सनातनी।।३९।।**
**तद्वैषम्यात् समुत्पन्ना तस्मिन् वस्तुत्रयाभिधा।**

**अन्वयार्थ** : सनातनी = शाश्वत अशी, गुणत्रयात्मिका = सत्त्वादी गुणस्वरूप, शक्तिः = शक्ती, ब्रह्मनिष्ठा = परशिव ब्रह्मात असते, तद्वैषम्यात् = तिच्या वैषम्यामुळे, तस्मिन् = त्या परशिवात, वस्तुत्रयाभिधा = तीन प्रकारचे पदार्थ, समुत्पन्ना = उत्पन्न झाले.

**भावार्थ** : परशिव ब्रह्मामध्ये शाश्वत आणि त्रिगुणात्मक शक्ती अविनाभावसंबंधाने असते. तिच्यातील सत्त्वादी त्रिगुणांच्या विषमतेमुळे तो परशिव जीव, जगत् आणि ईश्वर अशी तीन रूपे धारण करतो.।।३९।।

**किञ्चित्सत्त्वरजोरूपं भोक्तृसंज्ञकमुच्यते।।४०।।**
**अत्यन्ततामसोपाधिर्भोज्यमित्यभिधीयते।**
**परतत्त्वमयोपाधिर्ब्रह्मचैतन्यमीश्वरः ।।४१।।**
**भोक्ता भोज्यं प्रेरयिता वस्तुत्रयमिदं स्मृतम्।**
**अखण्डे ब्रह्मचैतन्ये कल्पितं गुणभेदतः।।४२।।**

**अन्वयार्थ** : किञ्चित् सत्त्व = थोडा सत्त्व गुण, रजोरूपं = अधिक रजोगुणाने युक्त असे चैतन्य, भोकृसंज्ञकम् = भोकृ या नावाने, उच्यते = ओळखले जाते, अत्यन्ततामसोपाधि: = अतिशय तमोगुणाच्या उपाधीमुळे, भोज्यमित्यभिधीयते = भोज्य असे म्हणविले जाते, परतत्त्वमयोपाधिः = शुद्ध सत्त्वगुणोपाधीने युक्त, ब्रह्मचैतन्यं = परशिव ब्रह्म, ईश्वरः = ईश्वर, म्हणून ओळखले जाते, अशा प्रकारे, अखण्डे = अखंड अशा, ब्रह्मचैतन्ये = ब्रह्मचैतन्यात, गुणभेदतः = गुणभेदामुळे, कल्पितं = कल्पिलेले, भोक्ता = जीव, भोज्यं = विषय, आणि प्रेरयिता = प्रेरक, इदं वस्तुत्रयं स्मृतम् = असे हे तीन पदार्थ आहेत.

**भावार्थ** : किंचित् सत्त्व आणि तम या गुणांनी मिश्रित रजोगुणयुक्त चैतन्याला जीव अर्थात् भोक्ता असे नाव आहे. अत्यंत तमोगुणरूप उपाधियुक्त चैतन्य हेच भोज्य अर्थात् रसादिरूपविषय होत. आणि या दोहोंपेक्षा उत्कृष्ट असा जो परतत्त्वरूप सत्त्वगुण आहे, अशा सत्त्वगुणउपाधिविशिष्ट चैतन्याला प्रेरक अर्थात् ईश्वर म्हणतात. ब्रह्मचैतन्य अखंड आणि एकच असले तरी त्यात अविनाभावसंबंधाने सत्त्व, रज व तम या गुणांच्या तरतमभावामुळे भोक्ता, भोज्य आणि प्रेरयिता ह्या तीन वस्तू मानलेल्या आहेत.॥४०-४२॥

**अत्र प्रेरयिता शम्भुः शुद्धोपाधिर्महेश्वरः।**
**संमिश्रोपाधयः सर्वे भोक्तारः पशवः स्मृताः।।४३।।**
**भोज्यमव्यक्तमित्युक्तं शुद्धतामसरूपकम्।**

**अन्वयार्थ** : अत्र = या तीन पदार्थात, शुद्धोपाधिः = शुद्ध सत्त्वगुणोपाधीने युक्त, शम्भुः = सुखकारक, महेश्वरः = महेश्वर, प्रेरयिता = प्रेरक आहे, संमिश्रोपाधयः = मिश्र उपाधीने युक्त, सर्वे = सर्व, भोक्तारः = भोक्ता असे जीव, पशवः स्मृताः = पशू असे म्हणविले जातात, शुद्धतामसरूपकं = शुद्ध तमोगुण उपाधीने युक्त, अव्यक्तं = गूढ चैतन्य, भोज्यमिति = भोज्य असे, उक्तम् = म्हणविले जाते.



**भावार्थ** : या तिन्हींपैकी शुद्ध सत्त्वगुणाने युक्त आणि सुखकारक असा जो प्रेरयिता आहे त्याला महेश्वर म्हणतात. मिश्र उपाधीने युक्त जे भोक्ते जीव आहेत त्यांना पशू म्हणतात.॥४३॥

**सर्वज्ञः प्रेरकः शम्भुः किञ्चिज्ज्ञो जीव उच्यते।।४४।।**
**अत्यन्तगूढचैतन्यं जडमव्यक्तमुच्यते।**

**अन्वयार्थ** : प्रेरकः = प्रेरक असा, शम्भुः = परमात्मा, सर्वज्ञः = सर्वज्ञ आहे, जीवः = जीव, किञ्चिज्ज्ञः = अल्पज्ञ असा, उच्यते = म्हणविला जातो, अत्यन्तगूढचैतन्यं = तमोगुणउपाधीने युक्त गूढ चैतन्य, जडं = जड पदार्थ, अव्यक्तं = अव्यक्त असे, उच्यते = म्हणविले जाते.

**भावार्थ** : सुखकारक व प्रेरक असा परमात्मा सर्वज्ञ आहे, भोक्ता जीव हा अल्पज्ञ आहे, आणि अव्यक्त, अत्यंत गूढ अशा चैतन्याला जड असे म्हणतात, तेच भोज्य होय.॥४४॥

**उपाधिः पुनराख्यातः शुद्धाशुद्धविभेदतः।।४५।।**
**शुद्धोपाधिः परा माया स्वाश्रया मोहकारिणी।**

**अन्वयार्थ** : उपाधिः = उपाधी, पुनः = पुन्हा, शुद्धाशुद्धविभेदतः = शुद्ध आणि अशुद्ध अशा दोन भेदांनी, आख्यातः = सांगितली जाते, त्यांपैकी शुद्धोपाधिः = शुद्धोपाधी अशी, परा माया = ऊर्ध्व माया, स्वाश्रया = आपल्या आश्रय अशा ईश्वराला, अमोहकारिणी = मोहित न करणारी आहेत.

**भावार्थ** : अशा या मायेचे (उपाधीचे) शुद्ध व अशुद्ध असे दोन भेद होतात. त्यांपैकी शुद्ध उपाधी ही श्रेष्ठ माया होय. ती आपल्या आश्रयाला (शिवाला) मोहित करीत नाही. तिला ऊर्ध्वमाया म्हणतात.॥४५॥

**अशुद्धोपाधिरप्येवमविद्याश्रयमोहिनी ।।४६।।**
**अविद्याशक्तिभेदेन जीवा बहुविधाः स्मृताः।**

**अन्वयार्थ** : एवम् = अशा प्रकारे, अशुद्धोपाधिः = अशुद्ध उपाधी अशी, अविद्या अपि = अविद्या तर, आश्रयमोहिनी = आपल्या आश्रयाला मोहित करणारी असते, अविद्याशक्तिभेदेन = अविद्याशक्तीच्या भेदामुळे, जीवाः = जीव, बहुविधाः = अनेक प्रकारचे, स्मृताः = होतात.

**भावार्थ** : अशुद्ध उपाधी हीच माया होय. ही अविद्या आपल्या आश्रयाला (जीवांना) मोहात पाडते. तिला अधोमाया म्हणतात. त्या अविद्येच्या अंशभेदाने अनेक प्रकारचे जीव झालेले आहेत.॥४६॥

**मायाशक्तिवशादीशो नानामूर्तिधरः प्रभुः॥४७॥**
**सर्वज्ञः सर्वकर्ता च नित्यमुक्तो महेश्वरः।**
**किञ्चित्कर्ता च किञ्चिज्ज्ञो बद्धोऽनादिशरीरवान्॥४८॥**

**अन्वयार्थ** : प्रभुः = सर्वनियंता, सर्वज्ञः = सर्व जाणणारा, सर्वकर्ता = सर्व करणारा, नित्यमुक्तः = नित्यमुक्त, च = आणि, महेश्वरः = सर्वावर शासन करणारा असा, ईशः = परमात्मा, मायाशक्तिवशात् = माायाशक्तीमुळे, नानामूर्तिधरः = नाना रूपे धारण करतो, बद्धः = बद्ध झालेला जीव, अनादिशरीरवान् = अनादी काळापासून शरीर धारण करीत, किञ्चित्कर्ता = अल्प करणारा, च = आणि, किञ्चिज्ज्ञः = अल्प जाणणारा, असा झाला आहे.

**भावार्थ** : कर्तुमकर्तुं अन्यथा कर्तुं असा समर्थ, सदसत् सकल पदार्थांचे अनादिज्ञान युक्त, सकल प्रपंच निर्माण करण्यास निमित्त कारण, आणवादि मलसंबंधरहित असा परमेश्वर शुद्धोपाधिरूप महामायेच्या प्रभावाने सद्योजातादी अनेक रूपे धारण करतो. बद्ध जीव अनादी कालापासून शरीरधारण करीत अल्पकर्ता आणि अल्पज्ञ झाला आहे.॥४७-४८॥

**अविद्यामोहिता जीवा ब्रह्मैक्यज्ञानवर्जिताः।**
**परिभ्रमन्ति संसारे निजकर्मानुसारतः॥४९॥**
**देवतिर्यङ्मनुष्यादिनानायोनिविभेदतः ।**

**अन्वयार्थ** : जीवाः = जीव, अविद्यामोहिताः = अविद्येमुळे मोहित होऊन, ब्रह्मैक्यज्ञानवर्जिताः = ब्रह्मज्ञानशून्य झाले आहेत, म्हणून, संसारे = या जगात, निजकर्मानुसारतः = आपापल्या कर्मानुसार, देव = देव, तिर्यङ् = तिर्यक्, पशुपक्षी, मनुष्यादि = मनुष्य आदी, नानायोनिविभेदतः = नाना योनींत जन्म घेऊन, परिभ्रमन्ति = परिभ्रमण करतात.



**भावार्थ** : जगातील सर्व जीव अविद्यारूप उपाधीने आवृत झाल्यामुळे शिवजीवैक्यज्ञानशून्य होऊन आपापल्या कर्मानुसार देव, पशू, पक्षी, मनुष्य वगैरे चौऱ्यांशी लक्ष योनींमध्ये जन्म घेऊन संसारचक्रात भ्रमत असतात. परंतु सृष्टिनिर्मितीपूर्वी प्राक्तनकर्मच नसल्यामुळे पुन्हा पुन्हा संसाराची फेरी का घडते, अशी शंका घेण्यात अर्थ नाही. कारण वीरशैव सिद्धान्तात सत्कार्यवाद मानलेला आहे. त्यानुसार संपूर्ण विश्व मयूरांडरसन्यायाने परब्रह्मात अविभाग-परामर्शशक्तीच्या स्वरूपाने राहाते व तेच सृष्टिनिर्मितीच्या वेळी वेगवेगळ्या रूपात प्रकट होत असते.॥४९॥

**चक्रनेमिक्रमेणैव भ्रमन्ति हि शरीरिणः॥५०॥**
**जात्यायुर्भोगवैषम्यकारणं कर्म केवलम्।**

**अन्वयार्थ** : शरीरिणः = जीव, चक्रनेमिक्रमेण = चाकातील आऱ्यांप्रमाणे, हि = निश्चयाने, भ्रमन्ति = भ्रमण करतात, जाति = जन्म, आयुः = आयुष्य, भोग = भोगाच्या, वैषम्यकारणं = विषमतेला कारण, केवलं = केवळ, कर्म = कर्मच आहे.

**भावार्थ** : गाडीचे चाक वाटेवरून फिरत असताना त्या चाकाबरोबरच त्याच्या आऱ्याही जशा सारख्या फिरत असतात, त्याप्रमाणेच देहधारी जीव अनेक योनींत जन्म घेऊन संसारात सदोदित फिरत असतात. त्या प्राण्याच्या जाती-आयुष्य-भोग यांच्यातील वैषम्याला त्याचे कर्मच केवळ कारणीभूत असते.॥५०॥

**एतेषां देहिनां साक्षी प्रेरकः परमेश्वरः॥५१॥**
**एतेषां भ्रमतां नित्यं कर्मयन्त्रनियन्त्रणे।**

**अन्वयार्थ** : नित्यं = नित्य, संसारे = संसारात, भ्रमतां = भ्रमण करणाऱ्या, एतेषां = ह्या सर्व, देहिनां = जीवांच्या, कर्मयन्त्रनियन्त्रणे = कर्मरूपी यंत्राचे नियंत्रण करणारा, प्रेरकः = प्रेरणा देणारा, साक्षी = साक्षी, परमेश्वरः = परमेश्वरच आहे.

**भावार्थ** : कर्मपाशाने बद्ध अशा प्रपंचचक्रात सदोदित भ्रमण करणाऱ्या भिन्न भिन्न शरीरे धारण केलेल्या या जीवांची जी जी भिन्न भिन्न कर्मे असतात, त्या त्या कर्मानुसार सर्व जीवांना प्रेरणा देणारा असा साक्षिभूत परमेश्वर असलाच पाहिजे. त्याशिवाय कर्म हे स्वत:सिद्ध जड असल्याकारणाने त्या कर्मामध्ये प्रेरकत्व सिद्ध होऊ शकत नाही. म्हणून प्रेरकत्व व साक्षित्व यांमुळे ईश्वराचे अस्तित्व मान्य करावे लागेल.॥५१॥

**देहिनां प्रेरक: शम्भुर्हितमार्गोपदेशक:।।५२।।**
**पुनरावृत्तिरहितमोक्षमार्गोपदेशक: ।**

**अन्वयार्थ** : देहिनां = जीवांना, प्रेरक: = प्रेरक असा, शम्भु: = परमात्मा, हितमार्गोपदेशक: = कल्याणकारी मार्गाचा उपदेश करणारा आहे. तसेच, पुनरावृत्तिरहित = जन्ममरणांची पुन्हा आवृत्ती नसलेल्या, मोक्षमार्गोपदेशक: = मुक्तिमार्गाचा उपदेश करणारा आहे.

**भावार्थ** : सुखकार शंभू हा सर्व प्राणिमात्रांचा प्रेरक तर आहेच, परंतु त्याबरोबरच तो कल्याणकारी मार्गाचा उपदेशक आणि जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्ती देणाऱ्या सन्मार्गाचाही उपदेश करणारा आहे.॥५२॥

**स्वकर्मपरिपाकेन प्रक्षीणमलवासन:।।५३।।**
**शिवप्रसादाज्जीवोऽयं जायते शुद्धमानस:।**

**अन्वयार्थ** : स्वकर्मपरिपाकेन = आपल्या कर्माच्या पक्वतेमुळे, प्रक्षीणमल-वासन: = मल आणि वासना क्षीण झालेला, अयं = हा, जीव: = जीव, शिवप्रसादात् = शिवाच्या अनुग्रहाने, शुद्धमानस: = शुद्ध मनाचा, जायते = होतो.

**भावार्थ** : जीवाचे स्वकर्म परिपक्व झाले म्हणजे विज्ञान, योग, संन्यास अथवा भोगाच्या द्वारे त्याचा क्षय होऊन जेव्हा जीव वासनारहित होते, तेव्हा त्याच्यावर शिवाचा अनुग्रह होऊन तो जीव शुद्ध अंत:करणाचा होतो.॥५३॥

**शुद्धान्त:करणे जीवे शुद्धकर्मविपाकत:।।५४।।**



**जायते शिवकारुण्यात् प्रस्फुटा भक्तिरैश्वरी।**
**जन्तुरन्त्यशरीरोऽसौ पिण्डशब्दाभिधेयक:।।५५।।**

**अन्वयार्थ** : शुद्धकर्मविपाकत: = निर्मल कर्माच्या परिपक्वतेमुळे, शुद्धान्त:-करणे = परिशुद्ध अंत:करणाच्या, जीवे = जीवात्म्यात, शिवकारुण्यात् = शिवाच्या अनुग्रहाने, प्रस्फुटा = निश्चल अशी, ऐश्वरी = ईश्वराची, भक्ति: = भक्ती, जायते = उत्पन्न होते, असौ = भक्तिसंपन्न असा हा, पिण्डशब्दाभिधेयक: = पिंड या नावाचा, जन्तु: = जीवात्मा, अन्त्यशरीर: = शेवटच्या शरीराचा होतो.

**भावार्थ** : श्रुती व आगम यांनी प्रतिपादिलेल्या शुद्ध कर्माची परिपक्व दशा प्राप्त झाल्यावर जीव शुद्ध अंत:करणाचा होतो आणि त्यावर शिवाची कृपा होते. त्यानंतर त्याच्या ठिकाणी शिवभक्ती उत्पन्न होऊन तिच्यामुळे त्याला मोक्षमार्गाचा उपदेश प्राप्त होतो. अशा रीतीने ज्या जीवामध्ये शिवभक्ती प्रकट झाली आहे अशा जीवाचा तो जन्म अंतिम असतो, असे श्रुतिवचन असून त्या परिशुद्ध जीवास 'पिंड' असे नाव आहे. येथे पिंडस्थलाचे विवेचन पूर्ण झाले.॥५४-५५॥

**पिण्डज्ञानस्थलम् – (२)**

**शरीरात्मविवेकेन पिण्डज्ञानी स कथ्यते।**
**शरीरमेव चार्वाकैरात्मेति परिकीर्त्यते।।५६।।**

**अन्वयार्थ** : स: = तो, शरीरात्मविवेकेन = शरीर आणि आत्म्याच्या विवेकामुळे, पिण्डज्ञानी = पिंडज्ञानी म्हणून, कथ्यते = ओळखला जातो, चार्वाकै: = चार्वाक, शरीरमेव = शरीरालाच, आत्मेति = आत्मा म्हणून, परिकीर्त्यते = वर्णितात.

**भावार्थ** : पूर्वी वर्णिलेल्या पिंडस्थलाच्या साधकाला जे शरीर आणि आत्म्याचे यथार्थ ज्ञान होते तेव्हा त्याला पिंडज्ञानी असे म्हणतात. चार्वाक सिद्धान्ताचे अनुयायी शरीरालाच आत्मा म्हणतात.॥५६॥

**इन्द्रियाणां तथात्मत्वमपरै: परिभाष्यते।**
**बुद्धितत्त्वगतैर्बौद्धैर्बुद्धिरात्मेति गीयते।।५७।।**

**अन्वयार्थ** : तथा = तसेच, अपरैः = अन्य लोकांकडून, इन्द्रियाणां = इंद्रिये हीच, आत्मेति = आत्मा असे, परिभाष्यते = मानले जाते, बुद्धितत्त्वगतैः = बुद्धितत्त्वापर्यंत विचार केलेल्या, बौद्धैः = बौद्धांकडून, बुद्धिः = बुद्धी हीच, आत्मेति = आत्मा म्हणून, गीयते = वर्णिली जाते.

**भावार्थ** : इंद्रियांना प्राधान्य देणारे केवळ इंद्रियांच्या समूहालाच आत्मा म्हणतात. बुद्धी हेच मुख्य तत्त्व मानणारे बौद्ध बुद्धीलाच आत्मा म्हणतात.॥५७॥

**नेन्द्रियाणां न देहस्य न बुद्धेरात्मता भवेत्।**
**अहंप्रत्ययवेद्यत्वाद् अनुभूतस्मृतेरपि॥५८॥**

**अन्वयार्थ** : अहंप्रत्ययवेद्यत्वात् = अहं प्रत्ययाने ओळखला जात असल्यामुळे, अनुभूतस्मृतेरपि = अनुभवाच्या स्मृतीचा विषय असल्यामुळे, देहस्य = देहाला, इन्द्रियाणां = इंद्रियांना, बुद्धेः = बुद्धीला, आत्मता = आत्मत्व, न भवेत् = सिद्ध होत नाही.

**भावार्थ** : अनुभवात्मक ज्ञान असो अथवा स्मृत्यात्मक असो, या दोन्ही ज्ञानात आत्मा अहं प्रत्ययाने ओळखला जातो. परंतु शरीर, इंद्रिये, बुद्धी हे सर्व 'मम' प्रत्ययाने ओळखले जात असल्यामुळे ते आत्मा होऊ शकत नाहीत. म्हणजे माझे शरीर, माझी इंद्रिये, माझी बुद्धी असे म्हणणारा जो मी असतो तोच आत्मा होय. तो शरीर, इंद्रिये आणि बुद्धीपेक्षा निराळा असतो.॥५८॥

**शरीरेन्द्रियबुद्धिभ्यो व्यतिरिक्तः सनातनः।**
**आत्मस्थितिविवेकी यः पिण्डज्ञानी स कथ्यते॥५९॥**

**अन्वयार्थ** : यः = जो, शरीरेन्द्रियबुद्धिभ्यः = शरीर, इंद्रिये आणि बुद्धीपेक्षा, व्यतिरिक्तः = भिन्न आहे, सनातनः = सनातन आहे असा, आत्मस्थितिविवेकी = आत्म्याच्या अस्तित्वाचा विवेक करणारा आहे, सः = तो, पिण्डज्ञानी = पिंडज्ञानी असे, कथ्यते = म्हणविला जातो.

**भावार्थ** : शरीर, इंद्रिय आणि बुद्धी यांच्यापेक्षा भिन्न असणारा जो सनातन आत्मा आहे, त्याच्या स्वरूपाचे ज्ञान ज्याला असते त्याला पिंडज्ञानी म्हणतात.॥५९॥



**नश्वराणि शरीराणि नानारूपाणि कर्मणा।**
**आश्रितो नित्य एवासाविति जन्तोर्विवेकिता॥६०॥**

**अन्वयार्थ** : कर्मणा = कर्मफलामुळे प्राप्त होणाऱ्या, नानारूपाणि = नाना रूपांची, शरीराणि = शरीरे, नश्वराणि = नश्वर आहेत, आश्रितः = त्यात आश्रित असणारा, असौ = हा आत्मा, नित्य एव = नित्यच आहे, इति = असा, जन्तोः = जीवाचा, विवेकिता = विवेक आहे.

**भावार्थ** : कर्मानुसार धारण करावी लागणारी भिन्न भिन्न शरीरे नाशवंत आणि अनित्य आहेत, तर परिवर्तनशील आणि अशाश्वत अशा शरीरामध्ये राहाणारा आत्मा अमर व नित्य आहे, अशा विवेकाला पिंडज्ञान म्हणावे.॥६०॥

**शरीरात् पृथगात्मानमात्मभ्यः पृथगीश्वरम्।**
**प्रेरकं यो विजानाति पिण्डज्ञानीति कथ्यते॥६१॥**

**अन्वयार्थ** : आत्मानं = आत्माच, शरीरात् = शरीरापासून, पृथक् = वेगळा आहे, आत्मभ्यः = आत्म्यांपासून, ईश्वरं = ईश्वर, पृथक् = भिन्न, आणि, प्रेरकं = प्रेरक आहे, इति = अशा प्रकारे, यः = जो, विजानाति = जाणतो, सः = तो, पिण्डज्ञानी = पिंडज्ञानी असे, कथ्यते = म्हणविला जातो.

**भावार्थ** : शरीरापासून आत्मा वेगळा, आत्म्यांहून ईश्वर वेगळा, तो त्या आत्म्यांना प्रेरक आहे, असे जो जाणतो ज्याला पिंडज्ञानी म्हणावे.॥६१॥

### संसारहेयस्थल - (३)

**निरस्तहृत्कलङ्कस्य नित्यानित्यविवेकिनः।**
**संसारहेयताबुद्धिर्जायते वासनाबलात्॥६२॥**

**अन्वयार्थ** : निरस्तहृत्कलङ्कस्य = हृदयाचा कलंक नाहीसा झालेल्या, नित्यानित्यविवेकिनः = नित्यानित्य विवेक असणाऱ्याला, वासनाबलात् = संस्कार बलाने, संसारहेयताबुद्धिः = संसार त्याज्य आहे अशी बुद्धी, जायते = उत्पन्न होते.

**भावार्थ** : पूर्वी सांगितल्याप्रमाणे अनेक जन्मार्जित पुण्यामुळे पापे क्षीण होऊन ज्याच्या अंतःकरणातील वाईट वासना सर्व नाहीशा झाल्यामुळे जो प्राणी आत्मा नित्य आहे व शरीर अनित्य आहे असा मनामध्ये नेहमी विचार करतो, त्याला उत्तम संस्कारामुळे संसार हेय म्हणजे त्याज्य वाटू लागतो.॥६२॥

**ऐहिके क्षणिके सौख्ये पुत्रदारादिसंभवे।**
**क्षयित्वादियुते स्वर्गे कस्य वाञ्छा विवेकिनः।।६३।।**

**अन्वयार्थ** : पुत्रदारादिसम्भवे = पुत्र आणि जायादिकांपासून प्राप्त होणाऱ्या, क्षणिके = क्षणिक अशा, ऐहिक = इहलोकाच्या, सौख्ये = सुखाविषयी, आणि क्षयित्वादियुते = क्षय आणि पतनादीने युक्त, स्वर्गे = स्वर्गाविषयी, कस्य = कोणत्या, विवेकिन: = विवेकी मनुष्याला, वाञ्छा = इच्छा होईल?

**भावार्थ** : इहलोकात मुले, पत्नी वगैरे पासून होणारे सुख क्षणभंगुर आहे. असे अनुभवास येते. पुण्यक्षय झाल्यावर स्वर्गातील जीवांना देखील पुन्हा मृत्युलोकी जन्म घ्यावा लागतो. त्यामुळे कोणता विवेकी मनुष्य स्वर्गसुखाची तरी आवड धरील? कोणीही नाही. त्यामुळे विवेकी लोकांना संसाराविषयी हेयबुद्धीच निर्माण होते.।।६३।।

**जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च।**
**जन्तुर्मरणजन्मभ्यां परिभ्रमति चक्रवत्।।६४।।**

**अन्वयार्थ** : जातस्य = जन्मलेल्याला, मृत्युः = मृत्यू, ध्रुवः = निश्चित आहे, च = आणि, मृतस्य = मरण पावलेल्याला, जन्म = जन्म, ध्रुवं = निश्चित आहे, त्यासाठी, जन्तुः = जीवात्मा, मरणजन्मभ्यां = मरण आणि जन्मात, चक्रवत् = चक्रासारखा, परिभ्रमति = फिरत असतो.

**भावार्थ** : जो जन्मला त्याला मृत्यू निश्चित आहे. तसेच जो मरतो त्याला पुनर्जन्मही निश्चत आहे. एकंदरीत सर्व प्राणी जन्ममरणाच्या फेऱ्यात सतत भ्रमण करीत असतात.।।६४।।

**मत्स्यकूर्मवराहाङ्गैर्नृसिंहमनुजादिभिः ।**
**जातेन निधनं प्राप्तं विष्णुनापि महात्मना।।६५।।**

**अन्वयार्थ** : मत्स्यकूर्मवराहनृसिंहमनुजादिभिः = मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह, मनुजादी, अङ्गैः = शरीररूपांत, जातेन = अवतार घेतलेल्या, महात्मना = महिमाशाली अशा, विष्णुनापि = विष्णूलाही, निधनं = मरण, प्राप्तं = प्राप्त झाले.



**भावार्थ** : महासामर्थ्यवान अशा विष्णूलाही दुष्टाच्या संहारासाठी, भक्तांच्या रक्षणासाठी मत्स्यकूर्मादी असे अनेक जन्म घ्यावे लागले. त्याला प्रत्येक वेळी मरणही चुकले नाही.।।६५।।

**भूत्वा कर्मवशाज्जन्तुर्ब्राह्मणादिषु जातिषु।**
**तापत्रयमहावह्निसन्तापाद् दह्यते भृशम्।।६६।।**

**अन्वयार्थ** : जन्तुः = जीवात्मा, कर्मवशात् = शुभाशुभ कर्मामुळे, ब्राह्मणादिषु = ब्राह्मणादी, जातिषु = जातीत, भूत्वा = जन्म घेऊन, तापत्रय = तापत्रयरूपी, महावह्नि = महान अग्नीच्या, सन्तापात् = तापाने, भृशम् = अतिशय, दह्यते = जळून जातो.

**भावार्थ** : कर्माच्या अधीन असणारा प्राणी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र इ. कोणत्याही जातीमध्ये जन्मला तरी आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक या तीन प्रकारच्या दुःखरूपी अग्नीमध्ये भाजून सारखा तळमळत असतो.।।६६।।

**कर्ममूलेन दुःखेन पीड्यमानस्य देहिनः।**
**आध्यात्मिकादिना नित्यं कुत्र विश्रान्तिरिष्यते।।६७।।**

**अन्वयार्थ** : कर्ममूलेन = कर्मामुळे उत्पन्न होणारा, आध्यात्मिकादिना = आध्यात्मिकादी, दुःखेन = दुःखापासून, नित्यं = नित्य, पीड्यमानस्य = पीडिलेल्या, देहिनः = जीवाला, विश्रान्तिः = विश्राम, कुत्र = कोठून, इष्यते = प्राप्त होतो.

**भावार्थ** : कर्मामुळे प्राप्त झालेल्या आध्यात्मिकादी दुःखांनी नेहमी गांजलेल्या प्राण्यास या जगात विश्रांती कोठून मिळणार? मुळीच मिळणार नाही.।।६७।।

**आध्यात्मिकं तु प्रथमं द्वितीयं चाधिभौतिकम्।**
**आधिदैविकमन्यच्च दुःखत्रयमिदं स्मृतम्।।६८।।**

**अन्वयार्थ** : प्रथमं तु = पहिले, आध्यात्मिकं = आध्यात्मिक, च = आणि, द्वितीयं = दुसरे, आधिभौतिकं = आधिभौतिक, अन्यच्च = तिसरे, आधिदैविकं =

आधिदैविक, इदं दुःखत्रयं = ही तीन दुःखे होत, मतम् = असे शास्त्रज्ञांचे मत आहे.॥६८॥

**भावार्थ** : आध्यात्मिक दुःख पहिले, आधिभौतिक दुःख दुसरे आणि आधिदैविक हे तिसरे दुःख होय. अशी तीन दुःखे शास्त्रज्ञांनी मानली आहेत.॥६८॥

**आध्यात्मिकं द्विधा प्रोक्तं बाह्याभ्यन्तरभेदतः।**
**वातपित्तादिजं दुःखं बाह्यमाध्यात्मिकं मतम्।।६९।।**

**अन्वयार्थ** : आध्यात्मिकं = आध्यात्मिक दुःख, बाह्याभ्यन्तरभेदतः = बाह्य आणि आभ्यंतर या भेदाने, द्विधा = दोन प्रकारची, प्रोक्तं = सांगितली आहेत. वातपित्तादिजं = वात आणि पित्तादीने उत्पन्न झालेले, दुःखं = दुःख, बाह्यं = बाह्य, आध्यात्मिकं मतम् = आध्यात्मिक असे मानले आहे.

**भावार्थ** : बाह्य व आंतर असे आध्यामिक दुःखाचे दोन भेद असून, वातपित्तादिकापासून होणारी ज्वरादी दुःखे बाह्य होत.॥६९॥

**रागद्वेषादिसम्पन्नमान्तरं परिकीर्त्यते।**
**आधिभौतिकमेतद्धि दुःखं राजादिभूतजम्।।७०।।**

**अन्वयार्थ** : रागद्वेषादिसम्पन्नं = रागद्वेषादी पासून उत्पन्न होणारे, आन्तरं = आंतर म्हणून, परिकीर्त्यते = वर्णिले जाते, राजादिभूतजं = राजादिकांपासून उत्पन्न होणारे, एतद्धि = हे, दुःखं = दुःख, आधिभौतिकम् = आधिभौतिक होय.

**भावार्थ** : रागद्वेषादिकांपासून होणारी ती आंतर दुःखे होत. राजा व इतर लोकांपासून होणाऱ्या दुःखांना आधिभौतिक दुःखे म्हणतात.॥७०॥

**आधिदैविकमाख्यातं ग्रहयक्षादिसम्भवम्।**
**दुःखैरेतैरुपेतस्य कर्मबद्धस्य देहिनः।।**
**स्वर्गे वा यदि वा भूमौ सुखलेशो न विद्यते।।७१।।**

**अन्वयार्थ** : ग्रहयक्षादिसम्भवम् = ग्रहयक्षादी पासून होणारे, दुःखं = दुःख, आधिदैविकमाख्यातं = आधिदैविक असे म्हटले जाते, एतैः = ह्या, दुःखैः = दुःखाने, उपेतस्य = युक्त असलेले, कर्मबद्धस्य = कर्माने बांधलेल्या, देहिनः = जीवांना, स्वर्गे वा = स्वर्गात असो, यदि वा = अथवा, भूमौ = भूलोकी असो, सुखलेशः = थोडेही सुख, न विद्यते = नसते.



**भावार्थ** : ग्रह, यक्ष, भूत, प्रेत, पिशाच्च इत्यादिकांपासून होणाऱ्या दुःखांना आधिदैविक दुःखे म्हणतात. या तीन प्रकारच्या दुःखांनी पीडित अशा कर्मबद्ध मनुष्याला, तो स्वर्गात असो वा मृत्युलोकात, त्याला सुख मुळीच मिळत नाही.॥७१॥

**तटित्सु वीचिमालासु प्रदीपस्य प्रभासु च।**
**सम्पत्सु कर्ममूलासु कस्य वा स्थिरतामतिः।।७२।।**

**अन्वयार्थ** : तटित्सु = विजांमध्ये, वीचिमालासु = तरंगमालांत, च = आणि, प्रदीपस्य = दिव्यांच्या, प्रभासु = ज्योतींमध्ये, वा = अथवा, कर्ममूलासु = कर्मामुळे प्राप्त होणाऱ्या, सम्पत्सु = संपत्तीमध्ये, कस्य = कोणाला, स्थिरतामतिः = स्थिरता वाटेल?

**भावार्थ** : मेघातील विजांमध्ये, पाण्याच्या लाटांमध्ये, दिव्याच्या ज्योतीमध्ये व कर्ममूलक ऐश्वर्यामध्ये स्थिरता कशी असेल? कारण त्या सर्व गोष्टी चंचल आहेत, हे सर्व जाणतातच. म्हणून विवेकी लोकांना ऐश्वर्यादी वस्तू स्थिर आहेत असे वाटत नाही.॥७२॥

**मलकोशे शरीरेऽस्मिन् महादुःखविवर्धने।**
**तडिदङ्कुरसङ्काशे को वा रुच्येत पण्डितः।।७३।।**

**अन्वयार्थ** : मलकोशे = मलाचे भांडार असलेल्या, महादुःखविवर्धने = महादुःख वाढविणाऱ्या, तडिदङ्कुरसंकाशे = विजेच्या अंकुराप्रमाणे क्षणिक असणाऱ्या, अस्मिन् = ह्या, शरीरे = शरीरात, को वा = कोण असा, पण्डितः = पंडित, रुच्येत = रुची बाळगेल?

**भावार्थ** : हे शरीर, अस्थी, चर्म, स्नायू, मज्जा, मांस, शुक्र, रक्त, शेंबूड, मल, मूत्र, वात, पित्त, कफ वगैरे दुर्गंधी पदार्थांचे कोठार आहे. त्यापासून आत्म्यास अनेक प्रकारची मोठमोठी दुःखे भोगावी लागतात. विजे-

प्रमाणे चंचल व अस्थिर असलेल्या शरीराविषयी कोणत्या शहाण्याला प्रेम वाटेल? कोणालाही वाटणार नाही.॥७३॥

**नित्यानन्दचिदाकारमात्मतत्त्वं विहाय कः।**
**विवेकी रमते देहे नश्वरे दुःखभाजने।।७४।।**

**अन्वयार्थ** : नित्यानन्दचिदाकारं = नित्य आनंद आणि चैतन्यरूप अशा, आत्मतत्त्वं = आत्म्याला, विहाय = सोडून, कः = कोण, विवेकी = पंडित, दुःखभाजने = दुःखाचे स्थान असणाऱ्या, नश्वरे = अशाश्वत अशा, देहे = शरीरात, रमते = रमेल?

**भावार्थ** : आत्मतत्त्व नित्यानंदस्वरूप असून चित्स्वरूपी आहे. त्या तत्त्वाचा त्याग करून कोणता शहाणा मनुष्य नाशिवंत अशा आणि अनेक प्रकारची दुःखे भोगण्यास लावणाऱ्या शरीरावर प्रेम करील? शहाणा मनुष्य शरीरावर प्रेम करून आत्मस्वरूपाकडे दुर्लक्ष कधीही करणार नाही.॥७४॥

**विवेकी शुद्धहृदयो निश्चितात्मसुखोदयः।**
**दुःखहेतौ शरीरेऽस्मिन् कलत्रे च सुतेषु च।।७५।।**

**अन्वयार्थ** : शुद्धहृदयः = परिशुद्ध अंतःकरणाचा, निश्चितात्मसुखोदयः = आत्मसुखाच्या उदयाचा विश्वास असणारा, विवेकी = आत्मानात्म विवेकी, दुःखहेतौ = दुःखाला कारणीभूत असलेल्या, अस्मिन् = ह्या, शरीरे = शरीरात, कलत्रे = पत्नीत, च = आणि, सुतेषु = पुत्रांमध्ये.

**भावार्थ** : ज्याचे मन निष्पाप आहे व ज्याला आत्मस्वरूपाचा वास्तविक अनुभव आला आहे तो विचारी मनुष्य दुःखाचे मूळ अशा आपल्या स्वतःच्या शरीराविषयी, स्त्रीविषयी, मुलाबाळांविषयी (उदासीन असतो).॥७५॥

**सुहृत्सु बन्धुवर्गेषु धनेषु कुलपद्धतौ।**
**अनित्यबुद्ध्या सर्वत्र वैराग्यं परमश्नुते।।७६।।**

**अन्वयार्थ** : सुहृत्सु = मित्रांमध्ये, बन्धुवर्गेषु = बंधुबांधवांमध्ये, धनेषु = ऐश्वर्यामध्ये, आणि कुलपद्धतौ = कुलाचारात, असे सर्वत्र = सर्वांत, अनित्यबुद्ध्या = (ते) अनित्य आहेत असे जाणून, परं = श्रेष्ठ असे, वैराग्यं = वैराग्य, अश्नुते = प्राप्त करून घेतो.



**भावार्थ** : मित्रांविषयी, नातलगांविषयी, द्रव्याविषयी आणि वंशाच्या रीतिरिवाजाविषयी, हे सर्व क्षणभंगुर आहेत असे जाणून त्यावर प्रेम न करता उदासीन राहून वैराग्य धारण करतो.॥७६॥

**विवेकिनो विरक्तस्य विषयेष्वात्मरागिणः।**
**संसारदुःखविच्छेदहेतौ बुद्धिः प्रवर्तते।।७७।।**

**अन्वयार्थ** : विषयेषु = शब्दस्पर्शादी विषयांत, विरक्तस्य = वैराग्य असलेल्या, आत्मरागिणः = आत्मसुखाची आवड असणाऱ्या, विवेकिनः = विवेकी पुरुषाची, बुद्धिः = बुद्धी, संसारदुःखविच्छेद = संसाराचे दुःख नाहीसे करणाऱ्या, हेतौ = कारणात, प्रवर्तते = प्रवृत्त होते.

**भावार्थ** : जो विचारी आहे व विषयसुखाविषयी निरिच्छ आहे आणि ज्याला आत्मस्वरूपाची आवड आहे, त्या मनुष्याला संसारदुःखाचा नाश व्हावा अशी बुद्धी उत्पन्न होते.॥७७॥

**नित्यानित्यविवेकिनः सुकृतिनः शुद्धाशयस्यात्मनो**
**ब्रह्मोपेन्द्रमहेन्द्रमुख्यविभवेष्वस्थायितां पश्यतः।**
**नित्यानन्दपदे निराकृतजगत्संसारदुःखोदये**
**साम्बे चन्द्रशिरोमणौ समुदयेद्भक्तिर्भवध्वंसिनी।।७८।।**

**अन्वयार्थ** : सुकृतिनः = पुण्यशाली, शुद्धाशयस्य = पवित्र हृदयाचा, नित्यानित्यविवेकिनः = नित्यानित्य विवेक असणारा, ब्रह्मोपेन्द्रमहेन्द्रमुख्यविभवेषु = ब्रह्मा, विष्णू, इंद्र आदी देवांच्या ऐश्वर्याविषयी, अस्थायितां = अस्थिरता, पश्यतः = पाहाणाऱ्या, आत्मनः = जीवाला, नित्यानन्दपदे = नित्यानंदाचे स्थान असणाऱ्या, निराकृतजगत्संसारदुःखोदये = लोकांच्या संसारदुःखाचे निराकरण करणाऱ्या, चन्द्रशिरोमणौ = मस्तकावर चंद्र धारण केलेल्या, साम्बे = शक्तिविशिष्ट अशा परमात्म्याविषयी, भवध्वंसिनी = संसारनाशक, भक्तिः = भक्ती, समुद्रयेत् = उत्पन्न होते.॥७८॥

**भावार्थ** : जो मनुष्य नित्य काय, अनित्य काय? याचा विचार करतो, जो वेदशास्त्रांत सांगितलेली सत्कर्में करतो, ज्याचे मन निष्पाप आहे, ज्याला ब्रह्मदेव, विष्णू, इंद्र वगैरे मुख्य मुख्य देवांचे ऐश्वर्यदेखील क्षणभंगुर असल्यामुळे तुच्छ वाटते, त्या मनुष्याला नित्य आनंदमय असणाऱ्या, सर्व जगातील लोकांच्या संसारदुःखाचा नाश करणाऱ्या व चंद्र मस्तकावर धारण केलेल्या शंकराविषयी भक्ती उत्पन्न होते.॥७८॥

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ भक्तस्थले पिण्डादिस्थलत्रयप्रसङ्गो नाम पञ्चमः परिच्छेदः।***

**पाचवा परिच्छेद समाप्त.**

❍❍❍

# सहावा परिच्छेद

**दीक्षालक्षणगुरुकारुण्यस्थल - (४)**

**ततो विवेकसम्पन्नो विरागी शुद्धमानसः।**
**जिज्ञासुः सर्वसंसारदोषध्वंसकरं शिवम्।।१।।**
**उपैति लोकविख्यातं लोभमोहविवर्जितम्।**
**आत्मतत्त्वविचारज्ञं विमुक्तविषयभ्रमम्।।२।।**
**शिवसिद्धान्ततत्त्वज्ञं छिन्नसन्देहविभ्रमम्।**
**सर्वतन्त्रप्रयोगज्ञं धार्मिकं सत्यवादिनम्।।३।।**
**कुलक्रमागताचारं कुमार्गाचारवर्जितम्।**
**शिवध्यानपरं शान्तं शिवतत्त्वविवेकिनम्।।४।।**
**भस्मोद्धूलननिष्णातं भस्मतत्त्वविवेकिनम्।**
**त्रिपुण्ड्रधारणोत्कण्ठं धृतरूद्राक्षमालिकम्।।५।।**
**लिङ्गधारणसंयुक्तं लिङ्गपूजापरायणम्।**
**लिङ्गाङ्गयोगतत्त्वज्ञं निरूढाद्वैतवासनम्।।६।।**
**लिङ्गाङ्गस्थलभेदज्ञं श्रीगुरुं शिववादिनम्।**

**अन्वयार्थ** : ततः = नंतर, शुद्धमानसः = परिशुद्ध मनाचा, विवेकसम्पन्नः = आत्मानात्मविवेक असलेला, विरागी = वैराग्यशाली असा साधक, सर्वसंसार-दोषध्वंसकरं = सांसारिक सकल दोषांचा नाश करणाऱ्या अशा, शिवं = शिवाला, जिज्ञासुः = जाणण्याची इच्छा ठेवून, लोकविख्यातं = जगात प्रसिद्ध असलेल्या, लोभमोहविवर्जितं = लोभमोहापासून अलिप्त, आत्मतत्त्वविचारज्ञं = आत्मतत्त्व जाणणारा, विमुक्तविषयभ्रमम् = विषयभ्रम नसणारा, शिवसिद्धान्ततत्त्वज्ञं = शिवाद्वैत सिद्धान्त जाणारा, छिन्नसन्देहविभ्रमम् = संशय आणि भ्रम नसलेला, सर्वतन्त्रप्रयोगज्ञं = सर्व शास्त्रांचे प्रयोग जाणणारा, धार्मिकं = धर्माने वागणारा, सत्यवादिनं = सत्य बोलणारा, कुलक्रमागताचारं = गुरुवंशक्रमात आलेला आचार अनुसरणारा, कुमार्गाचारवर्जितं = कुमार्गाचे आचरण न करणारा, शिवध्यानपरं = शिवध्यानात तत्पर असणारा, शान्तं = शांत स्वभावाचा, शिवतत्त्वविवेकिनम् =

शिवतत्त्वाचा विवेक असणारा, भस्मोद्धूलननिष्णातं = भस्मोद्धूलन क्रिया जाणणारा, भस्मतत्त्वविवेकिनम् = भस्मतत्त्वाचा विवेक असणारा, त्रिपुण्ड्रधारणोत्कण्ठम् = त्रिपुंड्र धारण करण्यास उत्सुक असणारा, धृतरुद्राक्षमालिकम् = रुद्राक्षमाला धारण करणारा, लिङ्गधारणसंयुक्तं = इष्टलिंग धारण करणारा, लिङ्गपूजापरायणं = इष्टलिंगपूजेत आसक्त असणारा, लिङ्गाङ्गयोगतत्त्वज्ञं = लिंग आणि अंगाचा योग जाणणारा, निरूढाद्वैतवासनम् = शिवाद्वैतवासनारूढ असणारा, लिङ्गाङ्गस्थल-भेदज्ञं = लिंगस्थल आणि अंगस्थलाचे भेद जाणणारा, शिववादिनम् = सदा मंगलमय बोलणारा, श्रीगुरुं = षड्गुणैश्वर्यसंपन्न अशा गुरूला, उपैति = हातात दर्भ घेऊन शरण जातो.

**भावार्थ** : पूर्वी सांगितल्याप्रमाणे निर्मल अंत:करणाचा, आत्मानात्म-विवेकसंपन्न झालेल्या, सांसारिक अनित्य सुखाविषयी हेयबुद्धीमुळे वैराग्य उत्पन्न झालेला, असा साधक संसारातील सर्व दु:खांचे निवारण करणाऱ्या परशिवरूप महालिंगाला जाणून घेण्याची जिज्ञासा उत्पन्न होऊन तो त्या महालिंगस्वरूपाचा उपदेश करणाऱ्या सद्गुरूला शरण जातो.।।१।। हा सद्गुरू लोकांत अत्यंत प्रसिद्ध असावा, सांसारिक लोभ व अज्ञानापासून मुक्त असावा, देह-इंद्रियादिकापासून वेगळे असे जे आत्मतत्त्व आहे, त्याचे यथार्थ ज्ञान त्याला असावे, विषयसुखाच्या भ्रमात तो नसावा.।।२।। त्याच्यावर शिवाद्वैताचा दृढ संस्कार झालेला असावा, तो शिवागमसिद्धान्ताचा जाणकार असावा, संशयज्ञान व विपरीतज्ञानरहित असावा आणि सत्यवक्ता असावा.।।३।। गुरुवंशपरंपरेने प्राप्त आचारांचे पालन करणारा असावा, कुमार्गाचारवर्जित असावा, शिवलिंगाचे चिंतन करणारा, रागद्वेषरहित, परशिवस्वरूपाचा ज्ञाता असावा.।।४।। भस्मोद्धूलनाची कला त्याला प्राप्त असावी, रुद्राक्षमाला त्याने धारण केलेल्या असाव्या.।।५।। बाह्य देहावर त्याने इष्टलिंग धारण केलेले असावे, त्या इष्टलिंगाच्या पूजेत त्याला निष्ठा असावी, शिव आणि जीवाच्या संबंधाचे तत्त्व त्याला ज्ञात असावे, अद्वैतभावना त्याने जोपासलेली असावी.।।६।। लिंगस्थल आणि अंगस्थलांतर्गत एकशेएक स्थलांचे त्याला ज्ञान असावे, तो नेहमी मंगल शब्दांचा वापर करणारा



असावा, अशा लक्षणांनी युक्त सद्गुरूला मुमुक्षू सद्भक्ताने गुरुकारुण्य-रूपदीक्षा प्राप्त करण्यासाठी हातात दर्भादी घेऊन शरण जावे.

**सेवेत परमाचार्यं शिष्यो भक्तिभयान्वित:।।७।।**
**षण्मासान् वत्सरं वापि यावदेष प्रसीदति।**

**अन्वयार्थ** : भक्तिभयान्वित: = भयभक्तीने युक्त, शिष्य: = शिष्य, षण्मासान् = सहा महिने, अपि = किंवा, वत्सरं = एक वर्ष, वा = अथवा, एष: = हा (गुरू), यावत् प्रसीदति = प्रसन्न होईतोपर्यंत, परमाचार्यं = परम गुरूची, सेवेत = सेवा करावी.

**भावार्थ** : भक्ताने सद्गुरूविषयी भक्ती आणि भययुक्त अंत:करणाने सदगुरूची सेवा सहा महिने, वर्षभर अथवा गुरू प्रसन्न होईपर्यंत करावी. ही सेवा आप्त, स्थान, अंग आणि सद्भाव अशा चतुर्विध स्वरूपाची असते.।।७।।

**प्रसन्नं परमाचार्यं भक्त्या मुक्तिप्रदर्शकम्।।८।।**
**प्रार्थयेदग्रत: शिष्य: प्राञ्जलिर्विनयान्वित:।**
**भो कल्याण महाभाग शिवज्ञानमहोदधे।।९।।**
**आचार्यवर्य सम्प्राप्तं रक्ष मां भवरोगिणम्।**

**अन्वयार्थ** : प्रसन्नं = प्रसन्न, मुक्तिप्रदर्शकं = मोक्ष दाखविणाऱ्या, परमाचार्य = श्रेष्ठ गुरूला, शिष्य: = शिष्याने, विनयान्वित: = विनयाने, अग्रत: = पुढे उभे राहून, प्राञ्जलि: = हात जोडून, भक्त्या = भक्तीने, प्रार्थयेत् = प्रार्थना करावी, भो = हे, कल्याण महाभाग = कल्याणकारी आणि भाग्यवंता, शिवज्ञानमहोदधे = शिवज्ञानाचा सागर अशा, भो आचार्यवर्य = हे गुरुश्रेष्ठा, सम्प्राप्तं = तुला शरण आलेल्या, भवरोगिणं = भवरोगपीडित अशा, मां = माझे, रक्ष = रक्षण कर.

**भावार्थ** : सद्गुरू प्रसन्न झाल्यावर शिवतत्त्वाचे ज्ञान करून देणाऱ्या सद्गुरूची दोन्ही हात जोडून अत्यंत विनयाने प्रार्थना करावी. हे कल्याण-कारक, महाभाग्यवंत, शिवज्ञानाचा सागर अशा श्रेष्ठ आचार्या, भवरोगाने ग्रस्त असलेल्या व आपणांस शरण आलेल्या माझे रक्षण करावे.।।८-९।।

**इति शुद्धेन शिष्येण प्रार्थितः परमो गुरुः ।।१०।।**
**शक्तिपातं समालोक्य दीक्षया योजयेदमुम् ।**

**अन्वयार्थ** : इति = अशा प्रकारे, शुद्धेन = परिशुद्ध अशा, शिष्येण = शिष्याकडून, प्रार्थितः = प्रार्थिलेला, परमो गुरुः = श्रेष्ठ असा सद्गुरू, शक्तिपातं = शक्तिपाताच्या चिन्हांची, समालोक्य = परीक्षा करून, अमुम् = त्या शिष्याशी, दीक्षया = दीक्षेने, योजयेत् = संबंध जोडावा.

**भावार्थ** : अशा प्रकारे प्रार्थना करणाऱ्या शुद्ध अंतःकरणाच्या शिष्याच्या ठिकाणी शरणभाव, रोमांच, अश्रू इत्यादी शक्तिपाताची चिन्हे पाहून गुरूने त्याला दीक्षा द्यावी.॥१०॥

**दीयते च शिवज्ञानं क्षीयते पाशबन्धनम् ।।११।।**
**यस्मादतः समाख्याता दीक्षेतीयं विचक्षणैः ।**

**अन्वयार्थ** : यस्मात् = ज्याच्यामुळे, शिवज्ञानं = शिवज्ञान, दीयते = दिले जाते, च = आणि, पाशबन्धनं = पाशबंध, क्षीयते = क्षय पावतो, अतः = म्हणून, विचक्षणैः = विद्वानांकडून, इयं = असा हा संस्कार, दीक्षेति = दीक्षा म्हणून, समाख्याता = सांगितला गेला आहे.

**भावार्थ** : परशिव महालिंगाचे ज्ञान प्राप्त करून देणाऱ्या आणि मल-माया-कर्म या पाशांचा नाश करणाऱ्या संस्काराला विद्वान लोकांनी दीक्षा असे नाव दिले आहे.॥११॥

**सा दीक्षा त्रिविधा प्रोक्ता शिवागमविशारदैः ।।१२।।**
**वेधारूपा क्रियारूपा मन्त्ररूपा च तापस ।**

**अन्वयार्थ** : तापस = हे तपस्वी अगस्त्या, सा = ती, दीक्षा = दीक्षा, शिवागमविशारदैः = शिवागमपंडितांनी, वेधारूपा = वेधा, क्रियारूपा = क्रिया, च = आणि, मन्त्ररूपा = मंत्रदीक्षा, अशी त्रिविधा = तीन प्रकारची, प्रोक्ता = सांगितली आहे.

**भावार्थ** : हे अगस्त्या, शिवागम पारंगत लोक दीक्षेचे तीन प्रकार सांगतात ते असे, १. वेधा दीक्षा, २. क्रिया दीक्षा व ३. मंत्र दीक्षा.॥१२॥



**गुरोरालोकमात्रेण हस्तमस्तकयोगतः ।।१३।।**
**यः शिवत्वसमावेशो वेधादीक्षेति सा मता ।**
**मान्त्री दीक्षेति सा प्रोक्ता मन्त्रमात्रोपदेशिनी ।।१४।।**

**अन्वयार्थ** : गुरोः = गुरूच्या, आलोकमात्रेण = केवळ कृपादृष्टिक्षेपाने, आणि हस्तमस्तकयोगतः = हात आणि मस्तकाच्या संबंधाने, यः = जो, शिवत्व-समावेशः = शिवस्वरूपाचा बोध होतो, सा = ती, वेधा दीक्षेति = वेधा दीक्षा म्हणून, मता = मानली जाते; मन्त्रमात्रोपदेशिनी = केवळ मंत्रोपदेशाची, सा = ती, मान्त्री दीक्षेति = मांत्री दीक्षा म्हणून, प्रोक्ता = सांगितली आहे.

**भावार्थ** : शिष्याकडे कृपादृष्टीने पाहून व त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवून श्रीगुरू त्याच्या ठिकाणी असलेल्या शिवतत्त्वाला जागे करतात व ते चिन्मयस्वरूपी आहे असा उपदेश करतात, त्याला वेधा दीक्षा असे म्हणतात. मनन केल्यामुळे आपले रक्षण करणाऱ्या प्रणवसहित पंचाक्षरी महामंत्राचा उपदेश ज्या दीक्षेत गुरूकडून गुप्तपणे शिष्याच्या उजव्या कानात दिला जातो ती मांत्री दीक्षा होय.॥१३-१४॥

**कुण्डमण्डलिकोपेता क्रियादीक्षा क्रियोत्तरा ।**
**शुभमासे शुभतिथौ शुभकाले शुभेऽहनि ।।१५।।**
**विभूतिं शिवभक्तेभ्यो दत्त्वा ताम्बूलपूर्वकम् ।**
**यथाविधि यथायोगं शिष्यमानीय देशिकः ।।१६।।**
**स्नातं शुक्लाम्बरधरं दन्तधावनपूर्वकम् ।**
**मण्डले स्थापयेच्छिष्यं प्राङ्मुखं तमुदङ् मुखः ।।१७।।**
**शिवस्य नाम कीर्तिं च चिन्तामपि च कारयेत् ।**

**अन्वयार्थ** : कुण्डमण्डलिकोपेता = कुंड आणि मंडलांनी युक्त, क्रियोत्तरा = क्रियाप्रधान असलेली, ती, क्रियादीक्षा = क्रिया दीक्षा म्हणविली जाते, शुभमासे = पवित्र मासात, शुभतिथौ = शुभ तिथीला, शुभकाले = शुभकालात, शुभेऽहनि = शुभ दिवशी, शिवभक्तेभ्यः = शिवभक्तांना, ताम्बूलपूर्वकं = विड्यासह, विभूतिं = विभूती, दत्त्वा = देऊन, यथाविधि = विधीप्रमाणे, यथायोगं = शास्त्रोक्त अशा,

दन्तधावनपूर्वकं = तोंड धुवून, स्नातं = स्नान केलेल्या, शुक्लाम्बरधरं = शुभ्रवस्त्र परिधान केलेल्या, शिष्यं = शिष्याला, देशिक: = गुरूने, आनीय = आणून, मण्डले = मंडलात, तं शिष्यं = त्या शिष्याला, प्राङ्मुखं = पूर्वाभिमुखी करून, स्थापयेत् = बसवावे. उदङ्मुख: = स्वत: उत्तराभिमुखी बसून, शिवस्य = शिवाचे, नामकीर्ति = नामोच्चारण, च = आणि, चिन्तामपि = ध्यानही, कारयेत् = (शिष्याकडून) करवावे.

**भावार्थ** : ज्या दीक्षेत पंचकलशांची स्थापना, स्वस्तिवाचन, मंडपादी क्रियेसहित लिंगधारण केले जाते तिला 'क्रियादीक्षा' असे म्हणतात. ही दीक्षा करताना, माघकार्तिकादी शुभ महिन्यात, द्वितीया-तृतीया-पंचम्यादी चांगल्या तिथीस, सोम-गुरू-शुक्र अशा चांगल्या दिवशी, अमृतादी शुभ मुहूर्तावर, शिवभक्तांना अगोदर निमंत्रणाचा विडा-विभूती देऊन, विधिपूर्वक योग्य रीतीने त्या शिष्याला दीक्षा द्यावयाच्या ठिकाणी आणून, श्रीगुरूने त्याला मंडपात पूर्वाभिमुख होऊन आसनावर बसवावे. त्यानंतर श्रीगुरूने उत्तराभिमुख होऊन आसनस्थ व्हावे आणि शिवानामाचे कीर्तन व शिवध्यान शिष्याला करावयास लावावे.॥१५-१७॥

**विभूतिपट्टं दत्त्वाग्रे यथास्थानं यथाविधि।।१८।।**

**पञ्चब्रह्ममयैस्तत्र स्थापितैः कलशोदकैः।**
**आचार्यः सममृत्विग्भिस्त्रिः शिष्यमभिषिञ्चयेत्।।१९।।**

**अन्वयार्थ** : यथाविधि = शास्त्रोक्त विधीनुसार, यथास्थानं = शास्त्रोक्त स्थानी, विभूतिपट्टं दत्त्वा = भस्माचे त्रिपुंड्र धारण करून, तत्र = तेथे, अग्रे = पुढे, स्थापितै: = स्थापिलेल्या, पञ्चब्रह्ममयै: = पंचब्रह्मस्वरूप अशा, कलशोदकै: = कलशातील जलाने, ऋत्विभि: समं = ऋत्विजांबरोबर, आचार्य: = गुरूने, त्रि: = तीन वेळा, अभिषिञ्चयेत् = अभिसिंचन करावे.

**भावार्थ** : प्रथम विधिपूर्वक व शास्त्रोक्त पद्धतीने अंगावर विभूतिधारण केल्यानंतर मंडपात स्थापन केलेल्या ईशानादी पंचाक्षरात्मक पाच कलशांतील पाण्याने जगविख्यात पंचाचार्यांच्या संप्रदायातील पुरोहिताकडून त्याच संप्रदायातील पट्टाभिषिक्त श्रीगुरूने शिष्यावर तीन वेळा सिंचन करावे॥१८-१९॥



**अभिशिच्य गुरुः शिष्यमासीनं परितः शुचिम्।**
**ततः पञ्चाक्षरीं शैवीं संसारभयतारिणीम्।।२०।।**
**तस्य दक्षिणकर्णे तु निगूढमपि कीर्तयेत्।**
**छन्दो रूपमृषिं चास्य दैवतान्यासपद्धतिम्।।२१।।**

**अन्वयार्थ** : अभिषिच्य = अभिसिंचन करून, परित: शुचिं = पूर्णत: परिशुद्ध झालेल्या, आसीनं = जवळ बसलेल्या, शिष्यं = शिष्याला, गुरु: = गुरूने, संसारभयतारिणीं = संसाराचे भय दूर करणारा, शैवीं = शिवाचा, पञ्चाक्षरीं = पंचाक्षरी मंत्र, तस्य तु = त्याच्या, दक्षिणकर्णे = उजव्या कानात, निगूढमपि = अत्यंत गूढपणे, कीर्तयेत् = उपदेशावा, तत: = त्यानंतर, अस्य = त्या मंत्राचा, छन्द: = छंद, रूपं = स्वरूप, ऋषिं = ऋषी, देवता = देवता, न्यासपद्धतिं = न्यासाची पद्धत, सांगावेत.

**भावार्थ** : अभिसिंचनानंतर श्रीगुरूने आपल्या समीप बसलेल्या शिष्याच्या उजव्या कानात संसारभयाचा नाश करणारा शिवसंबंधित असा 'नम: शिवाय' हा शिवपंचाक्षरी मंत्र, तो इतरांनी श्रवण करू नये अशी काळजी घेऊन, सांगावा. या पंचाक्षरी मंत्राचे स्वरूप, छंद, ऋषी, देवता, न्यासपद्धती, इत्यादी शिष्यास समजावून द्यावे.॥२०-२१॥

**लिङ्गधारणस्थल - (५)**

**स्फाटिकं शैलजं वापि चन्द्रकान्तमयं तु वा।**
**बाणं वा सूर्यकान्तं वा लिङ्गमेकं समाहरेत्।।२२।।**

**अन्वयार्थ** : स्फाटिकं = स्फटिकनिर्मित, शैलजं = शिलानिर्मित, वा तु = अथवा, चन्द्रकान्तमयं = चंद्रकांत मण्याचे, वा = अथवा, बाणं = नर्मदा नदीतील बाण, वा = अथवा, सूर्यकान्तं = सूर्यकांत मण्याचे, एकं = एक, लिङ्गं = लिंग, समाहरेत् = घ्यावे.

**भावार्थ** : नंतर श्रीगुरूने शिष्याकरिता स्फटिकाचे, श्रीशैलादी पर्वतावरील एखाद्या उत्तम शिलेचे, चंद्रकांत मण्याचे, नर्मदा नदीत सापडणाऱ्या बाणाचे किंवा सूर्यकांत मण्याचे यापैकी परीक्षा करून कोणतेही एक लिंग घ्यावे.॥२२॥

**सर्वलक्षणसंपन्ने तस्मिंल्लिङ्गे विशोधिते।**
**पीठस्थितेऽभिषिक्ते च गन्धपुष्पादिपूजिते।।२३।।**
**मन्त्रपूते कलां शैवीं योजयेद्विधिना गुरुः।**

**अन्वयार्थ** : सर्वलक्षणसम्पन्ने = शिल्पशास्त्रोक्त सर्व लक्षणांनी युक्त, विशोधिते = परिशुद्ध केलेले, पीठस्थिते = तळहातावर ठेवलेले, अभिषिक्ते = अभिषेक केलेले, गन्धपुष्पादिपूजिते = गंधपुष्पादींनी पूजिलेले, मन्त्रपूते = मंत्राने पवित्र केलेले, तस्मिन् = त्या, लिङ्गे = लिंगात, गुरुः = गुरूने, विधिना = शास्त्रोक्त रीत्या, शैवीं = शिवासंबंधी, कलां = कलेचे, योजयेत् = संयोजन केले पाहिजे.

**भावार्थ** : शिल्पशास्त्रानुसार सर्वलक्षणांनी युक्त, पंचगव्य (गाईचे दूध, दही, तूप, मूत्र आणि गोमय) यांनी परिशुद्ध, पंचामृताने (गाईचे दूध, दही, तूप, मध आणि साखर) अभिषिक्त, गंधपुष्पादींनी परिपूजित आणि मूल पंचाक्षरी मंत्राने सुसंस्कृत असे ते लिंग करपीठावर ठेवून शिष्याच्या मस्तकात स्थित असलेल्या शिवकलेचे आवाहन करावे व तिची इष्टलिंगात स्थापना करावी।।२३।।

**शिष्यस्य प्राणमादाय लिङ्गे तत्र निधापयेत्।।२४।।**
**तल्लिङ्गं तस्य तु प्राणे स्थापयेदेकभावतः।**
**एवं कृत्वा गुरुर्लिङ्गं शिष्यहस्ते निधापयेत्।।२५।।**

**अन्वयार्थ** : शिष्यस्य = शिष्याचा, प्राणं = प्राण, आदाय = आकर्षित करून, तत्र लिङ्गे = त्या लिंगात, निधापयेत् = (त्याची) स्थापना करावी, तु = तसेच, तल्लिङ्गं = ते लिंग, तस्य = त्याच्या, प्राणे = प्राणात, एकभावतः = तादात्म्याने, स्थापयेत् = स्थापन करावे, एवं = असे, कृत्वा = करून, गुरुः = गुरूने, लिङ्गं = लिंग, शिष्यहस्ते = शिष्याच्या हातात, निधापयेत् = ठेवावे.

**भावार्थ** : शिवकलेने परिपूर्ण अशा लिंगामध्ये शिष्याच्या जीवकलारूप प्राणास आकर्षून त्याची स्थापना करावी. त्याचप्रमाणे शिवकलेने पूर्ण अशा लिंगाची शिष्याच्या प्राणरूपी जीवकलेने युक्त अशा प्राणात एकभावाने व तादात्म्यासंबंधाने स्थापना करावी. अशा प्रकारे श्रीगुरूने शिव व जीवकलेने सामरस्य युक्त ते लिंग शिष्याच्या हतात ठेवावे.।।२४-२५।।



**प्राणवद्धारणीयं तत्प्राणलिङ्गमिदं तव।**
**कदाचित्कुत्रचिद्वापि न वियोजय देहतः।।२६।।**

**अन्वयार्थ** : तत् इदं = ते हे, प्राणलिङ्गं = प्राणलिंग, तव = तुझ्या, प्राणवत् = प्राणासारखे, धारणीयं = धारण केले पाहिजे, कदाचित् = केव्हाही, अपि = आणि, कुत्रचित् वा = कोठेही, देहतः = देहापासून, न वियोजय = वेगळे करू नकोस.

**भावार्थ** : हे शिष्या, हे लिंग तुझे प्राणलिंग असल्यामुळे तू तुझ्या प्राणाप्रमाणेच ते धारण करावेस. केव्हाही व कोठेही हे लिंग तुझ्या शरीरापासून वेगळे ठेवू नकोस, अर्थात् ते सदैव तुझ्या शरीरावरच राहू दे.।।२६।।

**यदि प्रमादात्पतिते लिङ्गे देहान्महीतले।**
**प्राणान् विमुञ्च सहसा प्राप्तये मोक्षसम्पदः।।२७।।**

**अन्वयार्थ** : यदि = जर, लिङ्गे = इष्टलिंग, देहात् = देहापासून, महीतले = भूमीवर, पतिते = पडल्यास, मोक्षसम्पदः = मुक्तिरूपी संपत्तीच्या, प्राप्तये = प्राप्तीसाठी, सहसा = तत्क्षणी, प्राणान् = प्राणांचा, विमुञ्च = त्याग कर.

**भावार्थ** : एखादे वेळी तर अनवधानाने शरीरापासून लिंग जमिनीवर पडले तर तत्क्षणीच प्राणत्याग कर. म्हणजे तुला मोक्ष प्राप्त होईल.।।२७।।

**इति सम्बोधितः शिष्यो गुरुणा शास्त्रवेदिना।**
**धारयेच्छाङ्करं लिङ्गं शरीरे प्राणयोगतः।।२८।।**

**अन्वयार्थ** : इति = अशा रीतीने, शास्त्रवेदिना = शास्त्रज्ञ अशा, गुरुणा = गुरूकडून, सम्बोधितः = उपदेशिलेल्या, शिष्यः = शिष्याने, शरीरे = आपल्या शरीरावर, प्राणयोगतः = प्राण असेतोपर्यंत, शाङ्करं = शिवस्वरूपी, लिङ्गं = इष्टलिंग, धारयेत् = धारण करावे.

**भावार्थ** : शास्त्रवेत्त्या अशा श्रीगुरूने शिष्यास उपदेश केल्यानुसार त्या शिष्याने शिवशक्तियुक्त असे ते लिंग शरीरावर आमरण आपल्या प्राणाप्रमाणे धारण करावे.।।२८।।

**लिङ्गस्य धारणं पुण्यं सर्वपापप्रणाशनम्।**
**आदृतं मुनिभिः सर्वैरागमार्थविशारदैः।।२९।।**

**अन्वयार्थ** : लिङ्गस्य = लिंगाचे, धारणं = धारण करणे, पुण्यं = पुण्यदायक, आणि सर्वपापप्रणाशनम् = सर्व पापांचा नाश करणारे होते, म्हणून, आगमार्थ-विशारदैः = आगमशास्त्र जाणणाऱ्या, सर्वैः = सर्व, मुनिभिः = ऋषींकडून, आदृतं = स्वीकारले गेले आहे.

**भावार्थ** : लिंगधारण करणे हे पुण्यकारक व सर्वपापनाशक आहे आणि आगमांचा अर्थ जाणणाऱ्या सर्व ऋषिमुनींनी ह्या लिंगधारणेचा स्वीकार केला आहे.।।२९।।

**लिङ्गधारणमाख्यातं द्विधा सर्वार्थसाधकैः।**
**बाह्यमाभ्यन्तरं चेति मुनिभिर्मोक्षकाङ्क्षिभिः।।३०।।**

**अन्वयार्थ** : सर्वार्थसाधकं = सकल मनोरथ पूर्ण करणारे, लिङ्गधारणं = लिंगधारण, मोक्षकाङ्क्षिभिः = मुक्तीची इच्छा बाळगणाऱ्या, मुनिभिः = मुनींकडून, बाह्यमाभ्यन्तरं चेति = बाह्य आणि आभ्यंतर असे, द्विधा = दोन प्रकारचे, आख्यातम् = सांगितले गेले आहे.

**भावार्थ** : मुक्तीची इच्छा बाळगणाऱ्या मुनींनी सकल मनोरथ पूर्ण करणाऱ्या इष्टलिंगधारणेचे बाह्य आणि आभ्यंतर असे दोन प्रकार सांगितलेले आहेत.।।३०।।

**चिद्रूपं परमं लिङ्गं शाङ्करं सर्वकारणम्।**
**यत्तस्य धारणं चित्ते तदान्तरमुदाहृतम्।।३१।।**

**अन्वयार्थ** : शाङ्करं = शिवस्वरूप, सर्वकारणं = सर्वांचे मूलकारण, चिद्रूपं = चिद्रूप असणारे, परमं = श्रेष्ठ असे, जे लिङ्गं = लिंग आहे, तस्य = त्याचे, चित्ते = हृदयात, यद् धारणं = जी धारणा पद्धती आहे, तत् = ती, आन्तरं = आंतर लिंगधारणा म्हणून, उदाहृतम् = सांगितली जाते.



**भावार्थ** : देशकाल आकाराने युक्त अशा विश्वाला कारणीभूत असलेले, सच्चिदानंद, सर्वश्रेष्ठ, देशकालातीत शिवस्वरूप जे लिंग आहे, त्या महालिंगाचे आपल्या हृदयकमलामध्ये ध्यानरूपाने धारणं करणे हेच अभ्यंतर लिंगधारण होय.।।३१।।

**चिद्रूपं हि परं तत्त्वं शिवाख्यं विश्वकारणम्।**
**निरस्तविश्वकालुष्यं निष्कलं निर्विकल्पकम्।।३२।।**
**सत्तानन्दपरिस्फूर्तिसमुल्लासकलामयम्।**
**अप्रमेयमनिर्देश्यं मुमुक्षुभिरुपासितम्।।३३।।**
**परं ब्रह्म महालिङ्गं प्रपञ्चातीतमव्ययम्।**

**अन्वयार्थ** : चिद्रूपं = चैतन्यस्वरूप, परं = श्रेष्ठ, विश्वकारणं = विश्वाला कारण असा, निरस्तविश्वकालुष्यं = जगातील दोष नसलेले, निष्कलं = निर्गुण, निर्विकल्पकम् = विकल्परहित, सत्तानन्दपरिस्फूर्तिसमुल्लासकलामयम् = सच्चिदानंदादी कलास्वरूप, अप्रमेयं = प्रमाणांना अगोचर, अनिर्देश्यं = दाखविण्यास अशक्य, मुमुक्षुभिः = मुमुक्षूंकडून, उपासितं = उपासिले जाणारे, प्रपञ्चातीतं = प्रपंचाच्या अतीत असणारे, अव्ययं = नाशरहित, परं = श्रेष्ठ असे, शिवाख्यं = शिव नावाचे, तत्त्वं = तत्त्व, हि = निश्चयाने, परं ब्रह्म = श्रेष्ठ ब्रह्म, महालिङ्गम् = महालिंग म्हणून प्रसिद्ध आहे.

**भावार्थ** : तो अंतर्लिंगरूपी परशिव जडप्रपंचापासून विलक्षण असल्यामुळे त्याला चिद्रूप म्हणतात. जीवाहून विलक्षण असल्यामुळे त्याला परमतत्त्व म्हणतात. तो चराचर प्रपंचाचा कारण असूनही प्रपंचाच्या दोषापासून मुक्त आहे. तो निरवयव असल्यामुळे त्याला निष्कल म्हणतात. त्याच्यात कोणताही भेद नसल्यामुळे त्याला निर्विकल्प म्हणतात. तो सत्, चित्, आनंद, स्फूर्ती, उत्साहादी सतरा कलांस्वरूप आहे. त्याचे स्वरूप कोणत्याही प्रमाणाने सिद्ध करता येत नसले, तरीही मुमुक्षूंकडून त्याची उपासना केली जाते. तो विश्वातीत असून त्रिकालाबाधित आहे. असा जे परब्रह्म शिव त्यालाच महालिंग म्हणतात आणि तेच अंतर्लिंग होय.।।३२-३३।।

**तदेव सर्वभूतानामन्तस्त्रिस्थानगोचरम्।।३४।।**
**मूलाधारे च हृदये भ्रूमध्ये सर्वदेहिनाम्।**
**ज्योतिर्लिङ्गं सदा भाति यद्ब्रह्मेत्याहुरागमाः।।३५।।**

**अन्वयार्थ** : तदेव = ते लिंगच, सर्वभूतानां = सर्व प्राण्यांचा, अन्तः = अंतरंगात, त्रिस्थानगोचरम् = तीन ठिकाणी प्रत्ययाला येते, सर्वदेहिनाम् = सर्व प्राण्यांच्या, मूलाधारे = मूलाधारात, हृदये = हृदयात, च = आणि, भ्रमूध्ये = भ्रूमध्यात, ज्योतिर्लिङ्गं = ज्योतिर्लिंग, सदा = नेहमी, भाति = प्रकाशमान असते, यत् = ज्याला, आगमाः = आगशास्त्रे, ब्रह्मेति = ब्रह्म म्हणून, आहुः = सांगतात.

**भावार्थ** : पूर्वोक्त महालिंग अथवा ज्योतिर्लिंग यालाच आगमांत ब्रह्म असे म्हटले आहे. ते सर्व प्राणिमात्रांच्या अंतर्यामी असते. ते मूलाधार, हृदय आणि भ्रूमध्य अशा तीन ठिकाणी सदैव प्रकाशमान असते. तरी त्याचे स्वरूप केवळ गुरूपदेशानेच ज्ञात होते.॥३४-३५॥

**अपरिच्छिन्नमव्यक्तं लिङ्गं ब्रह्म सनातनम्।**
**उपासनार्थमन्तःस्थं परिच्छिन्नं स्वमायया।।३६।।**

**अन्वयार्थ** : अपरिच्छिन्नम् = अखंड, अव्यक्तं = गूढ, सनातनम् = सनातन असे, ब्रह्म = ब्रह्म या नावाचे, अन्तःस्थं = अंतरंगात असणारे, लिङ्गं = लिंग, एकच असले तरी, उपासनार्थं = उपासनेसाठी, स्वमायया = आपल्या मायेने, परिच्छिन्नं = वेगवेगळे, झाले आहे.

**भावार्थ** : ते महालिंग अपरिच्छिन्न, अव्यक्त, सनातन असे ब्रह्मच होय, आणि शिवभक्ताच्या पूजेसाठी व ध्यानासाठी, आपल्या मायेच्या योगाने ते परिच्छिन्न अथवा खंडित रूपाने दिसते.॥३६॥

**लयं गच्छति यत्रैव जगदेतच्चराचरम्।**
**पुनः पुनः समुत्पत्तिं तल्लिङ्गं ब्रह्म शाश्वतम्।।३७।।**

**अन्वयार्थ** : एतत् = हे, चराचरम् = चराचर, जगत् = जग, यत्र = जेथे, एव = निश्चयाने, लयं गच्छति = विलय पावते, आणि पुनः पुनः = पुन्हा पुन्हा, समुत्पत्तिं = उत्पन्न होते, तत् = ते, शाश्वतं = शाश्वत असे, बह्म = ब्रह्मच, लिंङ्गं = लिंग होय.



**भावार्थ** : ज्याच्यात सर्व चराचर विश्व लय पावते आणि ज्याच्यातून पुन्हा पुन्हा त्याची उत्पत्ती होते, असे जे शाश्वत ब्रह्म आहे, त्याला लिंग म्हणतात.॥३७॥

**तस्माल्लिङ्गमिति ख्यातं सत्तानन्दचिदात्मकम्।**
**बृहत्वाद् बृहणत्वाच्च ब्रह्मशब्दाभिधेयकम्।।३८।।**

**अन्वयार्थ** : तस्मात् = त्यासाठी, सत्तानन्दचिदात्मकम् = सच्चिदानंदस्वरूप असे, लिङ्गं = लिंग या नावाने, ख्यातं = प्रसिद्ध असे ते तत्त्वच, बृहत्वात् = सर्वापेक्षा मोठे असल्याने, च = आणि, बृंहणत्वात् = सर्वांचे पोषक असल्यामुळे ते, ब्रह्मशब्दाभिधेयकम् = ब्रह्म या शब्दाने ओळखले जाते.

**भावार्थ** : त्यामुळे सच्चिदानंदरूप असे महालिंग सर्वात मोठे असल्याने व विश्वाच्या निर्मितीला कारण असल्यामुळे ते ब्रह्म या नावानेही प्रसिद्ध आहे. अशा रीतीने परब्रह्म म्हणजेच महालिंग आणि महालिंगच ब्रह्म होय असे समजावे.॥३८॥

**आधारे हृदये वापि भ्रूमध्ये वा निरन्तरम्।**
**ज्योतिलिङ्गानुसन्धानमान्तरं लिङ्गधारणम्।।३९।।**

**अन्वयार्थ** : आधारे = मूलाधारामध्ये, हृदये = हृदयात, वा = अथवा, भ्रूमध्ये = भुवयांच्या मध्यभागी, ज्योतिर्लिङ्गानुसन्धानम् = ज्योतिर्लिंगाचे अनुसंधान करणे, आन्तरं = अंतरंगाचे, लिङ्गधारणम् = लिंगधारण होय.

**भावार्थ** : आधार, हृदय अथवा भ्रूमध्य ह्यांपैकी कोणत्याही एका ठिकाणात ज्योतिर्मय लिंगाचे निरंतर ध्यान करणे हे अभ्यंतरलिंगधारण होय.॥३९॥

**आधारे कनकप्रख्यं हृदये विद्रुमप्रभम्।**
**भ्रूमध्ये स्फटिकच्छायं लिङ्गं योगी विभावयेत्।।४०।।**

**अन्वयार्थ** : योगी = शिवयोगी, आधारे = मूलाधारात, कनकप्रख्यं = सोन्याच्या रंगाचे, हृदये = हृदयात, विद्रुमप्रभम् = पोवळ्याच्या रंगाचे, भ्रूमध्ये = भ्रूमध्यात, स्फटिकच्छायं = शुभ्र वर्णाचे, लिङ्गं = लिंग, (असल्याची) विभावयेत् = भावना करावी.

**भावार्थ** : शिवयोग्याने मूलाधार स्थलात सुवर्णासारखे, हृदयात पोवळ्यासारखे व भ्रूमध्यात स्फटिकासारखे प्रकाशमान लिंग आहे अशी भावना करून त्याचे ध्यान करावे.॥४०॥

**निरुपाधिकमाख्यातं लिङ्गस्यान्तरधारणम्।**
**विशिष्टं कोटिगुणितं बाह्यलिङ्गस्य धारणात्।।४१।।**

**अन्वयार्थ** : लिङ्गस्य = लिंगाचे, आन्तरधारणम् = अंतरंगात धारण करणे, निरुपापधिकम् = निरुपाधिक असे, आख्यातं = सांगितले गेले आहे. बाह्यलिङ्गस्य = बाह्य लिंगाचे, धारणात् = धारणे पेक्षा, (आन्तरलिंग धारण) कोटिगुणितं = कोटी पटीने, विशिष्टं = श्रेष्ठ असे.

**भावार्थ** : अंतर्लिंगधारणेस निरुपाधिक लिंगधारणा असे म्हणतात आणि ही अंतर्लिंगधारणा बाह्यलिंगधारणेपेक्षा कोटीपटीने अधिक श्रेष्ठ आहे.॥४१॥

**ये धारयन्ति हृदये लिङ्गं चिद्रूपमैश्वरम्।**
**न तेषां पुनरावृत्तिर्घोरसंसारमण्डले।।४२।।**

**अन्वयार्थ** : ये = जे, हृदये = हृदयात, ऐश्वरम् = ईश्वराचे, चिद्रूपं = चैतन्य-स्वरूप असे, लिङ्गं = लिंग, धारयन्ति = धारण करतात, तेषां = त्यांना, घोरसंसार-मण्डले = भयानक अशा संसारात, न पुनरावृत्तिः = पुनर्जन्म प्राप्त होत नाही.

**भावार्थ** : जे शिवभक्त आपल्या हृदयकमलात चित्स्वरूप अंतर्लिंग धारण करतात त्यांना या संसारचक्रात पुन्हा जन्म घ्यावा लागत नाही. म्हणजेच त्यांना परममुक्ती प्राप्त होते.॥४२॥

**अन्तर्लिङ्गानुसन्धानमात्मविद्यापरिश्रमः ।**
**गुरूपासनशक्तिश्च कारणं मोक्षसम्पदाम्।।४३।।**

**अन्वयार्थ** : अन्तर्लिङ्गानुसन्धानम् = अंतर्लिंगाचे अनुसंधान, आत्मविद्या-परिश्रमः = आत्मविद्येतील परिश्रम, च = आणि, गुरूपासनशक्तिः = गुरुसेवेचे सामर्थ्य, ही तीन साधने, मोक्षसम्पदाम् = मोक्षरूपी संपत्तीच्या प्राप्तीला, कारणं = कारण आहेत.



**भावार्थ** : मोक्षप्राप्तीसाठी (१) आपल्या हृदयात असलेल्या चिद्रूप अंतर्लिंगाचे ध्यान करणे (२) आत्मविद्या प्राप्तीसाठी स्वाध्याय करणे आणि (३) गुरूची सेवा करणे, ही मुख्य तीन साधने कारणीभूत होतात.॥४३॥

**वैराग्यज्ञानयुक्तानां योगिनां स्थिरचेतसाम्।**
**अन्तर्लिङ्गानुसन्धाने रुचिर्बाह्ये न जायते।।४४।।**

**अन्वयार्थ** : वैराग्यज्ञानयुक्तानां = वैराग्य आणि ज्ञान असलेल्या, स्थिरचेत-साम् = स्थिर बुद्धीच्या, योगिनां = योग्यांना, अन्तर्लिङ्गानुसन्धाने = अंतर्लिंगाचे अनुसंधान करण्यात, रुचिः = आवड, जायते = उत्पन्न होते, न बाह्ये = बाह्य लिंगात होत नाही.

**भावार्थ** : वैराग्यसंपन्न व ज्ञानसंपन्न असे जे स्थिर चित्ताचे योगी आहेत, त्यांची आवड बाह्यलिंगाच्या अनुसंधानापेक्षा अंतर्लिंगाच्या अनुसंधानात अधिक असते.॥४४॥

**ब्रह्मा विष्णुश्च रुद्रश्च वासवाद्याश्च लोकपाः।**
**मुनयः सिद्धगन्धर्वा दानवा मानवास्तथा।।४५।।**
**सर्वे च ज्ञानयोगेन सर्वकारणकारणम्।**
**पश्यन्ति हृदये लिङ्गं परमानन्दलक्षणम्।।४६।।**

**अन्वयार्थ** : ब्रह्मा = ब्रह्मा, विष्णुः = विष्णू, रुद्रः = रुद्र, च = आणि, वासवाद्याः = इंद्रादी, लोकपाः = दिक्पाल, मुनयः = मुनी, सिद्धगन्धर्वाः = सिद्ध आणि गंधर्व, दानवाः = राक्षस, तथा = तसेच, मानवाः = मनुष्य, हे सर्वे = सर्व, सुज्ञानयोगेन = श्रेष्ठ ज्ञानामुळे, सर्वकारणकारणम् = सर्व कारणांना कारण असणारा, परमानन्दलक्षणम् = परमानंदस्वरूप अशा, लिङ्गं = लिंगाला, हृदये = हृदयात, पश्यन्ति = पाहातात (ध्यान करतात).

**भावार्थ** : ब्रह्मा, विष्णू, रुद्र इत्यादी सुरगण व लोकपाल, तसेच मुनी, सिद्ध, गंधर्व, दानव, मानव इत्यादी सर्व सकल कारणांचे कारण असलेल्या परमानंदस्वरूपी लिंगास आपल्या हृदयात ज्ञानदृष्टीने पाहातात.॥४५-४६॥

**तस्मात्सर्वप्रयत्नेन शाङ्करं लिङ्गमुत्तमम्।**
**अन्तर्विभावयेद्विद्वान् अशेषक्लेशमुक्तये।।४७।।**

**अन्वयार्थ** : तस्मात् = म्हणून, सर्वप्रयत्नेन = सर्व प्रयत्न करून, विद्वान् = विद्वान लोकांनी, अशेषक्लेषमुक्तये = संपूर्ण क्लेशांच्या निराकरणासाठी, अन्तः = आपल्या अंतरंगात, उत्तमम् = श्रेष्ठ अशा, शाङ्करं = शिवस्वरूप, लिङ्गं = लिंगाची, विभावयेत् = भावना करावी.

**भावार्थ** : अविद्या, राग, द्वेष, अस्मिता आणि अभिनिवेश या पंचक्लेशांची संपूर्ण निवृत्ती अंतर्लिंगाच्या अनुसंधानानेच होऊ शकते, म्हणून विद्वान शिवभक्ताने सर्वप्रयत्नपूर्वक अंतर्लिंगाचेच अनुसंधान करावे.॥४७॥

**अन्तर्धारयितुं लिङ्गमशक्तः शक्त एव वा।**
**बाह्यं च धारयेल्लिङ्गं तद्रूपमिति निश्चयात्।।४८।।**

**अन्वयार्थ** : लिङ्गं = लिंगाचे, अन्तर्धारयितुं = अंतरंगात धारण करण्यास, अशक्तः = अशक्त असो, वा = अथवा, शक्त एव = समर्थ असो, बाह्यं = बाह्य, लिङ्गं = इष्टलिंग, तद्रूपमिति निश्चयात् = त्याचेच स्वरूप आहे अशा निश्चयाने, धारयेत् = धारण करावे,

**भावार्थ** : अंतर्लिंगधारणेमध्ये शिवभक्त समर्थ असो वा असमर्थ असो त्याने स्फटिकादिनिर्मित इष्टलिंग हे हृदयकमलामध्ये स्थित असलेल्या चिन्मय अशा महालिंगाचे स्वरूपच आहे अशा निश्चयाने धारण करावे. वीरशैवाने अंतर्लिंगाच्या स्मरणाकरिता तत्स्वरूप बाह्य (इष्ट) लिंगाचे धारण अवश्य करावे.॥४८॥

**लिङ्गं तु त्रिविधं प्रोक्तं स्थूलं सूक्ष्मं परात्परम्।**
**इष्टलिङ्गमिदं स्थूलं यद्बाह्ये धार्यते तनौ।।४९।।**
**प्राणलिङ्गमिदं सूक्ष्मं यदन्तर्भावनामयम्।**
**परात्परं तु यत्प्रोक्तं तृप्तिलिङ्गं तदुच्यते।।५०।।**

**अन्वयार्थ** : लिङ्गं तु = लिंग तर, स्थूलं = स्थूल, सूक्ष्मं = सूक्ष्म, परात्परं = परात्पर असे, त्रिविधं = तीन प्रकारचे, प्रोक्तं = सांगितले आहे, यत् = जे, तनौ = शरीराच्या, बाह्ये = बाहेर, धार्यते = धारण केले जाते, ते, इदं = हे, इष्टलिङ्गं = इष्टलिंग, स्थूल = स्थूल होय, यत् = जे, अन्तः = आत, भावनामयम् = भावनात्मक आहे, सूक्ष्मं = सूक्ष्म आहे, ते इदं = हे, प्राणलिङ्गं = प्राणलिंग होय, यत् = जे, परात्परं = सर्वश्रेष्ठ, प्रोक्तं = म्हटले जाते, तत् = ते, तृप्तिलिङ्गमुच्यते = तृप्तिलिंग होय.



**भावार्थ** : स्थूल, सूक्ष्म आणि परात्पर असे लिंगाचे तीन भेद असून त्यांपैकी शरीरावर धारण केले जाणारे ते इष्टलिंग, हृदयात धारण केले जाणारे सूक्ष्मलिंग ते प्राणलिंग आणि जे सर्वश्रेष्ठ भावनामय लिंग आहे त्याला तृप्तिलिंग अथवा परात्पर लिंग म्हणतात.॥४९-५०॥

**भावनातीतमव्यक्तं परब्रह्म शिवाभिधम्।**
**इष्टलिङ्गमिदं साक्षादनिष्टपरिहारतः।।**
**धारयेदवधानेन शरीरे सर्वदा बुधः।।५१।।**

**अन्वयार्थ** : अव्यक्तं = रूपादिरहित, भावनातीतं = अशुद्ध वृत्तीला अगोचर असे, शिवाभिधम् = शिव नावाचे, परब्रह्म = परब्रह्मच, अनिष्टपरिहारतः = संसार-रूपी अनिष्टाचा परिहार करीत असल्यामुळे, ते, साक्षात् = प्रत्यक्ष दिसणारे, इदं = हे, इष्टलिङ्गं = इष्टलिंग होय, बुधः = बुद्धिमान लोकांनी, शरीरे = शरीरावर, अवधानेन = अत्यंत काळजीपूर्वक, त्याचे सर्वदा = नेहमी, धारयेत् = धारण करावे.

**भावार्थ** : अव्यक्त भावनातीत व निगमागमांत शिव या नावाने प्रसिद्ध असे जे परब्रह्म तेच इष्टलिंग असून ते संसारपाशरूपी अनिष्टाचा नाश करणारे व इष्ट अशा परमुक्तीचा लाभ करून देणारे आहे. असे इष्टलिंग ज्ञानी लोकांनी आपल्या शरीरावर सावधानतेने सदैव धारण करावे.॥५१॥

**मूर्ध्नि वा कण्ठदेशे वा कक्षे वक्षःस्थलेऽपि वा।**
**कुक्षौ हस्तस्थले वापि धारयेल्लिङ्गमैश्वरम्।।५२।।**

**अन्वयार्थ** : मूर्ध्नि = मस्तकावर, कण्ठदेशे = कंठात, कक्षे = काखेत, वक्षःस्थले = वक्षःस्थळावर, वा = अथवा, कुक्षौ = पोटावर, वापि = अथवा, हस्तस्थले = तळहातावर, ऐश्वरं लिङ्गं = ईश्वरस्वरूप अशा लिंगाचे, धारयेत् = धारण करावे.

**भावार्थ** : इष्टलिंग मस्तकावर, गळ्यात, काखेत, वक्षस्थलावर, पोटावर अथवा हातात धारण करावे.।।५२।।

**नाभेरधस्ताल्लिङ्गस्य धारणं पापकारणम्।**
**जटाग्रे त्रिकभागे च मलस्थाने न धारयेत्।।५३।।**

**अन्वयार्थ** : नाभेः = नाभीच्या, अधस्तात् = खाली, लिङ्गस्य = लिंगाचे, धारणं = धारण करणे, पापकारणम् = पापाला कारण होते, जटाग्रे = जटेच्या टोकावर, त्रिकभागे = पाठीवर, च = आणि, मलस्थाने = मलस्थानावर, न धारयेत् = धारण करू नये.

**भावार्थ** : नाभीच्या खाली, जटेच्या वर, पाठीवर व मलस्थानी लिंगधारण करू नये. केल्यास पापकारक आहे.।।५३।।

**लिङ्गधारी सदा शुद्धो निजलिङ्गं मनोरमम्।**
**अर्चयेद् गन्धपुष्पाद्यैः करपीठे समाहितः।।५४।।**

**अन्वयार्थ** : लिङ्गधारी = इष्टलिंगधारक, सदा = नेहमी, शुद्धः = पवित्र असतो, मनोरमम् = सुंदर असे, निजलिङ्गं = इष्टलिंगाचे, करपीठे = तळहातावर, समाहितः = एकाग्र मनाने, गन्धपुष्पाद्यैः = गंधपुष्पादींनी, अर्चयेत् = पूजा करावी.

**भावार्थ** : इष्टलिंग धारण करणारा शिवभक्त सदा परिशुद्ध असतो. त्याने मनोहर अशा इष्टलिंगाला आपल्या करपीठावर ठेवून त्याची गंधपुष्पादी सामग्रीने, एकाग्र होऊन पूजा करावी.।।५४।।

**बाह्यपीठार्चनादेतत् करपीठार्चनं वरम्।**
**सर्वेषां वीरशैवानां मुमुक्षूणां निरन्तरम्।।५५।।**

**अन्वयार्थ** : मुमुक्षूणां = मोक्षापेक्षी अशा, सर्वेषां = समस्त, वीरशैवानां = वीरशैवांना, निरन्तरम् = सदा, बाह्यपीठार्चनात् = बाह्यपीठार्चनेपेक्षा, एतत् = हे, करपीठार्चनं = तळहातावर इष्टलिंगपूजा करणे, वरम् = श्रेष्ठ आहे.

**भावार्थ** : मुक्तीची इच्छा बाळगणाऱ्या सर्व वीरशैवांना बाह्य पीठावर लिंग ठेवून पूजा करण्यापेक्षा करपीठावर लिंग ठेवून निरंतर पूजा करणे श्रेयस्कर आहे.।।५५।।



**ब्रह्मविष्ण्वादयो देवा मुनयो गौतमादयः।**
**धारयन्ति सदा लिङ्गमुत्तमाङ्गे विशेषतः।।५६।।**
**लक्ष्म्यादिशक्तयः सर्वाः शिवभक्तिविभाविताः।**
**धारयन्त्यलिकाग्रेषु शिवलिङ्गमहर्निशम्।।५७।।**

**अन्वयार्थ** : ब्रह्मविष्णवादयः = ब्रह्मा, विष्णू आदी, देवाः = देव, गौतमादयः = गौतमादी, मुनयः = मुनी, विशेषतः = विशेष रीतीने, सदा = नेहमी, लिङ्गं = इष्टलिंग, उत्तमाङ्गे = मस्तकावर, धारयन्ति = धारण करतात, लक्ष्म्यादि = लक्ष्मी आदी, सर्वाः = सर्व, शक्तयः = शक्तिदेवता, शिवभक्ति-विभाविताः = शिवभक्तीत तत्पर होऊन, अहर्निशम् = रात्रंदिवस, शिवलिङ्गं = शिवलिंग, अलिकाग्रेषु = कपाळावरील बटांच्या ठिकाणी, धारयन्ति = धारण करतात.

**भावार्थ** : ब्रह्मा, विष्णू इत्यादी देवगण, गौतमादी मुनिगण हे आपल्या मस्तकावर विशेषत्वाने सदैव लिंगधारण करतात. या शिवाय शिवभक्तिसंपन्न अशा लक्ष्मी इ. शक्तीही आपल्या मस्तकावर नेहमी शिवलिंग धारण करतात. अशा रीतीने पुरुष असो की स्त्री, सर्वांनीच लिंग धारण करावे हे सिद्ध होते.।।५६-५७।।

**वेदशास्त्रपुराणेषु कामिकाद्यागमेषु च।**
**लिङ्गधारणमाख्यातं वीरशैवस्य निश्चयात्।।५८।।**

**अन्वयार्थ** : वेद = वेदांमध्ये, शास्त्र = शास्त्रांत, पुराणेषु = पुराणांमध्ये, च = आणि, कामिकाद्यागमेषु = कामिक आदी आगमांत, वीरशैवस्य = वीरशैवांचे, लिङ्गधारण = लिंगधारण, निश्चयात् = निश्चयाने, आख्यातं = वर्णिले आहे.

**भावार्थ** : इष्टलिंग शरीरावर धारण करण्याचा सिद्धान्त वेद, शास्त्र, पुराणे व कामिकादी अठ्ठावीस आगमग्रंथांतून स्पष्टपणे प्रतिपादन केलेला आहे.।।५८।।

**ऋगित्याह पवित्रं ते विततं ब्रह्मणस्पते।**
**तस्मात्पवित्रं तल्लिङ्गं धार्यं शैवमनामयम्।।५९।।**

**अन्वयार्थ** : ऋक् = ऋग्वेदात, ब्रह्मणस्पते = हे ब्रह्माचे पती, ते = तुझे, विततं = व्यापक असे लिंगस्वरूप, पवित्रं = पवित्र आहे, इति = अशा रीतीने, आह = सांगितले आहे, तस्मात् = त्यासाठी, अनामयम् = दोषरहित, शैवं = शिवस्वरूप अशा, पवित्रं = पवित्र, तत् = ते, लिङ्गं = लिंग, धार्यं = धारण करण्यास योग्य आहे.

**भावार्थ** : 'पवित्रं ते' या ऋग्वेदाच्या मंत्रात शिवाला ब्रह्मणस्पती अर्थात् चतुर्मुख ब्रह्म्याचा अधिपती अशा अर्थाने संबोधिले आहे. 'हे ब्रह्मणस्पते, तुझे जे लिंगरूप आहे ते शिवादिभूभ्यंत छत्तीस तत्त्वांत व्यापलेले असून ते अत्यंत पवित्र आहे. म्हणून अशा दोषरहित लिंगरूपी तुला शरीरावर धारण करावे' असे ऋग्वेदात सांगितले आहे.।।५९।।

**ब्रह्मेति लिङ्गमाख्यातं ब्रह्मणः पतिरीश्वरः।**
**पवित्रं तद्धि निख्यातं तत्सम्पर्कात्तनुः शुचिः।।६०।।**

**अन्वयार्थ** : लिङ्गं = लिंग, ब्रह्मेति = ब्रह्म म्हणून, आख्यातं = वर्णिले आहे, ब्रह्मणः = ब्रह्मदेवाचे, पतिः = पती, ईश्वरः = शिव आहे, तत् = ते परशिवब्रह्म = पवित्रं = पवित्र या नावाने, विख्यातं = प्रसिद्ध आहे, तत् = त्याच्या, सम्पर्कात् = संपर्काने, तनुः = शरीर, शुचिः = पवित्र झाले.

**भावार्थ** : ते लिंग परब्रह्म नावाने प्रसिद्ध असून ते चतुर्मुख ब्रह्म्याचा अधिपतीही आहे. शिवाय ते अत्यंत पवित्र असल्याने त्याच्या संपर्काने शरीर शुद्ध होते. म्हणून शरीरावर सदैव लिंगधारण करावे.।।६०।।

**अतप्ततनुरज्ञो वै आमः संस्कारवर्जितः।**
**दीक्षया रहितः साक्षान्नाप्नुयाल्लिङ्गमुत्तमम्।।६१।।**

**अन्वयार्थ** : अतप्ततनुः = तपश्चर्या नसलेले, अज्ञः = अज्ञानी, आमः = अपरिपक्व अंतःकरणाचे, संस्कारवर्जितः = संस्कार नसलेले, दीक्षया रहितः = दीक्षा न घेतलेले, अशा जीवांनी, उत्तमम् = श्रेष्ठ असे, लिङ्गं = लिंग, वै = निश्चयाने, साक्षात् = स्वतःच, न आप्नुयात् = घेऊ नये.



**भावार्थ** : ज्याने तपश्चर्या केलेली नाही, ज्याचे अंतःकरण परिपक्व झालेले नाही अर्थात् ज्याला वैराग्य प्राप्त झालेले नाही, ज्याच्यावर शिवसंस्कार झालेले नाहीत, नित्यानित्यवस्तूचा विवेक ज्याला नाही, ज्याच्यावर गुरुकारुण्यरूप दीक्षासंस्कार झालेला नाही, त्याने स्वतःच ते उत्तम असे शिवलिंग आपण होऊन धारण करू नये. म्हणजेच गुरूकडून दीक्षेद्वारा प्राप्त झालेल्या लिंगधारणेनेच भोग आणि मोक्षाची प्राप्ती होते, अन्यथा होत नाही.।।६१।।

**अघोराऽपापकाशीति या ते रुद्र शिवा तनूः।**
**यजुषा गीयते यस्मात् तस्माच्छैवोऽघवर्जितः।।६२।।**

**अन्वयार्थ** : यस्मात् = ज्या अर्थी, रुद्र = हे रुद्रा, ते = तुझे, या = जे, तनूः = लिंगरूपी शरीर, अघोरा = शांत, शिवा = मंगलमय, अपापकाशी = निष्पाप भक्तांच्या शरीरावर प्रकाशित होणारे आहे, इति = असे, यजुषा = यजुर्वेदाने, गीयते = गायिले आहे, तस्मात् = त्या अर्थी, शैवः = लिंगधारी वीरशैव, अघवर्जितः = पापरहित असतो.

**भावार्थ** : हे रुद्रा, तुझे लिंगरूपी शरीर शांत, मंगलमय आणि निष्पाप लोकांच्या, शरीरावर प्रकाशित होणारे आहे, असे यजुर्वेदात म्हटले आहे, म्हणून शरीरावर इष्टलिंग धारण करणारा वीरशैव निष्पाप असतो.।।६२।।

**यो लिङ्गधारी नियतान्तरात्मा**
**नित्यं शिवाराधनबद्धचित्तः।**
**स धारयेत् सर्वमलापहत्यै**
**भस्मामलं चारु यथाप्रयोगम्।।६३।।**

**अन्वयार्थ** : नियतान्तरात्मा = संयत मनाचा, नित्यं = प्रतिदिन, शिवाराधन = शिवाराधनेत, बद्धचित्तः = आसक्त असा, यो = जो, लिङ्गधारी = लिंगधारी आहे, सः = त्याने, सर्व = समस्त, मलापहत्यै = दोषनिवृत्तीसाठी, यथाप्रयोगं = शास्त्रोक्त पद्धतीनुसार, चारु = सुंदर अशा, अमलं = निर्मल, भस्म = विभूतीचे, धारयेत् = धारण करावे.

**भावार्थ** : लिंगधारी, निर्मल अंत:करणाचा, नित्य शिवपूजेत आसक्ती बाळगणारा, अशा शिवलिंगधारी भक्ताने आपल्या सर्व दोषांचे परिमार्जन होण्यासाठी मनोहर आणि निर्मल असे भस्म शास्त्रोक्त पद्धतीने धारण केले पाहिजे.॥६३॥

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ भक्तस्थले गुरुकारुण्यस्थललिङ्गधारणस्थल-प्रसङ्गो नाम षष्ठः परिच्छेदः।***

**सहावा परिच्छेद समाप्त.**

OOO

# सातवा परिच्छेद

**भस्मधारणस्थल - (६)**

**भस्मधारणसंयुक्तः पवित्रो नियताशयः।**
**शिवाभिधानं यत्प्रोक्तं भासनाद्भसितं तथा।।१।।**

**महाभस्मेति सञ्चिन्त्य महादेवं प्रभामयम्।**
**वर्तन्ते ये महाभागा मुख्यास्ते भस्मधारिणः।।२।।**

**अन्वयार्थ** : भस्मधारणसंयुक्तः = भस्मधारी, नियताशयः = निश्चल मनाचा होऊन, पवित्रः = शुद्ध होतो, यत् = जे (भस्म), शिवाभिधानं = शिवाच्या नावाने, प्रोक्तं = ओळखले जाते, तथा = तसेच, भासनात् = शिवतत्त्वाचे प्रकाशन करीत असल्यामुळे, ते भसितं = भसित या नावाने संबोधिले जाते, ये = जे, महाभागाः = महाभाग्यशाली लोक, प्रभामयम् = प्रकाशस्वरूप अशा, महादेवं = परशिवाला, महाभस्मेति = महाभस्म म्हणून, संचित्य = सम्यक् चिंतन करून, वर्ततन्ते = असतात, ते = ते, मुख्याः = मुख्य असे, भस्मधारिणः = भस्मधारी होत.

**भावार्थ** : लिंगधारी भक्तांनी भस्म धारण केल्याने ते पवित्र आणि निर्मल चित्ताचे होतात. जाबालश्रुतीत शिवाला भस्म असे म्हटले आहे. त्यामुळे भस्मध्यानाने शिवध्यान आणि पंचाक्षरी मंत्राचे स्मरण केल्यासारखे होते. तसेच ह्या भस्माच्या ध्यानानेच साधक शिवस्वरूप होतो. आपल्या प्रकाशाने जगाला प्रकाशित केल्यामुळे परमात्म्याला भसित असे म्हणतात. असा प्रकाशमान असलेल्या महादेवाला महाभस्म असे समजून जे त्याचे निरंतर ध्यान करीत असतात तेच श्रेष्ठ असे निरुपाधिक भस्मधारी होत.॥१-२॥

**शिवाग्न्यादिसमुत्पन्नं मन्त्रन्यासादियोगतः।**
**तदुपाधिकमित्याहुर्भस्मतन्त्रविशारदाः ।।३।।**

**अन्वयार्थ** : मन्त्रन्यासादियोगतः = सद्योजातादी मंत्रसंबंधाने, शिवाग्न्यादि-समुत्पन्नं = मंत्रसंस्कृत अग्नीत उत्पन्न झालेले, जे भस्म असते, तत् = ते, सोपाधिकं = सोपाधिक भस्म असे, भस्मतन्त्रविशारदाः = भस्मशास्त्र प्रवीण लोक, आहुः = म्हणतात.

**भावार्थ** : जे भस्म पंचब्रह्म, मंत्र व न्यास यांच्या योगाने व शिवमंत्रामुळे सुसंस्कृत झालेल्या अग्नीपासून निर्माण झाले आहे, त्या भस्माला तंत्रविशारद सोपाधिक भस्म या नावाने ओळखतात.॥३॥

**विभूतिर्भसितं भस्म क्षारं रक्षेति भस्मनः।**
**एतानि पञ्चनामानि हेतुभिः पञ्चभिर्भृशम्।।४।।**

**अन्वयार्थ** : पञ्चभिः = पाच प्रकारच्या, हेतुभिः = कारणांमुळे, भस्मनः = भस्माची, विभूतिः = विभूती, भसितं = भसित, भस्म = भस्म, क्षारं = क्षार, रक्षा = रक्षा, इति = अशी, भृशम् = निश्चित, एतानि = ही, पञ्च = पाच, नामानि = नावे आहेत.

**भावार्थ** : कारणभेदामुळे त्या सोपाधिक भस्माची पाच नावे होतात. ती अशी- १. विभूती, २. भसित, ३. भस्म, ४. क्षार व ५. रक्षा.॥४॥

**विभूतिर्भूतिहेतुत्वाद् भसितं तत्त्वभासनात्।**
**पापानां भर्त्सनाद्भस्म क्षरणात् क्षारमापदाम्।।५।।**
**रक्षणात् सर्वभूतेभ्यो रक्षेति परिगीयते।**

**अन्वयार्थ** : भूतिहेतुत्वात् = ऐश्वर्याला कारण असल्यामुळे, विभूतिः = विभूति, तत्त्वभासनात् = तत्त्वांचे प्रकाशक असल्यामुळे, भसितं = भसित, पापानां = पापांची, भर्त्सनात् = निर्भत्सना करीत असल्यामुळे, भस्म = भस्म, आपदाम् = आपत्तींचा, क्षारणात् = क्षय करीत असल्यामुळे, क्षारं = क्षार, सर्वभूतेभ्यः = सर्वभूतप्रेतादी पासून, रक्षणात् = रक्षण करीत असल्यामुळे, रक्षा = रक्षा, इति = असे, परिगीयते = म्हटले जाते.

**भावार्थ** : भस्मधारणामुळे अणिमादी आठ ऐश्वर्यांची प्राप्ती होते म्हणून त्यास विभूती, शिवतत्त्वाचे प्रकाशन होते म्हणून भसित, मनोवाक्कायजन्य अशा सर्व पापांना भयोत्पादक असल्याने भस्म, तापत्रयाचा क्षय होतो म्हणून क्षार आणि भूतप्रेतादी व अनिष्ट ग्रहांपासून रक्षण होते म्हणून रक्षा असे म्हणतात.॥५॥

**नन्दा भद्रा च सुरभिः सुशीला सुमनास्तथा।।६।।**
**पञ्च गावो विभोर्जाताः सद्योजातादिवक्त्रतः।**



**अन्वयार्थ** : नन्दा = नंदा, भद्रा = भद्रा, सुरभिः = सुरभी, च = आणि, सुशीला = सुशीला, तथा = तशीच, सुमनाः = सुमना, या नावांच्या, पञ्च = पाच, गावः = गाई, विभोः = सदाशिवाच्या, सद्योजातादि = सद्योजातादी, वक्त्रतः = मुखांपासून, जाताः = उत्पन्न झाल्या.

**भावार्थ** : शिवाची पाच मुखे आहेत. त्या मुखांपासून पाच दिव्य गाई उत्पन्न झाल्या. सद्योजात मुखापासून नंदा, वामदेव मुखापासून भद्रा, अघोर मुखापासून सुरभी, तत्पुरुष मुखापासून सुशीला व ईशान मुखापासून सुमना अशा त्या होत.॥६॥

**कपिला कृष्णा च धवला धूम्रा रक्ता तथैव च।।७।।**
**नन्दादीनां गवां वर्णाः क्रमेण परिकीर्तिताः।**

**अन्वयार्थ** : कपिला = कपिल, कृष्णा = काळी, धवला = शुभ्र, धूम्रा = धुरकुट, तथैव = तसेच, रक्ता = लाल अशा, क्रमेण = अनुक्रमाने, नन्दादीनां = नंदादी, गवां = गाईचे, वर्णाः = रंग, परिकीर्तिताः = सांगितले आहेत.

**भावार्थ** : त्यांची रूपे अनुक्रमे अशी होत. कपिला, कृष्णा, धवला, धूम्रा व रक्ता. नंदा कपिल वर्णाची, भद्रा काळी, सुरभी पांढरी, सुशीला धुरकुट रंगाची व सुमना लाल रंगाची अशा त्या आहेत.॥७॥

**सद्योजाताद्विभूतिश्च वामाद्भसितमेव च।।८।।**
**अघोराद्भस्म संजातं तत्पुरुषात्क्षारमेव च।**
**रक्षा चेशानवक्त्राच्च नन्दादिद्वारतोऽभवत्।।९।।**

**अन्वयार्थ** : सद्योजातात् = सद्योजात मुखापासून, विभूतिः = विभूती, च = आणि, वामात् = वामदेव मुखापासून, भसितं = भसित, अघोरात् = अघोर मुखापासून, भस्म = भस्म, सञ्जातं = उत्पन्न झाले, च = आणि, तत्पुरुषात् = तत्पुरुष मुखापासून, क्षारनाम = क्षार नावाचे, च = आणि, ईशानवक्त्रात् = ईशान मुखापासून, रक्षा = रक्षा, असे, नन्दादिद्वारतः = नंदादी गाई द्वारा, अभवत् = उत्पन्न झाले.

**भावार्थ** : सद्योजात मुखापासून उत्पन्न झालेल्या कपिलवर्णी नंदेच्या गोमयापासून विभूती, वामदेव मुखापासून उत्पन्न झालेल्या कृष्णवर्णी भद्रेच्या गोमयापासून भसित, अघोर मुखापासून उत्पन्न झालेल्या धवलवर्णी सुरभीच्या गोमयापासून भस्म, तत्पुरुष मुखापासून उत्पन्न झालेल्या धूम्रवर्णी सुशीलेच्या गोमयापासून रक्षा अशी पाच प्रकारची भस्मे होतात.॥८-९॥

**धारयेन्नित्यकार्येषु विभूतिं च प्रयत्नतः।**
**नैमित्तिकेषु भसितं क्षारं काम्येषु सर्वदा।।१०।।**
**प्रायश्चित्तेषु सर्वेषु भस्म नाम यथाविधि।**
**रक्षा च मोक्षकार्येषु प्रयोक्तव्या सदा बुधैः।।११।।**

**अन्वयार्थ** : नित्यकार्येषु = नित्यकर्म करीत असताना, विभूतिं = विभूती, नैमित्तिकेषु = नैमित्तिक कर्म करीत असताना, भसितं = भसित, काम्येषु = काम्य कर्म करीत असताना, सर्वदा = नेहमी, क्षारं = क्षार, च = आणि, सर्वेषु = सर्व प्रकारच्या, प्रायश्चित्तेषु = प्रायश्चित्त कर्म करीत असताना, भस्म नाम = भस्म, च = आणि, मोक्षकार्येषु = मोक्षकारक कर्म करीत असताना, रक्षा = रक्षा, असे, सदा = नेहमी, यथाविधि = शास्त्रोक्त पद्धतीने, बुधैः = विद्वानांनी, प्रयत्नतः = प्रयत्न-पूर्वक, प्रयोक्तव्या = धारण केले पाहिजे.

**भावार्थ** : नित्य कर्माच्या वेळी विभूती, नैमित्तिक कर्माच्या वेळी भसित, काम्यकर्माच्या वेळी क्षार, प्रायश्चित्त घ्यावयाच्या वेळी भस्म आणि मोक्षप्राप्तीकरिता रक्षा, अशी भस्मे वीरशैवमताच्या विशिष्ट विद्वानांनी इच्छित हेतूसाठी प्रयत्नपूर्वक धारण करावीत.॥१०-११॥

**नन्दादीनां तु ये वर्णाः कपिलाद्याः प्रकीर्तिताः।**
**त एव वर्णा विख्याता भूत्यादीनां यथाक्रमम्।।१२।।**

**अन्वयार्थ** : नन्दादीनां = नंदादी गाईंचे, ये = जे, कपिलाद्याः = कपिलादी, वर्णाः = वर्ण, प्रकीर्तिताः = सांगितले आहेत, त एव = तेच, वर्णाः = वर्ण, = भत्यादीनां = विभूत्यादींना, यथाक्रमं = क्रमशः, विख्याताः = प्रसिद्ध आहेत.



**भावार्थ** : त्या त्या गाईच्या रंगाप्रमाणे भस्माचे वर्ण असतात विभूती-कपिलवर्ण, भसित-काळा, भस्म-पांढरा, क्षार-धुरकुट आणि रक्षा-लाल असे पाच भस्मांचे पाच रंग असतात.॥१२॥

**भस्मोत्पादनमुद्दिष्टं चतुर्धा तन्त्रवेदिभिः।**
**कल्पं चैवानुकल्पं तु उपकल्पमकल्पकम्।।१३।।**
**एषामादिममुत्कृष्टमन्यत् सर्वमभावतः।**

**अन्वयार्थ** : तन्त्रवेदिभिः = शास्त्रज्ञांकडून, भस्मोत्पादन = भस्माची निर्मिती, कल्पं = कल्प, अनुकल्पं = अनुकल्प, तु = आणि, उपकल्पं = उपकल्प, चैव = तसेच, अकल्पं = अकल्प, अशी, चतुर्धा = चार प्रकारची, उद्दिष्टं = सांगितली आहे, एषां = यापैकी, आदिमं = पहिल्या प्रकारचे भस्म, उत्कृष्टं = श्रेष्ठ आहे, अभावतः = ते न मिळाल्यास, अन्यत् सर्वं = इतर कोणतेही भस्म उपयोगात आणावे.

**भावार्थ** : तंत्रविशारद लोक भस्माच्या उत्पत्तीचे कल्प, अनुकल्प, उपकल्प आणि अकल्प असे चार प्रकार सांगतात. या चारांपैकी कल्प हे अत्युत्तम होय. कल्प भस्म कदाचित् मिळाले नाही तर अन्य तीन भस्मांचा उपयोग करावा.॥१३॥

**यथाशास्त्रोक्तविधिना गृहीत्वा गोमयं नवम्।।१४।।**
**सद्येन वामदेवेन कुर्यात् पिण्डमनुत्तमम्।**
**शोषयेत्पुरुषेणैव दहेद् घोराच्छिवाग्निना।।१५।।**
**कल्पं तद्भस्म विज्ञेयमनुकल्पमथोच्यते।**
**वनेषु गोमयं यच्च शुष्कं चूर्णीकृतं तथा।।१६।।**
**दग्धं चैवानुकल्पाख्यमापणादिगतं तु यत्।**
**वस्त्रेणोत्तारितं भस्म गोमूत्राबद्धपिण्डितम्।।१७।।**
**दग्धं प्रागुक्तविधिना भवेद्भस्मोपकल्पकम्।**
**अन्यैरापादितं भस्माप्यकल्पमिति निश्चितम्।।१८।।**

**अन्वयार्थ** : यथाशास्त्रोक्तविधिना = शास्त्रात सांगितलेल्या विधीप्रमाणे, नवं = नूतन, गोमयं = गाईचे शेण, सद्येन = सद्योजात मंत्र म्हणत, गृहीत्वा = घेऊन, वामदेवेन = वामदेव मंत्र म्हणत, अनुत्तमम् = श्रेष्ठ असा, पिण्डं = गोळा, कुर्यात् = करावा, पुरुषेणैव = तत्पुरुष मंत्राचे उच्चारण करीत, शोषयेत् = वाळवावे, घोरात् = अघोर मंत्राचे उच्चारण करीत, शिवाग्निना = पवित्र अग्नीत, दहेत् = जाळावे, तद्भस्म कल्पम् = ते भस्म कल्प होय, अथ = नंतर, अनुकल्पं = अनुकल्पविधि = अनुकल्पविधी, उच्यते = सांगितली जाते, वनेषु = रानात, शुष्कं = वाळलेले, यत् = जे, गोमयं = गाईचे शेण, ते, चूर्णीकृतं = चुरा करून, दग्धं = जाळलेले, अनुकल्पाख्यं = अनुकल्प नावाचे भस्म होय, तथा = तसेच, यथा तु = जे, अपणादिगतं = दुकानादीत मिळते ते, भस्म = भस्म, वस्त्रेणोत्तारितं = वस्त्रगाळ करून, गोमूत्राबद्धपिण्डितं = गोमूत्रात कालवून गोळे केलेले, आणि उपकल्प नावाचे, भस्म = भस्म, भवेत् = होते, अन्यैः = अन्य लोकांकडून, आपादितं = तयार केलेले, भस्म = भस्म, निश्चितं = निश्चितपणे, अकल्पकम् इति = अकल्प या नावाचे होते.

**भावार्थ** : नंदादी गाईंचे ताजे गोमय सद्योजात मंत्राचे उच्चारण करीत, जमिनीवर न पडू देता वरच अलगद धरावे. वामदेव मंत्राचा उच्चार करीत त्या ताज्या गोमयाचे लहान लहान गोळे करावेत. तत्पुरुषमंत्राचा उच्चार करीत ते गोळे वाळवावे. त्यानंतर अघोरमंत्राचा उच्चार करीत, शिवमंत्रसंस्कृत अग्नीत जाळून त्यांचे भस्म करावे. ईशानमंत्राचे उच्चारण करीत ते भस्म बिल्व-सुवर्ण-रजतादींच्या पात्रात ठेवावे. अशा विधीने तयार केलेले ते भस्म 'कल्पभस्म' होय असे जाणावे. रानातील वाळलेले गोमय (रानशेणी) आणून त्याचे चूर्ण करून पूर्वोक्त विधीने जाळून जे भस्म तयार होते ते 'अनुकल्प' होय. या ठिकाणी 'कल्प' भस्माप्रमाणे आरंभीच्या गोमय धरणे, त्याचे गोळे करणे व वाळविणे या तीन संस्कारक्रिया नसतात. बाजारातील भस्म वस्त्रगाळ करून गोमूत्रात चांगले भिजवून त्याचे गोळे करावे व वाळलेले गोळे पूर्वोक्त विधीने जाळून तयार झालेल्या भस्मास 'उपकल्प' म्हणतात. मंत्रादी विधी न जाणणाऱ्या व्यापाऱ्याकडून आणलेले भस्म 'अकल्प' होय.॥१४-१८॥



**एष्वेकतममादाय पात्रेषु कलशादिषु।**
**त्रिसन्ध्यमाचरेत्स्नानं यथासंभवमेव वा।।१९।।**

**अन्वयार्थ** : कलशादिषु = कलशादी, पात्रेषु = पात्रात ठेवलेले, एषु = ह्यापैकी, एकतमम् = काणतेही एक भस्म, आदाय = घेऊन, त्रिसन्ध्यं = तीन वेळा, वा = अथवा, यथासम्भवं = शक्य होईल तितक्या वेळा, स्नानं = भस्मस्नान, आचरेत् = अरावे.

**भावार्थ** : वरीलपैकी कोणतेही एक भस्म कळशीत वा एकाद्या पात्रात घेऊन रोज विधिपूर्वक तीन वेळा भस्मस्नान करावे अथवा शक्तिप्रमाणे एक वेळ तरी अवश्य करावे.॥१९॥

**स्नानकाले करौ पादौ प्रक्षाल्य विमलाम्भसा।**
**वामहस्ततले भस्म क्षिप्त्वाच्छाद्यान्यपाणिना।।२०।।**
**अष्टकृत्वाथ मूलेन मौनी भस्माभिमन्त्र्य च।**
**शिर ईशानमन्त्रेण पुरुषेण मुखं तथा।।२१।।**
**हृत्प्रदेशमघोरेण वामदेवेन गुह्यकम्।**
**पादौ सद्येन सर्वाङ्गं प्रणवेनैव सेचयेत्।।२२।।**

**अन्वयार्थ** : स्नानकाले = स्नानाच्या वेळी, विमलाम्भसा = शुद्ध जलाने, करौ = दोन्ही हात, पादौ = दोन्ही पाय, प्रक्षाल्य = धुवून, वामहस्ततले = डाव्या तळहातावर, भस्म = भस्म, क्षिप्त्वा = ठेवून, अन्यपाणिना = दुसऱ्या हाताने, आच्छाद्य = झाकून, च = आणि, मौनी = मौन होऊन, मूलेन = पंचाक्षरमंत्राने, भस्म = भस्म, अष्टकृत्वा = आठ वेळा, अभिमन्त्र्य = अभिमंत्रून, अथ = नंतर, ईशानमन्त्रेण = ईशानमंत्राने, शिरः = मस्तक, पुरुषेण = तत्पुरुषमंत्राने, मुखं = मुख, तथा = तसेच, अघोरेण = अघोरमंत्राने, हृत्प्रदेशं = हृदय, वामदेवेन = वामदेवमंत्राने, गुह्यकं = गुह्य स्थान, सद्येन = सद्योजातमंत्राने, पादौ = दोन्ही पाय, आणि, प्रणवेन = ॐ काराने, सर्वाङ्गं = सर्व अंगावर, सेचयेत् = सिंचन करून घ्यावे.

**भावार्थ** : भस्मस्नानाच्या वेळी स्वच्छ पाण्याने हातपाय धुवून आपल्या उजव्या मांडीवर डावा हात ठेवावा आणि त्यात भस्म ठेवून त्यावर उजवा हात

झाकावा. मौन धारण करून मूलमंत्राने आठ वेळा भस्म अभिमंत्रित करावे. नंतर ते ईशानमंत्राने मस्तकावर, तत्पुरुषाने मुखावर, अघोरमंत्राने हृदयावर, वामदेवमंत्राने गुह्यस्थानावर, सद्योजात मंत्राने दोन्ही पायांवर आणि ॐकार मंत्राचा जप करीत सर्वांगावर त्याचे सिंचन करावे. ह्यालाच भस्मस्नान म्हणतात.॥२०-२१॥

**भस्मना विहितं स्नानमिदमाग्नेयमुत्तमम्।**
**स्नानेषु वारुणाद्येषु मुख्यमेतन्मलापहम्।।२३।।**

**अन्वयार्थ** : भस्मना = भस्माने, विहितं = केलेले, इदं = हे, आग्नेयं = आग्नेय, स्नानं = स्नान, उत्तमं = श्रेष्ठ होय, वारुणाद्येषु = जल आदीने केल्या जाणाऱ्या, स्नानेषु = स्नानांमध्ये, मलापहं = सर्व दोष दूर करणारे, एतत् = हे, मुख्यं = मुख्य होय.

**भावार्थ** : धर्मशास्त्रात मांत्र, भौम, आग्नेय, वायव्य, दिव्य, वारुण आणि मानस या नावांची सप्तविध स्नाने सांगितली आहेत. शास्त्रात वर्णिलेल्या या सात स्नानांपैकी मांत्र, भौम, वायव्य, दिव्य आणि वारुण या स्नानांमुळे केवळ बाह्य मलांचा दोष नाहीसा होतो, तर मानसस्नानाने केवळ आंतरिक मल नाहीसा होतो. परंतु आग्नेय नावाच्या या भस्मस्नानामुळे मात्र अंतर्बाह्य सर्व दोष नाहीसे होतात. म्हणून हे भस्मस्नान सर्व स्नानांत श्रेष्ठ मानले आहे.॥२३॥

**भस्मस्नानवतां पुंसां यथायोगं दिनेदिने।**
**वारुणाद्यैरलं स्नानैर्बाह्यदोषापहारिभिः।।२४।।**

**अन्वयार्थ** : यथायोगं = शास्त्रोक्त विधीनुसार, दिने दिने = प्रतिदिवस, भस्मस्नानवतां = भस्मस्नान करणाऱ्या, पुंसां = मनुष्यांना, बाह्यदोषापहारिभिः = बाह्य दोष दूर करणारे, वारुणाद्यैः = जलादी, स्नानैः = स्नाने, अलम् = पुरेत.

**भावार्थ** : शास्त्रोक्त पद्धतीने प्रतिदिनी भस्मस्नान करणाऱ्या शिवभक्ताच्या बाह्य व अभ्यंतर मलांचा नाश होतो, म्हणून असे भस्मस्नान करणाऱ्यांना केवळ बाह्य मलांचाच नाश करणाऱ्या जलादी स्नानांचे काही प्रयोजन नसते.॥२४॥



**आग्नेयं भस्मना स्नानं यतिभिस्तु विधीयते।**
**आर्द्रस्नानात्परं भस्म आर्द्रे जन्तुवधो ध्रुवम्।।२५।।**

**अन्वयार्थ** : यतिभिः = यतींकडून, भस्मना = भस्माने, आग्नेयं = आग्नेय, स्नानं = स्नान, विधीयते = केले जाते, आर्द्रस्नानात् = जलस्नानापेक्षा, भस्म = भस्मस्नान, परं = श्रेष्ठ आहे, आर्द्रे = जलस्नानात, जन्तुवधः = प्राणिहिंसा, ध्रुवं = निश्चित होत असते.

**भावार्थ** : अग्नीत जसा प्रकाश असतो तसे भस्मस्नानात ज्ञान प्रदान करण्याची शक्ती असते. जलस्नानापेक्षा ते श्रेष्ठ असून जलस्नानात जसा जीवजंतूंचा नाश होतो तसा या भस्मस्नानात होत नाही.॥२५॥

**आर्द्रं तु प्रकृतिं विद्यात् प्रकृतिं बन्धनं विदुः।**
**प्रकृतेस्तु प्रहाणार्थं भस्मना स्नानमिष्यते।।२६।।**

**अन्वयार्थ** : आर्द्रं = जल, तु = निश्चयाने, प्रकृतिं = प्रकृती असे, विन्द्यात् = समजावे, प्रकृतिं = प्रकृतीला, बन्धनं = बंधन, विदुः = समजतात, प्रकृतेः = प्रकृतीच्या, प्रहाणार्थं = नाशासाठी, तु = निश्चयाने, भस्मना = भस्माचे, स्नानं = स्नानाची, इष्यते = इच्छा केली जाते.

**भावार्थ** : शुक्र व शोणित हे दोन्ही जलांश असून ते गर्भवासास कारण आहेत. तो गर्भवास म्हणजे प्रकृती हे बंधन होय. भोज्य-भोजनरूपाने प्रकृती पुरुषाला बंधनकारक आहे असे ज्ञाते मानतात. पुरुष प्रकृतीमुळे बद्ध होतो. म्हणून प्रकृतीच्या नाशाकरिता अर्थात् जलस्नानामुळे उत्पन्न होणाऱ्या दोषांच्या निवृत्तीकरिता भस्मस्नान हेच योग्य होय.॥२६॥

**ब्रह्माद्या विबुधाः सर्वे मुनयो नारदादयः।**
**योगिनः सनकाद्याश्च बाणाद्या दानवा अपि।।२७।।**
**भस्मस्नानयुताः सर्वे शिवभक्तिपरायणाः।**
**निर्मुक्तदोषकलिला नित्यशुद्धा भवन्ति हि।।२८।।**

**अन्वयार्थ** : ब्रह्माद्याः = ब्रह्मादी, सर्वे = सर्व, विबुधाः = देवता, नारदादयः = नारदादी, मुनयः = मुनी, च = आणि, सनकाद्याः = सनकादी, योगिनः = योगी,

अपि = तसेच, बाणाद्या: = बाणादी, दानवा: = दानव, शिवभक्तिपरायणा: = शिवभक्तिनिष्ठ होऊन, सर्वे = सर्व, भस्मस्नानयुता: = भस्मस्नानकरून, निर्मुक्तदोष-कलिला: = निर्दोष होऊन, हि = निश्चयाने, नित्यशुद्धा: = नित्य शुद्ध, भवन्ति = असतात.

**भावार्थ** : शिवभक्तिपरायण असे जे ब्रह्मादी सर्व देव, नारदादी ऋषिगण, सनकादी योगी, बाणासुरादी दैत्य हे सर्व नित्य भस्मस्नान करीत असल्यामुळे सर्व दोषांपासून मुक्त होऊन सदैव परिशुद्ध असतात.॥२७-२८॥

**नम:शिवायेति भस्म कृत्वा सप्ताभिमन्त्रितम्।**
**उद्धूलयेत्तेन देहं त्रिपुण्ड्रं चापि धारयेत्।।२९।।**

**अन्वयार्थ** : नम: शिवायेति = नम:शिवाय या मंत्राने, भस्म = भस्म, सप्ताभिमन्त्रितम् = सात वेळा अभिमंत्रित, कृत्वा = करून, च = आणि, तेन = त्याने, देहं = देहावर, उद्धूलयेत् = उद्धूलन करावे, अपि = तसेच, त्रिपुण्ड्रं = त्रिपुंड्र, धारयेत् = धारण करावे.

**भावार्थ** : सप्तजन्मांतील दोषांच्या निवृत्तीकरिता 'नम:शिवाय' या मंत्राने सात वेळा भस्म अभिमंत्रित करून ते शरीरावर उधळून घ्यावे. नंतर त्या भस्माचे त्रिपुंड्र धारण करावे.॥२९॥

**सर्वाङ्गोद्धूलनं चापि न समानं त्रिपुण्ड्रकै:।**
**तस्मात् त्रिपुण्ड्रमेवैकं लिखेदुद्धूलनं विना।।३०।।**

**अन्वयार्थ** : सर्वाङ्गोद्धूलनं चापि = सर्वांगावर भस्माचे उद्धूलन सुद्धा, त्रिपुण्ड्रकै: = त्रिपुंड्राच्या, न समानं = समान होत नाही, तस्मात् = त्यासाठी, उद्धूलनं विना = उद्धूलनाऐवजी, त्रिपुण्ड्रमेवैकं = केवळ त्रिपुंड्रच, लिखेत = लावून घ्यावे.

**भावार्थ** : आपल्या सर्वांगावर भस्माचे अभिसिंचन करण्यापेक्षा शरीरावर त्रिपुंड्र धारण करणे श्रेष्ठ होय. कारण शरीरभर भस्माचे अभिसिंचन केले तरी एका त्रिपुंड्रधारणाची ते बरोबरी करू शकत नाही. म्हणून अभिसिंचनाशिवाय मुख्य त्रिपुंड्र धारण करावे.॥३०॥

**त्रिपुण्ड्रं धारयेन्नित्यं भस्मना सलिलेन च।**
**स्थानेषु पञ्चदशसु शरीरे साधकोत्तम:।।३१।।**



**अन्वयार्थ** : साधकोत्तम: = श्रेष्ठ साधकाने, शरीरे = शरीरावर, पञ्चदशसु = पंधरा, स्थानेषु = स्थानी, सलिलेन = जलमिश्रित, भस्मना = भस्माने, नित्यं = प्रतिदिन, त्रिपुण्ड्रं = त्रिपुंड्र, धारयेत् = धारण करावे.

**भावार्थ** : श्रेष्ठ साधकाने शरीराच्या पंधरा स्थानांवर जलमिश्रित भस्माने त्रिपुंड्र धारण करावे.॥३१॥

**उत्तमाङ्गे ललाटे च श्रवणद्वितये तथा।**
**गले भुजद्वये चैव हृदि नाभौ च पृष्ठके।।३२।।**
**बाहुयुग्मे ककुद्देशे मणिबन्धद्वये तथा।**
**त्रिपुण्ड्रं भस्मना धार्यं मूलमन्त्रेण साधकै:।।३३।।**

**अन्वयार्थ** : साधकै: = साधकांनी, मूलमन्त्रेण = पंचाक्षर महामंत्राचा उच्चार करीत, उत्तमाङ्गे = मस्तकावर, ललाटे = कपाळावर, च = आणि, श्रवणाद्वितये = दोन्ही कानांवर, तथा = तसेच, गले = गळ्यावर, चैव = तसेच, भुजद्वये = दोन्ही खांद्यावर, हृदि = हृदयावर, नाभौ = बेंबीवर, च = आणि, पृष्ठके पाठीवर, बाहुयुग्मे = दोन्हीं दंडांवर, ककुद्देशे = मानेवर, तथा = तसेच, मणिबन्धद्वये = दोन्ही मनगटांवर, भस्मना = भस्माने, त्रिपुण्ड्रं = त्रिपुंड्र, धार्यम् = धारण करावे.

**भावार्थ** : मस्तकावर, कपाळावर, दोन्हीं कानांवर, गळ्यावर, दोन्हीं खांद्यांवर, हृदयावर, बेंबीवर, पाठीवर, दोन्ही, दंडांवर, मानेवर आणि दोन्ही मनगटांवर साधकाने पंचाक्षर मंत्राचा उच्चार करीत त्रिपुंड्र धारण करावे. अशा या भस्मधारणव्रताला श्रुतीत शांभवव्रत असे म्हटले आहे.॥३२-३३॥

**वामहस्ततले भस्म क्षिप्त्वाच्छाद्यान्यपाणिना।**
**अग्निरित्यादिमन्त्रेण स्पृशन् वाराभिमन्त्र्य च।।३४।।**
**त्रिपुण्ड्रमुक्तस्थानेषु दध्यात् सजलभस्मना।**
**शिवं शिवङ्करं शान्तं स प्राप्नोति न संशय:।।३५।।**

**अन्वयार्थ** : वामहस्ततले = डाव्या हाताच्या तळव्यावर, भस्म = भस्म, क्षिप्त्वा = ठेवून, अन्यपाणिना = दुसऱ्या हाताने, आच्छाद्य = झाकून, अग्निरित्यादि-मन्त्रेण = 'अग्निरिति भस्म' आदि मंत्राने, स्पृशन् = स्पर्श करून, वारा =

पाण्याने, अभिमन्त्र्य = अभिमंत्रित करून, च = आणि, सजल = जलमिश्रित, भस्मना = भस्माने, उक्तस्थानेषु = सांगितलेल्या स्थानांवर, त्रिपुण्ड्रं = त्रिपुंड्र, दध्यात् = धारण करावे. म्हणजे सः = तो साधक, शिवङ्करं = कल्याणकारी, शान्तं = शांत असे, शिवं = शिवस्वरूप, प्राप्नोति = प्राप्त करून घेतो, न संशयः = यात संशय नाही.

**भावार्थ** : साधकाने आपल्या डाव्या तळहातावर भस्म घेऊन त्यावर उजवा हात झाकावा. नंतर 'अग्निरिति भस्म' या मंत्राने त्यास स्पर्श करून त्यावर पाणी शिंपडावे. नंतर पाण्याने भिजविलेले भस्म घेऊन वर सांगितलेल्या पंधरा स्थानांवर त्रिपुंड्र धारण करावे. असे त्रिपुंड्र धारण करणारा मनुष्य शुभकारक व शांत असे शिवस्वरूप प्राप्त करून घेतो हे निस्संशय होय.॥३४-३५॥

**मध्याङ्गुलित्रयेणैव स्वदक्षिणकरस्य तु।**
**षडङ्गुलायतं मानमपि वाऽलिकमानकम्।।३६।।**
**नेत्रयुग्मप्रमाणेन फाले दध्यात् त्रिपुण्ड्रकम्।**

**अन्वयार्थ** : स्व = आपल्या, दक्षिणकरस्य = उजव्या हाताच्या, मध्याङ्गुलि-त्रयेण = मधल्या तीन बोटांनी, षडङ्गुलायतं = सहा बोटे लांब, मानं = मानाचे, अपि = आणि, अलिकमानकम् = कपाळ भरून, वा = अथवा, नेत्रयुग्मप्रमाणेन = दोन्ही डोळ्यांच्या कडांपर्यंत, फाले = कपाळावर, त्रिपुण्ड्रकं = त्रिपुंड्र, दध्यात् = धारण करावे.

**भावार्थ** : आपल्या उजव्या हाताच्या तर्जनी, मध्यमा व अनामिका या तीन बोटांनी सहा अंगुलीपर्यंत कपाळभरून अथवा दोन्ही डोळ्यांच्या मर्यादेपर्यंत त्रिपुंड्र धारण करावे हा पहिला प्रकार होय.॥३६॥

**मध्यमाऽनामिकाङ्गुष्ठैरनुलोमविलोमतः ।।३७।।**
**धारयेद्यस्त्रिपुण्ड्राङ्कं स रुद्रो नात्र संशयः।**

**अन्वयार्थ** : मध्यमाऽनामिकाङ्गुष्ठैः = मध्यमा, अनामिका आणि अंगठा या तीन बोटांनी, अनुलोमविलोमतः = अनुलोमविलोम पद्धतीने, त्रिपुण्ड्राङ्कं = त्रिपुंड्र,



धारयेत् = धारण करावे म्हणजे, सः = तो, रुद्रः = रुद्रच होतो, नात्र संशयः = यात संशय नाही.

**भावार्थ** : मध्यमा व अनामिका या दोन बोटांनी प्रथम अनुलोम म्हण्जे कपाळाच्या डावीकडून सुरू करून कपाळाला प्रदक्षिणारूपाने भस्माच्या दोन रेषा काढाव्या आणि त्यामध्ये अंगठ्याने प्रतिलोम पद्धतीने म्हणजे कपाळाच्या उजवीकडून डावीकडे फक्त मध्यभागी एक रेषा काढावी. या दुसऱ्या प्रकाराला अनुलोम-प्रतिलोम प्रक्रिया म्हणतात. असे त्रिपुंड्र धारण करतो तो मनुष्य प्रत्यक्ष रुद्र होय, यात संशय नाही. यामुळे पहिल्या प्रकारापेक्षा हा दुसरा प्रकार श्रेष्ठ मानला जातो.॥३७॥

**ऋजु श्वेतमनुव्याप्तं स्निग्धं श्रोत्रप्रमाणकम्।।३८।।**
**एवं सल्लक्षणोपेतं त्रिपुण्ड्रं सर्वसिद्धिदम्।**

**अन्वयार्थ** : ऋजु = सरळ, श्वेतं = शुभ्र, अनुव्याप्तं = दाट, स्निग्धं = मृदु, श्रोत्रप्रमाणकं = कानापर्यंत, एवं = अशा, सल्लक्षणोपेतं = सलक्षण, त्रिपुण्ड्रं = त्रिपुंड्र, सर्वसिद्धिदम् = सर्व सिद्धी प्राप्त करून देणारे होते.

**भावार्थ** : त्रिपुंड्र हे सरळ, शुभ्र, एकमेकास न चिकटलेले, अखंड, मृदू, ठळक व कानापर्यंत लांब गेलेले असावे. याप्रमाणे सर्व लक्षणांनी युक्त असणारे त्रिपुंड्र धारण केले म्हणजे साधकाचे सर्व मनोरथ पूर्ण होतात.॥३८॥

**प्रातःकाले च मध्याह्ने सायाह्ने च त्रिपुण्ड्रकम्।।३९।।**
**कदाचिद्भस्मना कुर्यात् स रुद्रो नात्र संशयः।**
**एवंविधं विभूत्या च कुरुते यस्त्रिपुण्ड्रकम्।।**
**स रौद्रधर्मसंयुक्तस्त्रयीमय इति श्रुतिः।।४०।।**

**अन्वयार्थ** : प्रातःकाले = प्रातःकाळी, मध्याह्ने = दुपारी, च = आणि, सायाह्ने = सायंकाळी, कदाचित् = कोणत्याही वेळी, भस्मना = भस्माने, त्रिपुण्ड्रकं = त्रिपुंड्र, कुर्यात् = धारण करावे, सः = तो, रुद्रः = रुद्रच, अत्र = या विषयी, न संशयः = संशय नाही, एवंविधं = अशा रीतीने, यः = जो, विभूत्या = विभूतीने, त्रिपुण्ड्रकं = त्रिपुंड्र, कुरुते = धारण करतो, सः = तो,

रौद्रधर्मसंयुक्तः = शिवधर्मयुक्त, आणि, त्रयीमयः = वेदस्वरूप होतो, इति = असे, श्रुतिः = श्रुतिवचन आहे.

**भावार्थ** : सकाळी, माध्यान्ही आणि सायंकाळी अथवा केव्हाही, जो पूर्वोक्तप्रकारे भस्माचे त्रिपुंड्र धारण करतो, तो रुद्रस्वरूप होय यात मुळीच संशय नाही. असा मनुष्य शिवाचारांनी युक्त व वेदत्रयस्वरूप होतो असे श्रुतिवचन आहे.॥३९-४०॥

**ब्रह्मा विष्णुश्च रुद्रश्च देवाः शक्रपुरोगमाः।**
**त्रिपुण्ड्रं धारयन्त्येव भस्मना परिकल्पितम्।।४१।।**
**वसिष्ठाद्या महाभागा मुनयः श्रुतिकोविदाः।**
**धारयन्ति सदाकालं त्रिपुण्ड्रं भस्मना कृतम्।।४२।।**

**अन्वयार्थ** : ब्रह्मा = ब्रह्मा, विष्णुः = विष्णू, रुद्रः = रुद्र, च = आणि, शक्रपुरोगमाः = इंद्रादी, देवाः = देव, भस्मना = भस्माने, परिकल्पितं = रेखिलेले, त्रिपुण्ड्रं = त्रिपुंड्र, एव = निश्चियाने, धारयन्ति = धारण करतात, श्रुतिकोविदाः = वेद जाणणारे, महाभागाः = भाग्यवंत, वसिष्ठाद्याः = वसिष्ठादी, मुनयः = मुनी, सदाकालं = नेहमी, भस्मना कृतं = भस्माचे केलेले, त्रिपुण्ड्रं = त्रिपुंड्र, धारयन्ति = धारण करतात.

**भावार्थ** : ब्रह्मा, विष्णू, रुद्र, इंद्रादी सुरगण भस्माचे त्रिपुंड्र धारण करतात. वसिष्ठादी ऋषी व वेदज्ञ मुनी सदैव त्रिपुंड्र धारण करतात.॥४१-४२॥

**शैवागमेषु वेदेषु पुराणेष्वखिलेषु च।**
**स्मृतीतिहासकल्पेषु विहितं भस्मपुण्ड्रकम्।।**
**धारणीयं समस्तानां शैवानां च विशेषतः।।४३।।**

**अन्वयार्थ** : शैवागमेषु = शैवागमांत, वेदेषु = वेदांत, अखिलेषु = समस्त, पुराणेषु = पुराणांत, च = आणि, स्मृतीतिहासकल्पेषु = स्मृती, इतिहास आणि कल्पशास्त्रात, भस्मपुण्ड्रकं = भस्मत्रिपुंड्राचे, विहितं = विधान सांगितले आहे, म्हणून, समस्तानां = सर्वांनी, च = आणि, विशेषतः = विशेष करून, शैवानां = वीरशैवांनी, धारणीयं = अवश्य धारण करावे.



**भावार्थ** : शिवागम, वेद, सर्व पुराणे, स्मृती, इतिहास व कल्पशास्त्र या सर्वांत भस्मधारणेचे विधान सांगितले आहे. म्हणून सर्वांनी आणि विशेषतः वीरशैवांनी भस्माचे त्रिपुंड्र अवश्य धारण करावे॥४३॥

**नास्तिको भिन्नमर्यादो दुराचारपरायणः।**
**भस्मत्रिपुण्ड्रधारी चेन्मुच्यते सर्वकिल्बिषैः।।४४।।**

**अन्वयार्थ** : नास्तिकः = नास्तिक, भिन्नमर्यादः = शास्त्रमर्यादेचे उल्लंघन करणारा, च = आणि, दुराचारपरायणः = दुराचारी, भस्म = भस्माचे, त्रिपुण्ड्रधारी चेत् = त्रिपुंड्र धारण केल्यास, सर्वकिल्बिषैः = सर्व पापांपासून, मुच्यते = मुक्त होतो.

**भावार्थ** : वेदविरुद्धाचारी असा नास्तिक असो, धर्मशास्त्राची मर्यादा उल्लंघन करणारा दुराचारी असो, त्याने त्रिपुंड्र धारण केल्यास तो सर्व पापांपासून मुक्त होतो.॥४४॥

**रुद्राक्षधारणस्थल - (७)**

**भस्मना विहितस्नानस्त्रिपुण्ड्राङ्कितमस्तकः।**
**शिवार्चनपरो नित्यं रुद्राक्षमपि धारयेत्।।४५।।**

**अन्वयार्थ** : भस्मना = भस्माने, विहितस्नानः = स्नान केलेला, त्रिपुण्ड्राङ्कितमस्तकः = कपाळावर त्रिपुंड्र धारण केलेला, शिवार्चनपरः = शिवार्चननिरत, अशा साधकाने, नित्यं = रोज, रुद्राक्षमपि = रुद्राक्षसुद्धा, धारयेत् = धारण करावेत.

**भावार्थ** : भस्मधारणस्थलात सांगितलेल्या विधीप्रमाणे भस्मस्नान, भस्मोद्धूलन तसेच मस्तकावर त्रिपुंड्र धारण करून शिवपूजा करणाऱ्या साधकाने नित्य शिवपूजेच्या वेळी रुद्राक्षदेखील धारण करावे.॥४५॥

**रुद्राक्षधारणादेव मुच्यन्ते सर्वपातकैः।**
**दुष्टचित्ता दुराचारा दुष्प्रज्ञा अपि मानवाः।।४६।।**

**अन्वयार्थ** : दुष्टचित्ताः = दुष्टवृत्तीचे, दुराचाराः = दुराचारी, दुष्प्रज्ञाः = हीन बुद्धीचे, असे, मानवा अपि = मानवसुद्धा, रुद्राक्षधारणादेव = केवळ रुद्राक्ष धारण केल्याने, सर्वपातकैः = सर्व पातकांपासून, मुच्यन्ते = मुक्त होतात.

**भावार्थ** : जे मनाने दुष्ट आहेत, दुराचारी आणि दुष्ट बुद्धीचे आहेत, अशा मनुष्यांनी केवळ रुद्राक्ष धारण केल्यास त्यांचीही सर्व पापे नाहीशी होतात. म्हणून सर्वांनी रुद्राक्षधारण करावे.॥४६॥

**पुरा त्रिपुरसंहारे त्रिनेत्रो जगतां पतिः।**
**उदपश्यत् पुरां योगमुन्मीलितविलोचनः॥४७॥**
**निपेतुस्तस्य नेत्रेभ्यो बहवो जलबिन्दवः।**
**तेभ्यो जाता हि रुद्राक्षा रुद्राक्षा इति कीर्तिताः॥४८॥**

**अन्वयार्थ** : पुरा = पूर्वी, जगतां = जगांचा, पतिः = अधिपती असा, त्रिनेत्रः = शिव, त्रिपुरसंहारे = त्रिपुरासुरांच्या संहाराच्या वेळी, उन्मीलित-विलोचनः = डोळे उघडून, पुरां = पुरांचे, योगं = जुळणे, उदपश्यत् = वर दृष्टी करून पाहात हातो, तेव्हा, तस्य = त्याच्या, नेत्रेभ्यः = नेत्रांतून, बहवः = पुष्कळ, जलबिन्दवः = अश्रूंचे थेंब, निपेतुः = खाली पडले, तेभ्यः = त्यापासून, हि = निश्चयाने, रुद्राक्षाः = रुद्राक्ष, जाताः = उत्पन्न झाले, ते रुद्राक्षा इति = रुद्राक्ष म्हणून, कीर्तिताः = प्रसिद्धीस आले.

**भावार्थ** : पूर्वी त्रिपुरासुरांचा वध करण्याच्या प्रसंगी, जगांचा पती असा त्रिनेत्रधारी शिव त्रिपुरासुरांची आकाशात भ्रमण करणारी तीन नगरे एकत्र केव्हा येतात हे वर दृष्टी लावून एकटक पाहात असताना त्याच्या नेत्रांतून जे योगाश्रू खाली पडले त्यापासून रुद्राक्ष उत्पन्न झाले. रुद्राच्या अशा (नेत्रा)पासून उत्पन्न झाले म्हणून त्यांना रुद्राक्ष हे नाव प्राप्त झाले, अशी कथा प्रसिद्ध आहे.॥४७-४८॥

**रुद्रनेत्रसमुन्पन्ना रुद्राक्षा लोकपावनाः।**
**अष्टत्रिंशत्प्रभेदेन भवन्त्युत्पत्तिभेदतः॥४९॥**

**अन्वयार्थ** : रुद्रनेत्रसमुत्पन्नाः = रुद्राच्या नेत्रापासून उत्पन्न झालेले, रुद्राक्षाः = रुद्राक्ष, लोकपावनाः = लोकांना पवित्र करणारे आहेत, ते, उत्पत्ति-भेदतः = उत्पत्तीच्या भेदांमुळे, अष्टत्रिंशत्प्रभेदेन = अडतीस प्रकारचे, भवन्ति = असतात.



**भावार्थ** : अशा रीतीने रुद्राच्या नेत्रांपासून उत्पन्न झालेल्या, लोकांना पावन करणाऱ्या रुद्राक्षांचे त्यांच्या उत्पत्तीच्या वेगळेपणावरून अडतीस भेद झाले आहेत.॥४९॥

**नेत्रात्सूर्यात्मनः शम्भोः कपिला द्वादशोदिताः।**
**श्वेताः षोडशसञ्जाताः सोमरूपाद्विलोचनात्॥५०॥**
**कृष्णा दशविधा जाता वह्निरूपाद्विलोचनात्।**
**एवमुत्पत्तिभेदेन रुद्राक्षा बहुधा स्मृता॥५१॥**

**अन्वयार्थ** : शम्भोः = शिवाच्या, सूर्यात्मनो नेत्रात् = सूर्यरूप नेत्रापासून, कपिलाः = कपिल वर्णाचे, द्वादशः = बारा प्रकारचे रुद्राक्ष, उदिताः = उत्पन्न झाले. सोमरूपाद विलोचनात् = चंद्ररूप नेत्रापासून, श्वेताः = शुभ्र वर्णाचे, षोडश = सोळा प्रकारचे रुद्राक्ष, सञ्जाता = उत्पन्न झाले, वह्निरूपाद् विलोचनात् = अग्निरूप नेत्रापासून, कृष्णाः = काळ्या रंगाचे, दशविधाः = दहा प्रकारचे रुद्राक्ष, जाताः = उत्पन्न झाले, एवं = अशा प्रकारे, उत्पत्तिभेदेन = उत्पत्तीच्या भेदामुळे, रुद्राक्षाः = रुद्राक्ष, बहुधा = अनेक प्रकारचे, स्मृताः = सांगितले आहेत.

**भावार्थ** : त्रिनेत्रधारी शंकराचे तीन नेत्र म्हणजे सूर्य, चंद्र आणि अग्नी. सूर्याच्या बारा, चंद्राच्या सोळा आणि अग्नीच्या दहा कला आहेत. सूर्याच्या तपिनी, तापिनी, धूम्रा, मरिची, ज्वलिनी, रुची, सुषम्ना, भोगदा, विश्वा, बोधिनी, धारिणी आणि क्षमा या बारा कलांपासून कपिल वर्णाचे बारा प्रकारचे रुद्राक्ष उत्पन्न झाले. चंद्राच्या अमृता, मानदा, पूषा, तुष्टी, पुष्टी, रती, धृती, शशिनी, चंद्रिका, कांती, ज्योत्स्ना, श्री, प्रीती, अंगदा, पूर्णा आणि पूर्णामृता या सोळा कलापासून सोळा प्रकारचे पांढरे रुद्राक्ष निर्माण झाले. अग्नीच्या धूम्रा, अर्ची, ऊष्मा, ज्वलिनी, ज्वालिनी, विस्फुलिंगिनी, सुश्री, सुरूपा, कपिला आणि हव्यकव्यवहा या दहा कलांपासून दहा प्रकारचे काळे रुद्राक्ष उत्पन्न झाले. याप्रमाणे उत्पत्तीच्या वेगळेपणावरून रुद्राक्षांचे एकूण अडतीस प्रकार झाले.॥५०-५१॥

**अच्छिद्रं कनकप्रख्यमनन्यधृतमुत्तमम्।**
**रुद्राक्षं धारयेत् प्राज्ञः शिवपूजापरायणः॥५२॥**

**अन्वयार्थ** : अच्छिद्रं = कीड न लागलेले, कनकप्रख्यं = सुवर्णकांतीचे, अनन्यधृतं = दुसऱ्याचे धारण न केलेले, असे, उत्तमम् = श्रेष्ठ, रुद्राक्षं = रुद्राक्ष, शिवपूजापरायण: = शिवपूजासक्त, प्राज्ञ: = बुद्धिमान लोकांनी, धारयेत् = धारण करावेत.

**भावार्थ** : ज्याला किड्याने छिद्र पाडलेले नसेल व ज्याचा रंग सोन्यासारखा असेल आणि जो पूर्वी कोणी वापरला नसेल असा रुद्राक्ष उत्तम जाणावा. बुद्धिवंत शिवपूजकाने असे रुद्राक्ष धारण करावेत.।।५२।।

**यथास्थानं यथावक्त्रं यथायोगं यथाविधि।**
**रुद्राक्षधारणं वक्ष्ये रुद्रसायुज्यसिद्धये।।५३।।**

**अन्वयार्थ** : रुद्रसायुज्यसिद्धये = रुद्रसायुज्य प्राप्तीसाठी, यथास्थानं = त्या त्या स्थानाला अनुसरून, यथावक्त्रं = मुखानुसार, यथायोग्यं = शास्त्रानुसार, यथाविधि = विधिपूर्वक, रुद्राक्षधारणं = रुद्राक्षांचे धारण, वक्ष्ये = सांगतो.

**भावार्थ** : हे अगस्त्या, रुद्रसायुज्यमुक्तीसाठी कोणत्या ठिकाणी, किती मुखांचे, किती रुद्राक्ष धारण करावे हे शास्त्रानुसार मी सांगतो. ते तू लक्ष देऊन श्रवण कर.।।५३।।

**शिखायामेकमेकास्यं रुद्राक्षं धारयेद् बुध:।**
**द्वित्रिद्वादशवक्त्राणि शिरसि त्रीणि धारयेत्।।५४।।**
**षट्त्रिंशद्धारयेन्मूर्ध्नि नित्यमेकादशानान्।**
**दशसप्तपञ्चवक्त्रान् षट षट् कर्णद्वये वहेत्।।५५।।**
**षडष्टवदनान् कण्ठे द्वात्रिंशद्धारयेत् सदा।**
**पञ्चाशद्धारयेद् विद्वान् चतुर्वक्त्राणि वक्षसि।।५६।।**
**त्रयोदशमुखान् बाह्वोर्धरेत् षोडश षोडश।**
**प्रत्येकं द्वादश वहेन्नवास्यान् मणिबन्धयो:।।५७।।**
**चतुर्दशमुखं यज्ञसूत्रमष्टोत्तरं शतम्।**
**धारयेत् सर्वकालं तु रुद्राक्षं शिवपूजक:।।५८।।**



**अन्वयार्थ** : बुध: = सुज्ञ मनुष्याने, शिखायां = शिखास्थानी, एकास्यं = एक मुखाचा, एकं = एक, रुद्राक्षं = रुद्राक्ष, धारयेत् = धारण करावा, शिरसि = मस्तकावर, द्वित्रिद्वादशवक्त्राणि = दोन, तीन आणि बारा मुखांचे असे, त्रीणि = तीन रुद्राक्ष, धारयेत् = धारण करावेत, नित्यं = प्रतिदिवशी, मूर्ध्नि = मस्तकाभोवती, एकादशाननान् = अकरा मुखांचे, षट्त्रिंशत् = छत्तीस रुद्राक्ष, धारयेत् = धारण करावेत, दशसप्तपञ्चवक्त्रान् = दहा, सात, आणि पाच मुखांचे रुद्राक्ष, षट्-षट् = सहा-सहा, कर्णद्वये = दोन्ही कानांवर, वहेत् = धारण करावे, विद्वान् = विद्वानाने, कण्ठे = गळ्यात, षडष्टवदनान् = सहा, आठ मुखांचे, द्वात्रिंशत् = बत्तीस रुद्राक्ष, सदा = नेहमी, धारयेत् = धारण करावे, वक्षसि = वक्ष:स्थलावर, चतुर्वक्त्राणि = चार मुखांचे, पञ्चाशत् = पन्नास रुद्राक्ष, धारयेत् = धारण करावे, बाह्वो: = दोन्हीं दंडांवर, त्रयोदशमुखान् = तेरा मुखांचे, षोडशषोडश = सोळा-सोळा रुद्राक्ष, धरेत् = धारण करावे, मणिबन्धयो: = दोन्ही मनगटांवर, नवास्यान् = नऊ मुखांचे, प्रत्येकं = प्रत्येकी, द्वादश = बारा रुद्राक्ष, वहेत् = धारण करावे, शिवपूजक: = शिवपूजा करणाऱ्या साधकाने, चतुर्दशमुखं = चौदा मुखांचे, अष्टोत्तरशतम् = एकशे आठ, रुद्राक्षं = रुद्राक्ष, यज्ञसूत्रं = यज्ञोपविताप्रमाणे, तु = निश्चयाने, सर्वकालं = सदा, धारयेत् = धारण करावे.

**भावार्थ** : सुज्ञ मनुष्याने आपल्या शेंडीमध्ये एक मुखाचा एक रुद्राक्ष धारण करावा. दोन, तीन आणि बारा मुखांचे असे तीन रुद्राक्ष मस्तकावर धारण करावेत. अकरा मुखांचे छत्तीस रुद्राक्ष कपाळाभोवती धारण करावेत. दहा, सात आणि पाच मुखांचे प्रत्येकी दोन दोन असे सहा, सहा रुद्राक्ष दोन्हीं कानांत धारण करावेत. सहा आणि आठ मुखांचे प्रत्येकी सोळा असे बत्तीस रुद्राक्ष गळ्यात धारण करावेत. तसेच विद्वान मनुष्याने आपल्या वक्ष:स्थळावर चार मुखांचे पन्नास रुद्राक्ष धारण करावेत. तेरा मुखांचे सोळा, सोळा रुद्राक्ष आपल्या दोन्ही दंडांवर बांधवेत व नऊ मुखांचे बारा बारा रुद्राक्ष दोन्ही मनगटांवर बांधावेत. चौदा मुखांच्या एकशे आठ रुद्राक्षांची माळा यज्ञोपवितप्रमाणे शिवभक्ताने सदैव गळ्यात धारण करावी. वीरशैवांनी शिवपूजेच्या वेळी धारण करावयाच्या रुद्राक्षांचा असा विधी आहे.।।५४-५८।।

**एवं रुद्राक्षधारी यः सर्वकाले तु वर्तते।**
**तस्य पापकथा नास्ति मूढस्यापि न संशयः ।।५९।।**

**अन्वयार्थ** : एवं = अशा रीतीने, सर्वकाले = सदा, यः = जो, रुद्राक्षधारी = रुद्राक्षधारण करून, वर्तते = असतो, मूढस्यापि = मूर्ख अशा, तस्य = त्याची, पापकथा = पापवार्ता सुद्धा, नास्ति = नसते, न संशयः = यात संशय नाही.

**भावार्थ** : अशा रीतीने जो मनुष्य सदासर्वकाळी रुद्राक्ष धारण करतो तो मूर्ख असला तरी त्याला पापाचा स्पर्श होत नाही.।।५९।।

**ब्रह्महा मद्यपायी च स्वर्णहृद् गुरुतल्पगः।**
**मातृहा पितृहा चैव भ्रूणहा कृतघातकः।।**
**रुद्राक्षधारणादेव मुच्यते सर्वपातकैः।।६०।।**

**अन्वयार्थ** : ब्रह्महा = ब्रह्महत्या करणारा, मद्यपायी = मद्यपान करणारा, स्वर्णहृत् = सोन्याची चोरी करणारा, च = आणि, गुरुतल्पगः = गुरुपत्नीशी गमन करणारा, मातृहा = मातृहत्या करणारा, पितृहा = पित्याची हत्या करणारा, भ्रूणहा = भ्रूणहत्या करणारा, चैव = तसेच, कृतघातकः = विश्वासघातकी, असा कोणीही असो, रुद्राक्षधारणादेव = केवळ रुद्राक्षाच्या धारणाने, सर्वपातकैः = सर्वपातकांपासून, मुच्यते = मुक्त होतो.

**भावार्थ** : मनुष्य ब्रह्महत्या करणारा असो, दारू पिणारा असो, सोने चोरणारा असो, गुरुपत्नीकडे पापी दृष्टीने पाहाणारा असो, मातेचा किंवा पित्याचा घात करणारा असो, भ्रूमणहत्या करणारा किंवा विश्वासघात करणारा असो, त्याने रुद्राक्ष धारण केल्यामुळेच त्याची सर्व पापे नष्ट होतात. धर्मशास्त्रात अतिपातक, महापातकादी नऊ प्रकारची पातके सांगितली आहेत. ती सर्वविध पातके रुद्राक्षधारणाने नाहीशी होतात असे समजावे.।।६०।।

**दर्शनात् स्पर्शनाच्चैव स्मरणादपि पूजनात्।**
**रुद्राक्षधारणाल्लोके मुच्यन्ते पातकैर्जनाः।।६१।।**

**अन्वयार्थ** : दर्शनात् = पाहाण्याने, स्पर्शनात् = स्पर्शकेल्याने, स्मरणात् = स्मरणाने, पूजनात् = पूजनाने, चैव = तसेच, रुद्राक्षधारणात् = रुद्राक्षांचे धारण केल्याने, लोके = जगात, जनाः = जन, पातकैः = पातकांपासून, मुच्यन्ते = मुक्त होतात.



**भावार्थ** : रुद्राक्षाच्या दर्शनाने, स्पर्शनाने, पूजनाने किंवा धारण केल्याने या प्रपंचातील सर्व लोक पापापासून मुक्त होतात.।।६१।।

**ब्राह्मणो वान्त्यजो वापि मूर्खो वा पण्डितोऽपि वा।**
**रुद्राक्षधारणादेव मुच्यते सर्वपातकैः।।६२।।**

**अन्वयार्थ** : ब्राह्मणः = ब्राह्मण, वा = अथवा, अन्त्यजः = चांडाल, वा = अथवा, मूर्खः = मूर्ख, अपि = आणि, पण्डितः = पंडित, कोणी ही असो, रुद्राक्षधारणादेव = केवळ रुद्राक्ष धारण केल्याने, सर्वपातकैः = सर्व पापांपासून, मुच्यते = मुक्त होतो.

**भावार्थ** : ब्राह्मण असो अंत्यज असो, अज्ञ असो अथवा पंडित असो केवळ रुद्राक्ष धारण केल्याने त्याची सर्व पापे नाहीशी होतात.।।६२।।

**गवां कोटिप्रदानस्य यत्फलं भुवि लभ्यते।**
**तत्फलं लभते मर्त्यो नित्यं रुद्राक्षधारणात्।।६३।।**

**अन्वयार्थ** : गवां कोटि = कोटी गायींचे, प्रदानस्य = दान केल्याने, यत् = जे, फलं = फळ, भुवि = भूलोकात, लभ्यते = प्राप्त होते, तत् = ते, फलं = फळ, नित्यं = सदा, रुद्राक्षधारणात् = रुद्राक्षांच्या धारणाने, मर्त्यः = मनुष्य, लभते = प्राप्त करतो.

**भावार्थ** : एक कोटी गाईंचे दान केल्याने जे पुण्य लाभते तेवढे पुण्य रुद्राक्ष धारण करणाऱ्या मनुष्यास लाभते. म्हणून धारणाने उत्कृष्ट पुण्याची प्राप्तीही होते.।।६३।।

**मृत्युकाले च रुद्राक्षं निष्पीड्य सह वारिणा।**
**यः पिबेच्चिन्तयन् रुद्रं रुद्रलोकं स गच्छति।।६४।।**

**अन्वयार्थ** : मृत्युकाले = मरणकाळी, तु = निश्चयाने, वारिणा सह = पाण्याने, रुद्राक्षं = रुद्राक्ष, निष्पीड्य = धुवून, रुद्रं = रुद्राचे, चिन्तयन् = चिंतन करीत, यः = जो, पिबेत् = पितो, सः = तो, रुद्रलोकं = रुद्रलोकाला, गच्छति = जातो.

**भावार्थ** : जसे, मरणकाळी पाण्यात रुद्राक्ष धुवून ते पाणी पिऊन शंकराचे चिंतन केल्याने तो मनुष्य रुद्रलोकास जातो.॥६४॥

**भस्मोद्धूलितसर्वाङ्गा धृतरुद्राक्षमालिकाः।**
**ये भवन्ति महात्मानस्ते रुद्रा नात्र संशयः।।६५।।**

**अन्वयार्थ** : भस्मोद्धूलितसर्वाङ्गाः = सर्व अंगावर भस्म उधळून घेतलेले, धृतरुद्राक्षमालिकाः = रुद्राक्षांच्या माळा धारण केलेले, ये भवन्ति = जे असतात, ते = ते, महात्मानः = महात्मे, रुद्राः = रुद्रच, असतात, अत्र = याविषयी, न संशयः = संदेह नाही.

**भावार्थ** : ज्यांनी आपल्या सर्वांगास भस्म लावले असून जे नेहमी रुद्राक्षमाळा गळ्यात धारण करतात त्यांचे महत्त्व फार असून ते प्रत्यक्ष रुद्रच होत यात संशय नाही.॥६५॥

**नित्यानि काम्यानि निमित्तजानि**
**कर्माणि सर्वाणि सदापि कुर्वन्।**
**योभस्मरुद्राक्षधरो यदि स्याद्**
**द्विजो न तस्यास्ति फलोपपत्तिः।।६६।।**

**अन्वयार्थ** : नित्यानि = नित्य, काम्यानि = काम्य, निमित्तजानि = नैमित्तिक, अशी सर्वाणि कर्माणि = सर्व कर्मे, सदा = नेहमी, कुर्वन्नपि = करीत असला तरी, यदि = जर, द्विजः = ब्राह्मण, भस्मरुद्राक्षधरः = भस्मरुद्राक्षधारी, न स्यात् = झाला नाही तर, तस्य = त्याला, फलोपपत्तिः = फलप्राप्ती, नास्ति = होत नाही.

**भावार्थ** : नित्य, नैमित्तिक, काम्य आदी सर्व कर्मे सर्वदा शास्त्रोक्त रीतीने करणारा ब्राह्मण असला तरी, जर तो भस्म व रुद्राक्ष धारण करीत नसेल तर त्याला आपल्या कर्मांची फळे मिळत नाहीत.॥६६॥

**सर्वेषु वर्णाश्रमसंगतेषु**
**नित्यं सदाचारपरायणेषु।**



**श्रुतिस्मृतिभ्यामिह चोद्यमानो**
**विभूतिरुद्राक्षधरः समानः।।६७।।**

**अन्वयार्थ** : सर्वेषु = सर्व, वर्णाश्रमसङ्गतेषु = वर्णाश्रमात असलेले, नित्यं = नित्य, सदाचारपरायणेषु = सदाचार संपन्नांमध्ये, विभूतिरुद्राक्षधरः = केवळ विभूतिरुद्राक्षधारी, समानः = समान असतो, श्रुतिस्मृतिभ्यां = श्रुती आणि स्मृतीद्वारे, इह = इहलोकी, चोद्यमानः = स्तुत्य होतो.

**भावार्थ** : ब्राह्मणादी चार वर्ण आणि ब्रह्मचर्यादी चार आश्रम यांच्यातील आपापल्या आचारांत संपन्न असलेल्या सर्व लोकांत भस्म धारण करणाराच सर्वश्रेष्ठ होय. श्रुतिस्मृती देखील त्याची स्तुती करतात.॥६७॥

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ भक्तस्थले भस्मरुद्राक्षधारणस्थलप्रसङ्गो नाम सप्तमः परिच्छेदः।***

**सातवा परिच्छेद समाप्त.**

ooo

# आठवा परिच्छेद

**पञ्चाक्षरीजपस्थल - (८)**

**धृतश्रीभूतिरुद्राक्षः प्रयतो लिङ्गधारकः।**
**जपेत्पञ्चाक्षरीविद्यां शिवतत्त्वप्रबोधिनीम्।।१।।**

**अन्वयार्थ** : धृतश्रीभूतिरुद्राक्षः = मंगलकर विभूती आणि रुद्राक्ष धारण केलेल्या, प्रयतः = पवित्र, लिङ्गधारकः = लिंगधारी साधकाने, शिवतत्त्व-प्रबोधिनीम् = शिवतत्त्वप्रकाशक अशा, पञ्चाक्षरीविद्यां = पंचाक्षरी मंत्राचा, जपेत् = जप करावा.

**भावार्थ** : विभूती-रुद्राक्ष-धारणाने पवित्र झालेल्या शिवलिंगधारक शिवभक्ताने परशिवतत्त्वाचे प्रकाशन करणारा व श्रीरुद्रात प्रसिद्ध असलेला नमःशिवाय या पंचाक्षरी मंत्राचा जप करावा.॥१॥

**शिवतत्त्वात् परं नास्ति यथा तत्त्वान्तरं महत्।**
**तथा पञ्चाक्षरीमन्त्रान्नास्ति मन्त्रान्तरं महत्।।२।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, शिवतत्त्वात् = शिवतत्त्वापेक्षा, परं = श्रेष्ठ, आणि, महत् = मोठे, तत्त्वान्तरं = दुसरे तत्त्व, नास्ति = नाही, तथा = तसेच, पञ्चाक्षरी-मन्त्रात् = पंचाक्षरी मंत्रापेक्षा, महत् = मोठा, मन्त्रान्तरं = दुसरा मंत्र, नास्ति = नाही.

**भावार्थ** : ज्याप्रमाणे शिवतत्त्वापेक्षा श्रेष्ठ आणि मोठे दुसरे कोणतेही तत्त्व नाही, तसेच पंचाक्षरी मंत्रापेक्षा मोठा दुसरा कोणताही मंत्र नाही.॥२॥

**ज्ञाते पञ्चाक्षरीमन्त्रे किं वा मन्त्रान्तरैः फलम्।**
**ज्ञाते शिवे जगन्मूले किं फलं देवतान्तरैः।।३।।**

**अन्वयार्थ** : पञ्चाक्षरीमन्त्रे = पंचाक्षरी मंत्राचे, ज्ञाते = ज्ञान झाल्यावर, मन्त्रान्तरैः = अन्य मंत्रांचे, किं वा फलम् = काय प्रयोजन?, जगन्मूले = विश्वाचे मूळ कारण, शिवे = शिवाचे, ज्ञाते = ज्ञान झाल्यावर, देवान्तरैः = अन्य देवतांचे, किं फलम् = काय प्रयोजन?



**भावार्थ** : जसे अनादी शिवाचे ज्ञान झाल्यावर इतर देवांच्या ज्ञानाची आवश्यकता उरत नाही, तसेच सर्व मंत्रांचे मूळ असणाऱ्या पंचाक्षरीमंत्राचे ज्ञान झाल्यावर इतर कोणत्याही मंत्राची गरज राहात नाही. म्हणून पंचाक्षरी मंत्राला मूलमंत्र असे नाव आहे.॥३॥

**सप्तकोटिषु मन्त्रेषु मन्त्रः पञ्चाक्षरो महान्।**
**ब्रह्मविष्ण्वादिदेवेषु यथा शम्भुर्महत्तरः।।४।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, ब्रह्मविष्ण्वादिदेवेषु = ब्रह्मा, विष्णू आदी देवतांमध्ये, शम्भुः = शिव, महत्तरः = सर्वोत्कृष्ट आहे, तसेच, सप्तकोटिषु मन्त्रेषु = सात कोटी मंत्रांमध्ये, पञ्चाक्षरः = पंचाक्षरी, मन्त्रः = मंत्र, महान् = श्रेष्ठ आहे.

**भावार्थ** : ब्रह्मादी तेहतीस कोटी देवतांत जसा शिव श्रेष्ठ आहे, तसा सात कोटी मंत्रांत पंचाक्षरी मंत्र श्रेष्ठ आहे. कारण हा मंत्र म्हणजे वेदांचे सारच होय.॥४॥

**अशेषजगतां हेतुः परमात्मा महेश्वरः।**
**तस्य वाचकमन्त्रोऽयं सर्वमन्त्रैककारणम्।।५।।**

**अन्वयार्थ** : अशेषजगतां = संपूर्ण विश्वाचे, हेतुः = कारण, परमात्मा = परमात्मा, महेश्वरः = महेश्वर आहे, तस्य = त्याचा, वाचकः = वाचक असा, अयं मन्त्रः = हा मंत्र, सर्वमन्त्रैककारणम् = सर्व मंत्रांना एकच कारण आहे.

**भावार्थ** : तिन्ही लोकांच्या उत्पत्ति-स्थिति-लय यांना मूळ कारण परमात्मा महेश्वर आहे आणि हा मंत्र त्याचाच वाचक असल्यामुळे सर्व मंत्रांपेक्षा श्रेष्ठ ठरतो व सर्व मंत्रांना कारण होतो. म्हणून पंचाक्षरी मंत्र सर्व मंत्रांत श्रेष्ठ होय.॥५॥

**तस्याभिधानमन्त्रोऽयमभिधेयश्च स स्मृतः।**
**अभिधानाभिधेयत्वान्मन्त्रात् सिद्धः परः शिवः।।६।।**

**अन्वयार्थ** : अयं मन्त्रः = हा मंत्र, तस्य = त्याचा, अभिधानः = वाचक, च = आणि, सः = तो, अभिधेयः स्मृतः = वाच्य होय असे सांगितले आहे,

अभिधानाभिधेयत्वात् = वाच्यवाचकभाव संबंध असल्यामुळे, मन्त्रात् = मंत्राने, पर:शिव: = परशिव, सिद्ध: = सिद्ध होतो.

**भावार्थ** : पंचाक्षरीमंत्र परशिवाचे अभिधान आहे आणि परशिव हा अभिधेय होय. अशा रीतीने या मंत्रात आणि परमात्म्यात अभिधान-अभिधेय संबंध असल्यामुळे हा मंत्रच परमात्म्याची सिद्धी करतो. या मंत्रामुळे परमात्मा प्रकाशित होतो.॥६॥

**नम:शब्दं वदेत्पूर्वं शिवायेति तत: परम्।**
**मन्त्र: पञ्चाक्षरो ह्येष सर्वश्रुतिशिरोगत:॥७॥**

**अन्वयार्थ** : पूर्वं = प्रथम, नम:शब्दं, तत: परम् = त्यानंतर, शिवयेति = शिवाय हा शब्द, वदेत् = उच्चारावा, हि एष: = हा, सर्वश्रुतिशरोगत: = सर्व वेदांच्या शिरोभागी असणारा, मन्त्र: = मन्त्र, पञ्चाक्षर: = पंचाक्षरी आहे.

**भावार्थ** : नम: शिवाय हा पाच अक्षरांचा मंत्र सर्व वेदांत श्रेष्ठ गणला जात असून तो पंचाक्षर मंत्र या नावाने ओळखला जातो.॥७॥

**आदित: परिशुद्धत्वान्मलत्रयवियोगत:।**
**शिव इत्युच्यते शम्भुश्चिदानन्दघन: प्रभु:॥८॥**

**अन्वयार्थ** : चिदानन्दघन: = सच्चिदानंदस्वरूपी, प्रभु: = स्वामी असा, शम्भु: = परमात्मा, मलत्रयवियोगत: = त्रिमलरहित असल्यामुळे, आदित: = आरंभापासून, परिशुद्ध-त्वात् = परिशुद्ध असल्यामुळे, शिव इति = शिव या नावाने, उच्यते = संबोधिला जातो.

**भावार्थ** : सच्चिदानंदस्वरूप परशिवब्रह्माला आणवादी मलत्रयाचा संबंध मुळीच नसल्यामुळे तो अत्यंत निर्मळ अर्थात् परिशुद्ध असतो. म्हणून त्यास शिव हे नाव प्राप्त झाले आहे.॥८॥

**आस्पदत्वादशेषाणां मङ्गलानां विशेषत:।**
**शिवशब्दाभिधेयो हि देवदेवस्त्रियम्बक:॥९॥**

**अन्वयार्थ** : विशेषेत: = विशेष रूपाने, अशेषाणां = समस्त, मङ्गलानां = मंगलांचे, आस्पदत्वात् = आश्रयस्थान असल्यामुळे, देवदेव: = देवांचा देव असा, त्रियम्बक: = त्रिनेत्रधारी, हि = निश्चयाने, शिवशब्दाभिधेय: = शिव या नावाने संबोधिला जातो.

**भावार्थ** : सृष्टि-स्थिति-लयास कारणीभूत असणाऱ्या परशिवब्रह्माला त्र्यंबक असे नाव असून तो ब्रह्मादी देवांचाही देव आणि समस्त मंगलांचे आश्रयस्थान आहे. म्हणूनच शिव शब्दाचा अर्थ मंगल असा असून तो सर्वांना मंगलकारक असल्यामुळे त्या परशिवाला शिव हे यथार्थ अभिधान प्राप्त झाले आहे.॥९॥

**शिव इत्यक्षरद्वन्द्वं परब्रह्मप्रकाशकम्।**
**मुख्यवृत्त्या तदन्येषां शब्दानां गुणवृत्तय:॥१०॥**

**अन्वयार्थ** : शिव इति = शिव ही, अक्षरद्वन्द्व = दोन अक्षरे, मुख्यवृत्त्या = अभिधा शक्तीने, परब्रह्मप्रकाशकम् = परब्रह्माचा बोध करणारी आहेत, तदन्येषां = त्याहून अन्य, शब्दानां = शब्द, गुणवृत्तय: = लक्षणा शक्तीने त्याच्या स्वरूपाचे बोधन करणारे आहेत.

**भावार्थ** : 'शिव' ही दोन अक्षरेच मुख्य वृत्तीने परब्रह्माची साक्षात् प्रकाशक होत आणि त्याशिवाय भव, शंकर, ईशान इत्यादी इतर नावे गुणवृत्तीने परब्रह्माची प्रकाशक आहेत. म्हणजे त्याच्या काही गुणांद्वारा त्याचे स्वरूपवर्णन करतात.॥१०॥

**तस्मान्मुख्यतरं नाम शिव इत्यक्षरद्वयम्।**
**सच्चिदानन्दरूपस्य शम्भोरमिततेजस:॥११॥**

**अन्वयार्थ** : तस्मात् = म्हणून, शिव इति = शिव ही, अक्षरद्वयं = दोन अक्षरे, सच्चिदानन्दरूपस्य = सच्चिदानंदरूपी, अमिततेजस: = महाप्रकाशरूप अशा, शम्भो: = शिवाचे, मुख्यतरं नाम = मुख्य नाव आहे.

**भावार्थ** : अपरिमित, तेजस्वी, सच्चिदानंदस्वरूपी असा जो परब्रह्म शंभू आहे, त्याचेच मुख्य व श्रेष्ठ नाव 'शिव' होय.॥११॥

**एतन्नामावलम्बेन मन्त्र: पञ्चाक्षर: स्मृत:।**
**यस्मादत: सदा जप्यो मोक्षकाङ्क्षिभिरादरात्॥१२॥**

**यथाऽनादिर्महादेवः सिद्धः संसारमोचकः।**
**तथा पञ्चाक्षरो मन्त्रः संसारक्षयकारकः।।१३।।**

**अन्वयार्थ** : एतत् = ह्या, नामावलम्बेलन = नावाचे अवलंबन केल्याने, मन्त्रः = मंत्र, पञ्चाक्षरः स्मृतः = 'पंचाक्षर' या नावाने ओळखला जातो, यस्मादतः = म्हणून, मोक्षकाङ्क्षिभिः : मोक्षाची इच्छा बाळगणाऱ्यांनी, आदरात् = आदरपूर्वक, सदा जप्यः = नेहमी जपण्यास योग्य आहे, यथा = जसा, अनादिसिद्धः = अनादि कालापासून असणारा, महादेवः = महादेव, संसार-मोचकः = संसाराचे निवारण करणारा आहे, तथा = तसाच, पञ्चाक्षरो मन्त्रः = पंचाक्षर मंत्र, संसारक्षयकारकः = संसाराचा क्षय करणारा आहे.

**भावार्थ** : मोक्षाची इच्छा बाळगणाऱ्या मुमुक्षू शिवभक्ताने शिव शब्दाने घटित अशा पंचाक्षरी मंत्राचा सदोदित आदरपूर्वक जप करावा. अनादी असा परशिव संसारबंधनातून मुक्त करणारा आहे. अशी त्याची प्रसिद्धी आहे. त्याचप्रमाणे संसारपाशाचा क्षय करणारा अशी शिवपंचाक्षरमंत्राची ख्याती आहे.॥१२-१३॥

**पञ्चभूतानि सर्वाणि पञ्चतन्मात्रकाणि च।**
**ज्ञानेन्द्रियाणि पञ्चापि पञ्चकर्मेन्द्रियाणि च।।१४।।**
**पञ्चब्रह्माणि पञ्चापि कृत्यानि सह कारणैः।**
**बोध्यानि पञ्चभिर्वर्णैः पञ्चाक्षरमहामनोः।।१५।।**

**अन्वयार्थ** : सर्वाणि = सर्व, पञ्चभूतानि = पंच महाभूते, च = आणि, पञ्चतन्मात्रकाणि = पंचतन्मात्रा, पञ्चज्ञानेन्द्रियाणि = पंच ज्ञानेंद्रिये, च = आणि, पञ्चकर्मेन्द्रियाणि = पंच कर्मेंद्रिये, पञ्च ब्रह्माणि = पंचब्रह्म, कारणैः सह = कारणांनी युक्त, पञ्चापि कृत्यानि = पंचकृत्ये, पञ्चाक्षरमहामनोः = पंचाक्षर महामंत्राच्या, पञ्चभिः = पाच, वर्णैः = अक्षरांपासून, उत्पन्न झाले असे, बोध्यानि = समजून घ्यावे.

**भावार्थ** : पंचमहाभूते, पंचतन्मात्रा, पंचज्ञानेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये, पंचसादाख्य, पंचकृत्ये आणि त्यांची कारणे ही सर्व पंचाक्षरी मंत्रापासूनच प्रकाशित झालेली आहेत. म्हणून पंचाक्षरी मंत्र सृष्टीचा कारणसुद्धा आहे.॥१४-१५॥



**पञ्चधा पञ्चधा यानि प्रसिद्धानि विशेषतः।**
**तानि सर्वाणि वस्तूनि पञ्चाक्षरमयानि हि।।१६।।**

**अन्वयार्थ** : विशेषतः = मुख्यतः, पञ्चधा पञ्चधा = पाच पाच अशा, यानि प्रसिद्धानि = ज्या ज्या प्रसिद्ध आहेत, तानि सर्वाणि = त्या सर्व, वस्तूनि = वस्तू, हि = निश्चयाने, पञ्चाक्षरमयानि = पंचाक्षरमय आहेत.

**भावार्थ** : पराशक्ती, आदिशक्ती, इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती ह्या पाच शक्ती; आचारादी पंचलिंगे, पंचज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये, मन, बुद्धी, अहंकार, प्रकृती व पुरुष ही पाच तत्त्वे आणि अशा पाच संख्येने निर्दिष्ट होणाऱ्या सर्व वस्तू पंचाक्षर मंत्रातूनच निर्माण झाल्या आहेत. म्हणून हे सर्व सुवर्णकुंडलन्यायाने पंचाक्षरमंत्रमय आहे.॥१६॥

**ओंकारपूर्वो मन्त्रोऽयं पञ्चाक्षरमयः परः।**
**शैवागमेषु वेदेषु षडक्षर इति स्मृतः।।१७।।**

**अन्वयार्थ** : ॐकारपूर्वः = आरंभी ॐकार असलेला, अयं = हा, पञ्चाक्षर-मयः = पाच अक्षरांनी युक्त, परः = श्रेष्ठ, मन्त्रः = मंत्र, शैवागमेषु = शैवागमांत, वेदेषु = वेदांमध्ये, षडक्षर इति स्मृतः = षडक्षर या नावाने ओळखला जातो.

**भावार्थ** : आंरभी ॐकार असलेला आणि पाच अक्षरांनी युक्त असा ॐ नमः शिवाय हा मंत्र वेदांत आणि शैवागमांमध्ये 'षडक्षर मंत्र' या नावाने ओळखला जातो.॥१७॥

**मन्त्रस्यास्यादिभूतेन प्रणवेन महामनोः।**
**प्रबोध्यते महादेवः केवलश्चित्सुखात्मकः।।१८।।**

**अन्वयार्थ** : महामनोः = महामंत्ररूप, मन्त्रस्य = मंत्राच्या, आदिभूतेन = आरंभी असणाऱ्या, प्रणवेन = ॐकाराने, केवलः = केवळ, चित्सुखात्मकः = चिदानंदस्वरूप, महादेवः = महादेव, प्रबोध्यते = बोधित होतो.

**भावार्थ** : पंचाक्षर मंत्राच्या आधी असलेल्या ॐकाराने चिदानंदरूपी शिवाचा बोध होतो.॥१८॥

**प्रणवेनैकवर्णेन परब्रह्म प्रकाश्यते।**
**अद्वितीयं परानन्दं शिवाख्यं निष्प्रपञ्चकम्।।१९।।**

**अन्वयार्थ** : एकवर्णेन = एकाक्षर अशा, प्रणवेन = ॐकाराने, अद्वितीयं = अद्वितीय, परानन्दं = परमानंदस्वरूप, निष्प्रपञ्चकम् = प्रपंचरहित, शिवाख्यं = शिव नावाचे, परब्रह्म = परब्रह्म, प्रकाश्यते = प्रकाशित होते.

**भावार्थ** : निष्प्रपंच, सच्चिदानंद, अद्वितीय परशिव ॐ या एकाच वर्णाने प्रकाशित होतो, बोधित होतो.॥१९॥

**परमात्ममनुर्ज्ञेयः सोऽहंरूपः सनातनः।**
**जायते हंसयोर्लोपादोमित्येकाक्षरो मनुः।।२०।।**

**अन्वयार्थ** : परमात्ममनुः = परमात्म्याला प्रकाशित करणारा मंत्र, सनातनः = सनातन अशा, सोऽहंरूपः = सोऽहंस्वरूपाने, ज्ञेयः = जाणला जातो, त्यातील, हंसयोः =हं आणि स चा, लोपात् = लोप झाल्यावर, ओमिति = ओम असा, एकाक्षरो मनुः = एकाक्षर मंत्र, जायते = उत्पन्न होतो.

**भावार्थ** : सोऽहं हा मंत्र सनातन अशा परमात्म्याचा अजपा मंत्र असून त्यातील सकार आणि हकार ह्या दोहोंचा त्याग केल्यावर ॐकार हा एकाक्षर मंत्र अवशिष्ट राहातो. हा ॐकार म्हणजे प्रणव, निष्प्रपंच ब्रह्माचा प्रतिपादक असून लिंगांगसामरस्यरूप परमुक्तीचे कारण आहे.॥२०॥

**प्रणवेनैव मन्त्रेण बोध्यते निष्कलः शिवः।**
**पञ्चाक्षरेण मन्त्रेण पञ्चब्रह्मतनुस्तथा।।२१।।**
**निष्कलः संविदाकारः सकलो विश्वमूर्तितः।**
**उभयात्मा शिवो मन्त्रे षडक्षरमये स्थितः।।२२।।**

**अन्वयार्थ** : प्रणवेनैव मन्त्रेण = एका प्रणव मंत्राने, निष्कलः शिवः = निष्कल परमात्मा, बोध्यते = बोधिला जातो. तथा = तसेच, पञ्चाक्षरेण मन्त्रेण = पंचाक्षर मंत्राने, पञ्चब्रह्मतनुः = पञ्चब्रह्मात्मक परमात्मा बोधिला जातो, निष्कलः = निष्कल परमात्मा, संविदाकारः = ज्ञानस्वरूप, सकलः = सकल परमात्मा, विश्वमूर्तितः = विश्वरूपाचा असतो, उभयात्मा शिवः = या दोन्ही रूपांचा शिव, षडक्षरमये मन्त्रे = षडक्षर मंत्रात, स्थितः = असतो.



**भावार्थ** : प्रणवामुळे परमात्म्याच्या निष्कल स्वरूपाचे व पंचाक्षरी मंत्राने परमात्म्याच्या सकल स्वरूपाचे ज्ञान होते. निष्कल शुद्ध चिन्मय ब्रह्म आणि सकल म्हणजे सगुण ईश्वर किंवा सद्योजातादी पंचब्रह्मस्वरूप होय. प्रणवमंत्राने निष्कल शिवाचे आणि पंचाक्षरी मंत्राने पंचब्रह्मस्वरूप शिवाचे ज्ञान होते. अशा रीतीने प्रणवयुक्त पंचाक्षरी मंत्राने परमात्म्याच्या सकल-निष्कल स्वरूपाचा बोध होतो.॥२१-२२॥

**मूलं विद्या शिवः शैवं सूत्रं पञ्चाक्षरस्तथा।**
**एतानि नामधेयानि कीर्तितानि महामनोः।।२३।।**

**अन्वयार्थ** : महामनोः = महामंत्राची, मूलं = मूळ, विद्या = विद्या, शिवः = शिव, शैवं सूत्रं = शैव सूत्र, तथा = आणि, पञ्चाक्षरः = पंचाक्षर, एतानि = ही, नामधेयानि = नावे, कीर्तितानि = प्रसिद्ध आहेत.

**भावार्थ** : या शिवपंचाक्षर महामंत्राची मूल, विद्या, शिव, शैवसूत्र व पंचाक्षर अशी पाच पर्यायनामे मानली जातात. पंचाक्षरी मंत्र हा सर्व मंत्रांचे मूळ असल्याने त्याला मूल हे नाव आहे. ह्याच्या जपाने शुद्ध विद्येची प्राप्ती होते म्हणून याला विद्या म्हणतात. हा मंगलकारक असल्यामुळे याला शिव म्हणून ओळखले जाते. शिवसंबंधी सर्व तत्त्वांचा बोध या पंचाक्षर मंत्रामुळे होत असल्याने याला शैवसूत्र म्हणतात आणि हा मंत्र पाच अक्षरांनी बनला असल्यामुळे याला पंचाक्षर हेही नाव प्राप्त झाले आहे.॥२३॥

**पञ्चाक्षरीमिमां विद्यां प्रणवेन षडक्षरीम्।**
**जपेत् समाहितो भूत्वा शिवपूजापरायणः।।२४।।**

**अन्वयार्थ** : प्रणवेन = ॐकारामुळे, षडक्षरीम् = षडक्षर नाव असलेला, इमां = ह्या, पञ्चाक्षरीं विद्यां = पंचाक्षरी मंत्राचा, शिवपूजापरायणः = शिवपूजानिष्ठ साधकाने, समाहितो भूत्वा = एकाग्रचित्त होऊन, जपेत् = जप करावा.

**भावार्थ** : हा पंचाक्षरी मंत्र महाविद्या असून त्यात ॐकार मिसळला की ती षडक्षरी विद्या होते. एकाग्रतेने शिवपूजा करणाऱ्या शिवभक्ताचे प्रणवयुक्त शिवपंचाक्षरी मंत्राचा जप करावा.॥२४॥

**प्राणायामत्रयं कृत्वा प्राङ्मुखेदङ्मुखोऽपि वा।**
**चिन्तयन् हृदयाम्भोजे देवदेवं त्रियम्बकम्।।२५।।**
**सर्वालङ्कारसंयुक्तं साम्बं चन्द्रार्धशेखरम्।**
**जपेदेतां महाविद्यां शिवरूपामनन्यधीः।।२६।।**

**अन्वयार्थ** : प्राङ्मुखः = पूर्वाभिमुख, अपि वा = अथवा, उदङ्मुख = उत्तराभिमुख, बसून, त्रयं = तीन वेळा, प्राणायामं कृत्वा = प्राणायाम करून, हृदयाम्भोजे = हृदयकमलात, सर्वालङ्कारसंयुक्तं = सर्व अलंकारांनी युक्त, साम्बं = अंबेसहित, चन्द्रार्धशेखरम् = चंद्रमौळी, देवदेवं = देवाधिदेव, अशा, त्रियम्बकम् = त्रिनेत्रधारी शिवाचे, चिन्तयन् = चिंतन करीत, अनन्यधीः = एकाग्र बुद्धीने, एतां = ह्या, शिवरूपां = शिवस्वरूपी, महाविद्यां = महाविद्येचा, जपेत् = जप करावा.

**भावार्थ** : पंचाक्षरी मंत्राचा जप करताना पूर्व अथवा उत्तराभिमुख होऊन आसनावर बसावे, तीन वेळा प्राणायाम करून आपल्या हृदयकमलात, सर्व अलंकारांनी युक्त पार्वतीसह, चंद्रमौळी, त्रिनेत्रधारी महादेवाचे चिंतन करीत एकाग्र बुद्धीने या शिवस्वरूपी महामंत्राचा जप करावा.॥२५-२६॥

**जपस्तु त्रिविधः प्रोक्तो वाचिकोपांशुमानसः।**
**श्रूयते यस्तु पार्श्वस्थैर्यथावर्णसमन्वयम्।।२७।।**
**वाचिकः स तु विज्ञेयः सर्वपापप्रभञ्जनः।**
**ईषत्स्पृष्ट्वाधरपुटं यो मन्दमभिधीयते।।२८।।**
**पार्श्वस्थैरश्रुतः सोऽयमुपांशुः परिकीर्तितः।**
**अस्पृष्ट्वाधरमस्पन्दि जिह्वाग्रं योऽन्तरात्मना।।**
**भाव्यते वर्णरूपेण स मानस इति स्मृतः।।२९।।**



**अन्वयार्थ** : जपः तु = जपाचे, वाचिकोपांशुमानसः = वाचिक, उपांशु आणि मानस असे, त्रिविधः = तीन प्रकार, प्रोक्तः = सांगितले आहेत, पार्श्वस्थैः = जवळ बसलेल्यांना, वर्णसमन्वयः = मंत्राक्षरे, यथा श्रूयते = ऐकू येतील असा, यस्तु = जो जप आहे, सर्वपापप्रभञ्जनः = सर्व पापांना दूर करणारा, स तु = तो, वाचिकः = वाचिक जप, विज्ञेयः = जाणावा, ईषत्स्पृष्ट्वाधरपुटं = ओठातल्या ओठात, यो = जो जप, मन्दमभिधीयते = मंद स्वरात उच्चारला जातो, आणि पार्श्वस्थैः = जवळ बसलेल्यांना, अश्रुतः = ऐकू न येणारा, सोऽयं = जो जप, उपांशुः = उपांशु या नावाने, परिकीर्तितः = प्रसिद्ध आहे, अधरम् अस्पृष्ट्वा = ओठ न हलविता, जिह्वाग्रं = जिभेचे टोक, अस्पन्दि = न हलविता, यो = जो, अन्तरात्मना = मनातल्या मनात, वर्णरूपेण = मंत्राक्षर रूपाने, भाव्यते = जपला जातो, सः = तो जप, मानसः = मानस, इति = असा, स्मृतः = समजावा.

**भावार्थ** : मंत्रोच्चाराला जप म्हणतात. वाचिक, उपांशू व मानस असे जपाचे तीन भेद आहेत. जवळ बसलेल्या लोकांना स्पष्ट ऐकू येईल असा मंत्राचा स्वच्छ उच्चार करणे हा वाचिक जप होय. या जपाने मन, वाणी व शरीर यांच्यापासून उद्‌भवलेली पापे नष्ट होतात. ज्यामध्ये ओठाची किंचित हालचाल होते परंतु जवळ बसलेल्या लोकांना मंत्रोच्चार ऐकू येत नाहीत, असा जप उपांशू जप होय. ओठ किंवा जीभ न हालवता मनातल्या मनात मंत्रोच्चार केला जातो, तेव्हा त्यास मानसजप असे म्हणतात.॥२७-२९॥

**यावन्तः कर्मयज्ञाद्या व्रतदानतपांसि च।**
**सर्वे ते जपयज्ञस्य कलां नार्हन्ति षोडशीम्।।३०।।**

**अन्वयार्थ** : कर्मयज्ञाः = ज्योतिष्टोमादी यज्ञ, च = आणि, व्रतदानतपांसि = व्रत, दान आणि तपश्चर्या अशी, यावन्तः = जितकी विहित कर्मे आहेत, ते = ती, सर्वे = सर्व, जपयज्ञस्य = जपयज्ञाच्या, षोडशीं कलां = सोळाव्या भागाशी, नार्हन्ति = समान होत नाहीत.

**भावार्थ** : ज्योतिष्टोमादी कर्मयज्ञ, चांद्रायणादी व्रते, गोभूदानादी दाने, पंचाग्नी आदी तपे ही सर्व एकत्र केली तरी शिवपंचाक्षरी महामंत्राच्या सोळाव्या हिश्श्याची देखील बरोबरी करू शकत नाहीत. म्हणून पंचाक्षरी मंत्राचा जप सर्वश्रेष्ठ होय.॥३०॥

**माहात्म्यं वाचिकस्यैतज्जपयज्ञस्य कीर्तितम्।**
**तस्माच्छतगुणोपांशुः साहस्रो मानसः स्मृतः।।३१।।**

**अन्वयार्थ** : एतत् = ह्या, वाचिकस्य = वाचिक, जपयज्ञस्य = जपयज्ञाचे, माहात्म्यं = माहात्म्य, कीर्तितम् = सांगितले आहे, तस्मात् = त्याहून, उपांशुः = उपांशू जप, शतगुणः = शतपट, मानसः = मानसिक जप, साहस्रः स्मृतः = हजार पटीने फल देणारा होतो.

**भावार्थ** : शिवपंचाक्षरी मंत्राच्या जपयज्ञाचे वर सांगितलेले माहात्म्य वाचिक जपाचे असून त्यापेक्षा उपांशू जपाचे शतपट आहे आणि त्यापेक्षाही मानसजपाचे सहस्रपट अधिक आहे. अशा रीतीने वाचिक जपापेक्षा उपांशू व उपांशू जपापेक्षा मानस जप श्रेष्ठ होय असे समजावे.॥३१॥

**वाचिकात् तदुपांशोश्च जपादस्य महामनोः।**
**मानसो हि जपः श्रेष्ठो घोरसंसारनाशकः।।३२।।**

**अन्वयार्थ** : अस्य = ह्या, महामनोः = महामंत्राचे, वाचिकात् = वाचिकापेक्षा, च = आणि, उपांशोः = उपांशू, जपात् = जपापेक्षा, घोरसंसारनाशकः = भयानक अशा संसाराची निवृत्ती करणारा, मनासो हि जपः = मानसिक जपच, श्रेष्ठः = श्रेष्ठ होय.

**भावार्थ** : मुमुक्षू साधकाने मानस जप करावा. कारण वाचिक व उपांशू या जपांपेक्षा मानस जप श्रेष्ठ असून तो घोर अशा संसाराचा नाशक आहे.॥३२॥

**एतेष्वेतेन विधिना यथाभावं यथाक्रमम्।**
**जपेत् पञ्चाक्षरीमेतां विद्यां पाशविमुक्तयेव।।३३।।**

**अन्वयार्थ** : एतेषु = ह्यापैकी, यथाक्रमं = क्रमानुसार, एतेन विधिना = सांगितलेल्या विधिप्रकारे, यथाभावं = भक्तिभावनेने, पाशविमुक्तये = अविद्यादी पाशांपासून मुक्त होण्यासाठी, एतां = ह्या, पञ्चाक्षरीं विद्यां = पंचाक्षरी मंत्राचा, जपेत् = जप करावा.

**भावार्थ** : पूर्वोक्त तीन जपांपैकी कोणताही जप योग्य विधीने, भक्तिभावाने व यथाक्रमाने जपावा. त्यामुळे संसारपाशातून मुक्ती मिळते.॥३३॥



**अनेन मूलमन्त्रेण शिवलिङ्गं प्रपूजयेत्।**
**नित्यं नियमसम्पन्नः प्रयतात्मा शिवात्मकः।।३४।।**

**अन्वयार्थ** : अनेन = ह्या, मूलमन्त्रेण = पंचाक्षर मंत्राने, नित्यं = प्रतिदिन, नियमसम्पन्नः = यमनियमादिसंपन्न, प्रयतात्मा = शुद्ध अंतःकरणाच्या, शिवात्मकः = शिवभक्ताने, शिवलिङ्गं = शिवलिंगाचे, प्रपूजयेत् = पूजन करावे.

**भावार्थ** : यमनियमादींनी संपन्न अशा, शुद्धान्तःकरणी, भस्मरुद्राक्षविभूषित अशा पवित्र शिवभक्ताने प्रणवयुक्त पंचाक्षर मंत्रानेच नित्य शिवलिंगपूजा करावी.॥३४॥

**भक्त्या पञ्चाक्षरेणैव यः शिवं सकृदर्चयेत्।**
**सोऽपि गच्छेच्छिवस्थानं मन्त्रस्यास्यैव गौरवात्।।३५।।**

**अन्वयार्थ** : यः = जो, भक्त्या = भक्तीने, शिवं = शिवाचे, पञ्चाक्षरेणैव = पंचाक्षर मंत्राने, सकृत् = एकवेळ, अर्चयेत् = अर्चन करतो, सोऽपि = तो सुद्धा, अस्यैव = ह्या, मन्त्रस्य = मंत्राच्या, गौरवात् = प्रभावाने, शिवस्थानं = शिवस्थान, गच्छेत् = प्राप्त करून घेतो.

**भावार्थ** : भक्तिपूर्वक ह्या शिवपंचाक्षरी मंत्राने जो मनुष्य एकवेळ शिवलिंगपूजा करील त्याला ह्या मंत्राच्या सामर्थ्याने शिवलोक प्राप्त होईल.॥३५॥

**अब्भक्षा वायुभक्षाश्च ये चान्ये व्रतकर्शिताः।**
**तेषामेतैर्व्रतैर्नास्ति शिवलोकसमागमः।।३६।।**

**अन्वयार्थ** : ये = जे, अब्भक्षाः = जलाहारी, च = आणि, वायुभक्षाः = वायू भक्षण करणारे, च = आणि, व्रतकर्शिताः = व्रताचरणाने कृश झालेले, अन्ये = इतर लोक, जे आहेत, तेषां = त्यांना, एतैः = ह्या, व्रतैः = व्रतांनी, शिवलोकसमागमः = शिवलोकाची प्राप्ती, नास्ति = होत नाही.

**भावार्थ** : जे केवळ पाणी पिऊन राहतात किंवा वायू भक्षण करून राहतात तसेच जे खडतर तपश्चर्या करतात त्यांना तपश्चर्येने देखील

शिवलोकाची प्राप्ती होत नाही. ती शिवभक्तांना शिवपंचाक्षरी मंत्राने सहज होते.।।३६।।

**तस्मात्तपांसि यज्ञाश्च व्रतानि नियमास्तथा।**
**पञ्चाक्षरार्चनस्यैते कोट्यंशेनापि नो समाः।।३७।।**

**अन्वयार्थ** : तस्मात् = म्हणून, तपांसि = तपश्चर्या, च = आणि, यज्ञाः = यज्ञ, व्रतानि = व्रते, तसेच नियमाः = नियम, एते = हे, पञ्चाक्षरार्चनस्य = पंचाक्षर मंत्राने केल्या जाणाऱ्या पूजेच्या, कोट्यंशेनापि = कोटीच्या एका अंशा इतकाही, नो समाः = समान होत नाही.

**भावार्थ** : म्हणून तपे, यज्ञ, व्रते आणि नियम हे शिवपंचाक्षरी मंत्राच्या एक कोट्यांशाची देखील बरोबरी करू शकणार नाहीत. या सर्वांपेक्षा पंचाक्षरी मंत्र एक कोटी पट अधिक फलदायी आहे. या साठी अन्य कोणत्याही व्रतापेक्षा जपयज्ञ करावा.।।३७।।

**अशुद्धो वा विशुद्धो वा सकृत् पञ्चाक्षरेण यः।**
**पूजयेत् पतितो वापि मुच्यते नात्र संशयः।।३८।।**

**अन्वयार्थ** : अशुद्धो वा = अशुद्ध असो, विशुद्धो वा = अथवा शुद्ध असो, यः = जो, सकृत् = एकवेळ, पञ्चाक्षरेण = पंचाक्षर मंत्रोच्चारण करून, पूजयेत् = पूजा करील, तो पतितो वापि = पतित सुद्धा, मुच्यते = मुक्त होतो, अत्र = ह्या विषयी, न संशयः = संशय नाही.

**भावार्थ** : पापी असो, पुण्यवान असो अथवा पतित (व्रतापासून भ्रष्ट झालेला) असो, त्याने एकदा जर शिवपंचाक्षरीचा जप करून पूजा केली तर तो मुक्त होतो, यात शंका नाही.।।३८।।

**सकृदुच्चारमात्रेण पञ्चाक्षरमहामनोः।**
**सर्वेषामपि जन्तूनां सर्वपापक्षयो भवेत्।।३९।।**

**अन्वयार्थ** : पञ्चाक्षरमहामनोः = पंचाक्षर महामंत्राचे, सकृत् = एकवेळ, उच्चारणमात्रेण = उच्चारण केल्यावर, सर्वेषां = समस्त, जन्तूनामपि = प्राण्यांचा सुद्धा, सर्व = समस्त, पापक्षयः = पापांचा नाश, भवेत् = होतो.



**भावार्थ** : पंचाक्षर महामंत्राचा एकवेळ उच्चार केला तरी सर्व प्राणि-मात्रांच्या सर्व पातकांचा नाश होतो.।।३९।।

**अन्येऽपि बहवो मन्त्रा विद्यन्ते सकलागमे।**
**भूयो भूयः समभ्यासात् पुरुषार्थप्रदायिनः।।४०।।**
**एष मन्त्रो महाशक्तिरीश्वरप्रतिपादकः।**
**सकृदुच्चारणादेव सर्वसिद्धिप्रदायकः।।४१।।**

**अन्वयार्थ** : सकलागमे = सर्व आगमांत = भूयो भूयः = पुनः पुन्हा, समभ्यासात् = जप केल्याने, पुरुषार्थप्रदायिनः = पुरुषार्थ देणारे, अन्येऽपि = दुसरे सुद्धा, बहवो मन्त्राः = अनेक मंत्र, विद्यन्ते = आहेत, महाशक्तिः = महा-शक्तिशाली, ईश्वरप्रतिपादकः = ईश्वरस्वरूपाचे प्रतिपादन करणारा, एषः = ह्या, मन्त्रः = पंचाक्षरमंत्र, सकृदुच्चारणादेव = एकवेळ उच्चारण केल्यानेही, सर्वसिद्धिप्रदायकः = सर्वसिद्धी देणारा आहे.

**भावार्थ** : शिवागमांत पंचाक्षरीशिवाय अनेक मंत्र आहेत. या मंत्रांचा अनेकवार पुरश्चरणपूर्वक जप केल्यावर उपासकांचे मनोरथ पूर्ण होतात. परंतु हा पंचाक्षरीमंत्र मात्र महासामर्थ्यवान असून शिवजीवसामरस्याचे प्रतिपादन करणारा आहे आणि याचा फक्त एकदाच उच्चार केला तरी सर्व सिद्धी प्राप्त होतात.।।४०-४१।।

**पञ्चाक्षरीं समुच्चार्य पुष्पं लिङ्गे विनिक्षिपेत्।**
**यस्तस्य वाजपेयानां सहस्रफलमिष्यते।।४२।।**

**अन्वयार्थ** : यः = जो, पञ्चाक्षरीं = पंचाक्षरीमंत्राचे, समुच्चार्य = उच्चारण करून, लिङ्गे = इष्टलिंगावर, पुष्पं = पुष्प, विनिःक्षिपेत् = अर्पण करतो, तस्य = त्याला, सहस्रवाजपेयानां = हजार वाजपेय यागांचे, फलं = फल, इष्यते = प्राप्त होते.

**भावार्थ** : अशा ह्या शिवपंचाक्षर मंत्राचा जप करीत जो मनुष्य इष्टलिंगावर फूल वाहतो त्याला हजार वाजपेय यज्ञ केल्याचे फळ मिळते.।।४२।।

**अग्निहोत्रं त्रयो वेदा यज्ञाश्च बहुदक्षिणाः।**
**पञ्चाक्षरजपस्यैते कोट्यंशेनापि नो समाः।।४३।।**

**अन्वयार्थ** : अग्निहोत्रं = अग्निहोत्र, त्रयो वेदा: = तीन वेदांचे अध्ययन, च = आणि, यज्ञा: = ज्योतिष्टोमादी याग, बहुदक्षिणा: = षोडशप्रकारची दाने, एते = हे सर्व, पञ्चाक्षरजपस्य = पंचाक्षर जपाचे, कोट्यंशेनापि = कोटीच्या एक भागाशीही, नो समा: = समान होत नाही.

**भावार्थ** : प्रात:काळी व सायंकाळी केलेले अग्निहोत्र, ऋक्, यजु, साम आदी वेदांचा अभ्यास, ज्योतिष्टोमादी यज्ञ, सोळा प्रकारची महादाने ही शिवपंचाक्षरी मंत्राच्या कोटी हिश्शाची देखील बरोबरी करू शकत नाहीत. म्हणून वेदाध्ययनादी सर्व अनुष्ठानांपेक्षा पंचाक्षरीजपाचे फल अधिक आहे.।।४३।।

**पुरा सानन्दयोगीन्द्रः शिवज्ञानपरायणः।**
**पञ्चाक्षरं समुच्चार्य नारकानुदतारयत्।।४४।।**

**अन्वयार्थ** : पुरा = पूर्वकाळी, शिवज्ञानपरायण: = शिवज्ञाननिष्ठ, सानन्दयोगीन्द्र: = सानंद गणेश्वराने, पञ्चाक्षरं = पंचाक्षर मंत्राचे, समुच्चार्य = उच्चारण करून, नारकान् = नरकातील जीवांचा, उदतारयत् = उद्धार केला.

**भावार्थ** : पूर्वी शिवज्ञान व शिवयोगात निपुण असलेल्या सानंद नामक गणेश्वराने शिवपंचाक्षरी मंत्राचा उच्चार करून अठ्ठावीस कोटी प्रकारच्या नरकांत खितपत पडलेल्या जीवांचा उद्धार केला.।।४४।।

**सिद्ध्या पञ्चाक्षरस्यास्य शतानन्दः पुरा मुनिः।**
**नरकं स्वर्गमकरोत् सङ्गिरस्यापि पापिनः।।४५।।**

**अन्वयार्थ** : पुरा = पूर्वी, शतानन्द: = शतानंद नावाच्या, मुनि: = मुनीने, अस्य = ह्या, पञ्चाक्षरस्य = पंचाक्षर मंत्राच्या, सिद्ध्या = सिद्धीने, पापिन: = पापी, सङ्गिरस्य = संगिरासाठी, नरकं = नरकाला, अपि = ही, स्वर्गमकरोत् = स्वर्ग केला.



**भावार्थ** : पूर्वी शतानंद नामक ऋषीने शिवपंचाक्षरी मंत्राच्या सामर्थ्याने संगिर नावाच्या पातकी पुरुषासाठी नरकाचाही स्वर्ग केला.।।४५।।

**उपमन्युः पुरा योगी मन्त्रेणानेन सिद्धिमान्।**
**लब्धवान् परमेशनाच्छैवशास्त्रप्रवक्तृताम्।।४६।।**

**अन्वयार्थ** : पुरा = पूर्वी, अनेन मन्त्रेण = ह्या मंत्राने, सिद्धिमान् = सिद्धी प्राप्त केलेल्या, योगी = योगी अशा, उपमन्यु: = उपमन्यूने, परमेशानात् = परशिवाकडून, शैवशास्त्रप्रवक्तृतां = शिवशास्त्राची आचार्य पदवी, लब्धवान् = मिळविली.

**भावार्थ** : ह्या मंत्राने सिद्धी मिळविलेल्या उपमन्यू नामक योग्याने परशिवाकडून शिवशास्त्रातील प्रवक्तृत्व व आचार्यपद प्राप्त करून घेतले.।।४६।।

**वसिष्ठवामदेवाद्या मुनयो मुक्तकिल्बिषाः।**
**मन्त्रेणानेन संसिद्धा महातेजस्विनोऽभवन्।।४७।।**

**अन्वयार्थ** : मुक्तकिल्बिषा: = निष्पाप, वसिष्ठवामदेवाद्या: = वसिष्ठ-वामदेवादी, मुनय: = महर्षी, अनेन = ह्या, मन्त्रेण = मंत्रजपाने, संसिद्धा: = सिद्धी प्राप्त करून, महातेजस्विन: = अत्यंत तेजस्वी, अभवन् = झाले.

**भावार्थ** : वसिष्ठ-वामदेवादी ऋषिगण याच मंत्राने पापमुक्त होऊन सिद्धिसंपन्न व महातेजस्वी झाले.।।४७।।

**ब्रह्मादीनां च देवानां जगत्सृष्ट्यादिकर्मणि।**
**मन्त्रस्यास्यैव माहात्म्यात् सामर्थ्यमुपजायते।।४८।।**

**अन्वयार्थ** : ब्रह्मादीनां = ब्रह्मादी, देवानां = देवांना, अस्यैव = ह्याच, मन्त्रस्य = मंत्राच्या, माहात्म्यात् = महिम्यामुळे, जगत्सृष्ट्यादिकर्मणि = जगाच्या सृष्टी आदी कार्यात, सामर्थ्यं = सामर्थ्य, उपजायते = प्राप्त झाले आहे.

**भावार्थ** : ब्रह्मा-विष्णु-रुद्रादी देवांना याच मंत्रामुळे जगाची उत्पत्ति-स्थिति-संहारादी कार्ये करण्यासाठी सामर्थ्य प्राप्त झाले आहे.।।४८।।

**किमिह बहुभिरुक्तैर्मन्त्रमेवं महात्मा**
**प्रणवसहितमादौ यस्तु पञ्चाक्षराख्यम्।**
**जपति परमभक्त्या पूजयन् देवदेवं**
**स गतदुरितबन्धो मोक्षलक्ष्मीं प्रयाति।।४९।।**

**अन्वयार्थ** : इह = येथे, बहुभिरुक्तैः = फार सांगण्याचे, किम् = काय प्रयोजन? यस्तु = जो, महात्मा = महात्मा, आदौ = आरंभी, प्रणवसहितं = प्रणवयुक्त अशा, पञ्चाक्षराख्यं = पंचाक्षर मंत्राचे, परमभक्त्या = अत्यंत प्रेमादराने, देवदेवं = महादेवाचे, पूजयन् = पूजन करीत, जपति = जप करतो, सः = तो, गतदुरितबन्धः = पापबंध नाहीसे होऊन, मोक्षलक्ष्मीं = मोक्षरूपी लक्ष्मी, प्रयाति = प्राप्त करतो.

**भावार्थ** : फार काय सांगावे, जो शिवभक्त भक्तिपूर्वक शिवलिंगाची पूजा करीत प्रणवयुक्त शिवपंचाक्षरी मंत्राचा जप करतो तो पातकांपासून मुक्त होऊन मोक्षरूपी लक्ष्मीची प्राप्ती करून घेतो.।।४९।।

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां***
***शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये***
***श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ***
***भक्तस्थले पञ्चाक्षरजपस्थलप्रसङ्गो***
***नाम अष्टमः परिच्छेदः।***

**आठवा परिच्छेद समाप्त.**

OOO

# नववा परिच्छेद

**भक्तमार्गक्रियास्थल - (९)**

**भूतिरुद्राक्षसंयुक्तो लिङ्गधारी सदाशिवः।**
**पञ्चाक्षरजपोद्योगी शिवभक्त इति स्मृतः।।१।।**

**अन्वयार्थ** : भूतिरुद्राक्षसंयुक्तः = विभूती आणि रुद्राक्ष धारण केलेला, सदाशिवः = सदा मंगलस्वरूप असा, पञ्चाक्षरजपोद्योगी = पंचाक्षरजप करणारा असा, लिङ्गधारी = इष्टलिंगधारक, शिवभक्त इति = शिवभक्त म्हणून, स्मृतः = ओळखला जातो.

**भावार्थ** : कपाळावर विभूती, गळ्यात रुद्राक्षमाला व लिंग धारण करणारा, सदा परिशुद्ध असून शिवपंचाक्षरी मंत्राचा जप करणारा जो साधक असतो त्याला शिवभक्त असे म्हणतात.।।१।।

**श्रवणं कीर्तनं शम्भोः स्मरणं पादसेवनम्।**
**अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम्।।२।।**

**एवं नवविधा भक्तिः प्रोक्ता देवेन शम्भुना।**
**दुर्लभा पापिनां लोके सुलभा पुण्यकर्मणाम्।।३।।**

**अन्वयार्थ** : शम्भोः = शिवाविषयी, श्रवणं = श्रवण करणे, कीर्तनं = कीर्तन करणे, स्मरणं = स्मरण करणे, पादसेवनं = पादसेवा करणे, अर्चनं = अर्चन करणे, वन्दनं = नमस्कार करणे, दास्यं = दास्यभाव ठेवणे, सख्यं = सख्यभाव बाळगणे, आत्मनिवेदनं = आत्मार्पण करणे, एवम् = अशा रीतीने, नवविधा = नऊ प्रकारची, भक्तिः = भक्ती, देवेन = महादेव अशा, शम्भुना = शिवाने, प्रोक्ता = सांगितली आहे, ती, लोके = जगात, पापिनां = पापी लोकांना, दुर्लभा = दुर्लभ असून, पुण्यकर्मणां = पुण्यात्म्यांना, सुलभा = सुलभ आहे.

**भावार्थ** : शिवकथेचे श्रवण करणे, शिवाचे गुणगान करणे, शिवाचे ध्यान करणे, शिवचरणाची सेवा करणे, शिवाची पूजा करणे, शिवास

नमस्कार करणे, शिवाचे दास्यत्व पत्करणे, शिवाशी स्नेह करणे आणि शिवाला आपले सर्वस्व अर्पण करणे असे भक्तीचे नऊ प्रकार सदाशिवाने सांगितले आहेत. अशी ही नवविधा भक्ती पातकी लोकांस दुर्लभ असून पुण्यवान लोकांकडून सहज घडते.॥२-३॥

**अधमे चोत्तमे वापि यत्र कुत्रचिदूर्जिता।**
**वर्तते शाङ्करी भक्तिः स भक्त इति गीयते।।४।।**

**अन्वयार्थ** : अधमे = अधम माणसात, च = आणि, उत्तमे = उत्तम माणसात, वापि = अथवा, यत्र कुत्रचित् = कोणामध्येही, ऊर्जिता = उत्कृष्ट अशी, शाङ्करी = शंकरांसबंधी, भक्तिः = भक्ती, वर्तते = असते, सः = तो, भक्त इति = भक्त म्हणून, गीयते = वर्णिला जातो.

**भावार्थ** : अधम असो वा उत्तम असो, ज्या पुरुषाच्या अंगी उत्कट शिवभक्ती आढळते त्याला शिवभक्त म्हणावे.॥४॥

**भक्तिः स्थिरीकृता यस्मिन् म्लेच्छे वा द्विजसत्तमे।**
**शम्भोः प्रियः स विप्रश्च न प्रियो भक्तिवर्जितः।।५।।**

**अन्वयार्थ** : म्लेच्छे = शूद्र, वा = अथवा, द्विजसत्तमे = ब्राह्मण असो, यस्मिन् = ज्याच्या ठिकाणी, भक्तिः = भक्ती, स्थिरीकृता = स्थिर झाली आहे, सः = तो, शम्भोः = शंभूला, प्रियः = प्रिय होतो, भक्तिवर्जितः = भक्तिरहित, विप्रः = वेदपाठी ब्राह्मण, न प्रियः = प्रिय होत नाही.

**भावार्थ** : ज्याच्याठायी शिवभक्ती दृढ झाली आहे, तो ब्राह्मण असो वा शूद्र असो, तो शंकरास प्रिय होतो. जातीने ब्राह्मण असूनही जर शिवभक्तिहीन असेल तर तो शंकरास प्रिय होत नाही. एकूण भक्तियुक्त पुरुषच शिवाला प्रिय असतो.॥५॥

**सा भक्तिर्द्विविधा ज्ञेया बाह्याभ्यन्तरभेदतः।**
**बाह्या स्थूलान्तरा सूक्ष्मा वीरमाहेश्वरादृता।।६।।**

**अन्वयार्थ** : वीरमोश्वरादृता = वीरमोश्वरांनी स्वीकारलेली, सा भक्तिः = ती भक्ती, बाह्याभ्यन्तरभेदेतः = बाह्य आणि आभ्यंतर अशा भेदाने, द्विविधा ज्ञेया = दोन प्रकारची असते, आन्तरा = अंतरंग भक्ती, सूक्ष्मा = सूक्ष्म असते, बाह्या = बाह्य भक्ती, स्थूला = स्थूल असते.



**भावार्थ** : शिवभक्ती ही बाह्य व आभ्यंतर अशी दोन प्रकारची असून बाह्य भक्तीला स्थूल भक्ती आणि आभ्यंतर भक्तीला सूक्ष्मभक्ती असे म्हटले जाते. आभ्यंतर भक्ती वीरशैव करतात तर बाह्य भक्ती वीरमाहेश्वरांकडून आचरिली जाते.॥६॥

**सिंहासने शुद्धदेशे सुरम्ये रत्नचित्रिते।**
**शिवलिङ्गस्य पूजा या सा बाह्या भक्तिरुच्यते।।७।।**

**अन्वयार्थ** : सुरम्ये = रमणीय अशा, शुद्धदेशे = पवित्र स्थानी, रत्नचित्रिते = नवरत्न जडविलेल्या, सिंहासने = सिंहासनावर, शिवलिङ्गस्य = शिवलिंगाची, या = जी, पूजा = पूजा केली जाते, सा = ती, बाह्या = बाह्य, भक्तिः = भक्ती, उच्यते = म्हटली जाते.

**भावार्थ** : अत्यंत रम्य, मनोहर व षट्संमार्जनाने शुद्ध केलेल्या भूमीवर रत्नखचित सिंहासनावर शिवलिंग ठेवून त्याची पूजा केली जाते. तिला बाह्यभक्ती असे म्हणतात.॥७॥

**लिङ्गे प्राणं समाधाय प्राणे लिङ्गं तु शाम्भवम्।**
**स्वस्थं मनस्तथा कृत्वा न किञ्चिच्चिन्तयेद् यदि।।८।।**
**साऽऽभ्यन्तरा भक्तिरिति प्रोच्यते शिवयोगिभिः।**
**सा यस्मिन् वर्तते तस्य जीवनं भ्रष्टबीजवत्।।९।।**

**अन्वयार्थ** : लिङ्गे = लिंगामध्ये, प्राणं = प्राण, तु = आणि, प्राणे = प्राणांमध्ये, शाम्भवं लिङ्गं = शिवलिंग, समाधाय = ठेवून, मनः = मन, स्वस्थं कृत्वा = स्थिर करून, तथा = तसेच, यदि = जर, किञ्चित् = काही ही, न चिन्तयेत् = चिंतन केले नाही तर, सा = ती, शिवयोगिभिः = शिवयोग्यांकडून, आभ्यन्तरा = आभ्यंतर, भक्तिरिति = भक्ती असे, प्रोच्यते = म्हटले जाते, सा = ती, यस्मिन् = ज्यात, वर्तते = असते, तस्य = त्याचे, जीवनं = जीवन, भ्रष्टबीजवत् = भाजलेल्या बीजासारखे होते.

**भावार्थ** : शिवलिंगामध्ये आपले प्राण व जीवकलारूप प्राणात शिवकलारूप लिंग यांचे सामरस्य करून स्वस्थ व निश्चिंत मनाने, अन्य कसलाही विचार न करता केवळ लिंग हेच आपले प्राण अशी समरसता साधली जाते, त्या भावस्थितीला शिवयोगी लोक आभ्यंतर भक्ती म्हणतात. ज्याला ही भक्ती प्राप्त होते, त्याची सर्व कर्मे दग्ध बीजाप्रमाणे निष्फळ झाल्यामुळे पुन्हा त्याच्या जन्म-मरणास कारणीभूत होत नाहीत.॥८-९॥

**बहुनात्र किमुक्तेन गुह्यात् गुह्यतरा परा।**
**शिवभक्तिर्न सन्देहस्तया युक्तो विमुच्यते।।१०।।**

**अन्वयार्थ** : अत्र = ह्या विषयी, बहुना = अधिक, उक्तेन किं = सांगून काय प्रयोजन?, गुह्याद् गुह्यतरा = रहस्यातील रहस्य अशा, शिवभक्तिः = आंतरिक शिवभक्ती, परा = श्रेष्ठ आहे, तया युक्तः = त्या भक्तीने युक्त असेलला, विमुच्यते = मुक्त होतो, न सन्देहः = यात संदेह नाही.

**भावार्थ** : ह्या आभ्यंतर भक्तीसंबंधी अधिक काय सांगावे? ही अत्यंत गुह्यतम व श्रेष्ठ आहे. ही आभ्यंतर शिवभक्ती ज्याच्या अंगी स्थिर होईल तो मुक्त होईल यात काही संशय नाही.॥१०॥

**प्रसादादेव सा भक्तिः प्रसादो भक्तिसम्भवः।**
**यथैवाङ्कुरतो बीजं बीजतो वा यथाङ्कुरः।।११।।**

**अन्वयार्थ** : सा भक्तिः = ती भक्ती, प्रसादादेव = प्रसादानेच (अनुग्रहानेच), प्रसादः = प्रसाद, भक्तिसम्भवः = भक्तीनेच प्राप्त होतो, यथा = जसे, अङ्कुरतः = अंकुरापासून, बीजं = बीज, यथा वा = अथवा, बीजतः = बीजातून, अङ्कुरः = अंकुर उत्पन्न होतो.

**भावार्थ** : शिवकृपारूपी प्रसादामुळेच ती शिवभक्ती उत्पन्न होते आणि शिवकृपारूपी प्रसाद भक्ती केल्यामुळे प्राप्त होतो. जसे बीजापासून अंकुर व अंकुरापासून बीज उत्पन्न होते, तसा प्रसाद व भक्ती यांचा परस्परसापेक्ष संबंध आहे.॥११॥



**प्रसादपूर्विका येयं भक्तिर्मुक्तिविधायिनी।**
**नैव सा शक्यते प्राप्तुं नरैरेकेन जन्मना।।१२।।**

**अन्वयार्थ** : येयं = जी, भक्तिः = भक्ती, प्रसादपूर्विका = शिवानुग्रहाने प्राप्त होणारी, मुक्तिविधायिनी = मुक्ती देणारी आहे, सा = ती भक्ती, नरः = मनुष्याकडून, एकेन जन्मना = एकाच जन्मात, प्राप्तुं = प्राप्त करून घेणे, नैव शक्यते = शक्य होत नाही.

**भावार्थ** : परशिवाच्या कृपाप्रसादाने प्राप्त होणारी व मुक्तिदाती अशी ही भक्ती एकाच जन्मात प्राप्त करून घेणे मानवाला अशक्य आहे.॥१२॥

**अनेकजन्मशुद्धानां श्रौतस्मार्तानुवर्तिनाम्।**
**विरक्तानां प्रबुद्धानां प्रसीदति महेश्वरः।।१३।।**

**अन्वयार्थ** : अनेकजन्मशुद्धानां = अनेक जन्मात परिशुद्ध झालेले, श्रौतस्मार्तानुवर्तिनाम् = श्रुती आणि स्मृतींना अनुसरून वर्तन करणाऱ्या, विरक्तानां = वैराग्यशील, प्रबुद्धानां = ज्ञानी लोकांना, महेश्वरः = महेश्वर, प्रसीदति = प्रसन्न होतो.

**भावार्थ** : पूर्वीच्या अनेक जन्मांत ज्याने शिवध्यान, शिवानुसंधान, शिवतत्त्वाचे विवेचन व अखंडपणे शिवनामस्मरण केल्यामुळे ज्याचे मन परिशुद्ध झाले आहे, श्रुतिस्मृतींत सांगितलेली नित्य, नैमित्तिक व प्रायश्चित्तादी कर्मे ज्याने अनुसरली आहेत असा काम्यकर्मात निःस्पृह असलेला शुद्धात्मा व आत्मानात्मविचारसंपन्न अशा ज्ञानी पुरुषावर परशिव प्रसन्न होतो.॥१३॥

**प्रसन्ने सति मुक्तोऽभून्मुक्तः शिवसमो भवेत्।**
**अल्पभक्त्यापि यो मर्त्यस्तस्य जन्मत्रयात्परम्।।१४।।**

**अन्वयार्थ** : प्रसन्ने सति = शिव प्रसन्न झाल्यावर, मुक्तः = मुक्त, अभूत् = होईल, मुक्तः = मुक्त झालेला, शिवसमः = शिवासमान, भवेत् = होतो, अपि = आणि, यो मर्त्यः = जो मनुष्य, अल्पभक्त्या = अल्प भक्तीने युक्त असतो, तस्य = त्याला, जन्मत्रयात् = तीन जन्मानंतर, परं = मुक्ती प्राप्त होते.

**भावार्थ** : शिव प्रसन्न झाल्यावर भक्त मुक्त होतो, म्हणजे शिवासमान होतो. जो पुरुष अल्प भक्तीने युक्त असेल त्याला तीन जन्मांत मुक्ती मिळते, तर पूर्णभक्तियुक्त पुरुषाला एकाच जन्मात मुक्ती मिळते. वीरशैवांना व वीरमाहेश्वरांना एकाच जन्मात मुक्ती मिळते आणि अन्य शैवांना मात्र तीन जन्मानंतर मुक्ती मिळते, असे वीरागमात म्हटले आहे.॥१४॥

**न योनियन्त्रपीडा वै भवेन्नैवात्र संशयः।**
**साङ्गा न्यूना च या सेवा सा भक्तिरिति कथ्यते।।१५।।**

**अन्वयार्थ** : वै = निश्चयाने, योनियन्त्रपीडा = गर्भवासाचे दुःख, न भवेत् = होत नाही, अत्र = याविषयी, नैव संशयः = संशय नाही, या सेवा = जी सेवा, भक्तिरिति कथ्यते = भक्ती म्हणून म्हटली जाते, सा = ती, साङ्गा = पूर्ण भक्ती, च = आणि, न्यूना = अल्पभक्ती, अशी दोन प्रकारची असते.

**भावार्थ** : भक्तीचे दोन प्रकार आहेत. पैकी एका भक्तीला 'सांगा' व दुसरीला 'न्यूना' म्हणतात. वर सांगितलेली नऊ प्रकारची भक्ती ज्यावेळी मनात व देहात पूर्णपणाने सक्रिय राहत असेल तेव्हा ती सांगा म्हणजे पूर्णभक्ती होय. शिवभक्ताला पुन्हा जन्म घेण्याचे कारण उरत नाही, त्यामुळे जन्म घेण्याचे दुःखही भोगावे लागत नाही.॥१५॥

**सा पुनर्भिद्यते त्रेधा मनोवाक्कायसाधनैः।**
**शिवरूपादिचिन्ता या सा सेवा मानसी स्मृता।।१६।।**
**जपादि वाचिकी सेवा कर्मपूजा च कायिकी।**

**अन्वयार्थ** : सा = ती पूर्ण भक्ती, पुनः = पुन्हा, मनोवाक्कायसाधनैः = मन, वाणी आणि शरीर या साधनांमुळे, त्रेधा भिद्यते = तीन प्रकारची होते, या = जी, शिवरूपादिचिन्ता = शिवाचे चिंतनरूप आहे, सा सेवा = ती भक्ती, मानसी स्मृता = मानसिक म्हटली जाते, जपादि = जप, स्तोत्रादी, वाचिकी सेवा = वाचिक भक्ती, च = आणि, कर्मपूजा = क्रियाकर्म, कायिकी = कायिक भक्ती होय.

**भावार्थ** : मन, वाणी व देह या तीन साधनांनी केलेली मानसिक, वाचिक व कायिक अशी सांगा भक्ती तीन प्रकारची होते. शिवस्वरूपाचे चिंतन



करणे ही मानसिक भक्ती, वाणीने शिवमंत्राचा जप, स्तुती व शिवनामाचा उच्चार करणे ही वाचिक भक्ती आणि शरीर झिजवून शिवलिंगपूजादी कर्तव्ये करणे ही कायिक भक्ती होय.॥१६॥

**बाह्यमाभ्यन्तरं चैव बाह्याभ्यन्तरमेव च।।१७।।**
**मनोवाक्कायभेदैश्च त्रिधा तद्भजनं विदुः।**

**अन्वयार्थ** : मनोवाक्कायभेदैः = मन, वाणी आणि शरीर या त्रिकरणांच्या भेदाने, त्रिधा = तीन प्रकार झालेली, तद्भजनं = ती भक्ती, बाह्यं = बाह्य, आभ्यन्तरम् = आभ्यंतर, चैव = तसेच, बाह्याभ्यन्तरमेव = बाह्याभ्यांतर, अशी त्रिधा = तीन प्रकारची, विदुः = विद्वान लोक जाणतात.

**भावार्थ** : दीक्षात्रययुक्त साधकाने पूर्वी सांगितल्याप्रमाणे मन, वाणी आणि शरीर या साधनांद्वारे केलेल्या भक्तीचे पुन्हा तसेच तीन प्रकार होतात, ते असे- बाह्यभक्ती, आभ्यंतर भक्ती आणि बाह्याभ्यंतर भक्ती.॥१७॥

**मनो महेशध्यानाढ्यं नान्यध्यानरतं मनः।।१८।।**
**शिवनामरता वाणी वाङ्मता चैव नेतरा ।**
**लिङ्गैः शिवस्य चोद्दिष्टैस्त्रिपुण्ड्रादिभिरङ्कितः।।१९।।**
**शिवोपचारनिरतः कायः कायो न चेतरः।**

**अन्वयार्थ** : महेशध्यानाढ्यं = शिवाच्या चिंतनात रत, मनः = मन होय, अन्यध्यानरतं = शिवेतर विषयात रमणारे, न मनः = मन नव्हे, शिवनामारता = शिवनामाच्या जपात तल्लीन, वाणी = वाणी, एव = च, वाङ्मता = वाणी होय, न च इतरा = अन्य व्यवहारात रमणारी वाणी नव्हे, शिवस्य = शिवाची, लिङ्गैः = चिन्हे म्हणून, उपदिष्टैः = उपदेशिलेली, त्रिपुण्ड्रादिभिः = भस्मादींनी, अङ्कितः = अलंकृत, च = आणि, शिवोपचारनिरतः = शिवपूजातत्पर, कायः = देह, कायः = देह होय. न चेतरः = इतर देह, देह नव्हेत.

**भावार्थ** : शिवध्यानात रत झालेले मनच मन होय, अन्य ध्यानांत रत होणारे मन हे मन नव्हे. शिवनामात तल्लीन होणारी वाणीच वाणी होय, अन्य विषयांत रत होणारी वाणी ही वाणीच नव्हे. भस्म, रुद्राक्ष आदी चिन्हांनी

अंकित झालेला आणि शिवपूजेत तत्पर असलेला देहच देह होय, अन्य देह देहच नव्हेत. अशा प्रकारे शिवाचे अनन्यभावाने चिंतन करणे ही मानसिक भक्ती, शिवाची अनन्यभावाने स्तुती, भजन आदी करणे ही वाचिक भक्ती व शिवाची अनन्यभावाने पूजा अर्चा करणे ही कायिक भक्ती होय.॥१८-१९॥

**अन्यात्मविदितं बाह्यं शम्भोरभ्यर्चनादिकम्।।२०।।**
**तदेव तु स्वसंवेद्यमाभ्यन्तरमुदाहृतम्।**
**मनो महेशप्रवणं बाह्याभ्यन्तरमुच्यते।।२१।।**

**अन्वयार्थ** : अन्यात्मविदितं = दुसऱ्यांना माहीत झालेली, शम्भोः = शिवाची, अभ्यर्चनादिकम् = पूजाअर्चादी, बाह्यं = बाह्य शिवपूजा होय, तदेव = तीच, स्वसंवेद्यं तु = स्वतःलाच गोचर झाल्यावर; आभ्यन्तरं = आभ्यंतर, शिवपूजा म्हणून, उदाहृतम् = सांगितली जाते, महेशप्रवणं = शिवलिंगासक्त, मनः = मन, बाह्याभ्यन्तरम् = बाह्याभ्यंतर होऊन केलेली पूजा, उच्यते = म्हटली आहे.

**भावार्थ** : आपण केलेली शिवपूजादी कर्मे दुसऱ्यांनी जाणली व नेत्रांनी पाहिली तर ती बाह्य शिवपूजा होय, तीच कर्मे दुसऱ्याच्या दृष्टीला न पडता स्वतःशिवाय कोणालाही कळली नाहीत तर ती आभ्यंतर शिवपूजा होय. जर आपले मन काकाक्षिगोलक न्यायाने काही वेळ आपल्या इष्टलिंगात आणि काही वेळ आपल्या हृदयकमलातील अंतर्लिंगात आळीपाळीने रत होत असेल तर ती बाह्याभ्यंतर शिवपूजा होय.॥२०-२१॥

**पञ्चधा कथ्यते सद्भिस्तदेव भजनं पुनः।**
**तपः कर्म जपो ध्यानं ज्ञानं चेत्यनुपूर्वकम्।।२२।।**

**अन्वयार्थ** : तदेव भजनं = तीच पूजा, पुनः = पुन्हा, तपः = तप, कर्म = कर्म, जपः = जप, ध्यानं = ध्यान, च = आणि, ज्ञानं = ज्ञान, इति = असे, अनुपूर्वकं = अनुक्रमाने, पञ्चधा = पाच प्रकारची, असते असे, सद्भिः = सज्जनांकडून, कथ्यते = सांगितले आहे.

**भावार्थ** : विद्वानांनी शिवार्चनेचे पाच प्रकार मानलेले आहेत, ते असे-तप, कर्म, जप, ध्यान व ज्ञान यालाच शिवपंचयज्ञ असेही म्हणतात.॥२२॥



**शिवार्थे देहसंशोषस्तपः कृच्छ्रादि नो मतम्।**
**शिवार्चा कर्म विज्ञेयं बाह्यं यागादि नोच्यते।।२३।।**
**जपः पञ्चाक्षराभ्यासः प्रणवाभ्यास एव वा।**
**रुद्राध्यायादिकाभ्यासो न वेदाध्ययनादिकम्।।२४।।**
**ध्यानं शिवस्य रूपादिचिन्ता नात्मादिचिन्तनम्।**
**शिवागमार्थविज्ञानं ज्ञानं नान्यार्थवेदनम्।।२५।।**
**इति पञ्चप्रकारोऽयं शिवयज्ञः प्रकीर्तितः।**

**अन्वयार्थ** : शिवार्थे = शिवासाठी, देहसंशोषः = शरीराचे शोषण करणे, तपः = तप होय, कृच्छ्रादि = कृच्छ्र चांद्रायणादी, नो मतम् = तप म्हणून मानले जात नाही, शिवार्चा = शिवलिंगपूजा, कर्म विज्ञेयं = कर्म समजावे, बाह्याङ्गादि = अन्य यज्ञयागादी, नोच्यते = कर्म म्हणविले जात नाही, पञ्चाक्षराभ्यासः = पंचाक्षर मंत्राची आवृत्ती, वा = अथवा, प्रणवाभ्यासः = ओंकाराची आवृत्ती, रुद्राध्यायादि-काभ्यासः = रुद्राध्यायाची आवृत्ती, जप एव = जप होय, वेदाध्ययनादिकं = अन्य वेदभागांचे अध्ययनादी, न जपः = जप नव्हे, शिवस्य = शिवाचे, रूपादिचिन्ता = स्वरूपादीचे चिंतन, ध्यानं = ध्यान होय, आत्मादिचिन्तनम् = परिछिन्न अशा शरीरेन्द्रियादी उपाधीने युक्त आत्म्याचे, 'मी' असे चिंतन करणे, न ध्यानं = ध्यान नव्हे, शिवागमार्थविज्ञानं = शिवागमांचा अर्थ जाणून घेणे, ज्ञानं = ज्ञान होय, अन्यार्थवेदनम् = अन्य शास्त्रांचा अर्थ समजून घेणे, न = ज्ञान नव्हे, इति = अशा प्रकारे, अयं = हा, शिवयज्ञः = शिवयज्ञ, पञ्चप्रकारः = पाच प्रकारचा, प्रकीर्तितः = सांगितला आहे.

**भावार्थ** : शिवपूजेची सामग्री संपादन करण्यासाठी देह झिजविणे म्हणजे तप, कृच्छ्रचांद्रायणादी व्रते करून देह झिजविणे हे तप नव्हे. शिवपूजन करणे हेच कर्म होय, कारण त्याचे फल शाश्वत आहे. शिवपूजना-शिवाय जी यज्ञयागादी कर्मे आहेत त्या कर्मास कर्म म्हणू नये. शिवपंचाक्षर-मंत्र, प्रणव आणि रुद्राध्याय आदींचा अभ्यास हाच जप होय, वेदाध्ययन करणे हा जप नव्हे. शरीर उपाधियुक्त आत्म्याच्या अहं रूप चिंतनास ध्यान म्हणू नये. शिवाच्या रूपाचे चिंतन, शिवलिंगाचे चिंतन, चन्द्रशेखरादी पवित्र मूर्तींचे

चिंतन यालाच ध्यान म्हणावे. शिवगमांपासून प्राप्त होणारे ज्ञान हेच ज्ञान होय, सांख्यादी अन्य शास्त्रांपासून प्राप्त होणाऱ्या ज्ञानास ज्ञान म्हणू नये. मन, वाणी व देह यांपासून घडणारा शिवयज्ञ असा पाच प्रकारचा असतो.॥२३-२५॥

**अनेन पञ्चयज्ञेन यः पूजयति शङ्करम्।**
**भक्त्या परमया युक्तः स वै भक्त इतीरितः।।२६।।**

**अन्वयार्थ** : अनेन = ह्या, पञ्चयज्ञेन = पाच प्रकारच्या यज्ञाने, यः = जो, शङ्करम् = शंकराची, पूजयति = पूजा करतो, परमया = श्रेष्ठ अशा, भक्त्या = भक्तीने, युक्तः = युक्त असलेला, सः = तो, वै = निश्चयाने, भक्त इति = भक्त म्हणून, ईरितः = म्हटला जातो.

**भावार्थ** : अशा पाच प्रकारच्या शिवयज्ञाने जो भक्तिपूर्वक शंकराचे पूजन करतो त्याला भक्त म्हणावे.॥२६॥

**पूजनाच्छिवभक्तस्य पुण्या गतिरवाप्यते।**
**अवमानान्महाघोरो नरको नात्र संशयः।।२७।।**

**अन्वयार्थ** : शिवभक्तस्य = शिवभक्ताचे, पूजनात् = पूजन केल्याने, पुण्या = श्रेष्ठ असे, गतिः = स्थान, अवाप्यते = प्राप्त होते, अवमानात् = त्याचा अपमान केल्यावर, महाघोरः = अत्यंत घोर असा, नरकः = नरक प्राप्त होतो, अत्र = ह्या विषयी, न संशयः = संशय नाही.

**भावार्थ** : शिवभक्ताची पूजा केल्याने सद्‌गती प्राप्त होते आणि अपमान केल्याने घोर असा नरक प्राप्त होतो यात संशय नाही.॥२७॥

**शिवभक्तो महातेजाः शिवभक्तिपराङ्मुखान्।**
**न स्पृशेन्नैव वीक्षेत न तैः सह वसेत् क्वचित्।।२८।।**

**अन्वयार्थ** : महातेजाः = महा तेजस्वी अशा, शिवभक्तः = शिवभक्ताने, शिवभक्तिपराङ्मुखान् = शिवभक्तिहीन लोकांना, न स्पृश्येत् = स्पर्श करू नये, नैव वीक्षेत = पाहूही नये, तैः सह = त्यांच्या बरोबर, क्वचित् = कोठेही, न वसेत् = बसू नये.



**भावार्थ** : शिवभक्त महातेजस्वी असतो. शिवभक्ताने शिवभक्ती न करणाऱ्या भवींना शिवू नये, त्यांचे तोंड पाहू नये आणि त्यांच्या सहवासात देखील राहू नये.॥२८॥

**यदा दीक्षाप्रवेशः स्याल्लिङ्गधारणपूर्वकः।**
**तदाप्रभृति भक्तोऽसौ पूजयेत् स्वागमस्थितान्।।२९।।**

**अन्वयार्थ** : यदा = जेव्हा, लिङ्गधारणपूर्वकः = लिङ्गधारणपूर्वक, दीक्षाप्रवेशः स्यात् = दीक्षा होते, तदाप्रभृति = तेव्हापासून, असौ = ह्या, भक्तः = भक्ताने, स्वागमस्थितान् = आपल्या आगमाप्रमाणे आचरण करणाऱ्यांचे, पूजयेत् = पूजन करावे.

**भावार्थ** : गुरूकडून दीक्षापूर्वक लिंगधारणा करवून घेणाऱ्या भक्ताने दीक्षा झालेल्या दिवसापासून शिवागमाप्रमाणे वर्तन करणाऱ्या शिवभक्तांचा आदरसत्कार करीत राहावे.॥२९॥

**स्वमार्गाचारनिरताः सजातीया द्विजास्तु ये।**
**तेषां गृहेषु भुञ्जीत नेतरेषां कदाचन।।३०।।**

**अन्वयार्थ** : स्वमार्गाचरनिरताः = वीरशैव धर्माचरणरत, स्वजातीयाः = स्वजातीय, ये द्विजाः = जे दीक्षासंपन्न वीरशैव आहेत, तेषां = त्यांच्या, गृहेषु = घरात, भुञ्जीत = जेवण करावे, इतरेषां = इतरांच्या घरी, न कदाचन = केव्हाही करू नये.

**भावार्थ** : शिवभक्ताने दीक्षासंपन्न आणि वीरशैवाचारनिष्ठ वीरशैव व वीर माहेश्वरांच्या घरीच भोजन घ्यावे, इतरांच्या घरी घेऊ नये.॥३०॥

**स्वमार्गाचारविमुखैर्भविभिः प्राकृतात्मभिः।**
**प्रेषितं सकलं द्रव्यमात्मलीनमपि त्यजेत्।।३१।।**

**अन्वयार्थ** : स्वमार्गाचारविमुखैः = वीरशैवाचार न पाळणारे, प्राकृतात्मभिः = असंस्कृत लोकांकडून, प्रेषितं = पाठविलेले, आत्मलीनमपि = स्वतःच्या अधीन झालेले असले तरी, सकलं द्रव्यं = संपूर्ण संपत्तीचा, त्यजेत् = त्याग करावा.

**भावार्थ** : वीरशैवाचाराच्या विरोधी आचरण करणाऱ्या भवींनी दिलेले धन आपल्या आधीन होण्यास योग्य असले तरी त्या धनाचा त्याग करावा.॥३१॥

**नार्चयदेन्यदेवांस्तु न स्मरेन्न च कीर्तयेत्।**
**न तन्निवेद्यमश्नीयाच्छिवभक्तो दृढव्रतः।।३२।।**

**अन्वयार्थ** : दृढव्रतः = दृढ व्रताच्या, शिवभक्तः = शिवभक्ताने, अन्य-देवान् = शिव सोडून अन्य देवांचे, नार्चयेत् = अर्चन करू नये, न स्मरेत् = स्मरण करू नये, न कीर्तयेत् = स्तुती करू नये, च = आणि, तन्निवेद्यम् = त्याचा नैवेद्य, न अश्नीयात् = खाऊ नये.

**भावार्थ** : दृढनिश्चयी शिवभक्ताने अन्य देवांची पूजा करू नये, स्तुती करू नये आणि ध्यान करू नये. अशा देवांना अर्पण केलेले अन्नादी पदार्थ सेवन करू नयेत.॥३२॥

**यद्गृहेष्वन्यदेवोऽस्ति तद्गृहाणि परित्यजेत्।**
**नान्यदेवार्चकान् मर्त्यान् पूजाकाले निरीक्षयेत्।।३३।।**

**अन्वयार्थ** : यद्गृहेषु = ज्या घरांत, अन्यदेवोऽस्ति = दुसरा देव आहे, तद्गृहाणि = ती घरे, परित्यजेत् = सोडावी, अन्यदेवार्चकान् = दुसऱ्या देवांची पूजा करणाऱ्या, मर्त्यान् = माणसांना, पूजाकाले = आपल्या इष्टलिंगपूजेच्या वेळी, न निरीक्षयेत् = पाहू नये.

**भावार्थ** : ज्या घरात शिवाखेरीज इतर देव असतील त्या घराचा त्याग करावा. आपल्या शिव-पूजनाच्या वेळी अन्य देवांचे पूजन करणाऱ्या लोकांचे तोंडदेखील पाहू नये.॥३३॥

**सदा शिवैकनिष्ठानां वीरशैवाध्ववर्तिनाम्।**
**नहि स्थावरलिङ्गानां निर्माल्याद्युपयुज्यते।।३४।।**

**अन्वयार्थ** : सदा = नेहमी, शिवैकनिष्ठानां = केवळ शिवावरच निष्ठा ठेवणाऱ्या, वीरशैवाध्ववर्तिनाम् = वीरशैवानुयायांना, स्थावरलिङ्गानां = स्थावर लिंगांचे, निर्माल्यादी = प्रसादादी, नहि उपयुज्यते = उपयुक्त नाहीत.



**भावार्थ** : शिवलिंगनिष्ठ वीरशैवमार्गी भक्तासाठी देवर्षी, मानवादींनी प्रतिष्ठापित केलेल्या स्थावर लिंगांचे निर्माल्य, प्रसाद अयोग्य मानला गेला आहे, म्हणून त्याचा स्वीकार करू नये.॥३४॥

**यत्र स्थावरलिङ्गानामपायः परिवर्तते।**
**अथवा शिवभक्तानां शिवलाञ्छनधारिणाम्।।३५।।**
**तत्र प्राणान् विहायापि परिहारं समाचरेत्।।**
**शिवार्थं मुक्तजीवश्चेच्छिवसायुज्यमाप्नुयात्।।३६।।**

**अन्वयार्थ** : यत्र = जेथे, स्थावरलिङ्गानां = स्थावर लिंगांना, अथवा = अथवा, शिवलाञ्छनधारिणां = शिवाचे भस्म-रुद्राक्षादी लांछन धारण केलेल्या, शिवभक्तानां = शिवभक्तांना, अपायः = अपाय, परिवर्तते = होतो, तत्र = तेथे, प्राणान् = स्वतःचे प्राण, विहायापि = त्यागून सुद्धा, परिहारं = अपायाचे निराकरण, समाचरेत् = करावे, शिवार्थं = शिवासाठी, मुक्तजीवश्चेत् = प्राणत्याग करणाऱ्यास, शिवसायुज्यं = शिवसायुज्य, आप्नुयात् = प्राप्त होईल.

**भावार्थ** : ज्या ठिकाणी स्थावर लिंगाचा नाश होत असेल आणि जेथे गजचर्म, गंगाकपाल, भस्म, कंथा, कमंडलू, भिक्षापात्र, दंड आदी शिवलांछने धारण करणाऱ्या जंगमदेवांना व नवविधा भक्ती करणाऱ्या शिवभक्तांना उपद्रव होत असेल त्या ठिकाणी स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता शिवलिंगाचा नाश होऊ देऊ नये आणि शिवभक्तांची पीडा दूर करावी. या कार्यात त्याचा प्राण गेला तरी तो शिवसायुज्य पावतो. शिवकार्यासाठी खर्च केलेल्या प्राणांचे सार्थकच होते.॥३५-३६॥

**शिवनिन्दाकरं दृष्ट्वा घातयेदथवा शपेत्।**
**स्थानं वा तत्परित्यज्य गच्छेद्यद्यक्षमो भवेत्।।३७।।**

**अन्वयार्थ** : शिवनिन्दाकरं = शिवनिंदा करणाऱ्यांना, दृष्ट्वा = पाहून, घातयेत् = त्याचा प्राणघात करावा, अथवा = अथवा, शपेत् = वाक्ताडन करावे, यदि = जर, अक्षमः = जे दोन्ही करण्यास असमर्थ झाल्यास, तत्स्थानं = ते स्थान, परित्यज्य = सोडून, गच्छेत् = जावे.

**भावार्थ** : शिवनिंदा करणाराचे हनन करावे अथवा त्यास शाप द्यावा. हे करण्याची शक्ती नसेल तर ते स्थान सोडून दुसरीकडे जावे. या दोन प्रकारच्या आचारांना शास्त्रात गणाचार म्हटले आहे.॥३७॥

**यत्र चाचारनिन्दाऽस्ति कदाचित्तत्र न व्रजेत्।**
**यद्गृहे शिवनिन्दाऽस्ति तद्गृहं तु परित्यजेत्।।३८।।**

**अन्वयार्थ** : यत्र = जेथे, आचारनिन्दा = शिवाचाराची निंदा, अस्ति = होते, तत्र = तेथे, कदाचित् = केव्हाही, न व्रजेत् = जाऊ नये, च = आणि, यद्गृहे = ज्या घरी, शिवनिन्दा = शिवनिंदा, अस्ति = होते, तद्गृहाणि = ते घर, परित्यजेत् = सोडून जावे.

**भावार्थ** : जेथे शिवाचाराची निंदा होत असेल तेथे जाऊ नये. ज्या घरात शिवनिंदा होत असेल त्या घराचा त्याग करावा.॥३९॥

**यः सर्वभूताधिपतिं विश्वेशानं विनिन्दति।**
**न तस्य निष्कृतिः शक्या कर्तुं वर्षशतैरपि।।३९।।**

**अन्वयार्थ** : यः = जो, सर्वभूताधिपतिं = सर्वभूतांचा अधिपती असणाऱ्या, विश्वेशानं = विश्वेश्वराची, विनिन्दति = निंदा करतो, तस्य = त्याचा, निष्कृतिः = परिहार, वर्षशतैरपि = शंभर वर्षांत सुद्धा, कर्तुं = करणे, न शक्या = शक्य होत नाही.

**भावार्थ** : शंकर हा प्राणिमात्रांचा अधिपती असून त्रैलोक्याचाही ईश्वर आहे. त्याची जो मनुष्य निंदा करतो त्या मनुष्याचे पाप शंभर वर्षांत देखील नष्ट होणारे नाही.॥३९॥

**शिवपूजापरो भूत्वा पूर्वकर्म विसर्जयेत्।**
**अथवा पूर्वकर्म स्यात् सा पूजा निष्फलं भवेत्।।४०।।**

**अन्वयार्थ** : शिवपूजापरः = शिवपूजातत्पर, भूत्वा = होऊन, पूर्वकर्म = दीक्षेपूर्वी करीत असलेली कर्मे, विसर्जयेत् = सोडावी, अथवा = जर, पूर्वकर्म = पूर्वीचे कर्म, स्यात् = करीत राहिल्यास, सा = ती, पूजा, निष्फला = निष्फल, भवेत् = होईल.



**भावार्थ** : शिवदीक्षायुक्त शिवपूजातत्पर अशा शिवभक्ताचे संध्या वंदनादी सूर्यादींच्या उपासनारूप पूर्वकर्माचा त्याग करावा. त्याने पूर्वकर्म सोडले नाही तर त्याने केलेली शिवपूजा निष्फळ होते.॥४०॥

**उत्तमां गतिमाश्रित्य नीचां वृत्तिं समाश्रितः।**
**आरूढपतितो ज्ञेयः सर्वकर्मबहिष्कृतः।।४१।।**

**अन्वयार्थ** : उत्तमां = श्रेष्ठ अशा, गतिं = स्थानाला, आश्रित्य = प्राप्त होऊन, नीचां = निकृष्ट, वृत्तिं = आचरणाचा, समाश्रितः = अवलंब करणारा, सर्वकर्मबहिष्कृतः = सर्व कर्मे करण्यास अयोग्य असा, आरूढपतितः = आरूढ पतित म्हणून, ज्ञेयः = समजावा.

**भावार्थ** : उत्तम गती प्राप्त झाल्यावर ती सोडून मुद्दाम नीचवृत्तीची आवड जो धरतो तो आरूढपतित होय. त्याला कोणतेही कर्म करण्याचा अधिकार नाही. तो सर्वकर्मबहिष्कृत समजावा.॥४१॥

**पञ्चाक्षरोपदेशी च नरस्तुतिकरो यदि।**
**सोऽलिङ्गी स दुराचारी कुकविः स तु विश्रुतः।।४२।।**

**अन्वयार्थ** : पञ्चाक्षरोपदेशी = पंचाक्षर मंत्राचा उपदेश घेतलेला साधक, यदि = जर, नरस्तुतिकरः = मनुष्याची स्तुती करणारा होईल तर, सः = तो, अलिङ्गी = लिंगरहित, दुराचारी = दुराचारी, च = आणि, कुकविः = कुकवी म्हणून, विश्रुतः = जाणला जातो.

**भावार्थ** : शिवपंचाक्षरी मंत्रोपदेश घेतलेल्या शिवभक्ताने नरस्तुती करणे चुकीचे होय. तो नर नरस्तुती करीत असेल अथवा नरस्तुतिपर काव्य करीत असेल तर तो अलिंगी, दुराचारी, कुकवी आणि शास्त्रद्रोही असा समजावा.॥४२॥

**चर्मपात्रे जलं तैलं न ग्राह्यं भक्तितत्परैः।**
**गृह्यते यदि भक्तेन रौरवं नरकं व्रजेत् ।।४३।।**

**अन्वयार्थ** : भक्तितत्परैः = शिवभक्तिनिष्ठांनी, चर्मपात्रे = चामड्याच्या भांड्यात, जलं = पाणी, तैलं = तेल, न ग्राह्यं = ग्रहण करू नये, यदि = जर,

भक्तेन = शिवभक्ताकडून, गृह्यते = स्वीकारले गेले, तर तो, रौरवं नरकं = रौरव नरकाला, व्रजेत् = जातो.

**भावार्थ** : शिवभक्ताने कातड्याच्या पात्रात तेल व पाणी कधी घेऊ नये, जर त्याने घेतले तर तो रौरव नरकात जातो.॥४३॥

**न तस्य सूतकं किञ्चित्प्राणलिङ्गाङ्गसङ्गिनः।**
**जन्मनोऽत्थं मृतोत्थं च विद्यते परमार्थतः॥४४॥**

**अन्वयार्थ** : तस्य = त्या, प्राणलिङ्गाङ्गसङ्गिनः = प्राणलिंगधारी शिवभक्ताला, जन्मनोत्थं = जन्मापासून होणारे, मृतोत्थं = मरणापासून होणारे, सूतकं = सूतक, परमार्थतः = पारमार्थिक रूपाने, किञ्चित् = थोडेही, न विद्यते = असत नाही.

**भावार्थ** : प्राण व लिंग यांचे सामरस्य प्राप्त करून घेतलेल्या अर्थात् प्राणलिंगधारी शिवभक्ताना परमार्थतः जन्मासंबंधी व मरणासंबंधी अणुमात्र सूतक नाही. म्हणून इष्टलिंगपूजेच्या वेळी जननमरणादी सूतके पाळू नयेत.॥४५॥

**लिङ्गार्चनरतायाश्च ऋतौ नार्या न सूतकम्।**
**तथा प्रसूतिकायाश्च सूतकं नैव विद्यते॥४५॥**

**अन्वयार्थ** : लिङ्गार्चनरतायाः = लिंगार्चन करणाऱ्या, नार्याः = स्त्रियांना, ऋतौ = ऋतुकालीन, सूतकं = सूतक, न = नसते, तथा = तसेच, प्रसूतिकायाः = प्रसूत झालेल्या स्त्रियांना, सूतकं = सूतक, नैव विद्यते = नसते.

**भावार्थ** : निष्ठापूर्वक लिंगार्चन करणाऱ्या वीरशैव स्त्रियांना ऋतुकाळ-सूतक व प्रसूतिसूतक नाही.॥४५॥

**गृहे यस्मिन् प्रसूता स्त्री सूतकं नात्र विद्यते।**
**शिवपादाम्बुसंस्पर्शात् सर्वपापं प्रणश्यति॥४६॥**

**अन्वयार्थ** : यस्मिन् गृहे = ज्या घरी, स्त्री = स्त्री, प्रसूता = प्रसूत झाली आहे, अत्र = त्या घरी, सूतकं = सूतक, न विद्यते = होत नाही, शिवपादाम्बु-संस्पर्शात् = शिवपादोदकस्पर्शाने, सर्वपापं = सर्व पाप, प्रणश्यति = नष्ट होते.



**भावार्थ** : शिवभक्ताच्या घरी शिवभक्त स्त्री प्रसूत झाली तर तेथे सूतकाचा दोष नाही. कारण गुरुपादोदक किंवा जंगमपादोदक यांच्या स्पर्शाने किंवा अभिसिंचनाने सर्व पापे नष्ट होतात.॥४६॥

**शिवस्थानानि तीर्थानि विशिष्टानि शिवार्चकः।**
**शिवयात्रोत्सवं नित्यं सेवेत परया मुदा॥४७॥**

**अन्वयार्थ** : शिवार्चकः = शिवपूजा करणाऱ्याने, विशिष्टानि = श्रेष्ठ, शिवस्थानानि = शिवक्षेत्रे, तीर्थानि = शिवतीर्थे, आणि शिवयात्रोत्सवं = शिव-यात्रोत्सवांचे, परया मुदा = मोठ्या आनंदाने, नित्यं = नेहमी, सेवेत = सेवन करावे.

**भावार्थ** : शिवपूजन करणाऱ्या भक्ताने प्रसिद्ध अशी शिवस्थाने पाहावी, तीर्थे करावी व शिवयात्रेच्या महोत्सव आवडीने करावा.॥४७॥

**शिवक्षेत्रोत्सवमहायात्रादर्शनकाङ्क्षिणाम्।**
**मार्गेऽन्नपानदानं च कुर्यान्माहेश्वरो जनः॥४८॥**

**अन्वयार्थ** : माहेश्वरो जनः = शिवभक्तांनी, शिवक्षेत्रोत्सवमहायात्रा = शिवक्षेत्रातील उत्सवानिमित्त होणाऱ्या महायात्रा, दर्शनकाङ्क्षिणाम् = पाहू इच्छि-णाऱ्यांना, मार्गे = मार्गात, अन्नपानदानं = अन्न व जलाचे दान, कुर्यात् = करावे.

**भावार्थ** : शिवभक्तिसंपन्न वीरमाहेश्वराने शिवक्षेत्रोत्सव व महायात्रा करण्यास जाणाऱ्या सर्व लोकांना मार्गात अन्नोदकाचे दान करावे.॥४८॥

**नान्नतोयसमं दानं न चाहिंसापरं तपः।**
**तस्मान्माहेश्वरो नित्यमन्नतोयप्रदो भवेत्॥४९॥**

**अन्वयार्थ** : अन्नतोयसमं = अन्न-पाण्यासारखे, न दानं = दान नाही, च = आणि, अहिंसापरं = अहिंसेपेक्षा श्रेष्ठ, तपः न = तप नाही, तस्मात् = म्हणून, माहेश्वरः = शिवभक्ताने, नित्यं = प्रतिदिन, अन्नतोयप्रदः = अन्नपाण्याचे दान करणारा, भवेत् = व्हावे.

**भावार्थ** : अन्नोदकाच्या दानासारखे दुसरे कोणतेही दान श्रेष्ठ नाही, आणि अहिंसेसारखे दुसरे श्रेष्ठ तप नाही. म्हणून शिवभक्ताने अन्नोदकाचे दान करावे.॥४९॥

**स्वमार्गाचारवर्तिभ्यः स्वजातिभ्यः सदाव्रती।**
**दद्यात्तेभ्यः समादद्यात् कन्यां कुलसमुद्भवाम्।।५०।।**

**अन्वयार्थ** : सदाव्रती = नित्य शिवाचाराने वागणाऱ्याने, स्वमार्गाचार-वर्तिभ्यः = आपल्या धर्माचाराने वागणाऱ्या, स्वजातिभ्यः = आपल्या जातीच्या लोकांना, कुलसमुद्भवाम् = आपल्या कुलात उत्पन्न झालेल्या, कन्यां = कन्येला, दद्यात् = द्यावे, तेभ्यः = त्यांच्याकडून, समादद्यात् = घ्यावे.

**भावार्थ** : नित्य शिवाचारसंपन्न वीरशैवाने आपल्यासारख्या आचार-संपन्न अशा स्वजातीय कन्येशीच विवाह करावा आणि अशाच आचारसंपन्न कुलातील पुरुषाला कन्या द्यावी. म्हणजेच कन्यादान करताना अथवा स्वीकारताना उपरोक्त गोष्टींचा अवश्य विचार करावा.।।५०।।

**एवमाचारसंयुक्तो वीरशैवो महाव्रती।**
**पूजयेत्परया भक्त्या गुरुं लिङ्गं च सन्ततम्।।५१।।**

**अन्वयार्थ** : एवम् = अशा प्रकारे, आचारसंयुक्तः = आचारवंत, महाव्रती = श्रेष्ठ व्रताचे पालन करणारा, वीरशैवः = वीरशैव, परया = श्रेष्ठ, भक्त्या = भक्तीने, सन्ततम् = सदा, गुरुं = गुरूचे, च = आणि, लिङ्गं = लिंगाचे, पूजयेत् = पूजन करावे.

**भावार्थ** : याप्रमाणे आचारसंपन्न वीरव्रतांचे पालन करणाऱ्या वीरशैवाने इष्टलिंगाबरोबर गुरूचेही सदैव उत्कट भक्तीने अर्चन करावे.।।५१।।

### उभयस्थलम् - (१०)

**गुरोरभ्यर्चनेनापि साक्षादभ्यर्चितः शिवः।**
**तयोर्नास्ति भिदा किञ्चिदेकत्वात्तत्त्वरूपतः।।५२।।**

**अन्वयार्थ** : गुरोः = गुरूचे, अभ्यर्चनेन = पूजन केल्याने, साक्षात् शिवः = प्रत्यक्ष शिवच, अभ्यर्चितः = पूजिला जातो, तयोः = त्या दोघांमध्ये, तत्त्वरूपतः = तात्त्विक रूपाने, एकत्वात् = ऐक्यभाव असल्यामुळे, किञ्चित् = थोडाही, भिदा = भेद, नास्ति = नाही.

**भावार्थ** : श्रीगुरूची पूजा केली असता साक्षात् परशिवाचीही पूजा घडते. अर्थात् गुरुपूजनात शिवपूजन अंतर्भूत असते. शिव व गुरू यांच्यात परमार्थतः अभेद असून किंचित देखील भेद नसतो.।।५२।।



**यथा देवे जगन्नाथे सर्वानुग्रहकारके।**
**तथा गुरुवरे कुर्यादुपचारान् दिने दिने।।५३।।**

**अन्वयार्थ** : सर्वानुग्रहकारके = सर्वांवर अनुग्रह करणाऱ्या, जगन्नाथे = विश्वाचा अधिपती अशा, देवे = शिवाला, यथा = जसे, तथा = तसे, गुरुवरे = गुरूला, दिने दिने = प्रतिदिवस, उपचारान् = षोडशादी उपचार, कुर्यात् = करावे.

**भावार्थ** : ज्याप्रमाणे सर्व प्राणिमात्रांवर अनुग्रह करणाऱ्या त्रैलोक्याधि-पती परशिवाची आपण अर्चना करतो त्याप्रमाणे प्रतिदिवशी श्रीगुरूची पूजोपचारांनी अर्चना करावी.।।५३।।

**अप्रत्यक्षो महादेवः सर्वेषामात्ममायया।**
**प्रत्यक्षो गुरुरूपेण वर्तते भक्तिसिद्धये।।५४।।**

**अन्वयार्थ** : सर्वेषां = सर्वांना, आत्ममायया = आपल्या मायाशक्तीमुळे, अप्रत्यक्षः = प्रत्यक्ष न दिसणारा, महादेवः = शिव, भक्तिसिद्धये = भक्तीच्या सिद्धीसाठी, गुरुरूपेण = गुरूच्या रूपाने, वर्तते = प्रत्यक्ष दिसतो.

**भावार्थ** : परशिव आपल्या मायेने अव्यक्तरूप असला तरी आपल्या भालनेत्र, चंद्रकला, गंगाधर, चतुर्भुज अशा रूपाचे तिरोधान (अंतर्धान) करून भक्तीसाठी श्रीगुरूच्या रूपाने व्यक्त होतो.।।५४।।

**शिवज्ञानं महाघोरसंसारार्णवतारकम्।**
**दीयते येन स गुरुः कस्य वन्द्यो न जायते।।५५।।**

**अन्वयार्थ** : महाघोर = अत्यंत भयानक अशा, संसारार्णव = संसाररूपी समुद्रातून, तारकम् = तारणारे, शिवज्ञानं = शिवज्ञान, येन = ज्याच्याकडून, दीयते = उपदेशिले जाते, सः = तो, गुरुः = गुरू, कस्य = कोणाला, वन्द्यः = वंदनीय, न जायते = होत नाही?

**भावार्थ** : अत्यंत भयंकर अशा संसारसागरातून ज्या ज्ञानामुळे तरून जाता येते ते ज्ञान देणारा गुरूच असल्यामुळे तो जन्ममृत्यूने पीडलेल्या भवपाशबद्ध लोकांना वंदनीय वाटतो.।।५५।।

**यत्कटाक्षकलामात्रात् परमानन्दलक्षणम्।**
**लभ्यते शिवरूपत्वं स गुरुः केन नार्चितः।।५६।।**

**अन्वयार्थ** : यत् = ज्याच्या, कटाक्षकलामात्रात् = केवळ कृपाकटाक्षाने, परमानन्दलक्षणं = परमानंदस्वरूप असे, शिवरूपत्वं = शिवस्वरूप, लभ्यते = प्राप्त होते, सः = तो, गुरुः = गुरू, केन = कोणाकडून, नार्चितः = पूजिला जाणार नाही?

**भावार्थ** : श्रीगुरूच्या केवळ कृपाकटाक्षाने शिवभक्तांना शिवतत्त्वाचे ज्ञान सहज होते. अशा गुरूचे पूजन कोण बरे करणार नाही? अर्थात् सर्वजण करतात.।।५६।।

**हितमेव चरेन्नित्यं शरीरेण धनेन च।**
**आचार्यस्योपशान्तस्य शिवज्ञानमहानिधेः।।५७।।**

**अन्वयार्थ** : उपशान्तस्य = रागद्वेषादिरहित, शिवज्ञानमहानिधेः = शिवज्ञानाचा सागर अशा, आचार्यस्य = गुरूला, शरीरेण = आपल्या शरीराने, च = आणि, धनेन = धनाने, नित्यं = प्रतिदिवस, हितमेव = हितकारक असे, चरेत् = आचरण करावे.

**भावार्थ** : रागद्वेषरहित व शिवज्ञानाचा सागरच असलेल्या गुरूच्या मनाला संतोष होईल असेच आपले आचरण ठेवावे. त्याच्या सेवेकरिता तनाने व मनाने झिजून त्याला सर्वप्रकारे सुख द्यावे.।।५७।।

**गुरोरज्ञां न लङ्घेत सिद्धिकामी महामतिः।**
**तदाज्ञालङ्घनेनापि शिवाज्ञाच्छेदको भवेत्।।५८।।**

**अन्वयार्थ** : सिद्धिकामी = मोक्षरूपी सिद्धी प्राप्त करून घेऊ इच्छिणाऱ्या, महामतिः = विवेकी पुरुषाने, गुरोः = गुरूची, आज्ञां = आज्ञेचे, न लङ्घेत = उल्लंघन करू नये, तदाज्ञालङ्घनेनापि = त्याच्या आज्ञेचे उल्लंघन केल्याने, शिवाज्ञाच्छेदकः = शिवाची आज्ञा मोडणारा, भवेत् = होतो.

**भावार्थ** : मोक्षाची इच्छा बाळगणाऱ्या विवेकी पुरुषाने गुरूच्या आज्ञेचे कधीही उल्लंघन करू नये, गुर्वाज्ञेचे उल्लंघन केल्यास प्रत्यक्ष शंकराची आज्ञा उल्लंघन केल्याचे पाप लागेल. यासाठी गुरू म्हणजे प्रत्यक्ष शिवच समजून त्याच्या आज्ञेचे कधीही उल्लंघन न करता वागावे.।।५८।।



### त्रिविधसम्पत्तिस्थल - (११)

**यथा गुरौ यथा लिङ्गे भक्तिमान् परिवर्तते।**
**जङ्गमे च तथा नित्यं भक्तिं कुर्याद्विचक्षणः।।५९।।**

**अन्वयार्थ** : विचक्षणः = प्रवीण शिवभक्त, यथा = जसा, गुरौ = गुरूशी, यथा = जसा, लिङ्गे = लिंगाशी, भक्तिमान् परिवर्तते = भक्तिमान होऊन वर्तन करतो, तथा च = तसेच, जङ्गमे = जंगमावर, नित्यं = प्रतिदिन, भक्तिं = भक्ती, कुर्यात् = करावी.

**भावार्थ** : पूर्वी सांगितल्यानुसार शिव आणि गुरू यांच्यात अभेद मानून त्यांची भक्ती केल्याप्रमाणे विवेकी पुरुषाने जंगमाचीही त्याच प्रकारे नित्य पूजा करावी.।।५९।।

**एक एव शिवः साक्षात् सर्वानुग्रहकारकः।**
**गुरुजङ्गमलिङ्गात्मा वर्तते भुक्तिमुक्तिदः।।६०।।**

**अन्वयार्थ** : सर्वानुग्रहकारकः = सर्वांवर अनुग्रह करणारा, भक्तिमुक्तिदः = भोग आणि मोक्ष देणारा, एक एव शिवः = एकच शिव, साक्षात् = स्वतः, गुरुजङ्गमलिङ्गात्मा = गुरुजंगमलिंग होऊन, वर्तते = राहतो.

**भावार्थ** : सर्व प्राण्यांवर अनुग्रह करणारा परशिव एकच आहे. तथापि, तो गुरू, लिंग व जंगम यांच्या रूपांत शिव कलारूपाने समान राहून शिवभक्तांना भुक्ती व मुक्ती देतो. म्हणून गुरू व लिंग यांच्या प्रमाणेच समदृष्टीने जंगमाचीही भक्ती करावी.।।६०।।

**लिङ्गं च द्विविधं प्रोक्तं जङ्गमाजङ्गमात्मना।**
**अजङ्गमे यथा भक्तिर्जङ्गमे च तथा स्मृता।।६१।।**

**अन्वयार्थ** : लिङ्गं च = लिंग तर, जङ्गमाङ्गमात्मना = जंगम आणि अजंगम रूपाने, अर्थात् चरस्थिर रूपाने, द्विविधं = दोन प्रकारचे, प्रोक्तं = सांगितले आहे; अजङ्गमे = स्थिर लिंगावर, यथा भक्तिः = जशी भक्ती केली जाते, तथा च = तशीच, जङ्गमे स्मृता = चरलिंगावरही ठेवावी.

**भावार्थ** : लिंगाचे जंगम (चर लिंग) आणि अजंगम (स्थिर लिंग) असे दोन भेद आहेत. अजंगम लिंगाविषयी जशी भक्ती करावी तशीच, जंगम लिंगाविषयही करावी. अर्थात इष्टलिंगा इतकीच जंगमावरही भक्ती ठेवावी.॥६१॥

**अजङ्गमं तु यल्लिङ्गं मृच्छिलादिविनिर्मितम्।**
**तद्वरं जङ्गमं लिङ्गं शिवयोगीति विश्रुतम्।।६२।।**

**अन्वयार्थ** : मृच्छिलादि = माती, दगड इत्यादी पासून, निर्मितं = तयार केलेले, यल्लिङ्गं = ते लिंग, आहे ते, अजङ्गमं = स्थिर लिंग होय, तद्वरं = त्यापेक्षा श्रेष्ठ असणारे, जङ्गमलिङ्गं = जंगम लिंग, शिवयोगीति विश्रुतम् = शिवयोगी म्हणून प्रसिद्ध आहे.

**भावार्थ** : मातीचे अथवा दगडाचे जे लिंग ते स्थिर लिंग होय. स्थिर लिंगापेक्षा जंगमलिंग श्रेष्ठ असून ते शिवयोगी या नावाने प्रसिद्ध आहे.॥६२॥

**अचरे मन्त्रसंस्काराल्लिङ्गे वसति शङ्करः।**
**सदाकालं वसत्येव चरलिङ्गे महेश्वरः।।६३।।**

**अन्वयार्थ** : अचरे लिङ्गे = स्थिर लिंगात, शङ्करः = शिव, मन्त्रसंस्कारात् = मंत्रसंस्कारामुळे, वसति = वास करतो, चरलिङ्गे = जंगमात, महेश्वरः = शिव, सदाकालं = नेहमी, वसत्येव = निश्चितरूपाने वास करतो.

**भावार्थ** : मंत्रसंस्काराने स्थिर लिंगात शंरकाचा वास असतो आणि चरलिंगात (जंगमात) महादेव निरंतर वास करून राहतो. या साठी स्थिर लिंगापेक्षा जंगमलिंग श्रेष्ठ होय.॥६३॥

**शिवयोगिनि यद्दत्तं तदक्षयफलं भवेत्।**
**तस्मात् सर्वप्रयत्नेन तस्मै देयं महात्मने।।६४।।**
**यत्फलं लभते जन्तुः पूजया शिवयोगिनः।**
**तदक्षयमिति प्रोक्तं सकलागमपारगैः।।६५।।**

**अन्वयार्थ** : शिवयोगिनि = शिवयोग्याला, यद्दत्तं = जे दिले जाते, तत् = त्याचे, अक्षयफलं = अक्षय असे फळ, भवेत् = होते, तस्मात् = म्हणून, सर्वप्रयत्नेन = सर्व प्रयत्नांनी, तस्मै = त्या, महात्मने = महान आत्म्याला, देयं = दिले पाहिजे, शिवयोगिनः = शिवयोग्याची, पूजया = पूजा केल्याने, जन्तुः = प्राण्यांना, यत्फलं = जे फळ, लभते = प्राप्त होते, ते फळ, सकलागमापारगैः = सकल आगमांत पारंगत असणाऱ्यांकडून, अक्षयमिति = अक्षय म्हणून, प्रोक्तं = सांगितले गेले आहे.



**भावार्थ** : शिवयोग्याला (जंगमाला) केलेल्या दानाचे फळ अक्षय असते. म्हणून प्रयत्नपूर्वक त्या सामर्थ्यवान महात्म्यांना दान द्यावे. शिवयोग्याचे पूजन केल्यावर जे फळ मिळते ते शाश्वत असते, असे शैवागमांत पारंगत असलेले लोक सांगतात.॥६४-६५॥

**नावमन्येत कुत्रापि शिवयोगिनमागतम्।**
**अवमानाद्भवेत्तस्य दुर्गतिश्च न संशयः।।६६।।**

**अन्वयार्थ** : आगतं = आलेल्या, शिवयोगिनं = शिवयोग्याचा, कुत्रापि = कोठेही, नावमन्येत = अवमान करून नये, तस्य = त्याचा, अवमानात् = अवमान केल्याने, दुर्गतिः = दुर्गती, भवेत् = प्राप्त होते, न संशयः = यात संशय नाही.

**भावार्थ** : शिवयोग्याची कोठेही भेट झाली तर त्याचे नमस्कारपूर्वक स्वागत करावे. त्याचा अपमान करू नये. त्याचा अपमान करणाऱ्यास दुर्गती प्राप्त होते, यात संशय नाही.॥६६॥

**शिवयोगी शिवः साक्षादिति कैङ्कर्यभक्तितः।**
**पूजयेदादरेणैव यथा लिङ्गं यथा गुरुः।।६७।।**

**अन्वयार्थ** : शिवयोगी = शिवयोगी, साक्षात् = प्रत्यक्ष, शिव इति = शिव म्हणून, कैङ्कर्यभक्तिमतः = किंकर भावनेने, यथा लिङ्गं = लिंगाप्रमाणे, यथा गुरुः = गुरूप्रमाणे, आदरेणैव = आदराने, पूजयेत् = पूजा करावी.

**भावार्थ** : शिवयोगी हा साक्षात् शिवस्वरूप आहे असे म्हणून गुरू व लिंग यांच्याप्रमाणेच आदरपूर्वक व सेवकभावाने त्याचे पूजन करावे.॥६७॥

चतुर्विधसारायस्थल (प्रसादस्वीकारस्थल) - (१२)

**पादोदकं यथा भक्त्या स्वीकरोति महेशितु:।**
**तथा शिवात्मनोर्नित्यं गुरुजङ्गमयोरपि।।६८।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, भक्त्या = भक्तीने, महेशितु: = शिवाचे, पादोदकं = पादोदक, स्वीकरोति = सेवन करतो, तथा = तसेच, शिवात्मनो: = शिवस्वरूपी, गुरुजङ्गमयोरपि = गुरूचे आणि जंगमाचे सुद्धा, नित्यं = प्रतिदिनं, (पादोदक सेवन करावे).

**भावार्थ** : ज्याप्रमाणे साधक इष्टलिंगाचे पादोदक घेतो, त्याप्रमाणे प्रत्यक्ष सदाशिवाचेच रूप असलेल्या जंगमाचे व गुरूचेही पादोदक भक्तिभावाने सेवन करावे.॥६८॥

**सर्वमङ्गलमाङ्गल्यं सर्वपावनपावनम्।**
**सर्वसिद्धिकरं पुंसां शम्भो: पादाम्बुधारणम्।।६९।।**

**अन्वयार्थ** : सर्वमङ्गलमाङ्गल्यं = समस्त मंगलांना मंगल असणारा, सर्वपावनपावनम् = समस्त पवित्रांनाही पवित्र असणारा अशा, शम्भो: = शिवाचे, पादाम्बुधारणं = पादोदक स्वीकारणे, पुंसां = मनुष्याला, सर्वविद्धिकरं = समस्त सिद्धी देणारे होते.

**भावार्थ** : जगात जेवढ्या कल्याणकारक वस्तू आहेत त्यापेक्षाही इष्टलिंगाचे पादोदक अधिक कल्याणकारक आहे. ते जगातील सर्व पवित्र वस्तूंपेक्षा अधिक पवित्र आहे आणि सर्व सिद्धी प्राप्त करून देणारे आहे. यासाठी इष्टलिंगाचे पादोदक नित्य शिरोधार्य होय.॥६९॥

**शिरसा धारयेद्यस्तु पत्रं पुष्पं शिवार्पितम्।**
**प्रतिक्षणं भवेत्तस्य पौण्डरीकक्रियाफलम्।।७०।।**

**अन्वयार्थ** : य: = जो, शिवार्पितं = शिवाला अर्पण केलेले, पत्रं = पत्र, पुष्पं = पुष्प, शिरसा = मस्तकावर, धारयेत् = धारण करतो, तस्य = त्याला, प्रतिक्षणं = क्षणोक्षणी, पौण्डरीकक्रियाफलं = पौण्डरीक याग केल्याचे फळ, भवेत् = मिळते.



**भावार्थ** : शंकरास वाहिलेले पान किंवा फूल जो शिवभक्त भक्तिपूर्वक आपल्या मस्तकावर धारण करील त्याला प्रतिक्षणी पौंडरीक यज्ञ केल्याचे फळ मिळेल. शिवास अर्पण केलेल्या पान, फूल इत्यादींना शिवनिर्माल्य असे म्हणतात. ते शरीर आणि मनाच्या निर्मलतेस कारणीभूत होत असल्यामुळे त्यास निर्माल्य म्हटले जाते.॥७०॥

**भुञ्जीयाद् रुद्रभुक्तान्नं रुद्रपीतं जलं पिबेत्।**
**रुद्राघ्रातं सदा जिघ्रेदिति जाबालिकी श्रुति:।।७१।।**

**अन्वयार्थ** : रुद्रभुक्तान्नं = रुद्राला समर्पिलेले अन्न, भुञ्जीयात् = सेवन करावे, रुद्रपीतं = रुद्राला अर्पिलेले, जलं = जल, पिबेत् = प्यावे, रुद्राघ्रातं = रुद्राला वाहिलेल्या, फुलाचा, सदा = नेहमी, जिघ्रेत् = वास घ्यावा, इति = असे, जाबालिकी श्रुति: = जाबालिकी श्रुतीचे प्रमाण आहे.

**भावार्थ** : शिवभक्ताने शिवाला दाखविलेला नैवेद्यच भक्षण करावा, शिवाला अर्पण केलेले जल प्राशन करावे आणि शिवार्पण केलेले फूल हुंगावे अशी जाबाल श्रुती आहे.॥७१॥

**अर्पयित्वा निजे लिङ्गे पत्रं पुष्पं फलं जलम्।**
**अन्नाद्यं सर्वभोज्यं च स्वीकुर्याद् भक्तिमान्नर:।।७२।।**

**अन्वयार्थ** : भक्तिमान् नर: = भक्तिसंपन्न साधकाने, पत्रं = पत्र, पुष्पं = पुष्प, फलं = फल, जलं = जल, च = आणि, अन्नाद्यं = अन्नादी, सर्वभोज्यं = सर्व भोज्य वस्तू, निजलिङ्गे = आपल्या इष्टलिंगाला, अर्पयित्वा = अर्पण करून, स्वीकुर्यात् = स्वीकाराव्यात.

**भावार्थ** : पान, फूल, फळ, जल आणि अन्नादी सर्व भोज्य पदार्थ प्रथम इष्टलिंगाला अर्पण करून मगच शिवभक्ताने ग्रहण करावेत.॥७२॥

**गुरुत्वात् सर्वभूतानां शम्भोरमिततेजस:।**
**तस्मै निवेदितं सर्वं स्वीकार्यं तत्परायणै:।।७३।।**

**अन्वयार्थ** : अमिततेजस: = अपरिमित तेजस्वी असा, शम्भो: = शंभू, सर्वभूतानां = सर्वप्राण्यांचा, गुरुत्वात् = पिता व गुरू असल्यामुळे, तत्परायणै: =

त्याच्यावर निष्ठा ठेवणाऱ्याने, सर्व = सर्व वस्तू, तस्मै = त्याला, निवेदितं = अर्पण करून, नंतर, स्वीकार्यं = स्वीकाराव्यात.

**भावार्थ** : शंकराचे सामर्थ्य अगाध असून तो सर्व जगाचा गुरू आहे. म्हणून शिवभक्ताने त्यालाच सर्व पदार्थ अर्पण करून नंतर त्यांचा स्वीकार करावा.॥७३॥

**ये लिङ्गधारिणो लोके ये शिवैकपरायणाः।**
**तेषां तु शिवनिर्माल्यमुचितं नान्यजन्तुषु।।७४।।**

**अन्वयार्थ** : लोके = जगात, ये = जे, लिङ्गधारिणः = लिंगधारी आहेत, ये = जे, शिवैकपरायणाः = शिवावरच नितांत निष्ठा ठेवणारे आहेत, तेषां तु = त्यांनाच, शिवनिर्माल्यं = शिवाचे निर्माल्य, उचितं = उचित आहे, अन्यजन्तुषु न = इतर जीवांना उचित नाही.

**भावार्थ** : जगातील लिंगधारी व अनन्य शिवभक्तिपरायण शिवभक्तांनीच शिवप्रसाद घेणे उचित आहे. अन्य प्राणी तो प्रसाद घेण्यास अधिकारी नाहीत.॥७४॥

**अन्नजाते तु भक्तेन भुज्यमाने शिवार्पिते।**
**सिक्थे सिक्थेऽश्वमेधस्य यत्फलं तदवाप्यते।।७५।।**

**अन्वयार्थ** : शिवार्पिते = शिवाला अर्पण केलेले, अन्नजाते = अन्नादी, भक्तेन = भक्ताकडून, भुज्यमाने = भक्षण केले गेले तर, अश्वमेधस्य = अश्वमेध यज्ञाचे, यत्फलं = जे फल, आहे, तत् = ते, सिक्थे सिक्थे = प्रत्येक शितागणिक, अवाप्यते = प्राप्त होते.

**भावार्थ** : शिवभक्ताचे शिवाला अर्पण केलेल्या अन्नाचे (प्रसादाचे) भक्षण केल्यास त्यातील प्रत्येक शितागणिक एकेक अश्वमेध केल्याचे पुण्य लाभते.॥७५॥

**निर्माल्यं निर्मलं शुद्धं शिवेन स्वीकृतं यतः।**
**निर्मलैस्तत्परैर्धार्यं नान्यैः प्राकृतजन्तुभिः।।७६।।**



**अन्वयार्थ** : निर्माल्यं = शिवनिर्माल्य, निर्मलं = दोषरहित, आणि शुद्धं = शुद्ध असते, यतः = कारण की, ते शिवेन = शिवाने, स्वीकृतं = स्वीकारलेले असते, निर्मलैः = परिशुद्ध चित्ताने, तत्परैः = शिवावर निष्ठा असणाऱ्यांनी, धार्यं = धारण करावे, अन्यैः = अन्य, प्राकृतजन्तुभिः = शिव-दीक्षासंस्कारहीन जीवांनी, न = धारण करू नये.

**भावार्थ** : शिवार्पित अन्नरूपी निर्माल्य पवित्र व शुद्ध असते, कारण प्रत्यक्ष शिवानेच त्याचा स्वीकार केलेला असतो. शिवदीक्षेने निर्मल झालेल्या शिवभक्तांनीच शिवनिर्माल्य स्वीकारावे, शिवदीक्षाविहीनांनी ते स्वीकारू नये. अर्थात् शिवप्रसादाचा अधिकार शिवसंस्कारयुक्त भक्तांनाच असून तो शिवसंस्कारहीन लोकांना नाही.॥७६॥

**शिवभक्तिविहीनानां जन्तूनां पापकर्मणाम्।**
**विशुद्धे शिवनिर्माल्ये नाऽधिकारोऽस्ति कुत्रचित्।।७७।।**

**अन्वयार्थ** : शिवभक्तिविहीनानां = शिवभक्ती नसलेल्या, पापकर्मणाम् = पापकर्म करणाऱ्या, जन्तूनां = जीवांना, विशुद्धे = परिशुद्ध अशा, शिवनिर्माल्ये = शिवनिर्माल्य ग्रहण करण्याविषयी, कुत्रचित् = कोठेही, अधिकारः = अधिकार, नास्ति = नाही.

**भावार्थ** : शिवभक्तिहीन पापकर्मी जीवांना अत्यंत पवित्र अशा शिवनिर्माल्य अथवा शिवप्रसादाचा अधिकार नाहीं.॥७७॥

**शिवलिङ्गप्रसादस्य स्वीकाराद् यत्फलं भवेत्।**
**तथा प्रसादस्वीकाराद् गुरुजङ्गमयोरपि।।७८।।**
**तस्माद् गुरुं महादेवं शिवयोगिनमेव च।**
**पूजयेत् प्रसादान्नं भुञ्जीयात् प्रतिवासरम्।।७९।।**

**अन्वयार्थ** : शिवलिङ्गप्रसादस्य = शिवलिंगाचा प्रसाद, स्वीकाराद् = स्वीकारल्यावर, यत्फलं = जे फळ, भवेत् = होते, गुरुजङ्गमयोरपि = गुरू आणि जंगमाचा सुद्धा, प्रसादस्वीकारात् = प्रसाद स्वीकारल्याने, तथा = तेच फळ मिळते, तस्मात् = त्यासाठी, गुरुं = गुरूचे, महादेवं = महादेवाचे, च = आणि,

शिवयोगिनमेव = जंगमाचेही, पूजयेत् = पूजन करावे, प्रतिवासरं = प्रतिदिन, तत्प्रसादान्नं = त्यांच्या प्रसादरूपी अन्नाचे, भुञ्जीयात् = सेवन करावे.

**भावार्थ** : शिवलिंगाचा प्रसाद सेवन केल्यामुळे जे फळ मिळते तेच गुरू व जंगम यांचा प्रसाद सेवन केल्याने मिळते. म्हणून गुरू, महादेव (लिंग) व शिवयोगी (जंगम) हे तिघे समान मानून त्यांची भक्तिपूर्वक पूजा करावी आणि त्यांचे प्रसादान्न प्रतिदिवशी भक्षण करावे.॥७८-७९॥

### सोपाधिदानस्थल - (१३)

**शिवलिङ्गे शिवाचार्ये शिवयोगिनि भक्तिमान्।**
**दानं कुर्याद्यथाशक्ति तत्प्रसादयुतः सदा।।८०।।**

**अन्वयार्थ** : भक्तिमान् = भक्ताने, शिवलिङ्गे = शिवलिंगाला, शिवाचार्ये = गुरूला, शिवयोगिनि = जंगमाला, तत्प्रसादयुतः = त्यांचा अनुग्रह पावून, यथाशक्ति = आपल्या शक्तीप्रमाणे, सदा = नेहमी, दानं कुर्यात् = दान करावे.

**भावार्थ** : शिवभक्ताने शिवलिंग, शिवाचार्य (गुरू) व शिवयोगी (जंगम) यांची भक्ती करून त्यांचा प्रसाद घ्यावा. नंतर आपल्या शक्तीप्रमाणे त्यांना निरंतर दान करावे.॥८०॥

**दानं च त्रिविधं प्रोक्तं सोपाधिनिरुपाधिकम्।**
**सहजं चेति सर्वेषां सर्वतन्त्रविशारदैः।।८१।।**

**अन्वयार्थ** : सर्वतन्त्रविशारदैः = सर्व आगमशास्त्र पंडिताकडून, सर्वेषां = सर्व, दानं = दानाचे, सोपाधिकं = सोपाधिक, निरुपाधिकं = निरुपाधिक, च = आणि, सहजं = सहज, इति = असे, त्रिविधं = तीन प्रकार, प्रोक्तं = सांगितले गेले आहे.

**भावार्थ** : सर्वागमपारंगत अशा विद्वानांनी सोपाधिक, निरुपाधिक आणि सहज असे, दानाचे तीन भेद सांगितले आहेत.॥८१॥

**फलाभिसान्धिसंयुक्तं दानं यद्विहितं भवेत्।**
**तत् सोपाधिकमाख्यातं मुमुक्षुभिरनादृतम्।।८२।।**



**अन्वयार्थ** : फलाभिसन्धिसंयुक्तं = फलाच्या अभिलाषेने युक्त, यद्दानं = जे दान, विहितं भवेत् = सांगितले आहे, मुमुक्षुभिरनादृतं = मोक्षार्थी साधकांकडून अस्वीकारलेले आहे, तत् = ते, सोपाधिकं = सोपाधिक दान म्हणून, आख्यातं = सांगितले आहे.

**भावार्थ** : फलाच्या अपेक्षेने दिलेले दान सोपाधिक दान होय. ते मुमुक्षू जनांना अपेक्षित नसते.॥८२॥

### निरुपाधिदानस्थल - (१४)

**फलाभिसन्धिनिर्मुक्तमीश्वरार्पितकाङ्क्षितम्।**
**निरुपाधिकमाख्यातं दानं दानविशारदैः।।८३।।**

**अन्वयार्थ** : फलाभिसन्धिनिर्मुक्तं = फलेच्छारहित, ईश्वरार्पितकाङ्क्षितम् = ईश्वराला अर्पण करण्याच्या भावनेने केलेले, दानं = दान, दानविशारदैः = दानविशारदांकडून, निरुपाधिकं = निरुपाधिक दान म्हणून, आख्यातं = प्रतिपादिले गेले आहे.

**भावार्थ** : कोणत्याही फळाची इच्छा न बाळगता ईश्वरार्पण बुद्धीने केलेल्या दानाला दानविशारदांनी 'निरुपाधिक दान' असे म्हटले आहे.॥८३॥

### सहजदानस्थल - (१५)

**आदातृदातृदेयानां शिवभावं विचिन्तयन्।**
**आत्मनोऽकर्तृभावं च यद्दत्तं सहजं भवेत्।।८४।।**

**अन्वयार्थ** : अदातृ = घेणारा, दातृ = देणारा, देयानां = देय वस्तूंच्या ठिकाणी, शिवभावं = शिवत्व भावनेचे, चिन्तयन् = चिंतन करीत, आत्मनः = आपल्या ठिकाणी, अकर्तृभावं = अकर्तृत्वभाव ठेवून, यत् = जे, दत्तं = दिले जाते, तत् = ते, सहजं भवेत् = सहजदान होते.

**भावार्थ** : दान देणारा, दान घेणारा आणि देण्यात येणारे दान हे सर्व शिवरूपी आहे. असे शिवभावाचे चिंतन करीत अकर्तृत्व भावनेने केलेले दान हे 'सहजदान' होय.॥८४॥

**सहजं दानमुत्कृष्टं सर्वदानोत्तमोत्तमम्।**
**शिवज्ञानप्रदं पुंसां जन्मरोगनिवर्तकम्।।८५।।**

**अन्वयार्थ** : पुंसां = जीवांचे, जन्मरोगनिवर्तकम् = भवरोग दूर करणारे, शिवज्ञानप्रदं = शिवज्ञान प्राप्त करून देणारे, सर्वदानोत्तमोत्तमम् = सर्व दानांत अत्युत्तम असणारे, सहजं दानं = सहजदान, उत्कृष्टं = सर्वश्रेष्ठ होय.

**भावार्थ** : सर्वप्रकारच्या दानात सहजदान हे अत्युत्तम होय. ते भवरोगाचा नाश करून शिवजीवैक्याचे ज्ञान देणारे आहे.॥८५॥

**शिवाय शिवभक्ताय दीयते यदि किञ्चन।**
**भक्त्या तदपि विख्यातं सहजं दानमुत्तमम्।।८६।।**

**अन्वयार्थ** : शिवाय = शिवाला, शिवभक्ताय = शिवभक्ताला, यदि = जर, किञ्चन = काहीही, भक्त्या = भक्तीने, दीयते = दिले जाते, तदपि = ते सुद्धा, उत्तमम् = उत्तम असे, सहजं दानं = सहज दान म्हणून, विख्यातं = प्रसिद्ध आहे.

**भावार्थ** : शिवाला आणि शिवभक्ताला भक्तिभावनेने काहीही दिले तरी ते सर्वश्रेष्ठ सहजदान होते.॥८६॥

**दानात् स्वर्णसहस्रस्य सत्पात्रे यत्फलं भवेत्।**
**एकपुष्पप्रदानेन शिवे तत्फलमिष्यते।।८७।।**

**अन्वयार्थ** : सत्पात्रे = योग्य जनाला, स्वर्णसहस्रस्य = हजार सुवर्णमुद्रांचे, दानात् = दान केल्याने, यत्फलं = जे फल, भवेत् = प्राप्त होते, तत्फलं = ते फल, शिवे = शिवाला, एकपुष्पप्रदानेन = एक फूल वाहिल्याने, इष्यते = प्राप्त होते.

**भावार्थ** : सत्पात्र व्यक्तीला एक हजार मोहरा दान केल्यावर जे फळ लाभते तेच फळ सदाशिवाला भक्तिपूर्वक एक सुगंधी फूल वाहिले तरी प्राप्त होते.॥८७॥

**शिव एव परं पात्रं सर्वविद्यानिधिर्गुरुः।**
**तस्मै दत्तं तु यत्किञ्चित्तदनन्तफलं भवेत्।।८८।।**

**अन्वयार्थ** : सर्वविद्यानिधिः = सर्व विद्यांचे निधान, गुरुः = गुरुरूप, शिव एव = शिवच, परं = श्रेष्ठ, पात्रं = पात्र होय, तस्मै = त्याला, यत्किञ्चित् = जे काही, दत्तं = दिले जाते, तु = निश्चयाने, अनन्तफलं = अनंत फल देणारे, भवेत् = होते.



**भावार्थ** : ईश्वरच सर्व विद्यांचा निधी व सर्व जगाचा गुरू आहे असे श्रुतींनी सांगितले आहे. यावरून तोच दानासाठी परमपात्र आहे. त्याला दिलेले थोडे दानदेखील अनंत फलदायक होते.॥८८॥

**शिवयोगी शिवः साक्षाच्छिवज्ञानमहोदधिः।**
**यत्किञ्चिद्दीयते तस्मै तद्दानं पारमार्थिकम्।।८९।।**

**अन्वयार्थ** : शिवज्ञानमहोदधिः = शिवज्ञानाचा सागर, शिवयोगी = शिवयोगी, साक्षात् = प्रत्यक्ष, शिवः = शिव होय, तस्मै = त्याला, यत्किञ्चित् = जे काही, दीयते = दिले जाते, तद्दानं = ते दान, पारमार्थिकम् = अपरिमित फलदायी सहजदान होय.

**भावार्थ** : शिवयोगी साक्षात् शिव असून शिवज्ञानाचा महासागर आहे. त्याला दिलेले सहजदान अपरिमित फलदायी होते.॥८९॥

**शिवयोगी महत्पात्रं सर्वेषां दानकर्मणि।**
**तस्मान्नास्ति परं किञ्चित्पात्रं शास्त्रविचारतः।।९०।।**

**अन्वयार्थ** : सर्वेषां = सर्व प्रकारच्या, दानकर्मणि = दानकर्मात, शिवयोगी = शिवयोगी, महत्पात्रं = उत्कृष्ट पात्र होय, शास्त्रविचारतः = शास्त्रीय विचाराने, तस्मात् = त्याहून, परं = श्रेष्ठ असे, किञ्चित् = कोणीही, पात्रं = पात्र, नास्ति = नाही.

**भावार्थ** : जंगमापेक्षा उत्तम सत्पात्र दुसरा नाही, असे शास्त्रवचन असल्यामुळे दान देण्यासाठी सर्वोत्तम सत्पात्र शिवयोगीच होय.॥९०॥

**भिक्षामात्रप्रदानेन शान्ताय शिवयोगिने।**
**यत्फलं लभ्यते नैतद् यज्ञकोटिशतैरपि।।९१।।**

**अन्वयार्थ** : शान्ताय = रागद्वेषादिरहित, शिवयोगिने = शिवयोग्याला, भिक्षामात्रप्रदानेन = एक कवळ (घास) अन्नदान केल्याने, यत्फलं = जे फळ, लभ्यते = प्राप्त होते, तत् = ते फळ, यज्ञकोटिशतैरपि = शतकोटी यज्ञ केले तरी, न = प्राप्त होत नाही.

**भावार्थ** : अत्यंत शांत शिवयोग्यास घासभर अन्नदान केले तर जे पुण्य लाभते ते कोटी यज्ञ केले तरी मिळत नाही, एवढी योग्यता जंगमास दिलेल्या दानाची आहे.॥९१॥

**शिवयोगिनि संतृप्ते तृप्तो भवति शङ्करः।**
**तत्तृप्त्या तन्मयं विश्वं तृप्तिमेति चराचरम्।।९२।।**

**अन्वयार्थ** : शिवयोगिनि = शिवयोगी, सन्तृप्ते = तृप्त झाल्यावर, शङ्करः = शंकर, तृप्तः = तृप्त, भवति = होतो, तत्तृप्त्या = शंकराच्या तृप्तीने, तन्मयं = तत्स्वरूपी, चराचरम् = चारचर असे, विश्वं = विश्व, तृप्तिमेति = तृप्त होते.

**भावार्थ** : शिवयोगी साक्षात् शिवस्वरूपी असतो. तो तृप्त झाला म्हणजे प्रत्यक्ष शिवच तृप्त होतो. शिव तृप्त झाला म्हणजे त्याचे स्वरूप असलेले हे चराचर विश्वच तृप्त होते.॥९२॥

**तस्मात् सर्वप्रयत्नेन येन केनापि कर्मणा।**
**तृप्तिं कुर्यात् सदाकालमन्नाद्यैः शिवयोगिनः।।९३।।**

**अन्वयार्थ** : तस्मात् = त्यासाठी, सर्वप्रयत्नेन = सर्व प्रयत्न करून, येन केनापि = कोणत्याही, कर्मणा = कार्याने, सदाकालं = नेहमी, शिवयोगिनः = शिवयोग्यांना, अन्नाद्यैः = अन्नवस्त्रादीने, तृप्तिं कुर्यात् = तृप्त करावे.

**भावार्थ** : शिवयोगी साक्षात् शिवस्वरूपी असल्याने त्याला अन्न, वस्त्र, धन इत्यादि देऊन सर्व प्रयत्नपूर्वक कोणत्याही रीतीने तृप्त करावे.॥९३॥

**निरुपाधिकचिद्रूपपरानन्दात्मवस्तुनि ।**
**समाप्तं सकलं यस्य स दानी शङ्करः स्वयम्।।९४।।**

**अन्वयार्थ** : निरुपाधिक = उपाधिरहित, चिद्रूप = ज्ञानस्वरूप अशा, परानन्दात्मवस्तुनि = परमानंदस्वरूप परशिवात, यस्य = ज्याचे, सकलं = सर्वस्व, समाप्तं = समर्पित झाले आहे, सः = तो, दानी = सहजदानी, स्वयं = स्वतः, शङ्करः = शिवच होय.



**भावार्थ** : सच्चिदानंदस्वरूपी गुरू, लिंग आणि जंगम हे परशिवाच्या सत्, चित्, आणि आनंदाचे स्वरूपच होय. म्हणून गुरूला शरीर, जंगमाला धन आणि लिंगाला प्राण हे जो समर्पण करतो तो सहजदानी शिवभक्त साक्षात् शिवस्वरूपच होय.॥९४॥

**उक्ताखिलाचारपरायणोऽसौ**
**सदा वितन्वन् सहजं तु दानम्।**
**ब्रह्मादिसम्पत्सु विरक्तचित्तो**
**भक्तो हि माहेश्वरतामुपैति।।९५।।**

**अन्वयार्थ** : उक्त = पूर्वोक्त, अखिल = संपूर्ण, आचारपरायणः = आचारांचे परिपालन करणारा, सहजं = सहज, दानं = दान, सदा = नेहमी, वितन्वन् = देत राहाणारा, ब्रह्मादि = ब्रह्मादि देवांच्या, सम्पत्सु = संपत्तीविषयी, विरक्तचित्तः = विरक्त असलेला, असौ = हा, भक्तो हि = भक्तच, माहेश्वरताम् = माहेश्वर स्थितीला, उपैति = पोचतो.

**भावार्थ** : या भक्तस्थलात सांगितलेल्या सर्व आचारांनी संपन्न असा जो भक्त असतो आणि जो नेहमी सहजदान करणारा, ब्रह्मादिकांच्याही ऐश्वर्याची इच्छा न करणारा असा विरक्तचित्त होतो, तेव्हा त्यालाच माहेश्वर असे नाव प्राप्त होते.॥९५॥

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ भक्तस्थले भक्तमार्गक्रियास्थलादिसप्तविध-स्थलप्रसङ्गो नाम नवमः परिच्छेदः।***

**नववा परिच्छेद समाप्त.**

○○○

# दहावा परिच्छेद

### अंगस्थलान्तर्गत

## माहेश्वरस्थल

**अगस्त्य उवाच-**

**भक्तस्थलं समाख्यातं भवता गणनायक।**
**केन वा धर्मभेदेन भक्तो माहेश्वरो भवेत्।।१।।**

**अन्वयार्थ** : गणनायक = हे गणनायका, भवता = आपल्याकडून, भक्तस्थलं = भक्तस्थलाचा, समाख्यातं = उपदेश केला गेला, केन वा = कोणत्या, धर्मभेदेन = आचारभेदाने, भक्त: = भक्त, माहेश्वर: = माहेश्वर, भवेत् = होतो?

**भावार्थ** : अगस्त्य म्हणतात, हे प्रमथनायका रेणुका, आतापर्यंत आपण भक्तस्थलाचे उत्तम निरूपण केलेत. आता भक्तच कोणत्या आचारभेदाने माहेश्वर होतो, हे कृपाकरून मला सांगावे.॥१॥

**रेणुक उवाच-**

**केवले सहजे दाने निष्णात: शिवतत्पर:।**
**ब्रह्मादिस्थानाविमुखो भक्तो माहेश्वर: स्मृत:।।२।।**

**अन्वयार्थ** : ब्रह्मादिस्थानविमुख: = ब्रह्मादिस्थानाविषयी नि:स्पृह असणारा, शिवतत्पर: = शिवावर निष्ठा ठेवणारा भक्त, जेव्हा, केवले = केवळ, सहजे दाने = सहजदानात, निष्णात: = कुशल होतो, तेव्हा तो, माहेश्वर: = माहेश्वर म्हणून, स्मृत: = समजला जातो.

**भावार्थ** : रेणुकाचार्य सांगतात, केवळ सहजदानातच कुशल, शिवभक्तीत तत्पर आणि ब्रह्मादी पदांविषयी नि:स्पृह असलेला शिवभक्तच माहेश्वर होतो.॥२॥

**भक्तेर्यदा समुत्कर्षो भवेद्वैराग्यगौरवात्।**
**तदा माहेश्वर: प्रोक्तो भक्त: स्थिरविवेकवान्।।३।।**



**अन्वयार्थ** : वैराग्यगौरवात् = वैराग्याच्या महिम्याने, यदा = जेव्हा, भक्ते: = भक्तीचा, समुत्कर्ष: = उत्कर्ष, भवेत् = होतो, स्थिरविवेकवान् = दृढ विवेकी, भक्त: = भक्त, माहेश्वर: = माहेश्वर म्हणून, प्रोक्त: = म्हटला जातो.

**भावार्थ** : शिवभक्ताच्या ठायी वैराग्याच्या सामर्थ्याने जेव्हा शिवभक्तीचा परमोत्कर्ष होतो तेव्हा त्या स्थिर अशा नित्यानित्य, आत्मानात्मविवेक असलेल्या शिवभक्ताला माहेश्वर म्हणावे.॥३॥

**माहेश्वरस्थलं वक्ष्ये यथोक्तं शम्भुना पुरा।**
**माहेश्वरप्रशंसादौ लिङ्गनिष्ठा तत: परम्।।४।।**
**पूर्वाश्रयनिरासश्च तथाद्वैतनिराकृति:।**
**आह्वानवर्जनं पश्चादष्टमूर्तिनिराकृति:।।५।।**
**सर्वगत्वनिरासश्च शिवत्वं शिवभक्तयो:।**
**एवं नवविधं प्रोक्तं माहेश्वरमहास्थलम्।।६।।**

**अन्वयार्थ** : पुरा = पूर्वी, शम्भुना = शिवाने, माहेश्वरस्थलं = माहेश्वरस्थल, यथोक्तं = जसे सांगितले तसे, वक्ष्ये = सांगतो, आदौ = पहिले, माहेश्वरप्रशंसा = माहेश्वर प्रशंसास्थल, तत: परम् = त्यानंतर, लिङ्गनिष्ठा = लिंगनिष्ठास्थल, च = आणि, पूर्वाश्रयनिरास: = पूर्वाश्रयनिरसनस्थल, तथा = तसेच, अद्वैतनिराकृति: = अद्वैतनिरसनस्थल, पश्चात् = त्यानंतर, आह्वानवर्जनम् = आह्वाननिरसनस्थल, त्यानंतर, अष्टमूर्तिनिराकृति: = अष्टमूर्तिनिरसनस्थल, च = आणि, सर्वगत्व-निरास: = सर्वगतनिरसनस्थल, नंतर शिवत्वं = शिवजगन्मयस्थल, त्यानंतर शिवभक्तयो: = भक्तदेहिकलिंगस्थल, एवम् = अशा प्रकारे, माहेश्वरमहास्थलम् = माहेश्वर स्थल, नवविधं = नऊ प्रकारचे , प्रोक्तं = सांगितले आहे.

**भावार्थ** : पूर्वी शंकरानी सांगितलेले माहेश्वरस्थलाचे नऊ भेद आहेत, १. माहेश्वरप्रशंसास्थल, २. लिंगनिष्ठास्थल, ३. पूर्वाश्रयनिरसनस्थल, ४. अद्वैतनिरसनस्थल, ५. आह्वाननिरसनस्थल, ६. अष्टमूर्तिनिरसनस्थल, ७. सर्वगत्वनिरसनस्थल, ८. शिवजगन्मयस्थल आणि ९. भक्तदेहिक-लिंगस्थल. ॥४-६॥

**आदितः क्रमशो वक्ष्ये स्थलभेदस्य लक्षणम्।**
**समाहितेन मनसा श्रूयतां भवता मुने।।७।।**

**अन्वयार्थ** : मुने = हे अगस्तीमुनी, स्थलभेदस्य = स्थल भेदाचे, लक्षणम् = लक्षण, आदितः = पहिल्यापासून, क्रमशः = क्रमाने, वक्ष्ये = सांगतो, समाहितेन मनसा = समाधान चित्ताने, भवता = तू, श्रूयताम् = श्रवण कर.

**भावार्थ** : हे अगस्त्या, मी आता वर सांगितलेल्या अवांतर नऊ स्थलांचे क्रमाने लक्षण सांगतो, ते तू नीट लक्ष देऊन ऐक.।।७।।

**माहेश्वरप्रशंसास्थल - (१६)**

**विश्वस्मादधिको रुद्रो विश्वानुग्रहकारकः।**
**इति यस्य स्थिरा बुद्धिः स वै माहेश्वरः स्मृतः।।८।।**

**अन्वयार्थ** : विश्वानुग्रहकारकः = विश्वातील देवदानवांवर अनुग्रह करणारा, रुद्रः = रुद्र, विश्वस्मात् = विश्वरूप नारायणापेक्षा, अधिकः = श्रेष्ठ, इति = अशी, यस्य = ज्याची, बुद्धिः = बुद्धी, स्थिरा = स्थिर झाली आहे, स वै = तोच, माहेश्वरः = माहेश्वर, स्मृतः = म्हटला जातो.

**भावार्थ** : समस्त देवदानवादी विश्वावर अनुग्रह करणारा रुद्र हा एकमेव आहे, असे श्रुतिवचन आहे. नारायण हा विश्वमय आहे, अशी प्रसिद्ध श्रुती आहे. परंतु विश्वरूप नारायणापेक्षा रुद्र श्रेष्ठ असून ब्रह्मा, विष्णू आदी देवांपेक्षाही तो महान होय, असा ज्याचा दृढ निश्चय असतो त्याला माहेश्वर म्हणावे. म्हणजेच महेश्वरावर अत्यंत दृढ निष्ठा ठेवणारा भक्तच माहेश्वर म्हणून ओळखला जातो.।।८।।

**ब्रह्माद्यैर्मलिनप्रायैर्निर्मले परमेश्वरे।**
**साम्योक्तिं यो न सहते स वै माहेश्वराभिधः।।९।।**

**अन्वयार्थ** : मलिनप्रायैः = मायादी मलांनी युक्त, ब्रह्माद्यैः = ब्रह्मादिकांबरोबर, निर्मले = निर्मल अशा, परमेश्वरे = परमेश्वराविषयी, साम्योक्तिं = बरोबरीची भाषा, यः = जो, न सहते = सहन करू शकत नाही, स वै = तोच, माहेश्वराभिधः = माहेश्वर होय.



**भावार्थ** : ब्रह्मा, विष्णू, रुद्र, इंद्र आदी देवांचा जन्म झाला आहे, असे श्रुतिवचन आहे. हे सुरगण जन्ममरणपीडित व त्रिमलयुक्त आहेत, परंतु परशिव मात्र कशाचेही कार्य व कारण नसल्यामुळे तो अजन्मा व अनादी आहे. ब्रह्मादी देव मलिन असून त्यांची परशिवाशी कोणी बरोबरी करू लागला तर ज्याला सहन होत नाही तो माहेश्वर होय.।।९।।

**ईश्वरः सर्वभूतानां ब्रह्मादीनां महानिति।**
**बुद्धियोगात्तदासक्तो भक्तो माहेश्वरः स्मृतः।।१०।।**

**अन्वयार्थ** : ब्रह्मादीनां = ब्रह्मादींना आणि, सर्वभूतानां = अन्य सर्व प्राण्यांना, ईश्वरः = प्रेरक असा परमेश्वर, महान् = श्रेष्ठ आहे, इति = अशा, बुद्धियोगात् = बुद्धीने, तदासक्तः = त्या परमेश्वरावर आसक्त असणारा, भक्तः = भक्त, माहेश्वरः स्मृतः = माहेश्वर म्हणविला जातो.

**भावार्थ** : सृष्टिकर्ता ब्रह्मदेव आणि त्याने निर्माण केलेल्या सर्व प्राणिमात्रांना प्रेरक असल्यामुळे त्या सर्वापेक्षा श्रेष्ठ परशिवच आहे, अशा दृढ बुद्धीने जो परशिवाच्या ठायी आसक्त असतो त्याला माहेश्वर म्हणावे.।।१०।।

**ब्रह्मादिदेवताजालं मोहितं मायया सदा।**
**अशक्तं मुक्तिदाने तु क्षयातिशयसंयुतम्।।११।।**
**अनादिमुक्तो भगवानेक एव महेश्वरः।**
**मुक्तिदश्चेति यो वेद स वै माहेश्वरः स्मृतः।।१२।।**

**अन्वयार्थ** : क्षयातिशयसंयुतं = क्षय आणि अतिशय या दोषांनी युक्त, ब्रह्मादि = ब्रह्मा आदी, देवताजालं = देवतासमूह, सदा = नेहमी, मायया = मायाशक्तीच्या आवरणाने, मोहितं = मोहित झालेला असून, मुक्तिदाने तु = मुक्ती देण्यासाठी, अशक्तं = असमर्थ आहे, अनादिमुक्तः = नित्य मुक्त असा, भगवान् = षड्गुणैश्वर्यशाली, महेश्वरः = महेश्वर, एक एव = एकटाच, मुक्तिदः = मुक्तिदायक आहे, इति = असे, यः = जो, वेद = जाणतो, स वै = तोच, माहेश्वरः स्मृतः = माहेश्वर होय.

**भावार्थ** : ब्रह्मा विष्णू आदी देव जन्ममरणाच्या आधीन असून परशिवाच्या स्वातंत्र्यरूप अशा मायाशक्तीने मोहांध झालेले असल्यामुळे ते मुक्ती द्यायला

असमर्थ आहेत. अनादी, नित्यमुक्त व षड्गुणैश्वर्यसंपन्न असा एक महेश्वरच मुक्ती देण्यास समर्थ आहे, हे जो जाणतो तो माहेश्वर होय.॥११-१२॥

**क्षयातिशयसंयुक्ता ब्रह्मविष्ण्वादिसम्पदः।**
**तृणवन्मन्यते युक्त्या वीरमाहेश्वरः सदा।।१३।।**
**शब्दस्पर्शादिसम्पन्ने सुखलेशे तु नःस्पृहः।**
**शिवानन्दे समुत्कण्ठो वीरमाहेश्वरो भवेत्।।१४।।**

**अन्वयार्थ** : क्षयातिशयसंयुक्ता: = विनाश आणि तरतमभावाने युक्त, ब्रह्मविष्ण्वादिसम्पद: = ब्रह्मा, विष्णू आदींच्या संपत्तीला, युक्त्या = अलिप्त बुद्धीने, सदा = नेहमी जो, तृणवन्मन्यते = तृणाप्रमाणे तुच्छ मानतो, तो वीरमाहेश्वर: = वीर माहेश्वर समजावा, शब्दस्पर्शादिसम्पन्ने = शब्दस्पर्शादी पासून उत्पन्न होणाऱ्या, सुखलेशे तु = लेशमात्र सुखाविषयी, नि:स्पृह: = निरिच्छ होऊन जो शिवानन्दे = नित्य सुखात, समुत्कण्ठ: = उत्कंठित, भवेत् = होतो, तो वीरमाहेश्वर: = वीर माहेश्वर होय.

**भावार्थ** : ब्रह्मा, विष्णू आदीची ऐश्वर्ये क्षय व तरतमभावाने युक्त असल्यामुळे ती अनित्य आहेत. हे अनुभवाने जाणून त्यांना जो तृणवत् मानतो आणि शब्द-स्पर्शादी विषयांकडून उत्पन्न होणाऱ्या तुच्छ सुखाविषयी नि:स्पृह होऊन नित्य अशा शिवानंदप्राप्तीची आकांक्षा बाळगतो तोच वीरमाहेश्वर होय.॥१३-१४॥

**परस्त्रीसङ्गनिर्मुक्तः परद्रव्यपराङ्मुखः।**
**शिवार्थकार्यसम्पन्नः शिवागमपरायणः।।१५।।**
**शिवस्तुतिरसास्वादमोदमानमनाः शुचिः।**
**शिवोत्कर्षप्रमाणानां सम्पादनसमुद्यतः।।१६।।**
**निर्ममो निरहङ्कारो निरस्तक्लेशपञ्जरः।**
**अस्पृष्टमदसम्बन्धो मात्सर्यावेशवर्जितः।।१७।।**
**निरस्तमदनोन्मेषो निर्धूतक्रोधविप्लवः।**
**सदा सन्तुष्टहृदयः सर्वप्राणिहिते रतः।।१८।।**



**निवारणसमुद्योगी शिवकार्यविरोधिनाम्।**
**सहचारी सदाकालं शिवोत्कर्षाभिधायिभिः।।१९।।**
**शिवापकर्षसम्प्राप्तौ प्राणत्यागेऽप्यशङ्कितः।**
**शिवैकनिष्ठः सर्वात्मा वीरमाहेश्वरो भवेत्।।२०।।**

**अन्वयार्थ** : परस्त्रीसङ्गनिर्मुक्त: = परस्त्रीसंगरहित, परद्रव्यपराङ्मुख: = परद्रव्याची अभिलाषा नसलेला, शिवार्थकार्यसम्पन्न: = शिवकार्य करणारा, शिवागमपरायण: = शिवागमांच्या अध्ययनात तत्पर, शिवस्तुतिरसास्वादमोदमानमना: = शिवस्तुतीच्या रसास्वादाने आनंदित झालेला, शुचि: = पवित्र, शिवोत्कर्षप्रमाणानां = शिवाचा उत्कर्ष प्रतिपादन करणाऱ्या प्रमाणांचा, सम्पादनसमुद्यत: = संग्रह करण्याची आसक्ती बाळगणारा, निर्मम: = ममत्वरहित, निरहङ्कार: = परिच्छिन्न अहंभावरहित, निरस्तक्लेशपञ्जर: = पंचक्लेशांच्या पिंजऱ्यातून मुक्त, अस्पृष्टमदसम्बन्ध: = मदरहित, मात्सर्यावेशवर्जित: = मत्सर-रहित, निरस्तमदनोन्मेष: = कामभावरहित, निर्धूतक्रोधविप्लव: = क्रोधबाधारहित, सदा सन्तुष्टहृदय: = प्रसन्न मनाचा, सर्वप्राणिहिते रत: = सर्व प्राण्यांच्या हितासाठी झटणारा, शिवकार्यविरोधिनाम् = शिवकार्यात होणाऱ्या विराधाचे, निवारण-समुद्योगी = निवारण करण्यात प्रयत्नशील असणारा, शिवोत्कर्षाभिधायिभि: = शिवप्रशंसकांच्या बरोबर, सदाकालं = नेहमी, सहचारी = राहाणारा, शिवापकर्ष-सम्प्राप्तौ = शिवाचा अपमान होण्यासारखा प्रसंग आल्यास, प्राणत्यागेऽपि = प्राणत्याग करण्यासही, अशङ्कित: = मागेपुढे न पाहाणारा, शिवैकनिष्ठ: = शिवावर दृढ निष्ठा असणारा, सर्वात्मा = सर्वांशी आत्मवत् वागणारा, (अशा गुणांनी युक्त साधक) वीरमाहेश्वरो भवेत् = वीर माहेश्वर होतो.

**भावार्थ** : परस्त्रीकडे पापदृष्टीने न पाहणारा, परद्रव्याकडे ढुंकूनही न पाहणारा, सदैव शिवकार्यात तत्पर असणारा, शिवागमांच्या अभ्यासात गढून गेलेला, शिवस्तुतीतील आनंद उपभोगणारा, शुद्ध आचरण असणारा, शिवश्रेष्ठत्व सिद्ध करणाऱ्या ग्रंथांचा संग्रह करणारा, कामवासनेपासून मुक्त, क्रोधरहित, सदा संतुष्ट राहणारा, सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणात गुंतलेला, शिवकार्याला विरोध करणारांचे निवारण करणारा, शिवभक्तांच्या सहवासात रमणारा, शिवाच्या कोणत्याही अपकर्षांच्या निवारणासाठी आपल्या प्राणाचीही

पर्वा न करणारा, शिवावर दृढनिष्ठा असणारा, प्राणिमात्रांत आत्मस्वरूप पाहणारा असा तो वीरमाहेश्वर होय.॥१५-२०॥

**लिङ्गनिष्ठास्थल (१७)**

**अस्य माहेश्वरस्योक्तं लिङ्गनिष्ठामहास्थलम्।**
**प्राणात्ययेऽपि सम्पन्ने यदत्याज्यं विधीयते।।२१।।**

**अन्वयार्थ** : प्राणत्यये = प्राणसंकट, सम्पन्नेऽपि = प्राप्त झाले तरी, यत् = जे (लिंग), अत्याज्यम् = त्यागू नये, असे ज्या स्थलात, विधीयते = विधान केले जाते, ते स्थल, अस्य = ह्या, माहेश्वरस्य = माहेश्वराचे, लिङ्गनिष्ठास्थलं = लिंग-निष्ठास्थल असे, उक्तम् = म्हटले आहे.

**भावार्थ** : माहेश्वराची लिंगावर अत्यंत निष्ठा असते. प्राणावर संकट आले तरी लिंगत्याग करणे त्याला अनुचित वाटते. यालाच लिंगनिष्ठा महास्थल म्हणतात. लिंगाविषयी अनन्य निष्ठा बाळगणाऱ्या माहेश्वरास उद्देशून या स्थलाचे निरूपण केलेले आहे.॥२१॥

**अपगच्छतु सर्वस्वं शिरश्छेदनमस्तु वा।**
**माहेश्वरो न मुञ्चेत लिङ्गपूजामहाव्रतम् ।।२२।।**

**अन्वयार्थ** : सर्वस्वं = सर्व संपत्ती, अपगच्छतु = जावो, वा = अथवा, शिरच्छेदनमस्तु = शिरच्छेद होवो, तथापि माहेश्वराने, लिङ्गपूजामहाव्रतं = लिंग-पूजारूपी महाव्रत, न मुञ्चेत् = सोडू नये.

**भावार्थ** : संपत्तीचा सर्वनाश होवो अथवा शिरच्छेद होण्याचा प्रसंग येवो, परंतु माहेश्वराने अपले लिंगपूजेचे महाव्रत सोडू नये. अशा प्रकारे कोणत्याही संकटात लिंगनिष्ठा दृढ ठेवणाराच माहेश्वर होय.॥२२॥

**लिङ्गपूजामकृत्वा तु ये न भुञ्जन्ति मानवाः।**
**तेषां महात्मनां हस्ते मोक्षलक्ष्मीरुपस्थिता।।२३।।**

**अन्वयार्थ** : लिङ्गपूजाम् = लिंगपूजा, अकृत्वा = केली नसता, ये मानवा: = जे मानव, न भुञ्जन्ति = जेवण करीत नाहीत, तेषां = त्या, महात्मनां = महात्म्यांचे, हस्ते = हातात, मोक्षलक्ष्मी: = मोक्षरूपी लक्ष्मी, उपस्थिता = उपस्थित राहाते.



**भावार्थ** : लिंगपूजा केल्याशिवाय जे अन्नग्रहण करीत नाहीत त्यांच्या हातात, तळहातावरील आवळ्यासारखी स्पष्ट, मोक्षरूप लक्ष्मी वास करते. म्हणजेच मोक्षप्राप्ती लिंगनिष्ठाला सहज सुलभ होते.॥२३॥

**किमन्यैर्धर्मकलिलैः कीकषार्थप्रदायिभिः।**
**साक्षान्मोक्षप्रदः शम्भोर्धर्मो लिङ्गार्चनात्मकः।।२४।।**

**अन्वयार्थ** : शम्भो: = शिवाचा, लिङ्गार्चनात्मक: = लिंगार्चनरूपी, धर्म: = धर्म, साक्षात् = साक्षात, मोक्षप्रद: = मोक्ष देणारा आहे, कीकर्षार्थप्रदायिभि: = क्षुद्र फळ देणाऱ्या, अन्यै: = इतर, धर्मकलिलै: = क्षुद्र धर्मांचे, किम् = काय प्रयोजन?

**भावार्थ** : लिंगार्चनात्मक धर्म हा सुखकर व साक्षात् मोक्षदायक असताना इतर क्षुद्रफल देणाऱ्या धर्मांचे काय प्रयोजन?॥२४॥

**अर्पितेनान्नपानेन लिङ्गे नियमपूजिते।**
**ये देहवृत्तिं कुर्वन्ति महामाहेश्वरा हि ते।।२५।।**

**अन्वयार्थ** : नियमपूजिते = नित्य नियमाने पूजिलेले, लिङ्गे = लिंगाला, अर्पितेन = अर्पण केलेल्या, अन्नपानेन = अन्नोदकाने, ये = जे, देहवृत्तिं = देहाचे पोषण, कुर्वन्ति = करतात, ते = ते, हि = निश्चयाने, महामाहेश्वरा: = महामाहेश्वर होत.

**भावार्थ** : प्रतिदिन इष्टलिंगपूजोत्तर लिंगार्पण केलेल्या अन्नोदकाने जे आपल्या देहाचे भरणपोषण करतात ते महामाहेश्वर या नावाने ओळखले जातात.॥२५॥

**चिन्मये शाङ्करे लिङ्गे स्थिरं येषां मनः सदा।**
**विमुक्तेतरसर्वार्थं ते शिवा नात्र संशयः।।२६।।**

**अन्वयार्थ** : येषां = ज्यांचे, मन: = मन, विमुक्तेतरसर्वार्थ = स्वर्गादि तुच्छ फलाभिलाषा त्यागून, चिन्मये = चिद्रूप, शाङ्करे लिङ्गे = शिवलिंगावर, सदा = नेहमी, स्थिरं = स्थिर राहाते, ते = ते, शिवा: = शिवस्वरूप होत, अत्र = याविषयी, न संशय: = संशय नाही.

**भावार्थ** : ज्यांचे मन स्वर्गादी तुच्छ फलापासून मुक्त असून चिन्मय अशा शिवलिंगात सदैव स्थिर असते असे माहेश्वर भूमीवरील रुद्रच होत, यात संशय नाही.।।२६।।

**लिङ्गे यस्य मनो लीनं लिङ्गस्तुतिपरा च वाक्।**
**लिङ्गार्चनपरौ हस्तौ स रुद्रो नात्र संशयः।।२७।।**

**अन्वयार्थ** : यस्य = ज्याचे, मनः = मन, लिङ्गे = लिंगात, लीनं = लीन झाले आहे, च = आणि, वाक् = वाणी, लिङ्गस्तुतिपरा = लिंगाची स्तुती करणारी आहे, ज्याचे हस्तौ = दोन्ही हात, लिङ्गार्चनपरौ = लिंगार्चनरत आहेत, सः = तो, रुद्र = रुद्रच होय, अत्र = या विषयी, न संशयः = संशय नाही.

**भावार्थ** : ज्याचे मन लिंगध्यानात लीन झाले आहे, ज्याची वाणी लिंगस्तुतीत रमलेली आहे आणि ज्याचे हात लिंगपूजेत मग्न आहेत, असा त्रिकरणरूप लिंगनिष्ठावंत असणारा माहेश्वर हा साक्षात् रुद्र होय, यात संशय नाही.।।२७।।

**लिङ्गनिष्ठस्य किं तस्य कर्मणा स्वर्गहेतुना।**
**नित्यानन्दशिवप्राप्तिर्यस्य शास्त्रेषु निश्चिता।।२८।।**

**अन्वयार्थ** : यस्य = ज्या, लिङ्गनिष्ठस्य = लिंगनिष्ठ असलेल्या, नित्यानन्दशिवप्राप्तिः = नित्यानंदरूपी शिवाची प्राप्ती, शास्त्रेषु = वेदागमादी शास्त्रांत, निश्चिता = निश्चित केली आहे, तस्य = त्याला, स्वर्गहेतुना = स्वर्गाला कारणीभूत अशा, कर्मणा = अग्निहोत्रादी कर्मांचे, किम् = काय प्रयोजन?

**भावार्थ** : लिंगनिष्ठ माहेश्वराला नित्यानंदरूपी शिवाची प्राप्ती निश्चितच आहे. वेद, आगम व पुराणे यांतही असेच म्हटलेले आहे. मग केवळ स्वर्गप्राप्ती हाच ज्यांचा हेतू आहे अशी अग्निहोत्रादी कर्मे वीरमाहेश्वराने करण्याचे कारणच काय? अर्थात् त्यांना अन्य कर्मांचे प्रयोजन नाही.।।२८।।

**लिङ्गनिष्ठापरं शान्तं भूतिरुद्राक्षसंयुतम्।**
**प्रशंसन्ति सदाकालं ब्रह्माद्या देवता मुदा।।२९।।**



**अन्वयार्थ** : भूतिरुद्राक्षसंयुतं = विभूतिरुद्राक्ष धारण केलेला, शान्तं = रागद्वेषरहित, लिङ्गनिष्ठापरं = लिंगावर अत्यंत निष्ठा असलेला, अशा माहेश्वराची, ब्रह्माद्याः = ब्रह्मादी, देवताः = देवता, मुदा = आनंदाने, सदाकालं = नेहमी, प्रशंसन्ति = स्तुती करतात.

**भावार्थ** : विभूति-रुद्राक्ष धारण करणाऱ्या, शांत अशा लिंगनिष्ठ माहेश्वराची प्रशंसा ब्रह्मादी देवताही सदैव आनंदाने करतात.।।२९।।

**पूर्वाश्रयनिरसनस्थल - (१८)**

**लिङ्गैकनिष्ठहृदयः सदा माहेश्वरो जनः।**
**पूर्वाश्रयगतान् धर्मांस्त्यजेत्स्वाचाररोधकान्।।३०।।**

**अन्वयार्थ** : सदा = नेहमी, लिङ्गैकनिष्ठहृदयः = लिंगनिष्ठ अंतःकरणाच्या, माहेश्वरो जनः = माहेश्वराने, स्वाचाररोधकान् = आपल्या सिद्धान्ताच्या आचाराशी विरोधी असणारा, पूर्वाश्रयगतान् = पूर्वीचा, धर्मान् = प्राकृत आचारधर्म, त्यजेत् = सोडावा.

**भावार्थ** : शिवलिंगाविषयी सदैव असाधारण निष्ठा बाळगणाऱ्या वीरमाहेश्वराने आपल्या आचार-विचाराला प्रतिकूल असलेल्या पूर्वीच्या प्राकृत आचारांचा त्याग करावा.।।३०।।

**स्वजातिकुलजान् धर्मान् लिङ्गनिष्ठाविरोधिनः।**
**त्यजन् माहेश्वरो ज्ञेयः पूर्वाश्रयनिरासकः।।३१।।**

**अन्वयार्थ** : लिङ्गनिष्ठाविरोधिनः = लिंगनिष्ठेला विरोधी होणारे, स्वजातिकुलजान् = आपल्या पूर्वीच्या जातीतील, धर्मान् = जननमरणादी सूतकांचा, त्यजन् = त्याग करणारा, माहेश्वरः = माहेश्वर, पूर्वाश्रयनिरासकः = पूर्वाश्रयनिरासक होय असे, ज्ञेयः = समजावे.

**भावार्थ** : लिंगनिष्ठेला विरोधी असलेल्या, आपल्या पूर्वीच्या ब्राह्मणादी जाती व कुंभारादी कुले यापासून प्राप्त झालेल्या जन्म-प्रेत-अशौच इत्यादी सूतकांचा त्याग करणाऱ्या वीरमाहेश्वराला ‘पूर्वाश्रय-निरासक’ म्हणतात. एकूण लिंगनिष्ठ असणाऱ्या माहेश्वराला कोणत्याही सूतकाचे अशौच नसते.।।३१।।

**शिवसंस्कारयोगेन विशुद्धानां महात्मनाम्।**
**किं पूर्वकालिकैर्धर्मैः प्राकृतानां हि ते मताः।।३२।।**

**अन्वयार्थ** : शिवसंस्कारयोगेन = शिवदीक्षासंस्कारामुळे, विशुद्धानां = परिशुद्ध झालेल्या, महात्मनाम् = महामाहेश्वरांना, पूर्वकालिकैः = पूर्वीच्या, धर्मैः = धर्माचरणाचे, किम् = काय प्रयोजन, हि = कारण, ते = अशौचादी धर्माचरण, प्राकृतानां = प्राकृत लोकांना, मताः = संमत आहे.

**भावार्थ** : पूर्वोक्त सहजादी दाने, शिवदीक्षासंस्कार व लिंगनिष्ठा यांमुळे ज्याचे किल्मिष, मनोमालिन्य व पापे नाहीशी होऊन निर्मल झालेल्या अशा वीरमाहेश्वरास संध्यावंदन आणि श्राद्धादी नित्यनैमित्तिक कर्माची आवश्यकताच काय?॥३२॥

**शिवसंस्कारयोगेन शिवधर्मानुषङ्गिणाम्।**
**प्राकृतानां न धर्मेषु प्रवृत्तिरुपपद्यते।।३३।।**

**अन्वयार्थ** : शिवसंस्कारयोगेन = शिवदीक्षासंस्कारामुळे, शिवधर्मानुषङ्गिणाम् = शिवाचार संबंधितांना, अर्थात् शिवाचारांचे परिपालन करणाऱ्यांना, प्राकृतानां = प्राकृत लोकांच्या, धर्मेषु = आचारधर्मात, प्रवृत्तिः = प्रवृत्ती, न उपपद्यते = होत नाही.

**भावार्थ** : शिवदीक्षासंस्कार झाल्यामुळे व शिवधर्माच्या संबंधामुळे शिवयोगी माहेश्वराच्या मनात प्राकृत लोकांच्या धर्माविषयी प्रवृत्ती उत्पन्न होत नाही.॥३३॥

**विशुद्धाः प्राकृताश्चेति द्विविधा मानुषा स्मृताः।**
**शिवसंस्कारिणः शुद्धाः प्राकृता इतरे मताः।।३४।।**

**अन्वयार्थ** : मानुषाः = मनुष्ये, विशुद्धाः = शुद्ध, च = आणि, प्राकृताः = प्राकृत, इति = अशा रीतीने, द्विविधाः = दोन प्रकारचे, स्मृताः = सांगितले आहेत, शिवसंस्कारिणः = शिवदीक्षा संस्कार झालेले, शुद्धाः = शुद्ध, इतरे = इतर, प्राकृताः = प्राकृत होत असे, मताः = मानतात.



**भावार्थ** : मानव विशुद्ध आणि प्राकृत असे दोन प्रकारचे आहेत. जे शिवसंस्कारयुक्त असतात ते विशुद्ध मानव होत. आणि ज्यांना शिवसंस्काराचा स्पर्शही होत नाही, ते प्राकृत मानव होत.॥३४॥

**वर्णाश्रमधर्माणां व्यवस्था हि द्विधा मता।**
**एका शिवेन निर्दिष्टा ब्रह्मणा कथिताऽपरा।।३५।।**

**अन्वयार्थ** : वर्णाश्रमादिधर्माणां = वर्णाश्रमादीं धर्मांची, व्यवस्था = व्यवस्था, हि = निश्चयाने, द्विधा = दोन प्रकारची, मता = मानली आहे, एका = एक, शिवेन = शिवाकडून, निर्दिष्टा = निर्देशिली आहे, अपरा = दुसरी, ब्रह्मणा = ब्रह्मदेवाकडून, कथिता = सांगितली आहे.

**भावार्थ** : वर्णाश्रमादी धर्मांची व्यवस्था दोन प्रकारची आहे. एक व्यवस्था शिवाने सांगितलेली असून दुसरी ब्रह्मदेवाने सांगितलेली आहे.॥३५॥

**शिवोक्तधर्मनिष्ठा तु शिवाश्रमनिषेविणाम्।**
**शिवसंस्कारहीनानां धर्मः पैतामहः स्मृतः।।३६।।**

**अन्वयार्थ** : शिवाश्रमनिषेविणाम् = शिवोक्त वर्णाश्रमानुसार राहाणाऱ्यांना, शिवोक्तधर्मनिष्ठा = शिवाने सांगितलेल्या शिवाचारात निष्ठा असावी, शिवसंस्कारहीनानां = शिवदीक्षा न झालेल्या लोकांसाठी, पैतामहः = ब्रह्मदेवाने सांगितलेले, धर्मः = आचार, स्मृतः = स्मृतीत सांगितले आहेत.

**भावार्थ** : शिवोक्त आश्रमधर्मानुसार भस्मादी लिंगयुक्त स्वधर्माचे सम्यक् आचरण शिवभक्त व माहेश्वर यांना उचित असून शिवसंस्कारविहीन लोकांना ब्रह्मदेवाने सांगितलेल्या धर्मावर विश्वास ठेवणे उचित आहे.॥३६॥

**शिवसंस्कारयुक्तेषु जातिभेदो न विद्यते।**
**काष्ठेषु वह्निदग्धेषु यथा रूपं न विद्यते।।३७।।**
**तस्मात्सर्वप्रयत्नेन शिवसंस्कारसंयुतः।**
**जातिभेदं न कुर्वीत शिवभक्ते कदाचन।।३८।।**

**अन्वयार्थ** : शिवसंस्कारयुक्तेषु = शिवसंस्काराने युक्त असलेल्या लोकात, जातिभेदं = जातीचा भेद, न विद्यते = असत नाही (नसतो), यथा = ज्या प्रमाणे,

वह्निदग्धेषु = अग्नीत जळालेल्या, काष्ठेषु = लाकडांमध्ये, रूपम् = रूप, न विद्यते = दिसत नाही, तस्मात् = म्हणून, सर्वप्रयत्नेन = सर्वप्रकारच्या प्रयत्नांनी, शिवसंस्कारसंयुत: = शिवसंस्काराने युक्त, शिवभक्ते = शिवभक्तात, कदाचन = कधीच, जातिभेदं = जातीचा भेद, न कुर्वीत् = करू नये.

**भावार्थ** : अग्नीत जळून गेलेल्या लाकडांचे पूर्वरूप जसे दिसत नाही, त्याप्रमाणे शिवसंस्काराने युक्त लोकांमध्ये पूर्व जातीचा भेद असत नाही. अर्थात् दीक्षासंस्कारानंतर वीरशैव धर्मामध्ये जातिभेद मानला जात नाही. म्हणून सर्व प्रयत्नांनी शिवसंस्काराने युक्त अशा शिवभक्तांमध्ये कधीही जातिभेद करू नये.॥३७-३८॥

### सर्वाद्वैतनिरसनस्थल - (१९)

**पूज्यपूजकयोर्लिङ्गजीवयोर्भेदवर्जने ।**
**पूजाकर्माद्यसम्पत्तेर्लिङ्गनिष्ठाविरोधत:।।३९।।**
**सर्वाद्वैतविचारस्य ज्ञानाभावे व्यवस्थिते:।**
**भवेन्माहेश्वर: कर्मी सर्वाद्वैतनिरासक:।।४०।।**

**अन्वयार्थ** : पूज्यपूजकयो: = पूज्य-पूजक असा, लिङ्गजीवयो: = शिवलिंग आणि शिव-भक्तामधील, भेदवर्जने = भेद सोडल्यास, पूजाकर्माद्यसम्पत्ते: = पूजाकर्मादी घडत नसल्यामुळे, लिङ्गनिष्ठाविरोधत: = लिंगनिष्ठेला विरोध होत असल्यामुळे, सर्वाद्वैतविचारस्य = सर्वत्र अद्वैत विचाराने, व्यवस्थिते: = वर्तन करणे, ज्ञानाभावे = अभेदज्ञानामुळे होत नाही म्हणून, कर्मी = लिङ्गपूजादी कर्मनिष्ठ, माहेश्वर: = माहेश्वर, सर्वाद्वैतनिरासक: = सर्वाद्वैत निरासक, भवेत् = होतो.

**भावार्थ** : पूज्य व पूजक, शिव व जीव यांच्यामध्ये भेद नसेल तर लिंगनिष्ठेला बाध येतो. शिवाय लिंगपूजेस अडसर उत्पन्न होतो. पूज्य व पूजक, प्रेर्य व प्रेरक, उपास्य व उपासक हा संबंध अद्वैतामुळे नव्हे तर द्वैतामुळे शोभून दिसतो. म्हणून शिवलिंगनिष्ठ असा माहेश्वर अद्वैताचा निरासक होतो.॥३९-४०॥

**प्रेरकं शङ्करं बुद्ध्वा प्रेर्यमात्मानमेव च।**
**भेदात् तं पूजयेन्नित्यं न चाद्वैतपरो भवेत्।।४१।।**



**अन्वयार्थ** : शङ्करं = शिवाला, प्रेरकं = प्रेरक असे, च = आणि, आत्मानं = स्वत:ला, प्रेर्यं = प्रेर्य असे, बुद्ध्वा = जाणून, भेदात् = भेद भावनेने, नित्यं = प्रतिदिन, तं = त्याला, पूजयेत् = पूजावे, च = आणि, अद्वैतपर: = अद्वैतनिष्ठ, न भवेत् = होऊ नये.

**भावार्थ** : शंकर हा बुद्धीचा प्रेरक असून जीव हा त्याच्याकडून प्रेरणा घेणारा म्हणजे प्रेर्य होय. प्रेरक आणि प्रेर्य या भेदाची जाणीव ठेवून माहेश्वराने नित्य शिवलिंगपूजा करावी. अद्वैतामुळे पूजेला बाध येतो म्हणून अद्वैतनिष्ठ होऊ नये.॥४१॥

**पति: साक्षान्महादेव: पशुरेष तदाश्रय:।**
**अनयो: स्वामिभृत्यत्वमभेदे कथमिष्यते।।४२।।**

**अन्वयार्थ** : महादेव: = परमेश्वर, साक्षात् = प्रत्यक्ष, पति: = पती होय, तदाश्रय: = त्याच्या आश्रयात असणारा, एष: = जीव, पशु: = पशू होय, अनयो: =या दोघांमधील, स्वामिभृत्यत्वं = स्वामीसेवक भाव, अभेदे = अभेद असल्यावर, कथमिष्यते = अपेक्षणीय कसा असेल?

**भावार्थ** : परमेश्वर हा त्रैलोक्याचा पती म्हणजे स्वामी आहे आणि जीव हा त्याचा आश्रित म्हणजे पशू आहे. ईश्वर व जीव या दोघांत स्वामी-सेवक संबंध असतो. त्यांच्यात जर अद्वैत मानले तर 'मूले कुठाराघात:' या म्हणीप्रमाणे क्रियाकर्माला तिलांजली द्यावी लागेल. म्हणून स्वामी व भृत्य या भेदभावानेच ईश्वरार्चन करावे.॥४२॥

**साक्षात्कृतं परं तत्त्वं यदा भवति बोधत:।**
**तदाद्वैतसमापत्तिर्ज्ञानहीनस्य न क्वचित्।।४३।।**

**अन्वयार्थ** : यदा = जेव्हा, बोधत: = गुरुकृत उपदेशाने, परं तत्त्वं = परशिव ब्रह्माचा, साक्षात्कृतं = साक्षात्कार, भवति = होतो, तदा = तेव्हा, अद्वैत-समापत्ति: = अद्वैत भावाची प्राप्ती होते, ज्ञानहीनस्य = ज्ञान नसलेल्यांना, न क्वचित् = केव्हाही होत नाही.

**भावार्थ** : श्रुती, गुरूपदेश व स्वानुभव यामुळे जेव्हा परशिवब्रह्माचा साक्षात्कार होतो तेव्हा अद्वैतसिद्धी लाभते. श्रुती, गुरूपदेश व स्वानुभव

नसलेल्या अज्ञ जीवाला अद्वैतसिद्धी कधीही होत नाही. त्याला सामरस्य प्राप्त होईपर्यंत कर्मकांडाची आवश्यकता असते.।।४३।।

**भेदस्य कर्महेतुत्वाद् व्यवहारः प्रवर्तते।**
**लिङ्गपूजादिकर्मस्थो न चाद्वैतं समाचरेत्।।४४।।**

**अन्वयार्थ** : भेदस्य = जीवेश्वर भेदाचा, व्यवहारः = व्यवहार, कर्महेतुत्वात् = शिवपूजादी कर्माला कारण होत असल्यामुळे, प्रवर्तते = पूजादी कर्मे चालतात म्हणून लिङ्गपूजादिकर्मस्थः = लिंगपूजादी कर्मनिरत साधकाने, अद्वैतं = अद्वैत भावाने, न समाचरेत् = वागू नये.

**भावार्थ** : ईश्वर व जीवभेदाचा व्यवहार शिवपूजादी कर्मांना कारण आहे. अर्थात् या भेदामुळेच पूजादी व्यवहार घडतो. म्हणून शिवपूजातत्पर माहेश्वराने अद्वैत मानू नये.।।४४।।

**पूजादिव्यवहारः स्याद्भेदाश्रयतया सदा।**
**लिङ्गपूजापरस्तस्मान्नाद्वैते निरतो भवेत्।।४५।।**

**अन्वयार्थ** : पूजादिव्यवहारः = पूजादी व्यवहार, सदा = नेहमी, भेदाश्रयतया = भेदामुळे, स्यात् = होतो, तस्मात् = म्हणून, लिङ्गपूजापरः = लिंगपूजानिष्ठ, वीरमाहेश्वराने, अद्वैते = अद्वैत भावनेत, निरतः आसक्त, न भवेत् = होऊ नये.

**भावार्थ** : निरंतर भेदाचा आश्रय केल्यामुळेच शिवलिंगपूजादी व्यवहार होतील, म्हणून शिवलिंगनिष्ठ माहेश्वराने अद्वैतासक्त होऊ नये. अर्थात् मी आणि शिव एकच आहोत असा निरर्थक गर्व करून लिंगपूजेचा त्याग कधीही करू नये.।।४५।।

### आह्वाननिरसनस्थल - (२०)

**लिङ्गार्चनपरः शुद्धः सर्वाद्वैतनिरासकः।**
**स्वेष्टलिङ्गे शिवाकारे न तमाह्वयेच्छिवम्।।४६।।**

**अन्वयार्थ** : लिङ्गार्चनपरः = लिंगार्चनात तत्पर, सर्वाद्वैतनिरासकः = सर्व अद्वैत निरासक, शुद्धः = परिशुद्ध अशा वीरमाहेश्वराने, शिवाकारे = शिवस्वरूपी,



श्रेष्ठलिङ्गे = आपल्या इष्टलिंगात, तं = त्या शिवाला, न आवाहयेत् = आवाहन करू नये.

**भावार्थ** : लिंगपूजापरायण, शुद्ध आणि सर्वाद्वैतनिरासक अशा माहेश्वराने आपल्या शिवस्वरूपी इष्टलिंगात पूजाप्रसंगी शिवाला आवाहन करू नये.।।४६।।

**यदा शिवकलायुक्तं लिङ्गं दद्यान्महागुरुः।**
**तदारभ्य शिवस्तत्र तिष्ठत्याह्वानमत्र किम्।।४७।।**

**अन्वयार्थ** : महागुरुः = आचार्यवर, शिवकलायुक्तं = शिवकलेने युक्त, लिङ्गं = इष्टलिंग, यदा = जेव्हा, दद्यात् = देतो, तदारभ्य = तेव्हापासून, तत्र = त्या इष्टलिंगात, शिवः = शिव, तिष्ठति = राहतो, म्हणून, अत्र = त्या इष्टलिंगात, आह्वानं = आवाहन करण्याचे, किम् = काय प्रयोजन?

**भावार्थ** : वीरशैव-तत्त्वज्ञ अशा आचार्यांने शिवभक्ताला शिवकलायुक्त लिंग दिल्यापासून शिव त्या लिंगात अखंड वास करतो. म्हणून शिवलिंगात शिवाला पुन्हा आवाहन करण्याचे कारण नाही.।।४७।।

**ससंस्कारेषु लिङ्गेषु सदा सन्निहितः शिवः।**
**तत्राह्वानं न कर्तव्यं प्रतिपत्तिविरोधकम्।।४८।।**

**अन्वयार्थ** : संस्कारेषु = संस्कारयुक्त, अशा, लिङ्गेषु = लिंगांमध्ये, शिवः = शिव, सदा = नेहमी, सन्निहितः = राहतो म्हणून, प्रतिपत्तिविरोधकं = भक्तीला विरोधी होणारे, आह्वानं = आवाहन, तत्र = त्या लिंगामध्ये, न कर्तव्यम् = करू नये.

**भावार्थ** : गुरुसंस्कारित लिंगात शिव नित्य असतोच. शिवलिंगात पुन्हा आवाहन केल्यास गुरूने पूर्वी केलेल्या आवाहनास विरोधी होईल म्हणून भक्ताने पुन्हा आवाहन करू नये.।।४८।।

**नाह्वानं न विसर्गं च स्वेष्टलिङ्गे तु कारयेत्।**
**लिङ्गनिष्ठापरो नित्यमिति शास्त्रस्य निश्चयः।।४९।।**

**अन्वयार्थ** : लिङ्गनिष्ठापरः = लिंगनिष्ठ माहेश्वराने, नित्यं = नित्य पूजेत, स्वेष्टलिङ्गे = आपल्या इष्टलिंगात, आह्वानं = आवाहन, च = आणि, विसर्गः = विसर्जन, न कारयेत् = करू नये, इति = असा, शास्त्रस्य = शास्त्राचा, निश्चयः = निर्णय आहे.

**भावार्थ** : लिंगनिष्ठ माहेश्वराने नित्य पूजेत आपल्या इष्टलिंगात शिवाचे आवाहन आणि विसर्जन करू नये, असा शास्त्राचा निर्णय आहे.॥४९॥

### अष्टमूर्तिनिरसनस्थल - (२१)

**यथात्मशिवयोरैक्यं न मतं कर्मसङ्गिनः।**
**तथा शिवात्पृथिव्यादेरद्वैतमपि नेष्यते।।५०।।**

**अन्वयार्थ** : कर्मसङ्गिनः = शिवपूजादि कर्मनिष्ठ माहेश्वराला, आत्मशिवयोः = जीवशिवामध्ये, ऐक्यं = अद्वैत, यथा = जसे, न मतं = मान्य नाही, तथा = तसेच, शिवात् = शिवाचे, पृथिव्यादेः = पृथिव्यादिकांशी, अद्वैतमपि = अद्वैत सुद्धा, नेष्यते = अपेक्षित नाही.

**भावार्थ** : शिवपूजादी कर्मनिष्ठ माहेश्वराला जसे शिवजीवाचे एकत्व संमत नाही तसेच पूज्य-पूजक भावास विरोधी शिव आणि पृथिव्यादी अष्टमूर्तींमधील अभेदही त्याला सांगत नाही.॥५०॥

**पृथिव्याद्यष्टमूर्तित्वमीश्वरस्य प्रकीर्तितम्।**
**तदधिष्ठातृभावेन न साक्षादेकभावतः।।५१।।**

**अन्वयार्थ** : ईश्वरस्य = शिवाचे, पृथिव्याद्यष्टमूर्तित्व = पृथिव्यादी अष्टमूर्ति-स्वरूप, जे, प्रकीर्तितम् = सांगितले आहे, ते, तदधिष्ठातृभावेन = त्यांच्या अधिष्ठानरूपाने होय. साक्षात् = प्रत्यक्ष, एकभावतः = एकरूपाने, न = नव्हे.

**भावार्थ** : पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, सूर्य, चंद्र व आत्मा या शिवाच्या अष्टमूर्ती आहेत असे शास्त्रात सांगितले असले तरी, त्या अष्टमूर्ती म्हणजे प्रत्यक्ष शिव नव्हे. कारण त्या मूर्ती परस्परापासून भिन्न आहेत, तशाच रीतीने परमात्मा शिव हा त्या सर्व अष्टमूर्तींपासून भिन्न आहे. त्यांचा संबंध शरीर व शरीरी (आत्मा) यांच्यासारखा आहे.॥५१॥



**पृथ्व्यादिकमिदं सर्वं कार्यं कर्ता महेश्वरः।**
**नैतत्साक्षान्महेशोऽयं कुलालो मृत्तिका यथा।।५२।।**

**अन्वयार्थ** : पृथ्व्यादि = पृथ्वी आदी, इदं सर्वं = हा सर्व प्रपंच, कार्यं = कार्य आहे, अयं = हा, महेश्वरः = शिव, कर्ता = कर्ता आहे, एतत् = हा प्रपंच, साक्षात् = प्रत्यक्ष, न महेशः = महेश्वर नव्हे, यथा = जसे, कुलालः = कुंभार आणि मृत्तिका = माती (एक नव्हेत).

**भावार्थ** : मृत्तिकेचा घटादी (कार्य) व कुंभार (कारण) हे जसे एक नसून भिन्न आहेत, त्या प्रमाणे कार्यरूपात्मक पृथ्वी आदी अष्टमूर्ती व कारणरूप शिव हे भिन्न आहेत, त्यांच्यात अभेद संभवत नाही.॥५२॥

**पृथिव्याद्यात्मपर्यन्तप्रपञ्चो ह्यष्टधा स्थितः।**
**तनुरीशस्य चात्मायं सर्वतत्त्वनियामकः।।५३।।**

**अन्वयार्थ** : पृथिव्याद्यात्मपर्यन्त = पृथ्वीपासून आत्म्यापर्यंत, अष्टधा = आठ प्रकारांनी, स्थितः = असणारा, प्रपञ्चः = प्रपंच, हि = निश्चयाने, ईशस्य = शिवाचे, तनुः = शरीर आहे, च = आणि, सर्वतत्त्वनियामकः = सर्व तत्त्वांचे नियमन करणारा, अयं = हा, आत्मा = आत्मा आहे.

**भावार्थ** : पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, चंद्र, सूर्य, आणि आत्मा असा अष्टधा प्रपंच हे ईश्वराचे शरीर असले तरी त्याचा प्रेरक, साक्षी परमात्मा आहे. घट व कुंभार यांच्यात देहभाव व देहीभाव नसतो. परंतु अष्टतनू व ईश्वर यांच्यात देह-देहीभाव असल्यामुळे हा संबंध विशेष असून तो घट व कुंभार यांच्यातील संबंधापेक्षा वेगळा आहे.॥५३॥

**शरीरभूतादेतस्मात् प्रपञ्चात्परमेष्ठिनः।**
**आत्मभूतस्य देवस्य नाभेदो न पृथक्स्थितिः।।५४।।**

**अन्वयार्थ** : परमेष्ठिनः = शिवाचे, शरीरभूतात् = शरीर असलेल्या, एतस्मात् = ह्या, प्रपञ्चात् = प्रपंचापासून, आत्मभूतस्य = आत्मस्वरूप अशा, देवस्य = शिवाचा, नाभेदः = अभेद नाही, न पृथक्स्थितिः = वेगळेपणाही नाही.

**भावार्थ** : परमेश्वराचे शरीर असलेला व आपल्या प्रचीतीला येणारा हा जो प्रपंच आहे, तो परमेश्वरापासून अभिन्न आहे व भिन्नही आहे. घट आणि पट यांच्यात जसा भेद आहे, तसा ईश्वर व प्रपंच यांच्यात अत्यंत भेद नाही. विश्व हे परमेश्वराचे शरीरच असल्यामुळे तो सर्व वस्तूंमध्ये असूनही शरीरातील आत्म्याप्रमाणे तो वेगळा आहे.॥५४॥

**अचेतनात्वात् पृथ्व्यादेरज्ञत्वाद् आत्मनस्तथा।**
**सर्वज्ञस्य महेशस्य नैकरूपत्वमिष्यते॥५५॥**

**अन्वयार्थ** : पृथिव्यादेः = पृथिव्यादी, अचेतनत्वात् = जड असल्यामुळे, तथा = तसेच, आत्मनः = जीवात्मा, अज्ञत्वात् = अल्पज्ञ असल्यामुळे, त्यांचे, सर्वज्ञस्य = सर्वज्ञ अशा, महेशस्य = महेश्वराशी, एकरूपत्वं = अभेद, नेष्यते = होत नाही.

**भावार्थ** : पृथ्वी आदी महाभूते अचेतन आहेत, आणि शरीरांतर्गत जीवात्मा हा किंचित् ज्ञानी आहे, म्हणून ईश्वराचे, प्रपंच आणि जीवात्मा यांच्यात साम्य नसल्यामुळे एकरूपत्व होऊ शकत नाही.॥५५॥

**इति यश्चिन्तयेन्नित्यं पृथिव्यादेरष्टमूर्तितः।**
**विलक्षणं महादेवं सोऽष्टमूर्तिनिरासकः॥५६॥**

**अन्वयार्थ** : इति = अशा रीतीने, यः = जो, नित्यं = प्रतिदिन, महादेवं = महादेवाचे, पृथिव्यादेः = पृथिव्यादी, अष्टमूर्तीपेक्षा, विलक्षणं = विलक्षण होय असे, चिन्तयेत् = चिंतन करतो, सः = तो माहेश्वर, अष्टमूर्तिनिरासकः = अष्ट-मूर्तिनिरासक होय.

**भावार्थ** : पृथ्वी आदी अष्टमूर्तीहून श्रीशंकर विलक्षण (वेगळा) आहे, असे, तत्त्वचिंतन करणाऱ्या माहेश्वराला अष्टमूर्तिनिरासक असे म्हणतात.॥५६॥

### सर्वगतनिरसनस्थल - (२२)

**सर्वगत्वे महेशस्य सर्वत्राराधनं भवेत्।**
**न लिङ्गमात्रे तन्निष्ठो न शिवं सर्वगं स्मरेत्॥५७॥**

**अन्वयार्थ** : महेशस्य = शिवाचे, सर्वगत्वे = सर्वत्र अस्तित्व मानल्यास, सर्वत्र = सगळीकडे आराधनं = पूजा, भवेत् = करावी लागेल, लिङ्गमात्रे = केवळ



लिंगात, न = होणार नाही, म्हणून, तन्निष्ठः = इष्टलिंगात निष्ठा असणाऱ्यांनी, शिवं = शिवाला, सर्वगं = सर्वव्यापी, म्हणून, न स्मरेत् = समजू नये.

**भावार्थ** : शिव हा सर्वव्यापी आहे, म्हणून कशाचेही पूजन केले तरी ते त्यालाच पोहोचते; मग लिंगपूजाच करण्याचे कारण काय? असा प्रश्न उपस्थित होईल. यासाठी लिंगनिष्ठ मनुष्य शिव सर्वव्यापी नसून तो लिंगातच आहे असे मानतो.॥५७॥

**सर्वगोऽपि स्थितः शम्भुः स्वाधारे हि विशेषतः।**
**तस्मादन्यत्र विमुखः स्वेष्टलिङ्गे यजेच्छिवम्॥५८॥**

**अन्वयार्थ** : शम्भुः = परमात्मा, सर्वगोऽपि = सर्वव्यापी असला तरी, स्वाधारे = आपल्याला आश्रयभूत इष्टलिंगात, हि = निश्चयाने, विशेषतः = अतिशयाने, स्थित = असतो, तस्मात् = म्हणून, अन्यत्र = दुसरीकडे, विमुखः = विन्मुख होऊन, स्वेष्टलिङ्गे = आपल्या इष्टलिंगात, शिवं = शिवाला, यजेत् = पूजावे.

**भावार्थ** : शिव सर्वव्यापी असला तरी तो स्वाधारभूत इष्टलिंगात विशेषत्वाने असतो. म्हणून अन्य स्थानाकडे लक्ष न देता माहेश्वराने स्वतःच्या इष्टलिंगातच त्याची पूजा करावी.॥५६॥

**शिवः सर्वगतश्चापि स्वाधारे व्यज्यते भृशम्।**
**शमीगर्भे यथा वह्निर्विशेषेण विभाव्यते॥५९॥**

**अन्वयार्थ** : शमीगर्भे = शमीवृक्षात, वह्निः = अग्नी, यथा = जसा, विशेषेण = विशेष रूपाने, विभाव्यते = असतो, तसेच, शिवः = शिव, सर्वगतश्चापि = सर्वत्र असला तरी, स्वाधारे = आपल्या आधारभूत इष्टलिंगात, भृशम् = अतिशयाने, व्यज्यते = अभिव्यक्त होतो.

**भावार्थ** : सर्व वृक्षांत अग्नी असला तरी शमीवृक्षात तो जसा विशेषत्वाने भासतो, त्याप्रमाणे शिव सर्वव्यापी असला तरी त्याचे विशेष आश्रयस्थान असलेल्या इष्टलिंगात तो विशेषत्वाने व्यक्त होतो.॥५९॥

**सर्वगत्वं महेशस्य सर्वशास्त्रविनिश्चितम्।**
**तथाप्याश्रयलिङ्गादौ पूजार्थमधिका स्थितिः।।६०।।**

**अन्वयार्थ** : महेशस्य = शिवाचे, सर्वगत्वं = सर्वव्यापकत्व, सर्वशास्त्रविनिश्चितम् = सर्व शास्त्रांनी निश्चित केले आहे, तथापि = तरी सुद्धा, आश्रयलिङ्गादौ = आश्रयभूत गुरुलिंगजंगमात, पूजार्थं = पूजेसाठी, त्यांची अधिका = अधिक, स्थितिः = उपस्थिती असते.

**भावार्थ** : महेश्वर सर्वव्यापी आहे, हे सर्व शास्त्रांनी मान्य केले आहे. तथापि तो आपले आश्रयस्थान असलेल्या लिंग-गुरु-जंगमात शिवभक्तांची पूजा स्वीकारण्यासाठी विशेषत्वाने राहातो.।।६०।।

**नित्यं भासि तदीयस्त्वं या ते रुद्र शिवा तनूः।**
**अघोराऽपापकाशीति श्रुतिराह सनातनी।।६१।।**

**अन्वयार्थ** : रुद्र = हे रुद्रा, ते = तुझे, या = जे, तनूः = शिवलिंगरूपी शरीर, शिवा = मंगलमय आहे, अघोरा = अभयंकर आहे, अपापकाशी = दोषरहित आहे, त्वं = तू, तदीयः = त्यात, नित्यं = नेहमी, भासि = सांगितले आहे.

**भावार्थ** : 'हे रुद्रा, तुझे शिवलिंगरूप शरीर पवित्र, मंगल, शांत, अभयंकर, दोषरहित आहे. तू लिंगाशी संबद्ध असून त्यात तू सर्वदा प्रकाशमान आहेस', असे श्रुतिवचन आहे.।।५९।।

**तस्मात्सर्वप्रयत्नेन सर्वस्थानपराङ्मुखः।**
**स्वेष्टलिङ्गे महादेवं पूजयेत्पूजकोत्तमः।।६२।।**

**अन्वयार्थ** : तस्मात् = म्हणून, पूजकोत्तमः = श्रेष्ठ पूजक अशा माहेश्वराने, सर्वप्रयत्नेन = सर्व प्रयत्नांनी, सर्वस्थानपराङ्मुखः = सर्वत्र विमुख होऊन, स्वेष्टलिङ्गे = आपल्या इष्टलिंगात, महादेवं = महादेवाला, पूजयेत् = पूजावे.

**भावार्थ** : इष्टलिंगात शिवाचा विशेष निवास असतो हे श्रुतिसंमत असल्यामुळे श्रेष्ठ पूजक माहेश्वराने अन्य स्थानांकडे मुळीच लक्ष न देता आपल्या इष्टलिंगातच शिवाची पूजा करावी.।।६२।।



**शिवस्य सर्वगत्वेऽपि सर्वत्र रतिवर्जितः।**
**स्वेष्टलिङ्गे यजन् देवं सर्वगत्वनिरासकः।।६३।।**

**अन्वयार्थ** : शिवस्य = शिवाची, सर्वगत्वेऽपि = सर्वत्र उपस्थिती असली तरी, सर्वत्र = सगळी कडे, रतिवर्जितः = आसक्ती सोडून, स्वेष्टलिङ्गे = आपल्या इष्टलिंगात, देवं = देवाची, यजन् = पूजा करीत राहाणारा, सर्वगत्वनिरासकः = सर्वगत्वनिरासक होतो.

**भावार्थ** : परशिव सर्वत्र व्यापक आहे. तथापि त्याच्या अन्य स्थानांतील रूपावर भक्ती न ठेवता इष्टलिंगातच जो शिवाची पूजा करतो त्याला सर्वगत्वनिरासक असे म्हणतात.।।६३।।

**शिवजगन्मयस्थल - (२३)**

**पूजाविधौ नियम्यत्वाल्लिङ्गमात्रे स्थितं शिवम्।**
**पूजयन्नपि देवस्य सर्वगत्वं विभावयेत्।।६४।।**

**अन्वयार्थ** : पूजाविधौ = पूजाविधीसाठी, नियमत्वात् = भक्ताधीन असल्यामुळे, लिङ्गमात्रे = केवळ इष्टलिंगात, स्थितं = राहाणाऱ्या, शिवं = शिवाची, पूजयन्नपि = पूजा करणारा असूनही, देवस्य = प्रकाशरूप शिवाच्या, सर्वगत्वं = सर्वव्यापकत्वाची, विभावयेत् = भावना करावी.

**भावार्थ** : शिव सर्वनियामक असला तरी पूजेच्या वेळी तो शिवभक्ताच्या अधीन असतो. इष्टलिंगात राहणारा शिव प्रकाशरूपी व सर्वव्यापी आहे, अशी वीरशैवाने भावना करावी.।।६४।।

**यस्मादेतत् समुत्पन्नं महादेवाच्चराचरम्।**
**तस्मादेतन्न भिद्येत यथा कुम्भादिकं मृदः।।६५।।**

**अन्वयार्थ** : मृदः = मातीपासून, कुम्भादिकं = घटादी, यथा = जसे, न भिद्येत = भिन्न नसतात, तसेच एतत् = हा, चराचरं = चराचर प्रपंच, यस्मात् = ज्या, महादेवात् = महादेवापासून, समुत्पन्नं = उत्पन्न झाला आहे, तो, तस्मात् = त्याच्यापासून, न भिद्यते = भिन्न नाही.

**भावार्थ** : शिवापासून उत्पन्न झालेले हे चराचर जग शिवापसून वेगळे नाही. कुंभाराने तयार केलेली मातीची घागर जशी मातीपासून निराळी नाही,

तद्वत् विश्व व विश्वनाथ यांच्यात भेद नसून अभेद आहे. कारणापासून कार्य वेगळे नाही.॥६५॥

**शिवतत्त्वात्समुत्पन्नं जगदस्मान्न भिद्यते।**
**फेनोर्मिबुद्बुदाकारं यथा सिन्धोर्न भिद्यते।।६६।।**

**अन्वयार्थ** : फेनोर्मिबुद्बुदाकारं = फेस, तरंग, बुडबुडे आदि, यथा = जसे, सिन्धोः = समुद्रापासून, न भिद्यते = भिन्न नसतात, तसे, शिवतत्त्वात् = शिवतत्त्वापूासन, समुत्पन्नं = उत्पन्न झालेले, जगत् = हे जग, अस्मात् = ह्या शिवापसून, न भिद्यते = भिन्न नाही.

**भावार्थ** : समुद्राच्या पाण्यातील फेस, लाटा, बुडबुडे हे ज्याप्रमाणे समुद्रापासून भिन्न नाहीत, त्याप्रमाणे शिवतत्त्वापासून उत्पन्न झालेले जग शिवापासून भिन्न नाही.॥६६॥

**यथा तन्तुभिरुत्पन्नः पटस्तन्तुमयः स्मृतः।।**
**तथा शिवात्समुत्पन्नं शिव एव चराचरम्।।६७।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, तन्तुभिः = तंतूपासून, उत्पन्नः = उत्पन्न झालेले, पटः = वस्त्र, तन्तुमयः स्मृतः = तंतुमय असे समजले जाते, तथा = तसे, शिवात् = शिवापासून, समुत्पन्नं = उत्पन्न झालेले, चराचरम् = चराचर जग, शिव एव = शिवस्वरूप होय.

**भावार्थ** : तंतूपासून उत्पन्न झालेले वस्त्र जसे तंतुमय असते, तसे शिवापासून उत्पन्न झालेले चराचर जग शिवरूपच असते.॥६७॥

**आत्मशक्तिविकासेन शिवो विश्वात्मना स्थितः।**
**कुटीभावाद् यथा भाति पटः स्वस्य प्रसारणात्।।६८।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, पटः = वस्त्र, स्वस्य = आपल्या, प्रसारणात् = प्रसरणामुळे, कुटीभावात् = तंबूच्या रूपाने, भाति = भासते, तसेच, शिवः = शिव, तसे शिव आपल्या शक्तीच्या विकासाने, विश्वात्मना = विश्वरूपाने, स्थितः = असून प्रतीत होतो.



**भावार्थ** : गुंडाळलेले वस्त्र जसे विशिष्टप्रकारे ताणल्यानंतर तंबूचे रूप धारण करते, तसे शिव आपल्या आत्मशक्तीच्या विकासाने प्रसरण पावून विश्वरूप होतो.॥६८॥

**तस्माच्छिवमयं सर्वं जगदेतच्छराचरम्।**
**तदभिन्नतया भाति सर्पत्वमिव रज्जुतः।।६९।।**

**अन्वयार्थ** : एतत् = हे, चराचरम् = चराचरात्मक जग, रज्जुतः = रज्जूपासून, सर्पत्वमिव = सर्पत्वासारखा, तदभिन्नतया = त्याच्याशी अभेदरूपाने, भाति = भासतो, तस्मात् = म्हणून, सर्वं जगत् = सर्व जग, शिवमयम् = शिवमय आहे.

**भावार्थ** : ज्याप्रमाणे दोरी (रज्जू) स्वतःच्या ठिकाणी असलेल्या दीर्घत्व (लांबी), कुंडलाकृती व कृष्णवर्ण या शक्तींमुळे विकाररहित होऊन सर्परूपाने भासते; त्याप्रमाणे शिव निर्विकार होऊन स्वतःच्या मायाशक्तीने विश्वाशी अभिन्न दिसतो. म्हणून सर्व चराचर विश्व शिवमय असून त्याच्याशिवाय अन्य काही नाही.॥६९॥

**रज्जौ सर्पवद्भाति शुक्तौ तु रजतत्ववत्।**
**चोरत्ववदपि स्थाणौ मरीच्यां च जलत्ववत्।।७०।।**
**गन्धर्वपुरवद्व्योम्नि सच्चिदानन्दलक्षणे।**
**निरस्तभेदसद्भावे शिवे विश्वं विराजते।।७१।।**

**अन्वयार्थ** : रज्जौ = दोरीत, सर्पत्ववत् = सर्पत्वाप्रमाणे, च = आणि, शुक्तौ = शिंपलीत, रजतत्ववत् = रजतत्वाप्रमाणे, स्थाणौ = झाडाच्या बुंध्यात, चोरत्ववत् = चोरत्वाप्रमाणे, च = आणि, मरीच्यां = मृगजळात, जलत्ववत् = जलत्वाप्रमाणे, व्योम्नि = आकाशात, गन्धर्वपुरवत् = गंधर्वपुरासारखे, निरस्तभेदसद्भावे = मुळीच भेद नसलेले, सच्चिदानन्दलक्षणे = सच्चिदानंदस्वरूपी, शिवे = शिवामध्ये, विश्वं = हा प्रपंच, विराजते = अभिन्नरूपाने प्रकाशित होतो.

**भावार्थ** : दोरी लांबीमुळे व रंगामुळे सापासारखी दिसते, शुभ्र वर्णामुळे शिंप रूप्यासारखी दिसते, झाडाचा बुंधा आकारमानामुळे माणसासारखा भासतो, उन्हामुळे मृगजळात पाण्याचा भास होतो, कारणपरत्वे आकाशात

गंधर्वनगरीचा भास होतो, त्याप्रमाणे सर्व प्रापंचिक भेदांपासून मुक्त, निर्विकार, सच्चिदानंदस्वरूप असे परशिवब्रह्मच त्याच्याठायी असलेल्या विमर्शशक्तीच्या प्रतिस्फुरणामुळे विश्वरूप भासते.।।७०-७१।।

**पत्रशाखादिरुपेण यथा तिष्ठति पादपः।**
**तथा भूम्यादिरूपेण शिव एको विराजते।।७२।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसा, पादपः = वृक्ष, पत्रशाखादिरूपेण = पत्रशाखादी रूपाने, तिष्ठति = राहातो, तथा = तसाच, एकः = एकच असणारा, शिवः = शिव, भूम्यादिरूपेण = भूमी आदींच्या रूपाने, विराजते = विराजमान होतो.

**भावार्थ** : ज्याप्रमाणे वृक्ष विकाररहित असला तरी कालाच्या प्रभावाने स्वतःत बीजरूपाने अवस्थित असलेल्या फांद्या, पाने, फुले इत्यादी रूपाने उभा असतो, त्याप्रमाणे शिव त्याच्या ठायी असलेल्या स्वसमवेत शक्तीच्या योगाने पृथ्वी आदी रूपांत प्रस्फुरित होतो.।।७२।।

भक्तदेहिकलिङ्गस्थल - (२४)

**समस्तजगदात्मापि शङ्करः परमेश्वरः।**
**भक्तानां हृदयाम्भोजे विशेषेण विराजते।।७३।।**

**अन्वयार्थ** : शङ्करः = सुखकर असा, परमेश्वरः = परशिव, समस्तजगदात्माऽपि = भावाभावरूप प्रपंचमय असला तरी, भक्तानां = भक्तांच्या, हृदयाम्भोजे = हृदयकमलात, विशेषेण = विशेष रूपाने, विराजते = प्रकाशित होतो.

**भावार्थ** : सर्व प्राणिमात्रांना सुख देणारा, सर्व चराचर जगताचा अंतरात्मा आणि प्रपंचमय शंकर शिवभक्तांच्या हृदयकमलात विशेषत्वाने विराजमान असतो.।।७३।।

**कैलासे मन्दरे चैव हिमाद्रौ कनकाचले।**
**हृदयेषु च भक्तानां विशेषेण व्यवस्थितः।।७४।।**

**अन्वयार्थ** : कैलासे = कैलास पर्वतावर, मन्दरे = मंदर पर्वतावर, हिमाद्रौ = हिमालय पर्वतावर, कनकाचले = मेरू पर्वतावर, च = आणि, भक्तानां = भक्तांच्या, हृदयेषु = हृदयांमध्ये, विशेषेण = विशेषरूपाने, विराजते = प्रकाशित होतो.



**भावार्थ** : कैलास, मंदराचल, हिमाचल आणि मेरूपर्वत या ठिकाणां-प्रमाणेच शिव आपल्या भक्तांच्या हृदयातही, विशेष आवडीने निवास करतो.।।७४।।

**सर्वात्मापि परिच्छिन्नो यथा देहेषु वर्तने।**
**तथा स्वकीयभक्तेषु शङ्करो भासते सदा।।७५।।**

**अन्वयार्थ** : शङ्करः = परमेश्वर, सर्वात्माऽपि = व्यापक असला तरी, यथा = जसा, देहेषु = देव, दानव, मनुष्यादींच्या शरीरांत, परिच्छिन्नः = परिच्छिन्न होऊन, वर्तते = प्रतिबिंबरूपाने राहातो, तथा = तसाच, स्वकीयभक्तेषु = आपल्या भक्तांच्या हृदयांमध्ये राहातो, सदा = नेहमी, भासते = प्रकाशमान असतो.

**भावार्थ** : सर्वात्मा परमेश्वर अपरिच्छन्न असला तरी तो देव, तिर्यक, मनुष्यादींच्या भिन्न-भिन्न अंतःकरणात प्रतिबिंब-रूपाने जसा असतो, तसाच, तो स्वभक्तांचा हृदयातही सर्वदा प्रकाशतो.।।७५।।

**नित्यं भाति त्वदीयेषु या ते रुद्र शिवा तनूः।**
**अघोराऽपापकाशीति श्रुतिराह सनातनी।।७६।।**

**अन्वयार्थ** : रुद्र = हे रुद्रा, ते = तुझे, तनूः = शिवलिंगरूपी शरीर, अघोरा = अभयंकर (सौम्य) आहे, अपापकाशी = दोषरहित आहे, आणि त्वदीयेषु = तुझ्या भक्तांच्या हृदयांत, नित्यं = नेहमी, भाति = प्रकाशित होते, असे सनातनी = सनातन, श्रुति = वेदांनी, आह = सांगितले आहे.

**भावार्थ** : हे रुद्रा तुझे शिवलिंगरूप कल्याणकारक, शांत आणि पातकांचा नाश करणारे असून ते भक्तांच्या हृदयात सर्वदा प्रकाशते, असे श्रुतिवचन आहे.।।७६।।

**विशुद्धेषु विरक्तेषु विवेकिषु महात्मसु।**
**शिवस्तिष्ठति सर्वात्मा शिवलाञ्छनधारिषु।।७७।।**

**अन्वयार्थ** : विशुद्धेषु = पवित्र व्यक्तींमध्ये, विरक्तेषु = विरक्तांमध्ये, विवेकिषु = विवेकी अशा, महात्मसु = शुकादी योग्यांमध्ये, आणि शिवलाञ्छन-धारिषु = विभूतिरुद्राक्षादी शिवलांछने धारण करणाऱ्यांमध्ये, सर्वात्मा = व्यापक असा, शिवः = परमात्मा, तिष्ठति = प्रकाशमान होतो.

**भावार्थ** : विशुद्ध, विरक्त, षट्स्थलज्ञानी अशा चरमूर्तींच्या हृदयांत, विवेकी अशा शुकदेवादी योग्यांच्या हृदयांत आणि विभूति-रुद्राक्षादी शिव-लांच्छने धारण करणाऱ्या शिवभक्तांच्या हृदयांत सर्वात्मा शिव नित्य वास करून असतो. म्हणजेच भक्तिविरहित लोकांना त्याचे अस्तित्व जाणवत नाही.॥७७॥

**नित्यं सन्तोषयुक्तानां ज्ञाननिर्धूतकर्मणाम्।**
**माहेश्वराणामन्त:स्थो विभाति परमेश्वर:।।७८।।**

**अन्वयार्थ** : ज्ञान = शिवज्ञानाने, निर्धूतकर्मणाम् = निष्पाप झालेल्या, नित्यं = नेहमी, संतोषयुक्तानां = संतोषाने राहाणाऱ्या, माहेश्वराणां = माहेश्वरांच्या, अन्तस्थ: = अंत:करणात राहून, परमेश्वर: = परमेश्वर, विभाति = स्पष्टपणे प्रकाशतो.

**भावार्थ** : शिवज्ञानाने ज्याची पापे नाश पावली आहेत, जे शिवमुखाचा नित्य अनुभव घेतात, स्वच्छ दर्पणा सारखे ज्यांचे हृदय निर्मल आहे अशा शिवभक्तांचा अंत:करणात शिव अत्यंत स्पष्टपणे प्रकाशमान असतो.॥७८॥

**अन्यत्र शम्भो रतिमात्रशून्यो निजेष्टलिङ्गे नियतान्तरात्मा।**
**शिवात्मकं विश्वमिदं विबुध्यन् माहेश्वरोऽसौ भवति प्रसादी।।७९।।**

**अन्वयार्थ** : शम्भो: = शंकराशिवाय, अन्यत्र = इतर देवांमध्ये, रतिमात्र-शून्य: = तिळमात्र प्रेम न ठेवणारा, निजेष्टलिङ्गे = आपल्या इष्टलिंगात, नियतान्त-रात्मा = संयमित अंत:करणाचा, असौ = हा, माहेश्वर: = माहेश्वर, इदं विश्वं = ह्या प्रपंचाला, शिवात्मकं = शिवस्वरूपाने, विबुध्यन् = जाणून, प्रसादी भवति = प्रसादी होतो.

**भावार्थ** : शिवाशिवाय अन्य देवाची भक्ती न करणारा, स्वत:च्या इष्टलिंगाची एकाग्रतेने पूजा करणारा, चराचर विश्वाला शिवरूप मानणारा माहेश्वरच 'प्रसादी' होतो.॥७९॥

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्य-विरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ माहेश्वरस्थले माहेश्वरप्रशंसा-दिनवविधस्थलप्रसङ्गो नाम दशम: परिच्छेद:।***
**दहावा परिच्छेद समाप्त.**

# अकरावा परिच्छेद

### अंगस्थलांतर्गत
## प्रसादीस्थल

**अगस्त्य उवाच —**

**उक्तो माहेश्वर: साक्षाल्लिङ्गनिष्ठादिधर्मवान्।**
**कथमेष प्रसादीति कथ्यते गणनायक।।१।।**

**अन्वयार्थ** : गणनायक = हे गणेश्वरा, लिङ्गनिष्ठादिधर्मवान् = लिंगनिष्ठादी धर्माने युक्त, साक्षात् = प्रत्यक्ष, माहेश्वरा: = माहेश्वर म्हणून, उक्त: = सांगितलेला, एष: = हा, प्रसादीति = प्रसादी म्हणून, कथं = कसा, कथ्यते = सांगितला जातो, ते सांगा.

**भावार्थ** : अगस्त्य म्हणतात, हे गणनायका रेणुका, इष्टलिंगावर दृढ निष्ठा ठेवून शिवधर्म व शिवाचार पालन करणाऱ्यास माहेश्वर म्हणतात ते समजले. हा माहेश्वर प्रसादी कसा होतो ते सांगा.॥१॥

**रेणुक उवाच —**

**लिङ्गनिष्ठादिभावेन ध्वस्तपापनिबन्धन:।**
**मन:प्रसादयोगेन प्रसादीत्येष कथ्यते।।२।।**

**अन्वयार्थ** : लिङ्गनिष्ठादिभावेन = लिंगनिष्ठास्थलोक्त धर्माचरणाने, ध्वस्त-पापनिबन्धन: = पापसमूह नष्ट झालेला, एष: = हा माहेश्वर, मन:प्रसादयोगेन = मनाच्या प्रसन्नतेमुळे, प्रसादीति = प्रसादी म्हणून, कथ्यते = सांगितला जातो.

**भावार्थ** : रेणुकाचार्य म्हणाले- पूर्वोक्त लिंगनिष्ठादी स्थलांच्या ज्ञानाने व त्यांच्या आचरणाने ज्याच्या पातकाचा नाश झाला आणि शिवज्ञानाने ज्याच्या मनाला प्रसन्नता लाभली आहे, अशा माहेश्वराला प्रसादी म्हणतात.॥२॥

**प्रसादिस्थलमित्येतदस्य माहात्म्यबोधकम्।**
**अन्तरस्थलभेदेन सप्तधा परिकीर्तितम्।।३।।**

**अन्वयार्थ** : एतत् = हे, प्रसादिस्थलं = प्रसादी स्थल, अस्य = ह्याचे, माहात्म्यबोधकं = माहात्म्य प्रतिपादन करणारे, अन्तरस्थलभेदेन = अंतर्गत स्थल भेदानुसार, सप्तधा = सात प्रकार, परिकीर्तितम् = सांगितले आहेत.

**भावार्थ** : या प्रसादीस्थलात भक्त व माहेश्वरस्थलांतील सदाचाराचे महत्त्व आधिक्याने सांगितले असून या स्थलाचे सात अवांतर भेद आहेत.॥३॥

**प्रसादिस्थलमादौ तु गुरुमाहात्म्यकं ततः।**
**ततो लिङ्गप्रशंसा च ततो जङ्गमगौरवम्॥४॥**
**ततो भक्तस्य माहात्म्यं ततः शरणकीर्तनम्।**
**शिवप्रसादमाहात्म्यमिति सप्तप्रकारकम्॥५॥**

**अन्वयार्थ** : आदौ = पहिले, प्रसादिस्थलं = प्रसादीस्थल, ततः = त्यानंतर, गुरुमाहात्म्यकं = गुरुमाहात्म्यस्थल, ततः = त्यानंतर, लिङ्गप्रशंसा = लिंगमाहात्म्यस्थल, ततः = त्यानंतर, जङ्गमगौरवम् = जंगममाहात्म्यस्थल, ततः = त्यानंतर,, भक्तस्य माहात्म्यं = भक्तमाहात्म्यस्थल, ततः = नंतर, शरणकीर्तनम् = शरणमाहात्म्यस्थल, च = आणि, शिवप्रसादमाहात्म्यम् = शिवप्रसादमाहात्म्य-स्थल, इति = असे, सप्तप्रकारकं = सात पोटभेद आहेत.

**भावार्थ** : १) प्रसादीस्थल २) गुरुमाहात्म्यस्थल ३) लिंगमाहात्म्यस्थल ४) जंगममाहात्म्यस्थल ५) भक्तमाहात्म्यस्थल ६) शरणमाहात्म्यस्थल आणि ७) शिवप्रसादमाहात्म्यस्थल, असे प्रसादीस्थलाचे सात भेद आहेत.॥४-५॥

**प्रसादिस्थल - (२५)**

**क्रमाल्लक्षणमेतेषां कथयामि महामुने।**
**नैर्मल्यं मनसो लिङ्गं प्रसाद इति कथ्यते।**
**शिवस्य लिङ्गरूपस्य प्रसादादेव सिद्ध्यति॥६॥**

**अन्वयार्थ** : महामुने = हे महामुनी, एतेषां = ह्यांचे, क्रमात् = अनुक्रमाने, लक्षणं = लक्षण, कथयामि = सांगतो, मनसः = मनाचे, नैर्मल्यं = निर्मलतेचे, लिङ्गं = चिन्ह, प्रसाद इति = प्रसाद म्हणून, कथ्यते = सांगितले जाते, (तो प्रसाद) लिङ्गरूपस्य = लिंगस्वरूपी, शिवस्य = शिवाच्या, प्रसादादेव = अनुग्रहानेच, सिद्ध्यति = सिद्ध होतो.

**भावार्थ** : हे अगस्त्या, आता मी तुला पूर्वोक्त सात स्थलांचे स्वरूप क्रमशः सांगतो. मनाच्या निर्मलपणाला (प्रसन्नतेला) प्रसाद असे म्हणतात. हा निर्मलस्वरूप प्रसाद लिंगरूप शिवाच्या प्रसादाने सिद्ध होतो.॥७॥



**शिवप्रसादं यद्द्रव्यं शिवाय विनिवेदितम्।**
**निर्माल्यं तत्तु शैवानां मनोनैर्मल्यकारणम्॥७॥**

**अन्वयार्थ** : शिवाय = शिवाला, विनिवेदितम् = समर्पित, यत् = जो, द्रव्यं = पदार्थ, आहे तो, शिवप्रसादं = शिवप्रसाद होय, तत् = ते, निर्माल्यं = निर्माल्य, शैवानां तु = वीरशैवानां, मनोनैर्मल्यकारणम् = मनाच्या निर्मलतेला कारण होते.

**भावार्थ** : शिवाला अर्पण केलेले जे पदार्थ असतात त्यास शिवप्रसाद म्हणावे. तो प्रसाद किंवा निर्माल्य वीरशैवांना मन निर्मल होण्यास कारण आहे.॥७॥

**मनःप्रसादसिद्ध्यर्थं निर्मलज्ञानकारणम्।**
**शिवप्रसादं स्वीकुर्वन् प्रसादीत्येष कथ्यते॥८॥**

**अन्वयार्थ** : निर्मलज्ञानकारणम् = शिवज्ञानाला कारणीभूत, शिवप्रसादं = शिवप्रसाद, मनःप्रसादसिद्ध्यर्थं = मनाच्या प्रसन्नतेसाठी, स्वीकुर्वन् = स्वीकार करणारा, एषः = हा माहेश्वर, प्रसादीति = प्रसादी म्हणून, कथ्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : शिवलिंगाचा प्रसाद असे शिवनिर्माल्य हेच शिवज्ञानाला कारण असून ते मनाच्या प्रसन्नतेसाठी स्वीकारणारा माहेश्वरच प्रसादी होतो.॥८॥

**अन्नशुद्ध्या हि सर्वेषां तत्त्वशुद्धिरुदाहृता।**
**विशुद्धमन्नजातं हि यच्छिवाय समर्पितम्॥९॥**
**तदेव सर्वकालं तु भुञ्जानो लिङ्गतत्परः।**
**मनःप्रसादमतुलं लभते ज्ञानकारणम्॥१०॥**

**अन्वयार्थ** : अन्नशुद्ध्या हि = अन्नाच्या शुद्धीनेच, सर्वेषां = सर्व प्राण्यांच्या, तत्वशुद्धिः = मन आदी तत्त्वांची शुद्धी, उदाहृता = प्रतिपादिली आहे, यत् = जो, अन्नजातं = अन्नसमूह, शिवाय = शिवाला, समर्पितं = समर्पित केला जातो, तत् = तो, विशुद्धम् = विशुद्ध मानला जातो, तदेव = त्याचा, सर्वकाल तु = सदा, भुञ्जानः = उपभोग घेणारा, लिङ्गतत्परः = लिंगनिष्ठ माहेश्वर, ज्ञानकारणम् =

शिवज्ञानाला कारणीभूत, अतुलं = अतुलनीय अशी, मन:प्रसादं = मनाची प्रसन्नता, लभते = प्राप्त करून घेतो.

**भावार्थ** : शुद्ध अन्नाच्या भक्षणाने सर्व प्राण्यांची तत्त्वशुद्धी होते. अर्थात् शरीर व इंद्रिये इत्यादी परिशुद्ध होतात. शिवार्पण केलेले अन्न हे शुद्धान्न होय. लिंगपूजापरायण माहेश्वर प्रतिदिनी शिवार्पित अन्नच (शिवप्रसाद) सेवन करतो. त्यामुळे शिवज्ञानाला कारण ठरणारी मनाची प्रसन्नता त्याला प्राप्त होते.॥९-१०॥

**आत्मभोगाय नियतं यद्यद्द्रव्यं समाहितम्।**
**तत्तत् समर्प्य देवाय भुञ्जीयादात्मशुद्धये।।११।।**

**अन्वयार्थ** : आत्मभोगाय = उपभोगासाठी, नियतं = निश्चित झालेला, समाहितं = संग्रहित केलेला, यद्यद् = जो जो, द्रव्यं = पदार्थ आहे, तत्तत् = तो तो, देवाय = इष्टलिंगाला, समर्प्य = अर्पण करून, आत्मविशुद्धये = चित्तशुद्धी साठी, भुञ्जीत = ग्रहण करावा.

**भावार्थ** : स्वत:च्या उपयोगासाठी जे जे पदार्थ संपादन केले असतील ते सर्व प्रथम शिवाला अर्पण करून नंतर स्वत: स्वीकारावे. यामुळे चित्तशुद्धी होते.॥११॥

**नित्यसिद्धेन देवेन भिषजा जन्मरोगिणाम्।**
**यद्यत् प्रसादितं भुक्त्वा तत्तज्जन्मरसायनम्।।१२।।**

**अन्वयार्थ** : जन्मरोगिणाम् = भवरोग्यांचा, भिषजा = वैद्य असणाऱ्या, नित्य-सिद्धेन = आपल्या इष्टलिंगात नित्य वास करणाऱ्या, देवेन = परमेश्वराने, यद्यद् = जो जो पदार्थ, भुक्त्वा = भोग घेऊन, त्याचा, प्रसादितं = प्रसाद केला आहे, तत्तत् = तो तो पदार्थ म्हणजे, जन्मरसायनम् = संसारव्याधी निवारण करणारे रसायन होय.

**भावार्थ** : शिव हा नित्यसिद्ध (इष्टलिंगात) असून जन्ममरणरूपी रोगाचे निवारण करणारा वैद्य आहे. त्याने प्रसाद म्हणून दिलेल्या अन्नाचे शिवभक्ताने भक्षण करणे म्हणजे जन्ममरणरूप रोग दूर होण्यासाठी रसायन सेवन करण्यासारखेच आहे.॥१२॥



**आरोग्यकारणं पुंसामन्त:करणशुद्धिदम्।**
**तापत्रयमहारोगसमुद्धरणभेषजम् ।।१३।।**
**विद्यावैशद्यकरणं विनिपातविघातनम्।**
**द्वारं ज्ञानावतारस्य मोहोच्छेदस्य कारणम्।।१४।।**
**वैराग्यसम्पदो मूलं महानन्दप्रवर्धनम्।**
**दुर्लभं पापचित्तानां सुलभं शुद्धकर्मणाम्।।१५।।**
**आदृतं ब्रह्मविष्ण्वाद्यैर्वसिष्ठाद्यैश्च तापसै:।**
**शिवस्वीकृतमन्नाद्यं स्वीकार्यं सिद्धिकाङ्क्षिभि:।।१६।।**

**अन्वयार्थ** : पुंसां = जीवांच्या, आरोग्यकारणं = आरोग्याला कारणीभूत, अन्त:करणशुद्धिदम् = अंत:करणाची शुद्धी करणारा, तापत्रय = तापत्रयरूपी, महारोग = महारोगापासून, समुद्धरण = उद्धार करणारे, भेषजं = औषध, विद्यावैशद्यकरणं = आत्मविद्येच्या अभिवृद्धीला कारण असा, विनिपातविघातनम् = दोषनाशक, ज्ञानावतारस्य द्वारं = ज्ञानप्राप्तीचा मार्ग, मोहोच्छेदस्य कारणम् = अज्ञाननिवारणाचे कारण, वैराग्यसम्पदो मूलं = वैराग्यसंपत्तीचे मूळ कारण, महानन्दप्रवर्धनम् = नित्यानंदवर्धक, पापचित्तानां दुर्लभं = पापी लोकांना दुर्लभ, शुद्धकर्मिणां सुलभं = पुण्यात्म्यांना सुलभ, ब्रह्मविष्ण्वाद्यै: = ब्रह्मा, विष्णू आदी देवांकडून, च = आणि, वसिष्ठाद्यै: तापसै: = वसिष्ठादी तपस्व्यांकडून, आदृतं = आदराने स्वीकारला गेलेला, शिवस्वीकृतं = शिवाने स्वीकारलेला, अन्नाद्यं = अन्नादी प्रसाद, सिद्धिकाङ्क्षिभि: = भोग आणि मोक्ष इच्छिणाऱ्यांनी, स्वीकार्यम् = स्वीकारावा.

**भावार्थ** : शिवप्रसादाचे सेवन केल्याने शिवभक्ताचे आरोग्य वाढते, अंत:करण शुद्ध होते, औषधामुळे रोग नाहीसा व्हावा तसे आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक असे तीन प्रकारचे ताप नाहीसे होतात, विद्येची शुद्धी होऊन वृद्धी होते, संकटाचा परिहार होतो, ज्ञानमार्ग मोकळा होऊन अज्ञानाचा उच्छेद होतो, शिवप्रसादान्नामुळे वैराग्यरूप संपत्ती वाढते आणि ब्रह्मानंदाची प्राप्ती होते. पातकी मनुष्यांना शिवप्रसाद दुर्लभ असून पुण्यात्म्यांना तो सहज मिळतो. ब्रह्मादी देवांनी व वसिष्ठादी ऋषिमुनींनी स्वीकारलेले शिवप्रसादान्न मुमुक्षू मनुष्याने अवश्य सेवन करावे.॥१३-१६॥

**पत्रं पुष्पं फलं तोयं यच्छिवाय निवेदितम्।**
**तत्तत्स्वीकारयोगेन सर्वपापक्षयो भवेत्।।१७।।**

**अन्वयार्थ** : पत्रं = पत्र, पुष्पं = पुष्प, फलं = फळ, तोयं = जल, यत् = जे, शिवाय = शिवाला, निवेदितम् = अर्पण केले आहे, तत्त्वत् = ते ते, स्वीकारयोगेन = स्वीकारल्याने, सर्वपापक्षय: = सर्व पापांचा नाश, भवेत् = होतो.

**भावार्थ** : शिवप्रसादाने सर्व पातकांचा नाश होतो. पान, फूल, फळ, पाणी वगैरे काहीही शिवाला अर्पण करून त्या शिवप्रसादाचा स्वीकार केल्याने सर्व पातकांचा नाश होतो.॥१७॥

**यथा शिवप्रसादान्नं स्वीकार्यं लिङ्गतत्परैः।**
**तथा गुरोः प्रसादान्नं तथैव शिवयोगिनाम्।।१८।।**

**अन्वयार्थ** : लिङ्गतत्परै: = लिंगनिष्ठ प्रसादी साधकांकडून, यथा = जसे, शिवप्रसादान्नं = शिवप्रसादरूपी अन्न, स्वीकार्यं = स्वीकारले गेले पाहिजे, तथा = तसे, गुरो: = गुरूचे, तथैव = तसेच, शिवयोगिनाम् = शिवयोग्यांचे, प्रसादान्नं = प्रसादान्न, स्वीकरणीय आहे.

**भावार्थ** : लिंगनिष्ठ प्रसादीने जसे शिवप्रसादान्नाचे भक्षण करावे तसेच गुरुप्रसादान्न व शिवयोगी (जंगम) प्रसादान्न यांचेही भक्षण करावे.॥१८॥

### गुरुमाहात्म्यस्थल - (२६)

**गुरुरेवात्र सर्वेषां कारणं सिद्धिकर्मणाम्।**
**गुरुरूपो महादेवो यतः साक्षादुपस्थितः।।१९।।**

**अन्वयार्थ** : अत्र = ह्या जगात, सर्वेषां = सर्व, सिद्धिकर्मणां = भोगमोक्षादी सिद्धीसाठी, गुरुरेव = गुरूच, कारणं = कारण आहे, यत: = कारण की, महादेव: = परमेश्वर, साक्षात् = प्रत्यक्ष, गुरुरूप: = गुरूपाने, उपस्थित: = उपस्थित असतो.

**भावार्थ** : इहलोकात भोगमोक्षादी सर्व सिद्धी प्राप्त करून देणारा गुरूच होय. कारण प्रत्यक्ष परमेश्वरच गुरूचे रूप घेऊन आला आहे.॥१९॥

**निष्कलो हि महादेवो नित्यज्ञानमहोदधिः।**
**सकलो गुरुरूपेण सर्वानुग्राहको भवेत्।।२०।।**



**अन्वयार्थ** : नित्यज्ञानमहोदधि: = नित्यज्ञानाचा सागर, महादेव: = महादेव, निष्कलो हि = निरवयव आहे तरी, गुरुरूपेण = गुरुरूपाने, सकल: = सावयव होऊन, सर्वानुग्राहक: = सर्वांवर अनुग्रह करणारा, भवेत् = होतो.

**भावार्थ** : परमेश्वर हा नित्य ज्ञानाचा सागर, निष्कल, निरवयव असला तरी सर्वांवर अनुग्रह करण्यासाठी तो गुरुरूपाने अवतरला आहे, असे समजावे.॥२०॥

**यः शिवः स गुरुर्ज्ञेयो यो गुरुः स शिवः स्मृतः।**
**न तयोरन्तरं कुर्याद् ज्ञानावाप्तौ महामतिः।।२१।।**

**अन्वयार्थ** : य: = जो, गुरु: = गुरू आहे, स: = तो, शिव: = शिव होय, य: = जो, शिव: = शिव आहे, स: = तो, गुरु: = गुरू म्हणून, स्मृत: = समजला जातो, महामति: = बुद्धिमान माणसाने, ज्ञानावाप्तौ = ज्ञानप्राप्तीसाठी, तयो: = त्या दोघांमध्ये, अन्तरं = अंतर, न कुर्यात् = करू नये.

**भावार्थ** : जो गुरू आहे तोच शिव आहे आणि जो शिव आहे तोच गुरू आहे, असे मानावे. बुद्धिमान शिवभक्तांनी ज्ञानप्राप्तीसाठी गुरू व शिव यांच्यात कधीही भेद करू नये.॥२१॥

**हस्तपादादिसाम्येन नेतरैः सदृशं वदेत्।**
**आचार्यं ज्ञानदं शुद्धं शिवरूपतया स्थितम्।।२२।।**

**अन्वयार्थ** : शुद्धं = निर्मल अंत:करणाचा, ज्ञानदं = शिवज्ञान देणारा, शिवरूपतया स्थितं = शिवरूपाने राहाणाऱ्या, आचार्यं = गुरूला, हस्तपादादि-साम्येन = हातापाय इत्यादींच्या साम्यामुळे, इतरै: = अन्य प्राकृत लोकांशी, सदृशं = समान असे, न वदेत् = म्हणू नये.

**भावार्थ** : गुरूला हातपाय इत्यादी अवयवसाम्यामुळे सामान्य मनुष्यासारखे समजू नये, तर शिवज्ञान देणारा गुरू प्रत्यक्ष शिवच आहे, असे समजावे.॥२२॥

**आचार्यस्यावमानेन श्रेयःप्राप्तिर्विहन्यते।**
**तस्मान्निःश्रेयसप्राप्त्यै पूजयेत् तं समाहितः।।२३।।**

**अन्वयार्थ** : आचार्यस्य = गुरूचा, अवमानेन = अपमान केल्याने, श्रेयः-प्राप्तिः = भोग मोक्षादी श्रेयप्राप्तीचा, विहन्यते = नाश होतो, तस्मात् = म्हणून, निःश्रेयसप्राप्त्यै = मोक्षप्राप्तीसाठी, समाहितः = एकाग्रचित्त होऊन, तं = त्याची, प्रजयेत् = पूजा करावी.

**भावार्थ** : आचार्य हे सामान्य मनुष्यासारखे आहेत, असे मानल्यामुळे त्यांचा अवमान होतो आणि श्रेयसाची प्राप्ती होत नाही. म्हणून निःश्रेयस् म्हणजे मोक्षप्राप्तीसाठी एकाग्रचित्ताने गुरूची पूजा करावी.॥२३॥

**गुरुभक्तिविहीनस्य शिवभक्तिर्न जायते।**
**ततः शिवे यथा भक्तिस्तथा भक्तिर्गुरावपि।।२४।।**

**अन्वयार्थ** : गुरुभक्तिविहीनस्य = गुरुभक्ती नसलेल्यांना, शिवभक्तिः = शिवभक्ती, न जायते = घडत नाही, ततः = त्यासाठी, यथा = जशी, शिवे = शिवावर, भक्तिः = भक्ती केली जाते, तथा = तशीच, गुरावपि = गुरूवरही, भक्तिः = भक्ती, करावी.

**भावार्थ** : ज्याने गुरुभक्ती केली नाही त्याच्याकडून शिवभक्ती घडत नाही. म्हणून शिवाप्रमाणे गुरूचीही भक्ती करावी.॥२४॥

### लिङ्गमाहात्म्यस्थल - (२७)

**गुरुमाहात्म्ययोगेन निजज्ञानातिरेकतः।**
**लिङ्गस्यापि च माहात्म्यं सर्वोत्कृष्टं विभाव्यते।।२५।।**

**अन्वयार्थ** : गुरुमाहात्म्ययोगेन = गुरुमहिमेच्या ज्ञानाने, च = आणि, निजज्ञानातिरेकतः = आपल्या ज्ञानाच्या आधिक्याने, लिङ्गस्यापि = शिवलिंगाचेही, माहात्म्यं = माहात्म्य, सर्वोत्कृष्टं = सर्वोत्कृष्ट असे, विभाव्यते = ज्ञात होते.

**भावार्थ** : गुरुमाहात्म्याच्या ज्ञानाने आणि स्वरूपज्ञानाच्या आधिक्याने शिवलिंगाचेही माहात्म्य सर्वोत्कृष्ट आहे, असे समजते.॥२५॥

**शिवस्य बोधलिङ्गं यद् गुरुबोधितचेतसा।**
**तदेव लिङ्गं विज्ञेयं शाङ्करं सर्वकारणम्।।२६।।**



**अन्वयार्थ** : शिवस्य = शिवाचे, यत् = जे, बोधलिङ्गं = चिन्मय लिंग आहे, तत् = ते, सर्वकारणं = विश्वाला कारण होणारे, शाङ्करं लिङ्गं = शंकराचे लिंग म्हणून, गुरुबोधितचेतसा = गुरूने सांगितलेल्या ज्ञानाचेच, विज्ञेयम् = जाणणे योग्य आहे.

**भावार्थ** : शिवाचे बोधलिंग हेच चिन्मयलिंग असून ते शांकरलिंग विष्णू आदी सर्व देवांचे व विश्वाचे मूळ कारण होय. त्या लिंगाचे ज्ञान केवळ गुरूकडूनच प्राप्त केले जाऊ शकते. म्हणून अगतिक होऊन श्रीगुरूला शरण जावे व शिवलिंगाचे ज्ञान संपादन करावे.॥२६॥

**परं पवित्रममलं लिङ्गं ब्रह्म सनातनम्।**
**शिवाभिधानं चिन्मात्रं सदानन्दं निरङ्कुशम्।।२७।।**
**कारणं सर्वलोकानां वेदानामपि कारणम्।**
**पूरणं सर्वतत्त्वस्य तारणं जन्मवारिधेः।।२८।।**
**ज्योतिर्मयमनिर्देश्यं योगिनामात्मनि स्थितम्।**
**कथं विज्ञायते लोके महागुरुदयां विना।।२९।।**

**अन्वयार्थ** : परं = श्रेष्ठ, पवित्रं = पवित्र, अमलं = निर्मल, सनातनं = सनातन, शिवाभिधानं = शिव नावाचे, चिन्मात्रं = चिद्रूप, सदानन्दं = नित्यानंद-स्वरूप, निरङ्कुशं = स्वतंत्र, सर्वलोकानां = सर्व लोकांचे, कारणं = कारण, वेदानामपि = वेदांचेही, कारणं = कारण, सर्वतत्त्वस्य = सर्व तत्त्वांनी, पूरणं = परिपूर्ण, जन्मवारिधेः = भवसागराचे, तारणं = तारक, ज्योतिर्मयं = ज्योतिस्वरूप, अनिर्देश्य = प्रमाणातीत, योगिनां = योग्यांच्या, आत्मनि = हृदयात, स्थितं = राहाणारे, लिङ्गं = लिंगरूपी, ब्रह्म = परब्रह्म, लोके = ह्या जगात, महागुरुदयां विना = महागुरूच्या कृपेशिवाय, कथं = कसे, विज्ञायते = जाणले जाईल?

**भावार्थ** : शिवलिंग हे श्रेष्ठ दैवत असून ते परमपवित्र आहे. त्रिमलांपासून मुक्त असून ब्रह्मस्वरूप आहे. ते सनातन, चैतन्यस्वरूप असून त्यालाच शिव म्हणतात. ते चिन्मात्र, आनंदस्वरूप, निरंकुश असून त्रैलोक्याचे व वेदांचे मूळ कारण आहे. ते सर्व तत्त्वांचे पूरक, संसारसागरातून तारणारे,

तेज:पुंज, प्रमाणातीत असून योग्यांच्या हृदयात वास करणारे आहे. असे हे परब्रह्मलिंग सद्‌गुरुकृपेशिवाय कोण जाणू शकेल?॥२७-२९॥

**ब्रह्मणा विष्णुना पूर्वं यल्लिङ्गं ज्योतिरात्मकम्।**
**अपरिच्छेद्यमभवत् केन वा परिचोद्यते।।३०।।**

**अन्वयार्थ** : ज्योतिरात्मकं = ज्योतिस्वरूप, यल्लिङ्गं = जे लिंग, पूर्वं = पूर्वी, ब्रह्मणा = ब्रह्मदेवाकडून, विष्णुना = विष्णूकडून, अपरिच्छेद्यं = जाणणे अशक्य, अभवत् = झाले, तरी ते, केन वा = कोणाकडून, परिचोद्यते = जाणले जाईल.

**भावार्थ** : पूर्वी वराहरूपी विष्णू भूमीत शिरला आणि हंसारूढ ब्रह्मा आकाशात उडाला तरीही त्यांना भूमी व आकाशव्यापी ज्योतिर्लिंगाचे दर्शन घडले नाही, मग ते सामान्य जनांस कसे होईल? अर्थात् होणार नाही.॥३०॥

**बहुनात्र किमुक्तेन लिङ्गं ब्रह्म सनातनम्।**
**योगिनो यत्र लीयन्ते मुक्तपाशनिबन्धनाः।।३१।।**

**अन्वयार्थ** : मुक्तपाशनिबन्धनाः = अविद्यादी पाशांपासून मुक्त झालेले, योगिनः = योगी लोक, यत्र = ज्या लिंगात, लीयन्ते = विलीन होतात, अशा सनातनं = सनातन, ब्रह्म = ब्रह्मस्वरूप, लिङ्गं = लिंगाविषयी, अत्र = येथे, बहुना = अधिक, उक्तेन = सांगण्याचे, किम् = काय प्रयोजन?

**भावार्थ** : अधिक काय सांगावे? विश्वाच्या उत्पत्ति-स्थिति-लयाला कारण असे अनादी, सनातन लिंग परब्रह्मस्वरूप असून सनक, सनंदन वगैरे योगीश्वर अविद्या वगैरे पंचक्लेशांपासून मुक्त होऊन त्या लिंगातच लीन होतात.॥३१॥

**पीठिका परमा शक्तिर्लिङ्गं साक्षात्परः शिवः।**
**शिवशक्तिसमायोगं विश्वं लिङ्गं तदुच्यते।।३२।।**

**अन्वयार्थ** : पीठिका = शाळुंका, परमा शक्तिः = सर्वोत्कृष्ट अशी क्रियाशक्ती आहे, साक्षात् = साक्षात्, परः शिवः = चिद्रूप परमेश्वर, लिङ्गं = पिंडी होय, शिवशक्तिसमायोगं = शिवशक्त्यात्मक, विश्वं = विश्व, तत् = ते, लिङ्गं = लिंग, उच्यते = म्हटले जाते.



**भावार्थ** : सर्वोत्कृष्ट क्रियाशक्ती ही पीठिका असून साक्षात् चिद्रूप शिव हे लिंग होय. शिवशक्तीचा संयोग हेच विश्व आहे. म्हणजेच शिवलिंग हे परब्रह्म, शक्ती ही शाळुंका आणि विश्व हे शिवशक्तिसंयोगरूप होय.॥३२॥

**ब्रह्मादयः सुराः सर्वे मुनयः शौनकादयः।**
**शिवलिङ्गार्चनादेव स्वं स्वं पदमवाप्नुयुः।।३३।।**

**अन्वयार्थ** : ब्रह्मादयः = ब्रह्मादी, सुराः = देव, आणि, शौनकादयः = शौनकादि, सर्वे = सर्व, मुनयः = मुनींनी, शिवलिङ्गार्चनादेव = शिवलिंगाचे अर्चन केल्यामुळेच, स्वं स्वं = आपापले, पदं = स्थान, आप्नुयुः = प्राप्त केले.

**भावार्थ** : ब्रह्मादी देव आणि शौनकादी ऋषींनीही शिवलिंगपूजन केल्यामुळे त्यांनाही आपापला अधिकार प्राप्त झाला.॥३३॥

**विश्वाधिपत्वमीशस्य लिङ्गमूर्तेः स्वभावजम्।**
**अनन्यदेवसादृश्यं श्रुतिराह सनातनी।।३४।।**

**अन्वयार्थ** : लिङ्गमूर्तेः = लिंगस्वरूपी, ईशस्य = शिवाचे, अनन्यदेवसादृश्यं = अन्य कोणत्याही देवाला नसलेले, विश्वाधिपत्वं = विश्वाचे अधिपतित्व, स्वभावजं = स्वाभाविक आहे असे, सनातनी = सनातन, श्रुतिः = श्रुतीने, आह = सांगितले आहे.

**भावार्थ** : लिंगस्वरूपी शंकराचे विश्वाचे स्वामित्व स्वाभाविक आहे. शिवाची दुसऱ्या देवाशी तुलना करता येत नाही. कारण त्याचे चराचर प्रपंचाचे नियामकत्व स्वत:सिद्ध आहे, असे श्रुतीत म्हटले आहे.॥३४॥

### जङ्गममाहात्म्यस्थल - (२८)

**गुरुशिष्यसमारूढलिङ्गमाहात्म्यसम्पदः ।**
**सर्वं चिद्रूपविज्ञानाज्जङ्गमाधिक्यमुच्यते।।३५।।**

**अन्वयार्थ** : गुरुशिष्यसमारूढ = गुरू आणि शिष्यामध्ये उत्पन्न झालेल्या, लिङ्गमाहात्म्यसम्पदः = लिंगाचे माहात्म्यरूपी संपत्तीपेक्षा, सर्वं = सर्व प्रपंच, चिद्रूपविज्ञानात् = चैतन्य स्वरूप आहे असे जाणणाऱ्या, जङ्गमाधिक्यं = जंगमाचे श्रेष्ठत्व, उच्यते = सांगितले जाते.

**भावार्थ** : इष्टलिंग, प्राणलिंग व भावलिंग यांच्याविषयीची तादात्म्य भावना गुरूपदेशाने शिष्याच्या मनात वृद्धिंगत होऊन लिंगमाहात्म्य दृढ होते; परंतु या लिंगमाहात्म्याच्या संपत्तीपेक्षा समस्त विश्व शिवशक्तिमय आहे असे जाणणाऱ्या जंगमाची योग्यता अधिक आहे.॥३५॥

**जानन्त्यतिशयाद् ये तु शिवं विश्वप्रकाशकम्।**
**स्वस्वरूपतया ते तु जङ्गमा इति कीर्तिताः।।३६।।**

**अन्वयार्थ** : विश्वप्रकाशकं = विश्वाला प्रकाशित करणाऱ्या, शिवं = शिवाला, ये = जे, अतिशयात् = अतिशयाने, स्वस्वरूपतया = आपल्या आत्मरूपाने, जानन्ति = जाणतात, ते तु = तेच, जङ्गमा इति = जंगम म्हणून, कीर्तिताः = म्हटले जातात.

**भावार्थ** : जगाला प्रकाशित करणाऱ्या, शिवाला जो आपले आत्मस्वरूप मानतो, अर्थात् ज्याला शिवजीवैक्याचे ज्ञान झाले आहे तो जंगम होय.॥३६॥

**ये पश्यन्ति जगज्जालं चिद्रूपं शिवयोगतः।**
**निर्धूतमलसंस्पर्शास्ते स्मृताः शिवयोगिनः।।३७।।**

**अन्वयार्थ** : ये = जे, शिवयोगतः = आपल्या शिवयोगसामर्थ्याने, जगज्जालं = संपूर्ण विश्वाला, चिद्रूपं = चिद्रूपाने, पश्यन्ति = पाहातात, निर्धूत-मलसंस्पर्शा = आणवादी मलत्रय नाहीसे झालेले, ते = ते, शिवयोगिनः = शिवयोगी, म्हणून, स्मृताः = समजले जातात.

**भावार्थ** : तादात्म्यसंबंधाने जग परशिवाशी संबंधित असते, आणि विश्व हे चित्क्रियात्मक लिंगरूप आहे, असे जे आपल्या शिवयोगसामर्थ्याने जाणतात तेच आणवादी मलांपासून मुक्त झालेले शिवयोगी जंगम आहेत.॥३७॥

**घोरसंसारतिमिरपरिध्वंसनकारणम् ।**
**येषामस्ति शिवज्ञानं ते मताः शिवयोगिनः।।३८।।**

**अन्वयार्थ** : घोर = भयानक, संसारतिमिर = संसाररूपी अंध:करणाचे, परिध्वंसनकारणम् = निवारण करणारे, शिवज्ञानं = शिवज्ञान, येषां = ज्यांना, अस्ति = आहे, ते = ते, शिवयोगिनः = शिवयोगी म्हणून, मताः = मानले जातात.



**भावार्थ** : संसाररूपी घोर अंध:काराचा नाश करणारे शिवज्ञान ज्यांच्याजवळ आहे, त्यांना शिवयोगी म्हणतात.॥३८॥

**जितकामा जितक्रोधा मोहग्रन्थिविभेदिनः।**
**समलोष्टाश्मकनकाः साधवः शिवयोगिनः।।३९।।**
**समौ शत्रौ च मित्रे च साक्षात्कृतशिवात्मकाः।**
**निस्पृहा निरहङ्कारा वर्तन्ते शिवयोगिनः।।४०।।**

**अन्वयार्थ** : जितकामाः = कामाला जिंकलेले, जितक्रोधाः = क्रोधाला जिंकलेले, मोहग्रन्थिविभेदिनः = मोहरूपी ग्रंथीचे भेदन करणारे, समलोष्टाश्म-कनकाः = माती, दगड आणि सोने यांना समान लेखणारे, असे जे, साधवः = सज्जन आहेत, ते शिवयोगिनः = शिवयोगी होत, साक्षात्कृतशिवात्मकाः = शिवसाक्षात्कार झालेले, शत्रौ = शत्रू, च = आणि, मित्रे = मित्रांमध्ये, समाः = समान बुद्धी ठेवणारे, शिवयोगिनः = शिवयोगी लोक, नि:स्पृहाः = स्पृहारहित, च = आणि, निरहङ्काराः = अहंकारशून्य असे, वर्तन्ते = असतात.

**भावार्थ** : ज्यांनी काम जिंकला, क्रोध जिंकला, मोहरूपी ग्रंथीचा भेद केला, माती व सोने यांकडे जे समदृष्टीने पाहातात अशा सज्जनांनाच शिवयोगी म्हणावे. शत्रू व मित्र त्यांना समान वाटतात, त्यांना शिवस्वरूपाचा साक्षात्कार झालेला असतो, ते नि:स्पृह व अहंकारशून्य वृत्तीने सर्वांशी वर्तन करतात.॥३९-४०॥

**दुर्लभं हि शिवज्ञानं दुर्लभं शिवचिन्तनम्।**
**येषामेतद्द्वयं चास्ति ते हि साक्षाच्छिवात्मकाः।।४१।।**

**अन्वयार्थ** : शिवज्ञानं = शिवाधिक्यज्ञान, दुर्लभं = दुर्लभ आहे, शिव-चिन्तनं = शिवाचे आत्मरूपाने चिंतन, हि = निश्चयाने, दुर्लभं = दुर्लभ होय, एतद्द्वयं = हे दोन्ही, येषां = ज्यांना, अस्ति = आहे, ते = ते, हि = निश्चयाने, साक्षात् = प्रत्यक्ष, शिवात्मकाः = शिवस्वरूप होत.

**भावार्थ** : शिवज्ञान अत्यंत दुर्लभ असून सदोदित शिवचिंतन करणे हेही कठीण आहे. या दोन्ही गोष्टी ज्यांना साधल्या आहेत असे शिवयोगी प्रत्यक्ष शिवच होत.॥४१॥

**पादाग्ररेणवो यत्र पतन्ति शिवयोगिनाम्।**
**तदेव सदनं पुण्यं पावनं गृहमेधिनाम्।।४२।।**
**सर्वसिद्धिकरं पुंसां दर्शनं शिवयोगिनाम्।**
**स्पर्शनं पापशमनं पूजनं मुक्तिसाधनम्।।४३।।**

**अन्वयार्थ** : यत्र = जेथे, शिवयोगिनां = शिवयोग्यांचे, पादाग्ररेणवः = पायधूळ, पतन्ति = पडते, गृहमेधिनाम् = गृहस्थांचे, तदेव = तेच, सदनं = घर, पुण्यं = पुण्यक्षेत्र होते, पावनं = दुसऱ्यांनाही पावन करणारे होते, पुंसां = जीवांना, शिवयोगिनाम् = शिवयोग्यांचे, दर्शनं = दर्शन घडणे, सर्वसिद्धिकरं = सर्व सिद्धी देणारे होते, स्पर्शनं = स्पर्शन, पापशमनं = पाप दूर करणारे होते, आणि, पूजनं = त्यांची पूजा करणे, मुक्तिसाधनम् = मुक्तीचे साधन होते.

**भावार्थ** : शिवयोग्याच्या पायाची धूळ जेथे पडते ते गृहस्थाचे घर स्वतः पवित्र आणि दुसऱ्याला पवित्र करणारे होय. शिवयोग्याच्या दर्शनाने सर्व सिद्धी प्राप्त होतात. त्याच्या स्पर्शाने पातकांचा नाश होतो आणि त्याचे पूजन केल्यामुळे मोक्ष प्राप्त होतो.॥४२-४३॥

**महतां शिवतात्पर्यवेदिनामनुमोदिनाम्।**
**किं वा फलं न सिद्ध्येत सम्पर्काच्छिवयोगिनाम्।।४४।।**

**अन्वयार्थ** : शिवतात्पर्यवेदिनां = शिवरहस्याचे तात्पर्य जाणणारे, अनुमोदिनां = शिवसुखात रमणारे, महतां = महान, शिवयोगिनाम् = शिवयोग्यांच्या, सम्पर्कात् = संबंधाने, किं वा फलं = कोणते फळ, न सिद्ध्येत् = सिद्ध होत नाही.

**भावार्थ** : अशा श्रेष्ठ, शिवरहस्य जाणणाऱ्या, शिवाच्या सुखात सुख मानणाऱ्या सत्पुरुष अशा शिवयोगी जंगमाच्या सान्निध्यात भक्तिभावनेने राहिल्यास कोणते फळ मिळणार नाही? अर्थात् सर्व प्रकारची फलप्राप्ती होईल.॥४४॥



**भक्तमाहात्म्यस्थल - (२९)**

**गुरोर्लिङ्गस्य माहात्म्यकथनाच्छिवयोगिनाम्।**
**सिद्धं भक्तस्य माहात्म्यं तथाप्येष प्रशस्यते।।४५।।**

**अन्वयार्थ** : गुरोः = गुरूचे, लिङ्गस्य = लिंगाचे, शिवयोगिनाम् = शिवयोग्याचे, माहात्म्यकथनात् = माहात्म्य सांगितल्याने, भक्ताचे, माहात्म्यं = माहात्म्य, सिद्धं = सिद्धच आहे, तथापि = तरी सुद्धा, एषः = हे (भक्तमाहात्म्य) प्रशस्यते = प्रशंसिले जाते.

**भावार्थ** : गुरू, लिंग व जंगम यांचे माहात्म्य जाणून भक्ताकडून भक्ती केली जाते. त्यामुळे भक्ताचेही माहात्म्य सिद्ध होते. शिवभक्ताची प्रशंसा शास्त्राने सुद्धा केली आहे.॥४५॥

**ये भजन्ति महादेवं परमात्मानमव्ययम्।**
**कर्मणा मनसा वाचा ते भक्ता इति कीर्तिताः।।४६।।**

**अन्वयार्थ** : अव्ययं = अक्षर, परमात्मानम् = लिंगरूपी, महादेवं = शिवाची, ये = जे, कर्मणा = शिवार्चनरूपी सेवा करतात, ते = ते, भक्ता इति = भक्त असे, कीर्तिताः = म्हटले जातात.

**भावार्थ** : जे हातांनी पूजन करून कायिक क्रियेने, शिवलिंगाचे ध्यान करून मानसक्रियेने आणि शिवस्तुती करून वाचिक क्रियेने, असे कायावाचामनसा त्रिकरणरूपाने लिंगरूपी शिवाचे भजन करतात, त्यांना शिवभक्त म्हणतात.॥४६॥

**दुर्लभा हि शिवे भक्तिः संसारभयतारिणी।**
**सा यत्र वर्तते साक्षात् स भक्तः परिगीयते।।४७।।**

**अन्वयार्थ** : संसारभयतारिणी = संसारभयापासून मुक्त करणारी, शिवे = शिवाची, भक्तिः = भक्ती, दुर्लभा हि = दुर्मिळ आहे, सा = ती भक्ती, यत्र = ज्याच्या ठिकाणी, वर्तते = असते, सः = तो, साक्षात् = साक्षात, भक्तः = भक्त म्हणून, परिगीयते = वर्णिला जातो.

**भावार्थ** : संसाराचा नाश करणारी शिवभक्ती खरोखर दुर्लभ आहे. ती ज्याच्या मनात असते, मग तो कोणीही असो, शिवभक्तच होय. शिवभक्तांमध्ये जातिभेद मानू नये.॥४७॥

**किं वेदैः किं ततः शास्त्रैः किं यज्ञैः किं तपोव्रतैः।**
**नास्ति चेच्छाङ्करी भक्तिर्देहिनां जन्मरोगिणाम्।।४८।।**

**अन्वयार्थ** : जन्मरोगिणाम् = जन्मरोगाने पीडित झालेल्या, देहिनां = जीवांना, शाङ्करी भक्ति: = शिवभक्ती, नास्ति चेत् = नसली तर, किं वेदैः = वेदाध्ययनाचे काय प्रयोजन?, ततः = तसेच, शास्त्रैः = शास्त्राभ्यासाचे काय प्रयोजन? यज्ञैः किं = यज्ञ करण्याचे काय प्रयोजन?, तपोव्रतैः किं = तप आणि व्रतांच्या आचरणाचे काय प्रयोजन?

**भावार्थ** : वेदाध्ययन करून उपयोग काय? शास्त्रे शिकून अथवा यज्ञ करून काय करावयाचे? तपश्चर्या व व्रते करून तरी काय करावयाचे आहे? जन्ममरणरूपी रोगाने ग्रस्त झालेल्या मनुष्याला शिवभक्ती घडत नसेल तर वरील गोष्टींचा काही उपयोग नाही.।।४८।।

**शिवभक्तिविहीनस्य सुकृतं चापि निष्फलम्।**
**विपरीतफलं च स्याद् दक्षस्यापि महाध्वरे।।४९।।**

**अन्वयार्थ** : शिवभक्तिविहीनस्य = शिवभक्ती नसलेल्यांचे, सुकृतं चापि = पुण्यसुद्धा, निष्फलं = निष्फल होते, महाध्वरे = महायज्ञात, दक्षस्यापि = दक्षप्रजापतीला सुद्धा, विपरीतफलं = विपरीत फल, स्यात् = प्राप्त झाले.

**भावार्थ** : शिवभक्ती न करणाऱ्या मनुष्याने काही सत्कर्म केले तरी त्याचा उपयोग नाही. यज्ञ केला तरी दक्षप्रजापतीला शिवभक्ती न केल्यामुळे विपरीत परिणाम भोगावा लागला.।।४९।।

**अत्यन्तपापकर्मापि शिवभक्त्या विशुद्ध्यति।**
**चण्डो यथा पुरा भक्त्या पितृहाऽपि शिवोऽभवत्।।५०।।**

**अन्वयार्थ** : अत्यन्त = अत्यधिक, पापकर्माऽपि = पापीसुद्धा, शिवभक्त्या = शिवभक्तीने, विशुद्ध्यति = परिशुद्ध होतो, पुरा = पूर्वकाळी, पितृहा = पितृहत्या करून सुद्धा, यथा = जसा, चण्डः = चंड नावाचा पापी, भक्त्या = शिवभक्तीने, शिवोऽभवत् = शिवस्वरूप झाला.



**भावार्थ** : मनुष्य अत्यंत पातकी असला तरी शिवभक्ती करताच तो पातकातून मुक्त होतो. पूर्वी चंड नामक पातक्याने पितृहत्या केली तरी शिवभक्ती केल्याने तो शिवसायुज्य पावला, शिवस्वरूप झाला.।।५०।।

**सुकृतं दुष्कृतं वापि शिवभक्तस्य नास्ति हि।**
**शिवभक्तिविहीनानां कर्मपाशनिबन्धनम्।।५१।।**

**अन्वयार्थ** : शिवभक्तस्य = शिवभक्ताला, सुकृतं दुष्कृतं चापि = पुण्य असो की पाप असो, नास्ति हि = नसतेच, शिवभक्तिविहीनानां = शिवभक्ती नसलेल्यांना, कर्मपाशनिबन्धनम् = कर्मपाशाने बंधन असते.

**भावार्थ** : शिवभक्ती करणाऱ्याला पुण्य नाही, पाप नाही. शिवभक्ती न करणाऱ्याला मात्र कर्मपाशाचे बंधन असते व त्याच्या कर्मानुसार त्याला सुखदु:खे भोगावी लागतात.।।१।।

**शिवाश्रितानां जन्तूनां कर्मणा नास्ति सङ्गमः।**
**वाजिनां दिननाथस्य कथं तिमिरजं भयम्।।५२।।**

**अन्वयार्थ** : शिवाश्रितानां = शिवाच्या आश्रयात असणाऱ्या, जन्तूनां = जीवांना, कर्मणा = कर्माचा, सङ्गमः = संबंध, नास्ति = नसतो, दिननाथस्य = सूर्याच्या, वाजिनां = घोड्यांना, तिमिरजं = अंधाराचे, भयम् = भय, कथं = कसे असेल?

**भावार्थ** : सूर्यरथाला जुंपलेल्या घोड्यांना जसे अंध:काराचे भय नसते, तसे शिवभक्ताला पुण्य-पाप-कर्मांचा संबंध नसतो.।।५२।।

**निरोद्धुं न क्षमं कर्म शिवभक्तान् विशृङ्खलान्।**
**कथं मत्तगजान् रुन्धेच्छृङ्खला बिसतन्तुजा।।५३।।**

**अन्वयार्थ** : विशृङ्खलान् = त्रिमलबंधनरहित, शिवभक्तान् = शिवभक्तांना, कर्म = पुण्यपापरूपी कर्म, निरोद्धुं = बांधण्यास, न क्षमं = समर्थ होत नाही, बिसतन्तुजा = कमलतंतूची, शृङ्खला = साखळी, मत्तगजान् = मदोन्मत्त हत्तींना, कथं = कशी, रुन्धेत् = बांधून ठेवील?

**भावार्थ** : एखाद्या उन्मत्त हत्तीला जसे कमलाच्या तंतूपासून केलेल्या साखळीने बांधता येत नाही, तसेच शिवदीक्षेमुळे जो आणवादी त्रिमलांपासून मुक्त झाला, अशा शिवभक्ताला बांधण्याची शक्ती कर्मामध्ये नसते.।।५३।।

**ब्राह्मणः क्षत्रियो वापि वैश्यो वा शूद्र एव वा।**
**अन्त्यजो वा शिवे भक्तः शिववन्मान्य एव सः।।५४।।**

**अन्वयार्थ** : ब्राह्मणः = ब्राह्मण असो, क्षत्रियो वापि = क्षत्रिय असो, वा = अथवा, वैश्यः = वैश्य असो, शूद्र एव वा = शूद्रही असो, वा = अथवा, अन्त्यजः = अंत्यज असो, शिवे भक्तः = शिवभक्त असेल तर, सः = तो, शिववत् = शिवासारखा, मान्य एव = मान्य होतो.

**भावार्थ** : ब्राह्मण असो, क्षत्रिय असो, वैश्य असो, शूद्र असो अथवा अंत्यज असो, जो कोणी शिवाची भक्ती करतो, तो शिवासारखाच मान्य आहे.।।५४।।

**शिवभक्तिसमावेशे क्व जातिपरिकल्पना।**
**इन्धनेष्वग्निदग्धेषु को वा भेदः प्रकीर्त्यते।।५५।।**

**अन्वयार्थ** : शिवभक्तिसमावेशे = शिवभक्ती उत्पन्न झाल्यावर, जातिपरि-कल्पना = जातीची भावना, क्व = कसली?, अग्निदग्धेषु = अग्नीने जळालेल्या, इन्धनेषु = लाकडात, को वा भेदः = कोणता भेद, प्रकीर्त्यते = सांगतात येईल?

**भावार्थ** : ज्यांच्या ठिकाणी परिपूर्ण भक्ती आहे त्यांच्या जातीचा विचार करण्याचे कारण नाही. लाकडे एकदा अग्नीत जळून विस्तव झाल्यावर लाकडांचे वेगळेपण कसे सांगता येईल? अर्थात् सांगताच येत नाही.।।५५।।

**शुद्धा नियमसंयुक्ताः शिवार्पितफलागमाः।**
**अर्चयन्ति शिवं लोके विज्ञेयास्ते गणेश्वराः।।५६।।**

**अन्वयार्थ** : शुद्धाः = दीक्षेने परिशुद्ध झालेले, नियमसंयुक्ताः = शिवव्रताचे पालन करणारे लोक, शिवार्पितफलागमाः = पूजाफल शिवार्पित करून, लोके = ह्या जगात, शिवं = शिवाचे, अर्चयन्ति = अर्चन करतात, ते = ते, गणेश्वराः = गणेश्वर म्हणून, विज्ञेयाः = जाणावेत.



**भावार्थ** : जे शिवदीक्षेमुळे पवित्र व शिवव्रतांमुळे संपन्न होऊन पापपुण्याची व कर्मफलाची आशा न बाळगता शिवार्पण बुद्धीने शिवपूजन हरतात तेच गणेश्वर आहेत असे समजावे.।।५६।।

### शरणमाहात्म्यस्थल - (३०)

**गुरुलिङ्गादिमाहात्म्यबोधान्वेषणसङ्गतः।**
**सर्वात्मना शिवापत्तिः शरणस्थानमुच्यते।।५७।।**

**अन्वयार्थ** : गुरुलिङ्गादि = गुरुलिंगजंगमादींचे, माहात्म्य = माहात्म्यांचे, बोधान्वेषणसङ्गतः = ज्ञानाच्या अन्वेषणासह, सर्वात्मना = सर्व प्रकाराने, शिवापत्तिः = शिव एकटाच रक्षक होय असे समजून त्याला शरण जाण्याची भावना, हीच शरणस्थलं = शरणस्थल म्हणून, उच्यते = म्हटली जाते.

**भावार्थ** : गुरू, लिंग, शिवयोगी, शिवभक्त यांच्या माहात्म्यज्ञानानंतर सर्वप्रकाराने शिवच रक्षक आहे असे जाणून त्याला अनन्यभावाने शरण जाणारास शरण म्हणतात.।।५७।।

**ब्रह्मादिविबुधान् सर्वान् मुक्त्वा प्राकृतवैभवान्।**
**प्रपद्यते शिवं यत्तु शरणं तदुदाहृतम्।।५८।।**

**अन्वयार्थ** : प्राकृतभैरवान् = प्राकृतिक संपत्तीने युक्त, सर्वान् = सर्व, ब्रह्मादिविबुधान् = ब्रह्मादी देवांना, मुक्त्वा = त्यागून, यत् = ज्या स्थलात, शिवं = शिवाला, प्रपद्यते = शरण जातात्, तत् = ते, शरणं = शरणस्थल म्हणून, उदाहृतम् = सांगितले जाते.

**भावार्थ** : शिव एकच ध्यान करण्यास योग्य आहे असे श्रुतिवचन आहे. ब्रह्मा, विष्णू आदी देवांचे ऐश्वर्य नाशिवंत असून त्या देवांविषयी उदासीन राहून अनन्यभावाने शिवाचाच आश्रय करणे यास शरणस्थल म्हणावे.।।५८।।

**शरण्यः सर्वभूतानां शङ्करः शशिशेखरः।**
**सर्वात्मना प्रपन्नस्तं शरणागत उच्यते।।५९।।**

**अन्वयार्थ** : शशिशेखरः = चंद्रमौली असा, शङ्करः = शिव, सर्वभूतानां = सर्व प्राण्यांना, शरण्यः = रक्षणसमर्थ आहे, या भावनेने, सर्वात्मना = संपूर्णपणे, तं = त्याला, प्रपन्नः = शरण गेलेला, शरणागतः = शरणागत म्हणून, उच्यते = म्हटले जाते.

**भावार्थ** : चंद्र मस्तकावर धारण करणारा शंकर हा सर्व प्राणिमात्रांचे रक्षण करण्यास समर्थ आहे. त्या शंकराला जो अनन्यभावाने शरण जातो त्यास शरणागत म्हटले जाते.॥५९॥

**विमुक्तभोगलालस्यो देवतान्तरनिस्पृहः।**
**शिवमभ्यर्थयन् मोक्षं शरणार्थीति गीयते।।६०।।**

**अन्वयार्थ** : विमुक्तभोगलालस्यः = भोगलालसेपासून मुक्त झालेला, देवतान्तरनिःस्पृहः = अन्य देवांवर भक्ती न ठेवणारा, शिवं = शिवाला, मोक्षं = मुक्ती, अभ्यर्थयन् = प्रार्थना करणारा, शरणार्थीति = शरणार्थी म्हणून, गीयते = म्हटला जातो.

**भावार्थ** : भोग-लालसेपासून मुक्त होऊन ब्रह्मा, विष्णू आदी पदव्यांविषयी निःस्पृह राहून जो शिवालाच मोक्ष मानतो त्याला शरणार्थी असे म्हणतात.॥६०॥

**ये प्रपन्ना महादेवं मनोवाक्कायकर्मभिः।**
**तेषां तु कर्मजातेन किं वा देवादितर्पणैः।।६१।।**

**अन्वयार्थ** : ये = जे, महादेवं = महादेवाला, मनोवाक्कायकर्मभिः = ध्यान स्तुति-पूजादी कर्मांनी, प्रपन्नाः = रक्षणासाठी शरण गेलेले, अशा तेषां = त्यांच्या, कर्मजातेन = यज्ञयागादी कर्मांचे, वा = अथवा, देवादितर्पणैः = देवादींना दिले जाणाऱ्या तर्पणाचे, किम् = काय प्रयोजन?

**भावार्थ** : जे शिवभक्त मनाने, वाणीने, देहाने व कर्मांनी महादेवाला शरण गेलेले असतात त्यांना यज्ञयागादी कर्मसमूहांचे आणि अन्य देवादिकांना तर्पण करण्योच प्रयोजनच काय? अर्थात् नाही.॥६१॥

**सर्वेषामपि यज्ञानां क्षयः स्वर्गः फलायते।**
**अक्षयं फलमाप्नोति प्रपन्नः परमेश्वरम्।।६२।।**



**अन्वयार्थ** : सर्वेषां = सर्व, यज्ञानां = यज्ञांचे, क्षयः = क्षय होणारा, स्वर्गः = स्वर्ग, फलायते = फळ म्हणून मिळतो, परमेश्वरं = परमेश्वराला, प्रपन्नः = शरण गेलेला, अक्षयं = अक्षय, फलम् = फळ, आप्नोति = प्राप्त करतो.

**भावार्थ** : सर्व यज्ञांचे फळ स्वर्गप्राप्ती हेच आहे. परंतु स्वर्गदेखील नाशिवंतच आहे. शंकराला शरण जाणाऱ्याला मात्र असे फळ मिळते की, जे नाश पावतच नाही. यासाठी शिवाला शरण जाणाऱ्यास अन्य सत्कर्माची गरज नसते.॥६२॥

**प्रपन्नपारिजातस्य भवस्य परमात्मनः।**
**प्रपत्त्या किं न जायेत पापिनामपि देहिनाम्।।६३।।**

**अन्वयार्थ** : प्रपन्नपारिजातस्य = शरणागतांना कल्पवृक्षासारखा असणाऱ्या, परमात्मनः = महान आत्मा अशा, भवस्य = शिवाला, प्रपत्त्या = शरण गेल्याने, पापिनां = पापी, देहिनामपि = जीवांनाही, किं न जायेत = काय प्राप्त होणार नाही?

**भावार्थ** : शंकर हा परमात्मा असून शरण आलेल्या भक्ताचे कल्पवृक्षा-प्रमाणे सर्व मनोरथ पूर्ण करणारा आहे. त्याला शरण जाणारा मनुष्य जरी महापातकी असला तरी तो शिवभक्ती करू लागल्यावर त्याला काय प्राप्त होणार नाही? अर्थात् त्याचे पाप नष्ट होऊन सर्व मनोरथ पूर्ण होतील.॥६३॥

**प्रपन्नानां महादेवं परिपक्वान्तरात्मनाम्।**
**जन्मैव जन्म नान्येषां वृथा जननसङ्गिनाम्।।६४।।**

**अन्वयार्थ** : महादेवं = शिवाला, प्रपन्नानां = शरण गेलेले, म्हणून, परिपक्वान्तरात्मनाम् = परिशुद्ध अंतःकरणाच्या लोकांचा, जन्मैव = जन्मच, जन्म = जन्म होय, वृथा = व्यर्थपणे, जननसङ्गिनाम् = जन्म घेणाऱ्या, अन्येषां = अन्य लोकांचा, न = जन्म नव्हे.

**भावार्थ** : ज्यांचे मन शिवभक्तीने परिपक्व व सुप्रसन्न झाले आहे, त्यांच्या जन्मालाच जन्म म्हणावे, इतर लोक कवेळ जन्माला येतात आणि मरतात. त्यांच्या जन्माचा काही एक उपयोग नाही.॥६४॥

**दुर्लभं मानुषं प्राप्य जननं ज्ञानसाधनम्।**
**ये न जानन्ति देवेशं तेषामात्मा निरर्थकः।।६५।।**

**अन्वयार्थ** : दुर्लभं = दुर्मिळ अशा, ज्ञानसाधनं = आत्मज्ञानाला साधनीभूत, मानुषं = मनुष्याचा, जननं = जन्म, प्राप्य = प्राप्त करून, ये = जे, देवेशं = परशिवाला, न जानन्ति = जाणत नाहीत, तेषां = त्यांचा, आत्मा = जीवन, निरर्थकः = निरर्थक होय.

**भावार्थ** : दुर्लभ असा मानवजन्म मिळूनही आत्मज्ञान प्राप्त करून देणाऱ्या शिवाला जे जाणत नाहीत त्यांचा जन्म व्यर्थ आहे.॥६५॥

**तत्कुलं हि सदा शुद्धं सफलं तस्य जीवितम्।**
**यस्य चित्तं शिवे साक्षाद् विलीनमबहिर्मुखम्।।६६।।**

**अन्वयार्थ** : यस्य = ज्याचे, चित्तं = चित्त, साक्षात् = साक्षात, शिवे = शिवलिंगात, अबहिर्मुखम् = बहिर्मुख न होता, विलीनम् = विलीन झाले आहे, तस्य = त्याचे, जीवितं = जीवन, सफलं = सफल आहे, तत्कुलं = त्याचे कुल, सदा = नेहमी, शुद्धं हि = परिशुद्धच होय.

**भावार्थ** : ज्याचे मन अंतर्बाह्य साक्षात शिवलिंगातच लीन झालेले आहे, त्याचा वंश धन्य व शुद्ध असून त्याच्या जन्माचे सार्थक झाले असे समजावे.॥६६॥

### प्रसादमहात्म्यस्थल - (३१)

**गुरुलिङ्गादिमाहात्म्यविशेषानुभवस्थितिः।**
**यस्माच्छिवप्रसादात् स्यात्तदस्य महिमोच्यते।।६७।।**

**अन्वयार्थ** : गुरुलिङ्गादि = गुरुलिंग जंगमादी, माहात्म्य = माहात्म्याची, विशेषानुभवस्थितिः = विशेष अनुभवाची स्थिती, यस्मात् = ज्या, शिवप्रसादात् = शिवप्रसादामुळे, स्यात् = होते, तत् = त्यामुळे, अस्य = शिवप्रसादाचे, महिमा = महत्त्व, उच्यते = सांगितले जाते.

**भावार्थ** : गुरू, लिंग, जंगम, शिवभक्त, शिवशरण यांच्या माहात्म्याच्या विशेष अनुभवाची स्थिती शिवप्रसादाने प्राप्त होते. म्हणून त्या प्रसादाचे महत्त्व सांगतो.॥६७॥



**सदा लिङ्गैकनिष्ठानां गुरुपूजानुषङ्गिणाम्।**
**प्रपन्नानां विशुद्धानां प्रसीदति महेश्वरः।।६८।।**

**अन्वयार्थ** : सदा = नेहमी, लिङ्गैक्यनिष्ठानां = इष्टलिंगावर निष्ठा ठेवणाऱ्या, गुरुपूजानुषङ्गिणाम् = गुरुपूजेत तत्पर राहाणाऱ्या, प्रपन्नानां = शरणागत झालेल्या, विशुद्धानां = पवित्र अशा लोकांवर, महेश्वरः = शिव, प्रसीदति = प्रसन्न होतो.

**भावार्थ** : जे शिवलिंगावर निष्ठा ठेवतात, गुरुपूजेत तत्पर असतात, जे शरण येतात आणि ज्यांचे आचरण शुद्ध असते, अशा शिवभक्तांवर महेश्वर प्रसन्न होतो.॥६८॥

**प्रसादोऽपि महेशस्य दुर्लभः परिकीर्त्यते।**
**घोरसंसारसन्तापनिवृत्तिर्येन जायते।।६९।।**

**अन्वयार्थ** : येन = ज्याने, घोरसंसारसन्तापनिवृत्तिः = भयंकर सांसारिक तापत्रयाची निवृत्ती, जायते = होते, अशा, महेशस्य = शिवाचा, प्रसादोऽपि = प्रसादसुद्धा, दुर्लभः = दुर्मिळ म्हणून, परिकीर्त्यते = सांगितले जाते.

**भावार्थ** : ज्यामुळे भयंकर अशा संसारतापाची निवृत्ती होते, तो शिवप्रसाद शिवभक्ताशिवाय दुसऱ्याला अत्यंत दुर्लभ असतो, असे सांगितले जाते.॥६९॥

**यज्ञास्तपांसि मन्त्राणां जपश्चिन्ता प्रबोधनम्।**
**प्रसादार्थं महेशस्य कीर्तितानि न संशयः।।७०।।**

**अन्वयार्थ** : यज्ञाः = यज्ञ, तपांसि = तपश्चर्या, मन्त्राणां जपः = मंत्रांचा जप, चिन्ता = ध्यान, प्रबोधनं = शिवाधिक्य ज्ञान, हे सर्व महेशस्य = महेश्वराच्या, प्रसादार्थं = अनुग्रहासाठी, कीर्तितानि = सांगितले आहे, न संशयः = यात संशय नाही.

**भावार्थ** : शिवप्रसाद मिळविण्यासाठी यज्ञ करावे लागतात, तप करावे लागते यात संदेह नाही. म्हणजेच यज्ञ, जपतपादी सर्व शिवप्रसादासाठीच करावे लागतात.॥७०॥

**प्रसादमूला सर्वेषां भक्तिरव्यभिचारिणी।**
**शिवप्रसादहीनस्य भक्तिश्चापि न सिद्ध्यति।।७१।।**

**अन्वयार्थ** : सर्वेषां = सर्वांना, अव्यभिचारिणी = अनन्य, भक्तिः = भक्ती, प्रसादमूला = प्रसादमुळेच, होते, शिवप्रसादहीनस्य = शिवानुग्रहरहिताला, भक्तिश्चापि = भक्तीसुद्धा, न सिद्ध्यति = साध्य होत नाही.

**भावार्थ** : शिवाची अव्यभिचारी भक्ती घडण्याचे मूळ कारण शिवप्रसादच होय. शिवप्रसाद नसलेल्या मनुष्याकडून अशी भक्ती घडणार नाही.।।७१।।

**गर्भस्थो जायमानो वा जातो वा ब्राह्मणोऽथवा।**
**अन्त्यजो वापि मुच्येत प्रसादे सति शाङ्करे।।७२।।**

**अन्वयार्थ** : शाङ्करे = शिवाचा, प्रसादे सति = प्रसाद प्राप्त झाल्यावर, गर्भस्थः = गर्भात राहाणारा, जायमानः = जन्म घेत असलेला, वा = अथवा, जातः = जन्मलेला, वा = अथवा, ब्राह्मणः = ब्राह्मण, अथवा = अथवा, अन्त्यजो वापि = अंत्यजसुद्धा, मुच्यते = मुक्त होतो.

**भावार्थ** : शिवाचा प्रसाद झाल्यावर गर्भात राहाणारा असो, जन्माला येणारा असो, जन्मलेला असो, ब्राह्मण असो किंवा अंत्यज असो तो तत्काळ मुक्त होतो.।।७२।।

**ब्रह्माद्या विभुधाः सर्वे स्वस्वस्थाननिवासिनः।**
**नित्यसिद्धा भवन्त्येव प्रसादात् पारमेश्वरात्।।७३।।**

**अन्वयार्थ** : ब्रह्माद्याः = ब्रह्मादी, सर्वे = सर्व, विबुधाः = देवता, पारमेश्वरात् = परमेश्वराच्या, प्रसादात् = प्रसादाने, स्वस्वस्थाननिवासिनः = आपापल्या स्थानी निवास करणारे आणि, नित्यसिद्धाः = नित्य सिद्ध, भवन्त्येव = होतात.

**भावार्थ** : आपापल्या अधिकारावर राहाणारे ब्रह्मदेवादी देव शिवप्रसादानेच नित्यसिद्ध होतात, अर्थात् त्यांना सर्व सिद्धी अनुकूल होतात.।।७३।।



**प्रसादे शाम्भवे सिद्धे परमानन्दकारणे।**
**सर्वं शिवमयं विश्वं दृश्यते नात्र संशयः।।७४।।**

**अन्वयार्थ** : परमानन्दकारणे = परमानंदाला कारणीभूत, शाम्भवे = शिवाचा, प्रसादे = प्रसाद, सिद्धे = प्राप्त झाल्यावर, सर्वं विश्वं = संपूर्ण विश्व, शिवमयं = शिवस्वरूप, दृश्यते = दिसते, नात्र संशयः = यात संशय नाही.

**भावार्थ** : परमानंद देणारा शिवप्रसाद सिद्ध झाल्यावर सर्व त्रैलोक्य शिवस्वरूप दिसू लागते, यात संशय नाही.।।७४।।

**संसारचक्रनिर्वाहनिमित्तं कर्म केवलम्।**
**प्रसादेन विना शम्भोर्न कस्यापि निवर्तते।।७५।।**

**अन्वयार्थ** : संसारचक्रनिर्वाहनिमित्तं = संसारचक्र चालू राहाण्याला निमित्त, केवलं कर्म = केवळ कर्मच होय, शम्भोः = शिवाच्या, प्रसादेन विना = प्रसादा शिवाय, कस्यापि = कोणाचेहि (कर्म), न निवर्तते = निवारण होत नाही.

**भावार्थ** : संसारचक्राच्या फेऱ्यात पडायला कर्म कारणीभूत आहे. ते पाणिमात्रांचे कर्म शिवप्रसादाशिवाय दुसऱ्या कोणत्याही साधनाने दूर होत नाही. शिवप्रसादाने मात्र दूर होते.।।७५।।

**बहुनात्र किमुक्तेन नास्ति नास्ति जगत्त्रये।**
**समानमधिकं चापि प्रसादस्य महेशितुः।।७६।।**

**अन्वयार्थ** : अत्र = ह्या विषयी, बहुना = अधिक, उक्तेन = सांगण्याचे, किं = काय प्रयोजन? महेशितुः = शिवाच्या, प्रसादस्य = प्रसादाच्या, समानं = समान, च = आणि, अधिकं = अधिक, जगत्त्रये = त्रैलोक्यात, नास्ति नास्ति = काही नाही.

**भावार्थ** : फार काय सांगावे? शिवप्रसादासारखे अथवा त्यापेक्षा अधिक असे या त्रैलोक्यात काहीही नाही. सर्व जगात शिवप्रसाद श्रेष्ठ आहे.।।७६।।

**शिवप्रसादे सति योगभाजि**
**सर्वं शिवैकात्मतया विभाति।**

**स्वकर्ममुक्तः शिवभावितात्मा**
**स प्राणलिङ्गीति निगद्यतेऽसौ।।७७।।**

**अन्वयार्थ** : योगभाजि = शिवयोग प्राप्त करून देणारा, शिवप्रसादे सति = शिवप्रसाद प्राप्त झाल्यावर, सर्वं = सम्पूर्ण विश्व, शिवैकात्मतया = शिवरूपाने, विभाति = ज्याला दिसते, स्वकर्ममुक्तः = आपल्या कर्मपासून मुक्त झालेला, शिवभावितात्मा = जो आपल्या आत्म्याला शिवस्वरूप मानतो, असौ = अशा प्रसादीला, प्राणलिङ्गीति = प्राणलिंगी म्हणून, निगद्यते = सांगितले जाते.

**भावार्थ** : शिवप्रसाद झाल्यावर शिवयोगसमाधीत तल्लीन होणाऱ्या शिवयोग्याला सर्व त्रैलोक्य शिवस्वरूप दिसू लागते, शिवाचे अभेदभावनेने चिंतन करणाऱ्या व आपल्या कर्मापासून मुक्त होऊन शिवभावनेने युक्त अशा प्रसादीलाच प्राणलिंगी असे म्हणतात.।।७७।।

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ प्रसादिस्थले प्रसादिस्थलादिसप्तविधस्थलप्रसङ्गो नाम एकादशः परिच्छेदः।***

**अकरावा परिच्छेद समाप्त.**

❍❍❍

# बारावा परिच्छेद

### अंगस्थलांतर्गत
## प्राणलिङ्गीस्थल

**प्राणलिङ्गीस्थल - (३२)**

**अगस्त्य उवाच —**

**भक्तो माहेश्वरश्चेति प्रसादीति निबोधितः।**
**एक एव कथं चैव प्राणलिङ्गीति कथ्यते।।१।।**

**अन्वयार्थ** : एक एव = एकच, भक्तः = भक्त, माहेश्वरः = माहेश्वर, प्रसादी = प्रसादी, इति = अशा रीतीने, निबोधितः = उपदेशिलेला, एषः = हा, कथं = कशा प्रकारे, प्राणलिङ्गीति = प्राणलिंगी म्हणून, कथ्यते = सांगितला जातो?

**भावार्थ** : अगस्त्य म्हणतात, भक्तच माहेश्वर होतो, प्रसादी होतो हे सांगितलेले मला समजले, आता तोच भक्त प्राणलिंगी कसा होतो हे सांगावे.।।१।।

**श्रीरेणुक उवाच —**

**भक्तो माहेश्वरश्चैष प्रसादीति च कीर्तितः।**
**कर्मप्राधान्ययोगेन ज्ञानयोगोऽस्य कथ्यते।।२।।**

**अन्वयार्थ** : एषः = हा, कर्मप्राधान्ययोगेन = बाह्य पूजादी कर्मांच्या प्राधान्यामुळे, भक्तः = भक्त, माहेश्वरः = माहेश्वर, च = आणि, प्रसादीति = प्रसादी म्हणून, कीर्तितः = वर्णिलेला, अस्य = ह्याचा, ज्ञानयोगः = ज्ञानयोग, कथ्यते = सांगितला जातो.

**भावार्थ** : श्रीरेणुकाचार्य म्हणतात, भक्तच आपल्या शुद्ध-क्रिया-आचरणाने माहेश्वर व प्रसादी होतो हे मी सांगितले, आता प्राणलिंगीला ज्ञानयोग कसा प्राप्त होतो हे सांगतो.।।२।।

**लिङ्गं चिदात्मकं ब्रह्म तच्छक्तिः प्राणरूपिणी।**
**तद्रूपलिङ्गविज्ञानी प्राणलिङ्गीति कथ्यते।।३।।**

**अन्वयार्थ** : चिदात्मकं = चिद्रूप, ब्रह्म = ब्रह्मच, लिङ्गं = शिवलिंग होय, तच्छक्तिः = त्याची शक्ती, प्राणरूपिणी = प्रणवरूपी प्राण होय, तद्रूपलिङ्ग-विज्ञानी = शिवशक्त्यात्मक लिंगस्वरूप जाणणारा, प्राणलिङ्गीति = प्राणलिंगी होय असे, कथ्यते = सांगितले जाते.

**भावार्थ** : चिद्रूप ब्रह्म हेच शिवलिंग आणि त्याची शक्ती प्राण-स्वरूप आहे, (प्रणवरूप) प्राणरूप शक्तीने युक्त लिंगाचे ज्याला यथार्थ ज्ञान झाले आहे, त्याला प्राणलिंगी म्हणतात.।।३।।

**प्राणलिङ्गिस्थलं चैतत् पञ्चस्थलसमन्वितम्।**
**प्राणलिङ्गिस्थलं चादौ प्राणलिङ्गार्चनं ततः।।४।।**
**शिवयोगसमाधिश्च ततो लिङ्गनिजस्थलम्।**
**अङ्गलिङ्गिस्थलं चाथ क्रमादेषां भिदोच्यते।।५।।**

**अन्वयार्थ** : एतत् = हे, प्रणलिङ्गिस्थलं = प्राणलिंगी स्थल, पञ्चस्थल-समन्वितं = पाच अवांतर स्थलांनी युक्त आहे, आदौ = पहिले, प्राणलिङ्गिस्थलं = प्राणलिंगीस्थल, ततः = नंतर, प्राणलिङ्गार्चनं = प्राणलिंगार्चन स्थल, च = आणि, शिवयोगसमाधिः = शिवयोगसमाधिस्थल, ततः = नंतर, लिङ्गनिजस्थलं = लिंगनिजस्थल, च = आणि, अङ्गलिङ्गिस्थलं = अंगलिंगी स्थल, अथ = आता, एषां = ह्यांचे, क्रमात् = क्रमाने, भिदा = भेद, उच्यते = सांगतो.

**भावार्थ** : प्राणलिंगी स्थलाचे पाच पोटभेद आहेत ते असे— १) प्राणलिंगीस्थल, २) प्राणलिंगार्चन स्थल, ३) शिवयोगसमाधिस्थल, ४) लिंगनिजस्थल आणि ५) अंगलिंगिस्थल. आता त्या प्रत्येकातील निराळेपणा क्रमाने सांगतो.।।४-५।।

**प्राणापानसमाघातात् कन्दमध्याद्यदुत्थितम्।**
**प्राणलिङ्गं तदाख्यातं प्राणापाननिरोधिभिः।।६।।**

**अन्वयार्थ** : प्राणापानसमाघातात् = प्राण आणि अपानाच्या आघाताने, कन्दमध्यात् = नाभिकेंद्रातून, यत् = जी ज्योती, उत्थितं = उत्पन्न होते, तत् = ती ज्योती, प्राणापाननिरोधिभिः = प्राण आणि अपानाच्या निरोधकां (शिवयोगी) कडून, प्राणलिङ्गं = प्राणलिंग म्हणून, आख्यातं = सांगितली जाते.



**भावार्थ** : श्रीगुरूच्या उपदेशाने योगमार्गानुसार मूलाधाराचा निरोध करून प्राणवायूशी अपान वायूला संघटित केल्यामुळे नाभिकंदमध्यात (बेंबीत) जी ज्योती उत्पन्न होते, तीच प्राणलिंग होय, असे प्राणवायू आणि अपानवायूचा निरोध करणाऱ्या शिवयोग्यांनी म्हटले आहे.।।६।।

**प्राणो यत्र लयं याति भास्करे तुहिनं यथा।**
**तत्प्राणलिङ्गमुद्दिष्टं तद्धारी स्यात् तदाकृतिः।।७।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, तुहिनं = धुके, भास्करे = सूर्यप्रकाशात, लयं याति = लय पावते, तसे यत्र = ज्या ज्योतीत, प्राणः = प्राणवायू, लयं याति = लय पावतो, तत् = ते, प्राणलिङ्गं = प्राणलिंग म्हणून, उद्दिष्टं = उपदेशिले जाते, तद्धारी = त्याचे धारण करणारा, तदाकृतिः = तत्स्वरूप, स्यात् = होतो.

**भावार्थ** : सूर्यकिरणात जसे धुके विरघळून जाते, त्याप्रमाणे ज्या परशिवलिंगात प्राणवायू विलीन होतो त्यास प्राणलिंग म्हणतात. प्राणलिंगाचे अनुसंधान करणाऱ्याला प्राणलिंगी म्हणतात. अर्थात् चिदहंभावनायुक्त साधकासच प्राणलिंगी म्हणावे.।।७।।

**ज्ञानिनां योगयुक्तानामन्तः स्फुरति दीपवत्।**
**चिदाकारं परब्रह्मलिङ्गमज्ञैर्न भाव्यते।।८।।**

**अन्वयार्थ** : चिदाकारं = चिद्रूप, परब्रह्मलिङ्गं = परशिवब्रह्मलिंग, अज्ञैः = अज्ञ जनांना, न भाव्यते = प्रत्ययास येत नाही, परंतु योगयुक्तानां = शिवयोग्यांच्या, ज्ञानिनां = शिवज्ञान्यांच्या, अन्तः = हृदयात, दीपवत् = दीपासारखे, स्फुरति = प्रकाशित होते.

**भावार्थ** : प्राणलिंग शिवयोगसाधना करणाऱ्या ज्ञानी लोकांच्या हृदयकमलात दीपाप्रमाणे प्रकाशमान होते. गुरूपदेश नसलेल्या अज्ञ, प्राकृत लोकांना ते चित्स्वरूप, ब्रह्मरूपी प्राणलिंग जाणवत नाही.।।८।।

**अन्तःस्थितं परं लिङ्गं ज्योतीरूपं शिवात्मकम्।**
**विहाय बाह्यलिङ्गस्था विमूढा इति कीर्तिताः।।९।।**

**अन्वयार्थ** : अन्तःस्थितं = हृदयात राहाणारे, ज्योतीरूपं = ज्योतिस्वरूप, शिवात्मकं = शिवरूप, परं लिङ्गं = परब्रह्मलिंगाला, विहाय = सोडून, बाह्यलिङ्गस्थाः = स्थावरलिंगावर, आसक्त असणारे लोक, विमूढा इति = मूर्ख म्हणून, कीर्तिताः = म्हटले जातात.

**भावार्थ** : अंतःकरणात ज्योतिरूपाने स्फुरित होणारे शिवस्वरूप असे प्राणलिंग सोडून जे लोक बाह्य (स्थावर) लिंगावर विश्वास ठेवून त्याची उपासना करतात ते अडाणी होत.॥९॥

**संविल्लिङ्गपरामर्शी बाह्यवस्तुपराङ्मुखः।**
**यः सदा वर्तते योगी प्राणलिङ्गी स उच्यते।।१०।।**

**अन्वयार्थ** : बाह्यवस्तुपराङ्मुखः = स्थावर लिंग आणि त्याच्या पूजाद्रव्यापासून विमुख असणारा, सदा = नेहमी, संविल्लिङ्गं = चिद्रूप प्राणलिंगाचे, परामर्शी = ज्ञान असणारा, यः = जो, योगी = शिवयोगी, वर्तते = असतो, सः = तो, प्राणलिङ्गी = प्राणलिंगी म्हणून, उच्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : बाह्य लिंगाच्या पूजासामग्रीकडे पाठ फिरवून जो शिवयोगी अंतःस्थित चिद्रूप प्राणलिंगाचे सदैव चिंतन करतो त्याला प्राणलिंगी म्हणावे.॥१०॥

**मायाविकल्पजं विश्वं हेयं सञ्चिन्त्य नित्यशः।**
**चिदानन्दमये लिङ्गे विलीनः प्राणलिङ्गवान्।।११।।**

**अन्वयार्थ** : मायाविकल्पजं = मायिक गुणाने उत्पन्न, विश्वं = विश्वाला, हेयं = त्याज्य म्हणून, संचिन्त्यं = चिंतन करून, नित्यशः = सदा, चिदानन्दमये = चिद्रूप, लिङ्गे = लिंगात, विलीनः = विलीन झालेला, तो प्राणलिङ्गवान् = प्राणलिंगी होय.

**भावार्थ** : हे विश्व मायेच्या विकल्पापासून झाले आहे आणि बाह्यलिंगही मायेच्या विकल्पांतर्गत असल्यामुळे त्याचा त्याग करणे उचित होय. हे ध्यानात घेऊन जो बाह्य लिंगास सोडून सदैव चिदानंदमय अशा प्राणलिंगात आपल्या मनाचा लय साधतो, त्यास प्राणलिंगी असे म्हणावे.॥११॥



**सत्ता प्राणमयी शक्तिः सद्रूपं प्राणलिङ्गकम्।**
**तत्सामरस्यविज्ञानात् प्राणलिङ्गीति कथ्यते।।१२।।**

**अन्वयार्थ** : सत्ता = (अहंस्फूर्ती) मी आहे अशी जाणीव, हीच प्राणमयी शक्तिः = प्राणमयी शक्ती आहे, सद्रूपं = त्या अहंस्फूर्तीने युक्त, प्राणलिङ्गकम् = प्राणलिंग होय, तत्सामरस्य = त्या शिवशक्तीचे सामरस्य, विज्ञानात् = ज्ञानाने, प्राणलिङ्गीति = प्राणलिंगी म्हणून, कथ्यते = म्हटले जाते.

**भावार्थ** : प्रत्येकाच्या अंतःकरणात मी आहे (अहमस्मि) अशी स्पंदित होणारी स्फूर्तीच प्राणशक्ती होय. प्राणशक्तिविशिष्ट जो अहंबोध आहे, त्यालाच प्राणलिंग म्हणतात. अर्थात् 'चिद्रूपोऽहम्' (मी चैतन्य स्वरूप आहे) असा जो बोध आहे, तोच प्राणलिंग होय. आणि याचे ज्ञान म्हणजेच अहम् रूपी शिव आणि सत्तारूपी शक्ती, या दोहोंच्या सामरस्याचे ज्ञान ज्याला झाले आहे त्याला प्राणलिंगी म्हणतात.॥१२॥

**प्राणलिङ्गार्चनस्थल - (३३)**

**अन्तर्गतं चिदाकारं लिङ्गं शिवमयं परम्।**
**पूज्यते भावपुष्पैर्यत् प्राणलिङ्गार्चनं हि तत्।।१३।।**

**अन्वयार्थ** : अन्तर्गतं = हृदयकमलात राहाणारे, चिदाकारं = चित्स्फुरण रूप, शिवमयं = शिवस्वरूप, अशा परं लिङ्गं = प्राणलिंगाचे, भावपुष्पैः = अंतःकरण वृत्तिरूप पुष्पांनी, पूज्यते = पूजा केली जाते, तत् = ती पूजा, हि = प्रसिद्ध असे, यत् = जे, प्राणलिङ्गार्चनं = प्राणलिंगार्चन होय.

**भावार्थ** : हृदयकमलात असणारे प्राणलिंग चित्स्वरूप, शिवमय आणि श्रेष्ठ आहे. त्याची भक्तिभावरूपी पुष्पांनी पूजा करणे याला प्राणलिंगार्चन असे म्हणतात.॥१३॥

**अन्तः पवनसंस्पृष्टे सुसूक्ष्माम्बरशोभिते।**
**मूर्धन्यचंद्रविगलत्सुधासेकातिशीतले ।।१४।।**
**बद्धेन्द्रियनवद्वारे बोधदीपे हृदालये।**
**पद्मपीठे समासीनं चिल्लिङ्गं शिवविग्रहम्।।**
**भावयित्वा सदाकालं पूजयेद् भाववस्तुभिः।।१५।।**

**अन्वयार्थ** : अन्त:पवन = प्राणवायूने, संस्पृष्टे = व्याप्त, सुसूक्ष्माम्बर-शोभिते = अतिसूक्ष्म अशा हृदयाकाशात शोभणारा, मूर्धन्य = ब्रह्मरंध्रात असणाऱ्या, चन्द्र = पूर्णचंद्रापासून, विगलत् = स्त्रवणाऱ्या, सुधासेक = अमृत-सिंचनाने, अतिशीतले = अत्यंत शीतल, बद्धेन्द्रियनवद्वारे = नवद्वार बंद असलेल्या, हृदयालये = हृदयमंदिरात, बोधदीपे = ज्ञानदीपरूप असणाऱ्या, पद्मपीठे = हृदयकमलात, समासीनं = असणाऱ्या, शिवविग्रहं = मंगलस्वरूपी, चिल्लिङ्गं = प्राणलिंगाची, भावयित्वा = भावना करून, सदाकालं = नेहमी, भाववस्तुभि: = भावमय पदार्थांनी, पूजयेत् = पूजा करावी.

**भावार्थ** : शरीरांतर्गत पंचप्राणरूपी वायूने व्याप्त सूक्ष्म आकाशाने सुशोभित झालेल्या ब्रह्मरंध्रस्थित चंद्रमंडलातून पाझरणाऱ्या अमृतबिंदूंनी शीतल झालेल्या हृदयमंदिराला दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, मुख आणि मलमूत्राचे दोन मार्ग अशी नऊ इंद्रियरूपी दारे आहेत. ती बंद केल्यावर हृदयमंदिराच्या गाभाऱ्यात शिवज्ञानरूपी जो दीप प्रकाशतो, त्याच्या प्रकाशात द्वादशदलहृदयकमलकर्णिकेत मंगलमय, चिद्रूप असे प्राणलिंग विराजमान असल्याचे दिसते. अशी भावना धरून श्रीगुरूंनी सांगितल्याप्रमाणे सद्भावरूपी वस्तूंनी त्या प्राणलिंगाची नेहमी पूजा करावी.॥१४-१५॥

**क्षमाऽभिषेकसलिलं विवेको वस्त्रमुच्यते।**
**सत्यमाभरणं प्रोक्तं वैराग्यं पुष्पमालिका॥१६॥**
**गन्ध: समाधिसम्पत्तिरक्षता निरहङ्कृति:।**
**श्रद्धा धूपो महाज्ञानं जगद्भासि प्रदीपिका॥१७॥**
**भ्रान्तिमूलप्रपञ्चस्य निवेद्यं तन्निवेदनम्।**
**मौनं घण्टापरिस्पन्दस्ताम्बूलं विषयार्पणम्॥१८॥**
**विषयभ्रान्तिराहित्यं तत्प्रदक्षिणकल्पना।**
**बुद्धेस्तदात्मिका शक्तिर्नमस्कारक्रिया मता॥१९॥**
**एवंविधैर्भावशुद्धैरुपचारैरदूषितै: ।**
**प्रत्युन्मुखमना भूत्वा पूजयेल्लिङ्गमान्तरम्॥२०॥**



**अन्वयार्थ** : क्षमा = क्षमा, अभिषेकसलिलं = अभिषेकाचे जल, विवेक: = नित्यानित्यवस्तुविवेक, वस्त्रमुच्यते = वस्त्र म्हटले जाते, सत्यं = सत्य बोलणे, आभरणं प्रोक्तं = अलंकार होत, वैराग्यं = वैराग्यभावना, पुष्पमालिका = फुलांची माळ, समाधिसम्पत्ति: = समाधिस्थिती, गन्ध: = गंध, निरहङ्कृति: = निरहंकार-भाव, अक्षता: = अक्षता, श्रद्धा = विश्वास, धूप: = धूप, जगद्भासि = विश्वाला प्रकाशित करणारे, महाज्ञानं = महाज्ञान, प्रदीपिका = दीप, भ्रान्तिमूलप्रपञ्चस्य = अज्ञानमूल प्रपंचाचे, निवेदनम् = अर्पण करणे, निवेद्यं = नैवेद्य, मौनं = मौन राहाणे, घण्टापरिस्पन्द: = घंटानाद, विषयार्पणम् = त्रिपुटीरूप विषयसमर्पण, ताम्बूलं = विडा, विषयभ्रान्तिराहित्यं = विषयभ्रमाचा त्याग करणे, प्रदक्षिण-कल्पना = प्रदक्षिणा करणे, बुद्धे: = बुद्धीची, तदात्मिका शक्ति: = लिंगरूप धारण करण्याची शक्ती, नमस्कारक्रिया = नमस्कार म्हणून, मता = मानले आहे, एवंविधै: = अशा प्रकारच्या, भावशुद्धै: = शुद्ध भावनेच्या, अदूषितै: = दोष नसलेल्या, उपचारै: = उपचारांनी, प्रत्युन्मुखमना: = अंतर्मुख मनाचा, भूत्वा = होऊन, आन्तरम् = अंतरंगात असणाऱ्या, लिङ्गं = प्राणलिंगाची, पूजयेत् = पूजा करावी.

**भावार्थ** : प्राणलिंगाच्या अभिषेकासाठी क्षमा (सहनशीलता) हेच जल, नित्य आणि अनित्य वस्तूंचा विवेक हेच त्याला नेसविण्याचे वस्त्र, सर्वदा सत्य बोलणे हेच त्याचे अलंकार व आभूषणे, वैराग्य हीच त्याला घालण्याची पुष्पमाला, चित्त शांत झाल्यावर समाधी लागणे हेच गंधसमर्पण होय. निरहंकार भावना हीच अक्षता, दृढ श्रद्धा हाच धूप आणि आत्मज्ञान होणे हाच दीप होय. भ्रांतीची निवृत्ती होणे हेच नैवेद्य दाखविणे होय. लौकिक व्यवहारात मौनवृत्ती धारण करणे हाच घंटानाद होय. विषयांचे समर्पण करणे हाच तांबूल होय. विश्व आणि शिव, तसेच मी आणि शिव भिन्न आहेत अशा प्रकारच्या भेदबुद्धीची निवृत्ती होणे हीच प्रदिक्षणा होय. आणि त्या भेदबुद्धीचा शेवटी त्या ज्योतिर्लिंगात लय होणे हीच नमस्कारक्रिया होय. अशा प्रकारच्या उपचारांनी व पवित्र अशा भावपुष्पांनी अंतर्मुखी होऊन अंत:स्थित प्राणलिंगाची पूजा करावी. हीच प्राणलिंगार्चना होय.॥१६-२०॥

## शिवयोगसमाधिस्थल - (३४)

**अन्त:क्रियारतस्यास्य प्राणलिङ्गार्चनक्रमैः।**
**शिवात्मध्यानसम्पत्तिः समाधिरिति कथ्यते।।२१।।**

**अन्वयार्थ** : प्राणलिङ्गार्चनक्रमैः = पूर्वी सांगितलेल्या प्राणलिंगार्चनाच्या प्रकारे, अन्त:क्रियारतस्य = अंतरंगपूजेत रत झालेल्या, अस्य = ह्या प्राणलिङ्गीचे, शिवात्मध्यानसम्पत्तिः = शिवजीवाचे समान सामरस्याचे अनुसंधान, समाधिरिति = समाधी म्हणून, कथ्यते = म्हटले जाते.

**भावार्थ** : प्राणलिंगाच्या पूर्वोक्त पूजाप्रकारांनी अंतरंगक्रिया करण्यात तत्पर असणाऱ्या या प्राणलिंगी पुरुषाच्या लिंगांगरूप शिवजीव सामरस्यानुसंधान संपत्तीला शिवयोगसमाधी असे म्हणतात.॥२१॥

**सर्वतत्त्वोपरि गतं सच्चिानन्दभासुरम्।**
**स्वप्रकाशमनिर्देश्यमवाङ्मानसगोचरम्।।२२।।**
**उमाख्यया महाशक्त्या दीपितं चित्स्वरूपया।**
**हंसरूपं परात्मानं सोऽहंभावेन भावयेत्।।**
**तदेकतानतासिद्धिः समाधिः परमो मतः।।२३।।**

**अन्वयार्थ** : सर्वतत्त्वोपरिगतं = पृथिव्यादी छत्तीस तत्त्वांच्या पलीकडे राहाणाऱ्या, सच्चिदानन्दभासुरम् = सच्चिदानंदरूपाने प्रकाशणारा, स्वप्रकाशं = स्वयंप्रकाशी, अनिर्देश्यं = प्रमाणागोचर, अवाङ्मानसगोचरम् = मन आणि वाणीला गोचर न होणारा, उमाख्यया = उमा नावाच्या, महाशक्त्या = महाशक्तीमुळे, चित्स्वरूपतया = चैतन्यरूपाने, दीपितं = प्रकाशित होणारा, हंसरूपं = परमहंसरूप, परात्मानं = परमात्म्याला, सोऽहंभावेन = तो मीच आहे या भावनेने, भावयेत् = ध्यान करावे, तदेकतानतासिद्धिः = त्या दोघांच्या एकत्वाची सिद्धी, परमः = श्रेष्ठ, समाधिः = समाधी म्हणून, मतः = मानले जाते.

**भावार्थ** : पृथ्वीपासून शिवापर्यंत असणाऱ्या ३६ तत्त्वांच्या पलीकडे असणारा, सत्, चित् आणि आनंद ह्यामुळे प्रकाशमान दिसणारा, आपल्याच प्रकाशाने प्रकाशित होणारा, ज्याचे वर्णन वाचेने करता येत नाही अथवा मनाने ज्याचे आकलन करता येत नाही, उमा नावाच्या चित्स्वरूप महाशक्तीमुळे जो प्रकाशित दिसतो, तो हंसस्वरूप असून परमेश्वर आहे. असा 'तोच मी' अशा भावनेने त्यास जाणावे. जीवाने शिवाशी साधलेली एकतानता-सिद्धी तीच परमसमाधी होय, असे मानले जाते. अर्थात् अकारादी हकारान्त असलेल्या वर्णाध्वरूप पाशांनी बद्ध असलेला जीव अहम् अहम् असे म्हणत असतो; परंतु त्या जीवाने तत् शब्द वाच्य असणाऱ्या षडध्वातीत अशा परमेश्वराचे सोऽहंभावाने तादात्म्यचिंतन करणे ह्यालाच शिवयोग समाधी असे म्हणतात.॥२२-२३॥



**परब्रह्म महालिङ्गं प्राणो जीवः प्रकीर्तितः।**
**तदेकभावमननात् समाधिस्थः प्रकीर्तितः।।२४।।**

**अन्वयार्थ** : महालिङ्गं = महालिंगाला, परब्रह्म = परब्रह्म म्हटले आहे, प्राणः = प्राणाला, जीवः = जीव म्हणून, प्रकीर्तितः = सांगितले आहे, तयोः = त्या दोघांचे, एकभावमननात् = ऐक्य भावनेने मनन केल्यास, समाधिस्थः = शिवयोगसमाधिनिष्ठ म्हणून, प्रकीर्तितः = म्हटले जाते.

**भावार्थ** : महालिंगच परब्रह्मस्वरूप आहे आणि प्राणालाच जीव म्हणतात. महालिंग आणि प्राण अथवा लिंगांगरूप शिवजीवांच्या सामरस्य ऐक्याचे चिंतन करणाऱ्या पुरुषास समाधिनिष्ठ शिवयोगी असे म्हणतात.॥२४॥

**अन्तः षट्चक्ररूढानि पङ्कजानि विभावयेत्।**
**ब्रह्मादिस्थानभूतानि भ्रूमध्यान्तानि मूलतः।।२५।।**
**भ्रूमध्यादूर्ध्वभागे तु सहस्त्रदलमम्बुजम्।**
**भावयेत्तत्र विमलं चन्द्रबिम्बं तदन्तरे।।२६।।**
**सूक्ष्मरंध्रं विजानीयात् तत्कैलासपदं विदुः।**
**तत्रस्थं भावयेच्छम्भुं सर्वकारणकारणम्।।२७।।**

**अन्वयार्थ** : अन्तः = आपल्या सूक्ष्मशरीरामध्ये, षट्चक्ररूढानि = षट्चक्राने उत्पन्न झालेल्या, पङ्कजानि = सहा कमळांची, मूलतः = आधार चक्रापासून, भ्रूमध्यान्तानि = आज्ञाचक्रापर्यंत, ब्रह्मादिस्थानभूतानि = ब्रह्मादिकांचे स्थान म्हणून,

विभावयेत् = गुरूच्या उपदेशानुसार भावना करावी आणि, भ्रूमध्यात् = भ्रूमध्यापासून, ऊर्ध्वमागे तु = ऊर्ध्वभागी तर, सहस्रदलमम्बुजं = हजार पाकळ्यांच्या कमळाची, भावयेत् = भावना करावी, तदन्तरे = त्यात, सूक्ष्मरन्ध्रं = अतिसूक्ष्म रंध्राला, कैलासपदं = कैलासस्थान म्हणून, विदुः = शास्त्रज्ञांनी जाणले आहे, तत्रस्थं = त्यात राहाणाऱ्या, सर्वकारणकारणम् = ब्रह्मादिकांनाही कारण असणाऱ्या, शम्भुं = शिवाचे, भावयेत् = आपल्या आत्म्याशी अभेद बुद्धीने ध्यान करावे.

**भावार्थ** : जीव आणि शिवाला आश्रय अशा सूक्ष्म शरीरामध्ये आधारस्थानापासून भ्रूमध्यापर्यंत सहा स्थानी सहा चक्रे असतात. गुदस्थानात आधारचक्र, लिंगस्थानी स्वाधिष्ठानचक्र, नाभिस्थानी मणिपूरचक्र, हृदयस्थानात अनाहतचक्र, कंठस्थानामध्ये विशुद्धिचक्र आणि भ्रूमध्यस्थानी आज्ञाचक्र अशी सहा स्थानांत सहा चक्रे असतात. त्या ठिकाणी क्रमाने चार, सहा, दहा, बारा, सोळा आणि दोन अशा पाकळ्यांची कमले असतात. भ्रूमध्यावर असलेल्या ब्रह्मरंध्रामध्ये सहस्रदल कमल असते, असे गुरूने केलेल्या उपदेशानुसार भावना धरून त्या सहस्रदल कमलाच्या मध्यावर केशाग्रप्रमाण रंध्र असल्याचे समजावे. त्यालाच शास्त्रज्ञ कैलासस्थान म्हणून ओळखतात. सकल देवांना कारण असा शिव त्या स्थानी विराजमान असतो. आणि तो मीच आहे, अशा प्रकारे शिवाशी आपला अभेदभाव असल्याचे चिंतन करावे, हीच सकल समाधी होय.॥२५-२७॥

**बहिर्वासनया विश्वं विकल्पार्थं प्रकाशते।**
**अन्तर्वासितचित्तानामात्मानन्दः प्रकाशते।।२८।।**

**अन्वयार्थ** : बहिर्वासनया = बाह्य वस्तूंच्या संस्काराने, विश्वं = जग, विकल्पार्थं = संकल्प-विकल्पाला कारण होऊन, प्रकाशते = प्रकाशित होते, अन्तर्वासितचित्तानाम् = ज्यांचे मन अंतर्मुख संस्कारांनी युक्त आहे, अशा लोकांना, आत्मानन्दः = शिवानंद, प्रकाशते = प्रकाशित होतो.

**भावार्थ** : बाह्य वासना संस्काराने पाहू लागले असता हे सर्व जग संकल्प विकल्पांनी भरलेले दिसून येते. अंतर्मुख दृष्टीने पाहणाऱ्या शिवयोग्यांना आत्मानंद अनुभवास येतो.॥२८॥



**आत्मारणिसमुत्थेन प्रमोदमथनात्सुधीः।**
**ज्ञानाग्निना दहेत्सर्वं पाशजालं जगन्मयम्।।२९।।**

**अन्वयार्थ** : सुधीः = सुज्ञ प्राणलिंगीने, प्रमोदमथनात् = शिवानंदाच्या, विचारापासून, आत्मारणि = आत्मारूपी अरणीत, समुत्थेन = उत्पन्न झालेल्या, ज्ञानाग्निना = ज्ञानरूपी अग्नीने, जगन्मयं = प्रपंचरूपी, सर्वं = सर्व, पाशजालं = मलमायादी पाशसमूहाला, दहेत् = जाळून टाकावे.

**भावार्थ** : ज्ञानी मनुष्याने (प्राणलिंगीने) आत्मारूप अरणीवर शिवानंदविचाररूपी घर्षणाने उत्पन्न झालेल्या शिवाद्वैत-ज्ञानरूप अग्नीने जगातील सर्व मलमायादी पाश जाळून टाकावे. म्हणजेच ज्ञानी मनुष्याने आत्मस्वरूपाचे यथार्थ ज्ञान करून घेऊन त्रैलोक्याचा पसारा खोटा (मायिक) आहे असे ओळखावे.॥२९॥

**संसारविषवृक्षस्य पञ्चक्लेशपलाशिनः।**
**छेदने कर्ममूलस्य परशुः शिवभावना।।३०।।**

**अन्वयार्थ** : कर्ममूलस्य = पुण्यपापरूप कर्मानि उत्पन्न झालेल्या, पञ्चक्लेशपलाशिनः = अविद्यादी पंचक्लेशरूपी पानांनी युक्त, संसारविषवृक्षस्य = जननमरणरूपी संसारविषवृक्षाला, छेदने = तोडण्यासाठी, शिवभावना = शिवध्यान, परशुः = कुऱ्हाड होय.

**भावार्थ** : मनुष्याचे धर्माधर्म अर्थात् पुण्यपापाची कर्मे हीच ज्याची मुळे आहेत अशा जननमरणरूपी संसाराच्या विषवृक्षाला अविद्या, अस्मिता, राग, द्वेष आणि अभिनिवेश ही पंचक्लेशात्मक पाने आहेत. या संसारवृक्षाचा मुळापासून नाश करण्यासाठी शिवध्यानाची कुऱ्हाडच योग्य आहे. अर्थात् शिवध्यानानेच संसारक्लेशांचा नाश होतो.॥३०॥

**अज्ञानराक्षसोन्मेषकारिणः संहृतात्मनः।**
**शिवध्यानं तु संसारतमसश्चण्डभास्करः।।३१।।**

**अन्वयार्थ** : संहृतात्मनः = आत्म्याला आवृत केलेल्या, अज्ञानराक्षस = अज्ञानरूपी राक्षसाचे, उन्मेषकारिणः = डोळे उघडणाऱ्या, संसारतमसः =

संसाररूपी अंध:काराला, शिवध्यानं = शिवध्यान, चण्डभास्कर: = प्रचंड भास्कराप्रमाणे असते.

**भावार्थ** : संसाराच्या अंधारात अज्ञानरूप राक्षसांचा धुमाकूळ होऊन आत्मस्वरूप ज्ञानाचा लोप होतो. त्या संसाराच्या अंधारास नष्ट करण्यासाठी शिवध्यान सूर्यासारखे तेजस्वी आहे. अर्थात् अज्ञानावरणाने मनुष्यात राक्षसीवृत्ती जागृत होतात. त्यांचा नाश होण्यासाठी शिवध्यानाची गरज असते.॥३१॥

### लिङ्गनिजस्थल - (३५)

**स्वान्तस्थशिवलिङ्गस्य प्रत्यक्षानुभवस्थिति:।**
**यस्यैव परलिङ्गस्य निजमित्युच्यते बुधै:।।३२।।**

**अन्वयार्थ** : यस्य = ज्याला, स्वान्तस्थ = आपल्या आत्म्यात तादात्म्याने राहणाऱ्या, शिवलिङ्गस्य = शिवलिंगाच्या, प्रत्यक्षानुभवस्थिति: = प्रत्यक्ष अनुभवाची स्थिती, प्राप्त होते, एव = त्याला, परलिङ्गस्य = महालिंगाचे, निजं = निजस्वरूप म्हणून, बुधै: = आत्मज्ञान्यांकडून, उच्यते = सांगितले जाते.

**भावार्थ** : आपल्या अंतरंगात तादात्म्याने असलेल्या परशिवलिंगाची देशकाल आकारादीविरहित महालिंग मीच आहे, अशी प्रत्यक्ष अनुभूती ज्याला आलेली असते अशा प्राणलिंगीला विद्वान लोक लिंगनिजस्थली असे म्हणतात. अर्थात् महालिंगच आपले निजस्वरूप होय असे समजणेच लिंगनिजस्थल होय.॥३२॥

**ब्रह्मविष्णवादयो देवा: सर्वे वेदादयस्तथा।**
**लीयन्ते यत्र गम्यन्ते तल्लिङ्गं ब्रह्म शाश्वतम्।।३३।।**

**अन्वयार्थ** : ब्रह्मविष्णवादय: = ब्रह्मा, विष्णू आदी, देवा: = देवता, तथा = तसेच, सर्वे = सर्व, वेदादय: = वेदागमादी, यत्र = जेथे, लीयन्ते = लय पावतात, गम्यन्ते = पुन्हा उत्पन्न होतात, तत् = ते, लिङ्गं = लिंग, केवलं ब्रह्म = केवळ ब्रह्मस्वरूप आहे.

**भावार्थ** : ब्रह्मा, विष्णू आदी देवदेवता आणि वेदपुराणादी सकलविद्या ज्यात लय पावतात व पुन्हा ज्याच्यातून उत्पन्न होतात त्या परशिवब्रह्माला लिंग असे म्हणतात.॥३३॥



**चिदानन्दमय: साक्षच्छिव एव निरञ्जन:।**
**लिङ्गमित्युच्यते नान्यद् यत: स्याद्विश्वसंभव:।।३४।।**

**अन्वयार्थ** : यत: = ज्याच्यापासून, विश्वसम्भव: = विश्वाची उत्पत्ती, स्यात् = होते, ते लिङ्गं = लिंग, चिदानन्दमय: = चिदानंदस्वरूप, निरञ्जन: = दोषरहित, साक्षात् = प्रत्यक्ष रूपाने, शिव एव = शिवच होय, इत्युच्यते = असे म्हटले जाते, नान्यत् = अन्य काही नाही.

**भावार्थ** : ज्या परब्रह्मस्वरूप लिंगापासून विश्वाची उत्पत्ती होते ते सच्चिदानंदस्वरूप व त्रिमलदोषरहित (निरंजन) असून साक्षात् शिवच आहे. त्या लिंगाशिवाय अन्य काही नाही.॥३४॥

**बहुनात्र किमुक्तेन लिङ्गमित्युच्यते बुधै:।**
**शिवाभिदं परं ब्रह्म चिद्रूपं जगदास्पदम्।।३५।।**

**अन्वयार्थ** : अत्र = ह्याविषयी, बहुना = अधिक, उक्तेन = बोलण्याचे, किं = काय प्रयोजन? जगदास्पदं = विश्वाचा आधार, चिद्रूपं = चैतन्यस्वरूप, परं ब्रह्म = परब्रह्मच, शिवाभिधं = शिव नावाचे, लिङ्गं = निजलिंग म्हणून, बुधै: = शास्त्रज्ञांकडून, उच्यते = म्हटले जाते.

**भावार्थ** : अधिक काय सांगावे? जगाला आधारभूत व स्फुरणस्वरूप असणारे परब्रह्मच परशिव असून त्यालाच ज्ञानी लोक निजलिंग असे म्हणतात.॥३५॥

**वेदान्तवाक्यजां विद्यां लिङ्गमाहुस्तथापरे।**
**तदसज्ज्ञेयरूपत्वाल्लिङ्गस्य ब्रह्मरूपिण:।।३६।।**

**अन्वयार्थ** : तथा = तसेच, अपरे = इतर लोक, वेदान्तवाक्यजां = अहं ब्रह्मास्मि, तत्त्वमसि आदी महावाक्यांनी उत्पन्न झालेल्या, विद्यां = विद्येला, लिङ्गं = लिंग, आहु: = म्हणतात, तदसत् = ते योग्य नाही, कारण ब्रह्मरूपिण: = परब्रह्मस्वरूपी, लिङ्गस्य = लिंग, ज्ञेयरूपत्वात् = ज्ञेयरूप आहे.

**भावार्थ** : अन्य काही लोक वेदान्तावाक्यापासून उत्पन्न झालेल्या, अहंब्रह्मास्मि, प्रज्ञानं ब्रह्म, तत्त्वमसि, अयामात्मा ब्रह्म इत्यादी वाक्यांतून व्यक्त

झालेल्या विद्येलाच लिंग म्हणतात. परंतु ते योग्य नाही; कारण परब्रह्मस्वरूपी लिंगाला जाणण्यासाठी विद्या हे साधन असल्यामुळे त्या विद्येला लिंग म्हणणे योग्य नाही.॥३६॥

**अव्यक्तं लिङ्गमित्याहुर्जगतां मूलकारणम्।**
**लिङ्गी महेश्वरश्चेति मतमेतदसङ्गतम्।।३७।।**

**अन्वयार्थ** : जगतां = जगांचे, मूलकारणं = मूळकारण असणाऱ्या, अव्यक्तं = मायातत्त्वाला, लिङ्गमिति = लिंग असे, आहुः = म्हणतात, च = आणि, महेश्वरः = मायाशक्तिविशिष्ट शिवाला, लिङ्गीति = लिंगी असे म्हणतात, एतद् = हे, मतम् = मत, असङ्गतम् = अयोग्य आहे.

**भावार्थ** : काही लोक प्रपंचाच्या लयगमनास कारणीभूत असणाऱ्या प्रकृतीलाच लिंग आणि महेश्वराला लिंगी असे श्वेताश्वतर उपनिषदातील वचनाचा आधार घेऊन मानतात, हे योग्य नाही. कारण प्रकृती जड व माया रूप असल्यामुळे हेय असून ती निजलिंग होऊ शकत नाही.॥३७॥

**न सूर्यो भाति तत्रेन्दुर्न विद्युन्न च पावकः।**
**न तारका महालिङ्गे द्योतमाने परात्मनि।।३८।।**

**अन्वयार्थ** : परात्मनि = परमात्मस्वरूपी, महालिङ्गे = महालिंग, द्योतमाने = प्रकाशित असल्यावर, तत्र = त्या प्रकाशात, सूर्यः = सूर्य, न भाति = प्रकाशित होत नाही, इन्दुः = चंद्र, न = प्रकाशित होत नाही, पावकः = अग्नी, न = प्रकाशित होत नाही, विद्युत् = वीज, न = प्रकाशित होत नाही, च = आणि, तारका = नक्षत्रे, न = प्रकाशित होत नाहीत.

**भावार्थ** : साक्षात् परब्रह्मस्वरूप असे ज्योतिर्मय महालिंग स्वयंप्रकाशाने तळपत असताना त्या प्रकाशापुढे सूर्याचा प्रकाश असो, चंद्राचा प्रकाश असो, विजेचा, अग्नीचा अथवा नक्षत्राचा प्रकाश असो ते सर्व फिके पडतात. कारण ते सर्व त्या महालिंगाला प्रकाशित करीत नसून त्या महालिंगाच्याच प्रकाशाने ते प्रकाशित होऊन जगाला प्रकाश देतात.॥३८॥



**ज्योतिर्मयं परं लिङ्गं श्रुतिराह शिवात्मकम्।**
**तस्य भासा सर्वमिदं प्रतिभाति न संशयः।।३९।।**

**अन्वयार्थ** : शिवात्मकं = शिवस्वरूपी, परं लिङ्गं = महालिंगच, ज्योतिर्मयं = स्वयंज्योतिस्वरूप आहे, तस्य = त्याच्या, भासा = प्रकाशाने, इदं = हे, सर्वं = सूर्यचंद्रादी सर्व, प्रतिभाति = प्रकाशित होते, न संशयः = यात संशय नाही. असे श्रुतिः = श्रुतीत, आह = म्हटले आहे.

**भावार्थ** : म्हणून निगमागम आणि शास्त्रेही सांगतात की, शिवस्वरूप लिंग हे सर्वश्रेष्ठ व ज्योतिर्मय आहे. ते स्वयंप्रकाशी असून त्याच्या तेजानेच सूर्यचंद्रादी सर्व विश्व प्रकाशमान झाले आहे.॥३९॥

**लिङ्गान्नास्ति परं तत्त्वं यदस्माज्जायते जगत्।**
**यदेतद्रूपतां धत्ते यदत्र लयमश्नुते।।४०।।**

**अन्वयार्थ** : यदस्मात् = ज्याच्यामुळे, जगत् = जग, जायते = उत्पन्न होते, यत् = जे जग, एतद्रूपताम् = स्थितिस्वरूप, धत्ते = धारण करते, यत् = जे जग, अत्र = ह्यात, लयमश्नुते = लय पावते, अशा ह्या लिङ्गात् = लिंगापेक्षा, परं तत्त्वं = श्रेष्ठ तत्त्व, नास्ति = नाही.

**भावार्थ** : ज्या लिंगापासून सर्व जग उत्पन्न झाले आहे, त्यापासून जगाचे रक्षण होते आणि ज्याच्यात शेवटी सर्व जग लय पावते, अशा स्वयंप्रकाशमान निजलिंगापेक्षा श्रेष्ठ तत्त्व दुसरे कोणतेही नाही.॥४०॥

**तस्माल्लिङ्गं परं ब्रह्म सच्चिदानन्दलक्षणम्।**
**निजरूपमिति ध्यानात् तदवस्था प्रजायते।।४१।।**

**अन्वयार्थ** : तस्मात् = त्यामुळे, सच्चिदानन्दलक्षणम् = सच्चिदानंदस्वरूप, परं ब्रह्म = परब्रह्मच, निजरूपं = आपले आत्मस्वरूप, लिङ्गमिति = लिंग म्हणून, ध्यानात् = ध्यान केल्याने, तदवस्था = लिंगनिजावस्था, प्रजायते = प्रकाशित होते.

**भावार्थ** : यास्तव लिंग हे परब्रह्म आहे. ते सत्, चित् आणि आनंद स्वरूपाचे आहे. हे लिंग माझेच (निज) रूप आहे, असे ध्यान केले म्हणजे

लिंगमय अवस्था प्राप्त होते. म्हणजेच ध्यान करणारा मनुष्य लिंगनिजावस्थेला प्राप्त होतो.॥४१॥

**अंगलिंगस्थल - (३६)**

**ज्ञानमङ्गमिति प्राहुर्ज्ञेयं लिङ्गं सनातनम्।**
**विद्यते तद्द्वयं यस्य सोऽङ्गलिङ्गीति कीर्तितः।।४२।।**

**अन्वयार्थ** : ज्ञानं = शिवज्ञान असलेल्या जीवाला, अङ्गमिति = अंग असे, प्राहुः = म्हणतात, सनातनम् = शाश्वत अशा शिवाला, लिङ्गं = लिंग असे, ज्ञेयं = समजावे, तद्द्वयम् = ते दोन्ही, यस्य = ज्याला, विद्यते = प्रत्ययाला येते, सः = तो, अङ्गलिङ्गीति = अंगलिंगी असे, कीर्तितः = म्हणविला जातो.

**भावार्थ** : शिवज्ञानसंपन्न जीवाला अंग म्हणतात, जाणून घ्यावयाच्या वस्तूला लिंग म्हणतात. शिवज्ञानमय अंग म्हणजे जीव आणि लिंग या दोहोंचे ज्ञान ज्या प्राणलिंगीला असते त्याला अंगलिंगी असे म्हणतात.॥४२॥

**अङ्गे लिङ्गं समारूढं लिङ्गे चाङ्गमुपस्थितम्।**
**एतदस्ति द्वयं यस्य स भवेदङ्गलिङ्गवान्।।४३।।**

**अन्वयार्थ** : अङ्गे = जीवात्म्यात, लिङ्गं = लिंग, समारूढं = सामरस्याने असते, च = आणि, लिङ्गे = शिवलिंगात, अङ्गं = जीव, उपस्थितं = सामरस्याने असतो, एतद् = हे, द्वयं = दोन प्रकारचे ज्ञान, यस्य = ज्याला, अस्ति = आहे, सः = तो, अङ्गलिङ्गवान् = अंगलिंगी, भवेत् = होतो.

**भावार्थ** : अंगात (जीवात) लिंग सामरस्याने असते व लिंगामध्ये अंग (जीव) सुद्धा समरस भावाने असतो. अशा प्रकारे बीजांकुर न्यायाने जीव व शिव या दोहोंचे सामरस्यपूर्ण एकत्र अस्तित्वाचे ज्ञान ज्या प्राणलिंगीला झाले आहे त्यासच अंगलिंगी म्हणावे.॥४३॥

**ज्ञात्वा यः सततं लिङ्गं स्वान्तस्थं ज्योतिरात्मकम्।**
**पूजयेद्भावयन्नित्यं तं विन्द्यादङ्गलिङ्गिनम्।।४४।।**

**अन्वयार्थ** : यः = जो प्राणलिंगी, स्वान्तस्थं = आपल्या हृदयकमलात असणाऱ्या, ज्योतिरात्मकं = ज्योतिस्वरूप, लिङ्गं = लिंगाला, सततं = निरंतर, ज्ञात्वा = सामरस्याने जाणून, नित्यं = नेहमी, पूजयेत् = पूजा करतो, भावयेत् = ध्यान करतो, तं = त्या प्राणलिंगीला, अङ्गलिङ्गिनम् = अंगलिंगी म्हणून, विन्द्यात् = जाणावे.



**भावार्थ** : जो प्राणलिंगी आपल्या हृदयात असणाऱ्या ज्योतिर्मय लिंगाला श्रीगुरूचा उपदेश व स्वानुभवाच्या द्वारे जाणून घेऊन त्याची सतत पूजा व ध्यान करतो त्यासच अंगलिंगी असे म्हणावे.॥४४॥

**ज्ञायते लिङ्गमेवैकं सर्वैः शास्त्रैः सनातनैः।**
**ब्रह्मेति विश्वधामेति विमुक्तेः पदमित्यपि।।४५।।**
**मुक्तिरूपमिदं लिङ्गमिति यस्य मनःस्थितिः।**
**स मुक्तो देहयोगेऽपि स ज्ञानी स महागुरुः।।४६।।**

**अन्वयार्थ** : सर्वैः = सर्व, सनातनैः = सनातन अशा, शास्त्रैः = निगमागम प्रमाणाने, एकं = एक, लिङ्गमेव = लिंगच, ब्रह्मेति = ब्रह्म म्हणून, विश्वधामेति = विश्वाचा आधार म्हणून, अपि = आणि, मुक्तेः = मुक्तीचे, पदमिति = स्थान म्हणून, ज्ञायते = जाणले जाते, इदं = हे, लिङ्गं = लिंग, मुक्तिरूप = मोक्ष-स्वरूप, इति = अशी, यस्य = ज्याची, मनःस्थितिः = मनाची स्थिती असते, सः = तो, देहयोगेऽपि = शरीर असून सुद्धा, मुक्तः = मुक्त असतो, सः = तो, ज्ञानी = शिवज्ञानी होय, सः = तो महागुरुः = महागुरू होय.

**भावार्थ** : अनादी कालापासून चालत आलेली निगमागमादीकरून सर्व शास्त्रे असे म्हणतात की, लिंग हेच काय ते एक परब्रह्म आहे. तेच सर्व त्रैलोक्याचा आधार आहे व मोक्षाचे स्थानही आहे. हे लिंग मोक्षप्राप्ती करून देणारे आहे. एवढेच नव्हे तर तेच प्रत्यक्ष मोक्ष आहे. अशी ज्याच्या मनाची धारणा झाली आहे तो मनुष्य देहधारी (जिवंत) असला तरी मुक्तच आहे समजावे. तो महाज्ञानी आणि श्रेष्ठ गुरू आहे असे मानावे.॥४५-४६॥

**अनादिनिधनं लिङ्गं कारणं जगतामिह।**
**ये न जानन्ति ते मूढा मोक्षमार्गबहिष्कृताः।।४७।।**

**अन्वयार्थ** : अनादिनिधनं = उत्पत्तिविनाशरहित, लिङ्गं = लिंग, जगताम् = विश्वांचे, कारणम् = कारण आहे, इति = असे, ये = जे, न जानन्ति = जाणत

नाहीत, ते = ते, मूढा: = मूढ आहेत, आणि, मोक्षमार्गबहिष्कृता: = मोक्षमार्गाला अयोग्य आहेत.

**भावार्थ** : लिंगास जन्म नाही आणि मरणही नाही, लिंग हे सर्व विश्वाला कारणभूत आहे. जे लोक अशा लिंगास जाणत नाहीत, ते मूर्ख आहेत. त्यांना मोक्ष मिळणार नाही.॥४७॥

**यः प्राणलिङ्गार्चनभावपूर्वै-**
**र्धर्मैरुपेतः शिवभावितात्मा।**
**स एव तुर्यः परिकीर्तितोऽसौ**
**संविद्विपाकाच्छरणाभिधानः।।४८।।**

**अन्वयार्थ** : यः = जो, प्राणलिङ्गार्चनभावपूर्वैः = प्राणलिंगार्चनेच्या भावनेने पूर्ण असलेल्या, धर्मैः = शिवाचाराने, उपेतः = युक्त असलेला, शिवभावितात्मा = शिवाला आपला आत्मा मानणारा, असौ = हा प्राणलिंगी, संविद्विपाकात् = ज्ञानाच्या परिपक्वतेमुळे, शरणाभिधानः = शरण या नावाचा होतो, स एव = तोच, तुर्यः = तुर्य म्हणून, परिकीर्तितः = म्हणविला जातो.

**भावार्थ** : पूर्वोक्त प्रकारे जो प्राणलिंगाचे पूजन भक्तिरूपपुष्पांनी करतो, योग्य धर्माचरणाने नेहमी मनात शिवाचेच स्मरण करतो, त्याचे ज्ञान पूर्णावस्थेला पोचले असल्यामुळे या चौथ्या क्रमाच्या प्राणलिंगी स्थलातील साधकच पुढील शरण या स्थलाचा अधिकारी होतो.॥४८॥

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ प्राणलिङ्गीस्थले प्राणलिङ्गिस्थलादिपञ्चविध-स्थलप्रसङ्गो नाम द्वादशः परिच्छेदः।***

**बारावा परिच्छेद समाप्त.**

○○○

# तेरावा परिच्छेद

**अंगस्थलांतर्गत**

## शरणस्थल

**अगस्त्य उवाच —**

**माहेश्वरः प्रसादीति प्राणलिङ्गीति बोधितः।**
**कथमेष समादिष्टः पुनः शरणसंज्ञकः।।१।।**

**अन्वयार्थ** : माहेश्वरः = माहेश्वर, प्रसादीति = प्रसादी म्हणून, बोधितः = उपदेशिला गेला, पुनः = पुन्हा, प्राणलिङ्गीति = प्राणलिंगी म्हणून, समादिष्टः = उपदेशिलेला, एषः = हा, शरणसंज्ञकः = शरण नावाचा, कथम् = कसा होतो?

**भावार्थ** : अगस्त्य म्हणाले, अहो रेणुकाचार्या, आपण भक्त, माहेश्वर, प्रसादी आणि प्राणलिंगी यांचे निरूपण केलेत. आता प्राणलिंगी कशा प्रकारे शरण होतो ते सांगावे, तेव्हा रेणुकाचार्य सांगतात.॥१॥

**रेणुक उवाच —**

**अङ्गलिङ्गी ज्ञानरूपः सती ज्ञेयः शिवः पतिः।**
**यत्सौख्यं तत्समावेशे तद्वान् शरणनामवान्।।२।।**

**अन्वयार्थ** : ज्ञानरूपः = शिवज्ञानी असा, अङ्गलिङ्गी = प्राणलिंगी, सती = सती म्हणून, आणि शिवः = शिव, पतिः = पती म्हणून, ज्ञेयः = जाणावे, तत्समावेशे = त्या दोघांच्या सामरस्यात, यत्सौख्यं = जे सुख आहे, तद्वान् = ते असलेला, शरणनामवान् = शरण नावाचा होतो.

**भावार्थ** : लिंगांगसामरस्याच्या स्थितीचा अनुभव घेणारा अंगलिंगी अर्थात् प्राणलिंगी शिवज्ञानसंपन्न असतो, तो सती समजावा व शिव हा पती समजावा, पतिपत्नीच्या सामरस्यात जे सुख असते तसे लिंगांगसामरस्याचे सुख अनुभविणाऱ्या प्राणलिंगीला शरण असे म्हणावे.॥२॥

**स्थलमेतत्समाख्यातं चतुर्धा धर्मभेदतः।**
**आदौ शरणमाख्यातं ततस्तामसवर्जनम्।।३।।**

**ततो निर्देशमुद्दिष्टं शीलसम्पादनं ततः।**
**क्रमाल्लक्षणमेतेषां कथयामि निशम्यताम्।।४।।**

**अन्वयार्थ** : एतत् = हे, स्थलं = शरणस्थल, धर्मभेदेन = आचरण भेदाने, चतुर्धा = चार प्रकारचे, समाख्यातं = वर्णिले आहे, आदौ = पहिले, शरणमाख्यातं = शरणस्थल होय, ततः = त्यानंतर, तामसवर्जनं = तामसनिरसन स्थल, ततः = त्यानंतर, निर्देशं = निर्देशस्थल, ततः = त्यानंतर, शीलसम्पादनं = शील संपादन स्थल, उद्दिष्टं = उपदेशलेली आहेत, एतेषां = ह्यांचे, क्रमात् = क्रमाने, लक्षणं = लक्षण, कथयामि = सांगतो, निशम्यताम् = ऐकावे.

**भावार्थ** : या शरणस्थलाचे आचारभेदाने चार पोटभेद आहेत. १) शरणस्थल, २) तामसवर्जनस्थल, ३) निर्देशस्थल आणि, ४) शील-सम्पादनस्थल. या चार पोटभेदांपैकी प्रत्येकाचे क्रमाक्रमाने लक्षण सांगतो, ते तू नीट लक्ष देऊन ऐक.।।३-४।।

### शरणस्थल - (३७)

**सतीव रमणे यस्तु शिवे शक्तिं विभावयन्।**
**तदन्यविमुखः सोऽयं ज्ञातः शरणनामवान्।।५।।**

**अन्वयार्थ** : रमणे = प्राणप्रिय पतीविषयी, सतीव = पतिव्रता स्त्रीप्रमाणे, यः = जो, शिवे = शिवलिंगाविषयी, शक्तिं = स्वतःला स्त्री असे, विभावयन् = समजून, तदन्यविमुखः = त्याच्याशिवाय अन्यत्र विमुख असतो, सोऽयं = तो, शरणनामवान् = शरण नावाने, ज्ञातः = जाणण्यायोग्य आहे.

**भावार्थ** : प्राणप्रिय पतीविषयी जशी पतिव्रता स्त्री-सती एकनिष्ठ असते, पतीशिवाय अन्य पुरुषाचा विचारही करीत नाही, तशा प्रकारे शिव आपला पती असून आपण सती आहोत, शक्ती आहोत अशी भावना असणारा जो अंगरूप जीव शिवलिंगाशिवाय अन्य देवाकडे लक्ष न देता एकनिष्ठेने शिवाची उपासना करतो, त्यालाच शरण असे म्हणतात.।।५।।

**परिज्ञाते शिवे साक्षात् को वाऽन्यमभिकाङ्क्षति।**
**निधाने महति प्राप्ते कः काचं याचतेऽन्यतः।।६।।**



**अन्वयार्थ** : शिवे = परशिव, साक्षात् = श्रुतिप्रमाणद्वारा, परिज्ञाते = ब्रह्मादिकाहून श्रेष्ठ आहे असे जाणल्यानंतर, को वा = कोण बरे, अन्यं = अन्य देवाची, अभिकाङ्क्षति = इच्छा करतो, जसे महति = विपुल, निधाने = संपत्ती, प्राप्ते = प्राप्त झाल्यावर, अन्यतः = दुसऱ्याकडून, काचं = काचेची, कः = कोण, याचते = याचना करील?

**भावार्थ** : जसे द्रव्याचा मोठा साठा सापडल्यावर काचमण्याची याचना कोणीही करणार नाही, तसे परशिव हा प्रत्यक्ष वेदागम प्रमाणांनी परिबोधित झाल्यावर तो सदाशिव ब्रह्मा विष्णू आदी सर्व देवांपेक्षा अतिश्रेष्ठ होय असे निश्चयाने जाणलेला शरण अन्य देवाची अपेक्षा करणार नाही. त्याची अविचल निष्ठा शिवामध्येच असते.।।६।।

**शिवानन्दं समासाद्य को वाऽन्यमुपतिष्ठते।**
**गङ्गामृतं परित्यज्य कः काङ्क्षेन्मृगतृष्णिकाम्।।७।।**

**अन्वयार्थ** : शिवानन्दं = शिवानंद, समासाद्य = प्राप्त करून, कः = कोण, अन्यम् = अन्य देवाचा, उपतिष्ठते = आश्रय घेईल, गङ्गामृतं = गंगाजल, परित्यज्य = सोडून, कः = कोण, मृगतृष्णिकाम् = मृगजळाची, काङ्क्षेत् = इच्छा करील.

**भावार्थ** : शिवस्वरूपाचे यथार्थ ज्ञान होऊन त्यापासून उत्पन्न होणारा आनंद प्राप्त झाल्यावर दुसऱ्या देवास शरण कोण जाईल? अमृतासमान गंगाजल मिळाल्यावर ते टाकून मृगजळामागे पाण्याच्या आशेने कोण धावेल? अर्थात् कोणीही धावणार नाही. तसे शिवानंदप्राप्तीनंतर शरण अन्य देवाला शरण जाणार नाही.।।७।।

**संसारतिमिरच्छेदे विना शङ्करभास्करम्।**
**प्रभवन्ति कथं देवाः खद्योता इव देहिनाम्।।८।।**

**अन्वयार्थ** : देहिनाम् = जीवांचे, संसारतिमिरच्छेदे = संसाररूपी अंधाराचा नाश करण्यासाठी, शङ्करभास्करं = शिवरूपी सूर्याच्या, विना = शिवाय, खद्योता इव = काजव्यासारखे असणारे, देवाः = अन्य देव, कथं = कसे, प्रभवन्ति = समर्थ होतात.

**भावार्थ** : अंधाराचा नाश करण्यास जसा काजव्याचा प्रकाश उपयोगाचा नाही, त्याला सूर्यप्रकाशाचीच गरज असते; तशाप्रकारे संसाररूप अंधार नाहीसा करण्यास शंकररूप सूर्यावाचून इतर देवरूप काजव्यांच्या प्रकाशाचा उपयोग होणार नाही, असे जाणून शिवाशिवाय अन्य देवापासून विमुख असणाराच शरण होय.॥८॥

**संसारार्तः शिवं यायाद् ब्रह्माद्यैः किं फलं सुरैः।**
**चकोरस्तृषितः पश्येच्चन्द्रं किं तारका अपि।।९।।**

**अन्वयार्थ** : संसारार्तः = संसारापासून दुःखी झालेल्या जीवाने, शिवं = शिवाला, यायाद् = शरण जावे, ब्रह्माद्यैः = ब्रह्मादी, सुरैः = देवांपासून, किं फलम् = काय प्रयोजन? तृषितः = तहान लागलेला, चकोरः = चकोर पक्षी, चन्द्रं = चंद्राला, पश्येत् = पाहील, किं = काय, तारका अपि = तारकांनाही पाहील काय?

**भावार्थ** : तहान लागल्यावर चकोर पक्षी चंद्राकडेच पाहातो, तारकांकडे पाहात नाही. तसे संसारदुःखाने पीडलेल्या मनुष्याने शंकरास शरण जावे लागते, ब्रह्मादी इतर देवांना शरण जाऊन उपयोग होणार नाही. म्हणून शरण हा अन्य कोणा देवाऐवजी केवळ शिवालाच शरण जातो.॥९॥

**शिव एव समस्तानां शरण्यः शरणार्थिनाम्।**
**संसाररोगदष्टानां सर्वज्ञः सर्वदोषहा।।१०।।**
**शिवज्ञाने समुत्पन्ने परानन्दः प्रकाशते।**
**तदासक्तमना योगी नान्यत्र रमते सुधीः।।११।।**

**अन्वयार्थ** : संसाररोगदष्टानां = संसाररूपी सर्प चावलेल्या, समस्तानां = समस्त, शरणार्थिनां = शरणागत आलेल्या जीवांना, सर्वज्ञः = सर्वज्ञ, सर्वदोषहा = सर्वदोष दूर करणारा, शिव एव = शिवच, शरण्यः = रक्षक म्हणून, शिवज्ञाने = शिवमाहात्म्यज्ञान, समुत्पन्ने = उत्पन्न झाल्यावर, परानन्दः = परमानंद, प्रकाशते = प्रकाशित होतो, तदासक्तमनाः = त्या आनंदात आसक्तचित्त, सुधीः = सुज्ञ असा, योगी = शिवयोगी, अन्यत्र = शिवाहून अन्य देवांमध्ये, न रमते = रमत नाही.



**भावार्थ** : संसाररूपी साप चावलेल्या सर्व शरणार्थींना त्या दुःखापासून मुक्त करणारा, सर्व दोषांचा नाश करणारा, सर्वज्ञ, रक्षक शिव एकच आहे. शिव-ज्ञानाने उत्पन्न झालेल्या श्रेष्ठ आनंदाचा अनुभव घेतल्यावर त्या आनंदात निमग्न झालेला शिवयोगी दुसऱ्या कोणत्याही आनंदात रमणार नाही.॥१०-११॥

**तस्मात्सर्वप्रयत्नेन शङ्करं शरणं गतः।**
**तदनन्तसुखं प्राप्य मोदते नान्यचिन्तया।।१२।।**

**अन्वयार्थ** : तस्मात् = म्हणून, सर्वप्रयत्नेन = त्रिकरणापासून, शङ्करं = शिवाला, शरणं गतः = शरणागत झालेला साधक, तदनन्तसखं = त्याचे अनंत सुख, प्राप्य = प्राप्त करून, मोदते = आनंद घेतो, अन्यचिन्तया = अन्य देवांच्या चिंतनाने, न = आनंदित होत नाही.

**भावार्थ** : म्हणून सर्व प्रयत्नांनी, मनोवाक्कायरूपी त्रिकरणांनी शिवास शरण गेलेला भक्त अत्यंत सुखाचा उपभोग घेत आनंदात राहातो. अन्य देवांना शरण न जाता अनन्यभावाने शिवालाच शरण जाणारा तो शरण होय.॥१२॥

### तामसनिरसनस्थल - (३८)

**शिवासक्तपरानन्दमोदिना गुरुणा यतः।**
**निरस्यन्ते तमोभावाः स तामसनिरासकः।।१३।।**

**अन्वयार्थ** : शिवासक्त = शिवावर नितांत निष्ठा ठेवून, परानन्दमोदिना = परानंदाचा अनुभव घेणाऱ्या, गुरुणा = श्रेष्ठ अशा शरणाकडून, तमोभावाः = तमोविकार, यतः = ज्यामुळे, निरस्यन्ते = निवारण केले जातात, त्यामुळे सः = तो, तामसनिरासकः = तामसनिरासक होतो.

**भावार्थ** : शिवभक्तीत निमग्न असल्यामुळे जो नेहमी अत्यानंदात असतो, असा श्रेष्ठ शरण आपल्या मनातून तमोगुणाचे परिणाम असलेले निद्रा, आलस्य, कलह, मोह आदी विकारांचे निवारण करतो, त्याला तामस-निरासक शरण असे म्हणतात.॥१३॥

**यस्य ज्ञानं तमोमिश्रं न तस्य गतिरिष्यते।**
**सत्त्वं हि ज्ञानयोगस्य नैर्मल्यं विदुरुत्तमाः।।१४।।**

**अन्वयार्थ** : यस्य = ज्याचे, ज्ञानं = ज्ञान, तमोमिश्रं = तमोविकाराने युक्त आहे, तस्य = त्याला, गति: = सद्गति, न इष्यते = प्राप्त होत नाही, उत्तमा: = उत्तम लोक, ज्ञानयोगस्य = ज्ञानयोगाला, नैर्मल्यं = निर्दोष ठेवण्यासाठी, सत्त्वं हि = शुद्ध सत्त्व गुणच कारण आहे असे, विदु: = जाणतात.

**भावार्थ** : ज्याचे ज्ञान तमोगुणाने युक्त आहे, त्याला सद्गती लाभत नाही. ज्ञानी लोक ज्ञानयोगाला निर्दोष ठेवण्यासाठी सत्त्वगुण उपयोगी पडतो असे म्हणतात.॥१४॥

**शमो दमो विवेकश्च वैराग्यं पूर्णभावना।**
**क्षान्तिः कारुण्यसम्पत्तिः श्रद्धा सत्यसमुद्भवा।।१५।।**
**शिवभक्तिः परो धर्मः शिवज्ञानस्य बान्धवाः।**
**एतैर्युक्तो महायोगी सात्त्विकः परिकीर्तितः।।१६।।**

**अन्वयार्थ** : शम: = अंतरेंद्रिय निग्रह, दम: = बहिरिंद्रिय निग्रह, विवेक: = नित्यानित्यवस्तुविचार, वैराग्यं = विषयविरक्ती, पूर्णभावना = अखंड ज्ञान, क्षान्ति: = क्षमा, कारुण्यसम्पत्ति: = भूतदया, सत्यसमुद्भवा = सत्याने उत्पन्न झालेला, श्रद्धा = विश्वास, शिवभक्ति: = शिवाची भक्ती, परो धर्म: = उत्कृष्ट असा शिवाचार, हे सर्व शिवज्ञानस्य = शिवज्ञानाचे, बान्धवा: = बंधू आहेत, एतैर्युक्त: = ह्या दशगुणांनी युक्त, महायोगी = शिवयोगी, सात्त्विक: = सत्त्व गुणाने युक्त असा, परिकीर्तित: = म्हणविला जातो.

**भावार्थ** : शम म्हणजे शांती, ती अंतरिंद्रियांच्या निग्रहाने मिळते. बाह्य इंद्रियांच्या निग्रहाला दम म्हणतात. नित्यानित्यवस्तुविचार म्हणजे विवेक. विषयाची विरक्ती म्हणजे वैराग्य, पूर्ण भावना म्हणजे अखंड ज्ञान, क्षांती ही क्षमा, कारुण्य म्हणजे भूतदया आणि सत्य वस्तूवरील विश्वास म्हणजे श्रद्धा. शिवभक्ती व श्रेष्ठ शिवाचार हे गुण शिवज्ञानाचे सहोदर बांधवच आहेत. हे दहा गुण ज्या योग्याच्या अंगी आहेत तो सात्त्विक होय.॥१५-१६॥

**कामक्रोधमहामोहमदमात्सर्यवारणाः ।**
**शिवज्ञानमृगेन्द्रस्य कथं तिष्ठन्ति सन्निधौ।।१७।।**



**अन्वयार्थ** : कामक्रोधमहामोहमदमात्सर्यवारणा: = काम, क्रोध, अज्ञान, मद आणि मात्सर्यरूपी हत्ती, शिवज्ञानमृगेन्द्रस्य = शिवज्ञानरूपी सिंहाच्या, सन्निधौ = समोर, कथं तिष्ठन्ति = कसे उभे राहातील?

**भावार्थ** : काम, क्रोध, महामोह (अज्ञान) मद, मात्सर्य हे सर्व प्रचंड विकाररूप हत्ती शिवज्ञानरूप सिंहाजवळ कसे टिकतील? ते राहाणार नाहीत. म्हणजेच शिवज्ञानसंपन्न सात्त्विक शिवयोग्याला कामक्रोधादी षड्रिपूंचा विकार होत नाही.॥१७॥

**यत्र कुत्रापि वा द्वेष्टि प्रपञ्चे शिवरूपिणि।**
**शिवद्वेषी स विज्ञेयो रजसाविष्टमानसः।।१८।।**

**अन्वयार्थ** : रजसाविष्टमानस: = रजोगुणाच्या विकारांनी युक्त होऊन, शिवरूपिणि = शिवस्वरूप अशा, प्रपञ्चे = प्रपंचात, यत्र वा कुत्रापि = जेथे तेथे, द्वेष्टि = द्वेष करतो, स: = तो, शिवद्वेषी = शिवद्वेषी म्हणून, विज्ञेय: = जाणावे.

**भावार्थ** : रजोगुणाचे कार्य असणाऱ्या कामक्रोधादी विकारांनी ज्याचे चित्त आवृत झालेले आहे, असा मनुष्य शिवस्वरूप प्रपंचाचा जेथे तेथे द्वेष करतो. अशा रजोगुणी मनुष्यास शिवद्रोही म्हणतात.॥१८॥

**यो द्वेष्टि सकलान् लोकान् यो वाऽहङ्कुरुते सदा।**
**योऽसत्यभावानायुक्तः स तामस इति स्मृतः।।१९।।**

**अन्वयार्थ** : य: = जो, सकलान् लोकान् = सर्व लोकांशी, द्वेष्टि = द्वेष करतो, य: = जो, सदा = नेहमी, अहङ्कुरुते = अहंभाव बाळगतो, वा = अथवा, य: = जो, असत्यभावनायुक्त: = खोट्या भावनेने भरलेला असतो, स: = तो, तामस इति = तामस म्हणून, स्मृत: = समजला जातो.

**भावार्थ** : जो मनुष्य सर्व प्राणिमात्रांचा द्वेष करतो, नेहमी अहंभावनेने फुगलेला असतो आणि नेहमी खोट्या कल्पनांनीभरलेला असतो त्याला तामसी असे म्हणावे.॥१९॥

**तमोमूला हि सञ्जाता रागद्वेषादिपादपाः।**
**शिवज्ञानकुठारेण छेद्यन्ते हि निरन्तरम्।।२०।।**

**अन्वयार्थ** : तमोमूला हि = तमोगुणामुळे, सञ्जाता: = उत्पन्न झालेले, रागद्वेषादिपादपा: = रागद्वेषादिरूप वृक्ष, हि = निश्चयाने, शिवज्ञानकुठारेण = सात्त्विक शिवज्ञानरूपी कुऱ्हाडीने, निरन्तरं = नेहमी, छेद्यन्ते = तोडले जातात.

**भावार्थ** : तमोगुणच ज्यांची मुळे आहेत असे रागद्वेषादी वृक्ष शिवज्ञानरूपी कुऱ्हाडीने तोडले जातात.॥२०॥

**शिवज्ञाने समुत्पन्ने सहस्रादित्यसन्निभे।**
**कुतस्तमोविकारा: स्युर्महतां शिवयोगिनाम्।।२१।।**

**अन्वयार्थ** : सहस्रादित्यसन्निभे = हजार सूर्यांसारखे प्रकाशमान, शिवज्ञाने = शिवज्ञान, समुत्पन्ने = उत्पन्न झाल्यावर, महतां = महापुरुष अशा, शिवयोगिनां = शिवयोग्यांना, तमोविकारा: = तमोगुणाचे विकार, कुत: स्यु: = कसे होतील?

**भावार्थ** : शिवज्ञान हजारो सूर्यांसारखे तेजस्वी आहे. ते शिवज्ञान प्राप्त झालेल्या शिवयोग्यांना अज्ञानांध:कार विकाराचा उपद्रव कसा होईल? मुळीच होणार नाही.॥२१॥

### निर्देशस्थल - (३९)

**निराकृत्य तमोभागं संसारस्य प्रवर्तकम्।**
**निर्दिश्यते तु यज्ज्ञानं स निर्देश इति स्मृत:।।२२।।**

**अन्वयार्थ** : संसारस्य = संसाराचे, प्रवर्तकं = मूळ कारण असणाऱ्या, तमोभागं = तमोगुणाला, निराकृत्य = निराकरण करून, यज्ज्ञानं = जे ज्ञान, निर्दिश्यते = उपदेशिले जाते, स: = ते ज्ञान, निर्देश इति = निर्देश म्हणून, स्मृत: = म्हटले जाते.

**भावार्थ** : संसाराच्या प्रवृत्तीस मूलकारण असा तमोगुण घालवून जे उत्तम रीतीचे ज्ञान गुरू आपल्या शिष्यास शिकवितो त्यास निर्देश असे म्हणतात.॥२२॥

**गुरुरेव परं तत्त्वं प्रकाशयति देहिनाम्।**
**को वा सूर्यं विना लोके तमसो विनिवर्तक:।।२३।।**



**अन्वयार्थ** : लोके = जगात, सूर्यं विना = सूर्याशिवाय, तमस: = अंध:-काराचे, को वा विनिवर्तक: = कोण बरे निवारण करील? देहिनां = जीवांना, परं तत्त्वं = परशिवतत्त्वाचे, गुरुरेव = गुरूच, प्रकाशयति = प्रकाशन करतो.

**भावार्थ** : या जगात व्यापलेल्या अंधाराचा नाश सूर्याशिवाय कोणीही करू शकत नाही, त्याप्रमाणे गुरूच आपल्या शिष्यास तमोगुणाचा नाश करून परतत्त्वाचा प्रकाश दाखवितो, त्याच्याशिवाय अन्य कोणीही नाही.॥२३॥

**अन्तरेण गुरुं सिद्धं कथं संसारनिष्कृति:।**
**निदानज्ञं विना वैद्यं किं वा रोगो निवर्तते।।२४।।**

**अन्वयार्थ** : सिद्धं गुरुं = ज्ञानसिद्ध अशा गुरूच्या, अन्तरेण = शिवाय, संसारनिष्कृति: = भवरोगाची निवृत्ती, कथं = कशी होईल? निदानज्ञं = रोगाचे निदान करणाऱ्या, वैद्यं विना = वैद्याविना, रोग: = रोग, किं वा निवर्तते = नाहीसा होईल काय?

**भावार्थ** : रोगाचे निदान जाणणाऱ्या वैद्याशिवाय जसे रोगाचे निवारण होत नाही, तशा प्रकारे ज्ञानसिद्ध अशा गुरूच्या मार्गदर्शनाशिवाय भवरोग दूर होत नाही.॥२४॥

**अज्ञानमलिनं चित्तदर्पणं यो विशोधयेत्।**
**प्रज्ञाविभूतियोगेन तमाहुर्गुरुसत्तमम्।।२५।।**

**अन्वयार्थ** : अज्ञानमलिनं = अज्ञानाने मलिन झालेला, चित्तदर्पणं = चित्तरूपी आरसा, प्रज्ञाविभूतियोगेन = शिवज्ञानरूपी विभूतीने, य: = जो, विशोधयेत् = स्वच्छ करतो, तं = त्याला, गुरुसत्तमम् = गुरुश्रेष्ठ असे, आहु: = म्हणतात.

**भावार्थ** : अज्ञानरूपी मलाने मलिन झालेले चित्तरूपी दर्पण जो ज्ञानरूपी विभूतीच्या साहाय्याने निर्मल करतो त्याला गुरुश्रेष्ठ म्हणावे.॥२५॥

**अपरोक्षिततत्त्वस्य जीवन्मुक्तस्वभाविन:।**
**गुरो: कटाक्षे संसिद्धे को वा लोकेषु दुर्लभ:।।२६।।**

**अन्वयार्थ** : अपरोक्षिततत्त्वस्य = तत्त्वसाक्षात्कार झालेला, जीवन्मुक्त-स्वभाविन: = जीवनमुक्तस्वरूपी अशा, गुरो: = गुरूचा, कटाक्षे = कृपाकटाक्ष, संसिद्धे = प्राप्त झाल्यावर, लोकेषु = जगात, को वा दुर्लभ: = काय दुर्लभ आहे?

**भावार्थ** : ज्याला शिवज्ञानाचा साक्षात्कार झालेला आहे व जो स्वत: जीवन्मुक्त स्थितीत आहे, अशा गुरूचा कृपाकटाक्ष लाभल्यावर या जगात कोणती गोष्ट दुर्लभ आहे? कोणतीही नाही. अर्थात् भोगमोक्षादी सर्व सिद्धी प्राप्त होतात.॥२६॥

**कैवल्यकल्पतरवो गुरव: करुणालया:।**
**दुर्लभा हि जगत्यस्मिन् शिवाद्वैतपरायणा:।।२७।।**

**अन्वयार्थ** : कैवल्यकल्पतरव: = कैवल्यरूपी फळाचा कल्पवृक्ष, करुणालया: = करुणानिधी, शिवाद्वैतपरायणा: = शिवाद्वैतज्ञाननिष्ठ असे, गुरव: = गुरू, अस्मिन् जगति = ह्या जगात, दुर्लभा हि = दुर्मिळच होत.

**भावार्थ** : मोक्षप्राप्ती करून देणारे कल्पतरू असे गुरू जे शिवाद्वैत शास्त्रात प्रवीण व कृपाळू असतात, ते या जगात दुर्मिळ आहेत.॥२७॥

**क्षीराब्धिरिव सिन्धूनां सुमेरुरिव भूभृताम्।**
**ग्रहाणमिव तिग्मांशुर्मणीनामिव कौस्तुभ:।।२८।।**
**द्रुमाणामिव भद्रश्रीर्देवानामिव शङ्कर:।**
**गुरु: शिव: पर: श्लाध्यो गुरूणां प्राकृतात्मनाम्।।२९।।**

**अन्वयार्थ** : सिन्धूनां = समुद्रांमध्ये, क्षीराब्धिरिव = क्षीरसागरासारखा, भूभृताम् = पर्वतांमध्ये, सुमेरुरिव = मेरू पर्वतासारखा, ग्रहाणां = नवग्रहांमध्ये, तिग्मांशुरिव = सूर्यासारखा, मणीनां = रत्नांमध्ये, कौस्तुभ इव = कौस्तुभमण्याप्रमाणे, द्रुमाणां = वृक्षांमध्ये, भद्रश्रीरिव = चंदनवृक्षासारखा, देवानां = देवांमध्ये, शङ्कर इव = शंकरासारखा, प्राकृतात्मनां = लौकिक, गुरूणाम् = गुरूंमध्ये, शिव: = शिवज्ञानी असा, गुरु: = गुरू, पर: = श्रेष्ठ म्हणून, श्लाघ्य: = स्तुत्य होय.

**भावार्थ** : समुद्रांत जसा क्षीरसमुद्र श्रेष्ठ, पर्वतांमध्ये जसा मेरूपर्वत श्रेष्ठ, नवग्रहांत जसा सूर्य श्रेष्ठ, रत्नांत जसे कौस्तुभरत्न श्रेष्ठ आहे, झाडांत जसे चंदनाचे झाड श्रेष्ठ, सर्व देवतांमध्ये जसा शंकर श्रेष्ठ आहे, त्याप्रमाणे जगातील इतर लौकिक गुरूंपेक्षा शिवाद्वैततत्पर असा परमगुरू श्रेष्ठ आहे.॥२८-२९॥



## शीलसम्पादनस्थल - (४०)

**जिज्ञासा शिवतत्त्वस्य शीलमित्युच्यते बुधै:।**
**निर्देश्ययोगादार्याणां तद्वान् शीलीति कथ्यते।।३०।।**

**अन्वयार्थ** : आर्याणां = पूर्वोक्त लक्षणयुक्त गुरूच्या, निर्देश्ययोगात् = उपदेशाने, शिवतत्त्वस्य = शिवतत्त्वाची, जिज्ञासा = जी जिज्ञासा उत्पन्न होते, तिला, बुधै: = विद्वानांकडून, शीलमिति = शील म्हणून, उच्यते = सांगितले जाते, तद्वान् = ते असणारा, शीलीति = शीली म्हणून, कथ्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : शिवतत्त्व समजावून घेण्याच्या जिज्ञासेला ज्ञाते शील असे म्हणतात. गुरूकडून ते शिवतत्त्व समजावून घेण्याची जिज्ञासा असलेल्या भक्ताला शीली असे म्हणतात.॥३०॥

**प्रपन्नार्तिहरे देवे परमात्मनि शङ्करे।**
**भावस्य स्थिरतायोग: शीलमित्युच्यते बुधै:।।३१।।**

**अन्वयार्थ** : प्रपन्नार्तिहरे = शरणागताचे क्लेश दूर करणारा, देवे = देवाधिदेव, परमात्मनि = परब्रह्मस्वरूपी, अशा शङ्करे = शिवावर, भावस्य = भाव, स्थिरता योग: = स्थिर करणे, बुधै: = विद्वानांकडून, शीलमिति = शील असे, उच्यते = म्हटले जाते.

**भावार्थ** : शरण आलेल्या भक्ताचा ताप नाहीसा करणाऱ्या परब्रह्मरूप शिवाच्या ठिकाणी चित्त स्थिर ठेवण्यास ज्ञानी लोक शील असे म्हणतात.॥३१॥

**शीलं शिवैकविज्ञानं शिवध्यानैकतानता।**
**शिवप्राप्तिसमुत्कण्ठा तद्योगी शीलवान् स्मृत:।।३२।।**

**अन्वयार्थ** : शिवैकविज्ञानं = शिवाचेच विशेष ज्ञान प्राप्त करणे, शिवध्यानैकतानता = शिवध्यानाची एकाग्रता, शिवप्राप्तिसमुत्कण्ठा = शिवप्राप्तीची उत्कंठा, हेच शीलं = शील होय, तद्योगी = ते असणारा, शीलवान् = शीलवान म्हणून, स्मृतः = समजला जातो.

**भावार्थ** : शिवाचे ज्ञान हेच उत्तम ज्ञान आहे असे मानणे, शिवध्यानाशिवाय अन्य कोणाचेही ध्यान नसणे, शिवप्राप्ती आपणांस कधी होईल अशी उत्कंठा असणे यालाच शील म्हणतात. आणि असे ज्याचे शील आहे त्यास शीलवान अथवा शीलवंत असे म्हटले जाते.॥३२॥

**शिवादन्यत्र विज्ञाने वैमुख्यं यस्य सुस्थिरम्।**
**तदासक्तमनोवृत्तिस्तमाहुः शीलभाजनम्।।३३।।**

**अन्वयार्थ** : शिवादन्यत्र = शिवाहून भिन्न देवाचे, विज्ञाने = ज्ञानाविषयी, वैमुख्यं = विमुख असणे, यस्य = ज्याचे, सुस्थिरम् = स्थिर आहे, तदासक्तमनोवृत्तिः = ज्याची मनोवृत्ती शिवावर आसक्त झाली आहे. त्याला शीलभाजनम् = शीलभाजन असे, आहुः = म्हणतात.

**भावार्थ** : शिवज्ञानाखेरीज इतर ज्ञान करून घेण्याची ज्याला कधीही इच्छा होत नाही, शिवज्ञानातच ज्याचे मन सदैव गुंतून राहते त्या मनुष्यास शीलवंत असे म्हणतात.॥३३॥

**पतिव्रताया यच्छीलं पतिरागात् प्रशस्यते।**
**तथा शिवानुरागेण सुशीलोऽभक्त उच्यते।।३४।।**

**अन्वयार्थ** : पतिव्रतायाः = प्रतिव्रतेचे, यच्छीलं = जे पातिव्रत्य आहे, ते पतिरागात् = पतीवरील प्रेमामुळे, प्रशस्यते = प्रशंसिले जाते, तथा = तसेच, शिवानुरागेण = शिवावरील प्रीतीमुळे, अभक्तः = अभिन्न असणारा शरण, सुशीलः = सुशील म्हणून, उच्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : पतिव्रतेचे शील जसे तिच्या पतीवरील प्रेमामुळे दिसून येते, त्याप्रमाणेच शिवावरील दृढभक्तीमुळे भक्ताची सुशीलता स्पष्ट होते.॥३४॥



**पतिं विना यथा स्त्रीणां सेवान्यस्य तु गर्हणा।**
**शिवं विना तथान्येषां सेवा निन्द्या कृतात्मनाम्।।३५।।**

**अन्वयार्थ** : स्त्रीणां = स्त्रियांना, पतिं विना = पतीशिवाय, यथा = जसे, अन्यस्य = अन्य पुरुषाची, सेवा तु = सेवा करणे, गर्हणा = निंदिले जाते, तथा = तसेच, कृतात्मनां = कृतकृत्य अशा शरणांना, शिवं विना = शिवाखेरीज, अन्येषां = अन्य देवांची, सेवा = सेवा करणे, निन्द्या = निंदनीय होते.

**भावार्थ** : स्त्रियांनी आपल्या पतिशिवाय अन्य पुरुषाची सेवा करणे जसे निषिद्ध आहे, तसेच कृतकृत्य अशा शरणाला शिवलिंगाशिवाय इतर देवांची पूजा करणे निषिद्ध आहे.॥३५॥

**बहुनात्र किमुक्तेन शिवज्ञानैकनिष्ठता।**
**शीलमित्युच्यते सद्भिः शीलवांस्तत्परो मतः।।३६।।**

**अन्वयार्थ** : अत्र = ह्या शीलाविषयी, बहुना = अधिक, उक्तेन = सांगण्याचे, किम् = काय प्रयोजन? शिवज्ञानैकनिष्ठता = शिवज्ञानावर निष्ठा ठेवणे हे, शीलमिति = शील म्हणून, सद्भिः = सत्पुरुषांकडून, उच्यते = सांगितले जाते, तत्परः = त्यात आसक्त असणारा, शीलवान् = शीलवान असे, मतः = म्हटले जाते.

**भावार्थ** : शीलाविषयी अधिक काय सांगावे? श्रीगुरूने निर्देश केल्याप्रमाणे केवळ शिवावरच दृढ निष्ठा ठेवणे या गुणास शील म्हणावे आणि शील अंगी असणाऱ्यास शीलवान म्हणावे, असे सज्जनांचे म्हणणे आहे.॥३६॥

**शिवात्मबोधैकरतः स्थिराशयः**
**शिवं प्रपन्नो जगतामधीशम्।**
**शिवैकनिष्ठाहितशीलभूषणः**
**शिवैक्यवानेष हि कथ्यते बुधैः।।३७।।**

**अन्वयार्थ** : शिवात्मबोधैकरतः = लिंगांगज्ञानात निष्ठा ठेवून, जगतामधीशं = जगाचा अधीश्वर अशा, शिवं = शिवाला, प्रपन्नः = शरण गेलेला, स्थिराशयः = स्थिरभावयुक्त, शिवैकनिष्ठाहितशीलभूषणः = शिवावरील एकनिष्ठेचे आभूषण

धारण केलेला, एषः = हा शरण, बुधैः = शिवशास्त्रज्ञांकडून, शिवैक्यवान् = शिवैक्य स्थिती प्राप्त झालेला असा, कथ्यते = म्हणविला जातो.

**भावार्थ** : लिंगांगज्ञानातच एकनिष्ठा असलेला, जगाचा अधीश्वर असणाऱ्या शिवालाच शरण गेलेला, स्थिर मनाचा, अर्थात् स्वतः आणि शिवामध्ये सतिपतिभाव दृढतेने मानणारा, शिवाच्या ठिकाणी एकनिष्ठरूप शीलाचे अलंकार धारण करणारा शरणच पुढे ऐक्यस्थली पोचतो, असे शिवशास्त्रज्ञानी लोक म्हणतात.।।३७।।

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ शरणस्थले शरणस्थलादिचतुर्विधस्थलप्रसङ्गो नाम त्रयोदशः परिच्छेदः।***

**तेरावा परिच्छेद समाप्त.**

ooo

# चौदावा परिच्छेद

### अंगस्थलान्तर्गत

## ऐक्यस्थल

**अगस्त्य उवाच —**

**तामसत्यागसम्बन्धान्निर्देशाच्छीलतस्तथा।**
**शरणाख्यस्य भूयोऽस्य कथमैक्यनिरूपणम्।।१।।**

**अन्वयार्थ** : तामसत्यागसम्बन्धात् = तमोगुण निरसनाने, निर्देशात् = ज्ञान-निर्देशाने, तथा = तसेच, शीलतः = शीलसंपादनाने, भूयः = पुन्हा, अस्य = ह्या, शरणाख्यस्य = शरण नावाच्या साधकाच्या, ऐक्यनिरूपणं = ऐक्य स्थितीचे वर्णन, कथं = कसे असते?

**भावार्थ** : अगस्त्य म्हणतात— हे आचार्यवर आपण शरणाचे तामसगुण निरासक ज्ञानाचा निर्देश आणि शीलसंपादन वगैरे स्थलांचे वर्णन सांगितले. एवढ्यानेच त्याला ऐक्याची प्राप्ती कशी होते ते समजावून सांगावे.।।१।।

**श्रीरेणुक उवाच —**

**प्राणलिङ्गादियोगेन सुखातिशयमेयिवान्।**
**शरणाख्यः शिवेनैक्यभावनादैक्यवान् भवेत्।।२।।**

**अन्वयार्थ** : प्राणलिङ्गादियोगेन = अंतर्लिंगाच्या ध्यानयोगाने, सुखातिशय-मेयिवान् = अतिशय शिवसुख प्राप्त करून घेतलेला, शरणाख्यः = शरण नावाचा साधक, शिवेन = शिवाशी, ऐक्यभावना = अभेद भावनेने, ऐक्यवान् = ऐक्य स्थिती प्राप्त झालेल्या, भवेत् = होतो.

**भावार्थ** : श्रीरेणुकाचार्य सांगातात— शरण स्थावरादी बाह्यलिंगांकडे विमुख होऊन, इष्ट-प्राण-भावलिंगाची पूजा, ध्यान, योग केल्यामुळे शिवानंद-रस-परिपूर्ण होऊन शिवलिंगाशी एकत्व पावल्याने अखंडपणे चिंतन केल्यामुळे ऐक्यस्थितीला पोचतो.।।२।।

**ऐक्यस्थलमिदं प्रोक्तं चतुर्धा मुनिपुङ्गव।**
**ऐक्यमाचारसम्पत्तिरेकभाजनमेव च।।**
**सहभोजनमित्येषां क्रमाल्लक्षणमुच्यते।।३।।**

**अन्वयार्थ** : मुनिपुङ्गव = हे मुनिश्रेष्ठा, इदं = हे, ऐक्यस्थलं = ऐक्यस्थल, ऐक्यं = ऐक्यस्थल, आचारसम्पत्तिः = आचारसंपत्तिस्थल, एकभाजनं = एकभाजनस्थल, च = आणि, सहभोजनं = सहभोजनस्थल, असे चतुर्धा = चार प्रकारचे, प्रोक्तं = सांगितले आहे, एषां = ह्यांचे, क्रमात् = क्रमाने, लक्षणं = लक्षण, उच्यते = सांगितले जाते.

**भावार्थ** : हे ऋषिश्रेष्ठा, ऐक्यस्थलाचे चार पोटभेद आहेत, ते असे- १. ऐक्यस्थल, २. आचारसंपत्तिस्थल, ३. एकभाजनस्थल आणि ४. सहभोजनस्थल. या चोहोंची क्रमाक्रमाने लक्षणे सांगतो.॥३॥

**ऐक्यस्थल - (४१)**

**विषयानन्दकणिकानिःस्पृहो निर्मलाशयः।**
**शिवानन्दमहासिन्धुमज्जनादैक्यमुच्यते ।।४।।**

**अन्वयार्थ** : विषयानन्दकणिका = क्षुद्र अशा शब्दस्पर्शादी विषयांत, निःस्पृहः = विरक्त होऊन, निर्मलाशयः = निर्मल चित्ताच्या शरणाचे, शिवानन्द-महासिन्धु = शिवानंदरूपी महासागरात, मज्जनात् = सामरस्याने प्रवेश करणे, ऐक्यं = ऐक्य म्हणून, उच्यते = म्हटले जाते.

**भावार्थ** : जो शरण विषयसुखाला तुच्छ मानतो, ज्याचे मन निःस्पृह आणि निष्पाप असून, जो शिवानंदाच्या महासमुद्रात नेहमी बुडालेला असतो, त्याच्या त्या स्थितीला ऐक्यस्थल असे म्हणतात.॥४॥

**निर्धूतमलसम्बन्धो निष्कलङ्कमनोगतः।**
**शिवोऽहमिति भावेन निरूढो हि शिवैक्यताम्।।५।।**

**अन्वयार्थ** : निर्धूतमलसम्बन्धः = आणवादी मलांचा संबंध नसलेला, निष्कलङ्कमनोगतः = कलंकरहित मनोवृत्तीचा, शिवोऽहमिति = मी शिव आहे अशा, भावेन = भावनेने युक्त शरण, शिवैक्यताम् = शिवलिंगाशी ऐक्यस्थिती, निरूढो हि = प्राप्त करतो.



**भावार्थ** : ज्याचे आणवमल, मायामल आणि कार्मिकमल नाहीसे होऊन जो परिशुद्ध झालेला असतो, ज्याचे मन निष्पाप असते, जो शिवोऽहं भावनेने शिवलिंगाशी ऐक्य पावल्याचे निरंतर चिंतन करतो, अशा शरणास ऐक्य स्थितीची प्राप्ती होते.॥५॥

**शिवेनैक्यं समापन्नश्चिदानन्दस्वरूपिणा।**
**न पश्यति जगज्जालं मायाकल्पितवैभवम्।।६।।**

**अन्वयार्थ** : चिदानन्दस्वरूपिणी = सच्चिदानंदरूपी, शिवेन = शिवाशी, ऐक्यं = सामरस्य, समापन्नः = प्राप्त करून घेतलेला ऐक्यस्थली, मायाकल्पित-वैभवं = मायाशक्तीचे वैभवरूप, जगज्जालं = जगाला, न पश्यति = पाहात नाही.

**भावार्थ** : सच्चिदानंदस्वरूपी शिवाशी ऐक्य पावलेल्या शरणाच्या दृष्टीला मायेने निर्माण झालेला जगाचा पसारा, त्याचे वैभव दिसत नसून त्याला सर्व जग शिवमय दिसते.॥६॥

**ब्रह्माण्डबुद्बुदोद्भेदविजृम्भी तत्त्ववीचिमान्।**
**मायासिन्धुर्लयं याति शिवैक्यवडवानले।।७।।**

**अन्वयार्थ** : ब्रह्माण्ड = ब्रह्मांडरूपी, बुदबुदोद्भेद = बुडबुड्यांच्या उद्भवण्याने, विजृम्भी = वाढलेला, तत्त्ववीचिमान् = छत्तीस तत्त्वरूपी तरंगांनी युक्त, मायासिन्धुः = मायारूपी समुद्र, शिवैक्यवडवानले = शिवैक्यस्थितिरूपी वडवाग्नीत, लयं याति = लय पावतो.

**भावार्थ** : अनेक ब्रह्मांडरूपी बुडबुडे आणि छत्तीस तत्त्वांचे तरंग असणारा मायारूपी समुद्र त्या शिवैक्यरूपी वडवाग्नीत जळून नष्ट होतो. म्हणून शिवैक्य अवस्थेत मायानिर्मित सर्व प्रपंच नाहीसा होतो.॥७॥

**मायाशक्तितिरोधानाच्छिवे भेदविकल्पना।**
**आत्मनस्तद्विनाशे तु नाद्वैतात्किञ्चिदिष्यते।।८।।**

**अन्वयार्थ** : शिवे = शिवामध्ये, मायाशक्तितिरोधानात् = मायाशक्तीच्या आवरणाने, आत्मनः = जीवाच्या, भेदविकल्पना = भेदभाव उत्पन्न होतो,

तद्विनाशे = मायाप्रसरणाचा नाश झाल्यावर, अद्वैतात् = अद्वैताशिवाय, किञ्चित् = थोडा ही भेद, नेष्यते = असू शकत नाही.

**भावार्थ** : मायाशक्तीच्या आवरणाने जीव आणि शिव यांच्यात भेद दिसतो. त्या मायाशक्तीच्या संकोचाने त्या दोहोंतील भेद नाहीसा होऊन शिव आणि जीवात अभेद निर्माण होतो. त्यांच्यामध्ये किंचितही भेद उरत नाही.॥८॥

**पशुत्वं च पतित्वं च मायामोहविकल्पितम्।**
**तस्मिन् प्रलयमापन्ने कः पशुः को नु वा पतिः॥९॥**

**अन्वयार्थ** : पशुत्वं = पशुभाव, च = आणि, पतित्वं = पतिभाव हे दोन्ही, मायामोहविकल्पितम् = मायामोहाने कल्पिलेले आहेत, तस्मिन् = ते मायामोह, प्रलयामापन्ने = विलय झाल्यावर, कः पशुः = पशू कोण? को नु वा पतिः = अथवा पती तरी कोण?

**भावार्थ** : पशुपण किंवा पतिपणा हा भेद मायेच्या भ्रांतीतून कल्पिला गेला आहे. ती मायाभ्रांती नाहीशी झाली म्हणजे पशू तरी कोण आणि पती तरी कोण? म्हणजेच ऐक्यस्थली जीव व शिव एकरूपच असतात.॥९॥

**घोरसंसारसर्पस्य भेदवल्मीकशायिनः।**
**बाधकं परमाद्वैतभावना परमौषधम्॥१०॥**

**अन्वयार्थ** : भेदवल्मीकशायिनः = भेदरूपी वारुळात वास करणाऱ्या, घोरसंसारसर्पस्य = भयानक अशा संसाररूपी सर्पाला, बाधकं = नाहीसा करणारे, परं = श्रेष्ठ, औषधं = औषध म्हणजे, परमाद्वैतभावना = श्रेष्ठ असा जडचेतनाचा ऐक्यभाव होय.

**भावार्थ** : जड आणि जडातील भेद, जीव आणि जीवातील भेद, जीव आणि जडातील भेद, जीव आणि ईश्वरातील भेद व जड आणि ईश्वरातील भेद अशा पंचविध भेदरूपी वारुळात जन्ममरणात्मक संसाररूपी भयंकर साप आहे. त्यावर खात्रीचे औषधे म्हणजे परमाद्वैत-भावना अर्थात् जडचेतनातील ऐक्यभाव हे होय.॥१०॥



**भेदबुद्धिसमुत्पन्नमहासंसारसागरम्।**
**अद्वैतबुद्धिपोतेन समुत्तरति देशिकः॥११॥**

**अन्वयार्थ** : भेदबुद्धिसमुत्पन्न = भेदबुद्धीने उत्पन्न झालेल्या, महासंसार-सागरं = संसाररूपी महासागराला, देशिकः = शिवैक्यभाव असलेला देशिक, अद्वैतबुद्धिपोतेन = अद्वैतबुद्धिरूपी नावेने, समुत्तरति = तरून जातो.

**भावार्थ** : भेदबुद्धीतून उत्पन्न झालेला संसाररूपी महासागर ऐक्यस्थिती प्राप्त झालेला देशिक अद्वैतबुद्धिरूपी नावेतून तरून जातो.॥११॥

**अज्ञानतिमिरोद्रिक्ता कामरक्षःक्रियाकरी।**
**संसारकालरात्रिस्तु नश्येदद्वैतभानुना॥१२॥**
**तस्मादद्वैतभावस्य सदृशो नास्ति योगिनाम्।**
**उपायो घोरसंसारमहातापनिवृत्तये॥१३॥**

**अन्वयार्थ** : अज्ञानतिमिरोद्रिक्ता = अज्ञानरूपी गाढ अंधःकाराने उत्पन्न झालेला, कामरक्षःक्रियाकरी = कामरूपी राक्षसी कृत्य करणारी, संसारकालरात्रिः = संसारूपी काळरात्र, अद्वैतभानुना = शिवाद्वैत सूर्याने, नश्येत् = नष्ट होते, तस्मात् = त्यासाठी, घोरसंसारमहातापनिवृत्तये = भयानक अशा संसाररूपी तापाच्या निवृत्तीसाठी, योगिनां = शिवयोग्यांना, अद्वैतभावस्य = शिवाद्वैत भावाच्या, सदृशः = समान, उपायः = उपाय, नास्ति = नाही.

**भावार्थ** : अज्ञानांधःकाराने व्यापलेली आणि मदनरूप राक्षसाची शक्ती वाढविणारी संसाररूपी काळीकुट्ट रात्र अद्वैतज्ञानरूपी सूर्याच्या प्रकाशामुळे नाहीशी होते. यावरून स्पष्ट होते की, शिवयोग्यांना घोर संसारातील महासंकटे दूर करण्यास अद्वैतभावनेसारखा दुसरा उपाय नाही.॥१२-१३॥

**अद्वैतभावनाजातं क्षणमात्रेऽपि यत्सुखम्।**
**तत्सुखं कोटिवर्षेण प्राप्यते नैव भोगिभिः॥१४॥**
**चित्तवृत्तिसमालीनजगतः शिवयोगिनः।**
**शिवानन्दपरिस्फूर्तिर्मुक्तिरित्यभिधीयते॥१५॥**

**अन्वयार्थ** : अद्वैतभावनाजातं = शिवाद्वैत भावनेने उत्पन्न, क्षणमात्रेऽपि = एका क्षणात, यत्सुखं = जे सुख, प्राप्यते = प्राप्त होते, तत्सुखं = ते सुख, भोगिभि: = राजभोग्यांना, कोटिवर्षेण = एक कोटी वर्षात, नैव = प्राप्त होत नाही, चित्तवृत्तिसमालीनजगत: = ज्याच्या मनोवृत्तीत सर्व जगच सामावलेले आहे अशा, शिवयोगिन: = शिवयोग्याच्या, शिवानन्दपरिस्फूर्ति: = शिवानंदाच्या स्फुरणाला, मुक्तिरिति = मुक्ती असे, अभिधीयते = म्हणतात.

**भावार्थ** : एका क्षणाच्या अद्वैतभावनेपासून उत्पन्न झालेले जे सुख असते ते विषयभोग्याला एक कोटी वर्षांतही लाभत नाही. ज्याच्या मनोवृत्तीत सर्व जगच सामावलेले आहे त्या शिवयोग्याला शिवानंदाचे जे परिस्फुरण होते, त्यालाच मुक्ती म्हणतात.॥१४-१५॥

### आचारसंपत्तिस्थल - (४२)

**शिवैकभावनापन्नशिवत्वे देहवानपि।**
**देशिको हि न लिप्येत स्वाचारै सूतकादिभि:॥१६॥**

**अन्वयार्थ** : शिवैकभावना = शिवसागरस्य भावना, आपन्न = प्राप्त झालेला, शिवत्व: = शिवत्व असलेला, देशिक: = ऐक्यस्थली साधक, देहवानपि = शरीर असून सुद्धा, सूतकादिभि: = जननादी सूतकांनी, आणि स्वाचरै: = आपल्या स्वैराचाराने, न हि लिप्यते = लिप्त होत नाही.

**भावार्थ** : शिवसामरस्यभावनेने शिवैक्य म्हणजे शिवत्व प्राप्त झालेला देशिक देह धारण केलेला असला तरी तो जीवन्मुक्त असल्याने स्वत:च्या आचाराने आणि जननमरणादी पंचसूतकांपासून अलिप्त असतो. त्याच्या आचारांना कोणत्याही प्रकारचे सूतक बाधक होत नाही.॥१६॥

**शिवाद्वैतपरिज्ञाने स्थिते सति मनस्विनाम्।**
**कर्मणा किं नु भाव्यं स्यादकृतेन कृतेन वा॥१७॥**

**अन्वयार्थ** : मनस्विनां = शिवज्ञान्यांना, शिवाद्वैतपरिज्ञाने = शिवाद्वैताचे ज्ञान, स्थिते सति = स्थिर झाल्यावर, अकृतेन कर्मणा = दुष्कर्मामुळे, वा = अथवा, कृतेन = सत्कर्मामुळे, किं नु भाव्यं स्यात् = काय होणार आहे?



**भावार्थ** : लिंगैक्य भावनेत मनोव्यापार लय पावलेल्या ज्ञान्यांना शिवाद्वैतज्ञान दृढ झाल्यावर त्यांच्याकडून आचरल्या जाणाऱ्या दुष्कर्म अथवा सत्कर्मापासून कोणतेच फळ निष्पन्न होत नाही. म्हणजेच त्यांचे मन कोणत्याही कर्मात लिप्त झालेले नसते.॥१७॥

**शम्भोरेकत्वभावेन सर्वत्र समदर्शन:।**
**कुर्वन्नपि महाकर्म न तत्फलमवाप्नुयात्॥१८॥**

**अन्वयार्थ** : सर्वत्र = सगळीकडे, समदर्शन: = समदृष्टी ठेवणारा ऐक्यस्थली, शम्भो: = शिवाशी, एकत्वभावेन = ऐक्यभावनेने युक्त होऊन, महाकर्म = पुण्यपापरूपी मोठे कर्म, कुर्वन्नपि = करीत असला तरी, तत्फलं = त्याचे फळ त्याला, नाप्नुयात् = लागत नाही.

**भावार्थ** : शिवाशी ऐक्य साधले असल्यामुळे सर्वत्र शिवच परिपूर्णपणे व्यापलेला आहे असे जाणून सर्वांशी समत्व बुद्धीने वागणाऱ्या योग्याला, त्याने कोणतेही मोठे पुण्य अथवा पापकर्म केले तरी त्याचे फळ भोगावे लागत नाही.॥१८॥

**सुकृती दु:ष्कृती वापि ब्राह्मणो वान्त्यजोऽपि वा।**
**शिवैकभावयुक्तानां सदृशो भवति ध्रुवम्॥१९॥**

**अन्वयार्थ** : शिवैकभावयुक्तानां = शिवैक्य भावनेने युक्त असलेल्यांना, सुकृती = पुण्यात्मा असो, वापि = अथवा, दुष्कृती = पापात्मा असो, वा = अथवा, ब्राह्मण: = ब्राह्मण असो, वा = अथवा, अन्त्यजोऽपि = अंत्यजही असो, तो ध्रुवं = निश्चयाने, सदृश्य: = समान, भवति = होतो.

**भावार्थ** : शिवाशी ऐक्य पावलेल्या शिवाद्वैतज्ञानयुक्त शिवयोग्याला कोणी पुण्यवान असो की पापी असो, ब्राह्मण असो किंवा अंत्यज असो, सारेजण सारखेच असतात, यात कसलाही संशय नाही.॥१९॥

**वर्णाश्रमसदाचारैर्ज्ञानिनां किं प्रयोजनम्।**
**लौकिकस्तु सदाचार: फलाभावेऽपि भाव्यते॥२०॥**

**अन्वयार्थ** : ज्ञानिनां = शिवज्ञान्यांना, वर्णाश्रमसदाचारैः = वर्णाश्रमादींच्या सदाचारांचे, किं प्रयोजनम् = काय प्रयोजन? लौकिकः = लौकिक, सदाचारः = नित्य-नैमित्तिक सदाचार, फलाभावेऽपि = फळ मिळत नसेल तरी, भाव्यते = केले जातात.

**भावार्थ** : शिवाद्वैतज्ञान प्राप्त झालेल्या शिवयोग्यांना ब्राह्मणादी वर्ण आणि ब्रह्मचर्यादी आश्रमाचे सदाचार पाळण्याचे काय प्रयोजन? काही नाही. कारण लौकिक व्यवहारात ज्याप्रमाणे नित्य नैमित्तिक कर्मांचे फळ मिळत नसूनही लोक ती कर्मे आचरतात, तद्वत् वर्णाश्रमांच्या सदाचार-आचरणाने शिवयोग्यांना काही फळाची अपेक्षा नसते, तरीही त्यांचे आचरण ते करीत असतात. परंतु त्यांनी ते केलेच पाहिजे असे बंधनकारक नाही.॥२०॥

**निर्दग्धकर्मबीजस्य निर्मलज्ञानवह्निना।**
**देहिवद्भासमानस्य देहयात्रा तु लौकिकी।।२१।।**

**अन्वयार्थ** : निर्मल = निर्मल अशा, ज्ञानवह्निना = ज्ञानरूपी अग्नीने, निर्दग्धकर्मबीजस्य = ज्याचे कर्मबीज जळून गेले आहे असा, देहिवद्भा-समानस्य = शरीरधारी दिसत असणाऱ्या शिवज्ञान्याचे, देहयात्रा = शरीरव्यवहार, लौकिकी = अस्थिर होत.

**भावार्थ** : दग्धपट न्यायाने विशुद्ध ज्ञानरूपी अग्नीने त्याचे कर्मरूप बीज जळून गेलेले आहे, असा मनुष्य जरी देहधारी दिसत असला तरी त्याचे लौकिक आचरण लोकांना दिसण्यापुरते असते. वास्तविक त्याचा कर्माचरणाशी काही संबंध उरलेला नसतो. म्हणून त्याने नित्यनैमित्तिक कर्मे केली नाहीत तरी त्याला पाप लागत नाही.॥२१॥

**शिवज्ञानसमापन्नस्थिरवैराग्यलक्षणः।**
**स्वकर्मणा न लिप्येत पद्मपत्रमिवाम्भसा।।२२।।**

**अन्वयार्थ** : शिवज्ञान = शिवज्ञानाने, समापन्न = प्राप्त झालेल्या, स्थिर = स्थिर अशा, वैराग्यलक्षणः = वैराग्यलक्षणांनी युक्त ऐक्यस्थली, स्वकर्मणा = आपल्या कर्माने, अम्भसा = पाण्याने, पद्मपत्रमिव = कमळाच्या पानासारखा, न लिप्यते = लिप्त होत नाही.



**भावार्थ** : पाण्यात असणारे कमळाचे पान जसे पाण्याने भिजत नाही, त्याप्रमाणे शिवाच्या अद्वैतज्ञानाने उत्पन्न झालेले दृढ वैराग्य ज्याच्या मनात पूर्णपणे बिंबले आहे, त्याने कोणतेही कर्म केले तरी तो त्याच्या फलापासून अलिप्त असतो.॥२२॥

**गच्छंस्तिष्ठन् स्वपन् वापि जाग्रन् वापि महामतिः।**
**शिवज्ञानसमायोगाच्छिवपूजापरः सदा।।२३।।**

**अन्वयार्थ** : महामतिः = महाज्ञानी असा ऐक्यस्थली, गच्छन् = जाताना, तिष्ठन् = थांबला असताना, स्वपन् = निद्रेत असताना, जाग्रन् = जागा असताना, सदा = नेहमी, शिवज्ञानसमायोगात् = शिवज्ञानाने युक्त होऊन, शिवपूजापरः = शिवपूजानिष्ठ असतो.

**भावार्थ** : शिवसामरस्य पावलेला शिवयोगी वाटेने जात असो, एके ठिकाणी बसलेला असो, झोपलेला असो, त्याला शिवज्ञान प्राप्त झाले असल्यामुळे तो नेहमी शिवपूजाच करीत असतो.॥२३॥

**यद्यत्पश्यति सामोदं वस्तु लोकेषु देशिकः।**
**शिवदर्शनसम्पत्तिस्तत्र तत्र महात्मनः।।२४।।**

**अन्वयार्थ** : देशिकः = शिवज्ञानी, लोकेषु = जगात, यद्यद्वस्तु = ज्या ज्या घटपटादी वस्तूंना, सामोदं = आनंदाने, पश्यति = पाहतो, तत्र तत्र = त्या त्या वस्तूत, महात्मनः = महात्मा अशा ऐक्यस्थली साधकाला, शिवदर्शनसंपत्तिः = शिवदर्शनरूपी संपत्तीची, प्रतीती होते.

**भावार्थ** : शिवैक्य स्थितीतील देशिक व्यवहारात घटपटादी ज्या ज्या वस्तू आनंदयुक्त अंतःकरणाने पाहत असतो, त्या सर्व वस्तूंमध्ये त्याला शिवाच्याच दर्शनसंपत्तीचा लाभ होत असतो. अर्थात् त्याची बुद्धी चिन्मय झालेली असल्यामुळे त्याच्या दृष्टीला शिवाशिवाय अन्य कोणतीही वस्तू जगात दिसत नाही.॥२४॥

**यद्यच्चिन्तयते योगी मनसा शुद्धभावनः।**
**तत्तच्छिवमयत्वेन शिवध्यानमुदाहृतम्।।२५।।**

**अन्वयार्थ** : शुद्धभावन: = निर्मल भावनेचा, योगी = शिवयोगी, मनसा = आपल्या मनाने, यद्यच्चिन्तयते = ज्याचे ज्याचे चिंतन करतो, तत्तत् = ते ते, शिवमयत्वेन = शिवमय असल्याने ते त्याचे, शिवध्यानम् = शिवध्यानच, उदाहृतम् = म्हटले पाहिजे.

**भावार्थ** : शिवयोगी शुद्ध मनाने जे जे चिंतितो, ते ते सर्व शिवमय असल्याने ते त्याचे शिवध्यानच होय.॥२५॥

**यत्किञ्चिद्भाषितं लोके स्वेच्छया शिवयोगिना।**
**शिवस्तोत्रमिदं सर्वं यस्मात् सर्वात्मक: शिव:।।२६।।**

**अन्वयार्थ** : शिवयोगिना = शिवयोग्यांकडून, स्वेच्छया = आपल्या इच्छेने, लोके = जगात, यत्किञ्चित् = जे काही, भाषितं = बोलले जाते, इदं सर्वं = हे सर्व, शिवस्तोत्रं = शिवस्तोत्र होय, यस्मात् = कारण की, शिव: = शिव, सर्वव्यापक आहे.

**भावार्थ** : तो शिवयोगी स्वेच्छेने लोकांमध्ये जे काही बोलतो ते सर्व शिवस्तोत्रासारखेच. कारण शिव हा सर्वात्मक व सर्वव्यापी आहे.॥२६॥

**या या चेष्टा समुत्पन्ना जायते शिवयोगिनाम्।**
**सा सा पूजा महेशस्य सर्वदा तद्गतात्मनाम्।।२७।।**

**अन्वयार्थ** : तद्गतात्मनां = शिवलिंगाशी ऐक्य पावलेल्या, शिवयोगिनां = शिवयोग्यांची, या या चेष्टा = जी जी क्रिया, समुत्पन्ना जायते = होते, सा सा = ती ती क्रिया, महेशस्य = शिवलिंगाची, सर्वदा = नेहमी होणारी, पूजा = पूजा होय.

**भावार्थ** : शिवयोग्याचे मन सदैव शिवस्वरूपात निमग्न असल्याने त्याच्या हातून कळत नकळत ज्या काही क्रिया घडतात त्या सर्व शिवपूजा स्वरूपच असतात.॥२७॥

### एकभाजनस्थल - (४३)

**विश्वं शिवमयं चेति सदा भावयतो धिया।**
**शिवैकभाजनात्मत्वादेकभाजनमुच्यते ।।२८।।**



**अन्वयार्थ** : विश्वं = विश्व, शिवमयं चेति = शिवमय आहे म्हणून, धिया = एकाग्र बुद्धीने, सदा = नेहमी, भावयत: = अनुभवणाऱ्याच्या, शिवैकभाजनात्मत्वात् = शिवच एक आश्रय असल्याच्या जाणिवेला, एकभाजनमुच्यते = एकभाजन असे म्हटले जाते.

**भावार्थ** : हे विश्व शिवमय आहे असे सदैव एकाग्रबुद्धीने अनुभवल्या जाणाऱ्या जगातील सर्व वस्तूंना शिवच एकमेव आश्रयस्थान असल्याचे अनुभवास येण्याच्या अवस्थेला एकभाजनस्थल असे म्हणतात.॥२८॥

**स्वस्य सर्वस्य लोकस्य शिवस्याद्वैतदर्शनात्।**
**एकभाजनयोगेन प्रसादैक्यमतिर्भवेत्।।२९।।**

**अन्वयार्थ** : स्वस्य = आपल्या, सर्वस्य लोकस्य = संपूर्ण लोकांच्या, शिवस्य = शिवाच्या, अद्वैतदर्शनात् = ऐक्यरूपाच्या अनुभवाने, एकभाजनयोगेन = एकभाजन स्थिती प्राप्त झाल्यावर, प्रसादैक्यमति: = प्रसादविषयी ऐक्यबुद्धी, भवेत् = होते.

**भावार्थ** : आपण स्वत:, सर्व लोक, जग आणि शिव या सर्वांत असणाऱ्या अद्वैताच्या अनुभूतीमुळे एकभाजनस्थलावस्थेत प्रसादाविषयी ऐक्यबुद्धी निर्माण होते. त्यामुळे आपला प्रसाद तो शिवप्रसाद, शिवप्रसाद तो आपला प्रसाद, त्याखेरीज आपणाहून निराळ्या भासणाऱ्या शिवभक्ताचा प्रसादही शिवप्रसादच अशी दृढभावना होते. म्हणूनच चरमूर्तीचे पादोदक लिंगाला व आपल्याला घेण्याची पद्धत वीरशैवाचारात प्रसिद्ध आहे. म्हणजेच ज्यांच्या ठिकाणी गुरू, लिंग व जंगम यांच्या प्रसादामध्ये ऐक्यबुद्धी जाणवत नाही, त्यांना शिवाद्वैतज्ञान होत नाही.॥२९॥

**शिवे विश्वमिदं सर्वं शिव: सर्वत्र भासते।**
**आधाराधेयभावेन शिवस्य जगत: स्थिति:।।३०।।**

**अन्वयार्थ** : शिवे = शिवामध्ये, इदं सर्वं विश्वं = हे संपूर्ण विश्व आणि, शिव: = शिव, सर्वत्र = सर्व प्रपंचात, भासते = प्रकाशित होतात, आधाराधेयभावेन = आधार-आधेय संबंधाने, शिवस्य = शिवाची आणि जगत: = जगाची, स्थिति: = स्थिती आहे.

**भावार्थ** : शिवामध्ये हे सर्व विश्व स्थित आहे आणि सर्व चराचरात शिव व्यापून राहिलेला आहे असे अनुभवास येते, म्हणून शिव आणि विश्व यांच्यात बीजांकुरन्यायाने परस्पर आधार-आधेय भावाचा संबंध आहे. अशा प्रकारे प्रपंच आणि परमात्मा सामरस्यरूपाने असतात.॥३०॥

**चित्तैकभाजनं यस्य चित्तवृत्ते: शिवात्मकम्।**
**नान्यत्तस्य किमेतेन मायामूलेन वस्तुना।।३१।।**

**अन्वयार्थ** : यस्य = ज्याचे, चित्तवृत्तेः = मनोव्यापाराला, शिवात्मकं = शिवस्वरूपी, चिदेकभाजनं = चैतन्य हाच एक विषय आहे, नान्यत् = अन्य काही नाही, तस्य = त्याला, मायामूलेन = मायेमुळे प्रतीत होणाऱ्या, एतेन = ह्या, वस्तुना = भेदक वस्तूंचे, किं = काय प्रयोजन?

**भावार्थ** : ज्याला आपल्या मनोवृत्तिरूपी ज्ञानाने हे सर्व जग शिवात्मरूप दिसते, दुसरे काहीही दिसत नाही, त्याला एकभाजनस्थिती प्राप्त झालेली असते. अशांना मायाकल्पित भेदांचे काही प्रयोजन नसते.॥३१॥

**चित् प्रकाशयते विश्वं तद्विना नास्ति वस्तु हि।**
**चिदेकनिष्ठचित्तानां किं मायापरिकल्पितैः।।३२।।**

**अन्वयार्थ** : विश्वं = घटपटादी विश्वाला, चित्प्रकाशयते = चैतन्यच प्रकाशित करते, तद्विना = त्या चैतन्यप्रकाशाशिवाय, वस्तु = घटपटादी वस्तू, नास्ति = नाहीत, चिदेकनिष्ठचित्तानां = केवल चैतन्यात निष्ठा ठेवणाऱ्यांना, मायापरिकल्पितैः = मायानिर्मित पदार्थांचे, किं = काय प्रयोजन?

**भावार्थ** : या घटपटादी प्रपंचाला परमात्म्याचे चैतन्यच प्रकाशित करते. त्या चैतन्याशिवाय जगातील कोणत्याच वस्तूची प्रतीती होत नाही. पाण्यात असलेले बुडबुडे, तरंग हे जसे पाण्यापेक्षा वेगळे नाहीत, तशा रीतीने हे विश्व शिवापासून उत्पन्न झालेले असल्यामुळे ते त्याच्यापेक्षा वेगळे नसून शिवस्वरूपच आहे, अशी चिदेकनिष्ठा असणाऱ्या शिवयोग्यांना मायाकल्पित वस्तूंचे काय प्रयोजन? काहीच नाही.॥३२॥



**वृत्तिशून्ये स्वहृदये शिवलीने निराकुले।**
**यः सदा वर्तते योगी स मुक्तो नात्र संशयः।।३३।।**

**अन्वयार्थ** : यः = जो, योगी = शिवयोगी, वृत्तिशून्ये = मनोव्यापाररहित, निराकुले = क्षोभरहित, शिवलीने = शिवलिंगात तल्लीन होऊन, स्वहृदये = आपल्या हृदयात, सदा = नेहमी, वर्तते = राहतो, सः = तो, मुक्तः = जीवन्मुक्त होय, अत्र = ह्याविषयी, न संशयः = संदेह नाही.

**भावार्थ** : ज्या शिवयोग्याचे हृदय विविध विचारतरंगांनी रहित, विकारविरहित, सर्व मनोवृत्तीं पासून मुक्त झालेले आहे व जो सदैव आत्मलीन वृत्तीत राहतो तो खरा जीवन्मुक्त होय, यात संशय नाही.॥३३॥

### सहभोजनस्थल - (४४)

**गुरोः शिवस्य शिष्यस्य स्वस्वरूपतया स्मृतिः।**
**सहभोजनमाख्यातं सर्वग्रासात्मभावतः।।३४।।**

**अन्वयार्थ** : गुरोः = गुरूला, शिवस्य = शिवलिंगाला, शिष्यस्य = शिष्याला, स्वस्वरूपतया = आपल्या आत्मरूपाने, स्मृतिः = पाहणे, सर्वग्रासात्मभावतः = अशा सर्वग्रासात्मभावाला, सहभोजनं = सहभोजन म्हणून, आख्यातम् = म्हटले जाते.

**भावार्थ** : श्रीगुरू, शिवलिंग आणि शिष्य यांचे स्वरूप माझ्या स्वरूपापासून भिन्न नाही अशी जी जाणीव होते, तिला सर्वग्रासात्मक भाव असे म्हणतात. या भावनेने प्रपंचातील सर्व भिन्नभिन्न घटपटादी वस्तूंच्या भेदभावनेचे ग्रसन करून ती सर्व रूपे स्वात्मस्वरूप आहेत, असे चिंतन करण्याला सहभोजन म्हणतात.॥३४॥

**शिवं विश्वं गुरुं साक्षाद्योजयेन्नित्यमात्मनि।**
**एकत्वेन चिदाकारे तदिदं सहभोजनम्।।३५।।**

**अन्वयार्थ** : साक्षात् = प्रत्यक्ष, चिदाकारे = चिद्रूप, आत्मनि = आपल्या आत्म्यात, शिवं = शिवाला, गुरुं = गुरूला, विश्वं = विश्वाला, एकत्वेन = एकरूपाने, नित्यं = नेहमी, योजयेत् = चिंतन करतो, तदिदं = अशा चिंतनाला, सहभोजनं = सहभोजन असे म्हणतात.

**भावार्थ** : साक्षात् चिदाकार अशा स्वात्मस्वरूपात शिव, गुरू आणि जगतासह सर्व मिळून एकरूपत्वाने जाणण्याला सहभोजन म्हणतात.॥३५॥

**अयं शिवो गुरुश्चैव जगदेतच्चराचरम्।**
**अहं चेति मतिर्यस्य नास्त्यसौ विश्वभोजकः।।३६।।**

**अन्वयार्थ** : अयं शिवः = हा शिव आहे, एष गुरुः = हा गुरू आहे, एतच्चराचरम् = हे चराचर, जगत् = विश्व आहे, च = आणि, अहम् = मी आहे, इति = अशा रीतीने, यस्य = ज्याची, मतिः = बुद्धी, नास्ति = नाही, असौ = असा हा, विश्वभोजकः = जगाचा भेदभक्षक होय.

**भावार्थ** : हा शिव आहे, हा गुरू आहे, हे जग आहे आणि मी त्यापेक्षा निराळा आहे अशी भेदबुद्धी ज्याच्या ठिकाणी मुळीच उरली नाही, त्याला विश्वभोजक अर्थात् जगाच्या भेदांचे भक्षण करणारा असे म्हणावे.॥३६॥

**अहं भृत्यः शिवः स्वामी शिष्योऽहं गुरुरेव वै।**
**इति यस्य मतिर्नास्ति स चाद्वैतपदे स्थितः।।३७।।**

**अन्वयार्थ** : अहं भृत्यः = मी सेवक आहे, शिवः स्वामी = शिव स्वामी आहे, अहं शिष्यः = मी शिष्य आहे, गुरुरेष वै = हा गुरू आहे, इति = अशा रीतीने, यस्य = ज्याची, मतिः = भेदबुद्धी, नास्ति = नाही, सः = तो, अद्वैतपदे स्थितः = अद्वैतस्थानी राहातो.

**भावार्थ** : शिव स्वामी आहे, मी सेवक आहे, तो गुरू आहे व मी शिष्य आहे, अशा तऱ्हेची भेदबुद्धी ज्याची मुळीच नसते त्यालाच शिवलिंगैक्य अद्वैत-पदावर, विश्वभेदग्रासात्मक शिवाद्वैतपदावर स्थिर झाला आहे असे म्हणावे.॥३७॥

**पराहन्तामये स्वात्मपावके विश्वभास्वति।**
**इदन्ताहव्यहोमेन विश्वहोमीति कथ्यते।।३८।।**

**अन्वयार्थ** : विश्वभास्वति = विश्वाला प्रकाशित करणारा, पराहन्तामये = उत्कृष्ट मूलाहंकाररूपी, स्वात्मपावके = आत्मरूपी अग्नीत, इदंताहव्य = इदंतारूप हव्यद्रव्याचे, होमेन = हवन केल्याने, विश्वहोमीति = विश्वहोमी म्हणून, कथ्यते = म्हणविला जातो.



**भावार्थ** : विश्वाला प्रकाशित करणाऱ्या उत्कृष्ट मूल अहंकाररूप स्वात्म-अग्नीत इदंतारूप (भेदबुद्धी) हव्य-द्रव्याची जो आहुती देतो त्याला विश्वहोमी असे म्हणावे.॥३८॥

**अहं शिवो गुरुश्चाहमहं विश्वं चराचरम्।**
**यया विज्ञायते सम्यक् पूर्णाहन्तेति सा स्मृता।।३९।।**

**अन्वयार्थ** : अहं शिवः = मी शिव आहे, अहं गुरुः = मी गुरू आहे, च = आणि, चराचरम् = चराचर, विश्वं = विश्व, अहं = मी आहे, अशारीतीने यया = ज्या अहंभावनेमुळे, सम्यक् = नीटपणे, विज्ञायते = जाणले जाते, सा = ती, पूर्णाहन्तेति = पूर्णाहंता म्हणून, स्मृता = म्हटली जाते.

**भावार्थ** : जिच्यामुळे मीच शंकर, मीच गुरू, मीच स्थावरजंगम विश्व आहे, अशी सर्वव्यापी अहंता जाणवते ती पूर्णाहंता होय.॥३९॥

**आधारवह्नौ चिद्रूपे भेदजातं जगद्धविः।**
**जुहोति ज्ञानयज्वा यः स ज्ञेयो विश्वहव्यभुक्।।४०।।**

**अन्वयार्थ** : चिद्रूपे = ज्ञानरूप, आधारवह्नौ = आज्ञाचक्रातील अग्नीमध्ये, भेदजातं = भेदसमूहरूपी, जगद्धविः = जगरूपी हवन द्रव्याचे, यः = जो, जुहोति = हवन करतो, सः = तो, विश्वहव्यभुक् = विश्वरूपी हवनद्रव्याचा, भोक्ता, ज्ञानयज्वा = ज्ञानयज्ञदीक्षित असे, ज्ञेयः = जाणणे योग्य आहे.

**भावार्थ** : आज्ञाचक्रात असलेल्या ज्ञानस्वरूप अशा अग्नीत मायाकल्पित अशा जगातील भेदरूप हविद्रव्याचे जो हवन करतो तोच विश्व-हविभोक्ता आणि ज्ञानयज्ञ-दीक्षित म्हणविण्यास योग्य होतो.॥४०॥

**चिदाकारे पराकाशे परमानन्दभास्वति।**
**विलीनचित्तवृत्तीनां का वा विश्वक्रमस्थितिः।।४१।।**

**अन्वयार्थ** : चिदाकारे = चिद्रूप, पराकाशे = हृदयाकाशात, परमानन्द-भास्वति = परमानंदमय महालिंगरूप सूर्यामध्ये, विलीनचित्तवृत्तीनां = मनोव्यापार विलीन झालेल्यांना, विश्वक्रमस्थितिः = विश्वाचा व्यवहार, का वा = कोणता?

**भावार्थ** : चैतन्यस्वरूप ऊर्ध्वहृत्कमलकर्णिकेत नित्यानंदमय अशा महालिंगरूप सूर्याचा उदय झाल्यावर त्यात ज्यांच्या चित्तवृत्ती विलीन झाल्या आहेत, अशा लिंगैक्य स्थितीतील शिवयोग्यांना बाह्य जगाच्या कोणत्याही व्यवहाराची जाणीव कशी असणार? अर्थात् असत नाही.॥४१॥

**निरस्तविश्वसम्बाधे निष्कलङ्के चिदम्बरे।**
**भावयेल्लीनमात्मानं सामरस्यस्वभावतः॥४२॥**
**सैषा विद्या परा ज्ञेया सत्तानन्दप्रकाशिनी।**
**मुक्तिरित्युच्यते सद्भिर्जगन्मोहनिवर्तिनी॥४३॥**

**अन्वयार्थ** : निरस्तविश्वसम्बाधे = जननमरणादी क्लेशरहित, निष्कलङ्के = दोशरहित, चिदम्बरे = चिदाकाशरूप महालिंगात, आत्मानं = अंगपदवाच्य स्वतःला, सारमसयस्वभावतः = समरसरूपाने, लीनं = लीन झाल्याची, भावयेत् = भावना करावी, सैषा = ती भावना, सत्तानन्दप्रकाशिनी = सच्चिदानंद-स्वरूप प्रकाशित करणारी, परा विद्या = पराविद्या म्हणून, ज्ञेया = जाणण्यायोग्य, जगन्मोहनिवर्तिनी = जगाची भेदभ्रांती दूर करणारी, मुक्तिरिति = परामुक्ती म्हणून, सद्भिः = सत्पुरुषांकडून, उच्यते = सांगितली जाते.

**भावार्थ** : जननमरणादी क्लेशविरहित, निष्कलंक, चिदाकाशस्वरूप महालिंगात अंग शब्दाने वाच्य होणारा स्वतःचा आत्मा, स्वतःच्या स्वरूपात कसल्याही हानि-वृद्धीची जाणीव नसताना सामरस्यभावनेने लीन झाला आहे, अशी भावना करावी. अशा तऱ्हेच्या अंग-लिंगातील सामरस्यभावनेला सच्चिदानंदस्वरूप अशी पराविद्या म्हणून ओळखतात. विश्वभेदाची निवृत्ती करणाऱ्या ह्या पराविद्येला सत्पुरुष परामुक्ती असे म्हणतात.॥४२-४३॥

**भक्तादिधामार्पितधर्मयोगात्**
**प्राप्तैकभावः परमाद्भुतेन।**
**शिवेन चिद्व्योममयेन साक्षान्**
**मोक्षश्रियो भाजनतामुपैति॥४४॥**



**अन्वयार्थ** : भक्तादिधामार्पितधर्मयोगात् = भक्तादी स्थलांत सांगितलेल्या सदाचारांचे परिपालन केल्यामुळे, चिद्व्योममयेन = चिदाकाशस्वरूप, परमाद्भुतेन = अत्यंत अद्भुत अशा, शिवेन = शिवलिंगाशी प्राप्तैकभावः = ऐक्यस्थिती प्राप्त करून घेतलेला ऐक्यस्थली, साक्षात् = साक्षात, मोक्षप्रियः = मोक्षलक्ष्मीचे, भाजनात् = आश्रयत्व, उपैति = मिळवितो.

**भावार्थ** : येथपर्यंत सांगितलेली भक्तादी सहा स्थाने व त्यांच्या ४४ अवांतर स्थलांतील वर्णिलेल्या सदाचारांचे क्रमाक्रमाने पालन करून ऐक्यभाव पावलेला भक्त परमाद्भुत शक्तियुक्त, चिदंबरस्वरूप शिवाच्या कृपेने मोक्षाचा धनी होतो. म्हणजेच षट्स्थलाच्या धर्माचरणाने शिवैक्य पावलेला मनुष्य शिवकृपेने मोक्ष पावतो.॥४४॥

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ ऐक्यस्थले ऐक्यस्थलादिचतुर्विधस्थलप्रसङ्गो नाम चतुर्दशः परिच्छेदः।***

**चौदावा परिच्छेद समाप्त.**

○○○

# पंधरावा परिच्छेद

## लिंगस्थलांतर्गत

## भक्तस्थल

**श्रीरेणुक उवाच—**

**षट्स्थलोक्तसदाचारसम्पन्नस्य यथाक्रमम्।**
**लिङ्गस्थलानि कथ्यन्ते जीवन्मुक्तिपराणि च।।१।।**

**अन्वयार्थ** : षट्स्थलोक्त = अंगषट्स्थलात सांगितलेल्या, सदाचार-सम्पन्नस्य = सदाचारांनी युक्त ऐक्यस्थलीची, जीवन्मुक्तिपराणि = जीवन्मुक्ती वर्णिणारी, लिङ्गस्थलानि = लिंगस्थले, यथाक्रमं = अनुक्रमाने, कथ्यतन्ते = सांगितली जातात.

**भावार्थ** : रेणुकाचार्य सांगतात— अंगषट्स्थलात जे जे सदाचार पाळावे म्हणून सांगितले आहेत, ते ते योग्य रीतीने पाळणाऱ्या जीवन्मुक्ती मिळवून देणारी लिंगस्थले (लिंगषट्स्थले) क्रमाने सांगितली जातात.।।१।।

**अगस्त्य उवाच—**

**भक्ताद्यैक्यावसानानि षडुक्तानि स्थलानि च।**
**लिङ्गस्थलानि कानीह कथ्यन्ते कति वा पुनः।।२।।**

**अन्वयार्थ** : भक्ताद्यैक्यावसानानि = भक्तापासून ऐक्यापर्यंत, स्थलानि = स्थले, षडुक्तानि = सहा सांगितली आहेत, इह = येथे, लिङ्गस्थलानि = लिंगस्थले, कानि = कोणती, पुनः = पुन्हा, कति वा = किती, कथ्यन्ते = सांगितली जातात?

**भावार्थ** : अगस्त्य विचारतात— आतापर्यंत भक्तस्थलापासून ऐक्य-स्थलापर्यंतची सहा स्थले विवरण करून सांगितली, आता लिंगस्थले कोणती व किती आहेत ते सांगावे.।।२।।

**गुर्वादिज्ञानशून्यान्ता भक्तादिस्थलसंश्रिताः।**
**स्थलभेदाः प्रकीर्त्यन्ते पञ्चाशत् सप्त चाधुना।।३।।**



**अन्वयार्थ** : भक्तादिस्थलसंश्रिताः = भक्तस्थलापासून ऐक्यस्थलापर्यंत असलेल्या षट्स्थलांना आश्रित असणारे, गुर्वादिज्ञानशून्यान्ताः = दीक्षा गुरुस्थला-पासून ज्ञानशून्यस्थला पर्यंत असणारे, सप्तपञ्चाशत् = सत्तावन प्रकारचे, स्थल-भेदाः = स्थलांचे भेद, अधुना = आता, प्रकीर्त्यन्ते = बोधिले जात आहेत.

**भावार्थ** : श्रीरेणुक म्हणतात— भक्तादी स्थलांना अनुसरून असणारे गुरुस्थल प्रथम आणि ज्ञानशून्यस्थल शेवटचे, असे एकूण सत्तावन भेद आता सांगत आहे.।।३।।

**आदौ नवस्थलानीह भक्तस्थलसमाश्रयात्।**
**कथ्यन्ते गुणसारेण नामान्येषां पृथक् शृणु।।४।।**

**अन्वयार्थ** : इह = लिंगषट्स्थलामध्ये, भक्तस्थलसमाश्रयात् = भक्तस्थलाला आश्रित असणारे, आदौ = अगोदर, नवस्थलानि = नऊ स्थले, गुणानुसारेण = श्रेष्ठत्व गुणानुसार, एषां = ह्यांची, पृथक् नामानि = वेगळी नावे, कथ्यन्ते = सांगितली जातात, शृणु = श्रवण कर.

**भावार्थ** : ह्या लिंगषट्स्थलांमध्ये भक्तस्थलास अनुसरून आधी नऊ स्थाने मानली आहेत. त्यांच्या गुणानुसार त्यांची वेगवेगळी नावे आहेत, ती मी येथे सांगतो, श्रवण कर.।।४।।

**दीक्षागुरुस्थलं पूर्वं ततः शिक्षागुरुस्थलम्।**
**प्रज्ञागुरुस्थलं चाथ क्रियालिङ्गस्थलं ततः।।५।।**
**भावलिङ्गस्थलं चाथ ज्ञानलिङ्गस्थलं ततः।**
**स्वयं चरं परं चेति तेषां लक्षणमुच्यते।।६।।**

**अन्वयार्थ** : पूर्वं = पहिले, दीक्षागुरुस्थलं = दीक्षागुरुस्थल, ततः = त्यानंतर, शिक्षागुरुस्थलं = शिक्षागुरुस्थल, अथ = नंतर, प्रज्ञागुरुस्थलं = प्रज्ञागुरुस्थल, ततः = नंतर, क्रियालिङ्गस्थलं = क्रियालिंगस्थल, अथ = त्यानंतर, भावलिङ्गस्थलं = भावलिंगस्थल, ततः = त्यानंतर, ज्ञानलिङ्गस्थलं = ज्ञानलिंगस्थल, स्वयं = स्वयस्थल, परं = परस्थल, च = आणि, चरं = चरस्थलं, इति = अशी (नऊ स्थले आहेत), तेषां = त्यांचे, लक्षणं = लक्षण, उच्यते = सांगितले जाते.

**भावार्थ** : ती नऊ स्थले अशी- १. दीक्षागुरुस्थल, २. शिक्षागुरुस्थल, ३. प्रज्ञागुरुस्थल, ४. क्रियालिंगस्थल, ५. भावलिंगस्थल, ६. ज्ञानलिंगस्थल, ७. स्वयस्थल, ८. परस्थल आणि, ९. चरस्थल. आता त्यांपैकी प्रत्येकाचे लक्षण सांगतो.।।५-६।।

**दीक्षागुरुस्थल - (४५)**

**दीयते परमं ज्ञानं क्षीयते पाशबन्धनम्।**
**यया दीक्षेति सा तस्यां गुरुर्दीक्षागुरुः स्मृतः।।७।।**

**अन्वयार्थ** : यया = जिच्यामुळे, परमं ज्ञानं = उत्कृष्ट असे शिवज्ञान, दीयते = दिल जाते, पाशबन्धनं = मलमायादी पाशांचे बंधन, क्षीयते = क्षीण होते, सा = ती, दीक्षेति = दीक्षा होय, तस्यां = ती दीक्षा देणारा, गुरुः = गुरू, दीक्षागुरुः स्मृतः = दीक्षागुरू समजला जातो.

**भावार्थ** : जिच्यामुळे परमोत्कृष्ट शिवज्ञान दिले जाते आणि त्रिमलादी पाशांचे भवबंधन तुटून जाते तिला दीक्षा असे म्हणावे. त्या चित्क्रियात्मक दीक्षेविषयी, शिवलिंग आणि शिवज्ञानाविषयी शिष्यास उपदेश देणारा, लिंगांगसामरस्य साधलेला व ती साधना शिष्यास देणारा, त्याला दीक्षागुरू असे म्हणतात.।।७।।

**गुणातीतं गुकारं च रूपातीतं रुकारकम्।**
**गुणातीतमरूपं च यो दद्यात् स गुरुः स्मृतः।।८।।**

**अन्वयार्थ** : गुकारं = गुकार, गुणातीतं = सत्त्वादिगुणरहित, च = आणि, रुकारं = रुकार, रूपातीतं = अशुद्ध मायारूपरहित, गुणातीतमरूपं = निर्गुण आणि निराकार अशा परमात्म्याचा, यः = जो, दद्यात् = उपदेश देतो, सः = तो, गुरुः स्मृतः = गुरू म्हटला जातो.

**भावार्थ** : गुरू शब्दातील 'गु' ह्या अक्षराने तो प्राकृत गुणातीत आहे असे समजावयाचे आणि 'रु' ह्या अक्षरावरून तो अशुद्ध मायारूपातीत आहे असे समजावे. ती गुणातीत व रूपातीत अशी चिन्मय वस्तू जो आपल्या उपदेशाने समजावून देतो, त्याला गुरू म्हणतात.।।८।।



**आचिनोति च शास्त्रार्थानाचारे स्थापयत्यलम्।**
**स्वयमाचरते यस्मादाचार्यस्तेन चोच्यते।।९।।**

**अन्वयार्थ** : यस्मात् = ज्यामुळे, शास्त्रार्थात् = वीरशैव शास्त्रांचा रहस्यार्थ, आचिनोति = संग्रह करून उपदेश करतो, आचारे = आचार पाळण्यात, अलं = चांगल्या रीतीने, स्थापयति = शिष्याचे नियमन करतो, च = आणि, स्वयं = स्वतः, आचरते = आचरण करतो, तेन = त्यामुळे, आचार्यः = आचार्य म्हणून, उच्यते = म्हणविला जातो.

**भावार्थ** : गुरू हा वीरशैवशास्त्रातील रहस्यार्थाचा संग्रह करतो, आपल्या शिष्यांना त्याचा उपदेश करून त्यांच्याकडून तसे आचरण करवितो व स्वतःही तसे आचरण करतो. म्हणून अशा गुरूला आचार्य असे म्हणतात.।।९।।

**षडध्वातीतयोगेन यतते यस्तु देशिकः।**
**मायाब्धितारणोपायहेतुर्विश्वगुरुः शिवः।।१०।।**

**अन्वयार्थ** : षडध्वातीतयोगेन = वर्णादी सहा अध्वांच्या अतीत असणाऱ्या शिवयोगाने, यः = जो, यतते = प्रयत्न करतो, अर्थात् निरंतर शिवयोगरत असतो, तो देशिकः = गुरू, मायाब्धितारणोपायहेतुः = मायासमुद्र तरून जाण्यास कारणीभूत असा, शिवः = शिवैक्य प्राप्त करून घतेलेला तो, विश्वगुरुः = जगद्गुरू होय.

**भावार्थ** : वर्णादी सहा अध्वांच्या अतीत अशा शिवयोगाने शिवैक्य भावनेत सदैव रत असणारा गुरूच प्रपंचाचा मायासमुद्र तरून जाण्याचा मार्ग दाखविणारा असल्यामुळे त्याला विश्वगुरू अथवा जगद्गुरू असे म्हणतात.।।१०।।

**अखण्डं येन चैतन्यं व्यज्यते सर्ववस्तुषु।**
**आत्मयोगप्रभावेण स गुरुर्विश्वभासकः।।११।।**

**अन्वयार्थ** : सर्ववस्तुषु = सर्व वस्तूंमध्ये, आत्मयोगप्रभावेण = स्वानुभव-बळाने, अखण्डं = सच्चिदानंदरूपी, चैतन्यं = चैतन्य, येन = ज्याच्याकडून, व्यज्यते = भासते, सः = तो, गुरुः = गुरू, विश्वभासकः = विश्वप्रकाशक होय.

**भावार्थ** : जगातील सर्व वस्तूंच्या ठिकाणी आपल्या आत्मानुभवाच्या सामर्थ्याने अखंड, सच्चिदानंदस्वरूप चैतन्य असल्याचे ज्याच्यामुळे प्रकाशमान होते अशा गुरूला विश्वप्रकाशक असे म्हणावे.॥११॥

**शिक्षागुरुस्थल - (४६)**

**दीक्षागुरुरसौ शिक्षाहेतुः शिष्यस्य बोधकः।**
**प्रश्नोत्तरप्रवक्ता च शिक्षागुरुरितीर्यते।।१२।।**

**अन्वयार्थ** : असौ = हा, दीक्षागुरुः = दीक्षागुरू, शिष्यस्य = शिष्याला, बोधकः = बोधक होऊन, प्रश्नोत्तरप्रवक्ता = शिष्याच्या प्रश्नाला उत्तर देऊन, शिक्षाहेतुः = शिष्याच्या शिक्षणाला कारण होत असल्यामुळे, त्याला शिक्षागुरुरिति = शिक्षागुरू असे, ईर्यते = म्हटले जाते.

**भावार्थ** : पूर्वोक्त दीक्षागुरू जेव्हा शिष्यास बोध व्हावयासाठी त्याने विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देऊन संशयनिवारण करतो व त्याला सुशिक्षित व अनुशासित करतो, तेव्हा त्या गुरूस शिक्षागुरू असे म्हणतात.॥१२॥

**बोधकोऽयं समाख्यातो बोध्यमेतदिति स्फुटम्।**
**शिष्यो नियुज्यते येन स शिक्षागुरुरुच्यते।।१३।।**

**अन्वयार्थ** : अयं = हे, बोधकः = शिवसिद्धान्ताचे बोधक असे, समाख्यातः = प्रसिद्ध, एतत् = शिवयोगज्ञान, बोध्यमिति = बोध्य म्हणून, स्फुटं = स्पष्ट आहे, इति = अशा रीतीने, येन = ज्या गुरूकडून, शिष्ये = शिष्याचे, नियुज्यते = नियमन केले जाते, सः = तो, शिक्षागुरुः = शिक्षागुरू होय, असे उच्यते = म्हटले जाते.

**भावार्थ** : शिवज्ञान हे बोध्य असून शिष्याला त्याचा बोध करणाऱ्या गुरूला बोधक म्हणतात. तसेच हा बोध्यबोधक भाव ज्या गुरूकडून शिष्याला उपदेशिला जातो त्याला शिक्षागुरू असे म्हणतात.॥१३॥

**संसारतिमिरोन्माथिशरच्चन्द्रमरीचयः ।**
**वाचो यस्य प्रवर्तन्ते तमाचार्यं प्रचक्षते।।१४।।**



**अन्वयार्थ** : यस्य = ज्याची, वाचः = उपदेशवचने, संसारतिमिरोन्माथि = संसाररूपी अंधाराला दूर करणाऱ्या, शरच्चन्द्रमरीचयः = शारदीय चंद्राच्या किरणासारखी, प्रवर्तन्ते = प्रकट होतात, तं = त्याला, आचार्यं = आचार्य म्हणून, प्रचक्षते = म्हटले जाते.

**भावार्थ** : ज्याच्या उपदेशाची वाक्ये संसाररूपी अंधाराचे निवारण करण्यासाठी शरदऋतूतील चंद्रकिरणासारखी असतात, त्यांना आचार्य असे म्हणावे.॥१४॥

**ददाति यः पतिज्ञानं जगन्मायानिवर्तकम्।**
**अद्वैतवासनोपायं तमाचार्यवरं विदुः।।१५।।**

**अन्वयार्थ** : यः = जो, जगन्मायानिवर्तकं = प्रापंचिक भेदभ्रांती दूर करणारे, अद्वैतवासनोपायं = अद्वैत भावनेला कारण असे, पतिज्ञानं = शिवज्ञान, ददाति = देतो अर्थात् उपेदिशतो, तं = त्याला, आचार्यवरं = श्रेष्ठ आचार्य म्हणून, विदुः = जाणतात.

**भावार्थ** : प्रापंचिक भेदभ्रांतीचे निवारण करणाऱ्या स्वात्माभिन्न अशा शिवज्ञानाचा उपदेश करणाऱ्याला आचार्यश्रेष्ठ म्हणतात.॥१५॥

**पूर्वपक्षं समादाय जगद्भेदविकल्पनम्।**
**अद्वैतकृतसिद्धान्तो गुरुरेष गुणाधिकः।।१६।।**

**अन्वयार्थ** : जगद्भेदविकल्पनं = प्रापंचिक भेदविषयक, पूर्वपक्षं = संदिग्ध विचाररूपी पूर्वपक्ष, समादाय = समजून घेऊन, अद्वैतकृतसिद्धान्तः = शिवाद्वैत सिद्धान्त सिद्ध करणारा, एषः = हा, गुरुः = शिक्षागुरू, गुणाधिकः = श्रेष्ठ होय.

**भावार्थ** : जगातील निरनिराळे भेदवादी विकल्प, संदिग्ध विचार यांचा पूर्वपक्ष समजून, जाणून घेऊन जो शिवाद्वैत-सिद्धान्त हाच खरा आहे असे सिद्ध करतो तो शिक्षागुरूच सर्वश्रेष्ठ होय.॥१६॥

**सन्देहवनसन्दोहसमुच्छेदकुठारिका ।**
**यत्सूक्तिधारा विमला स गुरूणां शिखामणिः।।१७।।**

**अन्वयार्थ** : विमला = निर्मल, यत्सूक्तिधारा = ज्याच्या उपदेशाची धारा, सन्देह = संशयरूपी, वनसन्दोह = वनसमूह, समुच्छेद = तोडणारी, कुठारिका = कुऱ्हाड आहे असा, सः = तो, गुरूणां = गुरूंचा, शिखामणिः = शिखामणी होय.

**भावार्थ** : ज्याच्या वाचेची (विचारांची) निर्मल धारा संशयरूपी निबिड अरण्याचे निर्मूलन करणारी कुऱ्हाड होते तो गुरूंचा शिखामणी शोभतो.॥१७॥

**यत्सूक्तिदर्पणाभोगे निर्मले दृश्यते सदा।**
**मोक्षश्रीर्बिम्बरूपेण स गुरुर्भवतारकः॥१८॥**

**अन्वयार्थ** : निर्मले = स्वच्छ अशा, यत्सूक्ति = ज्याच्या उपदेशरूपी, दर्पणाभोगे = आरशात, मोक्षश्रीः = मोक्षरूपी लक्ष्मी, बिम्बरूपेण = प्रतिबिंब-रूपाने, सदा दृश्यते = नेहमी दिसते, सः = तो, गुरुः = गुरू, भवतारकः = संसारापासून मुक्त करणारा असतो.

**भावार्थ** : ज्याच्या वाणीच्या निर्मल आरशात मोक्षरूप लक्ष्मी प्रतिबिंब-रूपाने सदैव दिसते असा गुरू संसाररूपी समुद्रातून तारणारा असतो.॥१८॥

**शिष्याणां हृदयालेख्यं प्रद्योतयति यः स्वयम्।**
**ज्ञानदीपिकयाऽनेन गुरुणा कः समो भवेत्॥१९॥**

**अन्वयार्थ** : यः = जो गुरू, शिष्याणां = शिष्यांचे, हृदयालेख्यं = हृदयकमलात असलेल्या निजरूप चित्राचे, ज्ञानदीपिकया = ज्ञानदीपाने, स्वयं = स्वतः, प्रद्योतयति = प्रकाशित करतो, अनेन = अशा, गुरुणा = शिक्षागुरूशी, कः = कोण, समः = समान, भवेत् = होईल?

**भावार्थ** : जो गुरू आपल्या ज्ञानज्योतीने शिष्याच्या हृदयात असणाऱ्या त्याच्या निजस्वरूपाचे प्रकाशित करतो, अशा गुरूची बरोबरी कोणाकडून होऊ शकत नाही.॥१९॥

**परमाद्वैतविज्ञानपरमौषधदानतः।**
**संसाररोगनिर्माथी देशिकः केन लभ्यते॥२०॥**

**अन्वयार्थ** : परमाद्वैत = श्रेष्ठ अशा शिवाद्वैताचे, विज्ञान = विज्ञानरूपी, परमौषधिदानतः = श्रेष्ठ औषध देण्याने, संसाररोग = जननमरणरूपी रोग, निर्माथी = दूर करणारा, देशिकः = शिक्षागुरू, केन = कोणाला, लभ्यते = लाभतो?



**भावार्थ** : परमाद्वैत शिवज्ञानरूपी उत्तम औषध देऊन संसाररूप रोगाचे निवारण करणारा देशिक (गुरू) कोणाला मिळणार? शिवकारुण्यरहित असणाऱ्यांना असा गुरू सहजतेने मिळणे कठीणच.॥२०॥

### ज्ञानगुरुस्थल - (४७)

**उपदेष्टोपदेशानां संशयच्छेदकारकः।**
**सम्यज्ज्ञानप्रदः साक्षादेष ज्ञानगुरुः स्मृतः॥२१॥**

**अन्वयार्थ** : उपदेशानां = शिवज्ञानोपदेशाचा, उपदेष्टा = उपदेश करणारा, संशयच्छेदकारकः = शिष्याचे संदेह दूर करणारा, एषः = हा शिक्षागुरू, साक्षात् = प्रत्यक्ष शिवासारखा, सम्यग्ज्ञानप्रदः = उत्तम ज्ञानोपदेश करणारा होऊन, ज्ञानगुरुः स्मृतः = ज्ञानगुरू म्हणून म्हटला जातो.

**भावार्थ** : शिवज्ञानाच्या रहस्यार्थाचा उपदेश करणारा, शिष्यजनांचे संशय दूर करणारा आणि प्रत्यक्षभूत परशिवासारखा ज्ञान करून देणारा जो शिक्षागुरू आहे, त्यालाच ज्ञानगुरू म्हणावे.॥२१॥

**निरस्तविश्वसम्भेदं निर्विकारं चिदम्बरम्।**
**साक्षात्करोति यो युक्त्या स ज्ञानगुरुरुच्यते॥२२॥**

**अन्वयार्थ** : निरस्तविश्वसम्भेदं = प्रपंचाचे भेदरहित, निर्विकारं = विकाररहित, चिदम्बरम् = चिदाकाशरूपी शिवाला, यः = जो, युक्त्या = शिवाद्वैतशास्त्रोक्त युक्तीने, साक्षात्करोति = साक्षात्कार करून देतो, सः = तो, ज्ञानगुरुरुच्यते = ज्ञानगुरू असे म्हणविला जातो.

**भावार्थ** : जो गुरू शिवाद्वैतशास्त्रोक्त प्रकारे युक्ती, प्रमाण आणि स्वानुभवाने जगत्भेद-भ्रांतिनिवारक, निर्विकार अशा ज्ञानाकाशाचा साक्षात्कार करून देतो तोच ज्ञानगुरू होय.॥२२॥

**कलङ्कवानसौ चन्द्रः क्षयवृद्धिपरिप्लुतः।**
**निष्कलङ्कस्थितो ज्ञानचन्द्रमा निर्विकारवान्॥२३॥**

**अन्वयार्थ** : असौ चन्द्रः = हा चंद्रमा, क्षयवृद्धिपरिप्लुतः = क्षय आणि वृद्धीने पीडित आहे, आणि कलङ्कवान् = कलंकित आहे, निर्विकारवान् = विकाररहित, ज्ञानचन्द्रमाः = ज्ञानरूपी चंद्रमा, निष्कलङ्कस्थितः = कलंकरहित आहे.

**भावार्थ** : आकाशातील चंद्र कलंकित आहे, शिवाय शुक्लपक्षात त्याची वृद्धी व कृष्णपक्षात त्याचा क्षय होत जातो. मात्र गुरूच्या उपदेशाने शिष्याच्या चिदाकाशात उगवलेला ज्ञानचंद्र हा निष्कलंक असून त्यास क्षयवृद्धी मुळीच होत नाही.॥२३॥

**पार्श्वस्थतिमिरं हन्ति प्रदीपो मणिनिर्मितः।**
**सर्वगामि तमो हन्ति बोधदीपो निरङ्कुशः॥२४॥**

**अन्वयार्थ** : मणिनिर्मितः = रत्नाने निर्मिलेला, प्रदीपः = दीपक, पार्श्वस्थ = जवळ असणारा, तिमिरं = अंधार, हन्ति = निवारण करतो, निरङ्कुशः = प्रतिबंधरहित, बोधदीपः = ज्ञानदीप, सर्वगामी = सर्वत्र असणारा, तमः = अंधार, हन्ति = दूर करतो.

**भावार्थ** : रत्नाचा दीप असला तरी त्याच्या प्रकाशाने केवळ आजूबाजूचा अंधार नाहीसा होतो. परंतु गुरूने प्रज्वलित केलेला ज्ञानदीप हा सर्व जगातील अज्ञानाचा अंधार नाहीसा करतो, त्याच्या प्रकाशाला कोठेच प्रतिबंध नाही.॥२४॥

**सर्वार्थसाधकज्ञानविशेषादेशतत्परः ।**
**ज्ञानाचार्यः समस्तानामनुग्रहकरः शिवः॥२५॥**

**अन्वयार्थ** : सर्वार्थसाधक = भोगमोक्षरूपी सर्वार्थ सिद्ध करणारा, ज्ञान = शिवज्ञानाचे, विशेषादेशतत्परः = विशेषरूपाने उपदेश करण्यात आसक्त असलेला, ज्ञानाचार्यः = ज्ञानगुरू, समस्तानां = समस्त मुमुक्षूंवर, अनुग्रहकरः = अनुग्रह करणारा, शिवः = साक्षात शिव होय.

**भावार्थ** : भोगमोक्षात्मक सर्वार्थसाधक शिवज्ञानाचा विशेष रीतीने उपदेश करण्यात तत्पर असलेला ज्ञानगुरू सर्व मुमुक्षूंवर अनुग्रह करणारा प्रत्यक्ष शिवच होय.॥२५॥



**कटाक्षचन्द्रमा यस्य ज्ञानसागरवर्धनः।**
**संसारतिमिरच्छेदी स गुरुर्ज्ञानपारगः॥२६॥**

**अन्वयार्थ** : यस्य = ज्या ज्ञानगुरूचा, कटाक्षचन्द्रमा = कृपाकटाक्षरूपी चंद्रमा, ज्ञानसागरवर्धन = ज्ञानरूपी सागराला भरती आणणारा आणि, संसारतिमिरच्छेदी = संसाररूपी अंधार नाहीसा करणारा आहे, सः = तो, गुरुः =गुरू, ज्ञानपारगः = ज्ञानपारंगत होय.

**भावार्थ** : ज्याचा कृपाकटाक्षरूपी चंद्र शिष्याच्या ज्ञानरूप सागरास भरती आणतो आणि संसाररूपी अंधाराचा नाश करतो, तो गुरू परापरज्ञानपारंगत होय.॥२६॥

**बहिस्तिमिरविच्छेत्ता भानुरेष प्रकीर्तितः।**
**बहिरन्तस्तमश्छेदी विभुर्देशिकभास्करः॥२७॥**

**अन्वयार्थ** : एषः = हा, भानुः = सूर्य, बहिस्तिमिरविच्छेत्ता = बाहेरचा अंधार दूर करणारा म्हणून, प्रकीर्तितः = सांगितला जातो, विभुः = व्यापक असा, देशिकभास्करः = गुरुरूपी सूर्य, बहिरन्तस्तमश्छेदी = बाहेरील आणि आतील अंधाराला दूर करणारा आहे.

**भावार्थ** : आकाशातील सूर्य सृष्टीतील बाहेरचा अंधार नाहीसा करतो. परंतु व्यापक गुरुरूपी सूर्य 'संसार शिवरूप नाही' अशा बाह्य विषयगत अज्ञानांधःकाराबरोबरच 'मी शिव नाही' या मनातील अंधःकाराचाही नाश करतो. म्हणून गुरू हा सूर्यापेक्षाही श्रेष्ठ होय.॥२७॥

**कटाक्षलेशमात्रेण विना ध्यानादिकल्पनम्।**
**शिवत्वं भावयेद्यत्र स वेदः शाम्भवो भवेत्॥२८॥**

**अन्वयार्थ** : यत्र = जेथे, ध्यानादिकल्पनम् विना = ध्यानधारणादी संकल्पाशिवाय, कटाक्षलेशमात्रेण = गुरूच्या थोड्याशा कृपाकटाक्षाने, शिवत्वं = शिवस्वरूपाची, भावयेत् = स्फुट भावना होते, स = ते ज्ञान, शाम्भवो वेदो मतः = शांभव ज्ञान असे म्हटले जाते.

**भावार्थ** : धारणादी संकल्पावाचूनही केवळ ज्ञानगुरूच्या कृपाकटाक्षानेच शिवतत्त्वाचे ज्ञान होते, त्यालाच 'शांभव वेद' असे म्हणतात.॥२८॥

**शिववेदकरे ज्ञाने दत्ते येन सुनिर्मले।**
**जीवन्मुक्तो भवेच्छिष्यः स गुरुर्ज्ञानसागरः।।२९।।**

**अन्वयार्थ** : येन = ज्याच्याकडून, शिववेदकरे = शिवज्ञान करून देणारे, सुनिर्मले = निर्मल, ज्ञाने = शिवज्ञान, दत्ते = दिल्यावर, शिष्यः = शिष्य, जीवन्मुक्तः = जीवन्मुक्त, भवेत् = होतो, स गुरुः = तो गुरू, ज्ञानसागरः = ज्ञानसागर होय.

**भावार्थ** : शिवाचे ज्ञान होईल असा निर्मल उपदेश ज्याच्याकडून शिष्याला दिला जातो आणि ज्या ज्ञानप्राप्तीमुळे शिष्य जीवन्मुक्त होतो, असे ज्ञान देणारा गुरू ज्ञानाचा सागरच होय.॥२९॥

### क्रियालिङ्गस्थल - (४८)

**गुरोर्विज्ञानयोगेन क्रिया यत्र विलीयते।**
**तत्क्रियालिङ्गमाख्यातं सर्वैरागमपारगैः।।३०।।**

**अन्वयार्थ** : गुरोः = ज्ञानगुरूच्या, विज्ञानयोगेन = विशेष ज्ञानोपदेशाने, क्रिया = कर्म, यत्र = जेथे, विलीयते = विलीन होते, सर्वैः = सर्व, आगमपारगैः = आगमपंडितांकडून, तत् = ते, क्रियालिङ्गं = क्रियालिंग म्हणून, आख्यातम् = म्हटले गेले आहे.

**भावार्थ** : गुरूने दिलेल्या विशेष ज्ञानामुळे जेथे क्रिया लय पावते ते क्रियालिंग होय, असे सर्व शिवसिद्धान्तपारंगत वीरशैव आचार्य म्हणतात. तेच इष्टलिंग होय.॥३०॥

**परानन्दचिदाकारं परब्रह्मैव केवलम्।**
**लिङ्गं सद्रूपतापन्नं लक्ष्यते विश्वसिद्धये।।३१।।**

**अन्वयार्थ** : परानन्दचिदाकारं = नित्यानंद चिद्रूप, केवलं = केवळ, परब्रह्मैव = परब्रह्मच, विश्वसिद्धये = संपूर्ण क्रियासिद्धीसाठी, सद्रूपतापन्नं = सद्रूप होऊन, लिङ्गं = इष्टलिंग म्हणून, लक्ष्यते = प्रतीत होते.

**भावार्थ** : अंतर्मुख ज्ञानस्वरूप असणारे ते परब्रह्मच भक्ताकडून होणाऱ्या क्रिया सफल करण्यासाठी अस्तित्वरूप धारण करून क्रियालिंग-रूपाने अर्थात् इष्टलिंगरूपाने प्रतीत होते.॥३१॥



**लिङ्गमेव परं ज्योतिर्भवति ब्रह्म केवलम्।**
**तस्मात् तत्पूजनादेव सर्वकर्मफलोदयः।।३२।।**

**अन्वयार्थ** : परं ज्योतिः = परंज्योतिस्वरूप, केवलं = केवळ, ब्रह्मैव = ब्रह्मच, लिङ्गं = क्रियालिंग, भवति = होय, तस्मात् = त्यामुळे, तत्पूजनादेव = त्याची पूजा केल्याने, सर्वकर्मफलोदयः = सर्व कर्मांचे फळ मिळते.

**भावार्थ** : इष्टलिंग हे परमज्योतिस्वरूप असणारे परब्रह्मच क्रियालिंग असल्यामुळे त्याचे पूजन केल्याने सकल सत्कर्माचे फळ प्राप्त होते.॥३२॥

**परित्यज्य क्रियाः सर्वा लिङ्गपूजैकतत्पराः।**
**वर्तन्ते योगिनः सर्वे तस्माल्लिङ्गं विशिष्यते।।३३।।**

**अन्वयार्थ** : सर्वे = सर्व, योगिनः = सनकादी योगी, सर्वाः = सर्व, क्रियाः = योगादी क्रिया, परित्यज्य = सोडून, लिङ्गपूजैकतत्पराः = इष्टलिंगपूजेत तत्पर होऊन, वर्तन्ते = आहेत, तस्मात् = त्यासाठी, लिङ्गं = क्रियालिंग, विशिष्यते = श्रेष्ठ होय.

**भावार्थ** : योगसाधना करणारे सनकसानंदादी सर्व योगी लिंगपूजना-खेरीज इतर सर्व योगक्रिया करावयाचे सोडून देऊन इष्टलिंगपूजनच एकनिष्ठेने करतात. यावरूनच इष्टलिंग हे सर्वश्रेष्ठ होय असे स्पष्ट होते.॥३३॥

**यज्ञादयः क्रियाः सर्वा लिङ्गपूजांशसंमिताः।**
**इति यत्पूज्यते सिद्धैस्तत्क्रियालिङ्गमुच्यते।।३४।।**

**अन्वयार्थ** : यज्ञादयः = यज्ञादी, सर्वाः = सर्व, क्रियाः = कर्मे, लिङ्गपूजांशसंमिताः = लिंगपूजेच्या एका अंशाबरोबर आहेत, इति = असे मानून, सिद्धैः = सनकादि सिद्धांकडून, यत् = जे, पूज्यते = पूजिले जाते, तत् = ते, क्रियालिङ्ग-मुच्यते = क्रियालिंग म्हणून म्हटले जाते.

**भावार्थ** : यज्ञयागासारख्या क्रिया ह्या लिंगपूजनाचा अंश असल्या-सारख्या आहेत. म्हणजेच त्या पूर्ण फलप्राप्ती देणाऱ्या नाहीत, असे जाणून सनकादी ऋषी ज्याची पूजा करतात ते इष्टलिंग अर्थात् क्रियालिंग सर्व क्रियांचे फल देणारे असे आहे. म्हणून सनकादिक योग्यांनी यज्ञयागादी क्रियांचा त्याग केला.॥३४॥

**किं यज्ञैरग्निहोत्राद्यैः किं तपोभिश्च दुश्चरैः।**
**लिङ्गार्चनरतिर्यस्य स सिद्धः सर्वकर्मसु।।३५।।**

**अन्वयार्थ** : अग्निहोत्राद्यैः = अग्निहोत्रादी, यज्ञैः = यज्ञांचे, किं = काय प्रयोजन? च = आणि, दुश्चरैः = अत्यंत कठीण अशा, तपोभिः = तपश्चर्यांचे, किं = काय प्रयोजन, यस्य = ज्याला, लिङ्गार्चनरतिः = इष्टलिंगार्चनेत रुची आहे, सः = तो, सर्वकर्मसु = सर्व कर्मांत, सिद्धः = सिद्ध होतो.

**भावार्थ** : ज्याला लिंगपूजन करण्याची आवड आहे, त्याला सहजच सर्व कर्मे केल्याचे इष्टफल मिळते. म्हणून यज्ञ करणे, अग्निहोत्र घेणे आणि आचरणास कठीण अशी तपाचरणे इत्यादींची गरज नाही.।।३५।।

**ब्रह्मविष्ण्वादयः सर्वे विबुधा लिङ्गमाश्रिताः।**
**सिद्धाः स्वस्वपदे भान्ति जगत्तन्त्राधिकारिणः।।३६।।**

**अन्वयार्थ** : सिद्धाः = प्रसिद्ध असे, जगत्तन्त्राधिकारिणः = जगाच्या सृजनादी कार्यांचे अधिकारी, ब्रह्मविष्ण्वादयः = ब्रह्मा, विष्णू आदी, सर्वे = सर्व, विबुधाः = देवतागण, लिङ्गमाश्रिताः = इष्टलिंगाचा आश्रय करून, स्वस्वपदे = आपापल्या पदावर, भान्ति = दिसत आहेत.

**भावार्थ** : ब्रह्मदेव, विष्णू वगैरे देव इष्टलिंगाचाच आश्रय करून, इष्टलिंगाचे पूजन करतात त्यामुळेच ते आपापल्या पदावर यशस्वीपणे आरूढ होऊन जगाचा कारभार योग्य रीतीने चालवीत आहेत.।।३६।।

### भावलिंगस्थल - (४९)

**क्रिया यथा लयं प्राप्ता तथा भावोऽपि लीयते।**
**यत्र तद्देशिकैरुक्तं भावलिङ्गमिति स्फुटम्।।३७।।**

**अन्वयार्थ** : यथा = जशा, क्रिया = पूजादी क्रिया, लयं प्राप्ता = (क्रिया-लिंगात) लय पावतात, तथा = तसे, यत्र = जेथे, भावोऽपि = भावसुद्धा, लीयते = लय पावतात, त्याला देशिकैः = गुरूकडून, भावलिङ्गमिति = भावलिंग असे, स्फुटम् = स्पष्ट, उक्तम् = सांगितले आहे.



**भावार्थ** : क्रिया ज्यामध्ये लय पावते त्याला जसे क्रियालिंग म्हणतात तसे जेथे भाव लय पावतो त्याला भावलिंग म्हणावे, असे देशिक सांगतात.।।३७।।

**भावेन गृह्यते देवो भगवान् परमः शिवः।**
**किं तेन क्रियते तस्य नित्यपूर्णो हि स स्मृतः।।३८।।**

**अन्वयार्थ** : भगवान् = षड्गुणैश्वर्यसंपन्न, परमः शिवः = परमेश्वर असा, देवः = देव, भावेन = निर्मल अंतःकरणवृत्तीला, गृह्यते = प्रकाशित होतो, तस्य = त्याला, तेन = बाह्य क्रियारूपी पूजादींचे, किं क्रियते = काय व्हावे? हि = निश्चयाने, सः = तो, नित्यपूर्णः = नित्य परिपूर्ण म्हणून, स्मृतः = जाणला जातो.

**भावार्थ** : षड्गुणैश्वर्यसंपन्न असणारा परमेश्वर निर्मल अंतःकरणवृत्तीच्या भावनेलाच गोचर होतो. तो परमेश्वर नित्यपूर्ण, नित्य तृप्तच असल्यामुळे त्याला बाह्य क्रियाकलापाची काही आवश्यकता नसते.।।३८।।

**अखण्डपरमानन्दबोधरूपः परः शिवः।**
**भक्तानामुपचारेण भावयोगात् प्रसीदति।।३९।।**

**अन्वयार्थ** : अखण्डपरमानन्दबोधरूपः = अपरिच्छिन्न आनंदाचा बोधस्वरूप, परः शिवः = परमेश्वर, भक्तानां = भक्तांच्या, भावयोगात् = भावपूर्ण अशा, उपचारेण = मानसिक उपचाराने, प्रसीदति = प्रसन्न होतो.

**भावार्थ** : श्रेष्ठ असा शिव अखंड परमानंदस्वरूप व बोधरूप आहे, शिवभक्तांच्या भक्ति-उपचारांतील भावयोगाने तो त्यांच्यावर प्रसन्न होतो. म्हणून भावलिंग हे क्रियालिंगापेक्षा श्रेष्ठ होय.।।३९।।

**मृच्छिलाविहिताल्लिङ्गाद्भावलिङ्गं विशिष्यते।**
**निरस्तसर्वदोषत्वाद् ज्ञानमार्गप्रवेशनात्।।४०।।**

**अन्वयार्थ** : मृच्छिलाविहितान् = मृत्तिका आणि शिलेपासून निर्मिलेल्या, लिङ्गात् = लिंगापेक्षा, निरस्तसर्वदोषत्वात् = सर्व प्रकारच्या छेदनभेदनादी दोषांनी रहित, ज्ञानमार्गप्रवेशनात् = ज्ञानमार्गात प्रवेश करविणारे, भावलिङ्गं = भावलिंग, विशिष्यते = श्रेष्ठ आहे.

**भावार्थ** : मृत्तिका किंवा शिला या पासून तया केलेल्या लिंगापेक्षा भावलिंग हे श्रेष्ठ आहे. कारण भावलिंगास कोणत्याही तऱ्हेचा दोष नसून उलट त्यापासून ज्ञानमार्गावर प्रवेश मिळतो.।।४०।।

**विहाय बाह्यलिङ्गानि चिल्लिङ्गं मनसि स्मरन्।**
**पूजयेद् भावपुष्पैर्यो भावलिङ्गीति कथ्यते।।४१।।**

**अन्वयार्थ** : बाह्यलिङ्गानि = बाह्य शिलामय लिंगाचा, विहाय = त्याग करून, चिल्लिङ्गं = चैतन्यरूपी लिंगाचे, मनसि स्मरन् = मनात स्मरण करीत, यः = जो, भावपुष्पैः = भावपुष्पांनी, पूजयेत् = पूजा करतो, तो भावलिङ्गीति = भावलिंगी म्हणून, कथ्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : माती किंवा शिलेपासून तयार केलेल्या (स्थावर) बाह्य लिंगाचे पूजन न करिता हृदयकमलामध्ये चित्स्वरूप प्राणलिंगाचे स्मरण करीत अहिंसा-अस्तेयादी उत्कृष्ट अष्टभावपुष्पांनी जो पूजा करतो त्याला भावलिंगी असे म्हणतात.।।४१।।

**मूलाधारेऽथवा चित्ते भ्रूमध्ये वा सुनिर्मलम्।**
**दीपाकारं यजन् लिङ्गं भावद्रव्यैः स योगवान्।।४२।।**

**अन्वयार्थ** : मूलाधारे = आधारचक्रात, अथवा = अथवा, चित्ते = हृदय-कमलात, वा = अथवा, भ्रूमध्ये = भ्रूमध्यात, सुनिर्मलं = अत्यंत निर्मल, दीपाकारं = ज्योतिस्वरूप अशा, लिङ्गं = प्राणलिंगाची, भावद्रव्यैः = भावद्रव्यांनी, यजन् = पूजा करणारा, सः = तो, योगवान् = शिवयोगी होय.

**भावार्थ** : मूलाधारचक्रात, हृदयामध्ये अथवा दोन्ही भुवयांच्या मध्ये निर्मल अशा ज्योतीच्या आकाराचे शिवलिंग कल्पून त्याची पूजा भावरूप द्रव्यांनी जो करतो त्यास शिवयोगी असे म्हणावे.।।४२।।

**स्वानुभूतिप्रमाणेन ज्योतिर्लिङ्गेन संयुतः।**
**शिलामृद्दारुसंभूतं न लिङ्गं पूजयत्यसौ।।४३।।**

**अन्वयार्थ** : असौ = हा शिवयोगी, स्वानुभूतिप्रमाणेन = आपल्या अनुभवाने, ज्योतिर्लिङ्गेन = चिन्मय अशा प्राणलिंगाशी, संयुतः = संयुक्त होऊन, शिलामृद्दारुसंभूतं = शिला, मृत्तिका आणि लाकडापासून निर्मिलेल्या, लिङ्गं = लिंगाची, न पूजयति = पूजा करीत नाही.



**भावार्थ** : तो शिवयोगी मी अकर्ता आहे अशा आपल्या अनुभवाच्याच प्रमाणाने चित्स्वरूप ज्योतिर्लिंगाने संयुक्त असल्यामुळे दगड, माती, लाकूड आदी जड द्रव्यांनी केलेल्या लिंगाची पूजा कधीही करीत नाही.।।४३।।

**क्रियारूपा तु या पूजा सा ज्ञेया स्वल्पसंविदाम्।**
**आन्तरा भावपूजा तु शिवस्य ज्ञानिनां मता।।४४।।**

**अन्वयार्थ** : शिवस्य = शिवाची, क्रियारूपा तु = क्रियारूप अशी, या पूजा = जी पूजा आहे, सा = ती, स्वल्पसंविदाम् = अज्ञान्यांची होय असे, ज्ञेया = जाणावे, आन्तरा = अंतरंगातील, भावपूजा तु = भावपूजा तर, ज्ञानिनां = ज्ञानी लोकांना, मता = संमत आहे.

**भावार्थ** : कर्मकांडात सांगितलेली क्रियारूप असणारी पूजा ही अज्ञजनासाठी, सामान्य लोकांसाठी सांगितलेली आहे. ज्ञानकांडात सांगितलेली शिवाची पूजा ही भावपूजा होय व ती परिपूर्ण ज्ञानी लोकांकरिता सांगितलेली आहे. म्हणून क्रियालिंगापेक्षा भावलिंगाची पूजा श्रेष्ठ आहे.।।४४।।

### ज्ञानलिङ्गस्थल - (५०)

**तद्भावज्ञापकज्ञानं लयं यत्र समश्नुते।**
**तज्ज्ञानलिङ्गमाख्यातं शिवतत्त्वार्थकोविदैः।।४५।।**

**अन्वयार्थ** : तद्भावज्ञापकज्ञानं = त्या भावलिंगाला प्रकाशित करणारे ज्ञान, यत्र = जेथे, लयं = लय, समश्नुते = पावते, तत् = ते, शिवतत्त्वार्थ- कोविदैः = शिवतत्त्वार्थ जाणणाऱ्याकडून, ज्ञानलिङ्गमाख्यातं = ज्ञानलिंग असे म्हणविले जाते.

**भावार्थ** : भावलिंग प्रकाशक असे ज्ञान ज्या ठिकाणी लय पावते ते ज्ञानलिंगस्थल होय. त्यालाच शिवरहस्य जाणणारे वीरशैवाचार्य ज्ञानलिंग अथवा तृप्तिलिंग असे म्हणतात.।।४५।।

**त्रिमूर्तिभेदनिर्मुक्तं त्रिगुणातीतवैभवम्।**
**ब्रह्म यद्बोध्यते तत्तु ज्ञानलिङ्गमुदाहृतम्।।४६।।**

**अन्वयार्थ** : त्रिमूर्तिभेदनिर्मुक्तं = ब्रह्मा, विष्णू आदी रुद्ररूपी त्रिमूर्तिभेदरहित, त्रिगुणातीतवैभवम् = सत्त्वादी त्रिगुणरहित, तुर्यातीत संपत्तीने युक्त, यत् = जे, ब्रह्म = ब्रह्म, बोध्यते = बोधिले जाते, तत् तु = ते, ज्ञानलिङ्गमुदाहृतम् = ज्ञानलिंग म्हणविले जाते.

**भावार्थ** : ब्रह्मा, विष्णू आदी रुद्र अशा त्रिमूर्तीच्या भेदाने विरहित, सत्त्व, रज, तम या त्रिगुणाच्या अतीत आणि तुर्यातीत संपत्तिरूप ब्रह्म, जे श्रुती, गुरूपदेश आणि स्वानुभव यांच्या माध्यमातून जाणले जाते आणि ज्ञानाचे आश्रयीभूत असणारे जे ज्ञानलिंग, त्यालाच तृप्तिलिंग असे म्हटले जाते.।।४६।।

**स्थूले क्रियासमापत्तिः सूक्ष्मे भावस्य सम्भवः।**
**स्थूलसूक्ष्मपदातीते ज्ञानमेव परात्मनि।।४७।।**

**अन्वयार्थ** : स्थूले = इष्टलिंगाची, क्रियासमापत्तिः = क्रियारूप पूजासामग्रीने, सूक्ष्मे = प्राणलिंगाची, भावस्य सम्भवः = भावमय सामग्रीने, स्थूलसूक्ष्मपदातीते = स्थूल आणि सूक्ष्म याहून पलीकडे असणाऱ्या, परात्मनि = तृप्तिलिंगरूपी परमात्म्याची, ज्ञानमेव = केवळ ज्ञानाने पूजा होते.

**भावार्थ** : स्थूलरूप इष्टलिंगाची पूजा गंधपुष्पादी सामग्रीने होत असते. सूक्ष्म लिंगांची पूजा मनाच्या निर्मलपणाने व्हावी लागते. स्थूल व सूक्ष्म या दोन्ही लिंगांच्या पलीकडे असणाऱ्या तृप्तिलिंगस्वरूप परमात्म्याची पूजा ज्ञानाचेच व्हावी लागते. इष्टलिंगाची अर्चा क्रियेने, प्राणलिंगाची अर्चा सद्भावाने आणि तृप्तिलिंगरूप परमेश्वराची पूजा फक्त ज्ञानाने होत असते.।।४७।।

**कल्पितानि हि रूपाणि स्थूलानि परमात्मनः।**
**सूक्ष्माण्यपि च तैः किं वा परबोधं समाचरेत्।।४८।।**



**अन्वयार्थ** : परमात्मनः = परमात्म्याची, स्थूलानि रूपाणि = स्थूलरूपे, च = आणि, सूक्ष्माण्यपि = सूक्ष्म रूपही, कल्पितानि = मायेने कल्पिलेली आहेत, तैः किं = त्यांचे काय प्रयोजन? म्हणून, परबोधं = परब्रह्मरूप तृप्तिलिंगच, समाचरेत् = उत्कृष्ट आहे असे जाणावे.

**भावार्थ** : परमेश्वराची स्थूल व सूक्ष्मरूपे मायाकल्पित आहेत. ती रूपे केवळ मोक्षाची अपेक्षा बाळगणाऱ्यासाठी उपयोगाची नाहीत. म्हणून मुमुक्षूने स्थूलसूक्ष्मातीत अशा ज्ञानलिंगाचीच उपासना करावी. अर्थात् ज्ञानलिंगरूप तृप्तिलिंग श्रेष्ठ होय.।।४८।।

**परात्परं तु यदब्रह्म परमानन्दलक्षणम्।**
**शिवाख्यं ज्ञायते येन ज्ञानलिङ्गीति कथ्यते।।४९।।**

**अन्वयार्थ** : परात्परं = सर्वोत्कृष्ट, परमानन्दलक्षणम् = परमानंदस्वरूप, यद् = जे, शिवाख्यं = शिव नावाचे, ब्रह्म = परब्रह्म, येन = ज्याच्याकडून, ज्ञायते = जाणले जाते तो, ज्ञानलिङ्गात कथ्यते = ज्ञानलिंगी होय असे म्हटले जाते.

**भावार्थ** : उत्कृष्ट ज्ञानाची जाणीव ठेवणाराच ज्ञानलिंगी म्हणविण्यास योग्य होतो. परब्रह्मस्वरूप श्रेष्ठापेक्षाही श्रेष्ठ आहे. परमानंद हे त्याचे लक्षण आहे. त्याचे नाव शिव असे असून त्याला जो जाणतो त्यास ज्ञानलिंगी असे म्हणावे.।।४९।।

**बाह्यक्रियां परित्यज्य चिन्तामपि मानसीम्।**
**अखण्डज्ञानरूपत्वं यो भजेन्मुक्त एव सः।।५०।।**

**अन्वयार्थ** : बाह्यक्रिया = इष्टलिंगसंबंधी बाह्यपूजा, च = आणि, मानसीं चिन्तामपि = प्राणलिंगासंबंधी आंतरध्यानपूजा, परित्यज्य = सोडून, अखण्डज्ञानरूपत्वं = परिपूर्ण अशा तृप्तिलिंगाचा, यः = जो, भजेत् = निदिध्यास करतो, सः = तो, मुक्त एव = मुक्तच होय.

**भावार्थ** : इष्टलिंगसंबंधीची बाह्यक्रियारूप पूजा व प्राणलिंगसंबंधीची आंतरध्यानरूप मानसिक पूजा याचा त्याग करून जो अखंड ज्ञानरूप असा तृप्तिलिंगस्वरूप होतो तोच खरा मुक्त होय.।।५०।।

**स्वयस्थल - (५१)**

**तद्भावज्ञापकं ज्ञानं यत्र ज्ञाने लयं व्रजेत्।**
**तद्वानेष समाख्यात: स्वाभिधानो मनीषिभि:।।५१।।**

**अन्वयार्थ** : तद्भावज्ञापकज्ञानं = त्या भावलिंगाचे ज्ञापन करणारे ज्ञान, यत्र = ज्या, ज्ञाने = ज्ञानात, लयं व्रजेत् = लय पावते, तद्वान् = ते असणारा, एष: = हा, मनीषिभि: = ज्ञान्याकडून, स्वाभिधान: = स्वयलिंग अशा नावाने, समाख्यात: = ओळखला जातो.

**भावार्थ** : भावलिंगाला प्रकाशित करणारे ज्ञान ज्या ठिकाणी लय पावते असे जे ज्ञानलिंगीस्थल, ते प्राप्त झालेल्या ज्ञानलिंगीलाच शिवज्ञानी लोक स्वयस्थलसंपन्न असे म्हणतात.॥५१॥

**स्वच्छन्दाचारसन्तुष्टो ज्योतिर्लिङ्गपरायण:।**
**आत्मस्थसकलाकार: स्वाभिधो मुनिसत्तम:।।५२।।**

**अन्वयार्थ** : ज्योतिर्लिङ्गपरायण: = चिल्लिंगनिष्ठ, स्वच्छन्दाचारसंतुष्ट: = स्वतंत्र आचारात संतुष्ट असणारा, आत्मस्थसकलाकार: = आपल्या आत्म्यातच संपूर्ण जगदाकार विलीन केलेला, मुनिसत्तम: = मुनिश्रेष्ठ, स्वाभिध: = स्वयलिंग नावाचा होतो.

**भावार्थ** : जो आत्मप्रेरित आचारात संतुष्ट असतो, बाह्यलिंगाकडे विमुख होऊन जो ज्योतिर्लिंगात तल्लीन होतो, आपल्या आत्म्याच्या ठिकाणी सर्व सृष्टीला पाहातो तो 'स्वय' नाम धारण करणारा मुनिश्रेष्ठ होय.॥५२॥

**निर्ममो निरहङ्कारो निरस्तक्लेशपञ्चक:।**
**भिक्षाशी समबुद्धिश्च मुक्तप्रायो मुनिर्भवेत्।।५३।।**

**अन्वयार्थ** : निर्मम: = ममत्वरहित, निरहङ्कार: = शरीरादी अभिमानरहित, निरस्तक्लेशपञ्चक: = अविद्यादी पंचक्लेशांनी रहित, भिक्षाशी = भिक्षान्नाचे सेवन करणारा, समबुद्धि = सर्वत्र समान बुद्धीचा, मुनि: = स्वयलिंग नावाचा यती, मुक्तप्राय: = मुक्तच, भवेत् = राहातो.



**भावार्थ** : असा स्वयस्थली योगी गृहक्षेत्रादी विषयांच्या ममत्वापासून, शरीरादिविषयक अहंकारापासून मुक्त असतो. अविद्यादी पाच क्लेशांपासून दूर आणि केवळ भिक्षान्नावर निर्वाह करणारा, पक्षपातविरहित समबुद्धीचा आणि मुक्तावस्थेप्रत पोचलेला मुनी असतो.॥५३॥

**यदृच्छालाभसन्तुष्टो भस्मनिष्ठो जितेन्द्रिय:।**
**समवृत्तिर्भवेद्योगी भिक्षुके वा नृपेऽथवा:।।५४।।**

**अन्वयार्थ** : यदृच्छालाभसन्तुष्ट: = प्राप्त झालेल्यात संतोष मानणारा, भस्मनिष्ठ: = भस्मात निष्ठा ठेवणारा, जितेन्द्रिय: = इंद्रियांवर विजय मिळविलेला, योगी = स्वयस्थल योगी, भिक्षुके वा = भिक्षुक असो, अथवा = अथवा, नृपे = राजा असो, समवृत्ति: = समान वृत्तीचा, भवेत् = होतो.

**भावार्थ** : तो सहजासहजी जे मिळेल त्यावर संतुष्ट असतो. भस्मधारण आणि भस्मोद्धूलन यांच्यात श्रद्धा ठेवतो. त्याने आपली इंद्रिये स्वाधीन ठेवलेली असतात. असा हा स्वयस्थलयोगी राजा असो की रंक, सर्वांशी समत्ववृत्तीने वागतो.॥५४॥

**पश्यन् सर्वाणि भूतानि संसारस्थानि सर्वश:।**
**स्मयमान: परानन्दे लीनात्मा वर्तते सुधी:।।५५।।**

**अन्वयार्थ** : सुधी: = उत्कृष्ट बुद्धीचा स्वयलिंगी, सर्वश: = सर्वत्र, संसारस्थानि = संसारचक्रात राहणाऱ्या, सर्वाणि = सर्व, भूतानि = जीवांना, पश्यन् = पाहून, स्मयमान: = आश्चर्यचकित होऊन, परानन्दे = परमानंदरूप महालिंगात, लीनात्मा = लीन होऊन, वर्तते = राहतो.

**भावार्थ** : जगातील सर्व प्राणिमात्र संसारसुखात रमलेले पाहून त्याच्या मनास विस्मय वाटतो. तरीही तो स्वत: ज्ञानी असल्याने परमानंदात लीन होऊन वर्तते असतो.॥५५॥

**ध्यानं शैवं तथा ज्ञानं भिक्षा चैकान्तशीलता।**
**यतेश्चत्वारि कर्माणि न पञ्चममिहेष्यते।।५६।।**

**अन्वयार्थ** : शैवं ज्ञानं = शिवाधिक्य ज्ञान, तथा = तसेच, ध्यानं = शिवध्यान, भिक्षा = भिक्षा, च = आणि, एकान्तशीलता = एकांतात राहणे, अशी यतेः = स्वयलिंग शिवयोग्याची, चत्वारि = चार, कर्माणि = कार्ये असतात, पञ्चमं = पाचवे, न इष्यते = नसते.

**भावार्थ** : नेहमी शिवचिंतन करणे, शिवरहस्याचे ज्ञान असणे, भिक्षेवर उदरनिर्वाह आणि एकांतस्थली वास करणे या चार गोष्टी त्याला हव्या असतात. या खेरीज पाचवी वस्तू अथवा कर्माची त्याला गरज नसते.॥५६॥

**चरस्थल - (५२)**

**स्वरूपज्ञानसम्पन्नो ध्वस्ताहंममताकृतिः।**
**स्वयमेव स्वयं भूत्वा चरतीति चराभिधः।।५७।।**

**अन्वयार्थ** : ध्वस्ताहंममताकृतिः = अहंकार, ममता नाहीसे झालेला, स्वरूपज्ञानसम्पन्नः = स्वस्वरूप ज्ञान झालेला, स्वयं = स्वयस्थली, स्वयमेव भूत्वा = स्वतः होऊन, चरतीति = संचार करतो म्हणून, चराभिधः = चरस्थल नावाचा होतो.

**भावार्थ** : अहंता आणि ममता यांच्यापासून विमुक्त आत्म्याच्या स्वरूपज्ञानाने संपन्न, स्वयलिंगी, इतराची अपेक्षा न बाळगता स्वतःच स्वतः होऊन फिरतो. म्हणून त्याला 'चर' हे नाव शोभते.॥५७॥

**कामक्रोधादिनिर्मुक्तः शान्तिदान्तिसमन्वितः।**
**समबुद्ध्या चरेद् योगी सर्वत्र शिवबुद्धिमान्।।५८।।**

**अन्वयार्थ** : कामक्रोधादिनिर्मुक्तः = कामक्रोधापासून मुक्त झालेला, शान्तिदान्तिसमन्वितः = शमदमादियुक्त, शिवबुद्धिमान् = सर्व शिवमय आहे अशा बुद्धीचा, योगी = चरस्थल योगी, सर्वत्र = सगळीकडे, समबुद्ध्या = समान बुद्धीने, चरेत् = संचार करीत असतो.

**भावार्थ** : कामक्रोधादी षड्विकारांपासून मुक्त, शांती-दांती इत्यादी दहा गुणांनी युक्त आणि तिन्ही लोक शिवमय आहेत अशा शिवस्वरूपात जगाला पाहात तो योगी सर्वत्र समबुद्धीने संचार करीत असतो.॥५८॥



**इदं मुख्यमिदं हीनमिति चिन्तामकल्पयन्।**
**सर्वत्र सञ्चरेद् योगी सर्वं ब्रह्मेति भावयन्।।५९।।**

**अन्वयार्थ** : इदं मुख्यं = हे मुख्य आहे, इदं हीनं = हे कनिष्ठ आहे, इति = अशी, चिन्ताम् = चिंता, अकल्पयन् = न करता, सर्वं = सर्व, ब्रह्मेति = ब्रह्म म्हणून, भावयन् = भावना करीत, योगी = चरस्थली, सर्वत्र = सगळीकडे, संचरेत् = संचार करीत असतो.

**भावार्थ** : हे श्रेष्ठ, ते कनिष्ठ असे विचार मनात न आणता सर्व जग ब्रह्ममयच आहे, अशा वृत्तीने तो सर्वत्र संचार करीत असतो.॥५९॥

**न सम्मानेषु सम्प्रीतिं नावमानेषु च व्यथाम्।**
**कुर्वाणः सञ्चरेद्योगी कूटस्थे स्वात्मनि स्थितः।।६०।।**

**अन्वयार्थ** : कूटस्थे = कूटस्थरूपी, स्वात्मनि = आपल्या आत्मस्वरूपात, स्थितः = राहणारा, योगी = चरस्थल शिवयोगी, सम्मानेषु = सन्मानात, सम्प्रीतिं = प्रीती, च = आणि, अवमानेषु = अपमानात, व्यथां = दुःखं, न कुर्वाणः = न बाळगता, संचरेत् = संचार करीत असतो.

**भावार्थ** : ज्याला आपला सन्मान झाल्याने आनंद होत नाही अथवा अपमान झाल्याचे दुःख वाटत नाही तो योगी कूटस्थ आत्म्यात स्थिर होऊन सर्वत्र संचार करतो. (कूटस्थ हा जीवाच्या कृती आणि अकृतीला साक्षीभूत असतो, सहभागी नसतो.)॥६०॥

**अप्रकृतैर्गुणैः स्वीयैः सर्वं विस्मापयन् जनम्।**
**अद्वैतपरमानन्दमुदितो देहिवच्चरेत्।।६१।।**

**अन्वयार्थ** : अद्वैतपरमानन्दमुदितः = शिवाद्वैत परमानंदाने आनंदित, अप्राकृतैः = लोकोत्तर अशा, स्वीयैः = आपल्या, गुणैः = गुणांनी, सर्वं जनं = सर्व लोकांना, विस्मापयन् = चकित करीत, देहिवत् = सामान्य माणसासारखा, चरेत् = संचार करतो.

**भावार्थ** : शिवाद्वैत परमानंदाने आनंदित झालेला शिवयोगी आपल्या अलौकिक गुणांनी जगाला चकित करीत असतानाच पाहाणाराला मात्र सामान्य जनाप्रमाणे दिसतो.॥६१॥

**न प्रपञ्चे निजे देहे न धर्मे न च दुष्कृते।**
**गतवैषम्यधीर्धीरो यतिश्चरति देहिवत्।।६२।।**

**अन्वयार्थ** : गतवैषम्यधी: = विधिनेषधाविषयी भेदबुद्धी नसलेला, धीर: = स्थिर चित्ताचा, यति: = शिवयोगी, निजे = आपले, देहे = शरीर असताना सुद्धा, देहिवत् = सामान्य जनाप्रमाणे, प्रपञ्चे = जगात, न चरति = आचरण करीत नाही, च = आणि, धर्मे = पुण्यकर्म, दुष्कृते = पापकर्म, न = करीत नाही.

**भावार्थ** : विधिनिषेधामध्ये भेदबुद्धी नसलेला, स्थिरचित्त असा तो योगी देहधारी दिसत असला तरी सामान्य लोकांप्रमाणे तो कोणत्याही पुण्यपाप कर्मांने लिप्त नसतो. अर्थात् त्याच्या हातून कोणतेही विहित अथवा निषिद्ध कर्म घडले तरी त्याला त्यापासून पुण्य अथवा पाप लागत नाही.।।६२।।

**प्राकृतैश्वर्यसम्पत्तिपराङ्मुखमन:स्थिति:।**
**चिदानन्दनिजात्मस्थो मोदते मुनिपुङ्गव:।।६३।।**

**अन्वयार्थ** : प्राकृतैश्वर्यसम्पत्ति = प्राकृत अशा ब्रह्मा, विष्णू आदींच्या ऐश्वर्याविषयी, पराङ्मुखमन:स्थिति: = विमुख मनोवृत्तीचा, मुनिपुङ्गव: = मुनिश्रेष्ठ, चिदानन्द = चिदानंदरूपी, निजात्मस्थ: = आपल्या आत्मस्वरूपात राहून, मोदते = आनंदित होतो.

**भावार्थ** : प्रकृतितत्त्वापासून उत्पन्न झालेल्या ब्रह्मलोक-विष्णुलोकांतील ऐश्वर्यापासून विमुख झालेला हा मुनिश्रेष्ठ चिदानंदस्वरूपी निजात्म्यात स्थिर होऊन तेथेच रमलेला असतो.।।६३।।

**परस्थल - (५३)**

**स्वयमेव स्वयं भूत्वा चरत: स्वस्वरूपत:।**
**परं नास्तीति बोधस्य परत्वमभिधीयते।।६४।।**

**अन्वयार्थ** : स्वयमेव = स्वत:च, स्वयं भूत्वा = स्वत: होऊन, स्वस्वरूपत: = आपल्या स्वरूपात, चरत: = संचार करणाऱ्या, अशा शिवयोग्याच्या, परं = दुसरे, नास्तीति = नाही अशा, बोधस्य = ज्ञानाला, परत्वम् = परस्थल म्हणून, अभिधीयते = म्हटले जाते.



**भावार्थ** : आपल्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान झाल्यामुळे स्वत:च स्वयंसिद्ध होऊन शिवयोगी संचार करीत असतो. आपल्या स्वरूपापेक्षा पर (दुसरे) काही नाही, हे तो जाणतो म्हणून त्यास परस्थल असे म्हणतात.।।६४।।

**स्वतन्त्र: सर्वकृत्येषु स्वं परत्वेन भावित:।**
**तृणीकुर्वन् जगज्जालं वर्तते शिवयोगिराट्।।६५।।**

**अन्वयार्थ** : स्वं = आपल्याला, परत्वेन = विश्वाहून अधिक म्हणून, भावित: = भावना करणारा, शिवयोगिराट् = शिवयोगीश्वर, सर्वकृत्येषु = संपूर्ण कार्यात, स्वतन्त्र: = स्वतंत्र होऊन, जगज्जालं = प्रपंचाला, तृणीकुर्वन् = तृणवत् मानून, वर्तते = असतो.

**भावार्थ** : आपण स्वत: विश्वाधिक असा शिवस्वरूप शिवयोगीश्वर असून सर्व कार्यात स्वतंत्र आहोत, ह्या जाणीवेने जगातील सर्व ऐश्वर्याला तृणवत् मानून नि:स्पृहपणे वागतो.।।६५।।

**वर्णाश्रमसमाचारमार्गनिष्ठापराङ्मुख: ।**
**सर्वोत्कृष्टं स्वमात्मानं पश्यन् योगी तु मोदते।।६६।।**

**अन्वयार्थ** : वर्णाश्रम = वर्णाश्रमांच्या, समाचारमार्ग = आचारमार्गात, निष्ठापराङ्मुख: = निष्ठा निसलेला, योगी = शिवयोगी, सर्वोत्कृष्टं = सर्वश्रेष्ठ अशा, स्वमात्मानं = आपल्या आत्म्याला, पश्यन् = पाहत, मोदते = आनंदित होतो.

**भावार्थ** : वर्णाश्रम धर्माच्या आचारांशी पराङ्मुख होऊन तो परशिवयोगी आपल्या सर्वोत्कृष्ट अशा आत्मस्वरूपाकडे पाहत राहून आनंदित होतो.।।६६।।

**विश्वातीतं परं ब्रह्म शिवाख्यं चित्स्वरूपकम्।**
**तदेवाहमिति ज्ञानी सर्वोत्कृष्ट: स उच्यते।।६७।।**

**अन्वयार्थ** : विश्वातीतं = विश्वातीत, चित्स्वरूपकं = चैतन्यरूप, शिवाख्यं = शिव नावाचे जे, परं ब्रह्म = परब्रह्म आहे, तदेवाहमिति = ते मी आहे असे जाणणारा, स: = तो, सर्वोत्कृष्ट: = सर्वश्रेष्ठ असा, ज्ञानी = ज्ञानी, उच्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : परशिव ब्रह्मच विश्वातीत आणि चित्स्वरूप असून ते परब्रह्म मीच आहे असे तो ज्ञानयोगी समजत असल्यामुळे तो सर्वोत्कृष्ट होय.॥६७॥

**अचलं ध्रुवमात्मानमनुपश्यन्निरन्तरम्।**
**निरस्तविश्वविभ्रान्तिर्जीवन्मुक्तो भवेन्मुनिः॥६८॥**

**अन्वयार्थ** : अचलं = स्थिर, ध्रुवं = नित्य, अशा आत्मानं = आपल्या आत्म्याला, निरन्तरम् = नेहमी, अनुपश्यन् = अनन्यरूपाने अनुसंधान करणारा, मुनिः = शिवयोगी, निरस्तविश्वविभ्रान्तिः = प्रापंचिक भ्रांती नाहीशी होऊन, जीवन्मुक्तः = जीवन्मुक्त, भवेत् = होतो.

**भावार्थ** : अविचल आणि शाश्वत अशा आत्म्याला तो सदैव पाहत असतो. विश्वाची भ्रांत कल्पना त्याच्या मनातून नष्ट पावलेली असल्यामुळे तो शिवयोगी जीवन्मुक्त होऊन वागत असतो. आहारव्यवहारमुळे तो जिवंत दिसत असला तरी त्याला पुनर्जन्म नसतो.॥६८॥

**ब्रह्माद्याः किं नु कुर्वन्ति देवताः कर्ममार्गगाः।**
**कर्मातीतपदस्थस्य स्वयं ब्रह्मस्वरूपिणः॥६९॥**

**अन्वयार्थ** : कर्ममार्गगाः = कर्ममार्गात राहाणाऱ्या, ब्रह्माद्याः = ब्रह्मा आदी, देवताः = देवता, कर्मातीतपदस्थस्य = कर्मातीत स्थितीत असणाऱ्या, स्वयं = स्वतः, ब्रह्मस्वरूपिणः = ब्रह्मस्वरूपी शिवयोग्याचे, किं नु कुर्वन्ति = काय करू शकतात?

**भावार्थ** : स्वतः परब्रह्मस्वरूपी असलेल्या, पुण्यपादी कर्मकांडानी प्राप्य अशा स्थानांच्या अतीत असलेल्या त्या शिवयोग्याला, त्याने कर्मकांडांचे पालन केले नाही तरी, कर्ममार्गी ब्रह्मादी देवता त्याचे काहीही अहित करू शकत नाहीत.॥६९॥

**स्वेच्छया सञ्चरेद्योगी विमुञ्चन् देहमानिताम्।**
**दर्शनैः स्पर्शनैः सर्वानज्ञानपि विमोचयेत्॥७०॥**

**अन्वयार्थ** : देहमानितां = शरीराभिमान, विमुञ्चन् = सोडलेला, योगी = शिवयोगी, स्वेच्छया = आपल्या इच्छेप्रमाणे, संचरेत् = संचार करीत, दर्शनैः = दर्शनाने, स्पर्शनैः = स्पर्शनाने, सर्वान् = सर्व, अज्ञानपि = सामान्य लोकांना सुद्धा, विमोचयेत् = मुक्त करतो.



**भावार्थ** : स्वतःच्या देहाचा अभिमान न बाळगता परशिवयोगी स्वच्छंदपणे जगात संचार करीत असतो. आपल्या दर्शनाने व स्पर्शाने सर्व अज्ञ जनांचे अज्ञान दूर करून त्यांना मुक्त स्थिती प्राप्त करून देतो.॥७०॥

**नित्ये निर्मलभावने निरुपमे निर्धूतविश्वभ्रमे**
**सत्तानन्दचिदात्मके परशिवे साम्यं गतः संयमी।**
**प्रध्वस्ताश्रमवर्णधर्मनिगलः स्वच्छन्दसञ्चारवान्**
**देहीवाद्भुतवैभवो विजयते जीवन्विमुक्तः सुधीः॥७१॥**

**अन्वयार्थ** : नित्ये = नित्य, निर्मलभावाने = निर्मलस्वरूप, निरुपमे = उपमातीत, निर्धूतविश्वभ्रमे = सर्वदोषशून्य, सत्तानन्दचिदात्मके = सच्चिदानंद स्वरूप, परशिवे = परशिवाशी, साम्यं गतः = साम्यस्थिती प्राप्त करून घेतलेला, संयमी = शिवयोगी, प्रध्वस्ताश्रमवर्णधर्मनिगलः = वर्णाश्रम धर्मशृंखलांपासून मुक्त होऊन, स्वच्छन्दसञ्चारवान् = आपल्या इच्छेप्रमाणे संचार करणारा, जीवन्मुक्तः = जीवन्मुक्त, सुधीः = सुज्ञ शिवयोगी, देहीव = शरीरधारी असला तरी, अद्भुत-वैभवः = अद्भुत वैभवाने युक्त होऊन, विजयते = विराजमान होतो.

**भावार्थ** : नित्य, निर्मल, निरूपम, विश्वभ्रमरहित, सच्चिदानंदरूप अशा परशिवाशी आपल्या ज्ञातृत्व, कर्तृत्वादीमुळे समान झालेला असा शिवयोगी, वर्णाश्रमधर्माच्या शृंखला तोडून स्वच्छंदपणे मानवरूपात संचार करतो. असा ज्ञानी जीवन्मुक्त देहधारी असूनही अलौकिक वैभवाने सर्वत्र विजयी होतो.॥७१॥

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां***
***शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये***
***श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ***
***लिङ्गस्थलान्तर्गतभक्तस्थले दीक्षागुरुस्थलादि***
***नवविधस्थलप्रसङ्गो नाम पञ्चदशः परिच्छेदः।***

**पंधरावा परिच्छेद समाप्त.**

○○○

# सोळावा परिच्छेद

### लिङ्गस्थलान्तर्गत

## माहेश्वरस्थल

**अगस्त्य उवाच—**

**स्थलानां नवकं प्रोक्तं भक्तस्थलसमाश्रयम्।**
**माहेश्वरस्थले सिद्धं स्थलभेदं वदस्व मे।।१।।**

**अन्वयार्थ** : भक्तस्थलसमाश्रयम् = भक्तस्थलांतर्गत, स्थलानाम् = स्थलांचे, नवकं = नऊ प्रकार, प्रोक्तं = सांगितले, माहेश्वरस्थले = माहेश्वर स्थलात, सिद्धं = असणारे, स्थलभेदं = स्थलांचे भेद, मे = मला, वदस्व = सांगा.

**भावार्थ** : अगस्त्य प्रश्न करतात- आपण भक्तस्थलातील नऊ स्थले विशद केलीत. आता माहेश्वर स्थलात जे स्थलभेद आहेत ते मला सांगा.।।१।।

**माहेश्वरस्थले सन्ति स्थलानि नव तापस।**
**क्रियागमस्थलं पूर्वं ततो भावागमस्थलम्।।२।।**
**ज्ञानागमस्थलं चाथ सकायस्थलमीरितम्।**
**ततोऽकायस्थलं प्रोक्तं परकायस्थलं ततः।।३।।**
**धर्माचारस्थलं चाथ भावाचारस्थलं ततः।**
**ज्ञानाचारस्थलं चाथ क्रमादेषां भिदोच्यते।।४।।**

**अन्वयार्थ** : तापस = हे तपस्वी अगस्त्या, माहेश्वरस्थले = माहेश्वर स्थलात, नव = नऊ, स्थलानि = स्थले, सन्ति = आहेत, पूर्वं = पहिले, क्रियागमस्थलं = क्रियागम स्थल, ततः = त्यानंतर, भावागमस्थलं = भावागमस्थल, अथ = नंतर, ज्ञानागमस्थलं = ज्ञानागम स्थल, च = आणि, सकास्थलं = सकायस्थल, ईरितं = सांगितले आहे, ततः = त्यानंतर, अकायस्थलं = अकायस्थल, प्रोक्तं = सांगितले आहे, ततः = त्यानंतर, परकायस्थलं = परकायस्थल, अथ = त्यानंतर, धर्माचारस्थलं = धर्माचारस्थल, ततः = नंतर, भावाचारस्थलं = भावाचारस्थल, च = आणि, ज्ञानाचारस्थलं = ज्ञानाचारस्थल, एषां = ह्यांचे, क्रमात् = क्रमाने, भिदा = भेद, उच्यते = सांगितले जातात.



**भावार्थ** : यावर श्रीरेणुक सांगतात- माहेश्वरस्थलात नऊ पोटभेद आहेत. ते असे- १. क्रियागमस्थल, २. भावागमस्थल, ३. ज्ञानागमस्थल, ४. सकायस्थल, ५. अकायस्थल, ६. परकायस्थल, ७. धर्माचारस्थल, ८. भावाचारस्थल आणि ९. ज्ञानाचारस्थल अशा नऊ स्थलांतील प्रत्येकाचे भेद आता क्रमाने सांगतो.।।२-४।।

### क्रियागमस्थल - (५४)

**शिवो हि परमः साक्षात् पूजा तस्य क्रियोच्यते।**
**तत्परा आगमा यस्मात् तदुक्तोऽयं क्रियागमः।।५।।**

**अन्वयार्थ** : परमः = पूर्वी सांगितलेला परलिंग शिवयोगी, साक्षात् = प्रत्यक्ष, शिवो हि = शिवच होय, तस्य = त्याने केलेली, पूजा = पूजा, क्रिया = क्रिया म्हणून, उच्यते = म्हटली जाते, आगमाः = आगम, यस्मात् = ज्या कारणाने, तत्पराः = क्रियाप्रधान आहेत, तत् = त्यामुळे, अयं = हे, क्रियागमः = क्रियागमस्थल, उक्तः = म्हटले आहे.

**भावार्थ** : पूर्वोक्त परलिंगशिवयोगी हाच साक्षात् शिव आहे. तो करतो ती पूजा हीच क्रिया होय. अशी क्रिया लोकानुसरणासाठी शास्त्रानुसार, उपयुक्त उपदेशासारखी असल्यामुळे त्या क्रियेलाच क्रियागम असे म्हणतात.।।५।।

**प्रकाशते यथा नाग्निररण्यां मथनं विना।**
**क्रियां विना तथान्तस्थो न प्रकाशो भवेच्छिवः।।६।।**

**अन्वयार्थ** : अरण्यां = अरणीत, मथनं विना = मंथन केल्याशिवाय, यथा = जसा, अग्निः = अग्नी, न प्रकाशते = प्रकाशित होत नाही, तथा = तसाच, अन्तःस्थः = लिंगामध्ये राहाणारा, शिवः = शिव, क्रियां विना = पूजारूपी क्रियेशिवाय, प्रकाशः = प्रकट, न भवेत् = होत नाही.

**भावार्थ** : अरणीत अग्नी असतो खरा परंतु तो मंथन केल्याशिवाय जसा प्रकट होत नाही, तसाच लिंगामध्ये असलेल्या शिवाचा साक्षात्कारसुद्धा क्रिये (पूजे) वाचून होत नाही.।।६।।

**न यथा विधिलोपः स्यद्यथा देवः प्रसीदति।**
**यथागमः प्रमाणं स्यत्तथा कर्म समाचरेत्।।७।।**

**अन्वयार्थ** : विधिलोप: = विधीचा लोप, यथा न स्यात् = ज्यायोगे होणार नाही, देव: = शिव, यथा प्रसीदति = ज्यायोगे प्रसन्न होईल, यथा = ज्यायोगे, आगम: = आगम, प्रमाणं स्यात् = प्रमाण होईल, तथा = तशी, कर्म = पूजा, समाचरेत् = केली पाहिजे.

**भावार्थ** : विधिविधानांचा लोप होऊ न देता, आगमशास्त्रात सांगितल्याप्रमाणे, म्हणजे आगमांच्या विरुद्ध नसणारी आणि शिवाचा अनुग्रह होईल अशी कर्मेच आचरावीत. तात्पर्य, जीवन्मुक्त अशा परलिंगशिवयोग्याचे आचरण पाहून लोक स्वत:चे आचरण करीत असतात. म्हणून लोकांसाठी तरी त्या शिवयोग्याने शास्त्रोक्तप्रकारे आचरण करावे.॥७॥

**विधि: शिवनियोगोऽयं यस्माद्विहितकर्मणि।**
**शिवाराधनबुद्ध्यैव निरत: स्याद्विचक्षण:॥८॥**

**अन्वयार्थ** : विहितकर्मणि = शास्त्रोक्त कर्माविषयी, अयं विधि: = शिवपूजा केली पाहिजे असा हा नियम, शिवनियोग: = शिवाची आज्ञा आहे, तस्मात् = म्हणून, विचक्षण: = बुद्धिवंताने, शिवाराधनबुद्ध्यैव = शिवाराधन बुद्धीतच, निरत: स्यात् = आसक्त राहावे.

**भावार्थ** : शिवपूजा ही विहितकर्मांपैकी आहे आणि ती करण्याविषयी शिवाची आज्ञा आहे. शिवाज्ञेचे उल्लंघन केल्यास नरकप्राप्ती होते, असे शास्त्रवचन आहे. म्हणून शिवाज्ञारूपी शिवपूजेचे उल्लंघन करू नये तर शहाण्या माणसाने शिवाराधनेच्या बुद्धीनेच विहित कर्मे करावीत.॥८॥

**गुरोरादेशमासाद्य पूजयेत् परमेश्वरम्।**
**पूजिते परमेशाने पूजिता: सर्वदेवता:॥९॥**

**अन्वयार्थ** : गुरो: = गुरूची, आदेशं = आज्ञा, आसाद्य = मिळवून, परमेश्वरम् = परमेश्वराची, पूजयेत् = पूजा करावी, परमेशाने = परमेश्वर, पूजिते = पूजिला गेल्यावर, सर्वदेवता: = सर्व देव, पूजिता: = पूजिल्यासारखेच होय.

**भावार्थ** : गुरूने उपदेश केल्याप्रमाणे शिवाची पूजा करावी. एका शिवाची पूजा केल्यानेच सर्व देवांची पूजा केल्यासारखे होते.॥९॥



**सदा शिवार्चनोपायसामग्रीव्यग्रमानस:।**
**शिवयोगरतो योगी मुच्यते नात्र संशय:॥१०॥**

**अन्वयार्थ** : सदा = नेहमी, शिवार्चनोपायसामग्री = शिवपूजेची साधनसामग्री मिळविण्यात, व्यग्रमानस: = मन व्यग्र असलेला, शिवयोगरत: = शिवयोगनिष्ठ, योगी = शिवयोगी, मुच्यते = मुक्त होतो, नात्र संशय: = यात संशय नाही.

**भावार्थ** : जो योगी नेहमी शिवपूजनास लागणारी सामग्री मिळविण्यात मग्न असतो आणि शिवयोगसमाधीत लीन असतो, तो मायामलपाशातून मुक्त होतो यात शंका नाही.॥१०॥

**अन्धपङ्गुवदन्योन्यसापेक्षे ज्ञानकर्मणी।**
**फलोत्पत्तौ विरक्तस्तु तस्मात्तद्द्वयमाचरेत्॥११॥**

**अन्वयार्थ** : ज्ञानकर्मणी = ज्ञान आणि कर्म हे दोघे, अन्धपङ्गुवत् = आंधळा आणि पांगळ्यासारखे, अन्योन्यसापेक्षे = परस्परावलंबी आहेत, तस्मात् = म्हणून, फलोत्पत्तौ = परापर मुक्तिरूप फलाच्या उत्पत्तीविषयी, विरक्तस्तु = निरपेक्ष असणाऱ्याने, तद्द्वयमाचरेत् = त्या दोन्हींचे आचरण करावे.

**भावार्थ** : आंधळा आणि पांगळा हे जसे परस्परावर अवलंबून असतात, त्याप्रमाणे ज्ञान आणि कर्म हे परस्परसापेक्ष आहेत. म्हणून ज्ञानी शिवयोग्याने त्यापैकी कशापासूनही फलाची आसक्ती न ठेवता दोहोंचे आचरण करावे. ज्ञान आणि कर्म यांच्या संयुक्त आचरणानेच त्याला मुक्ती मिळते.॥११॥

**ज्ञाने सिद्धेऽपि विदुषां कर्मापि विनियुज्यते।**
**फलाभिसन्धिरहितं तस्मात् कर्म न सन्त्यजेत्॥१२॥**

**अन्वयार्थ** : विदुषां = ज्ञानी लोकांना, ज्ञाने = ज्ञान, सिद्धेऽपि = प्राप्त झाले तरी, कर्मापि = कर्मसुद्धा, विनियुज्यते = केले पाहिजे असे विधान केले जाते, तस्मात् = त्यासाठी, फलाभिसन्धिरहितं = फलापेक्षाविरहित अशा, कर्म = कर्माचा, न सन्त्यजेत् = त्याग करू नये.

**भावार्थ** : ज्ञानसिद्धी झाली तरी विद्वानाने कर्म केलेच पाहिजे. वेदान्तशास्त्रात अग्निहोत्रादी कर्मे फलाची अपेक्षा न बाळगता करावीत असे

विधान आहे. त्या त्या आश्रमविहित कर्माच्या त्यागाने मनुष्य पतित होतो. ज्ञान प्रधान असले तरी ते कर्मविरहित नसावे आणि कर्माचे प्राधान्य असले तरी ते कर्म ज्ञानशून्य नसावे. पक्ष्याला उडण्यासाठी जशी दोन पंखांची गरज असते, एकाच पंखाने तो उडू शकत नाही, तशा प्रकारे मुक्ती मिळविण्यासाठी ज्ञान आणि कर्म या दोहोंची आवश्यकता आहे. म्हणून ज्ञान्याने निष्कामपणाने कर्म करावे.॥१२॥

**आचार एव सर्वेषामलङ्काराय कल्प्यते।**
**आचारहीनः पुरुषो लोके भवति निन्दितः॥१३॥**

**अन्वयार्थ** : सर्वेषां = सर्वांना, आचार एव = आचारच, अलङ्काराय = अलंकार म्हणून, कल्प्यते = मानले जाते, लोके = जगात, आचारहीनः = आचार नसलेला, पुरुषः = मनुष्य, निन्दितः = निंदनीय, भवति = होतो.

**भावार्थ** : चांगला आचार हाच सर्व लोकांना भूषणावह आहे. जो मनुष्य आचारभ्रष्ट, दुराचारी असतो तो लोकांच्या दृष्टीने निंद्य ठरतो.॥१३॥

**ज्ञानेनाचारयुक्तेन प्रसीदति महेश्वरः।**
**तस्मादाचारवान् ज्ञानी भवेदादेहपातनात्॥१४॥**

**अन्वयार्थ** : आचारयुक्तेन = आचारयुक्त, ज्ञानेन = ज्ञानाने, महेश्वरः = महेश्वर, प्रसीदति = प्रसन्न होतो, तस्मात् = म्हणून, ज्ञानी = ज्ञान्याने, आदेह-पातनम् = देहपात होईपर्यंत, आचारवान् भवेत् = आचारसंपन्न व्हावे.

**भावार्थ** : सदाचारयुक्त अशा ज्ञानी मनुष्यावरच महेश्वर प्रसन्न होतो. म्हणून ज्ञानी मनुष्याने मरेपर्यंत सदाचारसंपन्न राहावे.॥१४॥

### भावागमस्थल - (५५)

**भावचिह्नानि विदुषो यानि सन्ति विरागिणः।**
**तानि भावागमत्वेन वर्तन्ते सर्वदेहिनाम्॥१५॥**

**अन्वयार्थ** : विरागिणः = कर्मफलाची अपेक्षा न बाळगणाऱ्या, विदुषः = ज्ञानी योग्याची, यानि = जी, भावचिह्नानि = भावलक्षणे, सन्ति = आहेत,



तानि = ती, सर्वदेहिनाम् = प्राकृत लोकांसाठी, भावागमत्वेन = भावरूपी आगम-शास्त्राप्रमाणे, वर्तन्ते = असतात.

**भावार्थ** : शिवयोग्याची जी भावचिन्हे (लक्षणे) असतात तीच सामान्य माणसांना अनुकरणीय अशा भावरूप शास्त्रासारखी असतात. तात्पर्य, शिवयोग्याची भावचिन्हेच लोकांना मार्गदर्शक शास्त्राप्रमाणे असल्यामुळे हे भावागमस्थल होय.॥१५॥

**शिवोऽहमिति भावोऽपि शिवतापत्तिकारणम्।**
**न ज्ञानमात्रं नाचारो भावयुक्तः शिवो भवेत्॥१६॥**

**अन्वयार्थ** : शिवोऽहमिति = मी शिव आहे अशी, भावोऽपि = भावना सुद्धा, शिवतापत्तिकारणम् = शिवत्वप्राप्तीचे कारण आहे, ज्ञानमात्रं = केवळ ज्ञान, आचारः = केवळ आचार, न = शिवत्वप्राप्तीचे कारण होणार नाही, परंतु भावयुक्तः = मी शिव आहे असा भाव असलेला, शिवो भवेत् = शिवस्वरूप होतो.

**भावार्थ** : पूर्वी सांगितलेल्या ज्ञानयुक्त सदाचारापेक्षाही 'मी शिव आहे' अशी दृढ भावना होणे हेच शिवतत्त्वप्राप्तीला महत्त्वाचे कारण आहे. केवळ ज्ञान अथवा आचार या कारणाने शिवत्व येत नाही तर शिवत्वाच्या भावनेने युक्त होण्याने मनुष्य स्वतः शिव होतो.॥१६॥

**ज्ञानं वस्तुपरिच्छेदो ध्यानं तद्भावकारणम्।**
**तस्माद् ज्ञाते महादेवे ध्यानयुक्तो भवेत्सुधीः॥१७॥**

**अन्वयार्थ** : ज्ञानं = ज्ञान, वस्तुपरिच्छेदः = वस्तूच्या वास्तविक रूपाचे निर्णायक असते, ध्यानं = ध्यान, तद्भावकारणम् = त्या वस्तूचे मननरूप असते, तस्मात् = त्यासाठी, महादेवे = महादेवाचे, ज्ञाते = ज्ञान झाले तरी, सुधीः = ज्ञान्यांनी, ध्यानयुक्तः = भावनायुक्त, भवेत् = व्हावे.

**भावार्थ** : वस्तूचे यथार्थ स्वरूप समजून घेण्याला ज्ञान कारण असते. आणि त्या जाणलेल्या वस्तूचे स्वरूप प्राप्त करून घेण्याला कारण त्या वस्तूचे ध्यान असते. शिवज्ञानामुळे शिवाच्या स्वरूपाचे ज्ञान होते आणि शिवध्यानामुळे शिवत्व प्राप्त होते. म्हणून शिवज्ञानसंपन्न असलेल्या

शिवयोग्याने शिवोऽहं अशा भावनेने निरंतर ध्यान करीत राहावे. त्यामुळे तो शिवस्वरूप होतो.॥१७॥

**अन्तर्बहिश्च सर्वत्र परिपूर्णं महेश्वरम्।**
**भावयेत् परमानन्दलब्धये पण्डितोत्तमः।।१८।।**

**अन्वयार्थ** : अन्तः = आत, च = आणि, बहिः = बाहेर असे, सर्वत्र = सगळीकडे, परिपूर्णं = पूर्ण असलेल्या, महेश्वरम् = महेश्वराची, परमानन्दलब्धये = परमानंदप्राप्तीसाठी, पण्डितोत्तमः = श्रेष्ठ पंडिताने, भावयेत् = भावना करावी.

**भावार्थ** : शिवशास्त्रकुशल शिवयोग्यांनी परमानंदप्राप्तीसाठी परशिव आपल्या शरीराच्या आत आणि बाहेर सर्वत्र परिपूर्ण व्यापून राहिला आहे, असे सदा ध्यान करावे.॥१८॥

**अर्थहीना यथा वाणी पतिहीना यथा सती।**
**श्रुतिहीना यथा बुद्धिर्भावहीना तथा क्रिया।।१९।।**

**अन्वयार्थ** : यथा = जशी, अर्थहीना = अर्थ नसलेली, वाणी = भाषा, यथा = जशी, पतिहीना = पती नसलेली, सती = स्त्री, यथा = जशी, श्रुतिहीना = वेदसंमत नसलेली, बुद्धिः = मती, तथा = तशी, भावहीना = भावना नसलेली, क्रिया = क्रिया होय.

**भावार्थ** : अर्थ नसलेले बोलणे जसे योग्य नव्हे, पतिविना स्त्री जशी शोभत नाही किंवा वेदांचे ज्ञान नसणारी बुद्धी जशी अयोग्य, त्याप्रमाणे भावहीन क्रिया व्यर्थ होय.॥१९॥

**चक्षुर्हीनो यथा रूपं न किञ्चिद्वीक्षितुं क्षमः।**
**भावहीनस्तथा योगी न शिवं द्रष्टुमीश्वरः।।२०।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, चक्षुर्हीना = नेत्र नसलेला मनुष्य, रूपं = रूप, वीक्षितुं = पाहाण्यास, न किञ्चित् क्षमः = थोडाही समर्थ होत नाही, तथा = तसे, भावहीना = भाव नसलेला, योगी = शिवयोगी, शिवं = शिवाला, द्रष्टुं = पाहण्यास, ईश्वरः = समर्थ, न = होत नाही.



**भावार्थ** : नेत्रहीन अंधाला जसे थोडेही रूप दिसू शकत नाही तसे भाव नसणारा योगी शंकराचे यथार्थ दर्शन घेऊ शकत नाही.॥२०॥

**भावशुद्धेन मनसा पूजयेत्परमेष्ठिनम्।**
**भावहीनां न गृह्णाति पूजां सुमहतीमपि।।२१।।**

**अन्वयार्थ** : भावशुद्धेन = ध्यानाने परिशुद्ध झालेल्या, मनसा = मनाने, परमेष्ठिनं = परमेश्वराची, पूजयेत् = पूजा करावी, भावहीनां = भावनारहित, सुमहतीमपि = अत्यंत महत्त्वाची सुद्धा, पूजां = पूजा, न गृह्णाति = तो ग्रहण करीत नाही.

**भावार्थ** : भावशुद्धतेने स्वच्छ झालेल्या मनाने परमेश्वराची पूजा करावी. भाव नसताना केलेली पूजा कितीही वैभवाची असली तरी ती शंकराला प्रिय होत नाही, अर्थात् अशा पूजेचा शंकराकडून स्वीकार होत नाही.॥२१॥

**नैरन्तर्येण सम्पन्ने भावे ध्यातुं शिवं प्रति।**
**तद्भावो जायते यद्वत् क्रिमेः कीटस्य चिन्तनात्।।२२।।**

**अन्वयार्थ** : क्रिमेः = आळीने, कीटस्य = भ्रमराचे, चिन्तनात् = चिंतन केल्याने, यद्वत् = ज्या प्रकारे, तद्भावः = भ्रमरभाव, जायते = उत्पन्न होतो, तसेच शिवं प्रति = शिवाचे, ध्यातुं = ध्यान करून, नैरन्तर्येण = निरंतर, भावे सम्पन्ने = भावसंपन्न झाल्यावर, तो शिवस्वरूप होतो.

**भावार्थ** : कीटक जसा भ्रमराच्या चिंतनाने भ्रमर होऊन जातो, तसाच शिवभक्त शिवाच्या सदैव ध्यानाने शिवरूप होऊन जातो.॥२२॥

**निष्कलङ्कं निराकारं परब्रह्म शिवाभिधम्।**
**निर्ध्यातुमसमर्थोऽपि तद्विभूतिं विभावयेत्।।२३।।**

**अन्वयार्थ** : निष्कलङ्कं = दोषरहित, निराकारं = आकाररहित, शिवाभिधं = शिव नावाच्या, परब्रह्म = परब्रह्माचे, निर्ध्यातुम् = ध्यान करण्यात, असमर्थोऽपि = असमर्थ असल्यास, तद्विभूतिं = त्याच्या सर्वज्ञत्वादी ऐश्वर्याची, विभावयेत् = भावना करावी.

**भावार्थ** : निष्कलंक, निराकार परब्रह्माचे नाव शिव आहे. त्याचे ध्यान करण्यास असमर्थ असणाऱ्या भक्ताने त्याच्या सर्वज्ञत्वादिऐश्वर्ययुक्त सगुण रूपाचे ध्यान करावे.॥२३॥

## ज्ञानागमस्थल - (५६)

**परस्य ज्ञानचिह्नानि यानि सन्ति शरीरिणाम्।**
**तानि ज्ञानागमत्वेन प्रवर्तन्ते विमुक्तये।।२४।।**

**अन्वयार्थ** : परस्य = भावागमसंपन्न परशिवयोग्याची, यानि = जी, ज्ञानचिह्नानि = ज्ञानाची लक्षणे, सन्ति = आहेत, तानि = ती, शरीरिणाम् = सामान्य जीवांच्या, विमुक्तये = मुक्तीसाठी, ज्ञानागमत्वेन = ज्ञानागमरूपाने, प्रवर्तन्ते = प्रवृत्त होतात.

**भावार्थ** : भावागमसंपन्न परशिवयोग्याच्या ठिकाणी जी ज्ञानचिन्हे दिसतात ती सामान्य लोकांना सद्गती प्राप्त करून देणारे शास्त्रागमच होत, म्हणून त्यास ज्ञानागमस्थल असे म्हणतात.।।२४।।

**भावेन किं फलं पुंसां कर्मणा वा किमिष्यते।**
**भावकर्मसमायुक्तं ज्ञानमेव विमुक्तिदम्।।२५।।**

**अन्वयार्थ** : पुंसां = जीवांना, भावेन = भावनेने, किं फलं = कोणते फल मिळणार?, वा = अथवा, कर्मणा = कर्माने, किमिष्यते = काय प्राप्त होते?, भावकर्मसमायुक्तं = भाव आणि कर्माने युक्त, ज्ञानमेव = ज्ञानच, विमुक्तिपदम् = मुक्ती देणारे होते.

**भावार्थ** : केवळ भावाने मनुष्यास काय फळ मिळणार? अथवा नुसत्या कर्माने तरी काय साधणार? भाव आणि कर्माबरोबरच 'अहं ब्रह्मास्मि' असे अपरोक्षज्ञान प्राप्त झाले असेल तरच मोक्षप्राप्ती होऊ शकते.।।२५।।

**केवलं कर्ममात्रेण जन्मकोटिशतैरपि।**
**नात्मनां जायते मुक्तिर्ज्ञानं मुक्तेर्हि कारणम्।।२६।।**

**अन्वयार्थ** : केवलं = केवळ, कर्ममात्रेण = कर्म केल्याने, आत्मानां = जीवांना, जन्मकोटिशतैरपि = शतकोटी जन्मांत सुद्धा, मुक्तिः = मुक्ती, न जायते = मिळत नाही, मुक्तेः = मुक्तीला, कारणं = कारण, ज्ञानं हि = ज्ञानच होय.

**भावार्थ** : केवळ यज्ञयागादी कर्मांच्या योगाने कोठ्यावधी जन्म घेऊनही मनुष्यास मोक्षप्राप्ती होत नाही. ज्ञान हेच मोक्षप्राप्ती होण्यास मूळ कारण आहे. ज्ञानामुळेच मोक्षप्राप्ती होते.।।२६।।



**ज्ञानहीनं सदा कर्म पुंसां संसारकारणम्।**
**तदेव ज्ञानयोगेन संसारविनिवर्तकम्।।२७।।**

**अन्वयार्थ** : सदा = नेहमी, ज्ञानहीनं = ज्ञानहीन, कर्म = यज्ञायागादी कर्म, पुंसां = जीवांना, संसारकारणम् = जन्ममरणरूपी संसाराला कारण होते, तदेव = तेच, ज्ञानयोगेन = ज्ञानाने युक्त झाल्यावर, संसारविनिवर्तकम् = संसाराला निवृत्तिकारक होते.

**भावार्थ** : ज्ञानविरहित कर्मे करीत राहिल्याने मनुष्याचा संसारताप वाढतो उलट तीच कर्मे ज्ञान असून केली तर संसारदु:खातून सोडविण्यास कारण होतात.।।२७।।

**फलं क्रियावतां पुंसां स्वर्गाद्यं नश्वरं यतः।**
**तस्मात्स्थायिफलप्राप्त्यै ज्ञानमेव समभ्यसेत्।।२८।।**

**अन्वयार्थ** : यतः = ज्यामुळे, क्रियावतां = यज्ञायागादी कर्म करणाऱ्या, पुंसां = जीवांना, स्वर्गाद्यं = स्वर्गादी, फलं नश्वरं = अशाश्वत फळ मिळते, तस्मात् = त्यासाठी, स्थायिफलप्राप्त्यै = मोक्षरूपी स्थायी फलप्राप्तीसाठी, ज्ञानमेव = ज्ञानाचाच, समभ्यसेत् = अभ्यास करावा.

**भावार्थ** : यज्ञयागादी कर्मे केल्याने माणसाला स्वर्गीय सुख मिळत असले तरी ते नाशिवंत असते. कारण पुण्यकर्माने स्वर्गप्राप्ती झाली तरी ते पुण्य क्षीण झाल्यावर पुन्हा जन्म घ्यावा लागतो. म्हणून चिरकाल टिकणारे मोक्षसुख मिळवायचे असेल तर मनुष्याचे ज्ञानाचाच अभ्यास करावा.।।२८।।

**शास्त्राभ्यासादियत्नेन सद्गुरोपुपदेशतः।**
**ज्ञानमेव समभ्यस्येत् किमन्येन प्रयोजनम्।।२९।।**

**अन्वयार्थ** : शास्त्राभ्यासादियत्नेन = निगमागमांच्या अभ्यासादी प्रयत्नाने, सद्गुरोः = सद्गुरूच्या, उपदेशतः = उपदेशाने, ज्ञानमेव = शिवज्ञानाचाच, समभ्यसेत् = अभ्यास करावा, अन्येन = अन्य शास्त्रांचे, किं प्रयोजनम् = काय प्रयोजन?

**भावार्थ** : निगमागमांच्या शेवटच्या भागात असणाऱ्या वीरशैव-शास्त्राच्या अध्ययनाने आणि सद्गुरूच्या उपदेशाने शिवज्ञानाचाच अभ्यास

करावा, पशुमांसभक्षणादीचा उपदेश करणाऱ्या पूर्वमीमांसादी शास्त्रांच्या अध्ययनाने काही प्रयोजन नाही.॥२९॥

**ज्ञानं परशिवाद्वैतपरिपाकविनिश्चयः।**
**येन संसारसम्बन्धविनिवृत्तिर्भवेत् सताम्।।३०।।**

**अन्वयार्थ** : परशिवाद्वैत = परशिवलिंग एकच आहे अशा रीतीचा, परिपाकविनिश्चयः = परिपक्व निश्चय, ज्ञानं = ज्ञान होय, येन = ज्यामुळे, सतां = सज्जनांची, संसारसम्बन्धनिवृत्तिः = संसारबंधनापासून मुक्ती, भवेत् = होते.

**भावार्थ** : परशिव ब्रह्मापेक्षा अन्य असे काही नाही, असा दृढ निश्चय होणे हेच ज्ञान. अशा ज्ञानामुळेच संसारदुःखाची निवृत्ती होते.॥३०॥

**शिवात्मकमिदं सर्वं शिवादन्यन्न विद्यते।**
**शिवोऽहमिति या बुद्धिस्तदेव ज्ञानमुत्तमम्।।३१।।**

**अन्वयार्थ** : इदं सर्वं = हे सर्व, शिवात्मकं = शिवस्वरूप आहे, शिवादन्यत् = शिवाशिवाय, न विद्यते = काही नाही, शिवोऽहं = मी शिवस्वरूप आहे, इति = अशा रीतीची, या बुद्धिः = जी बुद्धी आहे, तदेव = तीच, उत्तमम् = उत्तम, ज्ञानं = ज्ञान होय.

**भावार्थ** : हे सर्व जग शिवस्वरूप असून शिवाशिवाय या जगात दुसरे काही नाही आणि मीदेखील शिवस्वरूप आहे, अशी जाणीव होणे यालाच श्रेष्ठ ज्ञान म्हणतात.॥३१॥

**अन्धो यथा पुरस्थानि वस्तूनि च न पश्यति।**
**ज्ञानहीनस्तथा देही नात्मस्थं वीक्षते शिवम्।।३२।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसा, अन्धः = आंधळा, पुरस्थानि = पुढे असलेल्या, वस्तूनि = वस्तू, न पश्यति = पाहू शकत नाही, तथा = तसा, ज्ञानहीनः = शिवाद्वैतज्ञान नसलेला, देही = जीवात्मा, आत्मस्थं = आपल्या आत्मरूपाने असणाऱ्या, शिवं = शिवाला, न वीक्षते = पाहू शकत नाही.

**भावार्थ** : आंधळ्यापुढे कोणत्याही वस्तू ठेवल्या तरी त्याला त्या दिसत नाहीत. तसेच ज्ञान नसणाऱ्या व्यक्तीला आपल्या हृदयातच असलेल्या शिवाचे रूप (आत्मरूप) दिसत नाही.॥३२॥



**शिवस्य दर्शनात् पुंसां जन्मरोगनिवर्तनम्।**
**शिवदर्शनमप्याहुः सुलभं ज्ञानचक्षुषाम्।।३३।।**

**अन्वयार्थ** : शिवस्य = शिवाच्या, दर्शनात् = दर्शनाने, पुंसां = जीवांचे, जन्मरोगनिवर्तनम् = जन्मरूपी रोग नाहीसा होतो, शिवदर्शनमपि = शिवाचे दर्शन सुद्धा, ज्ञानचक्षुषां = शिवज्ञान्यांना, सुलभं = सुलभ होते असे, आहुः = सांगतात.

**भावार्थ** : शिवाच्या दर्शनाने माणसाच्या जन्ममरणरोगाचे निवारण होते. ज्ञानाचे नेत्र लाभलेल्या मनुष्यास ते शिवदर्शन सुलभ होते.॥३३॥

**दीपं विना यथा गेहे नान्धकारो निवर्तते।**
**ज्ञानं विना तथा चित्ते मोहोऽपि न निवर्तते।।३४।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, गेहे = घरात, दीपं विना = दिव्याशिवाय, अन्धकारः = अंधार, न निवर्तते = दूर होत नाही, तथा = तसे, ज्ञानं विना = ज्ञानाशिवाय, चित्ते = चित्तातील, मोहोऽपि = मोहसुद्धा, न निवर्तते = दूर होत नाही.

**भावार्थ** : दिवा लावल्याशिवाय जसा घरातील अंधार नाहीसा होत नाही, तशा रीतीने ज्ञानाशिवाय (शिवज्ञान झाल्याशिवाय) मनुष्यांच्या मनातील मोह, अज्ञान नाहीसे होत नाहीत.॥३४॥

### सकायस्थल - (५७)

**परस्य या तनुर्ज्ञेयाऽदेहकर्माभिमानिनः।**
**तया सकायो लोकोऽयं तदात्मत्वनिरूपणात्।।३५।।**

**अन्वयार्थ** : अदेहकर्माभिमानिन; = मी स्थूल आहे, मी करतो अशा रीतीचा अभिमान नसलेला, परस्य = पूर्वोक्तज्ञानस्थलीचे, ज्ञेया = जाणण्यायोग्य, या = जे, तनुः = शरीर आहे, तया = त्याने, तदात्मत्वनिरूपणात् = त्या शरीरातील आत्मत्व प्रतिपादनाने, अयं लोकः = हा ज्ञानस्थली, सकायः = सकाय असे म्हणविला जातो.

**भावार्थ** : सामान्य लोकांप्रमाणे मी स्थूल आहे आणि मीच करतो, असा देहाचा आणि देहजन्य कर्मांचा अभिमान न धरणाऱ्या पूर्वोक्त ज्ञानसंपन्न शिवयोग्याचा देह, ज्याच्याद्वारे आत्मस्वरूपाचे निरूपण होते, त्या देहालाच

लोक आत्मस्वरूप मानतात. त्याचा देह लोकांकरताच असतो. म्हणून त्या आत्मस्वरूपी शिवयोग्याला सकाय असे म्हणतात. अर्थात् तो शरीरधारी शिवच असतो.॥३५॥

**कायं विना समस्तानां न क्रिया न च भावना।**
**न ज्ञानं यत्ततो योगी कायवानेव सञ्चरेत्।।३६।।**

**अन्वयार्थ** : यत् = ज्या करणाने, समस्तानां = सर्वांच्या, कायं विना = शरीराशिवाय, न क्रिया = क्रिया होऊ शकत नाही, न भावना = भावना होऊ शकत नाही, च = आणि, न ज्ञानं = ज्ञानसुद्धा प्राप्त होत नाही, ततः = त्या कारणाने, योगी = शिवयोग्याने, कायवानेव = सशरीरी होऊन, सञ्चरेत् = संचार करावा.

**भावार्थ** : शरीराशिवाय क्रिया, भावना व ज्ञान या तिन्ही गोष्टी निसर्गत: कोणालाही अशक्य असल्यामुळे योग्याने 'सकाय' होऊन म्हणजे शरीरधारी होऊनच संचार करावा.॥३६॥

**शिवैकज्ञानयुक्तस्य योगिनोऽपि महात्मनः।**
**काययोगेन सिद्ध्यन्ति भोगमोक्षादयः सदा।।३७।।**

**अन्वयार्थ** : शिवैक्यज्ञानयुक्तस्य = शिवाद्वैतज्ञान असणाऱ्या, महात्मनः = महात्मा अशा, योगिनोऽपि = योग्याला सुद्धा, काययोगेन = शरीरामुळेच, सदा = नेहमी, भोगमोक्षादयः = भोगमोक्षादी, सिद्ध्यन्ति = सिद्ध होतात.

**भावार्थ** : शिवज्ञान शिवयोगी महात्म्यालासुद्धा भोगमोक्षादी गोष्टी शरीरामुळेच साध्य होतात. शरीराशिवाय कोणताही अनुभव घेणे शक्य नाही. म्हणून तो ज्ञानी होऊनही शरीरधारी असतो.॥३७॥

**काष्ठं विना यथा वह्निर्जायते न प्रकाशवान्।**
**मूर्तिं विना तथा योगी नात्मतत्त्वप्रकाशवान्।।३८।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, काष्ठं विना = लाकडाशिवाय, वह्निः = अग्नी, प्रकाशवान् = प्रकट, न जायते = होत नाही, तथा = तसे, योगी = शिवयोग्याच्या, मूर्तिं विना = शरीराशिवाय, आत्मतत्त्व = आत्मतत्त्व, प्रकाशवान् = प्रकट, न = होत नाही.

**भावार्थ** : लाकडाशिवाय अग्नी प्रकाशित (प्रकट) होऊ शकत नाही. तशाच रीतीने शरीराशिवाय शिवयोग्याचे आत्मतत्त्व प्रकट होऊ शकणार नाही.॥३८॥

**मूर्त्यात्मनैव देवस्य यथा पूज्यत्वकल्पना।**
**तथा देहात्मनैवास्य पूज्यत्वं परयोगिनः।।३९।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, देवस्य = देवाचे, मूर्त्यात्मनैव = मूर्तीमुळेच, पूज्यत्वकल्पना = पूज्यभाव निर्माण होतो, तथा = तसेच, अस्य = ह्या, परयोगिनः = परशिवयोग्याविषयी, पूज्यत्वं = पूज्यभावना, देहात्मनैव = देहामुळेच होते.

**भावार्थ** : देवाची पूजा करण्यासाठी मूर्तीची गरज असते. त्या मूर्तीमुळे जशी पूज्य बुद्धी उत्पन्न होते, त्याप्रमाणे शरीरामुळे शिवयोग्याच्या आत्मरूपा-बद्दल पूज्यभाव उत्पन्न होतो. शरीराशिवाय शिवयोग्याची पूजा कशी होऊ शकेल? अर्थात् होऊ शकणार नाही.॥३९॥

**निष्कलो हि महादेवः परिपूर्णः सदाशिवः।**
**जगत्सृष्ट्यादिसंसिद्ध्यै मूर्तिमानेव भासते।।४०।।**

**अन्वयार्थ** : निष्कलः = निराकार, परिपूर्णः = परिपूर्ण, महादेवः = देवांचा देव असा, सदाशिवः = सदाशिव, जगत्सृष्ट्यादिसंसिद्ध्यै = जगाच्या सृजनादी कार्यासाठी, हि = निश्चयाने, मूर्तिमानेव = मूर्तिमंत होऊन, भासते = भासतो.

**भावार्थ** : निराकार, निष्कल, परिपूर्ण असा सदाशिव सृष्टीच्या उत्पत्ती, स्थिती आणि संहारासाठी दिव्य देह धारण करतो.॥४०॥

**ब्रह्माद्या देवताः सर्वा मुनयोऽपि मुमुक्षवः।**
**कायवन्तो हि कुर्वन्ति तपः सर्वार्थसाधकम्।।४१।।**

**अन्वयार्थ** : ब्रह्माद्याः = ब्रह्मा आदी, देवताः = देवता, सर्वाः = सर्व, मुनयः = मुनी, अपि = आणि, मुमुक्षवः = मोक्षाभिलाषी लोक, कायवन्तः =

शरीर धारण करून, सर्वार्थसाधकं = सर्व मनोरथ पूर्ण करणारे, तपः = तप, हि = निश्चयाने, कुर्वन्ति = करतात.॥४१॥

**भावार्थ** : ब्रह्मादिदेवता आणि मोक्षाची इच्छा करणारे सर्व मुनीही शरीर धारण करून सर्व मनोरथ पूर्ण करणारे तपाचरण करतात.॥४१॥

**तपो हि मूलं सर्वासां सिद्धीनां यज्जगत्त्रये।**
**तपस्तत्कायमूलं हि तस्मात् कायं न सन्त्यजेत्।।४२।।**

**अन्वयार्थ** : जगत्त्रये = त्रैलोक्यात, यत् = ज्या कारणाने, सर्वासां = सर्व, सिद्धीनां = सिद्धींना, तपो हि = तपच, मूलं = मूळ कारण होय, तत् = ते, तपः = तप, कायमूलं हि = शरीरामुळेच (होते), तस्मात् = म्हणून, कायं = शरीर, न सन्त्यजेत् = सोडू नये.

**भावार्थ** : तिन्ही लोकांत सर्व सिद्धी प्राप्त होण्यास तपश्चर्याच कारण असते त्या तपश्चर्येला शरीरच साधन असते. म्हणून शरीराचा जाणूनबुजून त्याग करू नये.॥४२॥

### अकायस्थल - (५८)

**औपचारिकदेहित्वाज्जगदात्मत्वभावनात्।**
**मायासम्बन्धराहित्यादकायो हि परः स्मृतः।।४३।।**

**अन्वयार्थ** : परः = पूर्वी सांगितलेला सकाय परयोगी, औपचारिकदेहित्वात् = देहाभिमान नसल्यामुळे औपचारिकरूपाने देहधारी असल्याने, जगत् = जग, आत्मत्वभावनात् = शिवाच्या चित्क्रियाशक्तिस्वरूप असल्याचे चिंतन करीत असल्यामुळे, मायासम्बन्धराहित्यात् = मायेचा संबंध नसल्याने, अकायो हि = अकाय अस, स्मृतः = म्हटला जातो.

**भावार्थ** : यापूर्वी वर्णिलेला तो सकाय योगी देहाभिमानरहित झाला असल्यामुळे त्याचे देहधारण औपचारिकच असते. हे सर्व जग शिवाशी अभिन्न अशा चित्क्रियाशक्तीचे प्रकट रूप आहे, असे जाणून प्रपंचात भेदबुद्धिविरहित होऊन मायासंबंधरहित होतो. त्यामुळे सामान्यजनाप्रमाणे तो देहधारी दिसत असला तरी विचारदृष्ट्या पाहिल्यास त्याला देहाचा संबंध उरलेला नसतो. म्हणूनच त्याला अकाय म्हणून ओळखतात.॥४३॥



**परस्य देहयोगोऽपि न देहाश्रयविक्रिया।**
**शिवस्येव यतस्तस्मादकायोऽयं प्रकीर्तितः।।४४।।**

**अन्वयार्थ** : यतः = ज्यामुळे, परस्य = परशिवयोग्याला, देहयोगेऽपि = देहसंबंध असला तरी, शिवस्येव = शिवाप्रमाणे, देहाश्रयविक्रिया = शरीरापासून होणारे कामादी विकार, न = होत नाहीत, तस्मात् = त्यासाठी, अयं = हा, अकायः = अकाय म्हणून, प्रकीर्तितः = ओळखला जातो.

**भावार्थ** : विकाररहित सत्त्वगुणप्रधान अशा मायेमुळे शिव देहधारी असला तरी तो जसा शरीरापासून उत्पन्न होणाऱ्या कामक्रोधादी विकारांनी रहित असतो तसा हा परयोगीही शिवसमान झाला असल्यामुळे देहाच्या विकारापासून तो अलिप्त असतो.॥४४॥

**परलिङ्गे विलीनस्य परमानन्दचिन्मये।**
**कुतो देहेन सम्बन्धो देहिवद्भासनं भ्रमः।।४५।।**

**अन्वयार्थ** : परमानन्दचिन्मये = परमानंद आणि चिद्रूप अशा, परलिङ्गे = परशिवब्रह्मात, विलीनस्य = लीन झालेल्याला, देहेन = देहाने होणारा, सम्बन्धः = संबंध, कुतः = कसा होईल? त्याचे देहिवद्भासनम् = शरीरीसारखा प्रतीत होणे, भ्रमः = भ्रम होय.

**भावार्थ** : परमानंद चिद्रूप अशा परलिंगात त्या परयोग्याचे मन विलीन झाले असल्यामुळे त्याला देहसंबंध कसा उरणार? उरत नाही. म्हणून तो वास्तविक अकायच होय. तरीही लौकिक जनांना भ्रमामुळे तो देहधारी भासतो. यामुळे तो शिवयोगी अकाय असूनही सकाय दिसतो.॥४५॥

**देहाभिमानहीनस्य शिवभावे स्थितात्मनः।**
**जगदेतच्छरीरं स्याद् देहेनैकेन का व्यथा।।४६।।**

**अन्वयार्थ** : देहाभिमानहीनस्य = आपल्या देहाचा अभिमान नसलेला, शिवभावे = शिवमयभावनेत, स्थितात्मनः = राहाणाऱ्याला, एतत् = हे, जगत् = जग, शरीरं स्यात् = शरीर होते, तर मग एकेन = एकाच, देहेन = देहाने, का व्यथा = काय बाधा होईल?.

**भावार्थ** : देहाभिमान मुळीच नसल्यामुळे शिवयोग्याचे मन नेहमी शिवस्वरूपात रमलेले असते. हे सर्व जग जसे शिवाचे आहे, तसे शिवयोग्यालाही सर्व जगच आपले शरीर वाटत असल्यामुळे त्याच्या दृश्य अशा एका शरीराची त्याला कसलीच बाधा होत नाही.॥४६॥

**शिवज्ञानैकनिष्ठस्य नाहंकारभवभ्रमः।**
**न चेन्द्रियभवं दुःखं त्यक्तदेहाभिमानिनः।।४७।।**

**अन्वयार्थ** : शिवज्ञानैकनिष्ठस्य = शिवाद्वैतज्ञानात एकनिष्ठ असलेल्याला, अहङ्कारभवभ्रमः = अहंकाराने होणारा भ्रम, न = नसतो, च = आणि, त्यक्तदेहाभिमानिनः = शरीराभिमान सोडलेल्याला, इन्द्रियभवं = इंद्रियामुळे उत्पन्न होणारे, दुःखं = दुःख, न = होत नाही.

**भावार्थ** : शरीराचा अभिमान सोडलेल्या आणि मी शिवच आहे अशी दृढ भावना झालेल्या त्या शिवयोग्याला परिच्छिन्न अशा शरीराविषयी अहंभाव उरला नसल्यामुळे त्या अहंकारापासून उत्पन्न झालेली, 'मी ईश्वर नाही' अशी भ्रांती असो अथवा इंद्रियजन्य दुःख असो, त्याला मुळीच स्पर्श करीत नाही.॥४७॥

**न मनुष्यो न देवोऽहं न यक्षो नैव राक्षसः।**
**शिवोऽहमिति यो बुद्ध्यात् तस्य किं देहकर्मणा।।४८।।**

**अन्वयार्थ** : अहम् = मी, न मनुष्यः = मनुष्य नाही, न देवः = देव नाही, न यक्षः = यक्ष नाही, नैव राक्षसः = राक्षसही नाही, परंतु अहम् = मी, शिवः = शिव आहे, इति = अशा प्रकारे, यः = जो, बुद्ध्यात् = जाणतो, तस्य = त्याला, देहकर्मणा = शरीरापासून, होणाऱ्या कर्मांचे, किं = काय प्रयोजन?

**भावार्थ** : मी मनुष्य नव्हे, देव नव्हे, राक्षस नव्हे किंवा यक्षही नव्हे तर मी प्रत्यक्ष शिवच आहे, असे जो जाणतो त्या शिवयोग्याला शरीराची पीडा काय होणार? आणि कर्माची तरी बाधा कशी होणार? अर्थात् होणार नाही.॥४८॥



## परकायस्थल - (५९)

**वशीकृतत्वात् प्रकृतेर्मायामार्गातिवर्तनात्।**
**परकायोऽयमाख्यातः सत्यज्ञानसुखात्मकः।।४९।।**

**अन्वयार्थ** : प्रकृतेः = प्रकृतीला, वशीकृतत्वात् = आपल्या अधीन करून घेतल्यामुळे, मायामार्गातिवर्तनात् = मायेचा मार्ग उल्लंघन केल्यामुळे, सत्यज्ञान-सुखात्मकः = सच्चिदानंदस्वरूप असा, अयं = हा अकाय शिवयोगी, परकायः = परकाय म्हणून, आख्यातः = म्हटला जातो.

**भावार्थ** : ज्याने प्रकृतीला वश केलेले आहे आणि जो मायामार्गाच्या पलीकडे गेलेला आहे, जो सच्चिदानंदरूप झालेला आहे, अशा शिवयोग्याला परकाय म्हणतात. पर म्हणजे ब्रह्म, काय म्हणजे शरीर. ज्याचे शरीरच ब्रह्मरूप झालेले असते असा तो परकाय होय.॥४९॥

**परब्रह्मवपुर्यस्य प्रबोधानन्दभासुरम्।**
**प्राकृतेन शरीरेण किमेतेनास्य जायते।।५०।।**

**अन्वयार्थ** : प्रबोधानन्दभासुरं = चिदानंदाने प्रकाशित होणारा, परब्रह्म = परशिवब्रह्म, यस्य = ज्याचे, वपुः = शरीर आहे, अस्य = ह्या परकाय शिवयोग्याला, एतेन = ह्या, प्राकृतेन = पाकृतिक, शरीरेण = शरीराने, किं जायते = काय होते?

**भावार्थ** : ज्याचे शरीर सच्चिदानंद परब्रह्मस्वरूपच झालेले आहे, तो परकाय शिवयोगी भेदबुद्धिरूप मायामार्ग ओलांडून गेला असल्यामुळे त्या मायेचे कार्य अशा प्रकृतितत्त्वाच्या अधीन असलेल्या शरीराची त्याला काय बाधा होणार?॥५०॥

**सम्यग्ज्ञानाग्निसन्दग्धजन्मबीजकलेवरः।**
**शिवतत्त्वावलम्बी यः परकायः स उच्यते।।५१।।**

**अन्वयार्थ** : सम्यग्ज्ञानाग्नि = दृढतर शिवाद्वैतज्ञानरूपी अग्नीने, सन्दग्ध-जन्मबीजकलेवरः = ज्याचे जन्मबीजरूपी सूक्ष्म शरीर जळालेले आहे असा, शिवतत्त्वावलम्बी = परशिवस्वरूपी, यः = जो आहे, सः = तो, परकायः = परकाय म्हणून, उच्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : दृढतर शिवाद्वैतज्ञानरूपी अग्नीने पुनर्जन्मास कारणीभूत असणारे ज्याचे सूक्ष्मशरीररूपी बीज पूर्णपणे जळून गेलेले आहे, असा शिवयोगी परशिवस्वरूप झालेला असतो, म्हणून त्याला परकाययोगी असे म्हणतात.॥५१॥

**इन्द्रियाणि मनोवृत्तिवासनाः कर्मसंभवाः।**
**यत्र यान्ति लयं तेन सकायोऽयं परात्मना॥५२॥**

**अन्वयार्थ** : कर्मसम्भवाः = कर्मपाशाने उत्पन्न झालेल्या, मनोवृत्तिवासनाः = मनोवृत्तीच्या वासना आणि, इन्द्रियाणि = इंद्रिये, यत्र = जेथे, लयं यान्ति = लय पावतात, तेन = त्या, परात्मना = परब्रह्माने, अयं = हा, सकायः = शरीरयुक्त होतो.

**भावार्थ** : कर्मपाशाने उत्पन्न झालेल्या मनोवृत्तींच्या वासना आणि इंद्रियव्यापार ज्यामध्ये विलीन होतात असे परब्रह्मरूप शरीर धारण केलेला हा परकाय योगी असतो.॥५२॥

**पराहन्तामनुप्राप्य पश्येद् विश्वं चिदात्मकम्।**
**सदेहोऽतिभ्रमस्तस्य निश्चिता हि शिवात्मता॥५३॥**

**अन्वयार्थ** : पराहन्ताम् = परशिवब्रह्म मी आहे अशा स्थितीला, अनुप्राप्य = प्राप्त होऊन जो, विश्वं = विश्वाला, चिदात्मकं = चिद्रूपाने, पश्येत् = पाहतो, तस्य = त्याचे, शिवात्मता = शिवरूपत्व, निश्चिता हि = निश्चितच आहे, सदेहः = शरीराने युक्त असणे, अतिभ्रमः = सामान्य लोकांना मोठे भ्रामक वाटते.

**भावार्थ** : मी म्हणजेच परब्रह्म आहे, अशा पराहंतेने शिवयोगी सर्व विश्वच चिदानंदस्वरूपत्वाने पाहातो. त्यामुळे त्याचे शरीर निश्चित रूपाने शिव-स्वरूप असते. तो सामान्य देहधारी आहे असे समजणे भ्रांतिमूलक होय.॥५४॥

**स्वस्वरूपं चिदाकारं ज्योतिः साक्षाद्विचिन्तयन्।**
**देहवानपि निर्देहो जीवन्मुक्तो हि साधकः॥५४॥**

**अन्वयार्थ** : स्वस्वरूपं = आपले स्वरूप, चिदाकारं = चिद्रूप अशी, ज्योतिः = ज्योती आहे, अशा रीतीने साक्षात् = साक्षात, विचिन्तयन् = चिंतन करणारा, साधकः = साधक, देहवानपि = शरीर असून सुद्धा, निर्देहः = निर्देही असतो, जीवन्मुक्तो हि = तो जीवन्मुक्त च असतो.



**भावार्थ** : आत्मस्वरूप चैतन्याकार आहे, साक्षात् ज्योतिर्मय आहे, असे ध्यान करणारा साधक देहधारी असला तरी तो विदेही अर्थात् जीवन्मुक्त असतो.॥५४॥

**देहस्तिष्ठतु वा यातु योगिनः स्वात्मबोधिनः।**
**जीवन्मुक्तिर्भवेत् सद्यश्चिदानन्दप्रकाशिनी॥५५॥**

**अन्वयार्थ** : स्वात्मबोधिनः = आपले आत्मस्वरूप जाणणाऱ्या, योगिनः = योग्याचा, देहः = देह, तिष्ठतु = राहो, वा = अथवा, यातु = जावो, त्याला सद्यः = तत्काल, चिदानन्दप्रकाशिनी = सच्चिदानंदरूप आत्म्याला प्रकाशित करणारी, जीवन्मुक्तिः = जीवन्मुक्ती, भवेत् = प्राप्त होते.

**भावार्थ** : ज्याला स्वात्मबोध झालेला आहे, अशा शिवयोग्याचा देह असो किंवा नसो, त्याला चिदानंदस्वरूपाचा प्रत्यय आणून देणारी जीवन्मुक्ती तत्काळ प्राप्त होते.॥५५॥

**आत्मज्ञानावसानं हि संसारपरिपीडनम्।**
**सूर्योदयेऽपि किं लोकस्तिमिरेणोपरुध्यते॥५६॥**

**अन्वयार्थ** : संसारपरिपीडनम् = जननमरणरूपी संसाराची पीडा, आत्मज्ञानावसानं हि = आत्मज्ञानाने समाप्त होणारी असते, सूर्योदयेऽपि = सूर्योदय झाल्यावर ही, लोकः = लोक, तिमिरेण = अंधाराने, किम् उपरुध्यते = कसे प्रतिबंधित होतील?

**भावार्थ** : सूर्योदय होईपर्यंत लोकांना अंधाराचा उपद्रव होतच असतो सूर्योदयानंतर तो जसा नाहीसा होतो, तशा प्रकारे आत्मज्ञान लाभेपर्यंत संसाराची पीडा सहन करावी लागते. परंतु आत्मज्ञान होताच संसारपीडा नाहीशी होते.॥५६॥

**देहाभिमाननिर्मुक्तः कलातीतपदाश्रयः।**
**कथं याति परिच्छेदं शरीरेषु महाबुधः॥५७॥**

**अन्वयार्थ** : देहाभिमाननिर्मुक्तः = शरीराच्या अभिमानाने मुक्त होऊन, कलातीतपदाश्रयः = कलातीत अशा परब्रह्मस्थानी आश्रित राहाणारा, महाबुधः = परमज्ञानी, शरीरेषु = शरीरामध्ये, परिच्छेदं = परिमित, कथं याति = कसा होईल?

**भावार्थ** : त्या परकाय योग्याने निवृत्ती, प्रतिष्ठा, विद्या, शांती आणि शांत्यतीत अशा पंचकलांच्या अतीत असे परब्रह्मपद प्राप्त केलेले असल्यामुळे त्या पंचकलांपासून उत्पन्न झालेल्या पंचभूतांचे कार्य अशा शरीराचा अभिमान त्याने त्यागलेला असतो. म्हणून असा देहाभिमानशून्य असलेला तो परमज्ञानी मी या एका शरीरातच आहे अशी परिमित भावना कशी करू शकेल? अर्थात् करणार नाही. त्यामुळे तो देहधारी आहे असे समजणे हा भ्रम होय.॥५७॥

**धर्माचारस्थल - (६०)**

**तस्यैव परकायस्य समाचारो य इष्यते।**
**स धर्मः सर्वलोकानामुपकाराय कल्पते।।५८।।**

**अन्वयार्थ** : तस्यैव = त्या, परकायस्य = परकाय शिवयोग्याला, यः = जो, समाचारः = आचार, इष्यते = इष्ट असतो, सः = तो आचार, धर्मः = धर्म होऊन, सर्वलोकानाम् = सर्व लोकांच्या, उपकाराय = उपकारासाठी, कल्प्यते = मानला जातो.

**भावार्थ** : ज्याचे शरीर परब्रह्मरूप आहे, अशा परकाय शिवयोग्याला ज्या आचाराची इच्छा होते तोच आचार लोकांना अनुकरणीय होतो. त्याचा धर्माचार सर्व लोकांच्या उपकारासाठी, हितासाठी असतो.॥५८॥

**अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं दया क्षमा।**
**दानं पूजा जपो ध्यानमिति धर्मस्य संग्रहः।।५९।।**

**अन्वयार्थ** : अहिंसा = अहिंसा, सत्यं = सत्य, अस्तेयं = अचौर्य, ब्रह्मचर्यं = ब्रह्मचर्य, दया = दया, क्षमा = क्षमा, दानं = सहज दान, पूजा = शिवलिंग पूजा, जपः = पंचाक्षरी जप, ध्यानं = शिवलिंगाचे चिंतन, इति = असा, धर्मस्य संग्रहः = धर्माचारांचा संग्रह होय.

**भावार्थ** : त्रिकरणपूर्वक (काया, वाचा आणि मनाने) कोणत्याही प्रकारची हिंसा न करणे, खरे बोलणे, चोरी न करणे, ब्रह्मचर्य पालन करणे,



सर्व प्राणिमात्रांविषयी दया असणे, क्षमाशील वृत्ती, स्वःच्या धनादी वस्तूंचे गरजवंताला सहजदान करणे, फलाची आशा न करता इष्टलिंगाची एकाग्रचित्ताने पूजा करणे, शिवपंचाक्षरी मंत्राचा जप करणे, शिवाच्या स्वरूपाशी एकाग्रता साधून तन्मयतेने शिवलिंगाचे चिंतनरूप ध्यान करणे या धर्माचारांमुळे धर्मसंग्रह होतो.॥५९॥

**शिवेन विहितो यस्मादागमैर्धर्मसंग्रहः।**
**तस्मात्तमाचरन् विद्वान् तत्प्रसादाय कल्पते।।६०।।**

**अन्वयार्थ** : यस्मात् = ज्यामुळे, आगमैः = शिवागमाद्वारे, शिवेन = शिवाने, धर्मसंग्रहः = धर्माचार, विहितः = उपदेशिला आहे, तस्मात् = त्यामुळे, विद्वान् = ज्ञानी, तं = त्यांचे, आचरन् = आचरण करीत, तत्प्रसादात् = शिवप्रसादासाठी, कल्प्यते = समर्थ होतो.

**भावार्थ** : हे अहिंसावादी धर्माचार आगमग्रंथांतून शिवाने सांगितलेले आहेत, त्यांना अनुसरून विद्वानांनी धर्माचरण करावे. म्हणजे त्यांच्यावर शिवाची कृपा होते.॥६०॥

**अधर्मं न स्पृशेत् किञ्चिद् विहितं धर्ममाचरेत्।**
**तं च कामविनिर्मुक्तं तमपि ज्ञानपूर्वकम्।।६१।।**

**अन्वयार्थ** : अधर्मं = अधर्माला, किञ्चित् = थोडाही, न स्पृशेत् = स्पर्श करू नये, विहितं = शास्त्रात सांगितलेले, धर्मं = अहिंसादी धर्म, आचरेत् = आचरावेत, तं च = ते सुद्धा, कामविनिर्मुक्तं = निष्काम भावनेने करावेत, तमपि = तेसुद्धा, ज्ञानपूर्वकं = ज्ञानी होऊन करावे.

**भावार्थ** : ह्या धर्माचरणाने वागावयाचे झाल्यास शास्त्रनिबिद्ध कर्म न करता यापूर्वी सांगितलेले अहिंसादी विहित धर्म आचरावेत. तेही निष्कामबुद्धीने आणि ज्ञानपूर्वक आचरावेत.॥६१॥

**आत्मवत् सर्वभूतानि संपश्येद् योगवित्तमः।**
**जगदेकात्मताभावान्निग्रहादिविरोधतः ।।६२।।**

**अन्वयार्थ** : योगवित्तमः = योगीश्वराने, जगदेकात्मताभावान् = जगाचे परमात्मरूप चिंतन करून, निग्रहादिविरोधतः = निग्रह आणि अनुग्रहाला अवकाश न ठेवता, सर्वभूतानि = सर्व प्राण्यांना, आत्मवत् = आपल्या आत्म्याप्रमाणे, संपश्येत् = पाहावे.

**भावार्थ** : ह्या योगीश्वराने सर्व जग हे परब्रह्मस्वरूप आहे अशी भावना करून, कोणावर रोष अथवा कोणावर अनुग्रह न करता, पक्षपात न ठेवता सर्व प्राणिमात्रांकडे आत्मस्वरूप दृष्टीने पाहिले पाहिजे, यालाच ज्ञान म्हणावे.।।६२।।

**एक एव शिवः साक्षज्जगदेतदिति स्फुटम्।**
**पश्यतः किं न जायेत ममकारो हि विभ्रमः।।६३।।**

**अन्वयार्थ** : शिवः = शिव, एक एव = हा एकच, एतत् = हे, जगत् = जग आहे, इति = अशा रीतीने, स्फुटं = स्पष्ट, साक्षात् = प्रत्यक्ष रूपाने, पश्यतः = पाहाणाऱ्याला, किं न जायते = काय प्राप्त होत नाही? ममकारः = ममत्व भावना, हि = निश्चयाने, विभ्रमः = भ्रमात्मक असते.

**भावार्थ** : हे सर्व जग साक्षात शिवच आहे असे दृढनिश्चयात्मक रीतीने जाणणाऱ्या शिवयोग्याला काय दुष्प्राप्य आहे? विशिष्ट वस्तूंमध्ये ममत्व बाळगणे हा भ्रम आहे. तो भ्रम शिवयोग्याचा ठिकाणी नसतो.।।६३।।

**धर्म एव समस्तानां यतः संसिद्धिकारणम्।**
**निस्पृहोऽपि महायोगी धर्ममार्गं च न त्यजेत्।।६४।।**

**अन्वयार्थ** : यतः = ज्यामुळे, समस्तानां = सर्व प्रकारच्या संसिद्धिकारणं = भोगमोक्षरूपी सिद्धीला कारण, धर्म एव = धर्मच असतो, त्यासाठी निस्पृहोऽपि = निरपेक्ष अशा, महायोगी = महायोग्यांनीही, धर्ममार्गं = धर्माचरण, न त्यजेत् = सोडू नये.

**भावार्थ** : धर्माचार हाच सर्व लोकांना भोगमोक्षात्मक सर्वसिद्धी प्राप्त करून देणारा असतो म्हणून निःस्पृह महायोगी जरी असला तरी त्याने धर्माचरण सोडू नये.।।६४।।



**ज्ञानामृतेन तृप्तोऽपि योगी धर्मं न संत्यजेत्।**
**आचारं महतां दृष्ट्वा प्रवर्तन्ते हि लौकिकाः।।६५।।**

**अन्वयार्थ** : ज्ञानामृतेन = शिवज्ञानरूपी अमृताने, तृप्तः = तृप्त, अशा योगी = योग्याने सुद्धा, धर्मं = धर्माचरण, न संत्यजेत् = सोडू नये, हि = कारण, लौकिकाः = सामान्य लोक, महताम् = महात्म्यांचे, आचारं = आचार, दृष्ट्वा = पाहून, प्रवर्तन्ते = आचरण करू लागतात.

**भावार्थ** : शिवज्ञानाने तृप्त झालेल्या महायोग्यानेही धर्माचरण सोडू नये. कारण लोक हे अनुकरणप्रिय असतात. श्रेष्ठ लोकांच्या वर्तनाकडे पाहून सामान्यजन वागत असतात. त्यांना सदाचाराचा आदर्श घालून देण्यासाठी ज्ञानी लोकांनीही सदाचाराने वागावे.।।६५।।

**सदाचारप्रियः शम्भुः सदाचारेण पूज्यते।**
**सदाचारं विना तस्य प्रसादो नैव जायते।।६६।।**

**अन्वयार्थ** : सदाचारप्रियः = सदाचार प्रेमी, शम्भुः = शिव, सदाचारेण = सदाचाराने, पूज्यते = पूजिला जातो, सदाचारं विना = सदाचाराशिवाय, तस्य = त्याचा, प्रसादः = अनुग्रह, नैव जायते = होत नाही.

**भावार्थ** : शिवाला सदाचार प्रिय आहे. म्हणून त्याची पूजा अहिंसादी सदाचाराने करावी. कारण सदाचाराशिवाय शिवाचा कृपाप्रसाद लाभणार नाही. त्यामुळे शिवाचा अनुग्रह मिळविण्यासाठी ज्ञान्यांनीही सदाचाराने वागावे.।।६६।।

### भावाचारस्थल - (६१)

**भाव एवास्य सर्वेषां भावाचारः प्रकीर्तितः।**
**भावो मानसचेष्टात्मा परिपूर्णः शिवाश्रयः।।६७।।**

**अन्वयार्थ** : अस्य = ह्या धर्माचारसंपन्न शिवयोग्याचा, भाव एव = भावच, सर्वेषां = सर्व सामान्यांना, भावाचारः = भावाचार म्हणून, प्रकीर्तितः = सांगितला गेला आहे, भावः = भाव म्हणजे, परिपूर्णः = पूर्णपणे, शिवाश्रयः = शिवालाच आश्रय केलेला, मानसचेष्टात्मा = मनोव्यापाररूप होय.

**भावार्थ** : शिवयोग्याचा भाव हाच सर्व प्राणिमात्रांचा भावाचार होय असे मानले जाते. कारण शिवयोग्याचा भावच इतरांच्या मनामध्ये तत्सम भाव निर्माण करतो. अंतर्बाह्यरूपाने शिवार्पित असा मनोव्यापार म्हणजे भाव होय.॥६७॥

**भावनाविहितं कर्म पावनादपि पावनम्।**
**तस्माद् भावनया युक्तं परधर्मं समाचरेत्।।६८।।**

**अन्वयार्थ** : भावनाविहितं = भावनेने केलेले, कर्म = कर्म, पावनादपि = पवित्रापेक्षा, पावनम् = पावन होते, तस्माद् = म्हणून, भावनया युक्तं = भावनायुक्त होऊन, परधर्मं = श्रेष्ठ अशा धर्माचे, समाचरेत् = आचरण करावे.

**भावार्थ** : भावपूर्वक केलेल्या शिवपूजादी धर्मपूजादी धर्मक्रिया अत्यंत पावन असतात. म्हणून कोणतेही धर्मकृत्य भावपूर्ण अंत:करणाने करावे.॥६८॥

**भावेन हि मनः शुद्धिर्भावशुद्धिश्च कर्मणा।**
**इति सञ्चिन्त्य मनसा योगी भावं न सन्त्यजेत्।।६९।।**

**अन्वयार्थ** : भावने हि = भावनेनेच, मन:शुद्धि: = मनाची शुद्धी होते, च = आणि, भावशुद्धि: = भावाची शुद्धी, कर्मणा = शिवपूजादी क्रियांनी होते, इति = अशा रीतीने, मनसा = मन:पूर्वक, संचिन्त्य = चिंतन करून, योगी = शिवयोग्याने, भावं = भावना, न संत्यजेत् = सोडू नये.

**भावार्थ** : शिवपूजादी धर्मकृत्यांनी भावनेची शुद्धी होते व भावशुद्धीने मनाची शुद्धी होते. असा विचार करून शिवयोग्याने कधी सद्भाव सोडू नये. भावपूर्वक केलेल्या कर्मानेच फळप्राप्ती होते. म्हणून भाव कधीही सोडू नये.॥६९॥

**शिवभावनया सर्वं नित्यनैमित्तिकादिकम्।**
**कुर्वन्नपि महायोगी गुणदोषैर्न बाध्यते।।७०।।**



**अन्वयार्थ** : सर्वं = सर्व, नित्यनैमित्तिकादिकं = नित्य आणि नैमित्तिक कर्मे, शिवभावनया = शिवभावनेने, कुर्वन्नपि = करीत असला तरी, महायोगी = शिवयोगी, गुणदोषैः = गुण आणि दोषांनी, न बाध्यते = लिप्त होत नाही.

**भावार्थ** : शिवयोग्याने नित्य आणि नैमित्तिक कर्मे, शिवच त्यांचा कर्ता आणि करविता आहे, अशा शिवभावनेने व निष्कामबुद्धीने केल्यामुळे त्या कर्मांच्या गुणदोषांची बाधा शिवयोग्याला होत नाही.॥७०॥

**अन्तः प्रकाशमानस्य संवित्सूर्यस्य सन्ततम्।**
**भावेन यदुपस्थानं तत्सन्ध्यावन्दनं विदुः।।७१।।**

**अन्वयार्थ** : अन्त: = आपल्या हृदयकमलात, प्रकाशमानस्य = प्रकाशमान असलेल्या, संवित्सूर्यस्य = ज्ञानरूपी सूर्याच्या, सन्ततं = नेहमी, भावेन = भावनेने, यत् = जे, उपस्थानम् = अनुचिंतन होते, तत् = ते, सन्ध्यावन्दनम् = संध्यावंदन म्हणून, विदु: = वीरशैव आचार्य म्हणतात.

**भावार्थ** : अंत:करणातील ऊर्ध्वमुखी हृदयकमलात सदोदित प्रकाशमान असणाऱ्या ज्ञानरूप सूर्याचे भक्तिभावाने जे आराधन, अनुचिंतन घडते त्यालाच वीरशैवाचार्य संध्यावंदन म्हणतात.॥७१॥

**आत्मज्योतिषि सर्वेषां विषयाणां समर्पणम्।**
**अन्तर्मुखेन भावेन होमकर्मेति गीयते।।७२।।**

**अन्वयार्थ** : आत्मज्योतिषि = आत्मरूपी चिदग्नीमध्ये, अन्तर्मुखेन = अंतर्मुख झालेल्या, भावेन = भावनेने, सर्वेषां = सर्व, विषयाणां = विषयांचे, समर्पणम् = समर्पण करणे, हे होमकर्मेति = होमकर्म म्हणून, गीयते = सांगितले जाते.

**भावार्थ** : अंतर्मुख वृत्तीने आत्मरूपी चिदग्नीत सर्वप्रकारच्या विषयांचे समर्पण करणे यालाच होमकर्म म्हणावे. तात्पर्य, सागरतरंगन्यायाने सर्व विषयांचे आत्म्याशीच लयचिंतन करणे हेच होमकर्म होय.॥७२॥

**भावयेत् सर्वकर्माणि नित्यनैमित्तिकानि च।**
**शिवप्रीतिकराण्येव सङ्गराहित्यसिद्धये।।७३।।**

**अन्वयार्थ** : सङ्गराहित्यसिद्धये = संसारसंबंधनिवृत्तीसाठी, नित्यनैमित्तिकानि = नित्य आणि नैमित्तिक अशा, सर्वकर्माणि = सर्व कर्मे, शिवप्रीतिकराण्येव = शिवाला प्रिय होवोत अशा, भावयेत् = भावनेने करावीत.

**भावार्थ** : संसारसंबंधाच्या निवृत्तीसाठी नित्यनैमित्तिक सर्व कर्मे शिव संतुष्ट होवो या भावनेने करावीत. अशा भावनेने केलेल्या कर्मामुळे तो शिवयोगी संसारसंगनिवृत्त होतो.।।७३।।

**शिवे निवेश्य सकलं कार्याकार्यं विवेकतः।**
**वर्तते यो महाभागः स सङ्गरहितो भवेत्।।७४।।**

**अन्वयार्थ** : विवेकत; = विवेकाने, कार्याकार्यं = करण्यायोग्य अथवा अयोग्य, असे सकलं = सर्व, शिवे = शिवाला, निवेश्य = समर्पण करून, यः = जो, महाभागः = भाग्यशाली महापुरुष, वर्तते = असतो, सः = तो, सङ्गरहितः = संगरहित, भवेत् = होतो.

**भावार्थ** : कर्ता, करविता, कर्म आणि फल हे सर्व शिवरूप आहे, अशा सदसद्विवेकाना, करण्यास योग्य अथवा अयोग्य अशा सर्व कर्मांचा भार शिवावर ठेवून जो महाशिवयोगी शिवार्पण भावनेने वागतो तोच संसारसंग-रहित होतो.।।७४।।

**आत्मानमखिलं वस्तु शिवमानन्दचिन्मयम्।**
**एकभावेन सततं संपश्यन्नेव पश्यति।।७५।।**

**अन्वयार्थ** : आत्मानम् = आपल्या आत्म्याला, अखिलं वस्तु = सर्व विश्वाला, आणि आनन्दचिन्मयं = सच्चिदानंदरूपी, शिवं = शिवाला, एकभावेन = एकत्व भावनेने, सततं = नेहमी, पश्यन्नेव = पाहाणाराच, पश्यति = शिवाला पाहातो.

**भावार्थ** : जगातील सर्व वस्तू म्हणजे आपणच आहोत आणि सर्व विश्व म्हणजे सच्चिदानंदरूप होय, अशा रीतीने स्वात्मा, विश्व आणि शिव सर्व एकच आहेत या दृढ भावनेने जो पाहतो, तोच खऱ्या अर्थाने शिवाला ओळखतो.।।७५।।



## ज्ञानाचारस्थल - (६२)

**अस्य ज्ञानसमाचारो योगिनः सर्वदेहिनाम्।**
**ज्ञानाचारो यदुक्तोऽयं ज्ञानाचारः स कथ्यते।।७६।।**

**अन्वयार्थ** : अस्य योगिनः = भावाचारसंपन्न शिवयोग्याचा, ज्ञानसमाचारः = ज्ञानाचार, सर्वदेहिनाम् = सर्व लोकांचा, ज्ञानाचारः = ज्ञानाचार म्हणून, यदुक्तः = जो सांगितला आहे, सः = तो, अयं = हा, ज्ञानाचार म्हणून, कथ्यते = सांगितला जातो.

**भावार्थ** : भावाचारसंपन्न अशा त्या शिवयोग्याचा शिवज्ञानयुक्त आचारच सर्व शिवभक्तांसाठी ज्ञानाचार होतो, असे जे सांगितले आहे, त्यामुळेच याला ज्ञानाचारस्थल असे म्हणतात.।।७६।।

**शिवाद्वैतपरं ज्ञानं ज्ञानमित्युच्यते बुधैः।**
**सिद्धेन वाप्यसिद्धेन फलं ज्ञानान्तरेण किम्।।७७।।**

**अन्वयार्थ** : शिवाद्वैतपरं = शिवाद्वैतप्रधान, ज्ञानं = जे ज्ञान आहे, तेच ज्ञानमिति = ज्ञान होय, असे बुधैः = पंडितांकडून, उच्यते = म्हटले जाते, ज्ञानान्तरेण = दुसरे ज्ञान, सिद्धेन = सिद्ध झाले तर, वापि = अथवा, असिद्धेन = सिद्ध झाले नाही तरी, किं फलम् = त्याचे काय प्रयोजन?

**भावार्थ** : शिवाद्वैतज्ञानच खरे ज्ञान आहे, असे विद्वान् सांगतात. शास्त्राद्वारे सिद्ध अथवा असिद्ध अशा इतर ज्ञानाचे फळ काय? कोणतेही फळ नाही.।।७७।।

**निर्मलं हि शिवज्ञानं निःश्रेयसकरं परम्।**
**रागद्वेषादिकलुषं भूयः संसृतिकारणम्।।७८।।**

**अन्वयार्थ** : शिवज्ञानं = शिवाद्वैतज्ञान, निर्मलं हि = मलरहित असून, परम् = श्रेष्ठ असो, निःश्रेयसकरं = मोक्षप्रदायक होते, रागद्वेषादिकलुषं = काम-क्रोधादींनी युक्त भेदज्ञान, भूयः = पुन्हा, संसृतिकारणम् = संसाराला कारण होते.

**भावार्थ** : शिवाद्वैतज्ञान हे आणवादिमल-संगरहित, निर्मल, निर्दोष आणि श्रेष्ठ आहे आणि सर्वोत्कृष्ट अशी मोक्षप्राप्ती करून देणारे आहे. त्या

व्यतिरिक्त असणारे भेदज्ञान रागद्वेषादी भावनांनी कलुषित होऊन पुन:पुन्हा जन्ममरणात्मक संसाराला कारणीभूत होते. म्हणून शिवाद्वैतज्ञानच श्रेष्ठ ज्ञान होय.।।७८।।

**परिपूर्णं महाज्ञानं परतत्त्वप्रकाशकम्।**
**अवलम्ब्य प्रवृत्तो यो ज्ञानाचार स उच्यते।।७९।।**

**अन्वयार्थ** : परतत्त्वप्रकाशकं = परशिवतत्त्वाला प्रकाशित करणारे, परिपूर्णं = पूर्ण अशा, महाज्ञानं = शिवाद्वैतज्ञानावर, अवलम्ब्य = अवलंबून असणारा, य: = जो, प्रवृत्त: = आचारप्रवृत्त होतो, स: = तो, ज्ञानाचार: = ज्ञानाचार म्हणून, उच्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : शिवाद्वैत परिपूर्ण महाज्ञान असून त्यामुळे परतत्त्वाचे दर्शन होते. त्याच्यावर अवलंबून असणारा जो आचार तो 'ज्ञानाचार' होय.।।७९।।

**निर्विकल्पे परे धाम्नि निष्कलो शिवनामनि।**
**ज्ञानेन योजयेत् सर्वं ज्ञानाचारी प्रकीर्तित:।।८०।।**

**अन्वयार्थ** : निष्कले = निरवयव, निर्विकल्पे = भेदशून्य, शिवनामनि = शिव नावाच्या, परे धाम्नि = परब्रह्मरूपी आधारस्थानी, सर्वं = सर्वजग, ज्ञानेन = अभेद ज्ञानाने, योजयेत् = योजितो, स: = तो, ज्ञानाचारी = ज्ञानाचारी म्हणून, प्रकीर्तित: = म्हटला जातो.

**भावार्थ** : निराकार, सर्वोत्कृष्ट, निर्विकल्प अशा परशिवाच्या ठिकाणी हे सर्व जग अभेदरूपाने आहे, अशा ज्ञानाने जो स्वत: वागतो आणि आपल्या आचरणरूपाने इतरांसाठी प्रत्यक्ष सिद्ध करून देतो, अशा शिवयोग्यास ज्ञानाचारी असे म्हणतात.।।८०।।

**ज्ञानं मुक्तिप्रदं प्राप्य गुरुदृष्टिप्रसादत:।**
**क: कुर्यात् कर्मकार्पण्ये वाञ्छां संसारवर्धने।।८१।।**

**अन्वयार्थ** : मुक्तिप्रदं = मोक्ष देणारे, ज्ञानं = शिवाद्वैतज्ञान, गुरुदृष्टि-प्रसादत: = गुरुकृपाकटाक्षाने, प्राप्य = मिळविल्यानंतर, संसारवर्धने = संसार वाढविणाऱ्या, कर्मकार्पण्ये = कर्मजालाची, वाञ्छां = इच्छा, क: कुर्यात् = कोण करील?



**भावार्थ** : सद्गुरूच्या कृपादृष्टीच्या प्रसादामुळे मोक्षप्रद शिवज्ञान प्राप्त झाल्यावर संसाराची अभिलाषा वाढविणाऱ्या यज्ञयागादी कर्मांची खटपट कोण करील? कोणीही करणार नाही.।।८१।।

**कर्म ज्ञानाग्निना दग्धं न प्ररोहेत् कथञ्चन।**
**यदाहु: संसृतेर्मूलं प्रवाहानुगतं बुधा:।।८२।।**

**अन्वयार्थ** : यत् = ज्या, बुधा: = ज्ञानी लोक, संसृते: = संसाराचे, मूलं = मूळ कारण, प्रवाहानुगतं = जलप्रवाह-न्यायाने, आहु: = सांगतात, ते कर्म ज्ञानाग्निना = शिवज्ञानरूपी अग्नीमुळे, दग्धं = जळाल्यानंतर, कथञ्चन = कसेही, न प्ररोहेत् = अंकुरित होत नाही.

**भावार्थ** : कर्म हे संसाराचे मूळ आहे व ते जलप्रवाह-न्यायाने अनादी काळापासून चालत आले आहे. असे हे संसाराचे मूळ कारण असणारे कर्म शिवज्ञानरूप अग्नीने जळून गेल्यावर ते पुन्हा अंकुरित होत नाही, असे ज्ञानी लोक सांगतात.।।८२।।

**ज्ञानेन हीन: पुरुष: कर्मणा बद्ध्यते सदा।**
**ज्ञानिन: कर्मसङ्कल्पा भवन्ति किल निष्फला:।।८३।।**

**अन्वयार्थ** : ज्ञानेन हीन: = ज्ञान नसलेला, पुरुष: = पुरुष, सदा = नेहमी, कर्मणा = कर्माने, बद्ध्यते = बांधला जातो, ज्ञानिन: = ज्ञान्याचे, कर्मसंकल्पा: = कर्मसंकल्प, निष्फला: = निष्कामरूप, भवन्ति किल = होतात ना!

**भावार्थ** : शिवज्ञानाच्या अभावी मनुष्य कर्माच्या बंधनात बांधला जातो. ज्ञानी लोकही कर्मे करतात परंतु ती फलाच्या आशेने करीत नाहीत, त्यामुळे ती त्यांना बंधनकारक होत नाहीत.।।८३।।

**शुद्धाचारे शुद्धभावो विवेकी**
**ज्योति: पश्यन् सर्वतश्चैवमेकम्।**
**ज्ञानध्वस्तप्रावृतात्मप्रपञ्चो**
**जीवन्मुक्तश्चेष्टते दिव्ययोगी।।८४।।**

**अन्वयार्थ** : शुद्धाचारे = परिशुद्ध अशा ज्ञानाचाराने, शुद्धभावः = निर्मल भावाचा, विवेकी = ज्ञानी, सर्वतः = चहूकडे, एकमेव = एकच, ज्योतिः = ज्योती, पश्यन् = पाहत, ज्ञानध्वस्त = ज्ञानाने नाश पावलेला आहे त्याचा, प्राकृतात्मप्रपञ्चः = प्रकृतिजन्य देहादिप्रपंच, असा दिव्ययोगी = दिव्य शिवयोगी, जीवन्मुक्तः = जीवन्मुक्त होऊन, चेष्टते = सामान्य लोकांप्रमाणे व्यवहार करतो.

**भावार्थ** : शुद्धाचाराने संपन्न, निर्मलभावाने, परिपूर्ण, विवेकी आणि सर्वत्र परशिवाचे तेज पाहणारा, प्राकृत देहाचा प्रपंच ज्याने शिवज्ञानाने नाहीसा केला आहे, असा दिव्य योगी जीवन्मुक्त असूनही सामान्य लोकांप्रमाणे जगात व्यवहार करीत असतो.।।४२।।

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां***
***शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये***
***श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ***
***लिङ्गस्थलान्तर्गत माहेश्वरस्थले क्रियागमस्थलादि-***
***नवविधस्थलप्रसङ्गो नाम षोडशः परिच्छेदः।***

**सोळावा परिच्छेद समाप्त.**

○○○

# सतरावा परिच्छेद

### लिंगस्थलांतर्गत
## प्रसादिस्थल

**अगस्त्य उवाच—**

**स्थलानि तानि चोक्तानि यानि माहेश्वरस्थले।**
**वदस्व स्थलभेदं मे प्रसादिस्थलसंश्रितम्।।१।।**

**अन्वयार्थ** : माहेश्वरस्थले = माहेश्वर स्थलात, यानि = जी, स्थलानि = स्थले आहेत, तानि = ती, उक्तानि =सांगितली आहेत, प्रसादिस्थलसंश्रितम् = प्रसादिस्थलात असणारे, स्थलभेदं = स्थलांचे भेद, मे = मला, वदस्व = सांगावे.

**भावार्थ** : अगस्तीऋषी प्रश्न करतात— हे आचार्य, आपण माहेश्वर-स्थलाचे पोटभेद असणारी स्थले मला सांगितलीत. आता प्रसादिस्थल आणि त्याचे पोटभेद कोणते ते मला सांगावे.।।१।।

**रेणुक उवाच—**

**स्थलभेदा नव प्रोक्ताः प्रसादिस्थलसंश्रिताः।**
**कायानुग्रहणं पूर्वमिन्द्रियानुग्रहं ततः।।२।।**
**प्राणानुग्रहणं पश्चात् ततः कायार्पितं मतम्।**
**करणार्पितमाख्यातं ततो भावार्पितं मतम्।।३।।**
**शिष्टस्थलं ततः प्रोक्तं शुश्रूषास्थलमेव च।**
**ततः सेव्यस्थलं चैषां क्रमशः शृणु लक्षणम्।।४।।**

**अन्वयार्थ** : प्रसादिस्थलसंश्रिताः = प्रसादिस्थलात असणारे, स्थलभेदाः = स्थलांचे भेद, नव = नऊ प्रकारचे, प्रोक्ताः = सांगितले आहेत, पूर्वं = पहिले, कायानुग्रहणं = कायानुग्रहस्थल, ततः = त्यानंतर, इन्द्रियानुग्रहं = इंद्रियानुग्रहस्थल, पश्चात् = त्यानंतर, प्राणानुग्रहणं = प्राणानुग्रहस्थल, ततः = त्यानंतर, कायार्पितं = कायार्पितस्थल, मतम् = मानले आहे, ततः = त्यानंतर, करणार्पितं = करणार्पित-स्थल, आख्यातं = सांगितले आहे, ततः = त्यानंतर, भावार्पितं = भावार्पितस्थल,

मतम् = सांगितले आहे, ततः = त्यानंतर, शिष्यस्थलं = शिष्यस्थल, प्रोक्तं = सांगितले आहे, च = आणि, शुश्रूषुस्थलं = शुश्रूषस्थल, ततः = त्यानंतर, सेव्यस्थलं = सेव्यस्थल, एषां = यांचे, लक्षणम् = लक्षण, क्रमशः = क्रमाने, शृणु = ऐक.

**भावार्थ** : श्री रेणुक उत्तर देतात- प्रसादी स्थलाच्या अंगभूत असणाऱ्या स्थलांचे नऊ भेद आहेत. ते असे- १) कायानुग्रहस्थल, २) इंद्रियानुग्रहस्थल, ३) प्राणानुग्रहस्थल, ४) कायार्पितस्थल, ५) करणार्पितस्थल, ६) भावार्पित-स्थल, ७) शिष्यस्थल, ८) शुश्रूषस्थल आणि ९) सेव्यस्थल. आता यापैकी प्रत्येकाचे लक्षण सांगतो ते ऐक.॥२-४॥

### कायानुग्रहस्थल - (६३)

**अनुगृह्णाति यल्लोकान् स्वकायं दर्शयन्नसौ।**
**तस्मादेष समाख्यातः कायानुग्रहनामकः।।५।।**

**अन्वयार्थ** : असौ = हा ज्ञानाचारसंपन्न शिवयोगी, यत् = ज्यामुळे, स्वकायं = आपले शरीर, दर्शयन् = दाखवून, लोकान् = प्राकृत जनांवर, अनुगृह्णाति = अनुग्रह करतो, तस्मात् = त्यामुळे, एषः = हा, कायानुग्रहनामकः = कायानुग्रह या नावाने, समाख्यातः = जाणला जातो.

**भावार्थ** : पूर्वोक्त ज्ञानाचारसंपन्न शिवयोग्याचे शरीर परब्रह्मस्वरूप झाले असल्यामुळे तो त्याच्या दर्शनाद्वारे सामान्य जनांवर अनुग्रह करतो. म्हणून त्याला कायानुग्राहक असे म्हणतात.॥५॥

**शिवो यथाऽनुगृह्णाति मूर्तिमाविश्य देहिनः।**
**तथा योगी शरीरस्थः सर्वानुग्राहको भवेत्।।६।।**

**अन्वयार्थ** : शिवः = शिव, यथा = जसा, मूर्तिमाविश्य = मूर्तीत राहून, देहिनः = जीवांना, अनुगृह्णाति = अनुग्रह करतो, तथा = तसा, योगी = शिवयोगी, शरीरस्थः = शरीरात राहून, सर्वानुग्राहकः = सर्वांवर अनुग्रह करणारा, भवेत् = होतो.

**भावार्थ** : निष्कल असा शिव ज्याप्रमाणे चंद्रशेखर, गंगाधरादी लीलारूपे धारण करून प्राणिमात्रांवर अनुग्रह करतो, तशा प्रकारे हा शिवयोगी दिव्यतेजोमय अशा आपल्या शरीराद्वारे सर्वांवर अनुग्रह करतो.॥६॥



**शिवः शरीरयोगेऽपि यथा सङ्गविवर्जितः।**
**तथा योगी शरीरस्थो निःसङ्गो वर्तते सदा।।७।।**

**अन्वयार्थ** : शिवः = शिव, शरीरयोगेऽपि = शरीराचा संबंध असला तरी, यथा = जसा, सङ्गविवर्जितः = सुख दुःखादी संगविरहित असतो, तथा = तसा, योगी = शिवयोगी, शरीरस्थः = शरीरात असूनही, सदा = नेहमी, निःसङ्गः = संगरहित, वर्तते = असतो.

**भावार्थ** : शिव ज्याप्रमाणे लीलारूप धारण केलेला असला तरी तो जसा असंग असतो तशा रीतीने हा शिवयोगीही शरीरधारी असूनसुद्धा सुखदुःखापासून निस्संग होऊन वर्तन करीत असतो.॥७॥

**शिवभावनया युक्तः स्थिरया निर्विकल्पया।**
**शिवो भवति निर्धूतमायावेशपरिप्लवः।।८।।**

**अन्वयार्थ** : स्थिरया = दृढ अशा, निर्विकल्पया = भेदरहित, शिव-भावनया = शिवोऽहं भावनेने, युक्तः = युक्त शिवयोगी, निर्धूतमायावेशपरिप्लवः = मायेचा उपद्रव नाहीसा होऊन, शिवः = शिवस्वरूप, भवति = होतो.

**भावार्थ** : ह्या शिवयोग्याच्या ठिकाणी थोडीही भेदबुद्धी नसते म्हणून तो शिवोऽहं अशा दृढ भावनेने युक्त होऊन माया-प्रपंच-क्लेशविरहित झाल्यामुळे साक्षात् शिवस्वरूपच होतो.॥८॥

**चित्तवृत्तिषु लीनासु शिवे चित्सुखसागरे।**
**अविद्याकल्पितं वस्तु नान्यत् पश्यति संयमी।।९।।**

**अन्वयार्थ** : चित्सुखसागरे = ज्ञान आणि आनंदाचा सागर अशा, शिवे = परशिवात, चित्तवृत्तिषु = मनोव्यापार, लीनासु = विलय पावल्यावर, संयमी = शिवयोगी, अविद्याकल्पितं = मायेने कल्पिलेला, अन्यत् = दुसरा, वस्तु = पदार्थ, न पश्यति = पाहात नाही.

**भावार्थ** : त्या संयमी शिवयोग्याचे सर्व मनोव्यापार ज्ञानानंदाचा सागर अशा शिवामध्ये विलीन झाले असल्यामुळे मायाजन्य अशी

कोणतीही वस्तू त्याच्या दृष्टीला दिसत नाही. म्हणून त्याला मायाप्रपंचाचा उपद्रव होत नाही.॥९॥

**नेदं रजतमित्युक्ते यथा शुक्तिः प्रकाशते।**
**नेदं जगदिति ज्ञाते शिवतत्त्वं प्रकाशते।।१०।।**

**अन्वयार्थ** : इदं = ही, न रजतं = चांदी नाही, इत्युक्ते = असे सांगितल्यावर, यथा = जसे, शुक्तिः = शिंपली, प्रकाशते = दिसते, तसेच इदं = हे, न जगत् = प्रपंच नाही, इति = असे, ज्ञाते = जाणून घेतल्यावर, शिवतत्त्वं = परशिवतत्त्व, प्रकाशते = प्रकाशित होते.

**भावार्थ** : शिंपल्यावर होणारी चांदीची भ्रांती त्या शिंपल्याचे सत्यस्वरूप समजल्यावर जसे ही चांदी नसून शिंप आहे असे ज्ञान होते, त्याप्रमाणे दिसणारा हा प्रपंच नव्हे तर प्रत्यक्ष शिवरूपच आहे असे ज्ञान झाल्यावर त्याला सर्वत्र शिवतत्त्वाचेच दर्शन घडते.॥१०॥

**यथा स्वप्रकृतं वस्तु प्रबोधेनैव शाम्यति।**
**तथा शिवस्य विज्ञाने संसारं नैव पश्यति।।११।।**

**अन्वयार्थ** : स्वप्नकृतं = स्वप्नात दिसणारा, वस्तु = पदार्थ, यथा = जसा, प्रबोधेनैव = जागृतीनेच, शाम्यति = नाहीसा होतो, तथा = तसेच, शिवस्य = शिवाचे, विज्ञाने = विशेष ज्ञान झाल्यावर, संसारं = संसाराला, नैव पश्यति = (शिवयोगी) पाहात नाही.

**भावार्थ** : स्वप्नात दिसणारे पदार्थ जागे झाल्याबरोबर जसे नाहीसे होतात. त्याप्रमाणे शिवज्ञान झालेल्या शिवयोग्याच्या दृष्टी समोरून मायाप्रपंच नाहीसा होऊन तो त्याला दिसेनासा होतो.॥११॥

**अज्ञानमेव सर्वेषां संसारभ्रमकारणम्।**
**तन्निवृत्तौ कथं भूयः संसारभ्रमदर्शनम्।।१२।।**

**अन्वयार्थ** : सर्वेषां = सर्वांना, अज्ञानमेव = अज्ञानच, संसारभ्रमकारणम् = संसारभ्रांतीचे कारण आहे, तन्निवृत्तौ = ते अज्ञान नाहीसे झाल्यावर, संसार-भ्रमदर्शनम् = सांसारिक भेदभ्रांतीचे दर्शन, भूयः = पुन्हा, कथं = कसे होईल?



**भावार्थ** : शिवविषयक अज्ञानच संसारभ्रमाला कारण असल्याने ते अज्ञानच नाहीसे झाल्यावर संसारविषयक भ्रम कसा राहील? अर्थात् राहाणार नाही.॥१२॥

**गलिताहङ्कृतिग्रन्थिः क्रीडाकल्पितविग्रहः।**
**जीवन्मुक्तश्चरेद्योगी देहिवन्निरूपाधिकः।।१३।।**

**अन्वयार्थ** : गलिताहङ्कृतिग्रन्थिः = परिच्छिन्न अहंकारग्रंथी नाहीशी झालेला, क्रीडाकल्पितविग्रहः = क्रीडेसाठी शरीर धारण केलेला, निरुपाधिकः = उपाधि-रहित, जीवन्मुक्तः = जीवन्मुक्त असा, योगी = शिवयोगी, देहिवत् = देहधारी होऊन, चरेत् = लोकानुग्रहासाठी संचार करीत असतो.

**भावार्थ** : तो शिवज्ञानी असा योगीश्वर, त्याच्या परिच्छिन्न अशा देहादिकाचा अभिमान हरवून गेला असल्यामुळे त्याला कसलाच प्रतिबंध उरलेला नसतो. म्हणून आपल्या इच्छेनुसार क्रीडा करण्यासाठी नाममात्र शरीरधारी होऊन जीवन्मुक्त अशा अवस्थेत लोकानुग्रहाकरिता संचार करीत असतो.॥१३॥

### इन्द्रियानुग्रहस्थल - (६४)

**दर्शनात्परकायस्य करणानां विवेकतः।**
**इन्द्रियानुग्रहः प्रोक्तः सर्वेषां तत्त्ववेदिभिः।।१४।।**

**अन्वयार्थ** : परकायस्य = श्रेष्ठ अशा कायानुग्रहसंपन्न शिवयोग्याच्या, दर्शनात् = दर्शनाने, सर्वेषां = प्राकृत लोकांच्या, करणानां = इंद्रियांना, विवेकतः = विवेक उत्पन्न होत असल्यामुळे, ते, इन्द्रियानुग्रहः = इंद्रियानुग्रह म्हणून, तत्त्ववेदिभिः = तत्त्वज्ञान्यांकडून, प्रोक्तः = सांगितले आहे.

**भावार्थ** : इंद्रियनिग्रहयुक्त परकाय शिवयोग्याच्या दर्शनाने सामान्य जनांच्या ठिकाणी इंद्रियांच्या व्यवहारासंबंधी विवेक उत्पन्न होतो तो त्या संयमशील इंद्रियांचा अनुग्रह असल्यामुळे. त्यालाच इंद्रियानुग्रह असे म्हणतात.॥१४॥

**इन्द्रियाणां समस्तानां स्वार्थेषु सति सङ्गमे।**
**रागो वा जायते द्वेषस्तौ योगी परिवर्जयेत्।।१५।।**

**अन्वयार्थ** : समस्तानां = सर्व, इन्द्रियाणां = इंद्रियांना, स्वार्थेषु = आपापल्या विषयाशी, सङ्गमे सति = संबंध झाल्यावर, रागः = राग, वा = अथवा, द्वेषः = द्वेष, जायते = उत्पन्न होतो, योगी = योग्याने, तौ = त्या दोहोंचा, परिवर्जयेत् = परित्याग करावा.

**भावार्थ** : मानवाच्या इंद्रियांचा आपापल्या विषयाशी संबंध झाल्यावर त्यापासून रागद्वेषादी भावना उत्पन्न होतात, म्हणून परयोग्याने रागद्वेषादी भावनांचा त्याग करावा.।।१५।।

**इन्द्रियाणां बहिर्वृत्तिः प्रपञ्चस्य प्रकाशिनी।**
**अन्तः शिवे समावेशो निष्प्रपञ्चस्य कारणम्।।१६।।**

**अन्वयार्थ** : इन्द्रियाणां = इंद्रियांची, बहिर्वृत्तिः = बाह्य प्रवृत्ती, प्रपञ्चस्य = प्रपंचाला, प्रकाशिनी = कारण होते, अन्तः = हृदयात असलेल्या, शिवे = शिवाशी, समावेशः = समरस होणे, हे, निष्प्रपञ्चस्य = मोक्षाचे, कारणम् = कारण होते.

**भावार्थ** : इंद्रियांची बाह्यप्रवृत्ती संसाराच्या व्यवहाराला कारण होते. तीच अंतर्मुख होऊन शिवाशी एकरूप झाल्यावर मोक्षप्राप्तीला कारण होते.।।१६।।

**क्षणमन्तः शिवं पश्यन् केवलेनैव चेतसा।**
**बाह्यार्थानामनुभवं क्षणं कुर्वन् दृगादिभिः।।१७।।**
**सर्वेन्द्रियनिरूढोऽपि सर्वेन्द्रियविहीनवान्।**
**शिवाहितमना योगी शिवं पश्यति नापरम्।।१८।।**

**अन्वयार्थ** : केवलेनैव = केवळ, चेतसा = मनाने, अन्तः = अंतरंगात, क्षणं = क्षणकाल, शिवं = शिवाला, पश्यन् = पाहात, क्षणं = क्षणकाल, दृगादिभिः = नेत्रादी इंद्रियांनी, बाह्यार्थानां = बाह्य रूपादी विषयांचे, अनुभवं = अनुभव, कुर्वन् = घेत, शिवाहितमनाः = शिवासक्त मनाचा, योगी = शिवयोगी, सर्वेन्द्रियनिरूढोऽपि = सर्वेंद्रिय-व्यवहारात आसक्त असला तरी, सर्वेन्द्रियविहीनवान् = सर्वेंद्रियरहित होऊन, शिवं = शिवालाच, पश्यति = पाहतो, नापरं = दुसऱ्या कोणलाही नाही.



**भावार्थ** : तो शिवयोगी क्षणभर अंतर्मुख होऊन एकाग्रचित्ताने आपल्या हृदयात शिवस्वरूप पाहतो आणि क्षणभर आपल्या बाह्यनेत्रादी इंद्रियांनी शब्दरूपादी विषयांचा अनुभव घेतो. शिवयोग्याला सामान्य जनांप्रमाणे सर्व इंद्रिये असली तरी ती असून नसल्यासारखी असतात. कारण त्याच्या सर्व इंद्रियांचे लक्ष शिवावर केंद्रित झाले असल्यामुळे त्याला शिवाशिवाय अन्य काही दिसत नाही.।।१७-१८।।

**न जरा मरणं नास्ति न पिपासा न च क्षुधा।**
**शिवाहितेन्द्रियस्यास्य निर्मानस्य महात्मनः।।१९।।**

**अन्वयार्थ** : शिवाहितेन्द्रियस्य = शिवाला इंद्रिय व्यवहार अर्पण केलेल्या, निर्मानस्य = देहादिकाचा अभिमान नसलेला, महात्मनः = महापुरुष, अस्य = अशा शिवयोग्याला, न जरा मरणं नास्ति = जरा आणि मरण नसते, न पिपासा = तहान नसते, न च क्षुधा = भूकही नसते.

**भावार्थ** : शिवामध्ये इंद्रियव्यापार विलीन झालेल्या त्या शिवयोग्याला देहाभिमानच उरलेला नसल्यामुळे जरा आणि मरण नसते. कारण जरा, मरण हे देहाचे धर्म असतात. तसेच तहानभूकही नसते, कारण ते प्राणाचे धर्म असतात.।।१९।।

**मनो यत्र प्रवर्तेत तत्र सर्वेन्द्रियस्थितिः।**
**शिवे मनसि सल्लीने क्व चेन्द्रियविचारणा।।२०।।**

**अन्वयार्थ** : यत्र = जेथे, मनः = मन, प्रवर्तते = प्रवृत्त होते, तत्र = तेथे, सर्वेन्द्रियस्थितिः = सर्व इंद्रिये राहातात, च = आणि, मनसि = मन, शिवे = शिवावर, सल्लीने = लीन झाल्यावर, इन्द्रियविचारणा = इंद्रियांचा व्यवहार, क्व = कसा होईल?

**भावार्थ** : मन ज्या ठिकाणी असते तेथेच सर्व इंद्रियेही असतात. म्हणून शिवाच्या ठिकाणी मन तल्लीन झाल्यावर इंद्रियांचे बाह्य व्यापार कसे होतील? अर्थात् होत नाहीत.।।२०।।

**यद्यत् पश्यन् दृशा योगी मनसा चिन्तयत्यपि।**
**तत्तत् सर्वं शिवाकारं संविद्रूपं प्रकाशते।।२१।।**

**अन्वयार्थ** : योगी = शिवयोगी, दृशा = दृष्टीने, यद्यत् = जे जे, पश्यन् = पाहात असतो, मनसा = मनाने, चिन्तयत्यपि = चिंतनही करीत असतो, तत्तत् = ते ते, सर्वं = सर्व, संविद्रूपं = चिद्रूप अशा, शिवाकारं = शिवरूपाने, प्रकाशते = प्रकाशित होते.

**भावार्थ** : शिवयोगी आपल्या दृष्टीने जे जे पाहतो, मनाने जे जे चिंतितो, ते ते सर्व चिद्रूप अशा शिवस्वरूपानेच प्रकाशमान होते. म्हणजेच त्याला अंतरंगात आणि बहिरंगात सर्वत्र शिवाचाच साक्षात्कार होतो.॥२१॥

**करणैः सहितं प्राणं मनस्याधाय संयमी।**
**योजयेत् स शिवः साक्षात् यत्र नास्ति जगद्भ्रमः।।२२।।**

**अन्वयार्थ** : करणैः = नेत्रादी करणांनी, सहितं = युक्त, प्राणं = प्राण-वायूची, मनसि = मनामध्ये, आधाय = स्थापना करून, संयमी = जो शिवयोगी, यत्र = ज्या परशिवात, योजयेत् = (मनाची) योजना करतो, सः = तो, साक्षात् = प्रत्यक्षरूपाने, शिवः = शिव होतो, जगद्भ्रमः = विश्वाची भेदभ्रांती, नास्ति = त्याला नसते.

**भावार्थ** : नेत्रादी इंद्रियांनी युक्त प्राणवायूला मनामध्ये साठवून जो शिवयोगी त्या मनाला परब्रह्मात स्थिर करतो तो साक्षात् शिवस्वरूपच होतो. अशा त्याला जगाचा भेदभ्रम नसतो.॥२२॥

**सर्वेन्द्रियप्रवृत्त्या च बहिरन्तः शिवं यजन्।**
**स्वच्छन्दचारी सर्वत्र सुखी भवति संयमी।।२३।।**

**अन्वयार्थ** : संयमी = शिवयोगी, सर्वेन्द्रियप्रवृत्त्या = अंतर्बाह्य इंद्रियांच्या व्यापाराने, बहिरन्तः = आत आणि बाहेर, शिवं यजेन् = इष्टलिंग आणि प्राण-लिंगरूपी शिवाचे पूजन करीत, सर्वत्र = सगळीकडे, स्वच्छन्दचारी = स्वतंत्र आचाराचा होऊन, सुखी भवति = सुखी होतो.



**भावार्थ** : संयमी असा शिवयोगी आपली अंतरिंद्रिये आणि बाह्येंद्रि-यांच्या वृत्तिद्वारा इष्टलिंग आणि प्राणलिंगाची पूजा करीत सर्वत्र स्वच्छन्दाचारी होऊन शिवसुखाचा अनुभव घेत असतो.॥२३॥

### प्राणानुग्रहस्थल - (६५)

**शिवस्य परकायस्य यत् तात्पर्यावलोकनम्।**
**तत्प्राणानुग्रहः प्रोक्तः सर्वेषां तत्त्वदर्शिभिः।।२४।।**

**अन्वयार्थ** : परकायस्य = इंद्रियानुग्रहसंपन्न, शिवस्य = परकाय शिवयोग्याचे, यत् = जे, तात्पर्यावलोकनम् = (प्राणवायूचा निरोध करून) जग सर्व शिवमय आहे अशा तात्पर्यदृष्टीने पाहतो, तत्र = ते, सर्वेषां = सर्वांचे, प्राणानुग्रहः = प्राणानुग्रह म्हणून, तत्त्वदर्शिभिः = तत्त्वज्ञान्यांकडून, प्रोक्तः = सांगितले आहे.

**भावार्थ** : इंद्रियानुग्रहसंपन्न असलेला तो परयोगी प्राणवायूला कुंभकाने निरोध करून दृश्यमान सर्व जग शिवस्वरूप असलेले पाहतो व त्याप्रमाणे अनुसरण करण्यासाठी सर्वांवर अनुग्रह करतो. तोच प्राणानुग्रह होय, असे सर्व तत्त्वचिंतक सांगतात.॥२४॥

**प्राणो यस्य लयं याति शिवे परमकारणे।**
**कुतस्तस्येन्द्रियस्फूर्तिः कुतः संसारदर्शनम्।।२५।।**

**अन्वयार्थ** : यस्य = ज्या शिवयोग्याचा, प्राणः = प्राणवायू, परमकारणे = सर्वाला कारण असणाऱ्या, शिवे = परशिवात, लयं याति = लय पावतो, तस्य = त्या शिवयोग्याचे, इन्द्रियस्फूर्तिः = इंद्रियव्यापार, कुतः = कोठून होणार? संसारदर्शनम् = संसाराचे दर्शन, कुतः = कसे होणार?

**भावार्थ** : प्रपंचाच्या उत्पत्त्यादींना कारण असलेल्या त्या परशिवामध्ये ह्या शिवयोग्याचा प्राण लय झाला असल्यामुळे त्याचा बाह्येंद्रियांचा व्यापार उरलेला नसतो. म्हणून त्याला नेहमी निष्प्रपंचरूप शिवलिंगाचेच सर्वत्र दर्शन होते.॥२५॥

**करणेषु निवृत्तेषु स्वार्थसङ्गात् प्रयत्नतः।**
**तैः समं प्राणमारोप्य स्वान्ते शान्तमतिः स्वयम्।।२६।।**

**अन्वयार्थ** : करणेषु = नेत्रादी इंद्रिये, स्वार्थसङ्गात् = आपल्या विषयांच्या संबंधापासून, प्रयत्नतः = प्रयत्नपूर्वक, निवृत्तेषु = विमुख झाल्यावर, स्वान्ते = आपल्या मनात, तैः समं = त्या इंद्रियांबरोबर, प्राणमारोप्य = प्राणांना एकरूप करून, स्वयं = स्वतः, शान्तमतिः = शांत मनाचा होतो.

**भावार्थ** : केवळ कुंभकानेच शिवामध्ये प्राणवायू विलीन केल्याने श्रोत्रादी सर्व इंद्रिये आपापल्या शब्दादी विषयांशी संबंध न उरल्यामुळे ते स्वतःशीच अंतर्मुख होतात. अशी अंतर्मुख इंद्रिये असलेला तो शिवयोगी आपली सर्व इंद्रिये प्राणामध्ये विलीन करून निश्चल व रागद्वेषादिविरहित होऊन स्वतःतच स्वतः शांत असतो.।।२६।।

**शान्तत्वात् प्राणवृत्तीनां मनः शाम्यति वृत्तिभिः।**
**तच्छान्तौ योगिनां किञ्चिच्छिवादन्यन्न दृश्यते।।२७।।**

**अन्वयार्थ** : प्राणवृत्तीनां = रेचक पूरकरूपी प्राणवृत्ती, शान्तत्वात् = शांत झाल्याने, मनः = मन, वृत्तिभिः = संकल्पविकल्परूप वृत्तीसह, शाम्यति = शांत होते, तच्छान्तौ = मन शांत झाल्यावर, योगिनां = योगी जनांना, शिवादन्यत् = शिवाहून भिन्न, किञ्चित् = काहीही, न दृश्यते = दिसत नाही.

**भावार्थ** : यापूर्वी सांगितलेल्या कुंभकाने प्राणवायूच्या रेचक पूरक वृत्ती शांत होतात. अशा रीतीने प्राणवायूच्या स्थिरतेमुळे मनाच्या संकल्प-विकल्पात्मक वृत्तीही नाहीशा होतात. त्यामुळे असा प्रशांत-मनस्क झालेला शिवयोगी शिवाशिवाय अन्य कोणालाही पाहत नाही.।।२७।।

**प्राण एव मनुष्याणां देहधारणकारणम्।**
**तदाधारः शिवः प्रोक्तः सर्वकारणकारणम्।।२८।।**

**अन्वयार्थ** : मनुष्याणां = मनुष्यांच्या, देहधारणकारणम् = शरीरधारण करण्यास कारण, प्राण एव = प्राणच होय, तदाधारः = त्या प्राणाचा आधार, सर्वकारण-कारणम् = सर्वकारणांना कारण असा, शिवः = शिव, प्रोक्तः = सांगितला जातो.



**भावार्थ** : मनुष्याच्या देहधारणाला प्राणच मुख्य कारण असतो. त्या प्राणाला सर्वास कारण असणारा शिवच आधार असतो असे सांगितले आहे.।।२८।।

**निराधारः शिवः साक्षात् प्राणस्तेन प्रतिष्ठितः।**
**तदाधारा तनुर्ज्ञेया जीवो येनैव चेष्टते।।२९।।**

**अन्वयार्थ** : शिवः = शिव, निराधारः = आधाररहित आहे, साक्षात् = प्रत्यक्ष, प्राणः = प्राण, तेन = शिवामुळे, प्रतिष्ठितः = प्रतिष्ठित आहे, तनुः = शरीर, तदाधारा = त्या प्राणाच्या आधाराने आहे, ज्ञेया = असे जाणावे, येनैव = ज्या प्राणामुळेच, जीवः = जीव, चेष्टते = व्यवहार करतो.

**भावार्थ** : शिव हा आधाररहित आहे, प्रत्यक्ष प्राण त्या शिवाच्याच आधाराने प्रतिष्ठित आहे. त्या प्राणाच्या आधाराने शरीर राहते, आणि प्राणाच्याच आधाराने जीव चलनवलनादी क्रिया करतो.।।२९।।

**शिवे प्राणो विलीनोऽपि योगिनो योगमार्गतः।**
**स्वशक्तिवासनायोगाद् धारयत्येव विग्रहम्।।३०।।**

**अन्वयार्थ** : योगिनः = शिवयोग्याला, योगमार्गतः = कुंभकरूप योग-मार्गाने, प्राणः = प्राण, शिवे = शिवात, विलीनोऽपि = विलीन झाला तरी, स्वशक्तिवासनायोगाद् = आपल्या शक्तिसंस्कार बलाने, विग्रहं = शरीर, धारयत्येव = धारण करतो.

**भावार्थ** : शिवयोग्याचे प्राण कुंभकरूप योगमार्गाने शिवलिंगात लय पावले तरी तो आपल्या योगशक्तिरूप वासनेच्या बळावर देह धारण करून असतो.।।३०।।

**स चाभ्यासवशाद्भूयः तर्वतत्त्वातिवर्तिनि।**
**निष्कलङ्के निराकारे निरस्ताशेषविक्लवे।।३१।।**
**चिद्विलासपरिस्फूर्तिपरिपूर्णसुखाद्वये ।**
**शिवे विलीनः सर्वात्मा योगी चलति न क्वचित्।।३२।।**

**अन्वयार्थ** : स च = तो प्राणवायू, भूयः = पुन्हा, अभ्यासवशात् = शिवयोगाभ्यासामुळे, सर्वतत्त्वातिवर्तिनि = भूम्यादी शिवान्त सर्व तत्त्वांच्या अतीत असणारा, निष्कलङ्के = जरामरणादी दोषरहित, निराकारे = आकाररहित, निरस्ताशेषविक्लवे = समस्त बाधारहित, चिद्विलासपरिस्फूर्ति = चिद्विलासाच्या बाहुल्याने, परिपूर्णसुखाद्वये = परिपूर्ण आनंदरूप आणि अद्वितीय अशा, शिवे = परशिवात, सर्वात्मा = सर्वव्यवहारासहित (प्राण), विलीनः = विलीन झालेला आहे, असा योगी = शिवयोगी, क्वचित् = कोठेही, न चलति = विचलित होत नाही.

**भावार्थ** : जीवात्म्याला आश्रयभूत असणारा प्राणवायू त्या योग्याने पुनः पुन्हा केलेल्या योगाभ्यासामुळे, भूम्यादिशिवान्त (भूमीपासून शिवापर्यंत) सर्व तत्त्वांच्या अतीत, जरामरणादिदोषरहित, नीलपीतादि आकारविहीन, कोणतीही बाधा नसलेला, चिच्छक्तिविलासस्फुरण-विशिष्ट, परमानंदपरिपूर्ण, अद्वितीय अशा परशिवामध्ये सर्व व्यवहारासह विलीन केलेला असतो. म्हणून तो योगी चलनवलनविरहित होऊन राहतो.॥३१-३२॥

**प्रध्वस्तवासनासङ्गात् प्राणवृत्तिपरिक्षयात्।**
**शिवैकीभूतसर्वात्मा स्याणुवद्भाति संयमी।।३३।।**

**अन्वयार्थ** : संयमी = शिवयोगी, प्रध्वस्तवासनासङ्गात् = विषयवासनेचा संपर्क नष्ट झाल्याने, प्राणवृत्तिपरिक्षयात् = प्राणाचे व्यवहार स्थगित झाल्याने, शिवैकीभूतसर्वात्मा = सर्व व्यवहारांनी शिवलिंगाशी समरस होऊन, स्थाणुवत् = झाडाच्या बुंध्याप्रमाणे, भाति = निश्चयरूपाने भासतो.

**भावार्थ** : प्राण आणि मनोवृत्तींना शिवामध्ये विलीन केलेल्या शिवयोग्याच्या सर्व वासना नष्ट झालेल्या असतात, आणि स्वाभाविक श्वासोच्छ्वासरूपी प्राकृत आणि विकारवश होऊन अस्वाभाविकपणे होणाऱ्या विकृत श्वासोच्छ्वासांचा प्राणवायुव्यापार आणि सर्वेंद्रियव्यापार स्थगित झालेला असतो. म्हणून तो शिवलिंगात एकरूप होऊन स्थाणुवत् (झाडाच्या बुंध्याप्रमाणे) अचल होतो.॥३३॥



### कायार्पितस्थल - (६६)

**शिवस्य पररूपस्य सर्वानुग्रहिणोऽर्चने।**
**त्यागो देहाभिमानस्य कायार्पितमुदाहृतम्।।३४।।**

**अन्वयार्थ** : सर्वानुग्राहिणः = सर्वांवर अनुग्रह करणाऱ्या, पररूपस्य = परशिवयोग्याचा, शिवस्य = शिवलिंगाच्या, अर्चने = पूजेविषयी, देहाभिमानस्य = शरीराभिमानाचा, त्यागः = त्याग, कायार्पित = कायार्पित म्हणून, उदाहृतम् = म्हटला जातो.

**भावार्थ** : सर्वांवर अनुग्रह करणाऱ्या शिवयोग्याने परशिवाच्या पूजेच्या वेळी देहाभिमानाचा त्याग करून देहच शिवाला अर्पण करणे याला कायार्पित असे म्हणतात.॥३४॥

**यदा योगी निजं देहं शिवाय विनिवेदयेत्।**
**तदा भवति तद्रूपं शिवरूपं न संशयः।।३५।।**

**अन्वयार्थ** : यदा = जेव्हा, योगी = शिवयोगी, निजं = स्वतःचे, देहं = शरीर, शिवाय = शिवाला, विनिवेदयेत् = अर्पण करतो, तदा = तेव्हा, तद्रूपं = त्याचे स्वरूप, शिवरूपं = शिवस्वरूप, भवति = होते, न संशयः = यात संशय नाही.

**भावार्थ** : आपला देह शिवाला अर्पण केल्याने शिवयोगी शिवस्वरूपच होतो, यात कसलाही संशय नाही.॥३५॥

**इन्द्रियप्रीतिहेतूनि विषयासङ्गजानि च।**
**सुखानि सुखचिद्रूपे शिवयोगी निवेदयेत्।।३६।।**

**अन्वयार्थ** : शिवयोगी = शिवयोग्याने, इन्द्रियप्रीतिहेतुनि = इंद्रियांच्या प्रीतीला कारणीभूत, च = आणि, विषयासङ्गजानि = विषयसंबंधाने उत्पन्न झालेली, सुखानि = सुखे, सुखचिद्रूपे = चिदानंदस्वरूप परशिवाला, निवेदयेत् = अर्पण करावीत.

**भावार्थ** : इंद्रियांना प्रिय होणाऱ्या विषयसंबंधाने उत्पन्न होणारी सर्व सुखे चिदानंदमय अशा शिवाला अर्पण करावीत.॥३६॥

**दर्शनात् स्पर्शनात् भुक्तेः श्रवणाद् घ्राणनादपि।**
**विषयेभ्यो यदुत्पन्नं शिवे तत्सुखमर्पयेत्।।३७।।**

**अन्वयार्थ** : दर्शनात् = पाहण्याने, स्पर्शनाद् = स्पर्श केल्याने, भुक्तेः = भक्षिल्याने, श्रवणाद् = ऐकल्याने, अपि = आणि, घ्राणनाद् = वास घेतल्याने, विषयेभ्यः = विषयांपासून, यदुत्पन्नं = जे सुख उत्पन्न होते, तत्सुखं = ते सुख, शिवे = शिवाला, समर्पयेत् = अर्पण करावे.

**भावार्थ** : पाहणे, स्पर्श करणे, उपभोग घेणे, श्रवण करणे, वास घेणे इत्यादी विषयोपभोगांमुळे उत्पन्न होणारी सर्व सुखे शिवयोग्याने शिवास अर्पण करावीत.॥३७।

**देहद्वारेण यद्यत् स्यात् सुखं प्रासङ्गमात्मनः।**
**तत्तन्निवेदयन् शम्भोर्योगी भवति निर्मलः।।३८।।**

**अन्वयार्थ** : देहद्वारेण = देहाच्या दशेंद्रियांद्वारा, यद्यत् = जे जे, सुखं = सुख, आत्मनः = स्वतःला, प्रासङ्गं स्यात् = प्राप्त होते, तत्तत् = ते ते सुख, शम्भोः = शिवलिंगाला, निवेदयन् = समर्पण करून, योगी = शिवयोगी, निर्मलः = निर्लिप्त, भवति = होतो.

**भावार्थ** : देहांतर्गत दशेंद्रियांद्वारा उत्पन्न होणारी सर्व सुखे शिवलिंगास अर्पण करून शिवयोगी निर्लिप्त होऊन राहतो. अशा रीतीने कायिक सुखांना शिवास अर्पण करणे हेच कायार्पण होय.॥३८॥

**करणार्पितस्थल - (६७)**

**आसञ्जनं समस्तानां करणानां परात्परे।**
**शिवे यत् तदिदं प्रोक्तं करणार्पितमागमे।।३९।।**

**अन्वयार्थ** : परात्परे = सर्वोत्कृष्ट अशा, शिवे = शिवलिंगाशी, समस्तानां = सर्व, करणानां = इंद्रियांचे, आसञ्जनं = संयोजन करणे, यत् = जे आहे, तदिदं = ते, आगमे = आगमशास्त्रात, करणार्पितं = करणार्पित म्हणून, प्रोक्तं = म्हटले आहे.

**भावार्थ** :जगाच्या उत्पत्तीला कारणीभूत असलेल्या शक्तितत्त्वाहून श्रेष्ठ असलेल्या त्या परात्पर शिवलिंगाशी आपले अंतःकरण आणि बाह्य करणांचा संयोग करण्याला वीरशैव सिद्धान्तात करणार्पित असे म्हणतात. अंतर्बाह्य इंद्रियांना परमेश्वराला अर्पण करणे हेच करणार्पण होय.॥३९॥



**यद्यत्करणमालम्ब्य भुङक्ते विषयजं सुखम्।**
**तत्तच्छिवे समर्प्यैष करणार्पकः उच्यते।।४०।।**

**अन्वयार्थ** : यद्यत् = ज्या ज्या, करणामालम्ब्य = इंद्रियाद्वारे, विषयजं = विषयांपासून उत्पन्न होणारे, सुखं = सुख, भुङ्क्ते = उपभोगतो, तत्तत् = ते ते, शिवे = शिवाला, समर्प्य = अर्पण करून, एषः = हा, करणार्पकः = करणार्पक, म्हणून, उच्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : इंद्रियाच्या द्वारे जे जे विषयसुख उत्पन्न होते ते ते सर्व परमात्म्याला अर्पण करणाऱ्याला करणार्पक म्हणतात.॥४०॥

**अहङ्कारमदोद्रिक्तमन्तःकरणवारणम् ।**
**बध्नीयाद् यः शिवालाने स धीरः सर्वसिद्धिमान्।।४१।।**

**अन्वयार्थ** : अहङ्कारमदोद्रिक्तं = अहंकार-ममतारूपी मदाने उन्मत्त, अन्तः-करणवारणम् = अंतःकरणरूपी हत्तीला, यः = जो, शिवालाने = शिवलिंगरूपी स्तंभाला, बध्नीयाद् = बांधतो, सः = तो, सर्वसिद्धिमान् = सर्व सिद्धी असलेला, धीरः = धैर्यवान होय.

**भावार्थ** : अहंकार आणि ममतारूपी मदाने उन्मत्त झालेल्या अंतः-करणरूपी हत्तीला शिवरूपी खांबाला जो बांधून टाकतो तो सर्वसिद्धी प्राप्त केलेला असा धैर्यवान होय.॥४१॥

**इन्द्रियाणां समस्तानां मनः प्रथममुच्यते।**
**वशीकृते शिवे तस्मिन् किमन्यैस्तद्वशानुगैः।।४२।।**

**अन्वयार्थ** : समस्तानां = सर्व, इन्द्रियाणां = इंद्रियव्यवहाराला, मनः = मन, प्रथमं = कारण, उच्यते = म्हटले जाते, तस्मिन् = ते, शिवे = शिवाला, वशीकृते = वशीभूत झाल्यावर, तद्वशानुगैः = त्याच्या अधीन राहाणारे, अन्यैः = अन्य इंद्रियांचे, किम् = काय?

**भावार्थ** : सर्व इंद्रियांमध्ये मन हेच प्रमुख असते. असे मन वश करून ते शिवामध्ये लीन केल्यानंतर त्याचे अनुसरण करणाऱ्या अन्य इंद्रियांना अधीन ठेवण्याचा प्रयत्न कशाला? ती इंद्रिये आपोआप अधीन राहतात.।।४२।।

**इन्द्रियाणां वशीकारो निवृत्तिरिति गीयते।**
**लक्षीकृते शिवे तेषां कृतः संसारगाहनम्।।४३।।**

**अन्वयार्थ** : इन्द्रियाणां = इंद्रियांना, वशीकारः = वशीभूत ठेवण्याला, निवृत्तिरिति = निवृत्ती असे, गीयते = म्हटले जाते, तेषां = त्या इंद्रियांना, शिवे = शिव, लक्षीकृते = लक्ष झाल्यावर, संसारगाहनम् = संसारात बुडणे, कुतः = कसे होईल?

**भावार्थ** : इंद्रियांना वश करून त्यांना ताब्यात ठेवण्याला निवृत्ती असे म्हणतात. इंद्रियांना शिवामध्ये केंद्रित केल्यावर संसारसागरात बुडण्याची भीती कशाला? इंद्रियांना शिवार्पित केल्यावर मनुष्याला संसाराचे भय उरत नाही.।।४३।।

**संसारविषकान्तारसमुच्छेदकुठारिका ।**
**उपशान्तिर्भवेत् पुंसामिन्द्रियाणां वशीकृतौ।।४४।।**

**अन्वयार्थ** : पुंसां = जीवांची, इन्द्रियाणां = इंद्रिये, वशीकृतौ = वशीभूत झाल्यावर, संसारविषकान्तार = संसाररूपी विषारी अरण्याचे, समुच्छेदकुठारिका = छेदनं करण्यासाठी कुऱ्हाडीप्रमाणे असणारी, उपशान्तिः = निरपेक्ष बुद्धी, भवेत् = उत्पन्न होते.

**भावार्थ** : इंद्रियांना वश करून अधीन ठेवल्याने मनुष्याच्या मनाला शांती लाभते. संसाररूपी विषवृक्षाला तोडून टाकणारी कुऱ्हाड म्हणजे मन:शांती होय.।।४४।।

**इन्द्रियैरेव जायन्ते पापानि सुकृतानि च।**
**तेषां समर्पणादीशे कुतः कर्मनिबन्धनम्।।४५।।**



**अन्वयार्थ** : इन्द्रियैरेव = इंद्रियांमुळे, पापानि = पापे, च = आणि, सुकृतानि = पुण्ये, जायन्ते = उत्पन्न होतात, तेषां = त्या इंद्रियांना, ईशे = शिवाला, समर्पणात् = अर्पण केल्यावर, कर्मनिबन्धनम् = कर्माचे बंधन, कुतः = कसे होणार?

**भावार्थ** : इंद्रियांपासूनच पुण्य आणि पापाची उत्पत्ती होते. ती इंद्रियेच जर शिवाला अर्पण केली तर त्याद्वारे केलेल्या कर्माचे बंधन मनुष्याला कसे असणार?।।४५।।

**प्रकाशमाने चिद्वह्नौ बहिरन्तर्जगन्मये।**
**समर्प्य विषयान् सर्वान् मुक्तवज्जायते जनः।।४६।।**

**अन्वयार्थ** : बहिः = बाहेर, अन्तः = आत, प्रकाशमाने = प्रकाशणाऱ्या, जगन्मये = विश्वरूपी, चिद्वह्नौ = चिदग्निरूप शिवलिंगात, सर्वान् = सर्व, विषयान् = विषयांना, समर्प्य = अर्पण करून, जनः = जननमरणपीडित जीव, मुक्तवज्जायते = मुक्त होतो.

**भावार्थ** : अग्नीत टाकलेले पदार्थ जसे भस्म होऊन जातात तसे जगाच्या आत व बाहेर चिदग्नीरूप प्रकाशमान असणाऱ्या शिवलिंगाला अर्पण केलेले पदार्थही नाश पावतात. त्यामुळे परमात्म्याला अर्पण केलेले विषय असोत की पुण्यपाप असो ते वाढत नाहीत, उलट ते नाश पावल्यामुळे अर्पण करणाराही जन्ममरणापासून मुक्त होतो.।।४६।।

**चित्तद्रव्यं समादाय जगज्जातं महाहविः।**
**चिद्वह्नौ जुह्वतामन्तः कुतः संसारविप्लवः।।४७।।**

**अन्वयार्थ** : जगज्जातं = शब्दादी विषयसमूहरूप, महाहविः = महाआहुती, आणि चित्तद्रव्यं = चित्तरूपी होमद्रव्य, समादाय = संग्रह करून, अन्तः = हृदयकमलात असणाऱ्या, चिद्वह्नौ = चिद्रूप अग्नीत, जुह्वताम् = होम करणाऱ्या शिवयोग्यांना, संसारविप्लवः = संसाराची बाधा, कुतः = कशी होईल?

**भावार्थ** : हे जग शब्दादी विषयरूप असते. प्रत्येक व्यक्तीच्या मनात त्याविषयी अभिलाषा उत्पन्न होत असते. मनात उत्पन्न झालेल्या विषयाभि-

लाषारूप हविपदार्थांना आपल्या हृदयकमलात प्रकाशमान असणाऱ्या चिदग्नीरूपी शिवलिंगात जो होमार्पित करतो त्याला संसाराचे बंधन कसे असणार? अर्थात् असणार नाही.।।४७।।

**आत्मज्योतिषि जिद्रूपे प्राणवायुनिबोधिते।**
**जुह्वन् समस्तविषयान् तन्मयो भवति ध्रुवम्।।४८।।**

**अन्वयार्थ** : प्राणवायुनिबोधिते = प्राणवायूने प्रकाशित झालेल्या, चिद्रूपे = प्रकाशरूप, आत्मज्योतिषि = शिवाग्नीमध्ये, समस्तविषयान् = त्या त्या इंद्रियजन्य विषयांचे, जुह्वन् = हवन करीत, तो योगी तन्मयः = शिवस्वरूप, भवति = होतो, ध्रुवं = हे निश्चित.

**भावार्थ** : प्राणवायूने प्रज्वलित झालेल्या आत्मज्योतिरूप शिवाग्नीत त्या इंद्रियजन्य अशा सुखांचे समर्पण करणारा तो शिवयोगी निश्चितपणे चिन्मय शिवस्वरूपच होतो.।।४८।।

**इन्द्रियाणि समस्तानि शरीरं भोगसाधनम्।**
**शिवपूजाङ्गभावेन भावयन् मुक्तिमाप्नुयात्।।४९।।**

**अन्वयार्थ** : भोगसाधनम् = भोगाचे साधन, शरीरं = शरीर, समस्तानि = सर्व, इन्द्रियाणि = इंद्रिये, शिवपूजाङ्गभावेन = शिवपूजेचे साधन आहे अशी, भावयन् = भावना करून, मुक्तिमाप्नुयात् = मुक्ती प्राप्त करून घेतो.

**भावार्थ** : भोगसाधन असे शरीर आणि सर्व इंद्रिये शिवपूजेची अंगे असल्यामुळे ती शिवाला अर्पण करण्यास योग्य आहेत. करणे ही कायेची अंगे असल्यामुळे कायार्पण प्रसंगात करणार्पण सुद्धा सांगितलेले आहे.।।४९।।

### भावार्पितस्थल - (६८)

**शिवे निश्चलभावेन भावानां यत्समर्पणम्।**
**भावार्पितमिदं प्रोक्तं शिवसद्भाववेदिभिः।।५०।।**

**अन्वयार्थ** : शिवे = शिवलिंगाविषयी, निश्चलभावेन = दृढ मनाने, भावानां = भावनांचे, यत् = जे, समर्पणम् = समर्पण केले जाते, इदं = हे,



शिवसद्भाववेदिभिः = शिवज्ञान्यांकडून, भावार्पितं = भावार्पित म्हणून, प्रोक्तं = सांगितले आहे.

**भावार्थ** : शिवामध्ये निश्चल भावना ठेवून सर्व भावना अर्पण करण्याला भावार्पित म्हणावे असे शिवसद्भाव जाणणारे सांगतात.।।५०।।

**चित्तस्थसकलार्थानां मननं यत्तु मानसे।**
**तदर्पणं शिवे साक्षन्मानसो भाव उच्यते।।५१।।**

**अन्वयार्थ** : मानसः = मनोविकाराला, भावः = भाव असे, उच्यते = म्हटले जाते, मानसे = मनोविकाररूपी भावात, चित्तस्थ = चित्तात राहणारे, सकलार्थानां = सर्व पदार्थांचे, यत् तु = जे, मननं = अनुभवरूप चिंतन आहे, तत् = त्याचे, साक्षात् = प्रत्यक्ष, शिवे = शिवलिंगाला, अर्पणं = अर्पण करणे, भावार्पण होय.

**भावार्थ** : मनामध्ये सर्व पदार्थांचे अनुभवरूपाने जे चिंतन चालते त्याला भाव असे म्हणतात. मनामध्ये उत्पन्न होणारे सर्व भाव शिवास अर्पण करणे म्हणजे भावार्पण होय.।।५१।।

**भाव एव हि जन्तूनां कारणं बन्धमोक्षयोः।**
**भावशुद्धौ भवेन्मुक्तिर्विपरीते तु संसृतिः।।५२।।**

**अन्वयार्थ** : जन्तूनां = प्राण्यांच्या, बन्धमोक्षयोः = बंध आणि मुक्तीला, कारणं = कारण, भाव एव हि = भावच आहे, भावशुद्धौ = भाव शुद्ध असल्यास, मुक्तिः = मुक्ती, भवेत् = होते, विपरीते तु = भाव शुद्ध नसल्यावर, संसृतिः = संसार प्राप्त होतो.

**भावार्थ** : जीवाच्या भावनाच त्याच्या बंध आणि मोक्षाला कारण असतात. म्हणून शुद्ध भावनेपासून मुक्ती आणि अशुद्ध भावनेमुळे संसाराचा व्याप प्राप्त होतो.।।५२।।

**भावस्य शुद्धिराख्याता शिवोऽहमिति योजना।**
**विपरीतसमायोगे कुतो दुःखनिवर्तनम्।।५३।।**

**अन्वयार्थ** : शिवोऽहं = मी शिव आहे, इति = अशा, योजना = संबंधामुळे, भावस्य = भावनेची, शुद्धिः = शुद्धी, आख्याता = सांगितली आहे, विपरीतसमायोगे = त्याच्या विपरीत झाल्यावर, दुःखनिवर्तनम् = दुःखाची निवृत्ती, कुतः = कशी होणार?

**भावार्थ** : शिवोऽहं म्हणजे मी शिव आहे असे स्वस्वरूपाचे चिंतन करणे म्हणजे भावशुद्धी होय. अशा शुद्ध भावनेने मनुष्यास मुक्ती प्राप्त होते. या उलट मी शिव नाही अशा विपरीत भावनेने सांसारिक दुःखाची निवृत्ती कशी होणार? अर्थात् होणार नाही.॥५३॥

**भोक्ता भोग्यं भोजयिता सर्वमेतच्चराचरम्।**
**भावयन् शिवरूपेण शिवो भवति वस्तुतः।।५४।।**

**अन्वयार्थ** : भोक्ता = जीव, भोग्य = पदार्थ, आणि, भोजयिता = शिव, एतत् = हे, सर्वं = सर्व, चराचरम् = चराचर प्रपंचाला, शिवरूपेण = शिवस्वरूपाने, भावयन् = भावना केल्याने, वस्तुतः = वास्तविकपणे, शिवः = शिवच, भवति = होतो.

**भावार्थ** : भोक्ता (जीव), भोग्य (वस्तू) व भोजयिता (ईश्वर) आणि चराचर विश्व हे सर्व शिवस्वरूपच होय अशी भावना करणारा शिवयोगी वास्तविक तो स्वतः शिवस्वरूपच होतो.॥५४॥

**मिथ्येति भावयन् विश्वं विश्वातीतं शिवं स्मरन्।**
**सत्तानन्दचिदाकारं कथं बद्धुमिहार्हति।।५५।।**

**अन्वयार्थ** : विश्वं = विश्वाला, मिथ्येति = मिथ्या म्हणून, भावयन् = भावना करणाऱ्या, आणि विश्वातीतं = विश्वोत्तीर्ण अशा, शिवं = शिवाला, सत्तानन्द-चिदाकारं = सच्चिदानंदस्वरूप असे, स्मरन् = चिंतन करणाऱ्या शिवयोग्याला, इह = ह्या प्रपंचात, बद्धुम् = मायादी पाश बांधण्यास, कथं = कसे, अर्हति = समर्थ होती?

**भावार्थ** : अविद्येचे कार्य असणारे नामरूपात्मक विश्व हे मिथ्या आहे, अशी भावना करून विश्वातीत असणाऱ्या सच्चिदानंदस्वरूप शिवाचे स्मरण करणाऱ्या शिवयोग्याला मलमायादिपाश कसे बांधू शकतील?॥५५॥



**सर्वं कर्मार्चनं शम्भोर्वचनं तस्य कीर्तनम्।**
**इति भावयतो नित्यं कथं स्यात्कर्मबन्धनम्।।५६।।**

**अन्वयार्थ** : सर्वं = सर्व, कर्म = कर्म, शम्भोः = शिवाचे, अर्चनं = अर्चन होय, वचनं = बोलणे, तस्य = त्याचे, कीर्तनं = कीर्तन होय, इति = अशा रीतीने, नित्यं = नेहमी, भावयतः = भावना करीत राहाणाऱ्याला, कर्मबन्धनम् = कर्माचे बंधन, कथं स्यात् = कसे होईल?

**भावार्थ** : मी करीत असलेल्या सर्व क्रिया म्हणजे शिवाची पूजा आणि माझे बोलणे म्हणजे शिवाची स्तुती होय, अशी सदासर्वदा भावना असणाऱ्या शिवयोग्यास त्याची कर्मे बंनधनकारक कशी होतील?॥५६॥

**सर्वेन्द्रियगतं सौख्यं दुःखं वा कर्मसम्भवम्।**
**शिवार्थं भावयन् योगी जीवन्मुक्तो भविष्यति।।५७।।**

**अन्वयार्थ** : सर्वेन्द्रियगतं = सर्व इंद्रियांमुळे होणारे, सौख्यं = सुख, वा = अथवा, कर्मसम्भवम् = पापकर्माने उत्पन्न झालेले, दुःखं = दुःख, शिवार्थं = शिवलिंगार्पित, अशी भावयन् = भावना करणारा, योगी = शिवयोगी, जीवन्मुक्तः = जीवन्मुक्त, भविष्यति = होतो.

**भावार्थ** : श्रोत्रादी सर्व इंद्रियांद्वारे निर्माण होणारे सुख असो किंवा पापकर्मामुळे निर्माण होणारे दुःख असो ते सर्व शिवलिंगार्पित होय, अशी भावना असणारा शिवयोगी जीवन्मुक्त होतो.॥५७॥

### शिष्यस्थल - (६९)

**शासनीयो भवेद्यस्तु परकायेन सर्वदा।**
**तत्प्रसादात्तु मोक्षार्थी स शिष्य इति कीर्तितः।।५८।।**

**अन्वयार्थ** : परकायेन = परब्रह्मशरीरी अशा शिवयोग्याकडून, यः = जो, सर्वदा = नेहमी, शासनीयः = शासन करण्यायोग्य, भवेत् = होतो, तत्प्रसादात् = त्या शिवयोग्याच्या कृपेने, मोक्षार्थी = मोक्षापेक्षी, सः = तो, शिष्य इति = शिष्य म्हणून, कीर्तितः = म्हटला जातो.

**भावार्थ** : भावार्पितसंपन्न अशा त्या परयोग्याकडून जो नेहमी शिक्षण प्राप्त करतो आणि त्या गुरूच्या अनुग्रहाने मोक्षप्राप्तीची अपेक्षा बाळगतो त्यालाच शिष्य असे म्हणावे.॥५८॥

**भावो यस्य स्थिरो नित्यं मनोवाक्कायकर्मभिः।**
**गुरौ निजे गुणोदारे स शिष्य इति गीयते॥५९॥**

**अन्वयार्थ** : यस्य = ज्याची, भाव: = भावना, गुणोदारे = ज्ञानवैराग्यादी गुणांनी उत्कृष्ट अशा, निजे = आपल्या, गुरौ = गुरूविषयी, मनोवाक्काय-कर्मभि: = ध्यानस्तोत्रपूजारूप त्रिकरण क्रियांनी, नित्यं = नित्य, स्थिर: = स्थिर होते, स: = तो, शिष्य इति = शिष्य म्हणून, गीयते = वर्णिला जातो.

**भावार्थ** : ज्ञानवैराग्यादी गुणांनी सर्वोत्कृष्ट अशा आपल्या गुरूच्या ठिकाणी ज्याची भावना, गुरूचे ध्यान, स्तोत्र व पूजारूप कर्मांनी स्थिर झालेली असते त्यालाच शिष्य म्हणावे.॥५९॥

**शान्तो दान्तस्तपश्शीलः सत्यवाक् समदर्शनः।**
**गुरौ शिवे समानस्थः स शिष्याणामिहोत्तमः॥६०॥**

**अन्वयार्थ** : शान्त: = जो अंतर इंद्रियनिग्रही, दान्त: = बाह्येंद्रिय निग्रही, तपश्शील: = यमादी अष्टांग योगलक्षण तपोनिष्ठ, सत्यवाक् = सत्य बोलणारा, समदर्शन: = समान बुद्धीचा, गुरौ = गुरूविषयी, आणि, शिवे = शिवाविषयी, समानस्थ: = समदर्शी होतो, स: = तो, इह = ह्या लोकात, शिष्याणां = शिष्यांमध्ये, उत्तम: = श्रेष्ठ होय.

**भावार्थ** : जो शांत (मनोनिग्रही), दांत (बाह्येंद्रियांचा निग्रही), तप:शील (यमनियमादी अष्टांगलक्षणतपोयोगनिष्ठ), सत्यवचनी, सोने आणि माती या दोहोंविषयी समानदृष्टी असणारा, तसेच श्रीगुरू आणि शिव यांच्या-विषयी अभेद बाळगणारा या प्रपंचात सर्वोत्तम शिष्य होय.॥६०॥

**गुरुमेव शिवं पश्येच्छिवमेव गुरुं तदा।**
**नैतयोरन्तरं किञ्चिद्विजानीयाद्विचक्षणः॥६१॥**



**अन्वयार्थ** : गुरुमेव = गुरूलाच, शिवं = शिवरूपाने, पश्येत् = पाहावे, तथा = तसेच, शिवमेव = शिवालाच, गुरुं = गुरूरूपाने पाहावे, विचक्षण: = सुज्ञ अशा शिष्याने, तयो: = त्या दोघांमध्ये, किञ्चित् = थोडाही, अन्तरं = भेद, न विजानीयाद् = जाणू नये.

**भावार्थ** : गुरू म्हणजे शिव व शिव म्हणजे गुरू अशाप्रकारे त्या दोघांत थोडाही भेद जो मानीत नाही तोच बुद्धिमान शिष्य होय.॥६१॥

**शिवाचारे शिवध्याने शिवज्ञाने च निर्मले।**
**गुरोरादेशमात्रेण परां निष्ठामवाप्नुयात्॥६२॥**

**अन्वयार्थ** : शिवाचारे = शिवाचाराविषयी, शिवध्याने = शिवध्यानाविषयी, च = आणि, निर्मले = परिशुद्ध अशा, शिवज्ञाने = शिवज्ञानाविषयी, गुरो: = गुरूच्या, आदेशमात्रेण = केवळ आज्ञेने, परां = श्रेष्ठ असा, निष्ठां = विश्वास, आप्नुयात् = मिळवावा.

**भावार्थ** : शिवाचार, शिवध्यान आणि निर्मल असे शिवज्ञान या विषयी शिष्याने गुरूच्या आज्ञेप्रमाणे विश्वास ठेवावा.॥६२॥

**ब्रह्माण्डबुद्बुदोद्भूतं मायासिन्धुं महत्तरम्।**
**गुरोः कवलयत्याशु कटाक्षवडवानलः॥६३॥**

**अन्वयार्थ** : ब्रह्माण्डबुद्बुदोद्भूतं = ब्रह्माण्डरूपी बुडबुड्यांच्या उत्पत्तीला कारणीभूत अशा, महत्तरम् = महान, मायासिन्धुं = मायारूप समुद्राला, गुरो: = गुरूचा, कटाक्षवडवानल: = कृपाकटाक्षरूपी वडवाग्नी, आशु = तत्काल, कवलयति = गिळून टाकतो.

**भावार्थ** : ब्रह्मांडरूप बुडबुड्यांच्या उत्पत्तीला कारण असा मायारूप महासमुद्र गुरुकृपाकटाक्षरूप वडवाग्नीने क्षणात नाहीसा होतो.॥६३॥

**गुरोः कटाक्षवेधेन शिवो भवति मानवः।**
**रसवेधाद् यथा लोहो हेमतां प्रतिपद्यते॥६४॥**

**अन्वयार्थ** : रसवेधाद् = रसायन प्रक्रियेने, यथा = जसे, लोहः = लोखंड, हेमतां = सुवर्णत्व, प्रतिपद्यते = प्राप्त करते, तसेच मानवः = मनुष्य, गुरोः = गुरूच्या, कटाक्षवेधेन = कृपाकटाक्षस्पर्शाने, शिवः = शिवस्वरूप, भवति = होतो.

**भावार्थ** : रसायनाच्या संबंधाने जसे लोखंडाचे सोने होते तसे गुरूच्या कृपाकटाक्षाच्या स्पर्शाने शिष्याला शिवस्वरूप प्राप्त होते.॥६४॥

**न लङ्घयेद् गुरोराज्ञां ज्ञानमेव प्रकाशयन्।**
**शिवासक्तेन मनसा सर्वसिद्धिमवाप्नुयात्॥६५॥**

**अन्वयार्थ** : गुरोः = गुरूची, आज्ञां = आज्ञा, न लङ्घयेद् = उल्लंघन करू नये, शिवासक्तेन = शिवध्याननिष्ठ अशा, मनसा = मनाने, ज्ञानमेव = शिवज्ञानच, प्रकाशयन् = प्रकट करीत, सर्वसिद्धिं = सर्व सिद्धी, अवाप्नुयात् = प्राप्त करून घेतो.

**भावार्थ** : शिष्याने आपल्या गुरूची आज्ञा कधीही मोडू नये. अशा आज्ञाधारक शिष्याने शिवाच्या ठिकाणी दृढ भक्ती ठेवल्याने शिवज्ञान प्रकाशित होऊन त्याला सर्व सिद्धी प्राप्त होतात.॥६५॥

**शिवादन्यज्जगन्मिथ्या शिवः संवित्स्वरूपकः।**
**शिवस्त्वमिति निर्दिष्टो गुरुणा मुक्त एव सः॥६६॥**

**अन्वयार्थ** : जगत् = जग, शिवादन्यत् = शिवाहून भिन्न आहे, इति = असे सांगणे, मिथ्या = असत्य होय, शिवः = शिव, संवित्स्वरूपकः = ज्ञानस्वरूप आहे, त्वं = तू, शिवः = शिवस्वरूप आहेस, इति = अशा रीतीने, गुरुणा = गुरूकडून, निर्दिष्टः = उपदेशिलेला, सः = तो शिष्य, मुक्त एव = मुक्तच होय.

**भावार्थ** : हे जग शिवापेक्षा भिन्न आहे असे समजणे खोटे आहे. अर्थात् जग शिवस्वरूपच आहे. शिव हा ज्ञानरूप असल्यामुळे सागरतरंग-न्यायाने जगही ज्ञानांतर्गत आहे. चिद्रूप असल्यामुळे तू सुद्धा शिवस्वरूपच आहेस. अशा रीतीने ज्या शिष्याला गुरूकडून उपदेश प्राप्त होतो तो जीवन्मुक्त होतो.॥६६॥



**गुरोर्लब्ध्वा महाज्ञानं संसारामयभेषजम्।**
**मोदते यः सुखी शान्तः स जीवन्मुक्त एव हि॥६७॥**

**अन्वयार्थ** : यः = जो, गुरोः = गुरूकडून, संसारामयभेषजम् = भवरोगाचे औषध असे, महाज्ञानं = शिवाद्वैतज्ञान, लब्ध्वा = मिळवून, सुखी = सुखी होऊन, मोदते = आनंदाचा अनुभव घेतो, शान्तः = रागद्वेषादिरहित, सः = तो शिष्य, जीवन्मुक्त एव हि = जीवन्मुक्तच होतो.

**भावार्थ** : जो शिष्य श्रीगुरूकडून संसाररूपी महारोगाचे औषधच अशा महाज्ञानाची प्राप्ती करून घेऊन शिवसुखाच्या आनंदात रममाण होतो, तो रागद्वेषादिरहित होऊन जीवन्मुक्त होतो.॥६७॥

**शुश्रूषुस्थल - (७०)**

**बोध्यमानः स गुरुणा परकायेन सर्वदा।**
**तच्छुश्रूषारतः शिष्यः शुश्रूषुरिति कीर्त्यते॥६८॥**

**अन्वयार्थ** : परकायेन = परब्रह्मशरीरी अशा, गुरुणा = गुरूकडून, सर्वदा = नेहमी, बोध्यमानः = उपदेशिला जाणारा, सः = तो, शिष्यः = शिष्य, तस्मात् = त्याच्याकडून, शुश्रूषारतः = श्रवण करण्यात आसक्त होऊन, शुश्रूषरिति = शुश्रूषु म्हणून, कीर्त्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : परब्रह्मशरीरी अशा सद्गुरुकडून नेहमी उपदेश घेणाऱ्या शिष्याला गुरूचा उपदेश ऐकण्यात आसक्ती असल्यामुळे त्याला शुश्रूषु असे म्हणतात.॥६८॥

**किं सत्यं किं नु वासत्यं क आत्मा कः परः शिवः।**
**इति श्रवणसंसक्तो गुरोः शिष्यो विशिष्यते॥६९॥**

**अन्वयार्थ** : सत्यं किं = सत्य म्हणजे काय, किं नु वासत्यं = असत्य म्हणजे काय, आत्मा कः = जीव कोण, परः शिवः = परमात्मा, कः = कोण, इति = अशा रीतीने, गुरोः = गुरूकडून, श्रवणसंसक्तः = उत्तरांचे श्रवण करण्यात तत्पर असणारा, शिष्यः = शिष्य, विशिष्यते = केवळ सेवा करणाऱ्या शिष्यापेक्षा वेगळा असतो.

**भावार्थ** : सत्य (नित्य) काय आणि असत्य (अनत्यि) काय? आत्मा कोण आणि परमात्मा कोण? अशा प्रश्नांची उत्तरे गुरूकडून समजून घेण्यास उत्सुक असणारा शिष्य केवळ सेवातत्पर अशा शिष्यापेक्षा श्रेष्ठ असतो.॥६९॥

**श्रुत्वा श्रुत्वा गुरोर्वाक्यं शिवसाक्षात्क्रियावहम्।**
**उपशाम्यति यः स्वान्ते स मुक्तिपदमाप्नुयात्।।७०।।**

**अन्वयार्थ** : यः = जो, शिवसाक्षात्क्रियावहम् = शिवसाक्षात्कार करून घेणारा, वाक्यं = उपदेशरूपी वाक्य, गुरोः = गुरूकडून, श्रुत्वा श्रुत्वा = पुनःपुन्हा ऐकून, स्वान्ते = आपल्या चित्तात, उपशाम्यति = शांत होतो, सः = तो, मुक्तिपदं = मोक्ष, आप्नुयात् = मिळवितो.

**भावार्थ** : उत्कट श्रवणाभिलाषी असणारा तो शिष्य शिवाचा साक्षात्कार करून देणारी श्रुतिसंमत अशी वाक्ये सद्‌गुरूच्या मुखातून पुनःपुन्हा ऐकून आपल्या अंतरंगात शांती प्राप्त करून घेऊन मुक्त होतो. म्हणून केवळ सेवातत्पर शिष्यापेक्षा तो श्रेष्ठ होय.॥७०॥

**न बुध्यति गुरोर्वाक्यं विना शिष्यस्य मानसम्।**
**तेजो विना सहस्रांशोः कथं स्फुरति पङ्कजम्।।७१।।**

**अन्वयार्थ** : गुरोः = गुरूच्या, वाक्यं विना = उपदेशाच्या वाक्याशिवाय, शिष्यस्य = शिष्याचे, मानसं = मन, न बुध्यति = विकसित होत नाही, सहस्रांशोः = सूर्याच्या, तेजो विना = प्रकाशाशिवाय, पङ्कजम् = कमल, कथं = कसे, स्फुरति = उमलेल?

**भावार्थ** : सूर्याच्या किरणस्पर्शाशिवाय ज्याप्रमाणे कमल विकसित होत नाही तशा प्रकारे गुरूचा उपदेशरूपी वाक्ये ऐकल्याशिवाय शिष्याला ज्ञानप्राप्ती होत नाही आणि तो मुक्तही होत नाही.॥७१॥

**सूर्यस्योदयमात्रेण सूर्यकान्तः प्रकाशते।**
**गुरोरालोकमात्रेण शिष्यो बोधेन भासते।।७२।।**



**अन्वयार्थ** : सूर्यस्य = सूर्याच्या, उदयमात्रेण = उदयानेच, सूर्यकान्तः = सूर्यकांतमणी, प्रकाशते = प्रकाश प्रकट करतो, गुरोः = गुरूच्या, आलोकमात्रेण = केवळ कृपाकटाक्षाने, शिष्यः = शिष्य, बोधेन = ज्ञानाने, भासते = प्रकाशित होतो.

**भावार्थ** : सूर्यकांतमणी जसा सूर्योदयामुळे प्रकाश प्रकट करतो तसा गुरूच्या केवळ कृपाकटाक्षाने शिष्य ज्ञानी होतो.॥७२॥

**अद्वैतपरमानन्दप्रबोधैकप्रकाशकम् ।**
**उपायं शृणुयाच्छिष्यः सद्‌गुरुं प्राप्य प्राञ्जलिः।।७३।।**

**अन्वयार्थ** : शिष्यः = शिष्याने, सद्‌गुरुं = सद्‌गुरूच्या, प्राप्य = जवळ जाऊन, साञ्जलिः = हात जोडून, अद्वैतपरमानन्द = अद्वैतरूपी परमानंदाचा, प्रबोधैकप्रकाशकम् = केवळ ज्ञान प्रकाशित करणारा, उपायं = उपाय, शृणुयात् = श्रवण करावा.

**भावार्थ** : समिधायुक्त हात जोडून शिष्याने सद्‌गुरूसमीप जावे आणि अद्वैताच्या परमानंदाचा बोध कसा होईल असा प्रश्न करून त्याचा उपाय ऐकावा.॥७३॥

**किं तत्त्वं परमं ज्ञेयं केन सर्वे प्रतिष्ठिताः।**
**कस्य साक्षात्क्रिया मुक्तिः कथयेति समासतः।।७४।।**

**अन्वयार्थ** : ज्ञेयं = जाणण्यायोग्य, परमं = श्रेष्ठ, तत्त्वं = तत्त्व, किं = कोणते? केन = कशाने, सर्वे = सर्व चराचर, प्रतिष्ठिताः = प्रतिष्ठित झाले आहे, कस्य = कशाच्या, साक्षात्क्रिया = साक्षात्काराने, मुक्तिः = मोक्ष मिळतो, हे सर्व समासतः = संक्षेपाने, कथय = सांगा, इति = असे (प्रश्न विचारावे).

**भावार्थ** : हे गुरुवर्या, समजून घेण्यास योग्य असे श्रेष्ठ तत्त्व कोणते? हे चराचर जग कशावर स्थिरावले आहे? कोणाच्या साक्षात्काराने मनुष्यास मोक्षप्राप्ती होते? ते कृपाकरून साररूपाने मला सांगावे.॥७४॥

**इति प्रश्ने कृते पूर्वं शिष्येण नियतात्मना।**
**ब्रूयात्तत्त्वं गुरुस्तस्मै येन स्यात् संसृतेर्लयः।।७५।।**

**अन्वयार्थ** : नियतात्मना = एकाग्र चित्ताच्या, शिष्येण = शिष्याकडून, इति = अशारीतीने, प्रश्ने = प्रश्न, पूर्वं = अगोदर, कृते = केल्यावर, गुरुः = गुरूने, तस्मै = त्याला, येन = ज्यामुळे, संसृतेः = संसाराचा, लयः स्यात् = लय होतो, अशा तत्त्वं = तत्त्वाचा, ब्रूयात् = उपदेश करावा.

**भावार्थ** : संयमशील अशा शिष्याने अगोदर प्रश्न केल्यावर सद्‌गुरूने शिष्याला ज्यायोगे संसाराचा लय होतो असा तत्त्वोपदेश करावा.॥७५॥

**शिव एव परं तत्त्वं चिदानन्दसदाकृतिः।**
**स यथार्थस्तदन्यस्य जगतो नास्ति नित्यता॥७६॥**

**अन्वयार्थ** : चिदानन्दसदाकृतिः = सच्चिदानंदस्वरूप, शिव एव = शिवच, परं तत्त्वं = श्रेष्ठ तत्त्व आहे, सः = तो परशिव, यथार्थः = नित्य आहे, तदन्यस्य = त्याहून भिन्न अशा, जगत; = विश्वाचे, नित्यता = नित्यत्व, नास्ति = नाही.

**भावार्थ** : सच्चिदानंदस्वरूप असलेले शिवतत्त्व हेच जाणून घेण्यास योग्य असे परमतत्त्व होय. तेच नित्य आहे. त्या पेक्षा निराळ्या अशा विष्णू आदी तत्त्वांना नित्यत्व नसते. अर्थात् शिवतत्त्वाप्रमाणे ती सनातन तत्त्वे नव्हेत.॥७६॥

**अयथार्थप्रपञ्चोऽयं प्रतितिष्ठति शङ्करे।**
**सदात्मनि यथा शुक्तौ रजतत्त्वं व्यवस्थितम्॥७७॥**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, सदात्मनि = सद्रूप अशा, शुक्तौ = शिंपल्यात, रजतत्त्वं = रजतत्त्व, व्यवस्थितम् = प्रतिष्ठित आहे, तसे अयं = हा, अयथार्थ-प्रपञ्चः = अनित्य प्रपंच, शङ्करे = शिवामध्ये, प्रतितिष्ठति = प्रतिष्ठित झाला आहे.

**भावार्थ** : शिंपल्यात होणाऱ्या चांदीच्या नामरूपात्मक प्रतीतीला जसा शिंपला अधिष्ठान असतो, तशा रीतीने प्रपंचाच्या नामरूप व्यवहाराला परशिवच अधिष्ठान असतो. अर्थात् हे चराचर परशिवतत्त्वावर स्थिरावले आहे. मात्र वीरशैवसिद्धान्तानुसार परशिवच जगद्रूपाने प्रतीत होत असतो.॥७७॥

**शिवोऽहमिति भावेन शिवे साक्षात्कृते स्थिरम्।**
**मुक्तो भवीत संसारान्मोहग्रन्थेर्विभेदतः॥७८॥**



**अन्वयार्थ** : शिवाहेऽहं = मी शिव आहे, इति = अशा रीतीच्या, भावेन = दृढ भावनेने, शिवं = शिवाचा, साक्षात्कृते = साक्षात्कार झाल्यावर, संसारात् = संसाररूपी, मोहग्रन्थेर्विभेदतः = मोहरूपी ग्रंथीचे भेदन झाल्यामुळे, स्थिरं = निश्चितपणे, मुक्तः = मुक्त, भवति = होतो.

**भावार्थ** : मी शिव आहे (शिवोऽहं) अशा दृढ भावनेने शिवाचा साक्षात्कार झाल्यावर संसाररूपी अज्ञानाची गाठ सुटते. अर्थात् शिवतत्त्व साक्षात्काराने जीवात्म्याला मुक्ती प्राप्त होते.॥७८॥

**शिवं भावय चात्मानं शिवादन्यं न चिन्तय।**
**एवं स्थिरे शिवाद्वैते जीवन्मुक्तो भविष्यसि॥७९॥**

**अन्वयार्थ** : आत्मानं = स्वतःला, शिवं = शिवस्वरूप, भावय = भावना कर, च = आणि, शिवाद् = शिवाहून, अन्यं = हा प्रपंच भिन्न आहे असे, न चिन्तय = चिंतन करू नकोस, एवं = अशा रीतीने, शिवाद्वैते = शिवाद्वैत ज्ञान, स्थिरे = स्थिर झाल्यावर, जीवन्मुक्तः = जीवन्मुक्त, भविष्यसि = होशील.

**भावार्थ** : शिव आणि शिवभक्ताचा आत्मा एकच असल्यामुळे हे शिष्या तू स्वतः शिवस्वरूपच आहेस असा भाव मनात धर. हा दिसणारा प्रपंच जलतरंगन्यायाने शिवस्वरूपापेक्षा भिन्न नाही असा विचार कर. अशा रीतीने तुझ्याठिकाणी शिवाद्वैतज्ञान स्थिर झाले म्हणजे तू जीवन्मुक्त होशील.॥७९॥

**एवं प्रचोदितः शिष्यो गुरुणा गुणशालिना।**
**शिवमेव जगत् पश्यन् जीवन्मुक्तोऽभिजायते॥८०॥**

**अन्वयार्थ** : एवं = अशा रीतीने, गुणशालिना = ज्ञान वैराग्यादि गुणांनी संपन्न, गुरुणा = गुरूकडून, प्रचोदितः = उपदेशिलेला, शिष्यः = शिष्य, जगत् = विश्वाला, शिव-मेव = शिवस्वरूपानेच, पश्यन् = पाहात, जीवन्मुक्तः = जीवन्मुक्त, अभिजायते = होतो.

**भावार्थ** : अशाप्रकारे ज्ञानवैराग्यादी गुणांनी युक्त अशा श्रीगुरूकडून प्राप्त झालेल्या उपदेशाने प्रबोधित झालेला शिष्य हे जगज्जाल शिवस्वरूपच आहे असे प्रत्ययास येऊन जीवन्मुक्त होतो.॥८०॥

**सेव्यस्थल - (७१)**

**गुरुवाक्यामृतास्वादात् प्राप्तबोधमहाफलः।**
**शुश्रूषुरेव सर्वेषां सेव्यत्वात् सेव्य उच्यते।।८१।।**

**अन्वयार्थ** : गुरुवाक्यामृतास्वादात् = गुरूपदेशरूपी अमृताच्या आस्वादाने, प्राप्तबोधमहाफल: = शिवाद्वैतज्ञानरूपी महाफल प्राप्त झालेला, शुश्रूषुरेव = हा शुश्रूषु शिष्यच, सर्वेषां = सर्वांना, सेव्यत्वात् = सेवा करण्यास योग्य असल्याने, सेव्य: = सेव्य म्हणून, उच्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : गुरूच्या वाक्यरूपी अमृताचा आस्वाद घेतलेला, गुरुसेवासक्त असलेला हा महापुरुषच सर्वांकडून सेवा घेण्यास योग्य झाल्या-कारणाने त्याला सेव्य असे म्हणतात.।।८१।।

**गुरूपदिष्टे विज्ञाने चेतसि स्थिरतां गते।**
**साक्षात्कृतशिवः शिष्यो गुरुवत् पूज्यते सदा।।८२।।**

**अन्वयार्थ** : गुरूपदिष्टे = गुरूकडून उपदेशिलेला, विज्ञाने = शिवाद्वैतज्ञान, चेतसि = मनात, स्थिरतां गते = स्थिर झाल्यावर, साक्षात्कृतशिव: = शिवसाक्षात्कार झालेला, शिष्य: = शिष्य, सदा = नेहमी, गुरुवत् = गुरूसारखा, पूज्यते = पूजिला जातो.

**भावार्थ** : गुरूकडून उपदिष्ट शिवाद्वैतलक्षणविशेषज्ञान मनामध्ये सुस्थिर होऊन ज्याला शिवाचा साक्षात्कार झालेला आहे असा शिष्यच गुरूप्रमाणे सदैव पूज्य होतो.।।८२।।

**ज्ञानादाधिक्यसम्पत्तिर्गुरोर्यस्मादुपस्थिता ।**
**तस्माज्ज्ञानागमाच्छिष्यो गुरुवत् पूज्यतां व्रजेत्।।८३।।**

**अन्वयार्थ** : गुरो: = श्रीगुरूला, यस्माद् = ज्या, ज्ञानाद् = ज्ञानाने, आधिक्यसम्पत्ति: = अधिक संपत्ती, उपस्थिता = प्राप्त झाली आहे, तस्मात् = ते, ज्ञानागमात् = ज्ञान प्राप्त झाल्याने, शिष्य: = शिष्य, गुरुवत् = गुरूसारखा, पूज्यतां = पूज्यत्व, व्रजेत् = मिळवितो.



**भावार्थ** : ज्या ज्ञानामुळे गुरूला श्रेष्ठत्व प्राप्त झालेले आहे, तसेच ज्ञान शिष्यालाही प्राप्त झाले असल्यामुळे तोही गुरूसारखा पूजनीय होतो.।।८३।।

**शिवोऽहमिति भावस्य नैरन्तर्याद् विशेषतः।**
**शिवभावे समुत्पन्ने शिववत् पूज्य एव सः।।८४।।**

**अन्वयार्थ** : शिवोऽहं = मी शिव आहे, इति = अशा रीतीच्या, भावस्य = भावनेचा, नैरन्तर्याद् = निरंतर होणाऱ्या, विशेषत: = अभ्यास विशेषाने, शिवभावे = शिवभाव, समुत्पन्ने = उत्पन्न झाल्यावर, स: = तो, शिववत् = शिवासारखा, पूज्य एव = पूज्य होतो.

**भावार्थ** : शिवोऽहं अशा भावाच्या निरंतर अभ्यासविशेषामुळे ज्याच्या ठिकाणी शिवभाव उत्पन्न झालेला आहे, असा तो शुश्रूषूही शिवासमान पूजनीय होतो.।।८४।।

**विषयासक्तचित्तोऽपि विषयासङ्गवर्जितः।**
**शिवभावयुतो योगी सेव्यः शिव इवापरः।।८५।।**

**अन्वयार्थ** : शिवभावयुत: = शिवभावाने युक्त, योगी = शुश्रूषु शिवयोगी, विषयासक्तचित्तोऽपि = विषयांत आसक्तचित्त असला तरी, विषयासङ्गवर्जित: = विषयसंगरहित होऊन, अपर: = दुसऱ्या, शिव इव = शिवासारखा, सेव्य: = पूजनीय होतो.

**भावार्थ** : शिवभावयुक्त झालेला हा शुश्रूषू शिवयोगी विषयसंगी असला तरी तो विषयासक्त नसतो. म्हणजेच त्याच्या इंद्रियांना विषयाचा संपर्क येत असला तरी त्याचे मन विषयासक्त नसते. तसेच त्याच्या ठिकाणी दृढ शिवभावना असल्यामुळे तो द्वितीय शंभूच असतो. म्हणून तो शिवाप्रमाणे पूज्य होतो.।।८५।।

**मुक्तः संशयपाशतः स्थिरमना बोधे च मुक्तिप्रदे**
**मोहं देहभृतां दृशा विघटयन् मूलं महासंसृतेः।**

**सत्तानन्दचिदात्मके निरुपमे शैवे परस्मिन् पदे**
**लीनात्मा क्षयितप्रपञ्चविभवो योगी जनैः सेव्यते।।८६।।**

**अन्वयार्थ** : संशयपाशतः = संशयरूपी पाशापासून, मुक्तः = मुक्त, च = आणि, मुक्तिप्रदे = मुक्ती देणाऱ्या, बोधे = ज्ञानात, स्थिरमना = स्थिरचित्त, महासंसृतेः = संसाराचे, मूलं = मूळ, अशा देहभृतां = जीवांच्या, मोहं = अज्ञानाला, दृशा = आपल्या कृपादृष्टीने, विघटयन् = दूर करणारा, सत्तानन्द-चिदात्मके = सच्चिदानंदस्वरूप, निरुपमे = उपमातीत, शैवे = शिवाच्या, परस्मिन् = श्रेष्ठ अशा, पदे = स्थानी, लीनात्मा = समरस झालेला, क्षयित-प्रपञ्चविभवः = प्रपंचाचे वैभव नष्ट करून घेतलेला, योगी = सेव्य शिवयोगी, जनैः = लोकांकडून, सेव्यते = पूजिला जातो.

**भावार्थ** : मी शिव आहे की नाही अशा संशयपाशातून मुक्त झालेला, परापर मुक्तिप्रद अशा शिवाद्वैतज्ञानात मन स्थिर झालेला, या घोर संसाराला मूळ कारणीभूत असे जीवाचे अज्ञान आपल्या कृपादृष्टीने नाहीसे करणारा, उपमातीत, सच्चिदानंदस्वरूप अशा परशिवात ज्याचा आत्मा लीन झाला आहे आणि सकल प्रपंचाचे वैभव ज्याच्या अध्यात्मशक्तीमध्ये विलीन झाले आहे, असा शिवयोगी सर्वजनांकडून सेवा घेण्यास योग्य अर्थात् पूज्य होतो.॥८६॥

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां***
***शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये***
***श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ***
***लिङ्गस्थलान्तर्गत प्रसादिस्थले कायानुग्रहादि-***
***नवविधस्थलप्रसङ्गो नाम सप्तदशः परिच्छेदः।***

**सतरावा परिच्छेद समाप्त.**

○○○

# अठरावा परिच्छेद

### लिंगस्थलांतर्गत

## प्राणलिंगीस्थल

**अगस्त्य उवाच—**

**प्रसादिस्थलसम्बद्धाः स्थलभेदाः प्रकीर्तिताः।**
**प्राणलिङ्गिस्थलारूढान् स्थलभेदान् वदस्व मे।।१।।**

**अन्वयार्थ** : प्रसादिस्थलसम्बद्धाः = प्रसादी स्थलाशी संबंध असणारी, स्थलभेदाः = अवांतर स्थले, प्रकीर्तिताः = सांगितलीत, प्राणलिङ्गिस्थलारूढान् = प्राणलिंगी स्थलात असणारी, स्थलभेदान् = अवांतर स्थले, मे = मला, वदस्व = सांगावीत.

**भावार्थ** : अगस्त्य प्रश्न करतात— हे रेणुका, आतापर्यंत प्रसादी-स्थलातील अवांतर स्थलभेदांचे वर्णन केलेत, आता प्राणलिंगी स्थलाचे अवांतर स्थलभेद मला सांगावेत.॥१॥

**श्रीरेणुक उवाच—**

**स्थलानां नवकं प्रोक्तं प्राणलिङ्गिस्थलाश्रितम्।**
**आदावात्मस्थलं प्रोक्तमन्तरात्मस्थलं ततः।।२।।**
**परमात्मस्थलं पश्चान्निर्देहागमसंज्ञितम्।**
**निर्भावागमसंज्ञं च ततो नष्टागमस्थलम्।।३।।**
**आदिप्रसादनामाथ ततोऽन्त्यप्रसादकम्।**
**सेव्यप्रसादकं चाथ शृणु तेषां च लक्षणम्।।४।।**

**अन्वयार्थ** : प्राणलिङ्गिस्थलाश्रितं = प्राणलिंगी स्थलात असणाऱ्या, स्थलानां = स्थलांचे, नवकं = नऊ प्रकार, प्रोक्तं = सांगितले आहेत, आदौ = पहिले, आत्मस्थलं = आत्मस्थल, ततः = त्यानंतर, अन्तरात्मस्थलं = अंतरात्मस्थल, प्रोक्तं = सांगितले आहे, पश्चात् = त्यानंतर, परमात्मस्थलं = परमात्मस्थल, च = आणि, निर्देहागमसंज्ञकं = निर्देहागमस्थल, च = आणि,

निर्भावागमस्थल, ततः = नंतर, नष्टागमस्थलम् = नष्टागमस्थल, अथ = त्यानंतर, आदिप्रसादनाम = आदिप्रसादिस्थल, ततः = नंतर, अन्त्यप्रसादकं = अंत्यप्रसादिस्थल, च = आणि, सेव्यप्रसादकं = सेव्यप्राप्तिस्थल, तेषां = त्यांची, लक्षणं = लक्षणे, शृणु = श्रवण कर.

**भावार्थ** : रेणुकाचार्य सांगतात— हे अगस्त्या, प्राणलिंगी स्थलात नऊ अवांतर स्थले आहेत. त्यांची नावे— १. आत्मस्थल, २. अंतरात्मस्थल, ३. परमात्मस्थल, ४. निर्देहागमस्थल, ५. निर्भावागमस्थल, ६. नष्टागमस्थल, ७. आदिप्रसादिस्थल, ८. अंत्यप्रसादिस्थल आणि ९. सेव्यप्रसादिस्थल. यांपैकी क्रमाने प्रत्येकाची लक्षणे सांगतो ती श्रवण कर.॥२-४॥

### आत्मस्थल - (७२)

**जीवभावं परित्यज्य यदा तत्त्वं विभाव्यते।**
**गुरोश्च बोधयोगेन तदात्मायं प्रकीर्तितः।।५।।**

**अन्वयार्थ** : अयं = हा सेव्यस्थली, गुरोः = गुरूच्या, बोधयोगेन = शिवज्ञानोपदेशामुळे, यदा = जेव्हा, जीवभावं = जीवभाव, परित्यज्य = सोडून, तत्त्वं = परतत्त्व, विभाव्यते = जाणतो, तदा = तेव्हा, आत्मा = आत्मा म्हणून, प्रकीर्तितः = ओळखला जातो.

**भावार्थ** : पूर्वोक्त सेव्यस्थलसंपन्न शिवयोगी, गुरूकडून उपदिष्ट शिवज्ञानामुळे आपल्या जीवभावाचा त्याग करून जेव्हा परब्रह्मभावाने वागतो, तेव्हा त्याला आत्मा या नावाने संबोधितात. म्हणजे त्याच्या ठिकाणचा जीवभाव नाहीसा होऊन आत्मभाव निर्माण होतो हे तात्पर्य.॥५॥

**वालाग्रशतभागेन सदृशो हृदयस्थितः।**
**अश्नन् कर्मफलं सर्वमात्मा स्फुरति दीपवत्।।६।।**

**अन्वयार्थ** : वालाग्रशतभागेन = केशाग्राच्या शतांश भागाच्या, सदृशः = समान, हृदयस्थितः = हृदयात राहणारा, आत्मा = जीवात्मा, सर्वं = सर्व प्रकारचे, कर्मफलं = आपल्या कर्माचे फळ, अश्नन् = उपभोगीत, दीपवत् = दीपासारखा, स्फुरति = प्रकाशित होतो.



**भावार्थ** : केसाच्या टोकाच्या शतांश भागाइतका सूक्ष्म असलेला जीवात्मा हृदयकमलात राहून आपण केलेल्या शुभाशुभ अशा सर्व कर्मांचे फल अनुभवीत दीपाप्रमाणे प्रकाशित असतो. दीप जसा घराच्या एका कोपऱ्यात असला तरी त्याचा प्रकाश सर्व घरभर पसरतो आणि त्यामुळे सर्व वस्तू प्रकाशित होतात, तशा प्रकारे हृदयस्थ असणाऱ्या आत्म्याचा ज्ञानप्रकाश शरीराच्या सर्व भागात व्याप्त होऊन सर्वांगीण सुखदुःखाचा तो अनुभव घेत असतो.॥६॥

**आत्मापि सर्वभूतानामन्तःकरणमाश्रितः।**
**अणुभूतो मलासङ्गादादिकर्मनियन्त्रितः।।७।।**

**अन्वयार्थ** : सर्वभूतानाम् = पंचमहाभूतांचे, आत्मापि = आश्रय असला तरी, मलासङ्गाद् = आणवादी मलांनी आवृत झाल्यामुळे, अणुभूतः = अणू होऊन, आदिकर्मनियन्त्रितः = प्राचीन कर्मरूपी पाशाने बद्ध होऊन, अन्तःकरण-माश्रितः = अंतःकरणाच्या आश्रयात असतो.

**भावार्थ** : हा आत्मा पंचमहाभूतांमध्ये व्यापक असल्यामुळे त्यांना आश्रयभूत असला तरी आणवादी मलत्रयांनी आवृत्त होऊन, आपल्या प्राचीन प्राक्तनकर्माच्या पाशांनी बद्ध होऊन अंतःकरणाच्या आश्रयाने राहातो.॥७॥

**जपायोगाद्यथा रागः स्फटिकस्य मणेर्भवेत्।**
**तथाऽहङ्कारसम्बन्धादात्मनो देहमानिता।।८।।**

**अन्वयार्थ** : जपायोगाद् = जास्वंदीच्या फुलाच्या संबंधाने, यथा = जसा, स्फटिकस्य मणेः = स्फटिकमणी, रागः = लाल, भवेत् = होतो, तथा = तसा, अहङ्कारसम्बन्धाद् = अहंकाराच्या संबंधामुळे, आत्मनः = आत्म्याला, देहमानिता = देहाभिमान प्राप्त होतो.

**भावार्थ** : स्वभावतः निर्मल असणारा स्फटिकमणी जसा जास्वंद-फुलाच्या सहवासात रक्तरंगी दिसतो स्वभावतः देहाभिमानी नसलेला आत्मा अहंकाराच्या संबंधाने देहाभिमानी दिसतो.॥८॥

**अशरीरोऽपि सर्वत्र व्यापकोऽपि निरञ्जनः।**
**आत्मा मायाशरीरस्थः परिभ्रमति संसृतौ।।९।।**

**अन्वयार्थ** : अशरीरोऽपि = शरीर नसलेला, सर्वत्र = सगळीकडे, व्यापकोऽपि = व्यापक असलेला, निरञ्जनः = दोषरहित असा, आत्मा = आत्मा, मायाशरीरस्थः = अधोमायाकल्पित शरीरात राहून, संसृतौ = संसारात, परिभ्रमति = भ्रमण करतो.

**भावार्थ** : आत्मा अशरीरी, निरंजन असून सुद्धा तो मायाकल्पित शरीराचा आश्रित होऊन संसारात परिभ्रमण करतो. याचेच अधिक स्पष्टीकरण असे- परापर मोक्षाला कारणीभूत असलेली शुद्ध विद्या हेच शरीर असलेल्या आत्म्याला स्थूल शरीर नसल्यामुळे, तो अपरिच्छिन्न, व्यापक दोषरहित आणि निरंजन असा आत्मा कलादिभूमिपर्यंत असणाऱ्या तीस तत्त्वांच्या उत्पत्तीला कारणीभूत अशी जी अधोमाया, तिच्याद्वारा कल्पित पंचज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये, चित्त, मन, अहंकार, विद्या, वाक् व शक्ती अशा सोळा कलांनी युक्त शरीर धारण करून संसारात परिभ्रमण करतो. म्हणजेच निर्दोष आत्म्याला वास्तविक शरीरसंबंध नसला तरी मायिक शरीरसंबंधाने तो संसारात देहधारी झालेला असतो.॥९॥

**आत्मस्वरूपविज्ञानं देहेन्द्रियविभागतः।**
**अखण्डब्रह्मरूपेण तदात्मप्राप्तिरुच्यते।।१०।।**

**अन्वयार्थ** : देहेन्द्रियविभागतः = शरीर आणि इंद्रियांपासून वेगळ्या, अखण्डब्रह्मरूपेण = अखंड ब्रह्मस्वरूपाने, आत्मस्वरूपविज्ञानं = आत्मस्वरूपाला जाणणे, तत् = तो, आत्मप्राप्तिः = आत्मप्राप्ती म्हणून, उच्यते = म्हटली जाते.

**भावार्थ** : आत्मतत्त्व प्रकृत शरीरेंद्रियादिकांपासून वेगळे आहे, अखंड ब्रह्मस्वरूप आहे, अशाप्रकारे जेव्हा आपल्या आत्मस्वरूपाचे ज्ञान जीवाला होते तेव्हा त्याला आत्मत्व प्राप्त होते. यालाच आत्मलाभ असेही म्हणतात.॥१०॥

**न चास्ति देहसम्बन्धो निर्देहस्य स्वभावतः।**
**अज्ञानकर्मयोगेन देही भवति भुक्तये।।११।।**



**अन्वयार्थ** : निर्देहस्य = निर्देही अशा आत्म्याला, स्वभावतः = परमार्थरूपाने, देहसम्बन्धः = शरीराचा संबंध, न चास्ति = नसतो, तरी सुद्धा, अज्ञानकर्मयोगेन = अज्ञान आणि आपल्या कर्मामुळे, भुक्तये = कर्मभोगासाठी, देही = शरीरधारी, भवति = होतो.

**भावार्थ** : अपरिच्छिन्न अशा परब्रह्माला स्वभावतः देहसंबंध नसला तरी सांसारिक सुखभोगासाठी अज्ञान आणि कर्मामुळे तो देहधारी होतो.॥११॥

**नासौ देवो न गन्धर्वो न यक्षो नैव राक्षसः।**
**न मनुष्यो न तिर्यक्च न च स्थावरविग्रहः।।१२।।**

**अन्वयार्थ** : असौ = हा जीव, न देवः = देव नव्हे, न गन्धर्वः = गंधर्व नव्हे, न यक्षः = यक्ष नव्हे, नैव राक्षसः = राक्षसही नव्हे, न मनुष्यः = मनुष्य नव्हे, न तिर्यक्च = तिर्यक प्राणीही नव्हे, न च स्थावरविग्रहः = आणि स्थावर वस्तूही नाही.

**भावार्थ** : जीव देव नव्हे, गंधर्व नव्हे, यक्ष नव्हे, राक्षस नव्हे, खेकड्यासारखा तिर्यक प्राणी नव्हे आणि दगड, लाकूड इत्यादी सारखा स्थावर वस्तूही नव्हे. म्हणून तो ज्या ज्या देहाचे धारण करतो त्या त्या नावाने तो ओळखला जातो. वस्तुतः त्याला स्वतःचे कोणतेही नाव नाही.॥१२॥

**नानाकर्मविपाकाश्च नानायोनिसमाश्रिताः।**
**नानायोगसमापन्नाः नानाबुद्धिविचेष्टिताः।।१३।।**
**नानामार्गसमारूढाः नानासङ्कल्पकारिणः।**
**अस्वतन्त्राश्च किञ्चिज्ञाः किञ्चित्कर्तृत्वहेतवः।।१४।।**
**लीलाभाजनतां प्राप्ताः शिवस्य परमात्मनः।**

**अन्वयार्थ** : नानाकर्मविपाकाः = आपल्या नानाप्रकारच्या कर्मांच्या विपाकामुळे, नानायोनिसमाश्रिताः = देवमानवादी नाना योनींत आश्रय घेऊन, नानायोगसमापन्नाः = नानाविध भोगांचे उपाय चिंतिणारे, नानाबुद्धिविचेष्टिताः = नाना प्रकाराच्या बुद्धीने व्यवहार करणारे, नानामार्गसमारूढाः = वैष्णवादी विभिन्न मार्गाने चालणारे, नानासङ्कल्पकारिणः = अनेक प्रकारचे संकल्प करणारे, अस्वतन्त्राः = पराधीन, किञ्चिज्ज्ञाः = अल्पज्ञानी, किञ्चित्कर्तृत्वहेतवः = किंचित

कर्तृत्वाला कारणीभूत असणारे जीव, परमात्मनः = श्रेष्ठ आत्मा अशा, शिवस्य = शिवाच्या, लीलाभाजनतां = क्रीडेचे पदार्थ, प्राप्ताः = होतात.

**भावार्थ** : हे जीव नानाविध अशा पूर्वकर्मांच्या परिपाकाने देव, तिर्यक मनुष्य अशा नाना योनींत जन्म घेऊन नानाविध अशी स्वर्गादी स्थाने प्राप्त करून घेण्यासाठी अनेक साधने वापरून नाना प्रकारच्या बुद्धीने शैववैष्णवादी मतमार्गांत प्रवर्तित होऊन, अनेक प्रकारच्या आकांक्षा बाळगून, अल्पज्ञ होऊन, स्वातंत्र्य नसलेले होऊन, अल्प कर्तृत्वाचे होऊन जगन्नाटकाचा सूत्रधार असलेल्या शिवाच्या लीलेचे साधनभूत असे पदार्थ झालेले असतात.॥१३-१४॥

**चोदिता परमेशेन स्वस्वकर्मानुरूपतः।।१५।।**
**स्वर्गं वा नरकं वापि प्राणिनो यान्ति कर्मिणः।**

**अन्वयार्थ** : परमेशेन = परमात्म्याकडून, स्वस्वकर्मानुरूपतः = आपापल्या कर्मानुसार, चोदिताः = प्रेरित झालेले, कर्मिणः = कर्मी, प्राणिनः = जीव, स्वर्गं = स्वर्गाला, वा = अथवा, नरकं = नरकाला, यान्ति = जातात.

**भावार्थ** : आपापल्या कर्मानुसार व परमेश्वराच्या प्रेरणेने कर्मी जीवांना स्वर्ग अथवा नरकाची प्राप्ती होते.॥१५॥

**पुनः कर्मावशेषेण जायन्ते गर्भकोटरात्।।१६।।**
**जाता मृताः पुनर्जाताः पुनर्मरणभाजिनः।**
**भ्रमन्ति घोरसंसारे विश्रान्तिकथया विना।।१७।।**

**अन्वयार्थ** : कर्मावशेषेण = भोगाने अवशिष्ट असलेल्या कर्मामुळे, पुनः = पुन्हा, गर्भकोटरात् = गर्भातून, जायन्ते = जन्म घेतात, जाताः = जन्मलेले, मृताः = मरण पावतात, पुनर्जाताः = पुन्हा जन्मलेले, पुनर्मरणभाजिनः = पुन्हा मरण पावतात, घोरसंसारे = भयानक अशा संसारात, विश्रान्तिकथया विना = विश्रांतीविना, भ्रमन्ति = भ्रमण करतात.

**भावार्थ** : हे जीव स्वर्गात अथवा नरकात आपापल्या कर्मांची फले भोगून झाल्यानंतर अवशिष्ट कर्माने ते पुन्हा जन्माला येतात, पुन्हा मरतात, पुन्हा जन्मतात. अशा रीतीने विश्रांती न घेता पुनःपुन्हा या घोर संसारात भ्रमण करीत असतात.॥१६-१७॥



**जीवत्वं दुःखसर्वस्वं तदिदं मलकल्पितम्।**
**निरस्यते गुरोर्बोधाज्ज्ञानशक्तिः प्रकाशते।।१८।।**

**अन्वयार्थ** : मलकल्पितम् = आणवादी मलांमुळे प्राप्त झालेल्या, तदिदं = हा, जीवत्वं = जीवभाव, दुःखसर्वस्वं = दुःखस्वरूप आहे, गुरोः = गुरूच्या, बोधात् = उपदेशाने, निरस्यते = दूर केला जातो, आणि, ज्ञानशक्तिः = ज्ञान, प्रकाशते = प्राप्त होते.

**भावार्थ** : जीवाला प्राप्त झालेले दुःखसर्वस्व असे हे जीवत्व आणवादि मलत्रयांनी युक्त कल्पिलेले आहे. गुरूकडून उपदेश प्राप्त झालेल्या शिवाद्वैतज्ञानामुळे ह्या जीवत्वाची निवृत्ती होते आणि स्व-स्वरूप ज्ञानशक्ती प्रकाशित होते.॥१८॥

### अन्तरात्मस्थल - (७३)

**यदा निरस्तं जीवत्वं भवेद् गुर्वनुबोधतः।**
**तदान्तरात्मभावोऽपि निरस्तस्य भवेद् ध्रुवम्।।१९।।**

**अन्वयार्थ** : गुर्वनुबोधतः = गुरूपदेशाने, यदा = जेव्हा, जीवत्वं = जीवभाव, निरस्तं भवेत् = दूर होतो, तदा = तेव्हा, निरस्तस्य = जीवभाव निरस्त झालेल्याला, आन्तरात्मभावोऽपि = अंतरात्मभावही, ध्रुवं = निश्चितपणे, भवेत् = होतो.

**भावार्थ** : गुरूच्या उपदेशाने जेव्हा जीव जीवभावापासून निवृत्त होतो तेव्हा त्या जीवभावरहित जीवाला निश्चितपणे अंतरात्मभाव प्राप्त होतो.॥१९॥

**देहस्थितोऽप्ययं जीवो देहसङ्गविवर्जितः।**
**बोधात् परात्मभावित्वादन्तरात्मेति कीर्तितः।।२०।।**

**अन्वयार्थ** : अयं = हा, जीवः = जीवात्मा, देहस्थितोऽपि = शरीरात राहिला तरी, देहसङ्गविवर्जितः = देहसंगरहित होऊन, बोधात् = स्वस्वरूपज्ञाना-मुळे, परात्मभावित्वाद् = परमात्मभावनेने युक्त असल्याने, अन्तरात्मेति = अंतरात्मा म्हणून, कीर्तितः = ओळखला जातो.

**भावार्थ** : हा जीव देहात असला तरी देहसंगरहित होऊन स्वस्वरूप-ज्ञानाने अंतरात्मभाव प्राप्त करून घेतो. त्यामुळे तो अंतरात्मा म्हणून ओळखला जातो.॥२०॥

**आत्मान्तरालवर्तित्वाज्जीवात्मपरमात्मनोः।**
**योगादुभयधर्माणामन्तरात्मेति कीर्तितः।।२१।।**

**अन्वयार्थ** : आत्मा = जीवभाव नाहीसा झालेला हा आत्मा, जीवात्म-परमात्मनोः = जीवात्मा आणि परमात्मा ह्या दोघांच्या, अन्तरालवर्तित्वात् = मध्यस्थानी असल्याने, उभयधर्माणां = उभय धर्मांच्या, योगाद् = संबंधामुळे, अन्तरात्मेति = अंतरात्मा म्हणून, कीर्तितः = म्हटला जातो.

**भावार्थ** : हा आत्मा जीवात्मा आणि परमात्मा या दोघांच्या मध्यावस्थेत असतो म्हणून याला अंतरात्मा असे म्हणतात. देहस्थ असल्यामुळे आहार-व्यवहाराच्या संबंधाने त्याच्या ठिकाणी जीवधर्म असतो. तसेच तो गुरूपदेशा-मुळे स्वस्वरूपानुसंधानतत्पर झाला असल्याने शिवधर्मही त्याच्या ठिकाणी असतो. अशा रीतीने जीव आणि शिव या दोहोंच्या धर्मसंबंधाने तो मध्यावर असल्यामुळे त्याला अंतरात्मा असे म्हणतात.॥२१॥

**अहङ्कारस्य सम्बन्धान्मनुष्यत्वादिविभ्रमः।**
**न स्वभाव इति ज्ञानादन्तरात्मेति कथ्यते।।२२।।**

**अन्वयार्थ** : अहङ्कारस्य = परिच्छिन्न अहंकाराच्या, सम्बन्धात् = संबंधाने, मनुष्यत्वादिविभ्रमः = मनुष्यत्वादीचा भ्रम होतो, न स्वभावः = स्वभावतः नाही, इति = अशा रीतीच्या, ज्ञानाद् = ज्ञानामुळे, अन्तरात्मेति = अंतरात्मा म्हणून, कथ्यते = म्हणविला जातो.

**भावार्थ** : परिच्छिन्न अशा मूल अहंकाराच्या संबंधाने मी मनुष्य आहे, पशू आहे, पक्षी आहे अशी जाणीव भ्रांतियुक्त असते, वास्तविक नसते. असे ज्ञान प्राप्त झाल्यामुळे हा जीव अंतरात्मा म्हणविला जातो.॥२२॥

**यथा पद्मपलाशस्य न सङ्गो वारिणा भवेत्।**
**तथा देहजुषोऽप्यस्य न शरीरेण सङ्गतिः।।२३।।**



**नीडस्थितो यथा पक्षी नीडाद्भिन्नः प्रदृश्यते।**
**देहस्थितस्तथात्मायं देहादन्यः प्रकाश्यते।।२४।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, पद्मपलाशस्य = कमलपत्राचा, वारिणा = पाण्याशी, सङ्गः = संपर्क, न भवेत् = होत नाही, तथा = तसे, देहजुषोऽपि = शरीरधारी असला तरी, अस्य = ह्याचा, शरीरेण = शरीराशी, न सङ्गतिः = संग होत नाही, यथा = जसे, नीडस्थितः = घरट्यात असलेला, पक्षी = पक्षी, नीडाद्भिन्नः = घरट्यातून निराळा, प्रदृश्यते = दिसतो, तथा = तसे, देहस्थितः = देहात राहाणारा, अयं = हा, आत्मा = अंतरात्मा, देहादन्यः = शरीराहून भिन्न, प्रकाश्यते = प्रकाशित होतो.

**भावार्थ** : कमल पाण्यात असेल तरी त्याला जसा पाण्याचा संग घडत नाही, तशा रीतीने हा अंतरात्मा देहात असला तरी देहसंबंधरहित असतो. घरट्यात असलेला पक्षी जसा त्या घरट्यापेक्षा निराळा असतो तसा देहस्थ असलेला हा अंतरात्माही निराळा असतो.॥२३-२४॥

**आच्छाद्यते यथा चन्द्रो मेघैरासङ्गवर्जितैः।**
**तथात्मा देहसङ्घातैरसङ्गपरिवेष्टितः।।२५।।**

**अन्वयार्थ** : चन्द्रः = चंद्रमा, यथा = जसा, आसङ्गवर्जितैः = संग नसलेल्या, मेघैः = मेघांनी, आच्छाद्यते = आच्छादित होतो, तथा = तसा, आत्मा = हा अंतरात्मा, देहसङ्घातैः = स्थूलादिशरीरसमूहांनी, असङ्गः = संबंध नसून, परिवेष्टितः = आवृत झालेला असतो.

**भावार्थ** : आकाशातील चंद्रमा मेघांचा स्पर्श न होताही तो जसा मेघाने आच्छादित झालेला दिसतो, तसा जीवभाव नाहीसा झालेला अंतरात्माही स्थूलदेहादी संबंधरहित असूनही देहावरणात असतो.॥२५॥

**निर्ममो निरहङ्कारो निरस्तोपाधिविक्लवः।**
**देहस्थोऽपि सदा ह्यात्मा शिवं पश्यति योगतः।।२६।।**

**अन्वयार्थ** : निर्ममः = ममकाररहित, निरहङ्कारः = अहंकाररहित, निरस्तो-पाधिविक्लवः = शरीरादी उपाधिबाधारहित, आत्मा = हा अंतरात्मा, देहस्थोऽपि =

शरीरात असला तरी, हि = निश्चयाने, योगतः = योगसामर्थ्याने, सदा = नेहमी, शिवं = शिवाला, पश्यति = पाहतो.

**भावार्थ** : अहंकार-ममकाररहित असा शरीरादी उपाधीच्या बाधा दूर केलेला हा अंतरात्मा सदा देहात असला तरी योगसाधनेद्वारा त्याचे लक्ष नेहमी शिवाकडे असते.॥२६॥

**भोक्तृभोज्यपरित्यागात् प्रेरकस्य प्रसादतः।**
**भोक्तृताभावगलितः स्फुरत्यात्मा स्वभावतः।।२७।।**

**अन्वयार्थ** : भोक्तृ = भोक्ता अशा जीवाकडून, भोज्यपरित्यागात् = भोज्य अशा विषयांचा त्याग झाल्याने, प्रेरकस्य = प्रेरक अशा ईश्वराच्या, प्रसादतः = अनुग्रहाने, भोक्तृताभावगलितः = भोक्ता असा जीवभाव नाहीसा होऊन, आत्मा = अंतरात्मा, स्वभावतः = आत्मत्वस्वरूपाने, स्फुरति = प्रकाशित होतो.

**भावार्थ** : भोक्ता असा जीव भोज्य अशा विषयांचा त्याग केल्यामुळे प्रेरक अशा परमेश्वराच्या अनुग्रहाने भोक्तारूप जीवभावापासून मुक्त होऊन स्वभावतः आत्मस्वरूपाने प्रकाशतो.॥२७॥

**सर्वेषां प्रेरकत्वेन शम्भुरन्तःस्थितः सदा।**
**तत्परिज्ञानयोगेन योगी नन्दति मुक्तवत्।।२८।।**

**अन्वयार्थ** : शम्भुः = शिव, सर्वेषां = सर्वांच्या, प्रेरकत्वेन = प्रेरकरूपाने, सदा = नेहमी, अन्तःस्थितः = हृदयात असतो, तत्परिज्ञानयोगेन = त्याचे ज्ञान झाल्यामुळे, योगी = हा शिवयोगी, मुक्तवत् = मुक्तात्म्यासारखा, नन्दति = आनंदित होतो.

**भावार्थ** : परमात्मा सर्वांच्या हृदयात प्रेरक होऊन निवास करतो, अशा या परशिवज्ञानयोगाने योगी पुरुष मुक्तात्म्यासारखा आनंद उपभोगतो.॥२८॥

### परमात्मस्थल - (७४)

**निर्धूते तत्प्रबोधेन मले संसारकारणे।**
**सामरस्यात् परात्मस्थात् परमात्मायमुच्यते।।२९।।**



**अन्वयार्थ** : संसारकारणे = जननमरणरूप संसाराला कारण असलेले, मले = अज्ञान, तत्प्रबोधेन = शिवाद्वैतज्ञानाने, निर्धूते = नाहीसे झाल्यावर, परात्मस्थात् = परमात्म्याबरोबर असलेल्या, सामरस्यात् = सामरस्याने, अयं = हा अन्तरात्मा, परमात्मा = परमात्मा म्हणून, उच्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : संसाराला कारणीभूत असणारे अज्ञान शिवाद्वैतज्ञानाने नष्ट झाल्यामुळे व परमात्म्याशी सामरस्यभाव प्राप्त झाल्याने हा अंतरात्मा म्हणविला जातो.॥२९॥

**सर्वेषामात्मभेदानामुत्कृष्टत्वात् स्वतेजसा।**
**परमात्मा शिवः प्रोक्तः सर्वगोऽपि प्रकाशवान्।।३०।।**

**अन्वयार्थ** : स्वतेजसा = आपल्या तेजाने, सर्वगोऽपि सर्वत्र व्यापक असूनही, प्रकाशवान् = प्रकाशित होणारा, शिवः = शिव, सर्वेषां = सर्व, आत्मभेदानां = भिन्न भिन्न आत्म्यापेक्षा, उत्कृष्टत्वात् = श्रेष्ठ असल्यामुळे, परमात्मा = परमात्मा म्हणून, प्रोक्तः = म्हटला जातो.

**भावार्थ** : स्वयंप्रकाशवान असणारा शिव आपल्या तेजाने सर्वत्र व्यापक असून तो सर्व आत्म्याहून श्रेष्ठ असल्यामुळे त्याला परमात्मा म्हणतात.॥३०॥

**ब्रह्माण्डबुद्बुदस्तोमा यस्य मायामहोदधौ।**
**उन्मज्जन्ति निमज्जन्ति परमात्मा स उच्यते।।३१।।**

**अन्वयार्थ** : यस्य = ज्याच्या, मायामहोदधौ = मायारूपी समुद्रात, ब्रह्माण्डबुद्बुदस्तोमाः = ब्रह्मांडरूपी बुडबुड्यांचे समूह, उन्मज्जन्ति = उत्पन्न होतात, आणि निमज्जन्ति = विलय पावतात, सः = तो, परमात्मा = परमात्मा म्हणून, उच्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : ज्याच्या मायारूपी महासमुद्रात ब्रह्मांडरूपी बुडबुड्यांचे समूह उत्पन्न होतात आणि विलय पावतात, त्याला परमात्मा असे म्हणतात. म्हणजेच प्रपंचाच्या उत्पत्ती, स्थिती आणि लयाला कारणीभूत असणारा शिवच परमात्मा होय.॥३१॥

**यस्मिन् ज्योतिर्गणाः सर्वे स्फुलिङ्गा इव पावकात्।**
**उत्पत्य विलयं यान्ति तद्रूपं परमात्मनः।।३२।।**

**अन्वयार्थ** : यस्मिन् = ज्यामध्ये, सर्वे = सर्व, ज्योतिर्गणाः = जीवरूपी तेजांचे समूह, पावकात् = अग्नीपासून, स्फुलिङ्गा इव = ठिणग्यांप्रमाणे, उत्पत्य = उत्पन्न होऊन, विलयं यान्ति = विलय पावतात, तत् = ते, परमात्मनः = परमात्म्याचे, रूपं = स्वरूप होय.

**भावार्थ** : अग्नीपासून जसे स्फुलिंग प्रादुर्भूत होतात आणि विलयही पावतात, तसे ज्योतिस्वरूप जीव त्या परमात्म्यापासून उद्भवतात आणि त्याच्यातच लय पावतात. असे त्या परमात्म्याचे स्वरूप आहे.॥३२॥

**यस्मिन् समस्तवस्तूनि कल्लोला इव वारिधौ।**
**सम्भूय लयमायान्ति तद्रूपं परमात्मनः।।३३।।**

**अन्वयार्थ** : यस्मिन् = ज्यामध्ये, समस्तवस्तूनि = भूम्यादी समस्त तत्त्वे, वारिधौ = समुद्रात, कल्लोला इव = मोठमोठ्या लाटांप्रमाणे, सम्भूय = उत्पन्न होऊन, लयमायान्ति = विलय पावतात, तत् = ते, परमात्मनः = परमात्म्याचे, रूपं = स्वरूप होय.

**भावार्थ** : समुद्रात जशा मोठमोठ्या लाटा उत्पन्न होतात आणि लय पावतात. तशा प्रकारे भूम्यादी सर्व तत्त्वे ज्याच्या ठिकाणी उत्पन्न होऊन पुन्हा विलय पावतात त्याला परमात्मा म्हणतात.॥३३॥

**निरस्तमलसम्बन्धं निःशेषजगदात्मकम्।**
**सर्वतत्त्वोपरि प्रोक्तं स्वरूपं परमात्मनः।।३४।।**

**अन्वयार्थ** : निरस्तमलसम्बन्धं = आणवादी मलांचा संबंध नसलेला, निःशेष-जगदात्मकम् = चराचर प्रपंचाला जीवनभूत अशा, परमात्मनः = परमात्म्याचे, स्वरूपं = स्वरूप, सर्वतत्त्वोपरि = भूम्यादी छत्तीस तत्त्वांहून श्रेष्ठ असे, प्रोक्तं = म्हटले जाते.

**भावार्थ** : त्रिमलसंबंधरहित, नामरूपात्मक सर्व जगाला जीवनभूत असणारा, भूम्यादी शिवापर्यन्त छत्तीस तत्त्वांपेक्षा श्रेष्ठ असा तो परमात्मा आहे.॥३४॥



**यथा व्याप्य जगत्सर्वं स्वभासा भाति भास्करः।**
**तथा स्वशक्तिभिर्व्याप्य परमात्मा प्रकाशते।।३५।।**

**अन्वयार्थ** : भास्करः = सूर्य, यथा = जसा, स्वभासा = आपल्या तेजाने, सर्वं = संपूर्ण, जगत् = जगाला, व्याप्य = व्यापून, भाति = प्रकाशित होतो, तथा = तसा, परमात्मा = परमात्मा, स्वशक्तिभिः = आपल्या शक्तींनी, व्याप्य = विश्वाला व्यापून, प्रकाशते = प्रकाशित होतो.

**भावार्थ** : सूर्य आपल्या तेजाने सर्व जगाला व्यापून जसा प्रकाशतो तसा परमात्मा धूमवती इत्यादी शक्तींनी जगभर व्यापून प्रकाशतो. कसा? तर, तो शिव आपल्या धूमवती शक्तीने पृथ्वीमध्ये, ल्हाद नावाच्या पालन शक्तीने जलामध्ये, भास्वती नावाच्या सृष्टिशक्तीने अग्नीमध्ये, स्पंद नावाच्या संहारशक्तीने वायूमध्ये आणि विभ्वी नावाच्या अनुग्रहशक्तीने आकाशामध्ये, अशा आपल्या पंचशक्तींनी पंचभूतात्मक प्रपंचात व्यापून प्रकाशित होतो. आपल्या तेजाने सर्व जगाला प्रकाशित करणारा सूर्य पदार्थांशी अभिन्न नाही. त्यांच्यात भेद आहे. परंतु शिव आणि प्रपंचाचे तसे नाही. कारण भूम्यादितत्त्वे शिवाची शक्तिरूपे असल्याने ती त्याच्याशी अभिन्न आहेत.॥३५॥

**विश्वतो भासमानोऽपि विश्वमायाविलक्षणः।**
**परमात्मा स्वयंज्योतीरूपो जीवात्मनां भवेत्।।३६।।**

**अन्वयार्थ** : परमात्मा = परमात्मा, विश्वतः = संपूर्ण विश्वामध्ये, भासमानोऽपि = प्रकाशित होत असला तरी, विश्वमायाविलक्षणः = विश्वाचे षड्भावविकाररहित होऊन संसारविषयी हेयबुद्धी उत्पन्न झालेल्या, जीवात्मनां = जीवात्म्यांना, स्वयंज्योतिरूपः = स्वयंप्रकाशरूप, भवेत् = होतो.

**भावार्थ** : परमात्मा विश्वात चहूकडे प्रकाशित होत असला तरी तो विश्वाला उपादान कारणीभूत अशा मायेपेक्षा विलक्षण असून आकाशाप्रमाणे विश्वात अस्ति, जायते, वर्धते, विपरिणमते, अपक्षीयते, विनश्यतिया षड्भाव विकार दोषांनी विरहित होऊन, संसाराविषयी हेयबुद्धी उत्पन्न झालेल्या जीवांच्या बुद्धीला सच्चिदानंदस्वरूपाने प्रकाश देत राहतो.॥३६॥

**निर्देहागमस्थल - (७५)**

**देहिनोऽपि परात्मत्वभाविनो निरहङ्कृतेः।**
**निरस्तदेहधर्मस्य निर्देहागम उच्यते।।३७।।**

**अन्वयार्थ** : निरहङ्कृतेः = अहंकाररहित, परात्मत्वभाविनः = परमात्म-भावनेने युक्त, निरस्तदेहधर्मस्य = शरीराचा स्थूलत्वादी धर्माभिमान नसलेला योगी, देहिनोऽपि = शरीरधारी असला तरी, त्याची स्थिती निर्देहागमः = निर्देहागम, अशी उच्यते = सांगितली जाते.

**भावार्थ** : अहंकार-ममकारशून्य होऊन परमात्मभाव प्राप्त करून घेतलेले शिवयोगी, स्थूलादी देहधर्माचा त्याग केल्यामुळे देहधारी असले तरी त्यांना निर्देहस्थिती प्राप्त होते म्हणून याला निर्देहागम असे म्हणतात.।।३७।।

**गलिते ममताहन्ते संसारभ्रमकारणे।**
**पराहन्तां प्रविष्टस्य कुतो देहः कुतो रतिः।।३८।।**

**अन्वयार्थ** : संसारभ्रमकारणे = संसारभ्रांतीला कारण असणारे, ममताहन्ते = अहंकार आणि ममता, गलिते = नष्ट झालेले, पराहन्तां = पर अहंभावामध्ये, प्रविष्टस्य = प्रवेश झालेल्याला, कुतो देहः = शरीर कुठले?, कुतो रतिः = त्यावरील प्रीती कुठली?

**भावार्थ** : संसाराच्या भ्रमाला कारणीभूत अशा अहंकार-ममकारांचा नाश होऊन पराहंता प्राप्त करून घेतलेल्या शिवयोग्याला देह कसला आणि त्याच्यावरील प्रेम तरी कोठून असणार? अर्थात् त्याला शरीराचा अभिमान नसतो म्हणून त्याविषयी प्रेमही नसते.।।३८।।

**केवले निष्प्रपञ्चौघे गम्भीरे चिन्महोदधौ।**
**निमग्नमानसो योगी कथं देहं विचिन्तयेत्।।३९।।**

**अन्वयार्थ** : निष्प्रपञ्चौघे = चराचर प्रपंचाचा समूह निवृत्त झालेला, गम्भीरे = गंभीर, केवले = केवल, चिन्महोदधौ = चिद्रूपसमुद्रात, निमग्न-मानसः = निमग्न चित्ताचा, योगी = शिवयोगी, देहं = शरीराबद्दल, कथं = कसा, विचिन्तयेत् = चिंता करील?



**भावार्थ** : केवल, निष्प्रपंच आणि गंभीर अशा चैतन्यरूपी समुद्रात ज्याचे मन पूर्णपणे निमग्न झालेले आहे, असा शिवयोगी शरीराची चिंता कसा करील? अर्थात् करीत नाही.।।३९।।

**अपरिच्छेद्यमात्मानं चिदम्बरमिति स्मरन्।**
**देहयोगेऽपि देहस्थैर्विकारैर्न विलिप्यते।।४०।।**

**अन्वयार्थ** : आत्मानं = आपल्या आत्म्याला, अपरिच्छेद्यं = परिच्छिन्न नसलेला, चिदम्बरमिति = चिद्रूप आकाश असे, स्मरन् = स्मरण करणारा योगी, देहयोगेऽपि = देहाचा संबंध असला तरी, देहस्थैः = शरीराच्या, विकारैः = विकारांपासून, न विलिप्यते = लिप्त होत नाही.

**भावार्थ** : आपला आत्मा अपरिच्छिन्न असा चिदाकाशरूप आहे, असे चिंतन करणारा शिवयोगी देहधारी असला तरी तो देहाच्या इंद्रियविकारांनी लिप्त होत नाही.।।४०।।

**अखण्डसंविदाकारमद्वितीयं सुखात्मकम्।**
**परमाकाशमात्मानं मन्वानः कुत्र मुह्यति।।४१।।**

**अन्वयार्थ** : आत्मानं = आपल्या आत्म्याला, अखण्डसंविदाकारम् = अखंड-ज्ञानस्वरूप, अद्वितीयं = द्वैतरहित, सुखात्मकं = आनंदस्वरूप, असे परमाकाशं = परमात्मास्वरूप, मन्वानः = जाणणारा शिवयोगी, कुत्र = कोठे, मुह्यति = मोहित होईल?

**भावार्थ** : आपला आत्मा अखंड, अद्वितीय, चिदानंदस्वरूप असा पराकाशरूप आहे, असे जाणणारा तो शिवयोगी कशाने मोहित होईल? आपल्यापेक्षा दुसरी वस्तूच नसल्याचे तो जाणत असल्यामुळे वस्तुप्राप्तीसाठी होणारा मोह त्याच्या ठिकाणी नसतो.।।४१।।

**उपाधिविहिता भेदा दृश्यन्ते चैकवस्तुनि।**
**इति यस्य मतिः सोऽयं कथं देहमितो भवेत्।।४२।।**

**अन्वयार्थ** : एकवस्तुनि = एका वस्तूमध्ये, उपाधिविहिताः = उपाधीमुळे, भेदाः = भेद, दृश्यन्ते = दिसतात, इति = अशा रीतीने, यस्य = ज्याची, मतिः = बुद्धी आहे, सोऽयं = तो हा, देहमितः = परिमित देहाचा, कथं भवेत् = कसा होईल?

**भावार्थ** : आकाश अखंड असले तरी ते जसे घटादी उपाधीमुळे घटाकाश, मठाकाश अशा परिच्छिन्नतेला कारण होते, तसे अखंड चिदाकाशच देहादी उपाधीमुळे भिन्न भिन्न व्यवहाराला होते, असे जाणणारा शिवयोगी परिच्छिन्न देहधारी कसा होईल?॥४२॥

**भेदबुद्धिः समस्तानां परिच्छेदस्य कारणम्।**
**अभेदबुद्धौ जातायां परिच्छेदस्य का कथा।।४३।।**

**अन्वयार्थ** : भेदबुद्धिः = भेदबुद्धी, समस्तानां = सर्वांच्या, परिच्छेदस्य = परिच्छिन्नतेचे, कारणम् = कारण होते, अभेदबुद्धौ = अभेद बुद्धी, जातायां = उत्पन्न झाल्यावर, परिच्छेदस्य = परिच्छिन्नतेची, का कथा = काय कथा?

**भावार्थ** : घटाकाश, मठाकाश असा भेदव्यवहार केवळ औपाधिक असतो. तो वास्तविक नाही असे ज्ञान झाल्यावर, चराचर प्रपंच परमात्म्यापेक्षा भिन्न असलेला दिसत असला तरी केवळ मायेच्या प्रभावाने दिसणारा हा भेद खरा नाही अशी अद्वैतबुद्धी जेव्हा निर्माण होते, तेव्हा द्वैतभावनेची वार्ता कुठे असणार? अर्थात् द्वैतभावना उरत नाही.॥४३॥

**शिवोऽहमिति यस्यास्ति भावना सर्वगामिनी।**
**तस्य देहेन सम्बन्धः कथं स्यादमितात्मनः।।४४।।**

**अन्वयार्थ** : शिवोऽहं = मी शिवस्वरूप आहे, इति = असे, यस्य = ज्याची, सर्वगामिनी = सर्वव्यापक, भावना = शिवाद्वैतभावना, अस्ति = आहे, अमितात्मनः = अपरिमित स्वरूपाच्या, तस्य = त्याचा, देहेन = शरीराशी, सम्बन्धः = संबंध, कथं = कसा होईल?

**भावार्थ** : मी शिवच आहे, शिवापेक्षा भिन्न वस्तू कोणतीही नाही अशी व्यापक शिवाद्वैतभावना ज्या शिवयोग्याची असते, त्या अखंड परमात्मस्वरूप शिवयोग्याला परिच्छिन्न देहधर्माचे विकार कसे असतील? अर्थात् त्याला देहसंबंध आणि देहाचे विकारही नसतात.॥४४॥



## निर्भावागमस्थल - (७६)

**व्यतिरेकात्स्वरूपस्य भावान्तरनिराकृतेः।**
**भावो विकारनिर्मुक्तो निर्भावागम उच्यते।।४५।।**

**अन्वयार्थ** : स्वरूपस्य = आपल्या निर्देह स्वरूपापेक्षा, व्यतिरेकात् = भिन्न अशा, भावान्तरनिराकृतेः = दुसऱ्या भावनेचे निराकरण केल्यामुळे, विकार-निर्मुक्तः = विकाररहित, भावः = भावना, निर्भावागमः = निर्भावागम म्हणून, उच्यते = म्हटली जाते.

**भावार्थ** : आपल्या स्वरूपाखेरीज अन्य भावांचे निराकरण करून इंद्रियविकाररहित अशा मनोभावनेला निर्भावागम असे म्हणतात.॥४५॥

**अहं ब्रह्मेति भावस्य वस्तुद्वयसमाश्रयः।**
**एकीभूतस्य चिद्व्योम्नि तदभावो विनिश्चितः।।४६।।**

**अन्वयार्थ** : अहं ब्रह्मेति = मी ब्रह्म आहे अशा, भावस्य = भावनेला, वस्तुद्वयसमाश्रयः = दोन वस्तूंची अपेक्षा असते, चिद्व्योम्नि = चिदाकाशात, एकीभूतस्य = समरस झाल्यावर, तदभावः = त्या दोन वस्तूंचा अभाव, विनिश्चितः = निश्चितच होतो.

**भावार्थ** : अहंब्रह्मास्मि अर्थात् मी ब्रह्म आहे, या भावनेत अहम् आणि ब्रह्म या वस्तुद्वयांची अपेक्षा असते. परंतु चिदाकाशरूप परब्रह्मात समरस झालेल्याला मी आणि ब्रह्म या दोन्ही वस्तू उरत नाहीत. म्हणून त्या अवस्थेला निर्भाव असे म्हणतात.॥४६॥

**एकभावनिरूढस्य निष्कलङ्के चिदम्बरे।**
**क्व जातिवासनायोगः क्व देहित्वं परिभ्रमः।।४७।।**

**अन्वयार्थ** : निष्कलङ्के = कलंकरहित, चिदम्बरे = चिदाकाशात, एकभाव-निरूढस्य = तादात्म्यभावाने युक्त शिवयोग्याला, जातिवासनायोगः = वर्णाश्रम वासनांचा संबंध, क्व = कोठून असणार?, देहित्वं = शरीरभाव, क्व = कोठला?, परिभ्रमः = संसारचक्रातील भ्रमण तरी कोठले?

**भावार्थ** : निरंजन अशा चिदाकाशात तादात्म्याने एकरूप झालेल्या शिवयोग्याला जातिवर्णाश्रमसंबंध, शरीरसंबंध आणि संसारचक्रातील परिभ्रमण कोठून असणार? अर्थात् या सर्वांपासून तो अलिप्त असतो.॥४७॥

**शून्ये चिदम्बरे स्थाने दूरे वाङ्मानसाध्वनः।**
**विलीनात्मा महायोगी केन किं वापि भावयेत्।।४८।।**

**अन्वयार्थ** : वाङ्मनसाध्वनः = वाणी आणि मनाच्या मार्गापासून, दूरे = दूर असलेला, शून्ये = आकाररहित, चिदम्बरे स्थाने = चिदाकाश स्थानात, विलीनात्मा = तादात्म्य पावलेला, महायोगी = शिवयोगी, केन = कशा रीतीने, किं वापि = कोणत्या वस्तूची, भावयेत् = भावना करील?

**भावार्थ** : वाणी आणि मनाला अगोचर असणाऱ्या, नीलपीतादी आकारशून्य असलेल्या, चिदाकाशात तादात्म्य पावलेल्या शिवयोग्याने कोणत्याप्रकारे व कशाची भावना करावी? अर्थात् त्याला कोणत्याही प्रकारे कसल्याही वस्तूची भावना (ध्यान) होऊ शकत नाही.॥४८॥

**अविशुद्धे विशुद्धे वा स्थले दीप्तिर्यथा रवेः।**
**पतत्येवं सदाद्वैती सर्वत्र समवृत्तिमान्।।४९।।**

**अन्वयार्थ** : रवेः = सूर्याचा, दीप्तिः = प्रकाश, यथा = जसा, अविशुद्धे = अशुद्ध, वा = अथवा, विशुद्धे = शुद्ध, स्थले = स्थानी, पतत्येवं = पडतो तसा, अद्वैती = शिवाद्वैती, सदा = नेहमी, सर्वत्र = सगळीकडे, समवृत्तिमान् = समदृष्टीचा होतो.

**भावार्थ** : सूर्याचा प्रकाश विशुद्ध अथवा अशुद्ध स्थलावर जसा समानतेने पडतो, तशाप्रकारे हा शिवाद्वैती सर्व ठिकाणी समान बुद्धी ठेवून संसार करीत असतो. अर्थात् स्तुती अथवा निंदा त्याच्या दृष्टीने समान असते.॥४९॥

**न बिभेति जरामृत्योर्न क्षुधया वशं व्रजेत्।**
**परिपूर्णनिजानन्दं समास्वादन् महासुखी।।५०।।**



**अन्वयार्थ** : जरामृत्योः = जरा आणि मृत्यूला, न बिभेति = भीत नाही, क्षुधायाः = भुकेला, वशं = वशीभूत, न व्रजेत् = होत नाही, परिपूर्णनिजानन्दं = परिपूर्ण अशा स्वस्वरूपानंदाचा, समास्वादन् = आस्वाद घेत, महासुखी = महासुखी असतो.

**भावार्थ** : जरामरणाला न भिता, तहानभुकेला वश न होता, परिपूर्ण अशा स्वात्मानंदाचा आस्वाद घेत महासुखी होऊन तो लोकांमध्ये संचार करीत असतो.॥५०॥

### नष्टागमस्थल - (७७)

**भेदशून्ये महाबोधे ज्ञात्रादित्रयहीनकः।**
**ज्ञानस्य नष्टभावेन नष्टागम इहोच्यते।।५१।।**

**अन्वयार्थ** : भेदशून्ये = द्वैतरहित, महाबोधे = महान अशा शिवाद्वैत ज्ञानात, ज्ञात्रादियत्रहीनकः = ज्ञाता, ज्ञान आणि ज्ञेयरूप त्रिपुटी नसल्याने, ज्ञानस्य = भेदज्ञानाचा, नष्टभावेन = नाश झाल्यामुळे, इह = येथे, नष्टागम म्हणून, उच्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : द्वैतशून्य अशा महाशिवज्ञानात ज्ञाता, ज्ञान आणि ज्ञेय असा त्रिपुटीमय प्रपंच नसल्यामुळे निर्भावागमसंपन्न अशा शिवयोग्याच्या ज्ञानात भेदज्ञान अर्थात् त्रिपुटीभेद नष्ट झाला असल्यामुळे याला नष्टागम असे म्हणतात.॥५१॥

**अद्वैतवासनाविष्टचेतसां परयोगिनाम्।**
**पश्यतामन्तरात्मानं ज्ञातृत्वं कथमन्यथा।।५२।।**

**अन्वयार्थ** : अद्वैतवासनाविष्टचेतसां = शिवाद्वैतवासनेने परिपूर्ण अशा मनाच्या, अन्तः = आपल्या हृदयकमलात, आत्मानं = आपल्याला, पश्यताम् = पाहणाऱ्या, परयोगिनां = परशिवयोग्यांना, अन्यथा = दुसऱ्या वस्तूंचे, ज्ञातृत्वं = ज्ञातृत्व, कथं = कसे असणार?

**भावार्थ** : अद्वैतवासनेने ज्यांची मने पूर्णपणे भरलेली आहेत आणि जे आपल्या अंतरात्म्यालाच पाहात आहेत अशा परयोग्यांना स्वत:खेरीज अन्य

पदार्थांचे जाणतेपण कसे असेल? त्याना अन्य पदार्थांची जाणीव नसल्यामुळे ते त्रिपुटीव्यवहारशून्य होतात.॥५२॥

**अकर्ताऽहमवेत्ताहमदेहोऽहं निरञ्जनः।**
**इति चिन्तयतः साक्षात् संविदेव प्रकाशये।।५३।।**

**अन्वयार्थ** : अकर्ताऽहं = मी कर्ता नाही, अवेत्ताऽहं = मी जाणणारा नाही, अदेहोऽहं = मी देह नाही, निरञ्जनः = मी निर्दोष आहे, इति = अशा रीतीने, चिन्तयतः = चिंतन करणाऱ्याला, साक्षात् = प्रत्यक्ष, संविदेव = शिवाद्वैतज्ञानच, प्रकाशते = प्रकाशित होते.

**भावार्थ** : मी कर्ता नाही, मी जाणणारा नाही, मी देहरहित आणि दोषरहित आहे, असे चिंतिणारा ज्ञाता-ज्ञान आणि ज्ञेयात्मक त्रिपुटीरहित होऊन त्याला केवळ शिवाद्वैतज्ञानच प्रकाशित होते म्हणून त्याला नष्टागमप्रकाश म्हणतात.॥५३॥

**निरस्तभेदजल्पस्य निरीहस्य प्रशाम्यतः।**
**स्वे महिम्नि विलीनस्य किमन्यज्ज्ञेयमुच्यते।।५४।।**

**अन्वयार्थ** : निरस्तभेदजल्पस्य = भेदवाक्यांचे निराकरण केलेल्या, प्रशाम्यतः = रागद्वेषादिरहित, स्वे = आपल्या, महिम्नि = विमर्शशक्तीत, विलीनस्य = विलीन झालेल्या, निरीहस्य = निःस्पृह अशा, शिवयोग्याला ज्ञेयं = जाणण्यायोग्य, अन्यत् = दुसरे, किमुच्यते = काय आहे?

**भावार्थ** : हा नष्टागम शिवयोगी भेदभावनेचे निराकरण करून, रागद्वेषादिरहित होऊन स्वविमर्शात विलीन झालेला असतो. अशा विरक्त शिवयोग्याला ह्या प्रपंचात जाणून घेण्यास योग्य अशी कोणती वस्तू आहे? अर्थात् कोणतीही नाही.॥५४॥

**एकीभूते निजाकारे संविदा निष्प्रपञ्चया।**
**केन किं वेदनीयं तद्वेत्ता कः परिभाष्यते।।५५।।**

**अन्वयार्थ** : निजाकारे = आपल्या स्वरूपात, निष्प्रपञ्चया = प्रपंचरहित अशा, संविदा = शिवाद्वैतज्ञानाने, एकीभूते = समरस झाल्यावर, केन = कशाने, किं = काय, वेदनीयं = जाणावे?, तद्वेत्ता = ज्ञानाने ज्ञेयाला जाणणारा ज्ञाता, कः = कोण म्हणून, परिभाष्यते = सांगितला जाईल?



**भावार्थ** : शिवाद्वैतज्ञानाचे स्वस्वरूपात सामरस्य प्राप्त झाल्यावर कशाने व काय जाणून घ्यावयाचे आहे? व ते जाणून घेणारा तरी कोण? अर्थात् स्वस्वरूपात लीन झालेल्या शिवयोग्याला ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय अशा त्रिपुटीरूप प्रपंचाचे दर्शनच होत नाही.॥५५॥

**महासत्ता महासंविद् विश्वरूपा प्रकाशते।**
**तद्विना नास्ति वस्त्वेकं भेदबुद्धिं विमुञ्चतः।।५६।।**

**अन्वयार्थ** : महासत्ता = सदसद् वस्तूंना व्यापून असलेले, महासंविद् = महाज्ञानस्वरूप असे ब्रह्मचैतन्य, विश्वरूपा = प्रपंचरूपाने, प्रकाशते = प्रकाशित होते, भेदबुद्धिं = भेदबुद्धी, विमुञ्चतः = सोडलेल्याला, तद्विना = त्या परशिव-ब्रह्मावाचून, वस्त्वेकं = दुसरी वस्तू, नास्ति = नसते.

**भावार्थ** : सदसद्रूप अशा सकलवस्तूंमध्ये व्यापून असलेले महाज्ञान-स्वरूप असे ब्रह्मचैतन्यच जगत्स्वरूप होऊन प्रकाशते. म्हणून भेदबुद्धी नाहीशी झालेल्या या शिवयोग्याला त्याखेरीज दुसरी वस्तू दिसत नाही. सागरतरंगन्यायाने हे विश्व ब्रह्मरूपानेच दिसते.॥५६॥

### आदिप्रसादिस्थल - (७८)

**सर्वाधिष्ठातृकः शम्भुरादिस्तस्य प्रसादतः।**
**आदिप्रसादीत्युक्तोऽयं निर्विकारपदे स्थितः।।५७।।**

**अन्वयार्थ** : सर्वाधिष्ठातृकः = विश्वाला आधारभूतः, शम्भुः = शिव, आदिः = सृष्ट्यादि पंचकृत्यांचा मूळ कारण आहे. तस्य = त्याच्या, प्रसादतः = अनुग्रहाने, निर्विकारपदे = विकाररहित अशा स्थानी, स्थितः = असलेला, अयं = हा शिवयोगी, आदिप्रसादीति = आदिप्रसादी म्हणून, उक्तः = म्हटला जातो.

**भावार्थ** : विश्वाचा आधार आणि नियामक अशा शंभूला आदी असे म्हणतात. अर्थात् सृष्ट्यादी पंचकृत्यांना मूळकारण असलेल्या त्या

परमात्माच्या प्रसादाने अर्थात् अनुग्रहाने विकाररहित अशी स्थिती प्राप्त करून घेतलेला तो नष्टागमसंपन्न शिवयोगी आदिप्रसादी म्हणून ओळखला जातो.॥५७॥

**अनेकजन्मशुद्धस्य निरहङ्कारभाविनः।**
**अप्रपञ्चस्यादिदेवः प्रसीदति विमुक्तये॥५८॥**

**अन्वयार्थ** : अनेकजन्मशुद्धस्य = अनेक जन्मांत परिशुद्ध झालेला, निरहङ्कारभाविनः = परिच्छिन्न अशा देहाचा अभिमानरहित, अप्रपञ्चस्य = प्रापंचिक भेदरहित, अशा शिवयोग्याला, आदिदेवः = सर्वांना आदी असा महादेव, विमुक्तये = मोक्ष देण्यासाठी, प्रसीदति = प्रसन्न होतो.

**भावार्थ** : अनेक जन्मांत संपादन केलेल्या निष्काम पुण्यामुळे परिशुद्धात्म झालेला, परिच्छिन्न अशा देहादिकांचा अभिमान नसलेला आणि प्रापंचिक भेदरहित अशा शिवयोग्याला मोक्ष देण्यासाठी आदिदेव असा परमात्मा त्याच्यावर अनुग्रह करतो.॥५८॥

**शिवप्रसादसम्पत्त्या शिवभावमुपेयुषि।**
**शिवादन्यज्जगज्जालं दृश्यते न च दृश्यते॥५९॥**

**अन्वयार्थ** : शिवप्रसादसम्पत्त्या = शिवानुग्रहरूपी संपत्तीमुळे, शिवभाव-मुपेयुषि = शिवत्व प्राप्त करून घेतलेल्या, शिवयोग्याला जगज्जालं = विश्वसमूह, शिवादन्यत् = शिवाहून भिन्न असे, दृश्यते = जे दिसते, ते न च दृश्यन्ते = दिसत नाही.

**भावार्थ** : शिवप्रसादाच्या प्राप्तीने शिवभावसंपन्न झालेल्या त्या शिवयोग्याला हा जगाचा समूह शिवापेक्षा भिन्न असा दिसत नाही. अर्थात् त्याला भेदबुद्धीचा नाश झाल्यामुळे सागरतरंगन्यायाने सर्व काही शिवमय आहे, अशा दृष्टीनेच तो पाहात असतो.॥५९॥

**शम्भोः शिवप्रसादेन संसारच्छेदकारिणा।**
**मोहग्रन्थिं विनिर्भिद्य मुक्तिं यान्ति विवेकिनः॥६०॥**



**अन्वयार्थ** : विवेकिनः = नित्यानित्यविवेकी लोक, संसारच्छेदकारिणा = संसारपाश नाहीसा करणाऱ्या, शम्भोः = शिवाच्या, शिवप्रसादेन = मंगलमय प्रसादाने, मोहग्रन्थिं = अज्ञानरूपी ग्रंथीचा, विनिर्भिद्य = भेद करून, मुक्तिं यान्ति = मोक्ष मिळवितात.

**भावार्थ** : नित्यानित्यविवेकसंपन्न असे शिवयोगी संसारनिवृत्तीला कारण असणाऱ्या शिवाच्या मंगलमय अनुग्रहानेच अज्ञानग्रंथीचा भेद करून परमोक्ष मिळवितात.॥६०॥

**विना प्रसादमीशस्य संसारो न निवर्तते।**
**विना सूर्योदयं लोके कुतः स्यात् तमसो लयः॥६१॥**

**अन्वयार्थ** : ईशस्य = शिवाच्या, प्रसादं विना = प्रसादाशिवाय, संसारः = संसार, न निवर्तते = निवृत्त होत नाही, लोके = जगात, सूर्योदयं विना = सूर्योदय झाल्याशिवाय, तमसो लयः = अंधःकाराची निवृत्ती, कुतः स्यात् = कशी होईल?

**भावार्थ** : सूर्योदय झाल्याशिवाय जगातील अंधाराचा जसा नाश होत नाही, तशा प्रकारे शिवप्रसादाविना संसाराची निवृत्ती होत नाही, अर्थात् मुक्ती मिळत नाही.॥६१॥

**सर्वानुग्राहकः शम्भुः केवलं कृपया प्रभुः।**
**मोचयेत् सकलान् जन्तून् न किञ्चिदिह कारणम्॥६२॥**

**अन्वयार्थ** : प्रभुः = स्वतंत्र, सर्वानुग्राहकः = सर्वांवर अनुग्रह करणारा, शम्भुः = शिव, केवलं = केवळ, कृपया = कृपेने, सकलान् = सर्व, जन्तून् = प्राण्यांना, मोचयेत् = मुक्त करीत, इह = या पाशमोचनासाठी, किञ्चित् = दुसरे, न कारणम् = कारण नाही.

**भावार्थ** : स्वतंत्र आणि सर्वानुग्राहक असा शिव केवळ आपल्या कृपेने सर्व प्राण्यांना संसारपाशापासून मुक्त करतो. सर्वांवर अनुग्रह करणे हा शिवाचा स्वभाव असल्यामुळे कोणत्याही अपेक्षेविना तो सर्वांना मुक्त करतो.॥६२॥

अन्त्यप्रसादिस्थल - (७९)

**लयः सर्वपदार्थानामन्त्य इत्युच्यते बुधैः।**
**प्रसादोऽनुभवस्तस्य तद्वानन्त्यप्रसादवान्।।६३।।**

**अन्वयार्थ** : सर्वपदार्थानां = भूम्यादी सर्व पदार्थांच्या, लयः = लयाला आश्रय असा परशिव, बुधैः = ज्ञान्यांकडून, अन्त्यः = अंत्य, इति = असा, उच्यते = म्हटला जातो, तस्य = त्याचा, अनुभवः = साक्षात्कार, हाच प्रसादः = प्रसाद होय, तद्वान् = तो प्रसाद प्राप्त झालेला, अन्त्यप्रसादवान् = अन्त्यप्रसादी होय.

**भावार्थ** : भूम्यादी शिवतत्त्वापर्यंत सर्व पदार्थांच्या लयाला आश्रयीभूत असणाऱ्या परशिवाला वीरशैवशास्त्रज्ञ अंत्य या नावाने संबोधितात. अशाप्रकारे सर्वांच्या अंती असणाऱ्या शिवाच्या साक्षात्काराला अंत्यप्रसाद असे म्हणतात. तो प्रसाद ज्याला प्राप्त होतो तो अंत्यप्रसादी होय. म्हणजेच प्रपंचाच्या लयाचे चिंतन करून त्या लयाला आश्रयीभूत असणाऱ्या शिवाच्या साक्षात्काररूप प्रसादाचा जो अनुभव घेतो त्याला अंत्यप्रसादी म्हणतात.।।६३।।

**देवतिर्यङ्मनुष्यादिव्यवहारविकल्पना ।**
**मायाकृता परे तत्त्वे तल्लये तत्क्षयो भवेत्।।६४।।**

**अन्वयार्थ** : देवतिर्यङ्मनुष्यादि = देव, तिर्यक आणि मनुष्य आदी, व्यवहार-विकल्पना = भेदव्यवहार, मायाकृता = मायेमुळे झालेला आहे, परे तत्त्वे = परशिवतत्त्वात, तल्लये = मायेचा विलय झाल्यावर, तत्क्षयः = भेदव्यवहाराचा क्षय, भवेत् = होतो.

**भावार्थ** : हा देव, हा तिर्यक प्राणी आणि हा मनुष्य असा जो भेदव्यवहार असतो तो मायाकल्पित होय. ही माया परमात्म्यात विलीन झाल्यावर त्या मायेपासून उत्पन्न झालेले सर्व विकारही नाहीसे होतात.।।६४।।

**साक्षात्कृते परे तत्त्वे सच्चिदानन्दलक्षणे।**
**क्व पदार्थपरिज्ञानं कुतो ज्ञातृत्वसंभवः।।६५।।**

**अन्वयार्थ** : सच्चिदानन्दलक्षणे = सच्चिदानंदस्वरूप, परे तत्त्वे = परशिवब्रह्माचा, साक्षात्कृते = साक्षात्कार झाल्यावर, पदार्थपरिज्ञानं = पदार्थांचे ज्ञान, क्व = कोठे, ज्ञातृत्वसम्भवः = ज्ञातृत्वाचा आविर्भाव, कुतः = कसा होईल?



**भावार्थ** : सच्चिदानंदस्वरूप अशा परब्रह्माचा साक्षात्कार झाल्यामुळेच मायेचा विलय होतो. या मायेची निवृत्ती झाल्यावर तिच्यापासून कल्पित अशा पदार्थांचे परिज्ञान असो की त्याचे ज्ञातृत्व असो, ते कसे संभवते? अर्थात् संभवत नाही.।।६५।।

**सुषुप्तस्य यथा वस्तु न किञ्चिदपि भासते।**
**तथा मुक्तस्य जीवस्य न किञ्चिद्वस्तु दृश्यते।।६६।।**

**अन्वयार्थ** : सुषुप्तस्य = गाढ निद्रेत झोपलेल्या, यथा = जसे, किञ्चिदपि = कोणताही, वस्तु = पदार्थ, न भासते = प्रतीत होत नाही, तथा = तसे, मुक्तस्य जीवस्य = जीवन्मुक्ताला, किञ्चिद्वस्तु = जगातील कोणताही पदार्थ, न दृश्यते = दिसत नाही.

**भावार्थ** : गाढ झोपलेल्या माणसाला जसे कोणत्याही वस्तूचे भान उरत नाही. तशा प्रकारे जीवन्मुक्त झालेल्या शिवयोग्याला प्रपंचातील कोणत्याही वस्तूची जाणीव नसते.।।६६।।

**यथाकाशमविच्छिन्नं निर्विकारं स्वरूपतः।**
**तथा मुक्तस्य जीवस्य स्वरूपमवशिष्यते।।६७।।**

**अन्वयार्थ** : अविच्छिन्नं = व्यापक, आकाशं = आकाश, यथा = जसे, स्वरूपतः = स्वाभाविकपणे, निर्विकारं = विकाररहित असते, तथा = तसे, मुक्तस्य जीवस्य = जीवन्मुक्ताचे, स्वरूपं = स्वरूप, अवशिष्यते = प्रकाशित होते.

**भावार्थ** : आकाश जसे स्वभावतः अविच्छिन्न निर्विकार असते तसे जीवन्मुक्त शिवयोग्याचे स्वरूपही अखंडपणे प्रकाशित असते.।।६७।।

**न किञ्चदपि मुक्तस्य दृश्यं कर्तव्यमेव वा।**
**सुखस्फूर्तिस्वरूपेण निश्चला स्थितिरुच्यते।।६८।।**

**अन्वयार्थ** : मुक्तस्य = जीवन्मुक्ताला, किञ्चिदपि = काहीही, दृश्यं = दृश्य, न = असते, वा = अथवा, कर्तव्यमेव = कर्तव्यसुद्धा नसते, त्याची सुखस्फूर्ति-स्वरूपेण = आनंदस्वरूपाने, निश्चला = निश्चल अशी, स्थितिः = अवस्था, उच्यते = सांगितली जाते.

**भावार्थ** : जीवन्मुक्त झालेल्यास काही दृश्य होत नाही आणि त्याला काही कर्तव्यही नसते. अर्थात् परिपूर्ण आनंदमय अशी त्याची निश्चल स्थिती असते. म्हणजे त्याला कसलेही कर्तव्य नसते.॥६८॥

**शिवाद्वैतपरिज्ञानशिथिलाशेषवस्तुनः ।**
**केवलं संविदुल्लासदर्शिनः केन को भवेत्।।६९।।**

**अन्वयार्थ** : शिवाद्वैतपरिज्ञान = शिवाद्वैतपरिज्ञानामुळे, शिथिलाशेषवस्तुनः = वस्तूंचा भेदभाव नाहीसा झालेला, केवलं = केवळ, संविदुल्लासदर्शिनः = ज्ञानाचा विलास पाहाणाऱ्या शिवयोग्याला, केन = कोणत्या इंद्रियव्यापाराने, को भवेत् = काय लाभ होईल?

**भावार्थ** : शिवाद्वैतपरिज्ञानाने सकल प्रापंचिक वस्तुभेदभ्रांती मिटल्यामुळे त्या शिवाद्वैतज्ञानात लीन झालेल्या शिवयोग्याला ज्ञानेंद्रिये अथवा कर्मेंद्रियांच्या व्यवहाराचे काय प्रयोजन असते?॥६९॥

**सेव्यप्रसादिस्थल - (८०)**

**सेव्यो गुरुः समस्तानां शिव एव न संशयः।**
**प्रसादोऽस्य परानन्दप्रकाशः परिकीर्त्यते।।७०।।**

**अन्वयार्थ** : समस्तानां = सर्वांना, सेव्यः = सेवा करण्यास योग्य असा, गुरुः = गुरू, शिव एव = शिवच होय, न संशयः = यात संशय नाही, अस्य = ह्याचा, प्रसादः = अनुग्रहच, परानन्दप्रकाशः = परमानंदप्रकाश म्हणून, परिकीर्त्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : सर्वांकडून सेवा करून घेण्यास योग्य अर्थात् पूज्य गुरू साक्षात् शिवच असतो यात कसलाही संशय नाही. अशा गुरूचा प्रसादच परमानंदरूपप्रकाशक होय.॥७०॥

**सेव्यो गुरुः स्मृतो ह्यस्य प्रसादोऽनुभवो मतः।**
**तदेकावेशरूपेण तद्वान् सेव्यप्रसादवान्।।७१।।**

**अन्वयार्थ** : गुरुः = शिवस्वरूप असा गुरू, सेव्यः = सेवा करण्यास योग्य असे, स्मृतः = सांगितले आहे, अस्य = ह्या गुरूचा, अनुभवः = उपदेशानुभव, प्रसादः = प्रसाद म्हणून, हि = निश्चित, मतः = शास्त्रज्ञांचे मत आहे, तदेकावेशरूपेण = गुरू आणि त्याच्या प्रसादाला एकरूपत्वाने, तद्वान् = जाणणारा, सेव्यप्रसादवान् = सेव्यप्रसादी होय.



**भावार्थ** : शिवस्वरूप असा गुरूच सर्वांकडून सेव्य होय, अशा गुरूचा उपदेशच प्रसाद होय. हे शास्त्रसंमत आहे. त्यामुळे गुरू आणि गुरूचा उपदेश या दोहोंना अभेदबुद्धीने जाणणारा सेव्यप्रसादी म्हणविला जातो.॥७१॥

**गुरुदेवः परं तत्त्वं परतत्त्वं गुरुः स्मृतः।**
**तदेकत्वानुभावेन न किञ्चिदवशिष्यते।।७२।।**

**अन्वयार्थ** : गुरुदेवः = गुरुदेव, परं तत्त्वं = परशिवतत्त्व आहे, परतत्त्वं = परशिव तत्त्व, गुरुः = गुरू म्हणून, स्मृतः = म्हटले जाते, तदेकत्वानुभावेन = त्या दोहोंच्या ऐक्यानुसंधानाने, किञ्चित् = जाणण्यायोग्य काहीही, नावशिष्यते = उरत नाही.

**भावार्थ** : गुरू हाच परशिव आणि परशिव हाच गुरू असे शास्त्रात सांगितले आहे. याप्रमाणे गुरू आणि परशिवामध्ये अभेदभाव ठेवल्याने या जगात जाणून घेण्यासारखी अशी अन्य वस्तू उरलेली नसते.॥७२॥

**अपरिच्छेद्यमात्मस्थमवाङ्मानसगोचरम्।**
**आनन्दं पश्यतां पुंसां रतिरन्यत्र का भवेत्।।७३।।**

**अन्वयार्थ** : अपरिच्छेद्यम् = अखंड, अवाङ्मनसगोचरम् = वाणी आणि मनाला अगोचर, आत्मस्थम् = स्वस्वरूपाचा, आनन्दं = आनंद, पश्यतां = अनुभविणाऱ्या, पुंसां = शिवयोग्याची, अन्यत्र = दुसरीकडे, का रतिः = कोणती प्रीती, भवेत् = होईल?

**भावार्थ** : वाणी व मनाला अगोचर अशा स्वस्वरूपच अखंड परमानंदाचा साक्षात् अनुभव घेणाऱ्या शिवयोग्याला अन्य विषयाची अभिलाषा कशी असेल? अर्थात् मुळीच नसते.॥७३॥

**ज्ञानामृतेन तृप्तस्य किमन्यैर्भोज्यवस्तुभिः।**
**ज्ञानादेव परानन्दं प्रकाशयति सच्छिवः।।७४।।**

**अन्वयार्थ** : ज्ञानामृतेन = ज्ञानामृताने, तृप्तस्य = संतुष्ट झालेल्या शिवयोग्याला, अन्यैः = दुसऱ्या, भोज्यवस्तुभिः = भोज्य पदार्थांचे, किं = काय

प्रयोजन?, सच्छिवः = सच्चिदानंदरूपी शिव, ज्ञानादेव = आत्मज्ञानानेच, परानन्दं = नित्यानंदाचे, प्रकाशयति = प्रकाशन करतो.

**भावार्थ** : ज्ञानामृताने संतृप्त झालेल्या शिवयोग्याला अन्य सांसारिक भोग्य वस्तूंचे काय प्रयोजन? अर्थात् काहीच प्रयोजन नसते. सच्चिदानंदस्वरूप असणाऱ्या शिवाच्या ज्ञानानेच परमानंद प्रकाशित होतो. म्हणजे शिवज्ञानानेच परमानंदाची प्राप्ती होते.॥७४॥

**मुक्तिरेव परा तृप्तिः सच्चिदानन्दलक्षणा।**
**नित्यतृप्तस्य मुक्तस्य किमन्यैर्भोगसाधनैः।।७५।।**

**अन्वयार्थ** : सच्चिदानन्दलक्षणा = सच्चिदानंदस्वरूप, मुक्तिरेव = मुक्तीच, परा तृप्तिः = उत्कृष्ट अशी तृप्ती होय, नित्यतृप्तस्य = नित्य तृप्त असलेल्या, मुक्तस्य = जीवन्मुक्त अशा शिवयोग्याला, अन्यैः = दुसऱ्या, भोगसाधनैः = भोगसामुग्रीचे, किम् = काय प्रयोजन?

**भावार्थ** : शिवाद्वैतज्ञानामृताच्या सेवनाने परमानंद प्राप्त करून घेतलेला शिवयोगी नित्यतृप्त असतो. म्हणजे तो शिवयोगी सर्वज्ञत्व, अनादिबोधत्व, स्वतंत्रत्व, अलुप्तशक्तिमत्त्व आणि अनंतशक्तिमत्त्वाने उपलक्षित अशी नित्यतृप्ती प्राप्त झालेला असतो. अशा रीतीने नित्यतृप्त आणि मुक्तही असलेल्या त्या शिवयोग्याला मुक्तीच परमतृप्ती झालेली असते. म्हणून अशा शिवयोग्याला अन्य भोग्यसाधनांचे कसलेही प्रयोजन नसते.॥७५॥

**न बाह्यकर्म तस्यास्ति न चान्तर्नैव कुत्रचित्।**
**शिवैक्यज्ञानरूढस्य देहभ्रान्तिं विमुञ्चतः।।७६।।**

**अन्वयार्थ** : शिवैक्यज्ञानरूढस्य = समान समरसभावाने शिवैक्यज्ञान प्राप्त करून घेतलेल्या, देहभ्रान्तिं = देहाभिमानरूपी भ्रांती, विमुञ्चनः = सोडलेल्या, तस्य = त्या सेव्यप्रसादीला, बाह्यकर्म = बहिरंगात केली जाणारी पूजाकर्मे, नास्ति = नसतात, न चान्तः = अंतरंगात केली जाणारी ध्यानादी कर्मे नसतात, नैव कुत्रचित् = अथवा कोणताही कर्मपाश नसतो.

**भावार्थ** : स्वरूपात हानि वृद्धी न होता, सजातीय आणि समान वस्तूंच्या सामरस्याप्रमाणे शिवैक्यज्ञानाची प्राप्ती करून घेऊन देहाच्या भ्रांतीचा



त्याग केलेल्या सेव्यप्रसादीला पूजादी बाह्य कर्मे असोत किंवा ध्यानादी अंतरंग कर्मे असोत, ती करावी लागत नाहीत. अर्थात् बिंदू, तिरोधानभाव, मलमायादी उपलक्षित कर्मपाश नसतात.॥७६॥

**न कर्मबन्धे न तपोविशेषे न मन्त्रयोगाभ्यसने तथैव।**
**ध्याने न बोधे च तथात्मतत्त्वे मनःप्रवृत्तिः परयोगभाजाम्।।७७।।**

**अन्वयार्थ** : परयोगभाजां = उत्कृष्ट असा शिवयोग प्राप्त करून घेतलेल्या सेव्यप्रसादीची, मनःप्रवृतिः = चित्तप्रवृत्ती, मन्त्रयोगाभ्यसने = सोऽहंरूपी मंत्रयोगाच्या अभ्यासात, न = नसते, तथैव = तसेच, कर्मबन्धे = षट्कर्म आणि बंधत्रयरूप हठयोगात, न = नसते, तपोविशेषे = विशिष्ट अशा राजयोगात, न = नसते, ध्याने = अनाहत ब्रह्म ध्यानरूप लययोगात, न = नसते, परंतु तथात्मतत्त्वे = आत्मस्वरूप, बोधे = ज्ञानात मनाची प्रवृत्ती असते.

**भावार्थ** : सर्वोत्कृष्ट असे महालिंग-सामरस्य प्राप्त केलेल्या त्या सेव्यप्रसादीचे मन अजपागायत्रीरूपी मंत्रयोगाभ्यास असो, षट्कर्म आणि बंधत्रयरूप हठयोगात असो, योगामध्ये श्रेष्ठ अशा राजयोगात असो किंवा अनाहत ब्रह्मध्यान अशा लययोगात असो, तात्पर्य असे की श्रीगुरूच्या उपदेशाप्रमाणे आपल्या देहाचे हातपाय, गुह्येंद्रियांची प्रथम शुद्धी करून त्यांना योगासनाद्वारे बांधून लययोग, राजयोग, हठयोग आणि मंत्रयोगाने क्रमशः श्रोत्र, नेत्र, नाक, जीभ आदी ज्ञानेंद्रियांचा निरोध करून स्थूल व सूक्ष्म देहाचा संबंध घडविणाऱ्या बिंदू आणि मायेचे कार्यरूप असलेली वागिंद्रिये आणि चर्मेंद्रिये यांना निश्चल करून सकल योगज्ञान उत्पन्न होण्यास मूलकारण असणाऱ्या स्वस्वरूपात्मक अनुसंधानात स्वतःचे मन तल्लीन करतो.॥७७॥

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ लिङ्गस्थलान्तर्गत प्राणलिङ्गीस्थले आत्मस्थलादि-नवविधस्थलप्रसङ्गो नाम अष्टादशः परिच्छेदः।***

**अठरावा परिच्छेद समाप्त.**

❍❍❍

# एकोणिसावा परिच्छेद

## लिंगस्थलांतर्गत

## शरणस्थल

अगस्त्य उवाच—

**स्थलभेदा: समाख्याता: प्राणलिङ्गिस्थलाश्रिता:।**
**कथय स्थलभेदं मे शरणस्थलसमाश्रितम्।।१।।**

**अन्वयार्थ** : प्राणलिङ्गिस्थलाश्रया: = प्राणलिंगी स्थलातील, स्थलभेदा: = अवांतर स्थलभेद, समाख्याता: = सागिंतलेत, शरणस्थलसंश्रितं = शरणस्थलात असणारे, स्थलभेदं = पोटभेद, मे = मला, कथय = सांगावे.

**भावार्थ** : अगस्त्य म्हणतात— हे आचार्या, प्राणलिंगीस्थलाचे त्यातील अवांतर स्थलभेदांसह विवेचन केलेत. आता शरणस्थलात असलेले पोटभेद कृपया मला सांगावे.॥१॥

**शरणस्थलमाश्रित्य स्थलद्वादशकं मया।**
**उच्यते नाम सर्वेषां स्थलानां शृणु तापस ।।२।।**

**अन्वयार्थ** : तापस = हे तपस्वी अगस्त्या, शरणस्थलमाश्रित्य = शरण-स्थलात असलेली, स्थलद्वादशकं = बारा अवांतर स्थले, मया = माझ्याकडून, उच्यते = सांगितली जातात, सर्वेषां = सर्व, स्थलानां = स्थलांची, नाम = नावे, शृणु = ऐक.

**भावार्थ** : रेणुकाचार्य सांगतात— हे तपस्वी अगस्त्या, शरणस्थलाचे बारा पोटभेद आहेत. त्यांची नावे मी सांगतो, ती तू लक्षपूर्वक श्रवण कर.॥२॥

**दीक्षापादोदकं पूर्वं शिक्षापादोदकं ततः।**
**ज्ञानपादोदकं चाथ क्रियानिष्पत्तिकं ततः।।३।।**
**भावनिष्पत्तिकं चाथ ज्ञाननिष्पत्तिकं ततः।**
**पिण्डाकाशस्थलं चाथ बिन्द्वाकाशस्थलं ततः।।४।।**



**महाकाशस्थलं चाथ क्रियायाश्च प्रकाशनम्।**
**भावप्रकाशनं पश्चात् ततो ज्ञानप्रकाशनम्।।**
**स्वरूपं पृथगेतेषां कथयामि यथाक्रमम्।।५।।**

**अन्वयार्थ** : पूर्वं = पहिले, दीक्षापादोदकं = दीक्षापादोदकस्थल, ततः = नंतर, शिक्षापादोदकं = शिक्षापादोदकस्थल, अथ = त्यानंतर, ज्ञानपादोदकं = ज्ञानपादोदकस्थल, च = आणि, क्रियानिष्पत्तिकं = क्रियानिष्पत्तिस्थल, ततः = नंतर, भावनिष्पत्तिकं = भावनिष्पत्तिस्थल, च = आणि, ज्ञाननिष्पत्तिकं = ज्ञान-निष्पत्तिस्थल, ततः = त्यानंतर, पिण्डाकाशस्थलं = पिंडाकाशस्थल, अथ = नंतर, बिन्द्वाकाशस्थलं = बिंद्वाकाशस्थल, ततः = त्यानंतर, महाकाशस्थलं = महाकाशस्थल, अथ = त्यानंतर, क्रियायाश्च प्रकाशयन् = क्रियाप्रकाशनस्थल, पश्चात् = नंतर, भावप्रकाशनं = भावप्रकाशनस्थल, ततः = नंतर, ज्ञानप्रकाशम् = ज्ञानप्रकाशनस्थल, एतेषां = ह्या सर्वांचे, यथाक्रमम् = क्रमानुसार, पृथक् = वेगळे, स्वरूपं = लक्षण, कथयामि = सांगतो.

**भावार्थ** : त्या स्थलांची नावे १. दीक्षापादोदकस्थल, २. शिक्षापादोदकस्थल, ३. ज्ञानपादोदकस्थल, ४. क्रियानिष्पत्तीस्थल, ५. भावनिष्पत्तीस्थल, ६. ज्ञाननिष्पत्तीस्थल, ७. पिंडाकाशस्थल, ८. बिंद्वाकाशस्थल, ९. महाकाशस्थल, १०. क्रिया-प्रकाशनस्थल, ११. भावप्रकाशनस्थल, १२. ज्ञानप्रकाशनस्थल ही बारा स्थले शरणस्थलाचे पोटभेद होत. त्यांचे स्वरूप आता मी क्रमाक्रमाने सांगतो.॥३-५॥

### दीक्षापादोदकस्थल - (८१)

**दीक्षयाऽपगतद्वैतं यज्ज्ञानं गुरुशिष्ययोः।**
**आनन्दस्यैक्यमेतेन दीक्षापादोदकं स्मृतम्।।६।।**

**अन्वयार्थ** : दीक्षयाऽपगतद्वैतं = दीक्षेमुळे द्वैतभाव नाहीसे झालेले, गुरुशिष्ययोः = गुरू आणि शिष्य, ह्या दोघांच्या, आनन्दस्य = निजानंदाचे, यद् ज्ञानं = जे ऐक्यज्ञान आहे, एतेन = ह्या ज्ञानामुळे, सेव्यप्रसादीला प्राप्त होणाऱ्या अवस्थेला, दीक्षापादोदकं = दीक्षापादोदक असे, स्मृतम् = म्हटले जाते.

**भावार्थ** : ज्ञानप्रदायक आणि मलक्षयकारी अशा चित्क्रियारूप दीक्षेने सेव्य अशा गुरुशिष्यांचे द्वैतज्ञान नाहीसे होऊन उदित होणारे अद्वैतज्ञान निजानंदात एकरूप होणे ह्यालाच दीक्षापादोदक असे म्हणतात. म्हणजेच अद्वैतज्ञानाचा जो दिव्यानंद गुरूला प्राप्त झालेला असतो तोच दिव्यानंद गुरूने शिष्यास दिलेल्या दीक्षेमुळे त्याच्या (मलत्रयाचा क्षय होऊन) अनुभवास येतो. त्या गुरुशिष्याच्या आनंदाचे स्वरूप समान पातळीवर एकरूप होते. अशा स्थितीला दीक्षापादोदक म्हटले जाते.॥६॥

**अथवा पादशब्देन गुरुरेव निगद्यते।**
**शिष्यश्चोदकशब्देन तयोरैक्यं तु दीक्षया।।७।।**

**अन्वयार्थ** : अथवा = अथवा, पादशब्देन = पाद शब्दाने, गुरुरेव = गुरूच, निगद्यते = बोधित होतो, च = आणि, उदकशब्देन = उदक शब्दाने, शिष्य: = शिष्य, बोधित होतो, तयो: = त्या दोघांचा, ऐक्यं तु = ऐक्यभाव, दीक्षया = दीक्षेमुळे होतो.

**भावार्थ** : पाद शब्दाने गुरू व उदक शब्दाने शिष्य असा अर्थ सूचित होतो. दीक्षेने होणाऱ्या त्यांच्या ऐक्यालाच दीक्षापादोदक असे म्हणतात. गुरूने आपल्या शिष्याच्या मस्तकाचे अवघ्राण करण्याच्या दीक्षासंस्काराने होणारे जे उभयतांचे भावैक्य तेच दीक्षापादोदक होय.॥७॥

**परमानन्द एवोक्त: पादशब्देन निर्मल:।**
**ज्ञानं चोदकशब्देन तयोरैक्यं तु दीक्षया।।८।।**

**अन्वयार्थ** : पादशब्देन = पाद शब्दाने, निर्मल: = मलरहित, परमानन्द एव = परमानंदच, उक्त: = सांगितला आहे, च = आणि, उदकशब्देन = उदक शब्दाने, ज्ञानं = ज्ञान, म्हटले आहे, तयो: = त्या दोघांचे, ऐक्यं तु = ऐक्य, दीक्षया = दीक्षेमुळे होते.

**भावार्थ** : मलरहित अशा परब्रह्माला पाद आणि परब्रह्मस्वरूपज्ञानाला उदक असे समजावे, 'विज्ञानमानन्दं ब्रह्म' या श्रुतिवचनानुसार दीक्षेमुळे हृदयकमलात होणारे आनंद आणि ज्ञानाचे जे ऐक्य, त्यालाच दीक्षापादोदक असे म्हणतात.॥८॥



**परसंवित्प्रकाशात्मा परमानन्दभावनाम्।**
**अधिगम्य महायोगी न भेदं क्वापि पश्यति।।९।।**

**अन्वयार्थ** : महायोगी = पादोदकदीक्षासंपन्न शिवयोगी, परसंवित्प्रकाशात्मा = परब्रह्मस्वरूप ज्ञानप्रकाशवान होऊन, परमानन्दभावनाम् = परमानंदाची भावना, अधिगम्य = प्राप्त करून, क्वापि = कुठेही, भेदं = भेद, न पश्यति = पाहत नाही.

**भावार्थ** : पूर्वोक्त दीक्षापादोदकसंपन्न महाशिवयोगी परब्रह्मस्वरूपाच्या ज्ञानाचा प्रकाशरूप होऊन परमानंदभाव प्राप्त करून घेतो. म्हणून त्याला प्रपंचात कोणताही भेद दिसत नाही.॥९॥

**देशकालाद्यवच्छेदविहीनं नित्यनिर्मलम्।**
**आनन्दं प्राप्य बोधेन नान्यत् काङ्क्षति संयमी।।१०।।**

**अन्वयार्थ** : संयमी = संयमशील शिवयोगी, देशकालाद्यवच्छेदविहीनं = देश, काल आणि वस्तुपरिच्छेदरहित, नित्यनिर्मलम् = सदा निर्मलस्वरूप, अशा आनन्दं = परशिवानंदाला, बोधेन = परशिवज्ञानाने, प्राप्य = प्राप्त करून घेऊन, अन्यत् = दुसरे काही, न काङ्क्षति = इच्छीत नाही.

**भावार्थ** : संयमी शिवयोगी सर्व देश, सर्व काल वा सर्व आकारांमध्ये परिपूर्णपणे राहणारा, नित्यनिर्मल असा ब्रह्मानंद ब्रह्मज्ञानाने प्राप्त करून घेतल्यामुळे दुसऱ्या कशाची अपेक्षा करीत नाही, कारण त्याच्या दृष्टीला ब्रह्माशिवाय दुसरे काहीच दिसत नाही.॥१०॥

**ज्ञानामृतमपि स्वच्छं गुरुकारुण्यसम्भवम्।**
**आस्वाद्य रमते योगी संसारामयवर्जित:।।११।।**

**अन्वयार्थ** : गुरुकारुण्यसम्भवं = गुरुकारुण्याने प्राप्त, स्वच्छं = निर्मल, ज्ञानामृतं = ज्ञानामृताचा, आस्वाद्य = आस्वाद घेऊन, योगी = शिवयोगी, संसारामयवर्जित: = भवरोगमुक्त होऊन, रमते = स्वस्वरूपात रममाण असतो.

**भावार्थ** : गुरूकृपेने प्राप्त झालेल्या निर्मल अशा ब्रह्मज्ञानामृताचा आस्वाद घेतलेला, दीक्षापादोदकसंपन्न असा हा शिवयोगी भवरोगापासून मुक्त होऊन स्वत:च्या आत्मस्वरूपात क्रीडा करीत असतो.॥११॥

## शिक्षापादोदकस्थल - (८२)

**गुरुशिष्यमयं ज्ञानं शिक्षा योगिनमीर्यते।**
**तयो: समरसत्वं हि शिक्षापादोदकं स्मृतम्।।१२।।**

**अन्वयार्थ** : शिक्षा = जे शिक्षण (पूर्वोक्त ज्ञानाचे मनन), गुरुशिष्यमयं = गुरु आणि शिष्य या दोघांच्या ऐक्यरूपाच्या, ज्ञानं = ज्ञानासाठी, योगिनं = दीक्षापादोदकसंपन्न शिवयोग्याला, ईर्यते = प्रेरणा देते, तयो: = ते, शिक्षण आणि ज्ञान यांच्या, समरसत्वं हि = सामरस्यालाच, शिक्षापादोदकं = शिक्षापादोदक असे, स्मृतम् = म्हटले जाते.

**भावार्थ** : गुरुशिष्यसामरस्यज्ञान झालेला शिवयोगी शिक्षणाने अर्थात् मनाने प्रेरणा प्राप्त करतो, त्या शिक्षणाच्या व ज्ञानाच्या समरसतेलाच शिक्षापादोदक असे म्हणतात. तात्पर्य असे की पूर्वी सांगितलेल्या दीक्षानुभवाने सिद्ध झालेल्या ज्ञानाचे मनन हाच शिक्षागुरू समजावा. त्या ज्ञानाच्या आणि मननरूपी शिक्षणाच्या सामरस्याने उत्पन्न होणाऱ्या सुखालाच शिक्षापादोदकस्थल असे म्हणतात.।।१२।।

**मथिताच्छास्त्रजलधेर्युक्तिमन्थानवैभवात्।**
**गुरुणा लभ्यते बोधसुधा सुमनसां गणै:।।१३।।**

**अन्वयार्थ** : युक्तिमन्थानवैभवात् = युक्तीरूपी रवीच्या सामर्थ्याने, मथितात् = मंथन केलेल्या, शास्त्रजलधे: = निगमागमरूप वीरशैवशास्त्रसमुद्रातून निघालेले, बोधसुधा = शिवाद्वैतरूपी ज्ञानामृत, सुमनसां = परिशुद्ध मनाच्या, गणै: = योग्यांना, गुरुणा = गुरूकडून, लभ्यते = प्राप्त होते.

**भावार्थ** : निगमागमात्मक वीरशैवशास्त्ररूपी समुद्राचे युक्तिरूप रवीने मंथन केल्यामुळे उत्पन्न झालेले शिवाद्वैतज्ञानरूपी अमृत, दीक्षापादोदक स्वीकाराने परिशुद्धचित्त झालेल्या शिवयोग्याला गुरुद्वारा प्राप्त होते.।।१३।।

**ज्ञानचन्द्रसमुद्भूतां परमानन्दचन्द्रिकाम्।**
**पश्यन्ति परमाकाशे मुक्तिरात्रौ महाधिय:।।१४।।**



**अन्वयार्थ** : महाधिय: = सूक्ष्मदर्शी शिवयोगी, मुक्तिरात्रौ = परमुक्तिरूपी गाढ अंधकारात, परमाकाशे = हृदयरूपी परमाकाशात, ज्ञानचन्द्रसमुद्भूतां = शिवाद्वैतज्ञानरूपी चंद्रापासून निघालेले, परमानन्दचन्द्रिकाम् = परमानंदरूपी चांदणे, पश्यन्ति = स्वस्वरूपाने पाहतात.

**भावार्थ** : सूक्ष्म दृष्टीचे शिवयोगी मुक्तिरूप रात्री आपल्या हृदयरूपी परमाकाशात शिवाद्वैतज्ञानरूपी चंद्रापासून उत्पन्न झालेल्या परमानंदरूप चांदण्याचा अनुभव घेतात, अर्थात् तो परमानंद आपल्या स्वस्वरूपाने पाहतात.।।१४।।

**दृष्टे तस्मिन् परानन्दे देशकालादिवर्जिते।**
**द्रष्टव्यं विद्यते नान्यच्छ्रोतव्यं ज्ञेयमेव वा।।१५।।**

**अन्वयार्थ** : देशकालादिवर्जिते = देशकालादिकांनी खंडित न होणारा, तस्मिन् = त्या, परमानन्दे = परमानंदाचा, दृष्टे = साक्षात्कार झाल्यावर, द्रष्टव्यं = पाहण्यायोग्य, श्रोतव्यं = ऐकण्यायोग्य, ज्ञेयमेव वा = अथवा जाणण्यायोग्य, अन्यत् = दुसरे काही, न विद्यते = नसते.

**भावार्थ** : देशकालादिपासून खंडित न होणाऱ्या त्या परमानंदाचा साक्षात्कार झाल्यावर या जगामध्ये पाहण्यासारखे, ऐकण्यासारखे आणि जाणण्यासारखेही दुसरे काही नसते.।।१५।।

**आत्मानन्देन तृप्तस्य का स्पृहा विषये सुखे।**
**गङ्गाजलेन तृप्तस्य कूपतोये कुतो रति:।।१६।।**

**अन्वयार्थ** : आत्मानन्देन = आत्मानंदाने, तृप्तस्य = तृप्त झालेल्याला, विषये सुखे = विषयसुखाची, का स्पृहा = कशी इच्छा होईल? गङ्गाजलेन = गंगाजलाने, तृप्तस्य = तृप्त झालेल्याला, कूपतोये = विहिरीचे पाणी, कुतो रति: = कसे आवडेल?

**भावार्थ** : पवित्र गंगाजलाने तृप्त झालेल्या व्यक्तीला जशी विहिरीच्या पाण्याची गोडी नसते. तसे आत्मानंदाने तृप्त झालेल्या शिवयोग्याला विषयसुखाची अपेक्षा नसते.।।१६।।

**यस्मिन्नप्राप्तकल्लोले सुखसिन्धौ निमज्जति।**
**सामरस्यान्महायोगी तस्य सीमा कुतो भवेत्।।१७।।**

**अन्वयार्थ** : अप्राप्तकल्लोले = रागद्वेषरूपी लाटा नसलेल्या, यस्मिन् = ज्या, सुखसिन्धौ = सुखरूपी समुद्रात, सामरस्यात् = समरसरूपाने, महायोगी = महायोगी, निमज्जति = निमग्न होतो, तस्य = त्या आनंदाला, सीमा = मर्यादा, कुतो भवेत् = कशी असेल?

**भावार्थ** : ज्या शिवानंदरूपी समुद्रावर रागद्वेषादिकांचे तरंग उठत नाहीत, त्या प्रशांत अशा सौख्यसागरात सामरस्यरूपाने निमग्न झालेल्या शिवयोग्याच्या आनंदाला मर्यादा कशी असू शकेल?॥१७॥

**गुरुप्रसादचन्द्रेण निष्कलङ्केन चारुणा।**
**यन्मनःकुमुदं नित्यबोधितं तस्य को भ्रमः।।१८।।**

**अन्वयार्थ** : निष्कलङ्केन = कलंकरहित, चारुणा = सुंदर, गुरुप्रसादचन्द्रेण = गुरूचा अनुग्रहरूपी चंद्रामुळे, यस्य = ज्याचे, मनःकुमुदं = मनरूपी कुमुद, नित्यबोधितं = नित्य विकसित असते, तस्य = त्याला, को भ्रमः कसली भ्रांती असेल?

**भावार्थ** : कलंकरहित, सुन्दर अशा गुरुप्रसादरूप चंद्रामुळे ज्याचे मनरूपी कुमुद नित्य विकसित झालेले असते, अशा व्यक्तीला भेदभ्रांती कशी असणार?॥१८॥

### ज्ञानपादोदकस्थल - (८३)

**तदैक्यसम्पदानन्दज्ञानं ज्ञानगुरुर्मतः।**
**तत्सामरस्यं शिष्यस्य ज्ञानपादोदकं विदुः।।१९।।**

**अन्वयार्थ** : आनन्दज्ञानं = आनंदाचे ज्ञान, ज्ञानगुरुः = ज्ञानगुरू होय असे, मतः = शास्त्रज्ञांचे मत आहे, तदैक्यसम्पदा = त्या आनंद आणि ज्ञानाच्या ऐक्य संपत्तीने, शिष्यस्य = शिष्याला प्राप्त होणारा, तत्सामरस्यं = ज्ञान आणि आनंदाचा समरसभाव, ज्ञानपादोदकं = ज्ञानपादोदक होय असे, विदुः = विद्वान लोक जाणतात.

**भावार्थ** : 'विज्ञानमानन्दं ब्रह्म' या श्रुतिवचनानुसार आनंदाचे ज्ञानच ज्ञानगुरू होय. शिक्षापादोदकसंपन्न अशा शिष्याला होणाऱ्या ज्ञान आणि आनंदाच्या ऐक्यालाच ज्ञानपादोदक असे शिवयोगी लोक म्हणतात. तात्पर्य, परमानंदरूप अशा ज्ञानाच्या मननात लीन झाल्याने ज्ञानच ज्ञानपादोदक होय.॥१९॥



**अविद्याराहुनिर्मुक्तो ज्ञानचन्द्रः सुनिर्मलः।**
**प्रकाशते पराकाशे परानन्दमहाद्युतिः।।२०।।**

**अन्वयार्थ** : अविद्याराहुनिर्मुक्तः = अविद्यारूपी राहूपासून मुक्त झालेला, सुनिर्मलः = अत्यंत निर्मल असा, ज्ञानचन्द्रः = शिवाद्वैतज्ञानपरूपी चंद्र, परानन्दमहाद्युतिः = परमानंदरूपी महाप्रकाश होऊन, पराकाशे = उत्कृष्ट अशा हृदयाकाशात, प्रकाशते = प्रकाशित होतो.

**भावार्थ** : अज्ञानरूप राहूचा स्पर्श न झालेला, मलवासनांचा लेशमात्र संपर्क नसलेला, परमानंदरूप महाकांतीने युक्त असा शिवाद्वैतज्ञानपरूपी चंद्र सर्वोत्कृष्ट अशा हृदयाकाशात प्रकाशित होतो.॥२०॥

**अज्ञानमेघनिर्मुक्तः पूर्णज्ञानसुधाकरः।**
**आनन्दजलधेर्वृद्धिमनुपश्यन् विभासते।।२१।।**

**अन्वयार्थ** : अज्ञानमेघनिर्मुक्तः = अज्ञानरूपी मेघपटलातून मुक्त झालेला, पूर्णज्ञानसुधाकरः = परिपूर्ण ज्ञानरूपी चंद्र, आनन्दजलधेः = आनंदरूपी समुद्राच्या, वृद्धिं = भरतीला, अनुपश्यन् = पाहात, विभासते = विशेषत्वाने प्रकाशित होतो.

**भावार्थ** : अज्ञानरूपी मेघावरणापासून मुक्त झालेला शिवज्ञानरूपी पूर्णचंद्र निजानंदरूपी समुद्राला भरती आणून प्रकाशित होतो.॥२१॥

**ज्ञानचन्द्रोदये जाते ध्वस्तमोहतमोभराः।**
**पश्यन्ति परमां काष्ठां योगिनः सुखरूपिणीम्।।२२।।**

**अन्वयार्थ** : ज्ञानचन्द्रोदये = ज्ञानरूपी चंद्राचा उदय, जाते = झाल्यावर, ध्वस्तमोहतमोभराः = मोहरूपी अंधःकार नाहीसा झालेले, योगिनः = शिवयोगी, सुखरूपिणीम् = परमानंदस्वरूप, परमां काष्ठां = उत्कृष्ट अशा स्वस्वरूपस्थितीचा, पश्यन्ति = अनुभव घेतात.

**भावार्थ** : शिवज्ञानरूपी चंद्रोदय झाल्याने मोहरूपी गाढ अंधार नाहीसा होऊन शिवयोगी परमानंदरूपी स्वस्वरूपस्थितीचा अनुभव घेतो.॥२२॥

**मायारजन्या विरमे बोधसूर्ये प्रकाशिते।**
**निरस्तसर्वव्यापारश्चित्रं स्वपिति संयमी।।२३।।**

**अन्वयार्थ** : मायारजन्या: = मायारूपी रात्रीचे, विरमे = अवसान झाल्यावर, बोधसूर्ये = ज्ञानरूप सूर्य, प्रकाशिते = उदित झाल्यावर, संयमी = शिवयोगी, निरस्तसर्वव्यापार: = संपूर्ण व्यवहाररहित होऊन, स्वपिति = निद्रित होतो, चित्र = हे आश्चर्य आहे!

**भावार्थ** : संयमी असा शिवयोगी मायारूप रात्र संपून चिदादित्याचा उदय होताच सर्वव्यापारशून्य होऊन झोपतो, हे आश्चर्यच म्हणायचे! ज्या सांसारिक व्यवहारात सामान्य लोक जागे होऊन सर्व व्यवहार करतात, त्या व्यवहारापासून हा शिवयोगी अलिप्त राहतो.॥२३॥

**अनाद्यविद्याविच्छित्तिवेलायां परयोगिन:।**
**प्रकाशते परानन्द: प्रपञ्चेन विना कृत:।।२४।।**

**अन्वयार्थ** : अनाद्यविद्या = अनादी अशा अविद्येच्या, विच्छित्तिवेलायां = निवृत्तीच्या वेळी, परयोगिन: = परशिवयोग्याला, प्रपञ्चेन विना कृत: = प्रपंच-विरहित, परानन्द: = निरुपाधिक असा परमानंद, प्रकाशते = अनुभवास येतो.

**भावार्थ** : अनादी अशा अविद्येच्या निवृत्तीच्या वेळी त्या परयोग्यास प्रपंचाविना निरुपाधिक अशा परमानंदाचा अनुभव येतो.॥२४॥

**नित्यानन्दे निजाकारे विमले परतेजसि।**
**विलीनचेतसां पुंसां कुतो विश्वविकल्पना।।२५।।**

**अन्वयार्थ** : नित्यानन्दे = नित्यानंदस्वरूप, विमले = निर्मल, निजाकारे = निजस्वरूप अशा, परतेजसि = परशिव तेजात, विलीनचेतसां = चित्त विलीन झालेल्या, पुंसां = सत्पुरुषांना, विश्वविकल्पना = विश्वाची जाणीव, कुत: = कशी असेल?



**भावार्थ** : नित्यानंद आणि निर्मल अशा निजस्वरूपी चिदादित्यात ज्याचे मन विलीन झाले आहे, अशा शिवयोग्यास संसाराची जाणीव कशी राहू शकेल? अर्थात् राहणार नाही.॥२५॥

**कुतो ब्रह्मा कुतो विष्णु: कुतो रुद्र: कुतो रवि:।**
**साक्षात्कृतपरानन्दज्योतिष: साम्यकल्पना।।२६।।**

**अन्वयार्थ** : कुतो ब्रह्मा = कुठला ब्रह्म, कुतो विष्णु: = कुठला विष्णू, कुतो रुद्र: = कुठला रुद्र, कुतो रवि: = कुठला सूर्य, साक्षात्कृतपरानन्दज्योतिष: = प्रत्यक्ष लाभलेल्या आत्मस्वरूपानन्दाच्या तेजाशी कोणाच्याच, साम्यकल्पना = साम्याची कल्पना होऊ शकत नाही.

**भावार्थ** : कुठला ब्रह्मदेव, कुठला विष्णू, कुठला रुद्र आणि कुठला सूर्य! प्रत्यक्ष लाभलेल्या आत्मस्वरूपानंदाच्या तेजाची बरोबरी कोणीही करू शकत नाही. कारण या आत्मस्वरूपानंदाचे केवळ अंशच त्यांच्या ठिकाणी प्रकाशित होत असल्यामुळे त्या इतरांना मूळ आत्मानंदाची सर येत नाही.॥२६॥

**अपरोक्षपरानन्दविलासस्य महात्मन:।**
**ब्रह्मविष्ण्वादयो देवा विशेषा: सुखबिन्दव:।।२७।।**

**अन्वयार्थ** : महात्मन: = ज्ञानपादोदकसंपन्न शिवयोग्याच्या, अपरोक्षपरानन्द-विलासस्य = साक्षात्कार झालेल्या आनंदाच्या विस्तारसागराचे, ब्रह्मविष्णवापदय: = ब्रह्मा, विष्णू आदी, देवा: = देव, विशेषा: = विशेष, सुखबिन्दव: = सुखाचे बिंदू आहेत.

**भावार्थ** : आत्मस्वरूपाचा पूर्ण आनंद प्रत्यक्षपणे मिळविलेल्या श्रेष्ठ शिवयोग्याला ब्रह्मदेव, विष्णू वगैरे देवांना मिळणारी सुखे बिंदूसमान क्षुद्र वाटतात.॥२७॥

**यन्मात्रासहितं लोके वाञ्छन्ति विषयं नरा:।**
**तदप्रमेयमानन्दं परमं को न वाञ्छति।।२८।।**

**अन्वयार्थ** : लोके = ह्या जगात, नरा: = मनुष्ये, यस्य = ज्याच्या, मात्रा-सहितं = आनंदाच्या अंशाने युक्त, विषयं = विषयसुखाची, वाञ्छन्ति = इच्छा

करतात, तर तदप्रमेयं = त्या अपरिमित अशा, परमं = श्रेष्ठ, आनन्दं = आनंदाची, को न वाञ्छति = कोण इच्छा करणार नाही?

**भावार्थ** : चिदानंदाचे अंशमात्र सुख असलेल्या विषयसुखाची लोक अभिलाषा बाळगतात, तर अप्रमेय, अपरिमित अशा श्रेष्ठ चिदानंदाची अपेक्षा कोण करणार नाही? अर्थात् सर्वांनाच त्याची अपेक्षा असते.॥२८॥

**क्रियानिष्पत्तिस्थल - (८४)**

**परकाये क्रियापत्तिः कल्पितैव प्रकाशते।**
**रज्जौ भुजङ्गवद् यस्मात् क्रियानिष्पत्तिमानयम्।।२९।।**

**अन्वयार्थ** : परकाये = परब्रह्मशरीरी अशा शिवयोग्याची, क्रियापत्तिः = क्रिया, यस्मात् = ज्यामुळे, रज्जौ = दोरीवर, भुजङ्गवत् = सर्पाची, कल्पितैव = कल्पना केल्यासारखी, प्रकाशते = दिसते, त्यामुळे अयं = हा, क्रियानिष्पत्तिमान् = क्रियानिष्पत्तिमान म्हटला जातो.

**भावार्थ** : ज्ञानपादोदकसंपन्न अशा शिवयोग्याकडून होणाऱ्या क्रिया रज्जू (दोरी) वर सर्पाचा आभास होण्यासारख्या असतात, म्हणजे वास्तविक नसतात, अर्थात् त्यांच्यापासून फलनिष्पत्ती होत नाही. अशा कर्तृत्वभावरहित म्हणून फलविरहित क्रियासंपन्न शिवयोग्याला क्रियानिष्पत्तिमान म्हणतात.॥२९॥

**ज्ञानिनां यानि कर्माणि तानि नो जन्महेतवः।**
**अग्निदग्धानि बीजानि यथा नाङ्कुरकारणम्।।३०।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, अग्निदग्धानि = अग्नीत जळालेली, बीजानि = बीजे, नाङ्कुरकारणम् = अंकुराच्या उत्पत्तीला कारण होत नाहीत, तसे ज्ञानिनां = ज्ञानी लोकांची, यानि = जी, कर्माणि = पुण्यापापादी कर्मे असतात, तानि = ती, नो जन्महेतवः = जन्माचे कारण होत नाहीत.

**भावार्थ** : भाजलेले बीज जसे अंकुरोत्पत्तीला कारण होऊ शकत नाही, तसे ज्ञानाग्नीने दग्ध झालेले ज्ञानाचे कर्म त्याच्या पुनर्जन्माला कारण होत नाही.॥३०॥



**कर्मणा कृतेनापि ज्ञानिनो निरहङ्कृतेः।**
**विक्रिया प्रतिबिम्बस्था किं करोति हिमद्युतेः।।३१।।**

**अन्वयार्थ** : निरहङ्कृतेः = अहंकार नसलेल्या, ज्ञानिनः = ज्ञान्यांनी, कृतेनापि = केलेल्या, कर्मणा = कर्माने, किं = काय होईल?, प्रतिबिम्बस्था = प्रतिबिंबात असणारा, विक्रिया = विकार, हिमद्युतेः = बिंबरूप चंद्राला, किं करोति = काय करू शकतो?

**भावार्थ** : प्रतिबिंबात दिसणारे विकार बिंबरूप अशा चंद्राला जसे स्पर्श करीत नाहीत, तशा रीतीने 'मी करतो' अशा मूल अहंकाररहित शिवयोग्याची कर्मेही त्याच्यावर कसलाही परिणाम करीत नाहीत. अर्थात् त्या कर्माची फळे त्याला भोगावी लागत नाही?॥३१॥

**चन्द्रस्य मेघसम्बन्धाद् यथा गमनकल्पना।**
**तथा देहस्य सम्बन्धादारोप्या स्यात् क्रियात्मनः।।३२।।**

**अन्वयार्थ** : मेघसम्बन्धात् = मेघांच्या संबंधाने, यथा = जसे, चन्द्रस्य = चंद्राच्या, गमनकल्पना = जाण्याची कल्पना होते, तथा = तसे, देहस्य = देहाच्या, सम्बन्धात् = संबंधाने, आत्मनः = आत्म्यावर, क्रिया = क्रिया, आरोप्या स्यात् = आरोपिली जाते.

**भावार्थ** : आकाशात मेघांच्या चलनाने चंद्रच चालत आहे असे भासते, तसे आत्म्यावर देहसंबंधाने क्रियाकर्तृत्वाचा आरोप होतो. वास्तविक आत्मा कोणतेही कर्म करीत नाही.॥३२॥

**ज्ञानी कर्मनिरूढोऽपि लिप्यते न क्रियाफलैः।**
**घृतादिना यथा जिह्वा भोक्त्री चापि न लिप्यते।।३३।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, जिह्वा = जीभ, भोक्त्री चापि = उपभोग घेत असूनही, घृतादिना = घृतादिकांनी, न लिप्यते = लिप्त होत नाही, तसे ज्ञानी = शिवाद्वैतज्ञानी, कर्मनिरूढोऽपि = कर्मतत्पर असूनही, क्रियाफलैः = क्रियांच्या फलांनी, न लिप्यते = लिप्त होत नाही.

**भावार्थ** : तूप, तेल वगैरे सर्व पदार्थांची चव घेणारी जीभ जशी त्या पदार्थाच्या ओशटपणाने लिप्त होत नाही, तसेच ज्ञानी मनुष्य कर्म करीत असला तरी त्याची फले त्याला भोगावी लागत नाहीत.॥३३॥

**निरस्तोपाधिसम्बन्धे जीवे या या क्रियास्थितिः।**
**सा सा प्रतीतिमात्रेण निष्फला चात्र लीयते॥३४॥**

**अन्वयार्थ** : निरस्तोपाधिसम्बन्धे = मूल अहंकार उपाधीचा संबंध नसलेल्या, जीवे = जीवन्मुक्त जीवाची, या या = जी जी, क्रियास्थितिः = कृती आहे, सा सा = ती ती, प्रतीतिमात्रेण = दिसण्यापुरती असून, निष्फला = निष्फल होऊन, अत्र = त्याच्या आत्म्यात, लीयते = लय पावते.

**भावार्थ** : कर्मफलाचा प्रभाव होण्यासाठी 'मी कर्ता आहे' असा मूल अहंकार असावा लागतो. शिवयोग्याचा ठिकाणी असा अहंकार नसल्यामुळे ज्ञानस्वरूप असा तो जीवन्मुक्त जे जे कर्म करीत असल्याचे दिसते, ते ते निष्फळ होऊन आत्म्यात विलीन होते.॥३४॥

**गच्छंस्तिष्ठन् स्वपन् वापि न निष्कर्मास्ति कश्चन।**
**स्वभावो देहिनां कर्म ज्ञानिनां तत्तु निष्फलम्॥३५॥**

**अन्वयार्थ** : कश्चन = कोणीही, न निष्कर्मास्ति = निष्क्रिय नसतो, गच्छन् = जात असो, तिष्ठन् = थांगलेला असो, वापि = अथवा, स्वपन् = निद्रा करीत असो, कर्म = कर्म करणे, देहिनां = जीवांचा, स्वभाव = स्वभाव आहे, ज्ञानिनां तु = ज्ञानी लोकांचे, तत् = ते कर्म, निष्फलं = फलरहित असते.

**भावार्थ** : सर्व प्राणिमात्र चालणे, झोपणे इत्यादी जीवनावश्यक कर्मे करीतच असतात. तो त्यांचा स्वभावधर्मच असतो. परंतु ज्ञानी जनांनी केलेली कर्मे फलरहित असतात.॥३५॥

**परिपूर्णमहानन्दभाविनः शुद्धचेतसः।**
**न भवेत् कर्मकार्पण्यं नानाभोगफलप्रदम्॥३६॥**

**अन्वयार्थ** : शुद्धचेतसः = निर्मल अंतःकरणाचा, परिपूर्णमहानन्दभाविनः = नित्य परिपूर्ण अशा परानंदाचा अनुभव घेणाऱ्या शिवयोग्याला, नानाभोगफलप्रदं =



नानाप्रकारचे भोगरूपी फल देणाऱ्या, कर्मकार्पण्यं = पुण्यपापलक्षण कर्माची पीडा, न भवेत् = होत नाही.

**भावार्थ** : निर्मल अंतःकरणाच्या, नित्य परिपूर्ण आनंद अनुभवीत असणाऱ्या शिवयोग्याला नानाविध भोगफले देणाऱ्या पुण्यपापरूप कर्माची पीडा नसते.॥३६॥

**भावनिष्पत्तिस्थल - (८५)**

**भावः प्रतीयमानोऽपि परकाये तु कल्पितः।**
**शुक्तौ रजतवद् यस्माद्भावनिष्पत्तिमानयम्॥३७॥**

**अन्वयार्थ** : परकाये = परब्रह्मशरीरी अशा शिवयोग्याला, प्रतीयमानः = प्रतीत होणारा, भावः = भाव, यस्मात् = जसा, शुक्तौ = शिंपल्यातील, रजतवत् = चांदीप्रमाणे, कल्पितः = कल्पित असतो, तसा अयं = हा, भावनिष्पत्तिमान् = भावनिष्पत्तियुक्त असतो.

**भावार्थ** : क्रियानिष्पत्तीने परिशुद्ध झालेल्या परब्रह्मशरीरी शिवयोग्याच्या ठिकाणी दिसणारा भाव शिंपल्यामध्ये भासणाऱ्या चांदीसारखा केवळ प्रतीत होतो, म्हणून त्याला भावनिष्पत्तिमान् असे म्हणतात.॥३७॥

**भावेन नास्ति सम्बन्धः केवलज्ञानयोगिनः।**
**तथापि भावं कुर्वीत शिवे संसारमोचके॥३८॥**

**अन्वयार्थ** : केवलज्ञानयोगिनः = केवळ ज्ञानयोग्याला, भावेन = भावनेचा, सम्बन्धः = संबंध, नास्ति = नसतो, तथापि = तरीही, संसारमोचके = संसारातून मुक्त करणाऱ्या, शिवे = शिवाविषयी, भावं = भावना, कुर्वीत = करावी.

**भावार्थ** : केवळ ज्ञानयोगी असणाऱ्याला भावाचा संबंध नसतो. तरीही त्याने संसारमोचक अशा परमात्म्याच्या ठिकाणी भाव ठेवला पाहिजे.॥३८॥

**परिपूर्णप्रबोधेऽपि भावं शम्भौ न वर्जयेत्।**
**भावो हि निहितस्तस्मिन् भवसागरतारकः॥६९॥**

**अन्वयार्थ** : परिपूर्णप्रबोधेऽपि = परिपूर्ण ज्ञान प्राप्त झाले तरी, शम्भौ = शिवाविषयी, भावं = भाव, न वर्जयेत् = सोडू नये, तस्मिन् = त्या शिवाविषयी,

निहित: = ठेवलेला, भावो हि = भावच, भवसागरतारक: = संसारसागरातून तारणारा होतो.

**भावार्थ** : शिवयोगी परिपूर्ण ज्ञानानंदस्वरूप झाला तरी शिवभावना त्याने सोडू नये. कारण परशिवाच्या ठिकाणी ठेवलेली भावनाच संसारसागर तरून जाण्यास साहाय्यक होते हे प्रसिद्ध आहे.।।३९।।

**निवर्त्य जन्मजं दु:खं भाव: शैवो निवर्तते।**
**यथा काष्ठादिकं दग्ध्वा स्वयं शाम्यति पावक:।।४०।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसा, पावक: = अग्नी, काष्ठादिकं = लाकूड आदींना, दग्ध्वा = जळून, स्वयं = स्वत:, शाम्यति = शांत होतो, तसे शैव: = शिवासंबंधी, भाव: = भाव, जन्मजं = जन्मामुळे प्राप्त झालेल्या, दु:खं = दु:खाचे, निवर्त्य = निवारण करून, निवर्तते = स्वत: निवृत्त होतो.

**भावार्थ** : लाकडाच्या ठिकाणी प्रकट झालेला अग्नी जसा लाकडाला जाळून शेवटी स्वत:ही शांत होतो. तशा प्रकारे ह्या ज्ञानी शिवयोग्याच्या ठिकाणी उत्पन्न झालेला शिवभाव जन्मदु:ख अर्थात् भवरोगाला नाहीसा करून स्वत:ही नाहीसा होतो.।।४०।।

**प्रकाशिते शिवानन्दे तद्भावै: किं प्रयोजनम्।**
**सिद्धे साध्ये चिरेणापि साधनै: किं प्रयोजनम्।।४१।।**

**अन्वयार्थ** : चिरेणापि = बऱ्याच काळानंतर, साध्ये = साध्य वस्तू, सिद्धे = सिद्ध झाल्यावर, साधनै: = साधनांचे, किं प्रयोजनम् = काय प्रयोजन असते, तसे शिवानन्दे = नित्य असा शिवानंद, प्रकाशिते = प्रकट झाल्यावर, तद्भावै: = त्या शिवभावनांचे, किं प्रयोजनम् = काय प्रयोजन?

**भावार्थ** : साध्य करावयाची वस्तू बऱ्याच काळानंतर सिद्ध झाल्यावर ज्याप्रमाणे साधनाचे प्रयोजन परत नाही, तशा प्रकारे भवरोगाची निवृत्ती होऊन नित्यानंदाची प्राप्ती झाल्यावर शिवभावाचे काय प्रयोजन? अर्थात् काही प्रयोजन नाही.।।४१।।



**एकीकृते शिवे भावे ज्ञानेन सह संयमी।**
**विस्मितात्मसमावेश: शिवभावे विभासते।।४२।।**

**अन्वयार्थ** : शिवे भावे = शिवभावना, ज्ञानेन सह = ज्ञानासह, एकीकृते = समरस झाल्यावर, संयमी = तो भावनिष्पत्तीचा शिवयोगी, विस्मितात्मसमावेश: = आश्चर्यकारक स्वस्वरूपात समाविष्ट होऊन, शिवभावे = सोऽहं या भावनेने, विभासते = प्रकाशित होतो.

**भावार्थ** : भावाचे ज्ञानासह अपरोक्ष अशा परशिवामध्ये ऐक्य होऊन भावनिष्पत्ती झालेला शिवयोगी आश्चर्यकारक स्वस्वरूप अनुसंधानयुक्त होऊन शिवोऽहं अशा भावरूपाने प्रकाशतो.।।४२।।

**न भावेन विना ज्ञानं न भावो ज्ञानमन्तरा।**
**मोक्षाय कारणं प्रोक्तं तस्मदुभयमाश्रयेत्।।४३।।**

**अन्वयार्थ** : भावेन विना = भावनेशिवाय, न ज्ञानं = वृत्त्यात्मक ज्ञान होत नाही, ज्ञानमन्तरा = ज्ञानाशिवाय, न भाव: = भावना होत नाही, तस्मात् = म्हणून, मोक्षाय = मुक्तीसाठी, कारणं = कारण म्हणून, प्रोक्तं = सांगितलेल्या, तदुभयं = त्या दोहोंचा, आश्रयेत् = आश्रय करावा.

**भावार्थ** : भाव नसेल तर ज्ञान होत नाही व ज्ञानाशिवाय भाव होत नाही. मोक्षासाठी भाव व ज्ञान हे दोन्ही असले पाहिजेत. म्हणून हे दोन्ही प्राप्त करून घ्यावेत.।।४३।।

### ज्ञाननिष्पत्तिस्थल - (८६)

**ज्ञानस्य व्यवहारेऽपि ज्ञेयाभावात् स्वभावत:।**
**स्वप्नवज्ज्ञाननिष्पत्त्या ज्ञाननिष्पन्न इत्यसौ।।४४।।**

**अन्वयार्थ** : ज्ञानस्य = ज्ञानाच्या, व्यवहारेऽपि = व्यवहारात असला तरी, स्वभावत: = दृढ रूपाने, ज्ञेयभावात् = ज्ञेय वस्तूंचा अभाव असल्यामुळे, स्वप्नवत् = स्वप्नासारखे, ज्ञाननिष्पत्त्या = ज्ञान होत असल्याने, असौ = हा भावनिष्पन्न शिवयोगी, ज्ञाननिष्पन्न: = ज्ञाननिष्पन्न, इति = असे म्हटला जातो.

**भावार्थ** : स्वस्वरूपज्ञानामध्ये विलीन झालेल्या शिवयोग्याला बाह्य प्रपंचात जाणून घेण्यासारखी कोणतीही वस्तू नसल्याने त्याचे व्यावहारिक ज्ञान स्वप्नातील ज्ञानाप्रमाणे विलय पावते. अशा रीतीने त्याचे व्यवहाराचे ज्ञान स्वस्वरूपज्ञानात विलीन झाले असल्यामुळे त्याला ज्ञाननिष्पत्तिमान म्हणतात.॥४४॥

**स्वप्नजातं यथा ज्ञानं सह स्वार्थैर्निवर्तते।**
**तथात्मनि प्रकाशे तु ज्ञानं ज्ञेयं निवर्तते।।४५।।**

**अन्वयार्थ** : स्वप्नजातं = स्वप्नात उत्पन्न झालेले, ज्ञानं = ज्ञान, यथा = जसे, स्वार्थैः सह = आपल्या विषयवस्तूंसह, निवर्तते = नाहीसे होते, तथा = तसे, आत्मनि = स्वस्वरूपाचे, प्रकाशे तु = ज्ञान झाल्यावर, ज्ञानं = जाग्रत तसे अवस्थेतील ज्ञान, आणि ज्ञेयं = ज्ञेय प्रपंच, निवर्तते = निवृत्त होतात.

**भावार्थ** : स्वप्नातून जागा झालेल्या व्यक्तीला ज्याप्रमाणे स्वप्नपदार्थ आणि त्यांचे ज्ञान दोन्हीही नाहीसे होतात, त्याप्रमाणे स्वस्वरूपज्ञान प्रकाशित झाल्यावर जागृत व्यवहारातील पदार्थ आणि त्यांचे ज्ञान, दोन्हीही विलय पावतात.॥४५॥

**परिपूर्णे महानन्दे परमाकाशलक्षणे।**
**शिवे विलीनचित्तस्य कुतो ज्ञेयान्तरे कथा।।४६।।**

**अन्वयार्थ** : परिपूर्णे = परिपूर्ण, महानन्दे = महानंदस्वरूप, परमाकाश-लक्षणे = परमाकाशरूप, शिवे = परशिवामध्ये, विलीनचित्तस्य = चित्त विलीन झालेल्याला, ज्ञेयान्तरे = जाणण्यायोग्य अशा दुसऱ्या वस्तूचा, कथा = व्यवहार, कुतः = कोठून असणार?

**भावार्थ** : परिपूर्ण, महानंदस्वरूप असलेल्या परमाकाशरूप परशिवामध्ये चित्त विलीन झालेल्या शिवयोग्याला जाणून घेण्यासारखा दुसरा कोणता पदार्थ आहे? अर्थात् कोणताही नाही.॥४६॥

**अखण्डानन्दसंवित्तिस्वरूपं ब्रह्म केवलम्।**
**मिथ्या तदन्यदित्येषा स्थितिर्ज्ञानमिहोच्यते।।४७।।**



**अन्वयार्थ** : अखण्डानन्दसंवित्तिस्वरूपं = अखंड आनंद आणि ज्ञानस्वरूप असा, ब्रह्म = परशिवब्रह्म, केवलम् = एकच आहे, तदन्यत् = त्याहून भिन्न, मिथ्या = सर्व मिथ्या आहे, इत्येषा = अशी, स्थितिः = स्थिती, ज्ञानं = ज्ञान म्हणून, इह = येथे, उच्यते = सांगितले जाते.

**भावार्थ** : परशिव हे पर्यायनाव असलेले परब्रह्मच अखंड सच्चिदानंद-स्वरूप आहे, त्याशिवाय भिन्न असलेले सर्व मिथ्या आहे, असे जाणून घेणे हेच ज्ञान होय. म्हणजेच त्या शिवयोग्याचे ज्ञान हे सर्वत्र शिवस्वरूप पाहणारे असते.॥४७॥

**सत्तात्मनानुवृत्तं यद् घटादिषु परं हि तत्।**
**व्यावर्तमाना मिथ्येति स्थितिर्ज्ञानमिहोच्यते।।४८।।**

**अन्वयार्थ** : सत्तात्मना = सद्रूप ब्रह्माहून, परं = भिन्न, घटादिषु = घटपटादी वस्तूंमध्ये, अनुवृत्तं = अनुगत राहाणारे, यद् = जे नामरूप आहे, तत् = ते, मिथ्येति = मिथ्या म्हणून, व्यावर्तमाना = व्यावृत करणाऱ्या, स्थितिः = स्थितीला, इह = येथे, ज्ञानं = ज्ञान म्हणून, उच्यते = म्हटले जाते.

**भावार्थ** : सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी सद्रूप असे ब्रह्म होते, या श्रुतीच्या वचनानुसार ते सद्रूप परब्रह्मच घटपटादी वस्तूंमध्ये अनुस्यूत आहे. असे सर्व पदार्थामध्ये अनुस्यूत असलेले ब्रह्मच सत्य होय. त्याखेरीज पदार्थांची नामरूपे ही मिथ्या समजावी. अशा रीतीने पदार्थांची नामरूपे व्यावर्त करून परब्रह्माचे सत्यरूप ओळखणे हेच ज्ञान होय.॥४८॥

**अकारणमकार्यं यदशेषोपाधिवर्जितम्।**
**तद्ब्रह्म तदहं चेति निष्ठा ज्ञानमुदीर्यते।।४९।।**

**अन्वयार्थ** : अकारणमकार्यं = कार्यकारणभावरहित, अशेषोपाधिवर्जितम् = समस्त उपाधीरहित, यद् = जे आहे, तद् ब्रह्म = ते ब्रह्मरूप आहे, च = आणि, तत् = ते, अहं = मी आहे, इति = अशा, निष्ठा = निष्ठेला, ज्ञानं = ज्ञान म्हणून, उदीर्यते = म्हटले जाते.

**भावार्थ** : कार्यकारणभावविहीन, सकलउपाधिविरहित जे परब्रह्म आहे तेच मी आहे आणि तेच चराचर प्रपंचही आहे, अशी होणारी दृढनिष्ठा हीच शिवाद्वैतसिद्धान्तानुसार उत्कृष्ट ज्ञान होय. ब्रह्माद्वैती प्रपंचाला मिथ्या मानून परब्रह्मालाच सत्य म्हणतात. परंतु शिवाद्वैतसिद्धान्तात प्रपंचालाही परब्रह्मस्वरूपच समजतात.

**ज्ञाताप्यहं ज्ञेयमिदमिति व्यवहृतिः कुतः।**
**अभेदब्रह्मस्वारस्ये निरस्ताखिलवस्तुनि।।५०।।**

**अन्वयार्थ** : निरस्ताखिलवस्तुनि = समस्त प्रापंचिक भेदरहित, अभेदब्रह्मस्वारस्ये = अद्वितीय अशा ब्रह्मसामरस्यात, अहं ज्ञाता = मी ज्ञाता आहे, इदं ज्ञेयं = हे ज्ञेय आहे, इति = अशा रीतीचा, व्यवहृतिः = व्यवहार, कुतः = कसा होईल?

**भावार्थ** : प्रापंचिक भेदरहित अशा अद्वितीय परब्रह्मात सामरस्यप्राप्ती करून घेणाऱ्याला, मी ज्ञाता आणि हे ज्ञेय असा व्यवहार कसा असू शकेल? अर्थात् असणे संभवत नाही.॥५०॥

**पिण्डाकाशस्थल - (८७)**

**यथा पिण्डस्थ आकाशस्तथात्मा पूर्ण उच्यते।**
**एतदर्थविवेको यः पिण्डाकाशस्थलं विदुः।।५१।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, पिण्डस्थः = शरीरात राहणारे, आकाशः = आकाश, पूर्णः = पूर्ण म्हणून, उच्यते = म्हटले जाते, तथा = तसे, पिंडात राहणारा, आत्मा = आत्मासुद्धा पूर्ण आहे, एतदर्थविवेकः = या विषयीचा विवेक, यः = जो आहे, त्याला पिण्डाकाशस्थलं = पिंडाकाशस्थल असे, विदुः = शिवयोगी जाणतात.

**भावार्थ** : अखंड परिपूर्ण असे आकाश पिंडामध्ये अर्थात् देहात जसे असते तसे आत्मा हा देहस्थ असला तरी तो परिपूर्णच होय, असा विवेक ज्ञाननिष्पत्तिसंपन्न शिवयोग्याला असणे यालाच पिंडाकाशस्थल असे म्हणतात.॥५१॥



**घटोपाधिर्यथाकाशः परिपूर्णः स्वरूपतः।**
**तथा पिण्डस्थितो ह्यात्मा परिपूर्णः प्रकाशते।।५२।।**

**अन्वयार्थ** : घटोपाधिः = घट उपाधीने युक्त, आकाशः = आकाश यथा = जसे, स्वरूपतः = स्वभावता, परिपूर्णः = व्यापक असते, तथा = तसे, पिण्डस्थितः = शरीरात राहणारा, आत्मा हि = आत्मासुद्धा, परिपूर्णः = परिपूर्ण असून, प्रकाशते = प्रकाशित होतो.

**भावार्थ** : घटोपाधीने युक्त आकाश ज्याप्रकारे स्वरूपतः पूर्ण असते, तसेच शरीरस्थ असणारा सच्चिदानंदस्वरूप आत्माही परिपूर्ण होऊन प्रकाशतो.॥५२॥

**अन्तःस्थितं पराकाशं शिवमद्वैतलक्षणम्।**
**भावयेद् यः सुमनसा पिण्डाकाशः स उच्यते।।५३।।**

**अन्वयार्थ** : अद्वैतलक्षणं = अद्वितीय, पराकाशं = पराकाशस्वरूप, अन्तःस्थितं = हृदयात राहणाऱ्या, शिवं = परशिवाला, यः = जो, सुमनसा = शुद्ध मनाने, भावयेत् = भावना करतो, सः = तो, पिण्डाकाशः = पिंडाकाश म्हणून, उच्यते = म्हणविला जातो.

**भावार्थ** : हृदयात असणाऱ्या पराकाशस्वरूप अद्वितीय अशा परशिवाचे निरालंब मनाने जो ध्यान करतो त्यालाच पिंडाकाश असे म्हणतात.॥५३॥

**शिवागारमिदं प्रोक्तं शरीरं बोधदीपितम्।**
**षट्त्रिंशत्तत्त्वघटितं सुमनःपद्मपीठकम्।।५४।।**

**अन्वयार्थ** : षट्त्रिंशत्तत्वघटितं = छत्तीस तत्त्वरूपी खांब आणि भिंतींनी निर्मित, सुमनःपद्मपीठकम् = निर्मल हृदयरूपी पद्मपीठाने युक्त, बोधदीपितम् = ज्ञानदीपाने प्रकाशित झालेले, इदं शरीरं = हे शरीर, शिवागारं = शिवमंदिर म्हणून, प्रोक्तं = म्हटले आहे.

**भावार्थ** : शिवादिभूम्यंत छत्तीस तत्त्वरूप खांब, भिंती इत्यादींनी बनलेले, हृदयरूपी कमलासनाने युक्त, तसेच ज्ञानदीपाने उजळलेले हे शरीरच देवालय होय.॥५४॥

**पराकाशस्वरूपेण प्रकाशः परमेश्वरः।**
**हृदाकाशगुहालीनो दृश्यतेऽन्तः शरीरिणाम्।।५५।।**

**अन्वयार्थ** : पराकाशस्वरूपेण = चिदाकाशरूपाने, प्रकाश: = प्रकाशणारा, परमेश्वर: = परमेश्वर, शरीरिणाम् = जीवांच्या, अन्त: = आत असणाऱ्या, हृदयाकाशगुहालीन: = हृदयाकाशरूपी गुहेत लीन होऊन, दृश्यते = ज्ञानी जनांना प्रत्ययास येतो.

**भावार्थ** : अशा शिवालयरूप प्राण्याच्या देहातील हृदयगुहेत लीन होऊन ज्ञानप्रकाशस्वरूपाने स्थित परशिव गुरूपदेशप्राप्त व्यक्तीला गोचर होतो.।।५६।।

**एतच्छिवपुरं प्रोक्तं सप्तधातुसमावृतम्।**
**अत्र हृत्पङ्कजं वेश्म सूक्षाम्बरमनोहरम्।।५६।।**
**तत्र सन्निहितं साक्षात् सच्चिदानन्दलक्षणम्।**
**नित्यसिद्धं प्रकाशात्मा जलस्थाकाशवच्छिवः।।५७।।**

**अन्वयार्थ** : सप्तधातुसमावृतम् = सप्तधांतूनी निर्मित, एतत् = हे शरीर, शिवपुरं = शिवपुर म्हणून, प्रोक्तं = म्हटले जाते, अत्र = येथे, सूक्ष्माम्बरमनोहरं = सूक्ष्माकाराने मनोहर असे, हृत्पङ्कजं = हृदयकमल, वेश्म = अंत:पुर होय, तत्र = तेथे, नित्यसिद्ध: = नित्य सिद्ध असणारा, सच्चिदानन्दलक्षण: = सच्चिदानंदरूप, शिव: = परशिव, जलस्थाकाशवत् = जलांतर्गत आकाशाप्रमाणे, साक्षात् = साक्षात, प्रकाशात्मा = प्रकाशरूपाने, सन्निहित: = स्थित आहे.

**भावार्थ** : सप्तधातूंनी निर्मित हा स्थूल देहच शिवाची राजधानी होय. त्यात असलेले हृदयकमल हेच राजगृह, त्यातील सूक्ष्माकाश हे अंत:पुर. त्यात नित्य परिपूर्णतेने सच्चिदानंदरूप परशिव निर्मल जलात दिसणाऱ्या आकाशप्रमाणे प्रकाशमान होऊन स्थित असतो.।।५६-५७।।

**अन्तराकाशबिम्बस्थमशेषोपाधिवर्जितम् ।**
**घटाकाश इव च्छिन्नं भावयेच्चिन्मयं शिवम्।।५८।।**



**अन्वयार्थ** : अन्तराकाशबिम्बस्थं = हृदयाकाशात असणाऱ्या, अशेषोपाधिवर्जितं = सर्व उपाधीरहित, चिन्मयं = चिद्रूप अशा, शिवं = शिवाला, घटाकाश इव = घटाकाशाप्रमाणे, च्छिन्नं = परिच्छिन्न रूपाने, भावयेत् = भावना करावी.

**भावार्थ** : अखंड असणारे आकाश घटरूप उपाधीने घटाकाश म्हणून जसे ओळखले जाते, तसा सकलोपाधिविहीन, चिन्मय असा परशिवच शरीरात असलेल्या सूक्ष्माकार हृदयाकाशात स्थित होऊन त्याच्या उपाधीने परिच्छिन्न होऊन दिसतो असे जाणावे.।।५८।।

**बिन्द्वाकाशस्थल - (८८)**

**यथाकाशो विभुर्ज्ञेयः सर्वप्राण्युपरि स्थितः।**
**तथात्मेत्युपमानार्थं बिन्द्वाकाशस्थलं विदुः।।५९।।**

**अन्वयार्थ** : सर्वप्राण्युपरि स्थित: = सर्व प्राण्यांच्या वर असलेले, आकाश: = आकाश, यथा = जसे, विभु: = व्यापक म्हणून, ज्ञेय: = जाणण्यायोग्य आहे, तथा = तसे, आत्मा = पिंडाकाशसंपन्न शिवयोग्याचा आत्माही होय, इति = अशा रीतीने, उपमानार्थं = उपमा देण्यासाठी, बिन्द्वाकाशस्थलं = बिंद्वाकाश स्थल आहे असे, विदु: = ज्ञानी लोक सांगतात.

**भावार्थ** : सर्व प्राणिमात्रांच्या वर असलेले आकाश जसे सर्वव्यापक असते, तसा पिंडाकाशस्थलसंपन्न अशा शिवयोग्याचा आत्मा सर्वव्यापक असतो, म्हणून त्याना बिंद्वाकाशस्थल असे म्हणतात. येथे ज्ञान्याच्या आत्म्याचे स्वरूप आकाशाच्या उपमानाने विशद केले असल्यामुळे याला बिंद्वाकाशस्थल म्हणतात.।।५९।।

**यथैको वायुराख्यातः सर्वप्राणिगतो विभुः।**
**तथात्मा व्यापकः साक्षात् सर्वप्राणिगतः स्वयम्।।६०।।**

**अन्वयार्थ** : सर्वप्राणिगत: = सर्व प्राण्यांमध्ये राहाणारा, विभु: = व्यापक, वायु: = वायू, यथा = जसा, एक: = एकच म्हणून, आख्यात: = म्हटला जातो, तथा = तसा, साक्षात् = प्रत्यक्ष, सर्वप्राणिगत: = सर्व प्राण्यांमध्ये राहणारा, आत्मा स्वयं = आत्माही, व्यापक: = व्यापक आहे.

**भावार्थ** : सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी प्राणवायूच्या रूपाने असलेला वायू जसा एकच असतो, तसा एकच असणारा व्यापक आत्मा सर्व प्राणिमात्रांमध्ये 'अहम्' रूपाने वास करतो.॥६०॥

**यथा वह्नेरमेयात्मा सर्वत्रैकोऽपि भासते।**
**तथा शम्भुः समस्तात्मा परिच्छेदविवर्जितः॥६१॥**

**अन्वयार्थ** : अमेयात्मा = अपरिमित असा, वह्निः = अग्नी, एकोऽपि = एकच असला तरी, यथा = जसा, सर्वत्र = सगळीकडे, भासते = प्रकाशित होतो, तथा = तसा, समस्तात्मा = सर्वांचा आत्मरूप असा, शम्भुः = शिव, परिच्छेद-विवर्जितः = परिच्छेदरहित आहे.

**भावार्थ** : अपरिमितस्वरूप असा एकच अग्नी, दावाग्नी, वडवाग्नी, वीज, कालाग्नी इत्यादी रूपाने प्रपंचव्यापक होऊन प्रकाशतो, तसा सर्वचैतन्यरूप, ज्ञानमय परमेश्वर एकच असला तरी देवदानवमानवादी सकल चराचरात्मक प्राणिवर्गात व्यक्ताव्यक्त स्वरूपात 'अहम्' रूपाने व्यापून असतो.॥६१॥

**सर्वेषां देहिनामन्तश्चित्ततोऽयं प्रकाशते।**
**तस्मिन् प्रतिफलत्यात्मा शिवो दर्पणवद् विभुः॥६२॥**

**अन्वयार्थ** : सर्वेषां = सर्व, देहिनां = जीवांच्या, अन्तः = आत, चित्ततोयं = चित्तरूपी जल, प्रकाशते = प्रकाशित होते, तस्मिन् = त्यात, विभुः = व्यापक असा, शिवः = शिव, दर्पणवत् = दर्पणातल्या प्रमाणे, आत्मा = आत्मरूपाने, प्रतिफलति = प्रतिबिंबित होतो.

**भावार्थ** : सर्व जीवांच्या हृदयात चित्तरूपी निर्मल जल विद्यमान असते. आरशात बिंबाचे प्रतिबिंब दिसल्याप्रमाणे त्या चित्तरूपी निर्मल जलात व्यापक असा परशिव आत्म्याच्या रूपाने प्रतिबिंबित होतो.॥६२॥

**एको वशीकृतः संवित्प्रकाशात्मा परात्परः।**
**सर्वप्राणिगतो भाति तथापि विभुरुच्यते॥६३॥**



**अन्वयार्थ** : परात्परः = पराशक्तीपेक्षा श्रेष्ठ, वशीकृतः = स्वतंत्र, संवित्प्रकाशात्मा = चित्प्रकाशरूप शिव, एकः = एकच, सर्वप्राणिगतः = सर्व प्राण्यांच्या हृदयात असून, भाति = प्रतीत होतो, तथापि = तरीसुद्धा, विभुः = व्यापक म्हणून, उच्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : पराशक्तीपेक्षा श्रेष्ठ, ज्ञानप्रकाशरूप एकमेवाद्वितीय असा शिव सर्व प्राणिमात्रांच्या हृदयकमलात वास करून परिच्छिन्न दिसत आत्मा असला तरी तो सर्वव्यापक आहे.॥६३॥

**एक एव यथा सूर्यस्तेजसा भाति सर्वगः।**
**तथात्मा शक्तिभेदेन शिवः सर्वगतो भवेत्॥६४॥**

**अन्वयार्थ** : सूर्यः = सूर्य, एक एव = एकच असला तरी, तेजसा = आपल्या तेजाने, यथा = जसा, सर्वत्र = व्यापक रूपाने, भाति = भासतो, तथा = तसा, शिवः = शिवस्वरूप, आत्मा = परमात्मा, शक्तिभेदेन = आपल्या इच्छाज्ञानादी शक्तिभेदाने, सर्वगतः = व्यापक, भवेत् = होतो.

**भावार्थ** : सूर्य एकच असला तरी आपल्या तेजाने सर्व जगाला व्यापक होऊन बर्फ वितळण्यास, पाऊस येण्यास जसा कारण होतो, तसा शिवस्वरूप आत्मा आपल्या इच्छा, ज्ञान, क्रियाशक्तींनी सर्व जग व्यापून असतो. बिंदुरूप असा शिवच आकशप्रमाणे व्यापक आहे असे जाणणे हे बिंद्वाकाशस्थल होय.॥६४॥

### महाकाशस्थल - (८९)

**पिण्डाण्डस्थं महाकाशं न भिन्नं तद्वदात्मनः।**
**अभिन्नः परमात्मेति महाकाशस्थलं विदुः॥६५॥**

**अन्वयार्थ** : पिण्डाण्डस्थं = पिंडांडात राहणारे, आकाशं = आकाश, यथा = जसे, न भिन्नं = महाकाशापेक्षा भिन्न नाही, तद्वत् = त्याप्रमाणे, आत्मनः = आत्म्याशी, परमात्मा = परमात्मा, अभिन्नः = अभिन्न आहे, इति = असे जाणणे हेच, महाकाशस्थलं = महाकाश स्थल म्हणून, विदुः = जाणतात.

**भावार्थ** : पिंडांडात राहाणारे आकाश जसे महाकाशापेक्षा भिन्न नाही त्याप्रमाणे बिंद्वाकाशस्थलसंपन्न अशा शिवयोग्याचे आत्मचैतन्यही

परमात्म्यापेक्षा निराळे नाही असे समजणे हेच महाकाशस्थल, असे ज्ञानी समजतात.॥६५॥

**यथा न भिन्नमाकाशं घटेषु च मठेषु च।**
**तथाण्डेषु पिण्डेषु स्थितो ह्यात्मा न भिद्यते।।६६।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, घटेषु = घटातील, च = आणि, मठेषु = मठातील, आकाशं = आकाश, न भिन्नं = भिन्न नसते, तथा = तसे, अण्डेषु = ब्रह्मांडातील, च = आणि, पिण्डेषु = पिंडातील, स्थितः = असलेला, आत्मा हि = आत्मासुद्धा, न भिद्यते = भिन्न नसतो.

**भावार्थ** : आकाश घटातील असो की मठातील, ते परस्परापासून जसे वेगळे नसते, तसा आत्माही ब्रह्मांड आणि पिंडांडामध्ये व्यापलेला असला तरी तो एकच असून भिन्न नसतो.॥६६॥

**अनिर्देश्यमनौपम्यमवाङ्मानसगोचरम्।**
**सर्वतोमुखसम्पन्नं सत्तानन्दं चिदात्मकम्।।६७।।**
**कालातीतं कलातीतं क्रमयोगादिवर्जितम्।**
**स्वानुभूतिप्रमाणस्थं ज्योतिषामुदयस्थलम्।।६८।।**
**शिवाख्यं परमं ब्रह्म परमाकाशलक्षणम्।**
**लिङ्गमित्युच्यते सद्भिर्यद्विना न जगत्स्थितिः।।६९।।**

**अन्वयार्थ** : अनिर्देश्यं = दाखविण्यास अशक्य, अनौपम्यं = अनुपमेय, अवाङ्मानसगोचरं = वाणी आणि मनाला गोचर न होणारा, सर्वतोमुखसम्पन्नं = सर्वतोमुखी, सत्तानन्दं = सदानंदरूप, चिदात्मकं = चिद्रूप, कालातीतं = कालत्रयातीत, कलातीतं = अडतीस कलांच्या पलीकडील, क्रमयोगादिवर्जितं = उत्पत्त्यादी क्रमसंबंधरहित, स्वानुभूतिप्रमाणस्थं = अनुभूतिप्रमाणास वेद्य, ज्योतिषामुदयस्थलं = सूर्यादी ज्योतींचे उदयस्थान, परमाकाशलक्षणम् = परमाकाशरूपी, शिवाख्यं = शिव नावाचे, परमं ब्रह्म = परब्रह्म, सद्भिः = सत्पुरुषांकडून, लिङ्गमिति = महालिंग म्हणून, उच्यते = म्हटले जाते, यद्विना = ज्याच्याशिवाय, न जगत्स्थितिः = जगाचे अस्तित्व राहू शकत नाही.



**भावार्थ** : जे दाखविता येत नाही, अनुपम, वाणीला आणि मनाला अगोचर, सर्वतोमुखी, सच्चिदानंदलक्षणयुक्त, भूतादिकालत्रयातीत, अडतीस कलांच्या पलीकडील, उत्पत्ति-स्थित्यादिक्रमसंबंधरहित, स्वस्वरूपाने मात्र गम्य असे, सूर्यादितेजोवलयांचे जन्मस्थान असणारे, शिव या नावाचे परमाकाश स्वरूप असणारे ते परब्रह्मच महालिंग होय, असे सत्पुरुष सांगतात. असे महालिंग नसते तर हे जगच नसते. म्हणजे हे महालिंगच जगाचे अधिष्ठान आहे.॥६७-६९॥

**परमाकाशमव्यक्तं प्रबोधानन्दलक्षणम्।**
**लिङ्गं ज्योतिर्मयं प्राहुर्लीयन्ते यत्र योगिनः।।७०।।**

**अन्वयार्थ** : यत्र = जेथे, योगिनः = शिवयोगी, लीयन्ते = मुक्तावस्थेत विलय पावतात, त्या अव्यक्तं = अप्रकट, प्रबोधानन्दलक्षणम् = ज्ञानानंदस्वरूप, परमाकाशं = परमाकाशाला, ज्योतिर्मयं = ज्योतिस्वरूप, लिङ्गं = महालिंग असे, प्राहुः = म्हणतात.

**भावार्थ** : ज्या महाकाशरूप महालिंगात शिवयोगी ऐक्य पावतो, त्या सच्चिदानंदलक्षणयुक्त अशा परमाकाशाला सत्पुरुष ज्योतिर्मयलिंग, अर्थात् ज्योतिर्लिंग या नावाने ओळखतात.॥७०॥

**संविदेव परा काष्ठा परमानन्दरूपिणी।**
**तामाहुः परमाकाशं मुनयो मुक्तसंशयाः।।७१।।**

**अन्वयार्थ** : परमानन्दरूपिणी = परमानंदस्वरूप, परा काष्ठा = सर्वोत्कृष्ट अशा, संविदेव = चैतन्यालाच, मुक्तसंशयाः = संशयरहित, मुनयः = वसिष्ठादी महर्षी, तां = त्या चैतन्याला, परमाकाशं = परमाकाश म्हणून, आहुः = म्हणतात.

**भावार्थ** : परमानंदस्वरूप अशा सर्वोत्कृष्ट चैतन्यालाच संशयरहित झालेले वसिष्ठादी ऋषिगण महाकाश या नावाने ओळखतात.॥७१॥

**तरङ्गादि यथा सिन्धोः स्वरूपान्नातिरिच्यते।**
**तथा शिवाच्चिदाकाशाद् विश्वमेतन्न भिद्यते।।७२।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, सिन्धोः = समुद्राचे, तरङ्गादि = तरंगादी, स्वरूपात् = समुद्राच्या स्वरूपापासून, नातिरिच्यते = भिन्न होत नाहीत, तथा = तसे, चिदाकाशात् = चिदाकाशरूपी, शिवात् = शिवापासून, एतत् = हे, विश्वं = विश्व, न भिद्यते = भिन्न होत नाही.

**भावार्थ** : समुद्रातील तरंगादी जसे समुद्रस्वरूपापेक्षा वेगळे नसतात, तसे चिदाकाशस्वरूप असलेल्या शिवापेक्षा हे विश्व भिन्न नाही.॥७२॥

**यथा पुष्पपलाशादि वृक्षरूपान्न भिद्यते।**
**तथा शिवात् पराकाशाज्जगतो नास्ति भिन्नता।।७३।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, पुष्पपलाशादि = फुले, पाने इत्यादी, वृक्षरूपात् = वृक्षापेक्षा, न भिद्यते = भिन्न नसतात, तथा = तसे, परमाकाशात् = परमाकाशरूपी, शिवात् = शिवापेक्षा, जगतः = जगाची, भिन्नता = भिन्नता, नास्ति = नाही.

**भावार्थ** : वृक्षापासून निर्माण झालेली पाने, फुले वगैरे त्या वृक्षापासून जशी भिन्न नसतात, तशा प्रकारे पराकाशस्वरूप अशा परशिवापासून उत्पन्न झालेले हे जग त्याच्यापेक्षा वेगळे नाही.॥७३॥

**यथा ज्योतींषि भासन्ते भूताकाशे पृथक्पृथक्।**
**तथा भान्ति पराकाशे ब्रह्माण्डानि विशेषतः।।७४।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, भूताकाशे = आकाशात, ज्योतींषि = नक्षत्रे, पृथक् पृथक् = वेगवेगळी, भासन्ते = प्रकाशित होतात, तथा = तसे, पराकाशे = परमाकाशात, ब्रह्माण्डानि = ब्रह्मांडे, विशेषतः = विशेष रूपाने, भान्ति = प्रकाशतात.

**भावार्थ** : या दिसणाऱ्या भूताकाशामध्ये जशी भिन्न भिन्न नक्षत्रे प्रकाशतात, तशा प्रकारे या महाकाशात अनेक ब्रह्मांडे दिसतात.॥७४॥

**निरस्तोपाधिसम्बन्धं निर्मलं संविदात्मकम्।**
**पराकाशं जगच्चित्रविलासालम्बभित्तिकाम्।।७५।।**

**अन्वयार्थ** : निरस्तोपाधिसम्बन्धं = उपाधीचा संबंध नसलेला, निर्मलं = मलरहित, संविदात्मकं = प्रकाशस्वरूप, पराकाशं = परमाकाशरूपी परमात्मा,



जगच्चित्र = जगज्जालरूपी चित्राच्या, विलास = विस्ताराला, आलम्बभित्तिकम् = आधारभूत भिंतीसारखा आहे.

**भावार्थ** : सकलोपाधिरहित, मलरहित आणि ज्ञानस्वरूप असणारे ते महाकाश हे जगज्जालरूपी चित्ररेखनासाठी आधारभूत अशा भिंतीसारखे आहे.॥७५॥

**क्रियाप्रकाशस्थल - (१०)**

**शिवस्य परिपूर्णस्य चिदाकाशस्वरूपिणः।**
**आत्मत्वेनानुसन्धनात् क्रियाद्योतनवान् यमी।।७६।।**

**अन्वयार्थ** : यमी = महाकाशस्वरूपी शिवयोगी, चिदाकाशस्वरूपिणः = चिदाकाशरूपी, परिपूर्णस्य = व्यापक अशा, शिवस्य = शिवाचे, आत्मत्वेन = आपल्या आत्मरूपाने, अनुसन्धानात् = अनुसंधान करीत असल्यामुळे, तो क्रियाद्योतनवान् = क्रिया प्रकाशवान होतो.

**भावार्थ** : शिव परिपूर्ण आणि ज्ञानाकाशस्वरूप आहे. तो शिव आणि मी एकच, असे नेहमी मनात ध्यान करणाऱ्या महाकाशस्वरूपी शिवयोग्याला क्रियाप्रकाशवान असे म्हणतात.॥७६॥

**निष्कलङ्कचिदानन्दगगनोपमरूपिणः।**
**शिवस्य परिपूर्णस्य वृत्तिश्चैतन्यरूपिणी।।७७।।**

**अन्वयार्थ** : निष्कलङ्क = कलंकरहित, चिदानन्दगगनोपरूपिणः = चिदानंदरूप आकाशासारखा असणारा, परिपूर्णस्य = परिपूर्ण अशा, शिवस्य = शिवासंबंधी होणारी, वृत्तिः = मी शिव आहे अशी वृत्ती, चैतन्यरूपिणी = शिवासारखी चित्स्वरूप असते.

**भावार्थ** : कलंकरहित ज्ञानानंदाकाशस्वरूप, परिपूर्ण जसा परशिवच मी आहे अशी होणारी अनुसंधानरूप मनोवृत्ती शिवासारखी ज्ञानरूपच असते.॥७७॥

**निष्कलङ्के निराकारे नित्ये परमतेजसि।**
**विलीनचित्तवृत्तस्य तथा शक्तिः क्रियोच्यते।।७८।।**

**अन्वयार्थ** : निष्कलङ्के = कलंकरहित, निराकारे = आकाररहित, नित्ये = नित्य अशा, परमतेजसि = परशिव तेजात, विलीनचित्तवृत्तस्य = चित्तवृत्ती विलीन झालेल्या, शिवयोग्याची क्रियाशक्तिः = अनुसंधानरूपी क्रियाशक्ती, तथा = परशिवाप्रमाणे, तेजोरूप उच्यते = म्हटली जाते.

**भावार्थ** : निष्कलंक, निराकार आणि नित्य अशा परशिवाच्या तेजात सर्व चित्तव्यापार विलीन झालेल्या शिवयोग्याची स्वस्वरूपानुसंधानरूप जी क्रिया असते ती क्रियाशक्ती परशिवतेजोरूपिणी आहे असे म्हटले जाते.॥७८॥

**सर्वज्ञः सर्वकर्ता च सर्वगः परमेश्वरः।**
**तदैक्यचिन्तया योगी तादृशात्मा प्रकाशते।।७९।।**

**अन्वयार्थ** : परमेश्वरः = परमेश्वर, सर्वज्ञः = सर्वज्ञ, सर्वकर्ता = पंचकृत्ये करणारा, च = आणि, सर्वगः = सर्वव्यापी असा आहे, तदैक्यचिन्तया = त्याच्याशी ऐक्यानुसंधानाने, योगी = शिवयोगी, तादृशात्मा = तत्स्वरूप होऊन, प्रकाशते = प्रकाशित होतो.

**भावार्थ** : सर्वज्ञ, सर्वकर्ता, सर्वव्यापक अशा परमेश्वरामध्ये सामरस्यरूप अनुसंधान केल्यामुळे हा शिवयोगीही परमात्मस्वरूप झालेला दिसतो.॥७९॥

**सर्वेन्द्रियाणां व्यापारे विद्यमानेऽपि संयमी।**
**प्रत्युन्मुखेन मनसा शिवं पश्यन् प्रमोदते।।८०।।**

**अन्वयार्थ** : संयमी = शिवयोगी, सर्वेन्द्रियाणां = सर्व इंद्रियांच्या, व्यापारे = व्यवहारात, विद्यमानेऽपि = असला तरी, प्रत्युन्मुखेन = पश्चिमशिखा-चक्राभिमुख झालेल्या, मनसा = मनाने, शिवं = शिवाला, पश्यन् = पाहात, प्रमोदते = आनंदित होतो.

**भावार्थ** : सकलेंद्रियव्यापार चालत असला तरी तो संयमी शिवयोगी पश्चिमशिखाचक्राकडे अभिमुख झालेल्या (अंतर्मुख) मनाने शिवदर्शन घेऊन आनंदित होतो.॥८०॥



**कूटस्थमचलं प्राज्ञं गुणातीतं गुणोत्तरम्।**
**शिवतत्त्वस्वरूपेण पश्यन् योगी प्रमोदते।।८१।।**

**अन्वयार्थ** : गुणोत्तरम् = ज्ञान वैराग्यादी गुणांनी श्रेष्ठ, प्राज्ञं = प्राज्ञ, गुणातीतं = मायिक सत्त्वादी गुणरहित, कूटस्थं = साक्षीस्वरूप, अचलं = निश्चल अशा, शिवतत्त्वं = परशिव तत्त्वाला, स्वरूपेण = आपल्या स्वरूपाने, पश्यन् = पाहत, योगी = शिवयोगी, प्रमोदते = आनंदित होतो.

**भावार्थ** : ज्ञानवैराग्यादी गुणांनी श्रेष्ठ, प्राज्ञ, कूटस्थ, तुर्य, साक्षी, प्रत्यगात्मादी संज्ञा असणारा, मायिक-सत्त्वादी गुणातीत आणि अचलही असलेल्या शिवाला स्वस्वरूपाने पाहात तो शिवयोगी आनंदित होतो.॥८१॥

**परात्मनि क्रिया सर्वा गन्धर्वनगरीमुखा।**
**प्रकाशत इति प्रोक्तं क्रियायास्तु प्रकाशनम्।।८२।।**

**अन्वयार्थ** : परात्मनि = परशिवस्वरूपी शिवयोग्याविषयी, सर्वा = सर्व प्रकारच्या, क्रिया = क्रिया, गन्धर्वनगरीमुखा = गंधर्वनगरीप्रमाणे, प्रकाशत इति = प्रकाशित होते म्हणून, क्रियावस्तु प्रकाशनं = क्रियाप्रकाशनस्थल असे, प्रोक्तम् = म्हटले जाते.

**भावार्थ** : परशिवस्वरूप अशा शिवयोग्याच्या सर्व क्रिया आकाशातील गंधर्वनगरीसमान दिसतात. अशा रीतीने शिवयोग्याच्या क्रियेबद्दल अस्थिरता प्रकाशित करण्याला क्रियाप्रकाशस्थल असे म्हणतात.॥८२॥

### भावप्रकाशस्थल - (९१)

**तरङ्गाद्या यथा सिन्धौ न भिद्यन्ते तथात्मनि।**
**भावा बुद्ध्यादयः सर्वे यत्तद् भावप्रकाशनम्।।८३।।**

**अन्वयार्थ** : सिन्धौ = समुद्रात, तरङ्गाद्याः = तरंग, बुडबुडे आदी, यथा = जसे, न भिद्यन्ते = भिन्न होत नाहीत, तथा = तसे, आत्मनि = शिवयोग्याच्या आत्म्यात, बुद्ध्यादयः = बुद्धी आदि, सर्वे = सर्व, भावाः = भावना, भिन्न होत नाहीत असे, यत् = जे आहे, तत् = ते, भावप्रकाशनम् = भावप्रकाशन स्थल होय.

**भावार्थ** : तरंग, फेस, बुडबुडे हे जसे समुद्रापेक्षा भिन्न नसतात, तशा प्रकारे बुद्धी वगैरे भावना क्रियाप्रकाशसंपन्न शिवयोग्याच्या आत्मचैतन्यापेक्षा भिन्न नसतात, हाच भावप्रकाश होय.।।८३।।

**शिव एव जगत्सर्वं शिव एवाहमित्यपि।**
**भावयन् परमो योगी भावदोषैर्न बाध्यते।।८४।।**

**अन्वयार्थ** : सर्वं जगत् = हे सर्व जगत, शिव एव = शिवच आहे, अहमपि = मी सुद्धा, शिव एव = शिवच आहे, इति = अशा रीतीने, भावयन् = भावना करणारा, परमो योगी = महा शिवयोगी, भवदोषैः = सांसारिक दोषांनी, न बाध्यते = बाधित होत नाही.

**भावार्थ** : हा सर्व प्रपंच परमात्मस्वरूपच आहे, त्यामुळे मीही शिवच आहे, असा भाव असणारा महाशिवयोगी सांसारिक दोषांनी लिप्त होत नाही. अर्थात् त्याला संसाराचे बंधन नसते.।।८४।।

**शिवभावे स्थिरे जाते निर्लेपस्य महात्मनः।**
**ये ये भावाः समुत्पन्नास्ते ते शिवमयाः स्मृताः।।८५।।**

**अन्वयार्थ** : निर्लेपस्य = सांसारिक विषयांपासून अलिप्त असणाऱ्या, महात्मनः = शिवयोग्याचा, शिवभावे = शिवभाव, स्थिरे जाते = स्थिर झाल्यावर, ये ये = जे जे, भावाः = भाव, समुत्पन्नाः = उत्पन्न होतात, ते ते = ते ते, शिवमयाः = शिवस्वरूप, स्मृताः = समजले जातात.

**भावार्थ** : विषयांपासून अलिप्त असलेल्या, शिवभावना स्थिर झालेल्या शिवयोग्याच्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या सर्व भावना शिवमय झालेल्या असतात.।।८५।।

**अद्वितीयशिवाकारभावनाध्वस्तकर्मणा ।**
**न किञ्चिद्भाव्यते साक्षात् शिवादन्यन्महात्मना।।८६।।**

**अन्वयार्थ** : अद्वितीय = अद्वितीय, शिवाकारभावना = शिवरूप भावनेने, ध्वस्तकर्मणा = कर्मबंधन नाहीसे झालेला, महात्मना = शिवयोगी, साक्षात् = प्रत्यक्ष, शिवादन्यत् = शिवाहून भिन्न, किञ्चिद् = काहीही, न भाव्यते = भावना करीत नाही.



**भावार्थ** : ज्याच्यासमान अथवा अधिक अशी दुसरी वस्तू नाही, अशा परमात्म्याच्या ठिकाणी निर्माण झालेल्या समरस भावनेने कर्मबंधन ध्वस्त केलेला शिवयोगी, शिवाशिवाय दुसऱ्या कशाची भावना करीत नाही.।।८६।।

**गलिताज्ञानबन्धस्य केवलात्मानुभाविनः।**
**यत्र यत्र इन्द्रियासक्तिस्तत्र तत्र शिवात्मता।।८७।।**

**अन्वयार्थ** : गलिताज्ञानबन्धस्य = अज्ञानरूपी बंधन गळालेले, केवलात्मानुभाविनः = केवळ आत्मस्वरूपाची भावना करणाऱ्या शिवयोग्याची, यत्र यत्र = जेथे जेथे, इन्द्रियासक्तिः = इंद्रिये आसक्त होतात, तत्र तत्र = तेथे तेथे, शिवात्मता = शिवभाव असतो.

**भावार्थ** : मी शिव नव्हे अशा अज्ञानबंधनाला शिवाद्वैतज्ञानाने ध्वस्त करून केवळ शिवस्वरूपानुसंधानी अशा शिवयोग्याची इंद्रिये ज्या ज्या ठिकाणी आसक्त होतात, त्या त्या ठिकाणी त्या भावनासिद्ध परशिवस्वरूपा-शिवाय दुसरे काही नसते.।।८७।।

**रागद्वेषादयो भावाः संसारक्लेशकारणम्।**
**तेषामुपरमो यत्र तत्र भावः शिवात्मकः।।८८।।**

**अन्वयार्थ** : रागद्वेषादयः = रागद्वेषादी, भावाः = भावना, संसारक्लेश-कारणम् = जन्ममरणरूपी क्लेशाला कारण होतात, यत्र = ज्या शिवयोग्याच्या ठिकाणी, तेषां = त्यांचा, उपरमः = उपशम होतो, तत्र = तेथे, शिवात्मकः = शिवस्वरूप, भावः = भाव होतो.

**भावार्थ** : रागद्वेषादी भावना संसारक्लेशाला कारण असतात हे खरे, तरी त्या भावना ज्याच्या मनातून नाहीशा झाल्या आहेत अशा शिवयोग्याच्या सर्व भावना शिवात्मकच झालेल्या असतात.।।८८।।

**यथा सूर्यसमाक्रान्तौ न शक्नोति तमः सदा।**
**तथा प्रकाशमात्मानं नाविद्याक्रामति स्वयम्।।८९।।**

**अन्वयार्थ** : तमः = अंधार, सदा = केव्हाही, सूर्यसमाक्रान्तौ = सूर्याला आवरण घालण्यास, यथा = जसा, न शक्नोति = समर्थ होत नाही, तथा = तसे,

प्रकाशं = प्रकाशरूप, आत्मानं = आत्म्याला, अविद्या = अज्ञान, स्वयं = स्वतः, नाक्रमति = आक्रमीत नाही.

**भावार्थ** : अंधार जसा सूर्याला कधीही आवरण घालू शकत नाही, तशा प्रकारे प्रकाशस्वरूप अशा आत्म्याला अज्ञानरूप अंधार झाकू शकत नाही.॥८९॥

**ज्ञानप्रकाशस्थल - (९२)**

**मुख्यार्थेऽसम्भवे जाते लक्षणायोगसंश्रयात्।**
**तज्ज्ञानयोजनं यत्तदुक्तं ज्ञानप्रकाशनम्॥९०॥**

**अन्वयार्थ** : मुख्यार्थे = वाच्यार्थ, असम्भवे जाते = असंभव झाल्यावर, लक्षणायोगसंश्रयात् = लक्ष्यार्थाच्या आश्रयाने, तज्ज्ञानयोजनं = अंगलिंगज्ञान-द्वयाचे समान सामरस्यज्ञान, यत् = जे आहे, तत् = त्याला, ज्ञानप्रकाशनम् = ज्ञानप्रकाशन असे, उक्तं = म्हणतात.

**भावार्थ** : अंग आणि लिंगाचे मुख्यार्थाने सामरस्य असंभवनीय असल्यामुळे त्या अंग-लिंगाचा लक्षणार्थ स्वीकारल्यावर, उपाधिशून्य अशा दोन्ही चैतन्याचे होणारे सामरस्यज्ञानच ज्ञानप्रकाश होय. याचे स्पष्टीकरण असे- कार्यरूप उपाधीने युक्त असा जीवात्मा हा अंग शब्दाचा वाच्यार्थ, तसा कारणरूप माया उपाधीने युक्त असा ईश्वर हा लिंग शब्दाचा वाच्यार्थ, जीवात्मा आपल्या अविद्यामुळे अल्पज्ञ व अल्पकर्ता असतो आणि ईश्वर आपल्या माया उपाधीमुळे सर्वज्ञ व सर्वकर्ता असतो. अशा उपाधियुक्त जीवात्मा आणि ईश्वराचे सामरस्य परस्परविरोधी धर्मामुळे होऊ शकत नाही. म्हणून उपाधिरूप वाच्यार्थाचा त्याग करून त्याच्यातील लक्ष्यरूप चैतन्याचे सामरस्यज्ञान प्राप्त करणे यालाच ज्ञानप्रकाश म्हणतात.॥९०॥

**मुक्तस्य ज्ञानसम्बन्धो ज्ञेयाभावः स्वभावतः।**
**उपाधिसहितं ज्ञानं न भेदमतिवर्तते॥९१॥**

**अन्वयार्थ** : मुक्तस्य = जीवन्मुक्त शिवयोग्याला, ज्ञानसम्बन्धः = लक्ष्यार्थ-रूप ज्ञानाचा संबंध, स्वभावतः = वास्तविकपणे असतो म्हणून त्याला, ज्ञेयाभावः = जाणण्यायोग्य काही नसते, उपाधिसहितं = उपाधीने युक्त, ज्ञानं = ज्ञान, भेदं = प्रापंचिक भेदाला, नातिवर्तते = अतिक्रमण अर्थात् निवारण करीत नाही.

**भावार्थ** : जीवन्मुक्त शिवयोग्याला लक्ष्यार्थज्ञान स्वाभाविक रीतीने झालेले असल्यामुळे त्याला ज्ञेय म्हणजे जाणून घेण्यासारखे काही शिल्लक नसते. उपाधियुक्त ज्ञानाने भेदभावना दूर करता येत नाही. म्हणून उपाधीची निवृत्ती हीच ज्ञानसामरस्याला मूळ कारण असते.॥९१॥

**ज्ञानमित्युच्यते सद्भिः परिच्छेदोऽपि वस्तुनः।**
**परात्मन्यपरिच्छेदे कुतो ज्ञानस्य सम्भवः॥९२॥**

**अन्वयार्थ** : वस्तुनः = लिंगांगरूपी वस्तूचा, परिच्छेदः = भेद, सद्भिः = सत्पुरुषांकडून, ज्ञानमिति = भेदज्ञान म्हणून, उच्यते = म्हटले जाते, अपरिच्छेदे = अखंडित अशा, परात्मनि = परमात्म्याविषयी, ज्ञानस्य = द्वैतज्ञानाचा, कुतः सम्भवः = संभव कसा होईल?

**भावार्थ** : लिंगांगस्वरूप वस्तूच्या खंडितत्वाला ज्ञाते लोक द्वैतज्ञान म्हणतात, अखंड निरुपाधिक महाचैतन्याच्या ठिकाणी द्वैतज्ञानाची उत्पत्ती कोठून होईल?॥९२॥

**ज्ञानस्याविषये तत्त्वे शिवाख्ये चित्सुखात्मनि।**
**आत्मैकत्वानुसन्धानं ज्ञानमित्युच्यते बुधैः॥९३॥**

**अन्वयार्थ** : ज्ञानस्याविषये = ज्ञानाचा विषय न होणारे, चित्सुखात्मनि = चिदानंदस्वरूप, शिवाख्ये = शिव नावाच्या, तत्त्वे = तत्त्वामध्ये, आत्मैकत्वानु-सन्धानं = आत्म्याचे एकरूपत्वानुसंधान, बुधैः = विद्वानांकडून, ज्ञानमिति = ज्ञान म्हणून, उच्यते = म्हटले जाते.

**भावार्थ** : स्वप्रकाशत्वामुळे ज्ञानाचा विषय न होणारे, सच्चिदानंद-स्वरूप, परशिव या नावाच्या तत्त्वात आपल्या आत्म्याचे ऐक्यानुसंधान करण्याला विद्वान लोक ज्ञान असे म्हणतात.॥९३॥

**अपरिच्छिन्नमानन्दं सत्ताकारं जगन्मयम्।**
**ब्रह्मेति लक्षणं ज्ञानं ब्रह्मज्ञानमिहोच्यते॥९४॥**

**अन्वयार्थ** : अपरिच्छिन्नमानन्दं = अखंड आनंदस्वरूप, सत्ताकारं = सद्रूप, जगन्मयम् = विश्वस्वरूप, असे ज्याचे लक्षणं = लक्षण आहे, ते ब्रह्मेति = ब्रह्म होय, ज्ञानं = त्याच्या ज्ञानाला, इह = येथे, ब्रह्मज्ञानं = ब्रह्मज्ञान म्हणून, उच्यते = म्हटले जाते.

**भावार्थ** : ज्याचा आनंद अखंड आणि अपरिमित, ज्याची सत्ता अबाधित आणि ज्याच्या रूपात त्रैलोक्याचा लय होतो, त्याला ब्रह्मही म्हणतात. त्या परशिवाच्या ज्ञानाला ब्रह्मज्ञान म्हटले जाते.।।९४।।

**ब्रह्मज्ञाने समुत्पन्ने विश्वोपाधिविवर्जिते।**
**सर्वं संविन्मयं भाति तदन्यन्नैव दृश्यते।।९५।।**

**अन्वयार्थ** : विश्वोपाधिविवर्जिते = विश्वभेदरहित, ब्रह्मज्ञाने = ब्रह्मज्ञान, समुत्पन्ने = उत्पन्न झाल्यावर, सर्वं = संपूर्ण जग, संविन्मयं = ज्ञानस्वरूप, भाति = भासते, तदन्यत् = त्या ज्ञानाहून भिन्न काहीही, नैव दृश्यते = दिसत नाही.

**भावार्थ** : विश्वभेदरहित असे ब्रह्मज्ञान उत्पन्न झाल्यावर सर्वत्र ज्ञानमय शिवस्वरूपच दिसू लागते. म्हणून त्याशिवाय दुसरे काहीही दिसत नाही.।।९५।।

**तस्मादद्वैतविज्ञानमपवर्गस्य कारणम्।**
**भावयन् सततं योगी संसारेण न लिप्यते।।९६।।**

**अन्वयार्थ** : तस्मात् = म्हणून, अद्वैतविज्ञानं = शिवाद्वैतज्ञान, अपवर्गस्य = मोक्षप्राप्तीचे, कारणं = कारण आहे, योगी = शिवयोगी, सततं = नेहमी, शिवाद्वैत = शिवाद्वैतज्ञानाची भावना करीत, संसारेण = संसाराने, न लिप्यते = लिप्त होत नाही.

**भावार्थ** : शिवाद्वैताचे ज्ञान होणे हे मोक्षप्राप्तीचे कारण आहे. अशी भावना नेहमी बाळगणाऱ्या शिवयोग्याला संसारदुःखाचा स्पर्श होत नाही.।।९६।।

**नित्ये निर्मलसत्त्वयोगिषु परे निर्वासने निष्कले**
**सर्वातीतपदे चराचरमये सत्तात्मनि ज्योतिषि।**



**संविद्व्योम्नि शिवे विलीनहृदयस्तद्भेदवैमुख्यतः**
**साक्षात् सर्वगतो विभाति विगलद्विश्वः स्वयं संयमी।।९७।।**

**अन्वयार्थ** : नित्ये = शाश्वत, निर्मलसत्त्वयोनिषु = निर्मल, सात्त्विक योग्यांमध्ये, परे = प्राधान्याने राहणारा, निर्वासने = वासनारहित, निष्कले = निरवयव, सर्वातीतपदे = सर्वश्रेष्ठ स्थानरूप, चराचरमये = चराचर प्रपंचाच्या उत्पत्तीला कारणीभूत, शक्तिस्वरूप, सत्तात्मनि = पारमार्थिक सद्रूप, ज्योतिषि = प्रकाशरूप, संविद्व्योम्नि = ज्ञानाकाशरूप अशा, शिवे = परशिवाविषयी, विलीन-हृदयः = मन विलीन झालेला, तद्भेदवैमख्यतः = शिवाहून अन्याविषयी विमुख झालेला, सर्वगतः = व्यापक असा, संयमी = शिवयोगी, विगलद्विश्वः = विश्वभेद नाहीसा होऊन, स्वयं = स्वतः, साक्षात् = विशेष रूपाने, विभाति = प्रकाशित होतो.

**भावार्थ** : शाश्वत, निर्मल, मुख्यतः सात्त्विक शिवयोग्यांमध्ये वास करणारा, वासनारहित, निरवयव, सर्वश्रेष्ठस्थानरूप, स्थावरजंगम प्रपंचाला कारणीभूत, चित्क्रियालक्षण, चिदंबर, शक्तिस्वरूप, पारमार्थिक सत्तास्वरूप, प्रकाशमय अशा ज्ञानाकाशरूप महालिंगात ज्याचे मन ऐक्य पावले आहे असा शिवयोगी त्या महालिंगाव्यतिरिक्त अन्य कोणतीही वस्तू न पाहाता, भेदभ्रांति-रहित होऊन सर्वत्र व्यापक असे स्वस्वरूप पाहात असतो.।।९७।।

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ शरणस्थले दीक्षापादोदकस्थलादिद्वादशविधस्थल-प्रसङ्गो नाम एकोनविंशतितमः परिच्छेदः।***

**एकोणिसावा परिच्छेद समाप्त.**

OOO

# विसावा परिच्छेद

### लिंगस्थलांतर्गत

## ऐक्यस्थल

**अगस्त्य उवाच—**

**स्थलभेदास्त्वया प्रोक्ताः शरणस्थलसंश्रिताः।**
**ऐक्यस्थलगतान् ब्रूहि स्थलभेदान् गणेन्द्र मे।।१।।**

**अन्वयार्थ** : गणेन्द्र = हे गणेश्वरा, शरणस्थलसंश्रिताः = शरणस्थलात असणारे, स्थलभेदाः = अवांतर स्थलांचे भेद, त्वया = तुझ्याकडून, प्रोक्ताः = सांगितले गेले, आता ऐक्यस्थलगतान् = ऐक्यस्थलात असणारे, स्थलभेदान् = अवांतर स्थलांचे भेद, मे = मला, ब्रूहि = सांगावेत.

**भावार्थ** : अगस्त्यमुनी प्रश्न करतात— हे गणेश्वरा, शरणस्थलांतर्गत पोटभेद आपण सांगितले, आता ऐक्यस्थलाचे पोटभेद किती आहेत ते मला सांगावे.।।१।।

**श्रीरेणुक उवाच—**

**स्थलानां नवकं चैक्यस्थलेऽस्मिन् प्रकीर्त्यते ।।२।।**
**तत्स्वीकृतप्रसादैक्यस्थलमादौ प्रकीर्तितम्।**
**शिष्टोदनस्थलं चाथ चराचरलयस्थलम्।।३।।**
**भाण्डस्थलं ततः प्रोक्तं भाजनस्थलमुत्तमम्।**
**अङ्गालेपस्थलं पश्चात् स्वपराज्ञस्थलं ततः।।४।।**
**भावाभावविनाशं च ज्ञानशून्यस्थलं ततः।**
**तदेषां क्रमशो वक्ष्ये शृणु तापस लक्षणम्।।५।।**

**अन्वयार्थ** : अस्मिन् = ह्या, ऐक्यस्थले = ऐक्यस्थलात, स्थलानां नवकं = नऊ स्थले, परिकीर्त्यते = सांगितली जातात, आदौ = पहिले, स्वीकृतप्रसादैक्य-स्थलं = स्वीकृतप्रसादिस्थल म्हणून, परिकीर्तितम् = म्हटले आहे, अथ = त्यानंतर, शिष्टौदनस्थलं = शिष्टौदनस्थल, च = आणि, चराचरलयस्थलं =



चराचरलयस्थल, ततः = त्यानंतर, भाण्डस्थलं = भांडस्थल, प्रोक्तं = सांगितले आहे, पश्चात् = त्यानंतर, उत्तमम् = उत्तम असे, भाजनस्थलं = भाजनस्थल, ततः = त्यांनतर, अङ्गालेपस्थलं = अंगालेपस्थल, पश्चात् = त्यानंतर, स्वपराज्ञस्थलं = स्वपराज्ञस्थल, च = आणि, भावाभावविनाशं = भावाभाव-विनाशस्थल, ततः = त्यानंतर, ज्ञानशून्यस्थलं = ज्ञानशून्यस्थल, तापस = हे तपस्वी अगस्त्या, एषां = ह्यांचे, क्रमशः = क्रमाने, लक्षणं = लक्षणे, वक्ष्ये = सांगतो, शृणु = ऐक.

**भावार्थ** : श्रीरेणुकाचार्य सांगतात— हे तपोनिधे अगस्त्या, ऐक्यस्थलाचे नऊ पोटभेद आहेत. १. स्वीकृतप्रसादैक्यस्थल, २. शिष्टौदनस्थल, ३. चराचरलयस्थल, ४. भांडस्थल, ५. भाजनस्थल, ६. अंगालेपस्थल, ७. स्वपराज्ञस्थल, ८. भावाभावविनाशस्थल आणि ९. ज्ञानशून्यस्थल, अशी नऊ अवांतर स्थले ऐक्यस्थलात आहेत. हे अगस्त्या, आता क्रमाने त्यांची लक्षणे सांगतो ती ऐक.।।२-५।।

### स्वीकृतप्रसादिस्थल - (९३)

**मुख्यार्थो लक्षणार्थश्च यत्र नास्ति चिदात्मनि।**
**विशृङ्खलतया तस्य प्रसादः स्वीकृतो भवेत्।।६।।**

**अन्वयार्थ** : चिदात्मनि = चिद्रूप अशा, यत्र = ज्ञानप्रकाशसंपन्न शिवयोग्यामध्ये, मुख्यार्थः = जीव आणि ईश्वरातील भेद दाखविणारा मुख्यार्थ, च = आणि, लक्ष्यार्थः = जीवेश्वराचा अभेद दाखविणारा लक्ष्यार्थ, नास्ति = नसतात, तस्य = तो शिवयोगी, विशृङ्खलतया = निरंकुशपणे, प्रसादः = पूर्ण ज्ञानरूप प्रसाद, स्वीकृतः = स्वीकारलेला, भवेत् = होतो.

**भावार्थ** : ज्ञानप्रकाशसंपन्न अशा चिद्रूप शिवयोग्याला भेदाभेदरहित स्थिती प्राप्त झालेली असते. म्हणून त्याचा जीवेश्वराचा वियोगरूपी मुख्यार्थ असो अथवा निरंतर अभेदरूप असा लक्ष्यार्थ असो, संभवत नाही. असा मुख्यार्थ, लक्ष्यार्थ यांचा आश्रय न घेता निरंकुश होऊन पूर्ण ज्ञानरूप प्रसाद त्याने स्वीकारल्यामुळे त्याला स्वीकृतप्रसादी या नावाने ओळखले जाते.।।६।।

**मातृमेयप्रमाणादिव्यवहारे विहारिणीम्।**
**संवित्साक्षात्कृतिं लब्ध्वा योगी स्वात्मनि तिष्ठति।।७।।**

**अन्वयार्थ** : मातृमेयप्रमाणादि = प्रमातृ, प्रमाण आणि प्रमेयादी, व्यवहारे = त्रिपुटीव्यवहारात, विहारिणीम् = रममाण, संवित् = चित्शक्तीचा, साक्षात्कृतिं = साक्षात्कार, लब्ध्वा = प्राप्त करून, योगी = ज्ञानप्रकाशसंपन्न शिवयोगी, स्वात्मनि = स्वस्वरूपात, तिष्ठति = स्थिर असतो.

**भावार्थ** : असा पूर्णज्ञानरूप प्रसाद प्राप्त करून घेतलेला शिवयोगी प्रमातृ, प्रमाण, प्रमेय अशा त्रिपुटीमय व्यवहाराला मूल कारण असलेल्या चित्शक्तीचा साक्षात्कार मिळवून स्वस्वरूप अनुसंधानात स्थिर असतो.।।७।।

**अद्वैतबोधनिर्धूतभेदावेशस्य योगिनः।**
**साक्षात्कृतमहासंवित्प्रकाशस्य क्व बन्धनम्।।८।।**

**अन्वयार्थ** : अद्वैतबोध = शिवाद्वैत ज्ञानप्रसादाने, निर्धूतभेदावेशस्य = जीवेश्वराचा भेद नाहीसा झालेल्या, साक्षात्कृतमहासंवित्प्रकाशस्य = निर्मल चित्प्रकाशाचा साक्षात्कार करून घेतलेल्या, योगिनः = शिवयोग्याला, बन्धनं = पाशबंधन, क्व = कसे असणार?

**भावार्थ** : शिवाद्वैतज्ञानप्रसादाच्या महत्त्वाने अंग-लिंग जीवेश्वराला भेदभाव दूर करून निर्मल ज्ञानप्रकाशाचे प्रत्यक्षीकरण केलेल्या त्या शिवयोग्याला पाशपंचकाचे बंधन कोठून असणार? अर्थात् असत नाही.।।८।।

**चिदात्मनि शिवे न्यस्तं जगदेतच्चराचरम्।**
**जायते तन्मयं सर्वमग्नौ काष्ठदिकं यथा।।९।।**

**अन्वयार्थ** : अग्नौ = अग्नीत, न्यस्तं = ठेवलेले, काष्ठादिकं = लाकडे वगैरे, यथा = जसे, तन्मयं = अग्निस्वरूप दिसते, तसे चिदात्मनि = चिद्रूप, शिवे = परशिवामध्ये असलेले, एतत् सर्व = हे सर्व, चराचरम् = चराचर, जगत् = जग, ज्ञायते = चिदग्नी रूपाने ज्ञात होते.

**भावार्थ** : अग्नीत टाकलेले लाकूड आदी पदार्थ जसे स्वतःचे स्वरूप सोडून अग्निरूप होऊन जातात, तसे चिदग्निरूप परशिवात असलेला हा चराचर प्रपंच चिन्मयरूपाने दिसतो.।।९।।



**न भाति पृथ्वी न जलं न तेजो नैव मारुतः।**
**नाकाशो न परं तत्त्वं शिवे दृष्टे चिदात्मनि।।१०।।**

**अन्वयार्थ** : चिदात्मनि = चिद्रूप, शिवे = परशिवाचा, दृष्टे = साक्षात्कार झाल्यावर, पृथ्वी = पृथ्वी, जलं = जल, तेजः = तेज, मारुतः = वायू, आकाशः = आकाश आणि, परं तत्त्वं = ह्या व्यतिरिक्त अन्य भौतिक पदार्थ, न भाति = त्याहून भिन्न रूपाने दिसत नाहीत.

**भावार्थ** : चिद्रूप अशा परमात्म्याचा साक्षात्कार झाल्यावर त्याचे कार्यरूप पृथ्वी, जल, तेज, वायू, आकाश ही पंच महाभूते आणि सर्व भौतिक पदार्थ तन्मय-रूपानेच दिसतात. मातीपासून झालेली गाडगीमडकी ही जशी मृण्मय होत, तसे परमात्म्यापासून निर्माण झालेले सर्व काही शिवमय असते.।।१०।।

**ज्योतिर्लिङ्गे चिदाकारे ज्वलत्यन्तर्निरन्तरम्।**
**विलीनं निखिलं तत्त्वं पश्यन् योगी न लिप्यते।।११।।**

**अन्वयार्थ** : अन्तः = हृदयकमलामध्ये, निरन्तरम् = सदा, चिदाकारे = चिद्रूप, ज्योतिर्लिङ्गे = ज्योतिस्वरूप महालिंग, ज्वलति = प्रकाशित झाल्यावर त्यात, निखिलं = सर्व, तत्त्वं = भूम्यादी तत्त्वांना, विलीनं = विलीन झाल्याचे, पश्यन् = चिंतन करीत, योगी = शिवयोगी, न लिप्यते = लिप्त होत नाही.

**भावार्थ** : आपल्या हृदयाच्या अष्टदलकमलामध्ये नेहमी प्रकाशणाऱ्या चिद्रूप महालिंगात शिवादिभूम्यंत छत्तीस तत्त्वांचे लयचिंतन करणारा शिवयोगी या भुवनातील भोगसाधने अशा छत्तीस तत्त्वांनी लिप्त होत नाही.।।११।।

**अन्तर्मुखेन मनसा स्वात्मज्योतिषि चिन्मये।**
**सर्वानप्यर्थविषयान् जुह्वन् योगी प्रमोदते।।१२।।**

**अन्वयार्थ** : चिन्मये = चिद्रूप अशा, स्वात्मज्योतिषि = आपल्या आत्मज्योतिरूप अग्नीत, अन्तर्मुखेन = अंतर्मुख झालेल्या, मनसा = मनाने, सर्वानपि = सर्व प्रकारच्या, अर्थविषयान् = पदार्थरूपी विषयांना, जुह्वन् = तादात्म्याने अर्पण करीत, योगी = शिवयोगी, प्रमोदते = आनंदित होतो.

**भावार्थ** : चिन्मय अशा स्वस्वरूपाग्नीच्या प्रकाशात अंतर्मुख मनाने सर्व पदार्थांचा होम करून अर्थात् तादात्म्यरूपाने चिंतन करून शिवयोगी आनंद उपभोगतो.॥१२॥

**सच्चिदानन्दजलधौ शिवे स्वात्मनि निर्मलः।**
**समर्प्य सकलान् भुङ्क्ते विषयान् तत्प्रसादतः।।१३।।**

**अन्वयार्थ** : निर्मलः = निर्मल असा शिवयोगी, सच्चिदानन्दजलधौ = सच्चिदानंदसमुद्ररूपी, स्वात्मनि = आपले आत्मस्वरूप अशा, शिवे = शिवाला, सकलान् = सर्व, विषयान् = शब्दादी विषयांना, समर्प्य = अर्पण करून, तत्प्रसादतः = त्याच्या प्रसादरूपाने, भुङ्क्ते = सेवन करतो.

**भावार्थ** : निर्मल असा शिवयोगी सच्चिदानंदसागर, स्वात्मस्वरूप अशा परशिवामध्ये शब्द स्पर्शादी सकलविषयांचे समर्पण करून, शिवाचा प्रसाद म्हणून त्याचा उपयोग घेतो, म्हणून त्याला स्वीकृतप्रसादी असे म्हणतात.॥१३॥

### शिष्टोदनस्थल - (९४)

**प्रकाशते या सर्वेषां माया सैवोदनाकृतिः।**
**लीयते तत्र चिल्लिङ्गे शिष्टं तत्परिकीर्तितम्।।१४।।**

**अन्वयार्थ** : या = जी, माया = अधोमाया, सर्वेषां = विज्ञानाकल, प्रलयाकल आणि सकल जीवांना, प्रकाशते = तत्तदुचित तनुकरणादी रूपांनी प्रकाशित होते, आणि चिल्लिङ्गे = चिन्मयलिंगात, लीयते = विलय पावते, सैव = हीच माया, तत्र = स्वीकृत प्रसादी शिवयोग्याविषयी, ओदनाकृतिः = अन्नाप्रमाणे असते, म्हणून तत् = ती, शिष्टं = शिष्टोदन म्हणून, परिकीर्तितम् = म्हटली जाते.

**भावार्थ** : शुद्धाध्व, मिश्राध्व आणि अशुद्धाध्वांमध्ये निवास करणाऱ्या विज्ञानाकल (आणवमलमात्रयुक्त), प्रलयाकल (आणवकार्ममलद्वय युक्त), आणि सकल (आणवकार्ममायामलत्रयाने युक्त) जीवांना तत्तदुचित तनु, करण, भुवन, आणि भोग या रूपांनी माया दिसत असते. अशी ही माया चिन्मयलिंगात विलीन होते. ती माया या स्वीकृतप्रसादीला शिष्टोदनासारखी असल्याने त्या मायेला शिष्टोदन असे म्हणतात.॥१४॥



**जगदङ्गे परिग्रस्ते मायापाशविजृम्भिते।**
**स्वात्मज्योतिषि बोधेन तदेकमवशिष्यते।।१५।।**

**अन्वयार्थ** : मायापाशविजृम्भिते = कलादिभूम्यन्त तीसतत्त्वरूपी मायापाशांनी व्यापलेले, जगदङ्गे = जगरूपी शरीरात असणारी, स्वात्मज्योतिषि = आत्मरूपज्योती, बोधेन = आत्मज्ञानाने, परिग्रस्ते = आक्रांत झाल्यावर, तदेकं = ते मायातत्त्व मात्र, अवशिष्यते = शिल्लक राहते.

**भावार्थ** : कलादिभूम्यंत तीस तत्त्वात्म मायापाशांनी बांधलेले हे जग स्वात्मज्ञानाने आक्रमिल्यानंतर ते सर्व स्वात्मरूप झालेले दिसते तरी त्या तीस तत्त्वांना कारणीभूत असणारी माया मात्र शिल्लक राहते.॥१५॥

**अखण्डसच्चिदानन्दपरब्रह्मस्वरूपिणः ।**
**जीवन्मुक्तस्य धीरस्य माया कैङ्कर्यवादिनी।।१६।।**

**अन्वयार्थ** : अखण्डसच्चिदानन्दपरब्रह्मस्वरूपिणः = अखंड सच्चिदानंद-लक्षण परब्रह्मस्वरूप, धीरस्य = जितेंद्रिय अशा, जीवन्मुक्तस्य = जीवन्मुक्त शिवयोग्यापुढे, माया = मायातत्त्व, कैङ्कर्यवादिनी = दास्यभावाने असते.

**भावार्थ** : अखंड, सच्चिदानंद परब्रह्मस्वरूप, जीवन्मुक्त आणि जितेंद्रिय अशा शिवयोग्यापुढे ही माया दासी होऊन राहते.॥१६॥

**विश्वसंमोहिनी माया बहुशक्तिनिरङ्कुशा।**
**शिवैकत्वमुपेतस्य न पुरः स्थातुमीहते।।१७।।**

**अन्वयार्थ** : विश्वसंमोहिनी = विश्वाला मोहित करणारी, बहुशक्ति = नानाविध शक्तींनी युक्त, निरङ्कुशा = स्वतंत्र, अशी माया = माया, शिवैक्यत्वमुपे-तस्य = शिवसामरस्य प्राप्त करून घेतलेल्या शिवयोग्याच्या, पुरः = पुढे, स्थातुं = मोहकरूपाने उभे राहण्यास, नेहते = इच्छीत नाही.

**भावार्थ** : शिवमोहिनी, बहुविधसामर्थ्यशालिनी, निरंकुशा अशी माया शिवाशी सामरस्यभाव प्राप्त झालेल्या शिवयोग्यापुढे मोहक रूपात उभी राहत नाही.॥१७॥

**ज्योतिर्लिङ्गे चिदाकारे निमग्नेन महात्मना।**
**भुज्यमाना यथायोगं नश्यन्ति विषयाः स्वतः।।१८।।**

**अन्वयार्थ** : चिदाकारे = चिद्रूप, ज्योतिर्लिङ्गे = ज्योतिर्लिंगात, निमग्नेन = ऐक्यस्थिती प्राप्त करून घेतलेल्या, महात्मना = शिवयोग्याकडून, यथायोगं = क्रमाने शिवार्पण बुद्धीने, भुज्यमानाः = भोगले जाणारे, विषयाः = शब्दस्पर्शादी विषय, स्वतः = आपोआप, नश्यन्ति = विलय पावतात.

**भावार्थ** : चिद्रूप महालिंगात ऐक्यस्थिती प्राप्त करून घेतलेल्या शिवयोग्याकडून शिवार्पणबुद्धीने उपभोगिले जाणारे शब्दस्पर्शादी विषय आपोआप आत्म्यात लय पावतात.॥१८॥

**शब्दादयोऽपि विषया भुज्यमानास्तदिन्द्रियैः।**
**आत्मन्येव विलीयन्ते सरितः सागरे यथा।।१९।।**

**अन्वयार्थ** : सागरे = समुद्रात, सरितः = नद्या, यथा = जशा, विलीयन्ते = विलय पावतात, तसे तदिन्द्रियैः = त्या शिवयोग्याच्या इंद्रियांद्वारे, भुज्यमानाः = उपभोगिले जाणारे, शब्दादयः = शब्दादी, विषया अपि = विषयसुद्धा, आत्मन्येव = आपल्या आत्म्यातच, विलीयन्ते = विलय पावतात.

**भावार्थ** : नद्या जशा समुद्रात विलीन होतात, त्याप्रमाणे शब्दादी विषय त्या त्या इंद्रियाकडून उपभोगल्यानंतर आत्म्यातच विलीन होतात.॥१९॥

**अर्थजातमशेषं तु ग्रसन् योगी प्रशाम्यति।**
**स्वात्मनैवास्थितो भानुस्तेजोजालमशेषतः।।२०।।**

**अन्वयार्थ** : योगी = शिवयोगी, अशेषं = संपूर्ण, अर्थजातं = पदार्थसमूहाला, ग्रसन् = स्वस्वरूपाने उपभोगून, तेजोजालं = आपल्या किरणसमूहाला, अशेषतः = संपूर्णपणे, ग्रसन् = उपसंहार करून, आस्थितः = आपल्या आत्म्यात, प्रशाम्यति = प्रशांत होतो.

**भावार्थ** : सूर्य आपले सर्व किरण आपल्यातच सामावून जसा अस्तंगत होतो तसा हा शिवयोगी सकल पदार्थांचा स्वस्वरूपाने उपभोग घेऊन परमशांत होतो.॥२०॥



## चराचरलयस्थल - (९५)

**लिङ्गैक्ये तु समापन्ने चरणाचरणे गते।**
**निर्देही स भवेद्योगी चराचरविनाशकः।।२१।।**

**अन्वयार्थ** : चरणाचरणे गते = चराचर प्रपंचासह, लिङ्गैक्ये = महालिंगाशी सामरस्य, समापन्ने = प्राप्त झालेला, सः = तो, योगी = शिवयोगी, निर्देही = विदेही होऊन, चराचरविनाशकः = चराचरविनाशक असा म्हणविला जातो.

**भावार्थ** : शिवाशी सामरस्य पावलेल्या शिवयोग्यामध्ये चराचर प्रपंचाचा लय झाल्यामुळे तो शिवयोगी विदेही होऊन चराचर-प्रपंच-विनाशक या नावाने ओळखला जातो.॥२१॥

**अनाद्यविद्यामूला हि प्रतीतिर्जगतामियम्।**
**स्वात्मैकबोधात्तन्नाशे कुतो विश्वप्रकाशनम्।।२२।।**

**अन्वयार्थ** : जगतां = जगांची, इयं = ही, प्रतीतिः = प्रतीती, अनाद्य-विद्यामूला हि = अनादी अशा अविद्येमुळेच होते, स्वात्मैकबोधात् = हे सर्व स्वात्मरूप आहे अशा बोधामुळे, तन्नाशे = अविद्येचा नाश झाल्यावर, विश्व-प्रकाशनं कुतः = जगाची प्रतीची कशी होईल?

**भावार्थ** : शिवाची अनादी अशी मायाच जगाच्या प्रतीतीचे मूल कारण आहे. ती मायाशक्तीच नाहीशी झाल्यावर स्वस्वरूप ज्ञानसंपन्न शिवयोग्याला तिचे कार्यरूप अशा जगाचे दर्शन कसे होईल? अर्थात् त्याला जगद्भावदर्शनच नसतो.॥२२॥

**यथा मेघाः समुद्भूता विलीयन्ते नभस्थले।**
**तथात्मनि विलीयन्ते विषयाः स्वानुभाविनः।।२३।।**

**अन्वयार्थ** : नभस्थले = आकाशात, मेघाः = मेघ, यथा = जसे, समुद्भूताः = उत्पन्न होऊन, विलीयन्ते = विलय पावतात, तथा = तसे, स्वानुभाविनः = स्वस्वरूपाचा अनुभवी अशा शिवयोग्याच्या, आत्मनि = आत्म्यात, विषयाः = शब्दादी विषय, उत्पन्न होऊन विलीयन्ते = विलय पावतात.

**भावार्थ** : आकाशात उत्पन्न झालेले मेघ जसे आकाशातच विलीन होतात तसे स्वस्वरूपानुभवी शिवयोग्याच्या आत्म्यात उत्पन्न होणारे शब्दादी विषय पुन्हा तेथेच विलय पावतात.॥२३॥

**स्वप्ने दृष्टं यथा वस्तु प्रबोधे लयमश्नुते।**
**तथा सांसारिकं सर्वमात्मज्ञाने विनश्यति।।२४।।**

**अन्वयार्थ** : स्वप्ने = स्वप्नात, दृष्टं = पाहिलेला, वस्तु = पदार्थ, प्रबोधे = जागे झाल्यावर, यथा = जसा, लयमश्नुते = लय पावतो, तथा = तसे, सर्वं = सर्व, सांसारिकं = सांसारिक पदार्थ, आत्मज्ञाने = आत्मज्ञान झाल्यावर, विनश्यति = नष्ट होतात.

**भावार्थ** : स्वप्नात पाहिलेले पदार्थ जागृतावस्थेत जसे विलीन होतात, तशा प्रकारे आत्मज्ञान झाल्यावर सांसारिक पदार्थांचा लयरूप विनाश होतो. प्रपंचाला स्वप्नाचा दृष्टांत दिल्यामुळे त्याला मिथ्या मानू नये. कारण जागृत अवस्थेप्रमाणे स्वप्नावस्थेतही सुखदु:खांचा अनुभव येत असतो.॥२४॥

**जाग्रत्स्वप्नसुषुप्तिभ्य: परावस्थामुपेयुष:।**
**किं वा प्रमाणं किं ज्ञेयं किं वा ज्ञानस्य साधनम्।।२५।।**

**अन्वयार्थ** : जाग्रत्स्वप्नसुषुप्तिभ्य: = जाग्रत, स्वप्न आणि सुषुप्ती अवस्थांपेक्षा, परावस्थामुपेयुष: = तुरीय अवस्थेला पोचलेल्या शिवयोग्याला, किं वा प्रमाणं = प्रमाण काय, किं ज्ञेयं = ज्ञेय वस्तू कोणती, ज्ञानस्य = ज्ञानाचे, साधनं वा किम् = साधन तरी कोणते?

**भावार्थ** : स्थूलादी तनुत्रयाशी संबंधित जागृतादी अवस्थात्रयाच्या अतीत झालेला, खेचरी मुद्रेच्या साधनेने प्राप्त होणाऱ्या तुरीय अवस्थेला पोचलेला शिवयोगी प्रमातृ-प्रमाण-प्रमेयरूप त्रिपुटीमय प्रपंचव्यवहाराच्या पलीकडे गेला असल्यामुळे त्याला प्रपंचाचे दर्शन होत नाही.॥२५॥

**तुर्यातीतपदं यत्तद् दूरं वाङ्मनसाध्वन:।**
**अनुप्रविश्य तद्योगी न भूयो विश्वमीक्षते।।२६।।**



**अन्वयार्थ** : वाङ्मनसाध्वन: = वाणी आणि मनापासून, दूरं = दूर असणारे, यत् = जो, तुर्यातीतपदं = तुर्यातीत पद आहे, तत् = त्यात, अनुप्रविश्य = प्रवेशलेला, तद्योगी = तुर्यातीत शिवयोगी, भूय: = पुन्हा, विश्वं = जगाला, नेक्षते = पाहात नाही.

**भावार्थ** : स्तुती आणि ध्यानाला अगोचर असणाऱ्या तुर्यातीत अवस्थेला पोचलेल्या शिवयोग्याला पुन्हा पूर्वीप्रमाणे प्रपंचाची प्रतीती होत नाही.॥२६॥

**नान्यत् पश्यति योगीन्द्रो नान्यज्जानाति किञ्चन।**
**नान्यच्छृणोति सन्दृष्टे चिदानन्दमये शिवे।।२७।।**

**अन्वयार्थ** : चिदानन्दमये = सच्चिदानंदरूप, शिवे = परशिवाचा, सन्दृष्टे = साक्षात्कार झाल्यावर, योगीन्द्र: = योगीश्वर, अन्यत् = आपल्याहून अन्य काही, न पश्यति = पाहत नाही, अन्यत् = आपल्याहून अन्य, किञ्चन = काहीही, न जानाति = जाणत नाही, अन्यत् = आपल्याहून अन्य, न शृणोति = ऐकत नाही.

**भावार्थ** : सच्चिदानंदस्वरूप परशिवाचा स्वात्मरूपात साक्षात्कार घडलेला शिवयोगी आपल्यापेक्षा भिन्न असे रूप पाहत नाही, भिन्न असा शब्द ऐकत नाही, आपल्यापेक्षा भिन्न असे काही जाणत नाही. तात्पर्य, या शिवयोग्याला, मलरूप शक्तीचा क्षय झाल्यामुळे मायिक रूपादी दिसत नाही. म्हणून त्याला प्रपंचाची प्रतीती होत नाही.॥२७॥

**असदेव जगत्सर्वं सदिव प्रतिभासते।**
**ज्ञाते शिवे तदज्ञानं स्वरूपमुपपद्यते।।२८।।**

**अन्वयार्थ** : सर्वं = सर्व, जगत् = जग, असदेव = शिवाहून भिन्न नाही तरी मलशक्तीमुळे, सदिव = त्याहून भिन्न असल्या सारखे, प्रतिभासते = भासते, शिवे = सच्चिदानंदस्वरूप शिवाचा, ज्ञाते = साक्षात्कार झाल्यावर, तदज्ञानं = भेद प्रतीतीचे कारण असे मूल अज्ञान, नष्ट होऊन, स्वरूपं = स्वत:ला कारणीभूत चित्शक्तिस्वरूप, उपपद्यते = प्राप्त होते.

**भावार्थ** : हे सकल जग शिवापेक्षा भिन्न नसते तरीही मायाशक्तीला वश झाल्यामुळे ते भिन्न दिसते. सच्चिदानंद परशिवरूपाचा साक्षात्कार झाल्यामुळे भेदरूप प्रपंचाच्या प्रतीतीला कारण अशा अज्ञानाचा नाश झाल्यावर सर्व काही स्वाभिन्न चिच्छक्ती आकाररूपाने दिसते. म्हणून शिवयोगी आपण स्वत: व हे जग शिवापेक्षा भिन्न आहेत असे कधीच मानीत नाही. त्यामुळे त्याला चराचर-भेदभावना नसते.॥२८॥

**भाण्डस्थल - (९६)**

**ब्रह्माण्डशतकोटीनां सर्गस्थितिलयान् प्रति।**
**स्थानभूतो विमर्शो यस्तद्भाण्डस्थलमुच्यते।।२९।।**

**अन्वयार्थ** : ब्रह्माण्डशतकोटीनां = अनेक कोटी ब्रह्मांडांच्या, सर्गस्थिति-लयान् प्रति = सृष्टिस्थितिसंहाराला, स्थानभूत: = आधार असलेला, य: = जो, विमर्श: = विमर्श आहे, तत् = ते, भाण्डस्थलं = भांडस्थल म्हणून, उच्यते = म्हटले जाते.

**भावार्थ** : अनंतकोटी ब्रह्मांडांच्या उत्पत्ति-स्थिति-लयाला परबिंदु अर्थात् पराशक्तीच आधार आहे. तिला भांड म्हणतात. तिच्याविषयीचा जो विचार त्याला भांडस्थल असे म्हणतात.॥२९॥

**विमर्शाख्या पराशक्तिर्विश्वोद्भासनकारिणी।**
**साक्षिणी सर्वभूतानां समिन्धे सर्वतोमुखी।।३०।।**

**अन्वयार्थ** : विमर्शाख्या = विमर्श नावाची, पराशक्ति: = शुद्धमाया, विश्वोद्भासनकारिणी = विश्वाला प्रकाशित करणारी आहे, सर्वभूतानां = सर्वतत्त्वांची, साक्षिणी = साक्षी आहे, अशी ती सर्वतोमुखी = सर्वतोमुखी होऊन, सामिन्धे = प्रकाशित होते.

**भावार्थ** : विमर्शशक्ती षडध्वांच्या उत्पत्तीला कारण आहे. सकल जगाच्या प्रकाशनाला तीच कारण असून तीच सकलतत्त्वांना साक्षीस्वरूपही आहे. तीच शक्ती सर्वतोमुखी होऊन शुद्धाध्ववासी देवतांना पराशक्तिरूपाने तनू होऊन, सदाशिव तत्त्वरूपाने करण होऊन, ईश्वरतत्त्वरूपाने भुवन होऊन आणि विद्यातत्त्वरूपाने भोग होऊन प्रकाशते. अशा प्रकारे विचार करणे हेच भांडस्थल होय.॥३०॥



**विश्वं यत्र लयं याति विभात्यात्मा चिदाकृति:।**
**सदानन्दमय: साक्षात् सा विमर्शमयी कला।।३१।।**

**अन्वयार्थ** : यत्र = जिच्यामध्ये, विश्वं = विश्व, लयं याति = विलय पावते, जिच्यामुळे आत्मा = आत्मा, चिदाकृति: = चिद्रूपाने, विभाति = प्रकाशित होतो, जी साक्षात् = साक्षात, सदानन्दमय: = सदानंदस्वरूप आहे, सा = ती, विमर्शमयी कला = विमर्शकला होय.

**भावार्थ** : जिच्यामध्ये सर्व जगाचा लय होतो, जिच्यामुळे साक्षात् सदानंदरूपी आत्मा चिद्रूपाने प्रकाशित होतो. तीच विमर्शकला होय. अशा रीतीने विमर्शकलेसंबंधी ज्ञान असणे हे भांडस्थल होय.॥३१॥

**पराहन्तासमावेशपरिपूर्णविमर्शवान् ।**
**सर्वज्ञ: सर्वग: साक्षी सर्वकर्ता महेश्वर:।।३२।।**

**अन्वयार्थ** : महेश्वर: = परमेश्वर, पराहन्तासमावेश = पराहंतेच्या समावेशाने, परिपूर्णविमर्शवान् = संपूर्ण विमर्शशक्तीने युक्त होऊन, सर्वज्ञ: = सर्वज्ञ, सर्वग: = सर्वव्यापी, सर्वकर्ता = सर्वकर्ता, आणि साक्षी = कर्मांचा साक्षी होतो.

**भावार्थ** : शिव आणि जीव यांना साधारण असलेल्या आत्मतत्त्व स्वसमवेत विमर्शशक्तीच्या क्षोभाने त्याच्या ठिकाणी पराहंतेचा अभिनिवेश होतो, म्हणून तो महेश्वर परिपूर्ण विमर्शवान (पूर्ण विचारवान) होऊन सर्वज्ञ, सर्वकर्ता, सर्वव्यापक आणि सर्वसाक्षी होतो. जर त्या आत्मतत्त्वात विमर्श-शक्ती नसती तर ते आत्मतत्त्व प्रकाशवान जरी दिसले असते तरी ते स्फटिकाप्रमाणे जड झाले असते.॥३२॥

**विश्वाधारमहासंवित्प्रकाशपरिपूरितम् ।**
**पराहन्तामयं प्राहुर्विमर्शं परमात्मन:।।३३।।**

**अन्वयार्थ** : विश्वाधार = विश्वाला आधारभूत, महासंवित्प्रकाशपरिपूरितं = महाज्ञानप्रकाशाने परिपूर्ण, परमात्मनः = परमात्म्याच्या, विमर्शं = विमर्शशक्तीला, पराहन्तामयं = पराहंता असे, प्राहुः = म्हणतात.

**भावार्थ** : जगाला आधारभूत असलेली, महाज्ञान प्रकाशाने परिपूर्ण असलेली, अशा परशिवाच्या विमर्शशक्तीला शिवाद्वैतज्ञानी पराहंता असे म्हणतात. अर्थात् अहम्-पदवाच्य परब्रह्माचा असाधारण धर्मच पराहंता होय.॥३३॥

**विमर्शभाण्डविन्यस्तविश्वतत्त्वविजृम्भणः।**
**अनन्यमुखसम्प्रेक्षी मुक्तः स्वात्मनि तिष्ठति।।३४।।**

**अन्वयार्थ** : मुक्तः = मुक्त असा शिवयोगी, ज्याने विमर्शभाण्डविन्यस्त = विमर्शरूपी भांड्यात ठेवला आहे, विश्वतत्त्वविजृम्भणः = विश्वतत्त्वांचा विस्तार, असा तो अनन्यमुखसंप्रेक्षी = अनन्यपणे अंतर्मुख होऊन, स्वात्मनि = स्वस्वरूपात, तिष्ठति = स्थिर होतो.

**भावार्थ** : मायापाशातून मुक्त झालेला शिवयोगी, शक्तितत्त्वापासून पृथ्वीतत्त्वापर्यंत सर्व तत्त्वांना आपल्या विमर्श-शक्तिरूपी भांड्यात ठेवून, अनन्यपणे अंतर्मुख होऊन स्वस्वरूपात स्थिर होतो.॥३४॥

**भाजनस्थल - (९७)**

**समस्तजगदण्डानां सर्गस्थित्यन्तकारणम्।**
**विमर्शो भासते यत्र तद्भाजनमिहोच्यते।।३५।।**

**अन्वयार्थ** : समस्तजगदण्डानां = समस्तभुवन ब्रह्मांडांच्या, सर्गस्थित्यन्तकारणं = सृष्टी, स्थिती आणि लयाला कारणीभूत अशी, विमर्शः = विमर्शशक्ती, यत्र = जेथे, भासते = प्रकाशित होते, तत् = ते, इह = येथे, भाजनमिति = भाजन म्हणून, उच्यते = म्हटले जाते.

**भावार्थ** : समस्त भुवन ब्रह्मांडाच्या सृष्टि-स्थिती-लयाला कारणीभूत असणारी विमर्शशक्ती ज्या परशिवब्रह्मात प्रकाशित होते तो परशिव ब्रह्मच भाजन असे म्हणविला जातो.॥३५॥



**विमर्शाख्या पराशक्तिर्विश्ववैचित्र्यकारिणी।**
**यस्मिन् प्रतिष्ठितं ब्रह्म तदिदं विश्वभाजनम्।।३६।।**

**अन्वयार्थ** : विश्ववैचित्र्यकारिणी = विश्वाच्या वैचित्र्याला कारणीभूत, विमर्शाख्या = विमर्श नावाची, परा शक्तिः = परा शक्ती, यस्मिन् = जेथे, प्रतिष्ठिता = प्रतिष्ठित झाली आहे, तदिदं = ते हे, ब्रह्म = परशिवब्रह्म, विश्वभाजनम् = विश्वभाजन असे म्हटले जाते.

**भावार्थ** : चित्रविचित्र विश्वाची उत्पत्ती करणारी विमर्शनामक पराशक्ती ज्याच्या ठिकाणी अविनाभावसंबंधाने प्रतिष्ठित असते ते परब्रह्मच विश्वभाजन होय.॥३६॥

**अन्तःकरणरूपेण जगदङ्कुररूपतः।**
**यस्मिन् विभाति चिच्छक्तिर्ब्रह्मभूतः स उच्यते।।३७।।**

**अन्वयार्थ** : चिच्छक्तिः = परशिवसमवेत असणारी ज्ञानशक्ती, जगदङ्कुररूपतः = जगाच्या अंकुरोत्पत्तीला कारणीभूत, अन्तःकरणरूपेण = मूलाहंकाररूपाने, यस्मिन् = जेथे, विभाति = भासते, सः = तो, ब्रह्मभूतः = परशिव ब्रह्म म्हणून, उच्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : परशिवसमवेत अशी ज्ञानशक्ती जगाच्या उदयास कारणीभूत असणाऱ्या मूलाहंकाराचे रूप धारण करून विमर्श नामक परबिंदूमध्ये समाविष्ट होते. तो परबिंदूच परशिव या औपचारिक नावाने ओळखला जातो. म्हणून तो परबिंदूच महालिंग होय असे समजावे.॥३७॥

**यथा चन्द्रे स्थिरा ज्योत्स्ना विश्ववस्तुप्रकाशिनी।**
**तथा शक्तिर्विमर्शात्मा प्रकारे ब्रह्मणि स्थिता।।३८।।**

**अन्वयार्थ** : चन्द्रे = चंद्रामध्ये, स्थिरा = स्थिर असणारे, ज्योत्स्ना = चांदणे, यथा = जसे, विश्ववस्तुप्रकाशिनी = सर्व वस्तूंना प्रकाशित करते, तथा = तसे, ब्रह्मणि = परशिवब्रह्मात, स्थिता = राहणारी, विमर्शात्मा = विमर्शस्वरूप, शक्तिः = शक्ती, प्रकारे = आपल्या एका अंशाने, विश्वाला प्रकाशित करते.

**भावार्थ** : चंद्रामध्ये स्थिर राहणारे चांदणे एका ठिकाणी म्हणजे चंद्रातच असले तरी ते जसे जगाला प्रकाशित करते त्या प्रमाणे परशिवब्रह्मात अविनाभावसंबंधाने राहणारी विमर्शात्मक शक्ती आपल्या एका अंशाने सर्व विश्वाला प्रकाशित करते.॥३८॥

**अकारः शिव आख्यातो हकारः शक्तिरुच्यते।**
**शिवशक्तिमयं ब्रह्म स्थितमेकमहंपदे।।३९।।**

**अन्वयार्थ** : अकारः = 'अ'कार, शिवः = शिव म्हणून, आख्यातः = म्हटला जातो, हकारः = 'ह'कार, शक्तिरुच्यते = शक्तिरूप म्हटला जातो, शिवशक्तिमयं = शिवशक्तिस्वरूप, ब्रह्म = परशिव ब्रह्म, एकं = एक होऊन, अहंपदे = अहंपदामध्ये, स्थितम् = स्थित आहे.

**भावार्थ** : 'अ'काराला शिव म्हणावे, 'ह'काराला शक्ती म्हणावे असे श्रुती आणि आगमांतून प्रतिपादिले आहे, त्यामुळे 'अहम्' या एकाच पदामध्ये शिवशक्तिमय असे परब्रह्म कालत्रयात अर्थात् नेहमी असते.॥३९॥

**अहन्तां परमां प्राप्य शिवशक्तिमयीं स्थिराम्।**
**ब्रह्मभूयंगतो योगी विश्वात्मा प्रतिभासते।।४०।।**

**अन्वयार्थ** : परमां = देशकालातीत, शिवशक्तिमयीं = शिवशक्तिस्वरूप, स्थिरां = सुस्थिर, अहन्तां = अहंतेला, प्राप्य = प्राप्त करून, ब्रह्मभूयंगतः = ब्रह्मस्वरूप झालेला, योगी = शिवयोगी, विश्वात्मा = जगद्रूप होऊन, प्रतिभासते = प्रकाशित होतो.

**भावार्थ** : देशकालातीत आणि शिवशक्त्यात्मक अशी स्थिर पराहंता प्राप्त करून ब्रह्मस्वरूप झालेला शिवयोगी जगद्रूप होऊन प्रकाशतो.॥४०॥

**वृक्षस्थं पत्रापुष्पादि वटबीजस्थितं यथा।**
**तथा हृदयबीजस्थं विश्वमेतत् परात्मनः।।४१।।**

**अन्वयार्थ** : वृक्षस्थं = वटवृक्षाचे, पत्रपुष्पादि = पत्र, पुष्प आदी, यथा = जसे, वटबीजस्थितं = वटबीजात असतात, तथा = तसे, एतद् विश्वं = हे समस्त जग, परात्मनः = परब्रह्मस्वरूप अशा भाजनस्थलसंपन्न शिवयोग्याच्या, हृदयबीजस्थं = हृदयरूपी बीजात असते.



**भावार्थ** : वटवृक्षाची पाने, फुले ही जशी वृक्ष उगवण्यापूर्वी त्याच्या बीजात सूक्ष्मरूपाने असतात तशा प्रकारे भाजनस्थलसंपन्न होऊन परब्रह्मरूप झालेल्या शिवयोग्याच्या हृदयात अहंतारूप शिवशक्त्यात्मक बीजरूपाने हे चराचर विश्व स्थित असते.॥४१॥

## अङ्गालेपस्थल - (९८)

**दिक्कालाद्यनवच्छिन्नं चिदानन्दमयं महत्।**
**यस्य रूपमिदं ख्यातं सोऽङ्गालेप इहोज्यते।।४२।।**

**अन्वयार्थ** : दिक्कालाद्यनवच्छिन्नं = देशकालादी परिच्छेदरहित, चिदानन्दमयं = चिदानंदस्वरूप, महत् = महान, इदं = हे, रूपं = स्वरूप, यस्य = ज्याचे म्हणून, ख्यातं = प्रसिद्ध आहे, सः = भाजनस्थलसंपन्न शिवयोगी, इह = येथे, अङ्गालेपः = अंगालेप म्हणून, उच्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : परब्रह्मस्थिती प्राप्त झालेल्या शिवयोग्याचे स्वरूप देशकालादी मर्यादारहित सच्चिदानंदस्वरूप, व्यापक होऊन प्रसिद्ध झालेले असते. अशा स्वरूपाचा शिवयोगी शरीरसंबंधित कर्मांपासून अलिप्त असल्याने त्याला अंगालेप असे म्हणतात.॥४२॥

**समस्तजगदात्मापि संविद्रूपो महामतिः।**
**लिप्यते नैव संसारैर्यथा धूमादिभिर्नभः।।४३।।**

**अन्वयार्थ** : यथा = जसे, नभः = आकाश, धूमादिभिः = धूमादिकांपासून, नैव लिप्यते = लिप्त होत नाही, तसे महामतिः = महाबुद्धिशाली, संविद्रूपः = ज्ञानस्वरूप शिवयोगी, समस्तजगदात्माऽपि = संपूर्ण जगमय असला तरी, संसारैः = संसाराच्या पापकर्मापासून लिप्त होत नाही.

**भावार्थ** : आकाश जसे आपल्या ठिकाणी संचरणाऱ्या धूर, मेघादिकांपासून निर्लिप्त असते, तशा प्रकारे महाबुद्धिशाली, ज्ञानस्वरूप शिवयोगी समस्त प्रपंचस्वरूप व्यापक असला तरी संसारपापकर्मापासून तो लिप्त होत नाही.॥४३॥

**न विधिर्न निषेधश्च न विकल्पो न वासना।**
**केवलं चित्स्वरूपस्य गलितप्राकृतात्मनः।।४४।।**

**अन्वयार्थ** : गलितप्राकृतात्मन: = प्राकृतिक कर्मप्रवृत्ती नसलेला, केवलं = केवळ, चित्स्वरूपस्य = चिद्रूप अशा शिवयोग्याला, न विधि: = विहित कर्म नाही, न निषेध: = निषिद्ध कर्म नाही, न विकल्प: = विकल्पही नाही, च = आणि, न वासना = वासनाही नाही.

**भावार्थ** : प्राकृतिक कर्मप्रवृत्ती नसलेल्या केवळ ज्ञानस्वरूप अशा शिवयोग्याला शास्त्रविहित कर्माचरण असो, शास्त्रनिषिद्ध कर्मांचा परित्याग असो, संकल्पविकल्पात्मक वृत्ती असो अथवा मायिक कर्मवासना असो, त्याच्या ठिकाणी मुळीच नसतात म्हणून तो कोणत्याही कर्माने लिप्त होत नाही.।।४४।।

**घटादिषु पृथग्भूतं यथाऽऽकाशं न भिद्यते।**
**तथोपाधिगतं ब्रह्म नानारूपं न भिद्यते।।४५।।**

**अन्वयार्थ** : घटादिषु = घटमठादीमुळे, पृथग्भूतं = वेगळे झालेले, आकाशं = आकाश, यथा = जसे, न भिद्यते = भिन्न होत नाही, तथा = तसे, उपाधिगतं = शरीरादी उपाधीमुळे, नानारूपं = अनेकरूप झालेले, ब्रह्म = ब्रह्मसुद्धा, न भिद्यते = भिन्न भिन्न नसते.

**भावार्थ** : घटमठादी उपाधीमुळे आकाश भिन्नभिन्न झालेले दिसत असले तरी वस्तुत: ते तसे नसते. तशाप्रकारे देवदानवादी शरीरोपाधीमुळे नानारूपे दिसत असली तरी त्यांच्यातील ब्रह्मतत्त्व वस्तुत: भिन्न नसते. असे हे अभेदज्ञान वासनारहित शिवयोग्याचे स्वरूप असते.।।४५।।

**अनश्वरमनिर्देश्यं यथा व्योम प्रकाशते।**
**तथा ब्रह्मापि चैतन्यमत्र वैशेषिकी कला।।४६।।**

**अन्वयार्थ** : व्योम = आकाश, यथा = जसे, अनश्वरं = नाशरहित, अनिर्देश्यं = निरूपम, प्रकाशते = प्रकाशित होते, तथा = तसे, ब्रह्मापि = ब्रह्म सुद्धा प्रकाशित होते, अत्र = ह्या ब्रह्मामध्ये, चैतन्यं = चिद्रूप, कला = कला, वैशेषिकी = विशेषरूपाने आहे.



**भावार्थ** : आकाश अविनाशी, उपमारहित जसे असते तसे परब्रह्मही अविनाशी आणि उपमातीत असते, तरीपण आकाशात ज्ञानशक्ती नसल्याने ते जडाकाश म्हणविले जाते आणि परब्रह्मात दृक्क्रियारूप कलाशक्ती असल्यामुळे परब्रह्मरूपी महालिंग चिदाकाश या नावाने ओळखले जाते.।।४६।।

**न देवत्वं न मानुष्यं न तिर्यक्त्वं न चान्यथा।**
**सर्वाकारत्वमाख्यातं जीवन्मुक्तस्य योगिनः।।४७।।**

**अन्वयार्थ** : जीवन्मुक्तस्य = जीवन्मुक्त अशा, योगिन: = शिवयोग्याला, न देवत्वं = देवत्व नाही, न मानुष्यं = मनुष्यत्व नाही, न तिर्यक्त्वं = तिर्यक्भाव नाही, च = आणि, न अन्यथा = दुसरा कोणताही भाव नाही, तरीपण तो सर्वाकारत्वं = परिपूर्ण चिदाकाशस्वरूप असल्याचे, आख्यातं = सांगितले जाते.

**भावार्थ** : जीवन्मुक्त शिवयोगी चिदाकाशस्वरूप झाला असल्याने तो कर्मबंधनापासून मुक्त असतो. यामुळे केवळ पुण्याधिक्याने प्राप्त होणारा देवभाव असो, पुण्यपाप मिश्रणाने येणारा मनुष्यभाव असो, केवळ पापकर्मांनी प्राप्त होणारा तिर्यक्भाव असो अथवा प्रकृतिगर्भात मूर्च्छित असणारा जडभाव असो, त्या शिवयोग्याच्या ठिकाणी यांपैकी कोणतीच भावना नसते. त्याऐवजी तो स्वत:च सर्वमय झाला असल्याकारणाने त्याच्यात कसल्याही प्रकारची भेदभावना उरलेली नसते. म्हणून त्याला अंगालेपस्थली म्हणतात.।।४७।।

### स्वपराज्ञस्थल - (९९)

**अप्रमेये चिदाकारे ब्रह्मण्यद्वैतवैभवे।**
**विलीनः किं नु जानाति स्वात्मानं परमेव वा।।४८।।**

**अन्वयार्थ** : अप्रमेये = अपरिमित, चिदाकारे = चिद्रूप, अद्वैतवैभवे = अद्वितीय अशा, ब्रह्मणि = ब्रह्मस्वरूपात, विलीन: = समरस झालेला शिवयोगी, स्वात्मानं = आपल्याला, वा = अथवा, परमेव = परशिवाला, किं नु जानाति = वेगळेपणाने जाणतो काय?

**भावार्थ** : अप्रमेय, ज्ञानमय, स्वगत-सजातीय-विजातीय असे भेद नसलेल्या एकमेव अशा परब्रह्मात ऐक्य पावलेला हा शिवयोगी आपण असो किंवा इतर कोणी असो, त्या परब्रह्माशिवाय भिन्न काही आहे असे कसा समजेल? अर्थात् सर्वत्र परब्रह्मच भरलेले आहे हे तो जाणतो.॥४८॥

**यत्र नास्ति भिदायोगादहं त्वमिति विभ्रमः।**
**न संयोगो वियोगश्च न ज्ञेयज्ञातृकल्पना।।४९।।**
**न बन्धो न च मुक्तिश्च न देवाद्यभिमानिता।**
**न सुखं नैव दुःखं च नाज्ञानं ज्ञानमेव वा।।५०।।**
**नोत्कृष्टत्वं न हीनत्वं नोपरिष्टान्न चाप्यधः।**
**न पश्चान्नैव पुरतो न दूरे किञ्चिदन्तरे।।५१।।**
**सर्वाकारे चिदानन्दे सत्यरूपिणि शाश्वते।**
**पराकाशमये तस्मिन् परे ब्रह्मणि निर्मले।।५२।।**
**एकीभावमुपेतानां योगिनां परमात्मनाम्।**
**परापरपरिज्ञानपरिहासकथा कुतः।।५३।।**

**अन्वयार्थ** : यत्र = ज्या अद्वितीय परब्रह्मात, योगात् = समानसमरस योगामुळे, अहंत्वामिति = मी आणि तू अशा, भिदा = भेदाचा, विभ्रमः = भ्रम, नास्ति = नसतो, न संयोगः = संयोग नसतो, च = आणि, वियोगः = वियोग नसतो, न ज्ञेयज्ञातृकल्पना नसते, न बन्धः = बंधन नसते, न च मुक्तिः = मुक्ती नसते, च = आणि, न देवाद्यभिमानिता = देवत्वादी अभिमान नसतो, न सुखं = सुख नसते, नैव दुःखं = दुःख नसते, नोत्कृष्टत्वं = उत्कृष्टत्व नसते, न हीनत्वं = हीन भाव नसतो, नोपरिष्टात् = वर नसते, न चाप्यधः = खाली ही नसते, न पश्चात् = पाठीमागे नाही, नैव पुरतः = पुढेही नाही, न दूरे = दूर नाही, किञ्चिदन्तरे = समीप नाही, सर्वाकारे = सर्वस्वरूप, चिदानन्दे = चिदानंदरूप, सत्यरूपिणि = सद्रूप, शाश्वते = शाश्वत, पराकाशमये = पराकाशरूप, निर्मले = मलरहित, तस्मिन् = त्या, परे ब्रह्मणि = परशिवब्रह्मात, एकीभावमुपेतानां = समरस झालेल्या, परात्मनाम् = परमात्मस्वरूप, योगिनां = शिवयोग्यांना, परापरपरिज्ञानपरिहासकथा = आपपरतेचा विनोदीभाव, कुतः = कोठून असणार?



**भावार्थ** : ज्या परब्रह्मस्वरूपात मी वेगळा व परमात्मा वेगळा असा भेदभाव भ्रम नाही, त्यात संयोग नाही, वियोग नाही. त्याला बंध नाही, मोक्ष नाही, देवत्वाचा अभिमान नाही. सुख नाही, दुःख नाही. ज्ञान नाही, अज्ञान नाही. त्याला श्रेष्ठत्व नाही, हीनत्व नाही. उच्चत्व नाही, नीचत्व नाही. मागे नाही, पुढे नाही. दूर नाही, जवळ नाही. परब्रह्मस्वरूप सर्व त्रैलोक्य मिळून एकरूप झाल्यासारखे आहे. ते ज्ञानस्वरूप, सत्यस्वरूप, श्रेष्ठ व निर्दोष आहे. त्या परब्रह्मस्वरूपात सामरस्याने एक झालेल्या परकाय शिवयोग्यांना आप-परभाव थट्टेला सुद्धा उरत नाही.॥४९-५३॥

**देशकालानवच्छिन्नतेजोरूपसमाश्रयात् ।**
**स्वपरज्ञानविरहात् स्वपराज्ञस्थलं विदुः।।५४।।**

**अन्वयार्थ** : देशकालानवच्छिन्न = देशकाल आणि वस्तुपरिच्छेदरहित अशा, तेजोरूपसमाश्रयात् = चित्प्रकाशरूप परशिवब्रह्मात समरस झाल्याने, स्वपरज्ञानविरहात् = स्व आणि पर हे भेद नसल्यामुळे, स्वपराज्ञस्थलं विदुः = त्या अवस्थेला स्वपराज्ञस्थल म्हणतात.

**भावार्थ** : देशकालवस्तुमर्यादारहित, ज्ञानप्रकाशरूप परशिवब्रह्मात समरस झालेल्या शिवयोग्यांना स्व आणि पराचे ज्ञान उरले नसल्यामुळे त्याला स्वपराज्ञ असे म्हणतात आणि त्याची ती अवस्था स्वपराज्ञस्थल होय.॥५४॥

### भावाभावलयस्थल - (१००)

**त्वन्ताहन्ताविनिर्मुक्ते शून्यकल्पे चिदम्बरे।**
**एकीभूतस्य सिद्धस्य भावाभावकथा कुतः।।५५।।**

**अन्वयार्थ** : त्वन्ताहन्ताविनिर्मुक्ते = परिच्छिन्न असा तूपणा आणि मीपणा भाव नसलेले, शून्यकल्पे = शून्यासारखे असणाऱ्या, चिदम्बरे = चिदाकाशरूप परशिवात, एकीभूतस्य = समरस झालेल्या, सिद्धस्य = स्वपरज्ञानशून्य शिवयोग्याला, भावाभावकथा = भाव आणि अभावाची जाणीव, कुतः = कोठून असणार?

**भावार्थ** : शून्यस्वरूप, चिदाकाररूप आणि परिच्छिन्न देहसंबंधाने उत्पन्न होणाऱ्या मी-तूपणाचा भाव नसलेल्या परशिवब्रह्मात समरसभूत झालेल्या स्वपरज्ञानशून्य अशा शिवयोग्याला भाव-अभावाचा प्रसंग कोठे असणार? अर्थात् असत नाही. म्हणजेच शरीरच आत्मा असा परिच्छिन्न भाव असो अथवा शरीर आत्मा नव्हे असा अभाव असो, हे दोन्ही त्याच्या ठिकाणी नसतात.॥५५॥

**अहंभावस्य शून्यत्वादभावस्य तथात्मनः।**
**भावाभावविनिर्मुक्तो जीवन्मुक्तः प्रकाशते॥५६॥**

**अन्वयार्थ** : अहंभावस्य = परिच्छिन्न अहंकार, तथा = तसेच, आत्मनः = आत्म्याचा, अभावस्य = अभाव, ह्या दोहोंच्या शून्यत्वात् = नसण्याने, भावाभाव-विनिर्मुक्तः = भावाभाव नसलेला शिवयोगी, जीवन्मुक्तः = जीवन्मुक्त होऊन, प्रकाशते = प्रकाशित होतो.

**भावार्थ** : स्वपरज्ञानशून्य अशा जीवन्मुक्त शिवयोग्याला 'अहम्' अशा परिच्छिन्न देहात अहंभाव असो अथवा आत्मा नाही असा अभाव असो, हे दोन्ही त्याला नसतात. म्हणून तो भावाभावविमुक्त होऊन स्वस्वरूपाने प्रकाशतो.॥५६॥

**सुखदुःखादिभावेषु नाभावो भाव एव वा।**
**विद्यते चित्स्वरूपस्य निर्लेपस्य महात्मनः॥५७॥**

**अन्वयार्थ** : निर्लेपस्य = निर्लिप्त, चित्स्वरूपस्य = चिद्रूप अशा, महात्मनः = महापुरुषांना, सुखदुःखादिभावेषु = सुखदुःखादिकांचा संबंध होत असताना, अभावः = अभाव, वा = अथवा, भाव एव = भावही, न विद्यते = नसतो.

**भावार्थ** : यापूर्वी वर्णिलेला मूलाहंकारलेपरहित, चित्स्वरूप, निर्लेप, व्यापक अशा महाशिवयोग्याला सुखदुःखादीच्या संबंधाचा भाव असो अथवा संबंध नाही असा अभाव असो हे दोन्हीही असत नाहीत. म्हणून त्याला भावाभावलयस्थली असे म्हणतात.॥५७॥



**यस्मिन् ज्योतिषि चिद्रूपे दृश्यते नैव किञ्चन।**
**सद्रूपं वाप्यसद्रूपं भावाभावं विमुञ्चतः॥५८॥**

**अन्वयार्थ** : भावाभावं = भाव आणि अभाव, विमुञ्चतः = सोडलेल्या शिवयोग्याला, यस्मिन् = ज्या, चिद्रूपे = ज्ञानस्वरूप, ज्योतिषि = प्रकाशाविषयी, सद्रूपं = सद्रूप, वा = अथवा, असद्रूपमपि = असद्रूप असे, किञ्चन = काहीही, न दृश्यते = दिसत नाही.

**भावार्थ** : भावाभावाचा त्याग केलेल्या चैतन्य प्रकाशरूप अशा त्या शिवयोग्याला सद्रूप अथवा असद्रूप असा कोणताही पदार्थ दिसत नाही.॥५८॥

**प्रतीयमानौ विद्येते भावभावौ न कुत्रचित्।**
**लिङ्गैक्ये सति यत्तस्माद्भावाभावलयस्थलम्॥५९॥**

**अन्वयार्थ** : प्रतीयमानौ = प्रकाशित होणारे, भावाभावौ = भाव आणि अभाव, लिङ्गैक्ये सति = शिवलिंगाची समरस झालेल्या महापुरुषाला, कुत्रचित् = कोठेही, यत् = जे, न विद्यते = नसतात, तस्मात् = म्हणून, त्याला भावाभाव-लयस्थलं = भावाभावलयस्थल असे म्हटले जाते.

**भावार्थ** : शिवलिंगात समरस झालेल्या त्या महापुरुषाला बाह्य प्रपंचात दिसणारे भावाभाव कोठेही दिसत नसल्यामुळे शिवयोग्याच्या त्या अवस्थेला भावाभावलयस्थल असे म्हणतात.॥५९॥

### ज्ञानशून्यस्थल - (१०१)

**परापरसमापेक्षभावाभावविवेचनम् ।**
**ज्ञानं ब्रह्मणि तन्नास्ति ज्ञानशून्यस्थलं विदुः॥६०॥**

**अन्वयार्थ** : परापरसमापेक्ष = पर आणि अपर ज्ञानाच्या अभिलाषेने युक्त, भावाभावविवेचनम् = भाव आणि अभावाचे विवेचक, ज्ञानं = ज्ञान, ब्रह्मणि = परब्रह्मस्वरूपी शिवयोग्यात, नास्ति = नसते, तत् = त्याला, ज्ञानशून्यस्थलं = ज्ञानशून्यस्थल असे, विदुः = जाणतात.

**भावार्थ** : परस्परसापेक्ष, अस्तिनास्तिरूप, भावाभाव विवेचनयुक्त असे जे भेदज्ञान ते परब्रह्मस्वरूप शिवयोग्यात नसते. अशा भेदज्ञानशून्यतेचे प्रतिपादन करणाऱ्या स्थलाला शिवज्ञानी लोक ज्ञानशून्यस्थल असे म्हणतात. ज्ञानशून्य म्हणजे भेदज्ञानशून्य असा अर्थ होय.॥६०॥

**जले जलमिव न्यस्तं वह्नौ वह्निरिवार्पितम्।**
**परे ब्रह्मणि लीनात्मा विभागेन न दृश्यते।।६१।।**

**अन्वयार्थ** : जले = पाण्यात, न्यस्तं = मिसळलेल्या, जलमिव = पाण्यासारखे, वह्नौ = अग्नीत, अर्पितं = अर्पिलेल्या, वह्निरिव = अग्नीप्रमाणे, परे ब्रह्मणि = परशिव ब्रह्मात, लीनात्मा = समरस झालेला शिवयोगी, विभागेन = भिन्न रूपाने, न दृश्यते = दिसत नाही.

**भावार्थ** : पाण्यामध्ये मिसळलेले पाणी, अग्नीमध्ये घातलेला अग्नी यांचे निराळे अस्तित्व जसे दिसत नाही, तसे परब्रह्मस्वरूप महालिंगात भावाभावरहित होऊन समरस झालेल्या शिवयोग्याचे त्याहून वेगळे अस्तित्व उरत नाही. लौकिक दृष्टांतात समरस झालेल्या वस्तूंमध्ये हानि-वृद्धी दिसून येते, तशी स्थिती परशिवाशी ऐक्य पावलेल्या शिवयोग्याची नसते. हानि-वृद्धीविना तो परब्रह्माशी समान समरसरूपाने ऐक्य पावतो.॥६१॥

**सर्वात्मनि परे तत्त्वे भेदशङ्काविवर्जिते।**
**ज्ञात्रादिव्यवहारोत्थं कुतो ज्ञानं विभाव्यते।।६२।।**

**अन्वयार्थ** : भेदशङ्काविवर्जिते = भेद नसलेले, सर्वात्मनि = प्रपंचस्वरूप, परे तत्त्वे = परशिवतत्त्वात, ज्ञात्रादिव्यवहारोत्थं = ज्ञातृज्ञानादी व्यवहाराने उत्पन्न, ज्ञानं = त्रिपुटी ज्ञान, कुतो विभाव्यते = कसे अनुभवास येईल?

**भावार्थ** : भेदशंकावर्जित सकलचराचरप्रपंचरूप अशा परतत्त्वात ज्ञातृज्ञेयादी व्यवहाराने उत्पन्न होणारे भेदज्ञान कसे अनुभवास येईल? अर्थात् येणार नाही.॥६२॥

**निर्विकारं निराकारं नित्यं सीमाविवर्जितम्।**
**व्योमवत् परमं ब्रह्म निर्विकल्पतया स्थितम्।।६३।।**



**न पृथ्व्यादीनि भूतानि न ग्रहा नैव तारकाः।**
**न देवा न मनुष्याश्च न तिर्यञ्चो न चापरे ।।६४।।**
**तस्मिन् केवलचिन्मात्रसत्तानन्दैकलक्षणे।**
**त्वन्ताहन्तादिसंरूढं विज्ञानं केन भाव्यते।।६५।।**

**अन्वयार्थ** : निर्विकारं = विकाररहित, निराकारं = आकाररहित, नित्यं = नित्य, सीमाविवर्जितं = निस्सीम असे, परमं ब्रह्म = परब्रह्म, व्योमवत् = आकाशाप्रमाणे, निर्विकल्पतया = भेदशून्य होऊन, स्थितं = असते, केवलचिन्मात्रसत्तानन्दैकलक्षणे = केवल सच्चिदानंदस्वरूप अशा, तस्मिन् = त्या परशिव ब्रह्मात, न पृथ्व्यादीनि भूतानि = पृथ्वी आदी पंचमहाभूते नसतात, न ग्रहाः = सूर्यादी ग्रह नसतात, नैव तारकाः = अश्विनी भरणी आदी नक्षत्रे नसतात, न देवाः = विष्ण्वादी देव नसतात, च = आणि, नापरे = दुसरे काही नसते, त्यामुळे त्वन्ताहन्तादिसंरूढं = मीतूपणाच्या व्यवहाराने उत्पन्न, विज्ञानं = विशेष ज्ञान, केन भाव्यते = कोणाकडून अनुभविले जाईल?

**भावार्थ** : विकाररहित, हेय असे आकाररहित, नित्य, सीमातीत असे परब्रह्म आकाशाप्रमाणे निर्विकल्प होऊन असते. स्थूल अशी पृथिव्यादी भूते असोत, सूर्यादी ग्रह असोत, अश्विन्यादी नक्षत्रे असोत, देवीदेवता असोत, मनुष्ये असोत, पशुपक्षी असोत, अशा कोणत्याही वस्तू त्या परब्रह्मात राहात नाहीत. केवळ सच्चिदानंदस्वरूप परब्रह्मात मी-तूपणाने होणारे भेदज्ञान कोणापासून होईल? अर्थात् त्या ठिकाणी मी-तूपणाचा भेदच नसतो त्यामुळे भेदज्ञान संभवत नाही.॥६३-६५॥

**ज्ञेयाभावाद्विशेषेण शून्यकल्पं विभाव्यते।**
**ज्ञातृज्ञेयादिभिः शून्यं शून्यं ज्ञानादिभिर्गुणैः।।६६।।**
**आदावन्ते च मध्ये च शून्यं सर्वत्र सर्वदा।**
**द्वितीयेन पदार्थेन शून्यं शून्यं विभाव्यते।।६७।।**

**अन्वयार्थ** : विशेषेण = विशेषरूपाने, ज्ञेयाभावात् = ज्ञेय पदार्थांचा अभाव असल्यामुळे, शून्यकल्पं = (ज्ञान) शून्यासारखे, विभाव्यते = वाटते, ज्ञातृज्ञेयादिभिः = ज्ञातृज्ञेयादी त्रिपुटीमय प्रपंचापासून, शून्यं = शून्य, ज्ञानादिभिः = ज्ञान

इच्छादी, गुणैः = गुणांनी, शून्यं = शून्य, आदौ = आरंभी, मध्ये = मध्ये, च = आणि, अन्ते = शेवटी, सर्वत्र = सगळीकडे, सर्वदा = नेहमी, शून्यं = शून्य, द्वितीयेन = दुसऱ्या, पदार्थेन = पदार्थाने, शून्यं = शून्य, म्हणून शून्यं = ज्ञान-शून्यस्थल म्हणून, विभाव्यते = समजले जाते.

**भावार्थ** : जाणून घेण्यास योग्य वस्तू असली तरच ज्ञानाचे अस्तित्व, ज्ञेय अशी दुसरी वस्तू नसल्यास ज्ञान शून्यवत् होते. म्हणून ते ज्ञान ज्ञातृज्ञेयादि-त्रिपुटीमय प्रपंचशून्य, इच्छा ज्ञानादिगुणशून्य, आदिमध्यान्तशून्य, सर्वदिक्कालशून्य असे असते. ते का तर दुसरा कोणताही ज्ञेय पदार्थ नसल्यामुळे त्या ज्ञानाला शून्यज्ञान असे म्हणतात.॥६६-६७॥

**केवलं सच्चिदानन्दप्रकाशाद्वयलक्षणम्।**
**शून्यकल्पं पराकाशं परब्रह्म प्रकाशते।।६८।।**

**अन्वयार्थ** : केवलं = केवळ, सच्चिदानन्दप्रकाशाद्वयलक्षणम् = सच्चिदानंद प्रकाश आणि अद्वितीय, पराकाशं = पराकाशरूप, परब्रह्म = परशिवब्रह्म, शून्यकल्पं = शून्यासारखे, प्रकाशते = प्रकाशित होते.

**भावार्थ** : केवळ सच्चिदानंदप्रकाश अद्वयस्वरूप महाकाश परब्रह्म शून्यसदृश होऊन प्रकाशते.॥६८॥

**शून्यज्ञानादिसङ्कल्पे शून्यसर्वार्थसाधने।**
**ज्योतिर्लिङ्गे चिदाकारे स्वप्रकाशे निरुत्तरे।।**
**एकीभावमुपेतस्य कथं ज्ञानस्य सम्भवः।।६९।।**

**अन्वयार्थ** : शून्यज्ञानादिसङ्कल्पे = ज्ञानसंकल्पादिरहित, शून्यसर्वार्थ-साधने = सर्वपुरुषार्थरहित, निरुत्तरे = ज्याच्या पलीकडे काही नाही असे, स्वप्रकाशे = स्वयंप्रकाश, चिदाकारे = चिद्रूप अशा, ज्योतिर्लिङ्गे = ज्योतिर्लिंगात, एकीभावमुपेतस्य = ऐक्यभाव संपादन केलेल्याला, ज्ञानस्य = ज्ञानाचा, कथं सम्भवः = कसा संभव होणार?

**भावार्थ** : ज्ञान-इच्छा-संकल्परहित, धर्म-अर्थ-काम-मोक्ष या अर्थ-साधने पासून मुक्त, एकैक, चित्स्वरूप, स्वयंप्रकाश ज्योतिर्लिंगात ऐक्य



पावलेल्या शिवयोग्याला अन्य वस्तूचे ज्ञान कसे होऊ शकेल? अर्थात् स्वस्वरूपज्ञानाशिवाय अन्य कोणत्याही ज्ञानाला अवकाशच नाही.॥६९॥

**यस्य कार्यदशा नास्ति कारणत्वमथापि वा।**
**शेषत्वं नैव शेषित्वं स मुक्तः पर उच्यते।।७०।।**

**अन्वयार्थ** : यस्य = ज्याला, कार्यदशा = कार्यावस्था, अथापि वा = अथवा, कारणत्वं = कारणावस्था, नास्ति = नाही, शेषत्वं = शेषभाव आणि शेषित्वं = शेषिभाव, नैव = नाही, सः = तो, परः = श्रेष्ठ, मुक्तः = मुक्त म्हणून, उच्यते = म्हटला जातो.

**भावार्थ** : जो स्वतःशिवाय दुसरी वस्तू न पाहणारा, परब्रह्म, परलिंगादी पर्यायनावे असलेला, स्वस्वरूपसंपन्न, सकलतत्त्वातीत अशा शिवयोग्याला कार्यरूप अवस्था असो, की कारणरूप अवस्था असो, ती असत नाही. तो नित्य परिपूर्ण असल्याने त्याच्या ठिकाणी शेषशेषीभाव असत नाही. अशा त्याला सच्चिदानंदस्वरूप परमुक्त असे म्हणतात.॥७०॥

## शिवैक्यस्थल

**एतावदुक्त्वा परमप्रबोधमद्वैतमानन्दशिवप्रकाशम्।**
**देव्यै पुरा भाषितमीश्वरेण तूष्णीमभूद् ध्यानपरो गणेन्द्रः।।७१।।**

**अन्वयार्थ** : गणेन्द्रः = रेणुक गणेश्वर, ईश्वरेण = शिवाकडून, पुरा = पूर्वी, देव्यै = पार्वतीला, भाषितं = गुप्तपणे सांगितलेले, अद्वैतमानन्दशिवप्रकाशम् = अद्वितीय आणि आनंदरूप असे शिवस्वरूप प्रकाशित करणारे, परमप्रबोधं = परमज्ञान, एतावत् = अशा रीतीने, उक्त्वा = अगस्तीमुनींना सांगून, ध्यानपरः = ध्यानस्थ होऊन, तूष्णीमभूत् = मौन झाले.

**भावार्थ** : पूर्वी परमेश्वराने पार्वतीला रहस्यमयतेने उपदेशिलेले शिवानंद प्रकाशक, स्वस्वरूपसाधक, शिवाद्वैतरूप असे पिंडस्थलापासून ज्ञानशून्य-स्थलापर्यंतचे वीरशैवशास्त्र श्रीमद्रेणुकाचार्य अगस्त्यमहर्षींना सांगून स्वस्वरूप ध्यानासक्त होऊन मौन राहिले.॥७१॥

**एवमुक्त्वा समासीनं शिवयोगपरायणम्।**
**रेणुकं तं समालोक्य बभाषे प्राञ्जलिर्मुनिः।।७२।।**

**अन्वयार्थ** : एवं = अशा रीतीने, उक्त्वा = सांगून, शिवयोगपरायणम् = शिवयोगात तल्लीन होऊन, समासीनं = बसलेल्या, तं = त्या, रेणुकं = रेणुक गणेश्वराला, समालोक्य = पाहून, मुनि: = अगस्त्यमुनी, प्राञ्जलि: = हात जोडून, बभाषे = म्हणाले.

**भावार्थ** : अशा रीतीने शिवयोगध्यानात बसलेल्या रेणुकाचार्यांना पाहून अगस्त्यमहर्षी हात जोडून त्यांना विनंती करतात.।।७२।।

**शिवयोगविशेषज्ञ शिवज्ञानमहोदधे।**
**समस्तवेदशास्त्रादिव्यवहारधुरन्धर ।।७३।।**
**आलोकमात्रनिर्धूतसर्वसंसारबन्धनः ।**
**स्वच्छन्दचरितोल्लास स्वप्रकाशात्मवच्छिव।।७४।।**
**अवतीर्णमिदं शास्त्रमनवद्यं त्वदाननात्।**
**श्रुत्वा मे मोदते चित्तं ज्योतिः पश्ये शिवाभिधम्।।७५।।**

**अन्वयार्थ** : शिवयोगविशेषज्ञ = शिवयोगाचे वैशिष्ट्य जाणणारा, शिवज्ञानमहोदधे = शिवज्ञानाचा सागर, समस्तवेदशास्त्रादि = संपूर्ण वेद-शास्त्रादींच्या, व्यवहारधुरन्धर = व्यवहारात प्रवीण, आलोकमात्र = केवळ दृष्टि-क्षेपाने, निर्धूतसर्वसंसारबन्धन = संसाराची सर्व बंधने नाहीशी करणारा, स्वच्छन्द-चरितोल्लास = स्वच्छंद आचाराने आनंदित राहणारा, स्वप्रकाशात्मवत् = स्वयंप्रकाशरूप, शिव = शिवस्वरूप गणेश्वरा, त्वदाननात् = तुझ्या मुखातून, अवतीर्णं = प्रकट झालेले, अनवद्यं = दोषरहित, इदं शास्त्रं = हे वीरशैवशास्त्र, श्रुत्वा = ऐकून, मे = माझे, चित्तं = मन, मोदते = आनंदित झाले आहे, आणि शिवाभिधम् = शिव नावाचा, ज्योतिः = प्रकाश, पश्ये = पाहत आहे.

**भावार्थ** : शिवयोगाचे रहस्य विशेषत्वाने जाणलेला, शिवज्ञानाचा सागर, सकलवेदागमपुराणशास्त्रव्यवहारात प्रवीण, केवळ दृष्टिक्षेपाने सकलसंसारबंधनाचे निवारण करणारा, स्वेच्छाचाराचा उल्हास असणारा, स्वप्रकाशस्वरूप, शिवस्वरूप अशा हे गणश्रेष्ठा, आपल्या मुखातून प्रकट झालेले हे वीरशैवशास्त्र ऐकून माझे मन आनंदित झाले. आणि त्यायोगाने मी ज्योतिस्वरूप शिवाचे दर्शन घेत आहे.।।७३-७५।।



**अद्य मे सफलं जन्म गतो मे चित्तविभ्रमः।**
**सञ्जाता पाशविच्छित्तिस्तपांसि फलितानि च।।७६।।**

**अन्वयार्थ** : अद्य: = आज, मे = माझा, जन्म = जन्म, सफलं = सफल झाला, मे = माझा, चित्तविभ्रम: = मनाचा भ्रम, गत: = निवृत्त झाला, पाशविच्छिति: = पाशविच्छेदन, सञ्जाता = झाले, मे = माझी, तपांसि = तपे, फलितानि = सफल झाली.

**भावार्थ** : आज माझा जन्म सफल झाला. माझ्या मनाची भ्रांती फिटली, माझे सर्व पाश तुटून गेले आणि माझी तपे सफल झाली.।।७६।।

**इदानीमेव मे जातं मुनिराजोत्तमोत्तमम्।**
**इतः परं मया नास्ति सदृशो भुरनत्रये।।७७।।**

**अन्वयार्थ** : इदीनीमेव = आताच, मे = मला, मुनिराजोत्तमोत्तमम् = उत्तमात उत्तम असे मुनिश्रेष्ठत्व, जातं = प्राप्त झाले, इत: परं = या पुढे, सृदशो मया = माझ्यासमान, भुवनत्रये = तिन्ही लोकांत, नास्ति = कोणी नाही.

**भावार्थ** : ऋषिगणांत आज मला श्रेष्ठत्व प्राप्त झाले. यापुढे तिन्ही लोकांत माझी बरोबरी करणारा कोणी नाही.।।७७।।

**शास्त्रं तव मुखोद्गीर्णं शिवाद्वैतपरम्परम्।**
**मां विना कस्य लोकेषु श्रोतुमस्ति तपः शुभम्।।७८।।**
**तपसां परिपाकेन शङ्करस्य प्रसादतः।**
**आगतस्त्वं महाभाग मां कुतार्थयितुं गिरा ।।७९।।**

**अन्वयार्थ** : तव = तुझ्या, मुखोद्गीर्णं = मुखातून निघालेले, शिवाद्वैत-परम्परम् = शिवाद्वैत परंपरेचे, शास्त्रं = वीरशैवशास्त्र, श्रोतुं = श्रवण करण्यासाठी, लोकेषु = त्रैलोक्यात, मां विना = माझ्याशिवाय, कस्य = कोणाचे, शुभम् = शुभ, तप: = तप, अस्ति = आहे, तपसां = तपांच्या, परिपाकेन = परिपक्वतेमुळे, शङ्करस्य = शिवाच्या, प्रसादत: = अनुग्रहाने, मां = मला, गिरा = वाणीने, कृतार्थयितुं = कृतार्थ करण्यासाठी, महाभाग = हे भाग्यवंता, त्वं = तू, आगत: = आलास.

**भावार्थ** : आपल्या मुखातून निघालेले हे शिवाद्वैतशास्त्र ऐकण्यासाठी मोठ्या तपश्चर्येची गरज असते. या जगात अशा तपश्चर्येच्या परिपक्वतेमुळे

आणि शिवाच्या अनुग्रहाने मला उपदेश करून कृतार्थ करण्यासाठी आपण अवतार घेऊन आला आहात.॥७८-७९॥

**इति स्तुवन्तं विनयादगस्त्यं मुनिपुङ्गवम्।**
**आलोक्य करुणादृष्ट्या बभाषे स गणेश्वरः।।८०।।**

**अन्वयार्थ** : इति = अशा रीतीने, विनयात् = भक्तीने, स्तुवन्तं = स्तुति करणाऱ्या, मुनिपुङ्गवं = मुनिश्रेष्ठ, अगस्त्यं = अगस्त्याकडे, करुणादृष्ट्या = कृपादृष्टीने, आलोक्य = पाहून, सः = तो, गणेश्वरः = रेणुक गणेश्वर, बभाषे = म्हणाला.

**भावार्थ** : भक्तीने स्तुती करणाऱ्या अगस्त्यमहर्षीकडे करुणामय दृष्टीने पाहून श्रीरेणुकगणेश्वर असे म्हणाले.॥८०॥

**अगस्त्य मुनिशार्दूल तपःसिद्धमनोरथ।**
**त्वां विना शिवशास्त्रस्य कः श्रोतुमधिकारवान्।।८१।।**

**अन्वयार्थ** : तपःसिद्धमनोरथ = तपश्चर्येने मनोरथ सिद्ध झालेल्या, मुनिशार्दूल = मुनिश्रेष्ठ, अगस्त्य = हे अगस्त्या, त्वां विना = तुझ्याशिवाय, शिवशास्त्रस्य = शिवाद्वैत-शास्त्राचे, श्रोतुं = श्रवण करण्यासाठी, कः = कोण, अधिकारवान् = अधिकारी आहे?

**भावार्थ** : तपःसामर्थ्याने मनोरथ पूर्ण झालेल्या हे अगस्त्य मुनिश्रेष्ठा, तुझ्याशिवाय हे शिवशास्त्र ऐकण्याचा अधिकार दुसऱ्या कोणाला आहे? अर्थात् तू एकटाच त्याचा अधिकारी आहेस.॥८१॥

**पात्रं शिवप्रसादस्य भवानेको न चापरः।**
**इति निश्चित्य कथितं मया ते तन्त्रमीदृशम्।।८२।।**

**अन्वयार्थ** : शिवप्रसादस्य = शिवानुग्रहाला, पात्रं = अधिकारी, भवानेकः = आपण एकटेच आहात, न चापरः = दुसरे कोणी नाही, इति = अशा रीतीने, निश्चित्य = निश्चय करून, मया = माझ्याकडून, ईदृशं तन्त्रं = हे वीरशैव तंत्र, ते = तुला, कथितम् = सांगितले गेले.

**भावार्थ** : म्हणून शिवाच्या अनुग्रहास तूच एकटा पात्र आहेस, तुझ्याशिवाय दुसरा कोणी नाही, असा मनाचा निश्चय झाल्यामुळे मी ह्या शिवशास्त्राचा उपदेश तुला केला.॥८२॥



**स्थाप्यतां सर्वलोकेषु तन्त्रमेतत् त्वया मुने।**
**ईदृशं शिवबोधस्य साधनं नास्ति कुत्रचित्।।८३।।**

**अन्वयार्थ** : मुने = हे अगस्त्यमुनी, सर्वलोकेषु = सर्व लोकांत, एतत् = हे, तन्त्रं = वीरशैवतंत्र, त्वया = तुझ्याकडून, स्थाप्यतां = स्थापिले जावे, शिवबोधस्य = शिवज्ञानाचे, ईदृशं = अशा प्रकारचे, साधनं = साधन, कुत्रचित् = कोठेही, नास्ति = नाही.

**भावार्थ** : हे मुनिश्रेष्ठा, शिवज्ञानाच्या उत्पत्तीस या शास्त्राशिवाय दुसरे कोणतेही साधन नाही. म्हणून सर्वोत्तम अशा ह्या वीरशैवतंत्राची सकल लोकांमध्ये तू स्थापना कर.॥८३॥

**रहस्यमेतत् सर्वज्ञः सर्वानुग्राहकः शिवः।**
**अवादीत् सर्वलोकानां सिद्धये पार्वतीपतिः।।८४।।**

**अन्वयार्थ** : सर्वानुग्राहकः = सर्वांवर अनुग्रह करणारा, सर्वज्ञः = सर्वज्ञ, पार्वतीपतिः = पार्वतीचा पती, अशा शिवः = शिवाने, सर्वलोकानां = सर्व लोकांच्या, सिद्धये = भोगमोक्षसिद्धीसाठी, एतद्रहस्यम् = हे वीरशैव रहस्यशास्त्र, अवादीत् = सांगितले आहे.

**भावार्थ** : सर्वज्ञ, सर्वलोकानुग्राहक पार्वतीचा पती अशा परमेश्वराने, जगातील सर्व लोकांना भोग आणि मोक्षाची प्राप्ती व्हावी या हेतूने दयाळू होऊन या रहस्यमय वीरशैवशास्त्राचा उपदेश केला.॥८४॥

**तदिदं शिवसिद्धान्तसाराणामुत्तमोत्तमम्।**
**वेदवेदान्तसर्वस्वं विद्याचारप्रवर्तकम्।।८५।।**
**वीरमाहेश्वरग्राह्यं शिवाद्वैतप्रकाशकम्।**
**परीक्षितेभ्यो दातव्यं शिष्येभ्यो नान्यथा क्वचित्।।८६।।**

**अन्वयार्थ** : शिवसिद्धान्तसाराणां = अठ्ठावीस आगमांच्या सारामध्ये, उत्तमोत्तमम् = सर्वश्रेष्ठ, वेदवेदान्तसर्वस्वं = वेद आणि उपनिषदांचे साररूप असे, विद्याचारप्रवर्तकम् = ज्ञान आणि क्रियांचे निरूपण करणारे, वीरमाहेश्वरग्राह्यं = वीरमाहेश्वरांकडून स्वीकारलेले, शिवाद्वैतप्रकाशकम् = शिवाद्वैताचे प्रकाशन

करणारे, तदिदं = ते हे वीरशैवशास्त्र, परीक्षितेभ्य: = परीक्षिलेल्या, शिष्येभ्य: = शिष्यांना, दातव्यं = दिले पाहिजे, नान्यथा क्वचित् = दुसऱ्या कोणालाही नाही.

**भावार्थ** : कामिकादिवातुलान्त अठ्ठावीस दिव्यागमांचे सारसर्वस्व असलेले, चारी वेद व बत्तीस उपनिषदांचे सार असे, ज्ञान आणि क्रिया या दोहोंचे निरूपण करणारे, वीरमाहेश्वरांनी अंगीकारलेले, परशिवाद्वैताचे प्रतिपादन करणारे, वीरशैव षट्स्थल शिवयोगमार्गाचे निरूपण करणारे हे शास्त्र, परीक्षा घेऊन योग्य ठरलेल्या शिष्याला शिकवावे. अन्य कोणाला याचा उपदेश करू नये.॥८५-८६॥

**एतच्छ्रवणमात्रेण सर्वेषां पापसंक्षय:।**
**अवतीर्णं मया भूमौ शास्त्रस्यास्य प्रवृत्तये।।**
**प्रवर्तय शिवाद्वैतं त्वमपि ज्ञानमीदृशम्।।८७।।**

**अन्वयार्थ** : एतच्छ्रवणमात्रेण = ह्याचे श्रवण कल्याने, सर्वेषां = सर्वांच्या, पापसंक्षय: = पापांचा नाश होतो, अस्य = ह्या, शास्त्रस्य = शास्त्राचे, प्रवृत्तये = प्रवर्तन करण्यासाठी, भूमौ = भूलोकात, मया = मी, अवतीर्णं = अवतार घेतला आहे, त्वमपि = तू सुद्धा, ईदृशं = अशा ह्या, शिवाद्वैतं = शिवाद्वैत, ज्ञानं = ज्ञानाचे, प्रवर्तय = प्रवर्तन कर.

**भावार्थ** : या शास्त्राचे श्रवण केल्याने सर्वांच्या पापांचा नाश होतो. म्हणून शिवाच्या आज्ञेने भूलोकात ह्या वीरशैवशास्त्राचे प्रवर्तन करण्यासाठी अर्थात् स्थापनेसाठी मी अवतार घेऊन आलो आहे. हे अगस्त्या, तूही या शिवाद्वैतशास्त्राच्या रहस्यज्ञानाचा जगामध्ये प्रचार कर.॥८७॥

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ लिङ्गस्थलान्तर्गत ऐक्यस्थले स्वीकृतप्रसादिस्थलादि-नवविधस्थलप्रसङ्गो नाम विंशतितम: परिच्छेद:।***

**विसावा परिच्छेद समाप्त.**

○○○

# एकविसावा परिच्छेद

## विभीषणास अभीष्टदान

**इत्युक्त्वा पश्यतस्तस्य पुरस्तादेव रेणुक:।**
**अन्तर्दधे महादेवं चिन्तयन्नन्तरात्मना।।१।।**

**अन्वयार्थ** : रेणुक: = रेणुक गणेश्वर, इति = अशा रीतीने, उक्त्वा = अगस्तीमुनीला सांगून, अन्तरात्मना = आपल्या मनाने, महादेवं = शिवाचे, चिन्तयन् = चिंतन करीत, पश्यत: = ते पाहात असतानाच, तस्य = त्याच्या (अगस्तींच्या) पुरस्तादेव = समोरूनच, अन्तर्दधे = अंतर्धान पावले.

**भावार्थ** : श्रीरेणुक अशा रीतीने अगस्त्यमुनींना उपदेश करून अंत:करणात परमात्म्याचे स्मरण करीत, अगस्त्यमुनी त्यांच्याकडे पाहत असतानाच त्यांच्या समोरून अंतर्धान पावले.॥१॥

**य इदं शिवसिद्धान्तं वीरशैवमतं परम्।**
**शृणोति शुद्धमनसा स याति परमां गतिम्।।२।।**

**अन्वयार्थ** : य: = जो, वीरशैवमतं = वीरशैवधर्मसंमत, परम् = उत्कृष्ट असा, इदं = हा, शिवसिद्धान्तं = वीरशैव सिद्धान्त, शुद्धमनसा = परिशुद्ध मनाने, शृणोति = श्रवण करतो, स: = तो, परमां गतिं = परम गतीला, याति = जातो.

**भावार्थ** : अंगलिंगषट्स्थलरूप सर्वोत्कृष्ट असा हा वीरशैवांचा शिवसिद्धान्त जो कोणी परिशुद्ध मनाने श्रवण करील त्याला परमुक्ती प्राप्त होईल.॥२॥

**स्वच्छन्दाचाररसिक: स्वेच्छानिर्मितविग्रह:।**
**आससाद पुरीं लङ्कां रेणुको गणनाथक:।।३।।**

**अन्वयार्थ** : स्वच्छन्दाचाररसिक: = निर्मल स्वेच्छाचारी, स्वेच्छानिर्मित-विग्रह: = आपल्या इच्छेप्रमाणे देह धारण करणारा, गणनायक: = गणांचा नायक, रेणुक: = रेणुक, लङ्कां पुरीं = लंकापुरीला, आससाद = आला.

**भावार्थ** : स्वच्छंदाचाराची आवड असणारे, आपल्या इच्छेप्रमाणे देहधारण करण्याचे सामर्थ्य असणारे, गणांमध्ये श्रेष्ठ असे श्रीरेणुक लंकानगरीस आले.॥३॥

**समागतं महाभागं सर्वागमविशारदम्।**
**विभीषणः समालोक्य गेहं प्रवेशयन्निजम्।।४।।**

**अन्वयार्थ** : सर्वागमविशारदम् = सर्व आगमांत पारंगत असे, आगतं = आपल्या नगरीत आलेल्या, तं = त्या, महाभागं = श्रेष्ठ अशा रेणुकगणेश्वराला, समालोक्य = पाहून, विभीषणः = विभीषणाने, निजं = आपल्या, गृहं = राजवाड्यात, प्रावेशयत् = त्याचा प्रवेश करविला. (त्याचे स्वागत केले).

**भावार्थ** : कामिकादिवातुलांत दिव्यागमांचे विशेषज्ञ, महामहिमाशाली असे श्रीरेणुकाचार्य आलेले पाहून विभीषणाने आपल्या राजवाड्यात त्यांचे स्वागत केले.॥४॥

**भद्रासने निजे रम्ये निवेश्य गणनायकम्।**
**अर्घ्यपाद्यादिभिः सर्वैरुपचारैरपूजयत्।।५।।**

**अन्वयार्थ** : निजे = आपल्या, रम्ये = रमणीय अशा, भद्रासने = सिंहासनावर, गणनायकं = गणनायक रेणुकाचार्याला, निवेश्य = बसवून, सर्वैः = सर्व प्रकारच्या, अर्घ्यपाद्यादिभिः = अर्घ्यपाद्यादी, उपचारैः = उपचारांनी, अपूजयत् = पूजा केली.

**भावार्थ** : गणनायक अशा श्रीरेणुकांना आपल्या रमणीय सिंहासनावर बसवून विभीषणाने अर्घ्यपाद्यादी उपचारांनी त्यांची यथाविधी पादपूजा केली.॥५॥

**पूजितेन प्रसन्नेन रेणुकेन निरूपितः।**
**निषसाद तदभ्याशे स निजासनमाश्रितः।।६।।**

**अन्वयार्थ** : पूजितेन = पूजा केल्यामुळे, प्रसन्नेन = प्रसन्न झालेल्या, रेणुकेन = रेणुकाकडून, निरूपितः = आदेशप्राप्त, सः = तो विभीषण, तदभ्याशे = त्याच्या समीप, निजासनमाश्रितः = आपल्या दुसऱ्या आसनावर, निषसाद = बसला.



**भावार्थ** : पूजेने प्रसन्न झालेल्या श्रीरेणुकाचार्यांच्या आज्ञेप्रमाणे विभीषण समीप असलेल्या दुसऱ्या आसनावर बसला.॥६॥

**आबभाषे गणेन्दं तं कृताञ्जलिर्विभीषणः।**
**मानुषाकारसम्पन्नं साक्षाच्छिवमिवापरम्।।७।।**

**अन्वयार्थ** : मानुषाकारसम्पन्नं = मानवी देह धारण केलेल्या, साक्षात् = प्रत्यक्ष, अपरं = दुसरा, शिवमिव = शिवासारखा असणाऱ्या, तं = त्या, गणेन्द्रं = गणेश्वराला, विभीषणः = विभीषणाने, कृताञ्जलिः = हात जोडून, आबभाषे = विज्ञापना केली.

**भावार्थ** : त्यानंतर विभीषणाने आपले हात जोडून मनुष्य देहधारी, दुसरे साक्षात् शिवच अशा रेणुकगणेंद्राना उद्देशून विनंती केली.॥७॥

**रेणुक त्वां गणाधीश शिवज्ञानपरायण।**
**अवतीर्णं महीमेनामिति सम्यक् श्रुतं मया।।८।।**

**अन्वयार्थ** : शिवज्ञानपरायण = शिवाद्वैतज्ञाननिष्ठ, गणाधीश = गणांचा अधिपती, रेणुक = हे रेणुका, त्वां = तू, एनां = ह्या, महीम् = भूमीवर, अवतीर्णं = अवतार घेतला, इति = असे, मया = मी, सम्यक् = चांगल्याप्रकारे, श्रुतम् = ऐकले होते.

**भावार्थ** : शिवज्ञानपरायण, गणाधिपती, हे रेणुका, आपण या भूलोकात अवतार घेतला आहे असे लोकांकडून मी ऐकले होते.॥८॥

**मद्भाग्यगौरवादद्य समायास्त्वं पुरीमिमाम्।**
**कथं भाग्यविहीनानां सुलभाः स्युर्भवादृशाः।।९।।**

**अन्वयार्थ** : मम = माझ्या, भाग्यगौरवात् = सौभाग्यामुळे, अद्य = आज, त्वं = तू, इमाम् = ह्या, पुरीं = नगरीत, समायाः = आलास, भाग्यहीनानां = भाग्य नसलेल्यांना, भवादृशाः = आपणांसारखे लोक, सुलभाः = सुलभ, कथं स्युः = कसे होणार?

**भावार्थ** : माझे विशेष भाग्य म्हणून आज आपण माझ्या नगरीत आगमन केले आहे. भाग्यहीनांना आपणासारख्याच्या दर्शनाचा लाभ कोठून होणार? अर्थात् होणार नाही.॥९॥

**मत्समो नास्ति लोकेषु भाग्यातिशयवत्तया।**
**यस्य गेहं स्वयं प्राप्तो भवान् साक्षान्महेश्वरः।।१०।।**

**अन्वयार्थ** : साक्षान्महेश्वरः = प्रत्यक्ष शिवासारखे असणारे, भवान् = आपण, स्वयं = स्वतः होऊन, यस्य = ज्या माझ्या, गेहं = राजगृहाला, प्राप्तः = आला म्हणून, लोकेषु = लोकांमध्ये, भाग्यातिशयवत्तया = भाग्यातिशयाने (भाग्यशाली), मत्समः = माझ्यासारख्या, नास्ति = कोणी नाही.

**भावार्थ** : हे रेणुका, भूलोकात अवतार धारण केलेले आपण साक्षात् महेश्वरच आहात. आपण स्वतः माझ्या घरी आगमन केल्यामुळे माझ्यासारखा श्रेष्ठ भाग्यशाली या जगात दुसरा कोणी नाही.॥१०॥

**कृतार्था मे पुरी ह्येषा कृतार्थो राक्षसान्वयः।**
**जीवितं च कृतार्थं मे यस्य त्वं दृष्टिगोचरः।।११।।**

**अन्वयार्थ** : यस्य = ज्या मला, त्वं = तू, दृष्टिगोचरः = दिसलास, त्यामुळे मे = माझी, एषा = ही, पुरी = लंकानगरी, हि = निश्चयाने, कृतार्था = कृतार्थ झाली, राक्षसान्वयः = राक्षसांचा वंश, कृतार्थः = कृतार्थ झाला, च = आणि, मे = माझे, जीवितं = जीवन, कृतार्थम् = सार्थक झाले.

**भावार्थ** : एवढेच नव्हे तर, हे रेणुका, आपल्या दर्शनाने माझी ही लंकानगरी धन्य झाली, राक्षसवंश कृतार्थ झाला, इतकेच नाही तर माझ्या जन्माचेही सार्थक झाले.॥११॥

**इति ब्रुवाणं कल्याणं राक्षसेन्द्रं गणेश्वरः।**
**बभाषे सस्मितो वाणीं विश्वोल्लासकरीं शुभाम्।।१२।।**

**अन्वयार्थ** : इति = अशा रीतीने, कल्याणं = शुभवचन, ब्रुवाणं = बोलणाऱ्या, राक्षसेन्द्रं = राक्षसाधिपती विभीषणाला, गणेश्वरः = रेणुक गणेश्वर,



सस्मितः = मंदस्मिताने, विश्वोल्लासकरीं = सर्वांना आनंद देणारे, शुभां = मंगलमय, वाणीं = वचन, बभाषे = बोलला.

**भावार्थ** : अशा रीतीने शुभवचन बोलणाऱ्या राक्षसश्रेष्ठ विभीषणाला उद्देशून श्रीरेणुकगणेश्वर मंदस्मित करून, विश्वातील सर्व मानवांना उल्हासजनक अशा मंगलमय वाणीने बोलू लागले.॥१२॥

**विभीषण महाभाग जाने त्वां धर्मकोविदम्।**
**त्वां विना कस्य लोकेषु जायते भक्तिरीदृशी।।१३।।**

**अन्वयार्थ** : महाभाग = भाग्यवंत, विभीषण = हे विभीषणा, त्वां = तुला, धर्मकोविदं = धर्मज्ञ म्हणून, जाने = जाणतो, लोकेषु = लोकांत, त्वां विना = तुझ्याशिवाय, ईदृशी = अशा प्रकारची, भक्तिः = भक्ती, कस्य = कोणाच्या ठिकाणी, जायते = उत्पन्न होते.

**भावार्थ** : हे भाग्यवंत विभीषणा, तू श्रेष्ठ धर्मज्ञ आणि धर्माचारी असल्याचे मी जाणतो. म्हणून अशी भक्ती तुझ्याशिवाय अन्य कोणाच्या ठिकाणी असेल?॥१३॥

**समस्तशास्त्रसारज्ञं सर्वधर्मपरायणम्।**
**अध्यात्मविद्यानिरतमाहुस्त्वां राक्षसेश्वर।।१४।।**

**अन्वयार्थ** : राक्षसेश्वर = हे राक्षसेश्वरा, त्वां = तुला, समस्तशास्त्रसारज्ञं = सर्व शास्त्रांचे सार जाणणारा, सर्वधर्मपरायणं = सर्व धर्मांत तत्पर राहणारा, अध्यात्मविद्यानिरतं = अध्यात्मविद्येत आसक्त असा, आहुः = म्हणतात.

**भावार्थ** : हे राक्षसेश्वरा, सर्व लोक, तू समस्त शास्त्रांचे रहस्य जाणणारा आहेस, समस्तशिवधर्मतत्पर आहेस, शिवाद्वैतज्ञानयोगरूप अध्यात्मविद्यानिरत आहेस असे सांगतात.॥१४॥

**त्वदीयधर्मसम्पत्तिं श्रुत्वाहं विस्मिताशयः।**
**व्रजन् कैलासमचलं त्वदन्तिकमुपागतः।।१५।।**

**अन्वयार्थ** : कैलासमचलम् = कैलास पर्वताला, व्रजन् = जात असताना, त्वदीयधर्मसम्पत्तिं = तुझ्या धर्माचरणाची कीर्ती, श्रुत्वा = ऐकून, विस्मिताशयः =

आश्चर्यचकित होऊन, अहं =मी, त्वदन्तिकम् = तुझ्याजवळ, आगतः = आलो आहे.

**भावार्थ** : कैलास पर्वतावर जात असताना तुझ्या ठिकाणच्या शिवधर्मसंपत्तीची कीर्ती ऐकून आश्चर्यचकित मनाने मी तुझ्याजवळ आलो आहे.॥१५॥

**प्रीतोऽस्मि तव चारित्रैः शोभनैर्लोकविश्रुतैः।**
**दास्यामि ते वरं साक्षात् प्रार्थयस्व यथेप्सितम्॥१६॥**

**अन्वयार्थ** : लोकविश्रुतैः = जगात प्रसिद्ध झालेले, शोभनैः = मंगलमय अशा, तव = तुझ्या, चारित्रैः = चरित्रामुळे, प्रीतोऽस्मि = मी प्रसन्न झालो आहे, ते = तुला, साक्षात् = प्रत्यक्ष रूपाने, वरं = वर, दास्यामि = देतो, यथेप्सितं = इच्छा असेल ते, प्रार्थयस्व = मागून घे.

**भावार्थ** : जगप्रसिद्ध आणि मंगलमय अशा तुझ्या चरित्रामुळे मी संतुष्ट झालो आहे. मी स्वतः तुला वर देणार आहे. तुला हवे असेल ते माग.॥१६॥

**इति प्रसादसुमुखे भाषमाणे गणेश्वरे।**
**प्रणम्य परया प्रीत्या व्याजहार विभीषणः॥१७॥**

**अन्वयार्थ** : इति = अशा रीतीने, प्रसादसुमुखे = प्रसन्नमुखाचा, गणेश्वरे = गणेश्वर, भाषमाणं = बोलल्यावर, विभीषणः = बिभीषण, परया = श्रेष्ठ, प्रीत्या = भक्तीने, प्रणम्य = नमस्कार करून, व्याजहार = म्हणाला.

**भावार्थ** : प्रसन्नमुख गणेश्वरांचे असे बोलणे ऐकून बिभीषण त्यांना साष्टांगनमन करून अत्यंत भक्तिभावनेने विनंती करू लागला.॥१७॥

**आगमानुग्रहादेव भवतः शिवयोगिनः।**
**दुर्लभाः सर्वलोकानां समपद्यान्त सम्पदः॥१८॥**

**अन्वयार्थ** : भवतः = आपल्यासारखा, शिवयोगिनः = शिवयोग्याच्या, आगमानुग्रहादेव = आगमनरूपी अनुग्रहानेच, सर्वलोकानां = सर्व जनांना, दुर्लभाः = दुर्लभ अशी, सम्पदः = संपत्ती, समपद्यन्त = प्राप्त होते.

**भावार्थ** : हे गणेश्वरा, शिवयोगी अशा आपल्या आगमनरूप अनुग्रहानेच लोकांना दुर्लभ अशी सर्व संपत्ती प्राप्त होते.॥१८॥



**तथापि प्रार्थनीयं मे किञ्चिदस्ति गणेश्वर।**
**सुकृते परिपक्वे हि स्वयं सिद्ध्यति वाञ्छितम्॥१९॥**

**अन्वयार्थ** : गणेश्वर = हे गणेश्वरा, तथापि = तरी सुद्धा, मे = मला, किञ्चित् = थोडीशी, प्रार्थनीयं = प्रार्थना करण्योग्य, अस्ति = आहे, सुकृते = पुण्य, परिपक्वे हि = परिपक्व झाल्यावरच, वाञ्छितं = इच्छिलेले, स्वयं = स्वतः, सिद्ध्यति = सिद्ध होते.

**भावार्थ** : तरी पण हे गणेश्वरा, माझी एक अल्पशी प्रार्थना आहे. पुण्य परिपक्व झाल्याबरोबर मनोरथही आपोआप परिपूर्ण होतात.॥१९॥

**रावणो हि मम भ्राता माहेश्वरशिखामणिः।**
**अदृष्टशत्रुसम्बाधं शशास हि जगत्त्रयम्॥२०॥**

**अन्वयार्थ** : मम = माझा, भ्राता = भाऊ, माहेश्वरशिखामणिः = श्रेष्ठ शिवभक्त, रावणो हि = रावण, अदृष्टशत्रुसम्बाधं = शत्रूंची बाधा नसलेला, जगत्त्रयं = त्रैलोक्याचे, शशास हि = शासन करीत होता.

**भावार्थ** : शिवभक्तांमध्ये शिखामणी असा माझा वडील बंधू रावण कोणाही शत्रूची पीडा न होता तिन्ही लोकांवर राज्य करीत होता.॥२०॥

**यस्य प्रतापमतुलं सोढुमक्षमशक्तयः।**
**इन्द्रादयः सुराः सर्वे राज्यलक्ष्म्या वियोजिताः॥२१॥**

**अन्वयार्थ** : यस्य = ज्याचा, अतुलं = अनुपम, प्रतापं = प्रताप, सोढुं = सहन करण्यास, अक्षमशक्तयः = सामर्थ्य नसलेले, इन्द्रादयः = इंद्रादी, सर्वे = सर्व, सुराः = देव, राज्यलक्ष्म्या = राज्यवैभवापासून, वियोजिताः = पारखे झाले.

**भावार्थ** : अतुल प्रतापी अशा रावणाचा पराक्रम असह्य झाल्यामुळे इंद्रादी देव आपापल्या राज्यवैभवाला पारखे झाले. तात्पर्य असे की इंद्रादी सर्व देवांचा त्याने पराभव केला.॥२१॥

**स तु कालवशेनैव स्वचरित्रविपर्ययात्।**
**रणे विष्णवतारेण रामेण निहतोऽभवत्॥२२॥**

**अन्वयार्थ** : स तु = असा पराक्रमी रावण, कालवशेनैव = कालाच्या प्रभावाने, स्वचारित्रविपर्ययात् = आपल्या विसंगत चारित्र्यामुळे, विष्ण्ववतारेण = विष्णूचा अवतार अशा, रामेण = रामाकडून, रणे = युद्धात, निहतोऽभवत् = मारला गेला.

**भावार्थ** : असा पराक्रमशाली रावण कालौघात चारित्र्यभ्रष्ट झाल्यामुळे विष्णूचा अवतार अशा रामाकडून रणांगणात मारला गेला.॥२२॥

**स तु रामशराविद्धः कण्ठस्खलितजीवितः।**
**अवशिष्टं समालोक्य मामवादीत् सुदुःखितः॥२३॥**

**अन्वयार्थ** : रामशराविद्धः = रामाच्या बाणाने घायाळ झालेला, कण्ठ-स्खलितजीवितः = कंठात प्राण धरून, स तु = तो रावण, अवशिष्टं = उरलेल्या, मां = मला, समालोक्य = पाहून, सुदुःखितः = अत्यंत दुःखी होऊन, अवादीत् = म्हणाला.

**भावार्थ** : रामाच्या बाणाने घायाळ झालेला तो रावण कंठात प्राण धरून, राक्षसांपैकी जिवंत उरलेल्या एकमात्र माझ्याकडे पाहून अत्यंत दुःखित स्वराने बोलू लागला.॥२३॥

**विभीषण विशेषज्ञ महाबुद्धे सुधार्मिक।**
**अवशिष्टोऽसि वंशस्य रक्षसां भाग्यगौरवात्॥२४॥**

**अन्वयार्थ** : सुधार्मिक = धर्माचरणशील, महाबुद्धे = महाबुद्धिशाली, विशेषज्ञ = विचक्षण अशा, विभीषण = हे विभीषण, रक्षसां = राक्षसांच्या, वंशस्य = वंशाच्या, भाग्यगौरवात् = सौभाग्याने, अवशिष्टोऽसि = तू जिवंत उरलास.

**भावार्थ** : महाबुद्धिशाली, धर्माचारशील, विचक्षण अशा हे विभीषण, राक्षसवंशाच्या सौभाग्याने तू एकटाच जिवंत राहिलास.॥२४॥

**वयमज्ञानसम्पन्ना महत्सु द्रोहकारिणः।**
**ईदृशीं तु गतिं प्राप्ता दुस्तरा हि विधिस्थितिः॥२५॥**



**अन्वयार्थ** : अज्ञानसम्पन्नाः = अज्ञानी होऊन, महत्सु = मोठ्यांच्या विषयी, द्रोहकारिणः = द्रोह करणारे, वयं = आम्ही, ईदृशीं = अशा प्रकारच्या, दुर्गतिं = दुर्गतीला, प्राप्ताः = प्राप्त झालो आहोत, हि = निश्चयाने, विधिस्थितिः = विधिलिखित, दुस्तरा = अनुल्लंघनीय आहे.

**भावार्थ** : अज्ञानाने ग्रस्त असे आम्ही सर्व मोठ्यांच्या विषयी द्रोह केल्यामुळे अशा दुःखावस्थेला प्राप्त झाली आहोत. दैवगती मोठी दुस्तर असते हेच खरे. तिला पार करणे साध्य नसते.॥२५॥

**नवकं लिङ्गकोटीनां प्रतिष्ठाप्यमिह स्थले।**
**इति सङ्कल्पितं पूर्वं मया तदवशिष्यते॥२६॥**

**अन्वयार्थ** : इह स्थले = या भूमीत, लिङ्गकोटीनां नवकं = नऊ कोटी लिंगांची, प्रतिष्ठाप्यम् = प्रतिष्ठापना करावी, इति = असा, पूर्वं = पूर्वकाळी, मया = माझ्याकडून, सङ्कल्पितं = संकल्प केला गेला आहे, तदवशिष्यते = त्यापैकी काही उरला आहे.

**भावार्थ** : ह्या लंकानगरीत नऊ कोटी शिवलिंगांची स्थापना करावी असा संकल्प मी पूर्वी केला होता. तरीपण तो संकल्प पूर्ण न होता थोडा शिल्लक आहे.॥२६॥

**कोटिषट्कं तु लिङ्गानां मया साधु प्रतिष्ठितम्।**
**कोटित्रयं तु लिङ्गानां स्थापनीयमतस्त्वया॥२७॥**

**अन्वयार्थ** : कोटिषट्कं तु = सहा कोटी, लिङ्गानां = लिंगांची, मया = माझ्याकडून, साधु = उत्तम प्रकारे, प्रतिष्ठितं = स्थापना झाली आहे, अतः = त्यासाठी, लिङ्गानां = लिंगांची, कोटित्रयं तु = तीन कोटी, त्वया = तुझ्याकडून स्थापनीयम् = स्थापना व्हावी.

**भावार्थ** : सहा कोटी शिवलिंगांची स्थापना मी शास्त्रानुसार केली आहे. परंतु माझ्या संकल्पाप्रमाणे अजून उरलेल्या तीन कोटी शिवलिंगांची स्थापना तू करावीस.॥२७॥

**इति तस्य वचः श्रुत्वा दीनबुद्धेर्मरिष्यतः।**
**तथा साधु करोमीति प्रतिज्ञातं मया तथा।।२८।।**

**अन्वयार्थ** : दीनबुद्धेः = दीन बुद्धीच्या, मरिष्यतः = मरणोन्मुख अशा, तस्य = त्या रावणाचे, इति = अशा प्रकारचे, वचः = बोलणे, श्रुत्वा = ऐकून, साधु = ठीक आहे, तथा करोमि = मी तसेच करतो, इति = असे, मया = माझ्याकडून, तथा प्रतिज्ञातं = तशी प्रतिज्ञा केली गेली.

**भावार्थ** : मरणोन्मुख, दीनबुद्धी अशा रावणाचे बोलणे ऐकून 'बरे आहे, तीन कोटी शिवलिंगांची स्थापना शास्त्रविधीप्रकारे करतो' अशी प्रतिज्ञा मी त्यावेळी केली.॥२८॥

**युगपच्छिवलिङ्गानां कोटित्रयमनुत्तमम्।**
**प्रतिष्ठाप्यं यथाशास्त्रमिति मे निश्चयोऽभवत्।।२९।।**

**अन्वयार्थ** : अनुत्तमम् = अत्युत्तम अशा, शिवलिङ्गानां = शिवलिंगाचे, कोटित्रयं = तीन कोटी, युगपत् = एकाच वेळी, यथाशास्त्रं = शास्त्रपद्धतीने, प्रतिष्ठाप्यम् = प्रतिष्ठापना केली पाहिजे, इति = असा, मे = माझा, निश्चयोऽभवत् = निश्चय झाला.

**भावार्थ** : अत्युत्तम अशा तीन कोटी शिवलिंगांची विधीप्रकारे स्थापना एकाच वेळी करावी असा मी निश्चय केला आहे.॥२९॥

**लिङ्गकोटित्रयस्येह युगपत् स्थापनाविधौ।**
**अविदन्नेकमाचार्यमहमेवमवस्थितः ।।३०।।**

**अन्वयार्थ** : इह = ह्या लंकानगरीत, लिङ्गकोटित्रयस्य = तीन कोटी-लिंगांची, युगपत् = एकाच वेळी, स्थापनाविधौ = स्थापनेसाठी, एकमाचार्यं = मुख्य आचार्य, अविदन् = अनुपलब्ध झाल्याने, एवम् = अशा प्रकारे, अहम् = मी अवस्थितः = राहिला आहे.

**भावार्थ** : या लंकानगरीत एकाच वेळी तीन कोटी शिवलिंगांची प्रतिष्ठापना करण्यास समर्थ असा आचार्य न आढळल्यामुळे मी आतापर्यंत निराश झालो होतो.॥३०॥



**शिवशास्त्रविशेषज्ञ शिवज्ञाननिधिर्भवान्।**
**आचार्यभावमासाद्य मम पूरय वाञ्छितम्।।३१।।**

**अन्वयार्थ** : शिवशास्त्रविशेषज्ञः = शिवशास्त्राचे वैशिष्ट्य जाणणारे, शिवज्ञाननिधिः = शिवज्ञानाचे भांडार असे, भवान् = आपण, आचार्यभावं = तीन कोटी आचार्यस्वरूप, आसाद्य = धारण करून, मम = माझे, वाञ्छितं = इच्छिलेले, पूरय = पूर्ण करावे.

**भावार्थ** : शिवशास्त्ररहस्यज्ञ, शिवज्ञानाचा सागर असलेल्या हे रेणुकाचार्या, आपण एकाच वेळी तीन कोटी गुरूंचे रूप धारण करून माझे मनोरथ पूर्ण करावेत.॥३१॥

**तस्येति वचनं श्रुत्वा राक्षसेन्द्रस्य धीमतः।**
**तथेति प्रतिशुश्राव सर्वज्ञो गणनायकः।।३२।।**

**अन्वयार्थ** : धीमतः = बुद्धिमान अशा, राक्षसेन्द्रस्य = राक्षसेश्वर अशा, तस्य = त्या बिभीषणाचे, इति = अशा प्रकारचे, वचनं = वचन, श्रुत्वा = ऐकून, सर्वज्ञः = सर्वज्ञ, गणनायकः = गणांचा नायक अशा रेणुकाने, तथेति = तसे होवो म्हणून, प्रतिशुश्राव = मान्य केले.

**भावार्थ** : सर्वज्ञ, गणनायक श्री रेणुकाचार्यांनी राक्षसराज विभीषणाचे बोलणे ऐकून 'तसेच होवो' अशी अनुमती दिली. अर्थात् त्यांनी विभीषणाची प्रार्थना मान्य केली.॥३२॥

**ततः सन्तुष्टचित्तस्य पौलस्त्यस्येष्टसिद्धये।**
**कोटित्रयं तु लिङ्गानां यथाशास्त्रं यथाविधि।।**
**त्रिकोट्याचार्यरूपेण स्थापितं तेन तत्क्षणे।।३३।।**

**अन्वयार्थ** : तत्र = लंकेत, संतुष्टचित्तस्य = संतुष्ट मनाच्या, पौलस्त्यस्य = बिभीषणाच्या, इष्टसिद्धये = इष्टार्थसिद्धीसाठी, त्रिकोट्याचार्यरूपेण = तीन कोटी आचार्यांचे रूप धारण केलेल्या, तेन = त्या रेणुकाचार्याने, तत्क्षणे = तत्काल, लिङ्गानां = लिंगांची, कोटित्रयं तु = तीन कोटी, यथाशास्त्र = शास्त्रानुसार, यथाविधि = विधीप्रमाणे, स्थापितम् = स्थापना केली.

**भावार्थ** : संतुष्टचित्त झालेल्या विभीषणाच्या मनोरथसिद्धीसाठी श्री रेणुकाचार्यांनी तीन कोटी गुरूंचे रूप धारण करून त्या लंकानगरीत तत्क्षणी तीन कोटी शिवलिंगांची शास्त्रविधिवत् स्थापना केली.॥३३॥

**तादृशं तस्य माहात्म्यं समालोक्य विभीषणः।**
**प्रणनाम मुहुर्भक्त्या पादयोस्तस्य विस्मितः॥३४॥**

**अन्वयार्थ** : विभीषणः = विभीषणाने, तस्य = त्या रेणुकाचार्यांचे, तादृशं = अशा प्रकारचे, माहात्म्यं = माहात्म्य, समालोक्य = पाहून, विस्मितः = आश्चर्यचकित होऊन, भक्त्या = भक्तीने, पादयोः = पायांशी, मुहुः = पुन्हा, प्रणनाम = नमस्कार केला.

**भावार्थ** : श्रीरेणुकाचार्यांचा अशा प्रकारचा महिमा पाहून विभीषण आश्चर्यचकित झाला. त्यांच्या पायाशी असाधारण भक्तिभावनेने त्याने पुन्हा नमन केले.॥३४॥

**प्रणतं विनयोपेतं प्रहृष्टं राक्षसेश्वरम्।**
**अनुगृह्य स्वमाहात्म्याद् रेणुकोऽन्तर्हितोऽभवत्॥३५॥**

**अन्वयार्थ** : विनयोपेतं = विनयाने युक्त, प्रहृष्टं = संतुष्ट, प्रणतं = नमस्कार केलेल्या, राक्षसेश्वरम् = राक्षसेश्वर विभीषणावर, अनुगृह्य = अनुग्रह करून, रेणुकः = रेणुकाचार्य, स्वमाहात्म्यात् = आपल्या महिम्याने, अन्तर्हितोऽभवत् = अंतर्धान पावले.

**भावार्थ** : अशा रीतीने नमस्कार केलेल्या, विनयांकित, संतुष्ट, राक्षस-सार्वभौम विभीषणावर अनुग्रह करून श्रीरेणुकाचार्य आपल्या महिम्याने अंतर्धान पावले.॥३५॥

**विभीषणोऽपि हृष्टात्मा रेणुकस्य प्रसादतः।**
**शिवभक्तिरसासक्तः स्थिरराज्यमपालयत्॥३६॥**

**अन्वयार्थ** : रेणुकस्य = रेणुकाचार्यांच्या, प्रसादतः = अनुग्रहाने, हृष्टात्मा = संतुष्ट मनाच्या, विभीषणोऽपि = विभीषणाने सुद्धा, शिवभक्तिरसासक्तः = शिव-भक्तिरसात अनुरक्त होऊन, स्थिरराज्यं = स्थिर राज्याचे, अपालयत् = पालन केले.



**भावार्थ** : श्रीरेणुकाचार्यांच्या अनुग्रहामुळे संतुष्ट झालेला शिवभक्ति-रूपरसास्वादासक्त विभीषण चिरकाल आपल्या प्रजेचे पालन करीत राहिला.॥३६॥

**रेणुकोऽपि महातेजाः सञ्चरन् क्षितिमण्डले।**
**प्रच्छन्नश्च प्रकाशश्च परमाद्वैतभावितः॥३७॥**
**कांश्चिद् दृष्टिनिपातेन करुणारसवर्षिणा।**
**अपरानुपदेशेन शिवाद्वैताभिमर्शिना॥३८॥**
**अन्यांश्च सहवासेन समस्तमलहारिणा।**
**कृतार्थयन् जनान् सर्वान् कृतिनः पक्वकर्मिणः॥३९॥**
**दर्शयित्वा निजाधिक्यं शिवदर्शनलालसः।**
**खण्डयित्वा दुराचारान् पाषण्डान् भिन्नदर्शनान्॥४०॥**
**यन्त्रमन्त्रकलासिद्धान् विमतान् सिद्धमण्डलान्।**
**विजित्य स्वप्रभावेण स्थापयित्वा शिवागमान्॥**
**आजगाम निजावासं कोल्लिपाक्यभिधं पुरम्॥४१॥**

**अन्वयार्थ** : महातेजाः = महातेजस्वी, रेणुकोऽपि = रेणुकाचार्यसुद्धा, क्षितिमण्डले = भूमंडळात, प्रच्छन्नः = गुप्तपणे, च = आणि, प्रकाशः = प्रकट रूपाने, संचरन् = संसार करीत, परमाद्वैतभावितः = उत्कृष्ट अशा शिवाद्वैत-भावनेने युक्त होऊन, कांश्चित् = काही लोकांना, करुणारसवर्षिणा = कारुण्यपूर्ण अशा, दृष्टिनिपातेन = दृष्टिक्षेपाने, अपरान् = दुसऱ्यांना, शिवाद्वैताभिमर्शिना = शिवाद्वैतविमर्शाने युक्त, उपदेशेन = उपदेशाने, अन्यांश्च = अन्य लोकांना, समस्तमलहारिणा = संपूर्ण दोष दूर करणाऱ्या, सहवासेन = आपल्या सहवासाने, पक्वकर्मिणः = पुण्यपरिपाक झालेल्या, कृतिनः = सुकृती अशा, सर्वान् = सर्व, जनान् = जनांना, कृतार्थयन् = कृतार्थ करीत, निजाधिक्यं = आपले महत्त्व, दर्शयित्वा = दाखवून, दुराचारान् = दुराचारी अशा, पाषण्डान् = पाखंडी, भिन्न-दर्शनान् = अन्य दर्शनांना, खण्डयित्वा = खंडन करून, यन्त्रमन्त्रकलासिद्धान् = यंत्र आणि मंत्रकलेत सिद्धी प्राप्त केलेल्या, विमतान् = कापालिकादी मतांचे, सिद्धमण्डलान् = सिद्धांच्या समूहांना, स्वप्रभावेण = आपल्या प्रभावाने,

विजित्य = जिंकून, शिवागमान् = शिवागमांचा सिद्धान्त, स्थापयित्वा = स्थापन करून, शिवदर्शनलालसः = शिवदर्शनाच्या उत्कण्ठेने, निजावासं = आपले निवासस्थान अशा, कोल्लिपाक्याभिधं = कोल्लिपाक नावाच्या, पुरं = नगराला, आजगाम = परत आले.

**भावार्थ** : महातेजस्वी, शिवमतप्रसारधुरंधर असे श्रीरेणुकाचार्य शिवाद्वैतभावनासंपन्न होऊन भूलोकात सातशे वर्षे गुप्त राहून पुन्हा सातशे वर्षे प्रकट होऊन संचार करीत, काहींना आपल्या कृपाकटाक्षाने पाहून, काहींना शिवाद्वैतज्ञानप्रकाशक उपदेश करून, काहींना मलत्रयनिवारक अशा आपल्या सहवासाने कृतार्थ करीत, आणखी काहींना कर्तव्यकुशल करीत, काहींचा कर्मपरिपाक करीत, अत्यंत आश्चर्यकारक असे आपले माहात्म्य दाखवून, दुराचारी, पाखंडी, तसेच अन्य नास्तिक दर्शनांचे वादविवादाने खंडन करीत, यंत्रतंत्रमंत्रादी चौसष्ट कलांमध्ये सिद्धी प्राप्त केलेल्या कापालिकादी मतांचे खर्परगोरक्षादी नवकोटी सिद्धांच्या समूहाला आपल्या माहात्म्याने जिंकून, कामिकादिवातुलान्त शिवागमांतील शिवसिद्धान्ताची प्रतिष्ठापना करून शिवदर्शन लालसेने आपले मुख्य स्थान अशा कोल्लिपाकास (कोलनुपाकास) परत आले.॥३७-४१॥

**तत्र सम्भावितः सर्वैर्जनैः शिवपरायणैः।**
**सोमनाथाभिधानस्य शिवस्य प्राप मन्दिरम्॥४२॥**

**अन्वयार्थ** : तत्र = कुल्यपाक (कोलनुपाक) क्षेत्रात, शिवपरायणैः = शिवभक्तिसंपन्न, सर्वैः = सर्व, जनैः = जनांकडून, सम्भावितः = सत्कारित रेणुकाचार्य, सोमनाथाभिधानस्य = सोमनाथ नावाच्या, शिवस्य मन्दिरम् = शिवमंदिराला, प्राप = पोचले.

**भावार्थ** : त्या कोल्लिपाकात असलेल्या सकल शिवभक्तांकडून होणारा सत्कार स्वीकारील, श्रीरेणुकाचार्य सोमनाथ देवालयास आले.॥४२॥

**पश्यतां तत्र सर्वेषां भक्तानां शिवयोगिनाम्।**
**तन्वानो विस्मयं भावैस्तुष्टाव परमेश्वरम्॥४३॥**



**अन्वयार्थ** : तत्र = त्या मंदिरात, पश्यतां = पाहात असलेल्या, सर्वेषां = सर्व, भक्तानां = भक्तांना, शिवयोगिनाम् = शिवयोग्यांना, भावैः = आपल्या निर्मल गुणांनी, विस्मयं तन्वानः = आश्चर्यचकित करीत, परमेश्वरम् = परमेश्वराची, तुष्टाव = स्तुती केली.

**भावार्थ** : तेथे त्यांना पाहत असलेल्या सकल भक्तांना व शिवयोग्यांना आपल्या निर्मल गुणांनी आश्चर्यचकित करीत त्यांनी परशिवाची स्तुती करण्यास प्रारंभ केला.॥४३॥

**देव देव जगन्नाथ जगत्कारणकारण।**
**ब्रह्मविष्णुसुराधीशवन्द्यमानपदाम्बुज ॥४४॥**

**अन्वयार्थ** : देवदेव = दे देवाधिदेव, जगन्नाथ = जगाचा अधिपती, जगत्कारणकारण = जगाच्या उत्पत्तीला असलेल्या कारणाचेही कारण असा, ब्रह्मविष्णुसुराधीश = ब्रह्माविष्णू आदी देवांच्या अधीशाकडून, वन्द्यमानपदाम्बुज = वंदनीय पदकमल असणारा असा तू आहेस.

**भावार्थ** : सकल देवांचा स्वामी अशा शिवा, तू सर्व जगाचा अधिपती आहेस, सर्व जगाच्या उदयास कारण अशा बिंदूमायादींना सुद्धा तूच कारण आहेस. ब्रह्माविष्णू आदी सर्व श्रेष्ठ देव तुझ्या चरणकमलाची सेवा करतात.॥४४॥

**संसारनाटकभ्रान्तिकलानिर्वहणप्रद ।**
**समस्तवेदवेदान्तपरिबोधितवैभव ॥४५॥**

**अन्वयार्थ** : संसारनाटक = संसाररूपी नाटकाची, भ्रान्तिकलानिर्वहणप्रद = भ्रांतीवर विजय मिळवून देणारा आहेस, समस्त = सर्व, वेदवेदान्त = वेदोपनिषदांकडून, परिबोधितवैभव = बोधिलेल्या वैभवाने युक्त आहेस.

**भावार्थ** : तुझ्या आश्रितांची जननमरणात्मक संसाररूप नाटकाची भ्रांती तू दूर करतोस. सकल वेदोपनिषदे तुझ्या वैभवाची स्तुती गातात.॥४५॥

**संसारवैद्य सर्वज्ञ सर्वशक्तिनिरङ्कुश।**
**सच्चिदानन्द सर्वस्व परमाकाशविग्रह॥४६॥**

**अन्वयार्थ** : संसारवैद्य = भवरोगवैद्य, सर्वज्ञ = सर्वज्ञ, सर्वशक्ति = सर्व शक्तिमान, निरङ्कुश = स्वतंत्र, सच्चिदानंद = सच्चिदानंदस्वरूप, सर्वस्व = पूर्ण, परमाकाशविग्रह = चिदाकाशकाय आहेस.

**भावार्थ** : हे परमात्म्या तू भवरोगवैद्य, सर्वज्ञ, सर्वकर्तृत्वादी महाशक्तिसंपन्न आणि निरंकुशही आहेस. तू सच्चिदानंदस्वरूप असून महाचिदाकाश हीच तुझी मूर्ती होय.॥४६॥

**समस्तजगदाधारज्योतिर्लिङ्गविजृम्भण ।**
**सदाशिवमुखानेकदिव्यमूर्तिकलाधर ।।४७।।**

**अन्वयार्थ** : समस्तजगदाधार = सकल जगांचा आधार, ज्योतिर्लिङ्ग-विजृम्भण = ज्योतिर्लिंगाच्या रूपाने प्रकाशित होणारा, सदाशिवमुखानेक = सदाशिवादि अनेक, दिव्यमूर्तिकलाधर = तेजोमय रूपे धारण करणारा तू आहेस.

**भावार्थ** : तूच सकल जगाचा आधार आहेस. या जगात ज्योतिर्लिंग-स्वरूपाने तूच दिसतोस. सदाशिव, रुद्र, भर्गादी अनेक लीलारूपे तू धारण करतोस.॥४७॥

**गुणत्रयपदातीत मलत्रयविनाशन।**
**जगत्त्रयविलासात्मन् श्रुतित्रयविलोचन।।४८।।**

**अन्वयार्थ** : गुणत्रयपदातीत = सत्त्वादि त्रिगुणातीत, मलत्रयविनाशन = आणवादी मलत्रयाचा नाश करणारा, जगत्त्रयविलासात्मन् = त्रैलोक्याची पंचकृत्यादी लीला करणारा, श्रुतित्रयविलोचन = वेदत्रयरूप त्रिलोचनधारी आहेस.

**भावार्थ** : तू सत्त्वादिगुणत्रयातीत आहेस. आणवादिमलत्रयाचा नाशक आहेस. त्रैलोक्याची सृष्टिसंरक्षणादी पंचकर्मे करणे ही तुझी लीला आहे. ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद हे तुझे तीन नेत्र आहेत.॥४८॥

**पाहि मां परमेशान पाहि मां पार्वतीपते।**
**त्वदाज्ञया मयैतावत्कालमात्रं महीतले।।**
**अचारि भवदुक्तानामागमानां प्रसिद्धये।।४९।।**



**अन्वयार्थ** : पार्वतीपते = पार्वतीच्या पते, पाहि माम् = माझे रक्षण कर, परमेशान = हे परमेश्वरा, पाहि माम् = माझे रक्षण कर, त्वदाज्ञया = तुझ्या आज्ञेने, मया = मी, एतावत्कालमात्रं = इसताक काळ, भवदुक्तानां = तुझ्याकडून उपदेशिलेल्या, आगमानां = आगमांच्या, प्रसिद्धये = प्रसिद्धीसाठी, महीतले = भूमंडळावर, अचारि = संचार केला.

**भावार्थ** : अशा हे परमेश्वरा, माझे रक्षण कर. हे पार्वतीपते, माझे रक्षण कर. तुझ्या आज्ञेप्रमाणे मी आजपर्यंत या भूतलावर तू सांगितलेल्या शिवागमांतील आशयाचा प्रचार करण्यासाठी संचार केला.॥४९॥

**अतः परं स्वरूपं ते प्राप्तुकामोऽस्मि शङ्कर।**
**अन्तरं देहि मे किञ्चिदनुकम्पाविशेषतः।।५०।।**

**अन्वयार्थ** : शङ्कर = हे शंकरा, अतः परं = यापुढे, ते = तुझ्या, स्वरूपं = स्वरूपाला, प्राप्तुकामोऽस्मि = प्राप्त होऊ इच्छितो, अनुकम्पाविशेषतः = विशेष दया दाखवून, किञ्चित् = थोडासा, मे = मला, अन्तरं = अवकाश, देहि = द्या.

**भावार्थ** : हे शंकरा आता मी तुझ्या निजस्वरूपात ऐक्य पावण्याची इच्छा बाळगून आहे. म्हणून विशेष कृपा करून तुझ्या ठिकाणी ऐक्य पावण्यासाठी मला थोडासा अवकाश दे.॥५०॥

**इत्युक्ते गणनायकेन सहसा लिङ्गात् ततः शाङ्करात्**
**वत्सागच्छ महानुभाव भवतो भक्त्या प्रसन्नोऽस्म्यहम्।**
**इत्युच्चैरगदाद् वचस्तनुभृतामाश्चर्यमासीत्तदा**
**दिव्यो दुन्दुभिराननाद गगने पुष्पं ववर्षुर्गणाः।।५१।।**

**अन्वयार्थ** : गणनायकेन = गणेश्वर रेणुकाचार्याकडून, इति = अशा रीतीने, उक्ते = प्रार्थना केल्यावर, शाङ्करात् = शंकराच्या, ततः = त्या, लिङ्गात् = सोमेश्वरलिंगापासून, सहसा = तत्क्षणी, महानुभाव = दृढ बुद्धीच्या, वत्स = वत्सा, आगच्छ = ये, भवतः = तुझ्या, भक्तीने, अहं = मी, प्रसन्नोऽस्मि = प्रसन्न झालो आहे, इति = अशी, उच्चैः = उच्च स्वराने, वचः = वाणी अगदात् = झाली, तदा = त्यावेळी, तनुभृतां = जीवांना, आश्चर्यमासीत् = आश्चर्य वाटले,

दिव्यः = देवलोकाच्या, दुन्दुभिः = दुंदुभी, आननाद = वाजू लागल्या, गगने = आकाशातून, गणाः = शिवगणांनी, पुष्पं = पुष्पांची, ववर्षुः = वृष्टी केली.

**भावार्थ** : अशा प्रकारे रेणुक गणेश्वरांनी प्रार्थना केल्यावर तत्क्षणी त्या सोमेश्वर लिंगातून — 'वेदागममाता विशेषनिश्चयबुद्धिसंपन्न वत्सा, रेणुका, तुझ्या भक्तिविशेषाने मी प्रसन्न झालो आहे, ये' — अशी परशिवाची हाक ऐकू आली. ती ऐकून सकल जनांना आश्चर्य वाटले. अंतरिक्षात देवदुंदुभी वाजू लागल्या, शिवगणांनी पुष्पवृष्टी केली.॥५१॥

**श्रुत्वा लिङ्गाद् वचनमुदितं शाङ्करं सानुकम्पं**
**संहृष्टात्मा गणपतिरथो ज्योतिषा दीप्यमानः।**
**जातोत्कण्ठैः परमनुचरैर्योगिभिः स्तूयमानो**
**ज्योतिर्लिङ्गं परमनुविशत् स्वप्रकाशं तदानीम्।।५२।।**

**अन्वयार्थ** : अथ = पुष्पवृष्टीच्या नंतर, संहृष्टात्मा = संतुष्ट चित्ताचा, गणपतिः = गणाधीश रेणुक, ज्योतिषा = शिवप्रकाशाने, दीप्यमानः = प्रकाशमान होऊन, लिङ्गात् = सोमेश्वर लिंगापासून, उदितं = निघालेल्या, सानुकम्पं = कृपायुक्त, शाङ्करं = शंकराचे, वचनं = वचन, श्रुत्वा = ऐकून, जातोत्कण्ठैः = आश्चर्यचकित झालेले, अनुचरैः = आपले सहचारी अशा, योगिभिः = शिवयोग्यां-कडून, स्तूयमानः = स्तुती करून घेत, तदानीं = त्यावेळी, परं = सर्वोत्कृष्ट, स्वप्रकाशं = स्वयंप्रकाशरूप, ज्योतिर्लिङ्गं = ज्योतिर्लिंगात, अनुविशत् = सामरस्याने प्रवेशला.

**भावार्थ** : त्या सोमेश्वरलिंगातून बाहेर पडलेले दयामय असे वचन ऐकून रेणुकगणेश्वर संतुष्ट अंतःकरणाने, शिवतेजाने तळपत, आपल्या आजूबाजूचे शिवयोगी आश्चर्यकित होऊन स्तुती करीत असतानाच, सर्वोत्कृष्ट निजप्रकाशरूप अशा त्या प्रसिद्ध ज्योतिर्मय सोमेश्वरलिंगात सामरस्याने प्रवेश करून ऐक्य पावले.॥५२॥

**लीने तस्मिन् शाङ्करे स्वप्रकाशे**
**दिव्याकारे रेणुके सिद्धनाथे।**



**सर्वो लोको विस्मिताभूत्तदानीं**
**शैवी भक्तिः सप्रमाणा बभूव।।५३।।**

**अन्वयार्थ** : दिव्याकारे = मनोहरस्वरूप, सिद्धनाथे = सिद्धांचे नाथ, रेणुके = रेणुक, स्वप्रकाशे = स्वयंप्रकाश अशा, शाङ्करे = शंकराच्या, तस्मिन् = त्या सोमेश्वर महालिंगात, लीने = लीन झाल्यावर, तदानीं = त्यावेळी, सर्वः = सर्व, लोकः = लोक, विस्मितोऽभूत् = आश्चर्यचकित झाले, शैवी भक्तिः = शिवभक्ती, सप्रमाणा = प्रमाणित, बभूव = झाली.

**भावार्थ** : दिव्य देहधारी असलेले श्रीरेणुकगणनायक स्वप्रकाशमय अशा त्या सोमेश्वरलिंगात ऐक्य पावले, त्यावेळी सकल जनांना आश्चर्य वाटले. तेव्हापासून शिवभक्ती ही सर्वोत्कृष्ट होय हे प्रत्यक्ष प्रमाणाने सिद्ध झाले.॥५३॥

**श्रीवेदागमवीरशैवसरणिं श्रीषट्स्थलोद्यन्मणिं**
**श्रीजीवेश्वरयोगपद्मतरणिं श्रीगोप्यचिन्तामणिम्।**
**श्रीसिद्धान्तशिखामणिं लिखयिता यस्तं लिखित्वा परान्**
**श्रुत्वा श्रावयिता स याति विमलां भुक्तिं च मुक्तिं पराम्।।५४।।**

**अन्वयार्थ** : श्रीवेदागमवीरशैवसरणिं = मंगलकर वेदागमांतील वीरशैव सिद्धान्ताला अनुसरून असणारी, श्रीषट्स्थलोद्यन्मणिं = मंगलकर षट्स्थलरूपी तेजस्वी रत्नासारखा, श्रीजीवेश्वरयोगपद्मतरणिं = मंगलकर जीवेश्वराच्या ऐक्यरूपी कमलाला विकसित करणाऱ्या सूर्याप्रमाणे असणारा, श्रीगोप्यचिन्तामणिम् = मंगलमय शिवरहस्यार्थाचे प्रकाशन करणाऱ्या चिंतामणीसारखा असणारा, तं = असा तो, श्रीसिद्धान्तशिखामणिं = श्रीसिद्धान्तशिखामणी नावाचा वीरशैव-शास्त्रग्रंथ, यः = जो, लिखित्वा = स्वतः लिहून, परान् = दुसऱ्याकडून, लिखयिता = लिहवितो, श्रुत्वा = स्वतः ऐकून, श्रावयिता = दुसऱ्यांना ऐकवितो, सः = तो, विमलां = निर्मल अशा, भुक्तिं = भोग, च = आणि, परां = श्रेष्ठ अशी, मुक्तिं = मुक्ती, याति = प्राप्त करतो.

**भावार्थ** : हा सिद्धान्तशिखामणी ग्रंथ वेदागमांमध्ये प्रतिपादन केलेल्या वीरशैव सिद्धान्तपद्धतीचा अवलंब करणारा आहे. मंगलमय अशा एकशेएक

अवांतर स्थलांनी युक्त अंगलिंगमय षट्स्थलांचा मार्ग प्रकाशमान करणारे हे उज्ज्वल रत्न आहे. शिवजीव ऐक्यज्ञानाचे कमल विकसित करणारा हा सूर्य आहे. शिवाद्वैतज्ञानाचे गुप्तधन प्राप्त करून देणारा चिंतामणी आहे. आणि सर्व सिद्धांतांमध्ये श्रेष्ठ असल्यामुळे याला श्रीसिद्धान्तशिखामणी हे अन्वर्थक नाव प्राप्त झाले आहे. असा हा श्रीसिद्धान्तशिखामणी ग्रंथ जो स्वत: लिहितो. इतरांकडून लिहवितो, स्वत: ऐकतो अथवा इतरांना ऐकवितो, तो निर्मल असे सुखोपभोग आणि सर्वोत्कृष्ट अशी मुक्ती मिळवितो.।।५४।।

***ॐ तत्सत् इति श्रीशिवगीतेषु सिद्धान्तागमेषु शिवाद्वैतविद्यायां शिवयोगशास्त्रे श्रीरेणुकागस्त्य संवादे वीरशैवधर्मनिर्णये श्रीशिवयोगिशिवाचार्यविरचिते श्रीसिद्धान्तशिखामणौ विभीषणाभीष्टवरप्रदानप्रसङ्गो नाम एकविंशतितमः परिच्छेदः।***

**एकविसावा परिच्छेद समाप्त.**

## ।। श्रीसिद्धान्तशिखामणी ग्रंथ समाप्त ।।

ooo